

यावलीचा

स्वातंत्र्य-संग्राम

वैद्य ह. वा. देशपांडे

यावली शहीद-स्मारक-समितीच्या विद्यमानें प्रकाशित

यावलीचा स्वातंत्र्य-संग्राम

१९४२

लेखक—

हरिहर वामन देशपांडे

वैद्य, वाङ्मय विशारद् अमरावती

प्रस्तावनालेखक—वीर वामनराव जोशी

सोल एजंट—नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर.

किंमत ६ रुपये.

प्रकाशकः-पंजाबराव बापुराव यावलीकर
अध्यक्ष, यावली शहीद स्मारक समिती.

या पुस्तकाच्या प्रथमावृत्तीचें सर्व उत्पन्न यावली शहीद स्मारक समितीला देण्यांत येईल.

मुखपृष्ठावरील चित्र श्री. दिनानाथराव दलाल यांचें आहे.


मुद्रक-

पृष्ठें १ ते १६० व प्रस्तावना वगैरे
लक्ष्मणराव मणाजी पटले,
रामेश्वर प्रिंटिंग प्रेस,
सिताबर्डी, नागपूर.


पृष्ठें १६१ ते २८८
शिवराम रामचन्द्र तिडके,
प्रभाकर प्रिंटिंग प्रेस,
गणेशपेठ, नागपूर.

सादर त्रिवार प्रणाम

सन १९४२ च्या आगस्ट क्रांतींत जीं जीं खेडीं ब्रिटिश सत्तेच्या विरुद्ध लढलीं, ज्यांनी राष्ट्रध्वजाच्या संरक्षणार्थ आपलें सर्वस्व अर्पण केलें, ज्यांनी स्वातंत्र्याच्या बलिवेदीवर आपल्या तरुणांचें रक्त सांडलें व ज्यांची भूमि हुतात्म्यांच्या चिताभस्माने पावन झाली त्या सर्व भारतीय खेड्यांच्या वीरतेला, त्यागाला, स्वराष्ट्रभक्तीला व राष्ट्रध्वजावरील प्रीतीला यावलीच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा हा इतिहास आदरपूर्वक त्रिवार प्रणाम करीत आहे.



दे. भ. शरच्चंद्र बोस व वृद्ध फकीर अकबरशाहा



वीर वामनराव जोशी

प्रस्तावना

माझे मित्र सुप्रसिद्ध विदर्भीय लेखक श्री. हरिहरराव उर्फ भय्यासाहेब देशपांडे यांनी लिहिलेल्या यावलीच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा परिचय प्रस्तावनेच्या द्वारें वाचकांना करून देण्याची कामगिरी यावलीकर मित्र पंजाबराव यांनी मजवर सोपविली आहे. एखाद्या ग्रंथाचा, वाचनाने प्रत्यक्ष परिचय करून घेण्यापूर्वी वा देण्यापूर्वी प्रस्तावनेच्या सहाय्याने परोक्ष परिचय करून घेणें वा देणें हें एवढ्याचसाठीं अवश्य असतें कीं त्यायोगें ग्रंथांतील विषयाचें यथार्थ-ज्ञान होणें वाचकांना सुकर व्हावें. परंतु त्यासाठीं वस्तुतः ग्रंथकाराने स्वतःच प्रस्तावना लिहिणें सोयीचें असतें. कारण ग्रंथकाराचें हृद्गत ग्रंथकारच अधिक चांगलें जाणत असतो. इतरांना तें कळलेलें असलें तरी त्याच्याइतकी इतरांना त्याची अचुक ओळख पटलेली नसतें. तेव्हा या यावलीच्या स्वातंत्र्यसंग्रामाला श्री. हरिहरराव देशपांडे यांनीच प्रस्तावना लिहिली असती तर ती अधिक युक्त व उपयुक्तहि झाली असती. परंतु त्यांनी ती जबाबदारी स्वतः न पत्करितां मित्र पंजाबरावाकडून आग्रहाने माझ्यावर लादविली आणि प्रेमळ मित्राची भीड मोडवेना म्हणून मीं ती नाइलाजानें पत्करली. तेव्हा आता श्री. हरिहरराव देशपांडे यांचें हृद्गत अगर त्यांच्या या सुंदर व सुरस ग्रंथाचें रहस्य वाचकांच्या नीट लक्षांत येण्यासाठी प्रस्तावनेच्या रुपाने मी जें मार्गदर्शन करीन तें जर त्यांच्या कल्पनेशीं तंतोतंत जुळलें नाही अगर सपशेल चुकीचें ठरलें तर त्याबद्दल त्यांनी मला दोष देऊं नये अशी अपेक्षा मीं केल्यास ती अयोग्य ठरेल असें मला वाटत नाही. कारण त्यांचें हृद्गत सांगण्याचा मीं कितीहि इमानेंइतबारें यत्न केला तरी त्यांत माझा स्वतःचा असा थोडा बहुत अंश निःसंशय रहाणारच. इतकेंच नव्हे तर असाहि संभव आहे कीं त्यांचें नांव पुढे करून कळत वा न कळत मी माझेंच हृद्गत वाचकांच्या पुढें मांडीन व त्यामुळे लोकांची कदाचित दिशाभूलहि होईल कोणी सांगावें ? ग्रंथकाराचें हृद्गत अचुक कळणें हें किती कठीण असतें याचा उत्कृष्ट नमुना म्हणजे गीतेवरील नानाप्रकारच्या टीका. प्रत्येक टीकाकार आपला अर्थ बिनचूक आहे असें छातीला हात लावून सांगतो, परंतु कोणत्याहि

टीकाकाराचा कोणाशींहि मेळ बसत नाही. तेव्हा याहि ठिकाणीं असाच गोंधळ होणार नाही कशावरून ? परंतु आतां कांहीहि होणार असलें तरी ग्रंथकाराला व प्रकाशकाला येणाऱ्या भोगाला सादर झालेंच पाहिजे व त्याच्याबरोबर वाचकांनीहि या जुलुमापुढें आपली मान बिनतक्रार वाकविलीच पाहिजे. असो.

यावली हें मागासलेल्या वऱ्हाड प्रांतांतील मूठभर अशिक्षित व निर्धन लोकांच्या वस्तीचें एक छोटेसें खेडे! व त्यानें सन १९४२ सालांत आसेतु-हिमाचलांत उसळलेल्या क्रान्तीच्या प्रचंड वादळांत सांपडून त्याच्या हादऱ्यानें थोडीबहुत हालचाल केली. परंतु तिला "स्वातंत्र्यसंग्रामाचें" भव्य नांव देऊन श्री. हरिहरराव देशपांड्यांनी तिच्यावर एक विस्तृत वर्णनपर ग्रंथ लिहिला. तेव्हा हें गौडबंगाल आहे तरी काय ? असा वाचकांना प्रश्न पडण्याचा संभव आहे व सकृद्दर्शनीं तसें होणें अगदी साहजिकहि आहे. लहान-मोठ्या खेडेगांवांतून अशा मारामाऱ्या अगर दंगेधोपे नेहमीच होत असतात व त्या काळांतहि झालेले होते. परंतु त्यांचें वर्णन करण्यासाठी श्री. हरिहरराव सारख्या प्रथितयश इतिहास लेखकांनीं एवढाले ग्रंथ लिहून काढल्याचीं उदाहरणें मराठी साहित्यांत तरी क्वचितच आढळतील— किंबहुना आढळणारच नाहीत. मग "यावलीच्या" या छोट्याशा गडबडीलाच एवढें महत्त्व कां ? "स्वातंत्र्याची स्फूर्ति" त्या गडबडीच्या मुळाशीं होती एवढें एक कारण तिचें एवढें अवडंबर माजविण्यास पुरेसें आहे काय ? कां तिच्यांत याहून कांही विशेष होतें आणि तो विशेष वाचकांच्या पुढे सांगोपांग मांडण्यासाठी श्री. हरिहरराव यांना हा एवढा प्रचंड उपद्व्याप करावा लागला आहे ? शिवाय तो विशेष तरी इतक्या महत्त्वाचा व मोलाचा होता काय कीं त्याचें यथार्थ दर्शन वाचकांना घडणें सांप्रतच्या कालीं अत्यवश्य आहे. या व अशाच अनेक प्रश्नांचा उलगडा झाल्या वाचून या ग्रंथाचें महत्व वाचकांच्या लक्षांत नीटसें भरेल असें वाटत नाहीं. तेव्हा याबद्दल दोन शब्द लिहिणें भाग आहे.

समग्र ग्रंथ लक्षपूर्वक वाचून पाहिल्यानंतर वाचकांना निश्चितपणें असें आढळून येईल कीं श्री. हरिहररावसारख्या कसलेल्या सूक्ष्मदर्शी लेखकास असें कांही तरी विशेषत्व या अद्भुतरम्य प्रसंगांत सांठलेलें आढळलें म्हणूच त्याने

लेखनाचे एवढे परिश्रम केले व आपलें लेखनकौशल्य खर्ची घालून "या लहान गोष्टीवर हा मोठा ग्रंथ" लिहिला. नाहीतर अशा "अव्यापारेषु व्यापारांत" पडण्याचें त्याला अर्थाअर्थी कांहीच कारण नव्हतें. 'यावली'ची दंगल कितीही छोटी असली तरी ती एक सुटी व अल्प स्थलकालानें मर्यादित झालेली कवडीमोल दंगल नव्हती; तर हिंदुस्थानाच्या पोटांत आज कैक वर्षांपासून पेटलेल्या व प्रत्यहि सतत वाढत असलेल्या एका सर्वव्यापी महाविशाल विराटस्वरूपी क्रांतीच्या अतिप्रखर प्रलयाग्नीचें सांप्रतच्या परिस्थितीचा शीतल पृष्ठभाग फोडून बाहेर पडलेलें तें एक उत्तुंग व तेजःपुंज ज्वालाशृंग होतें व त्यांच्या द्वारें कालगर्भांत वेगाने वृद्धिंगत होत असलेल्या अभूतपूर्व अभिनव क्रांतीचें शुद्धस्वरूप अत्यल्प प्रमाणांत कां होईना परंतु स्पष्ट प्रगट झालेलें होतें. तेव्हा "यावलीचा स्वातंत्र्यसंग्राम" व ही भविष्यकालांत सर्वजगत् व्यापून टाकणारी विराट क्रांति यांचा हा अन्योन्य निकट संबंध वाचकांना समजावून देणें व त्या बरोबरच साधल्यास भावी क्रान्तीच्या यथार्थ स्वरूपाचा पूर्वपरिचय करून देणें ग्रंथकारास अवश्य होतें. तसें त्याने केलें नसतें तर या संग्रामाचें रहस्यच त्यास समजलें नसल्याकारणाने या संग्रामाचें वर्णन करण्यास तो पात्र नाही असेंच दुर्दैवाने म्हणावें लागलें असतें. "या छोट्या गोष्टीचा मोठा ग्रंथ" लिहिण्याचें आमच्या मतें खरें कारण हें आहे. अर्थात हा ग्रंथकाराचा हेतु ग्रंथांत कितपत् सिद्ध झाला आहे हें पाहणें वाचकांचें काम आहे व ते तें करतील अशी आशा आहे.

तथापि अशा उद्देशानें ग्रंथावलोकन करीत असतां वाचकांना एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. हा क्रान्तिशास्त्रावरील स्वतंत्र ग्रंथ नसल्यामुळे क्रान्तीचें शास्त्रोक्त विस्तृत विवेचन यांत कोठेहि स्वतंत्रपणें केलेलें त्यांना फारसें आढळणार नाही व त्यामुळे या संग्रामाचा भावी क्रान्तीशीं असलेला हा अतिनिकट अंगांगी भावसंबंध स्पष्टपणें त्यांच्या लक्षांत भरण्यास क्वचित प्रसंगीं कठीणहि जाईल. तथापि ठिकठिकाणीं तत्कालीन परिस्थितीचीं जीं विस्तृत वर्णन आलीं आहेत तीं लक्षपूर्वक वाचल्यास त्या वर्णनांच्या द्वारें त्या परिस्थितीच्या पृष्ठभागाखालीं नांदत असलेल्या क्रान्तीचें त्यास निदान दिग्दर्शन तरी खात्रीनें होईल अशी आमची समजूत आहे.

परंतु हें दिग्दर्शन होण्यासहि क्रान्तीच्या सत्स्वरूपाचें थोडें तरी पूर्वज्ञान वाचकास असणें अवश्य आहे. कारण त्यावाचून आपणांस दिसत आहे हें खरोखर त्या क्रान्तीदेवतेचेंच रूप आहे अशी त्यास खात्री पटणें शक्य नाहीं. कारण ज्याने देव कधीच पाहिलेला नाही अगर देवासंबंधाने वेडीवांकडी-भलीबुरी-खरीखोटी कोणत्याच प्रकारची कल्पनाहि ज्याच्या डोक्यांत कधी आली नाही, त्याच्यासमोर अकस्मात् देव साक्षात् येऊन उभा राहिला तरी देव म्हणतात तो हाच अशी त्यास ओळख कशी पटणार? खऱ्या-खोट्याची कसोटी पहाण्यासाठी प्रत्यक्ष नसला तर निदान काल्पनिक तरी त्या वस्तूचा पूर्वपरिचय मनुष्यास असावा लागतो आणि म्हणून ग्रंथाचा पूर्वपरिचय करून देण्याच्या हेतूने लिहिलेल्या या प्रस्तावनेंत क्रान्तीसंबंधाच्या कांही ठोकळ कल्पनाशीं वाचकांची गांठ घालून देणें आम्हांस इष्ट वाटतें. तथापि हें करीत असतां क्रान्तीच्या बाह्यांगापेक्षा तिच्या अंतरंगाचाच-म्हणजे क्रान्तिकालांत मानवी मनोव्यापारांत ज्या अनेक घडामोडी व स्थित्यंतरें सारखीं घडून येत असतात त्यांचाच विचार या स्थलीं आम्ही प्रामुख्यानें करणार आहोंत. अर्थात् आमच्या विचारांचें श्री. हरिहरराव यांच्या क्रान्तीविषयक सिद्धान्ताशीं कितपत साम्य असेल हें आम्हीं सांगूं शकत नाहीं. कदाचित त्यांच्यांत साम्यापेक्षां वैषम्यच अधिक असण्याचाहि संभव आहे. तथापि आम्हीं स्वीकारलेली विचारसरणी डोळ्यापुढे ठेवून ग्रंथ वाचल्यास त्यांतील रहस्य समजण्यास वाचकांना बरेंच सोपें होईल अशी आमची कल्पना आहे. असो.

सृष्टींतील सर्व प्राण्यांच्या शिरोभागीं मोठ्या डौलानें नांदणाऱ्या मनुष्य प्राण्याचा प्रपंच आज कसा काय चालला आहे हें पाहूं लागल्यास आपणांस काय आढळून येतें ? ईश्वराची प्रत्यक्ष प्रतिमा म्हणून वाखाणल्या जाणाऱ्या मनुष्य प्राण्याची परिस्थिति इतर कनिष्ठ प्राण्यांच्या परिस्थितीपेक्षा अधिक सुखदायक व प्रगतिपर असावयास पाहिजे, हें उघड आहे. परंतु तशी ती आज आहे काय ? इतर प्राण्यांच्यापेक्षा मनुष्य प्राण्यास निसर्ग देवतेला सुप्रसन्न करण्याचें सामर्थ्य जास्त प्रमाणांत झालें आहे. तेव्हा त्या सामर्थ्याचा योग्य उपयोग करून त्याने आपल्या अशाश्वत व शाश्वत सुख वैभवांत किती पटीनें अधिक भर टाकलेली आहे ? कां सुख संपत्तीच्या तुडुंबलेल्या सरोवरांत डुंबत असतांहि तो पाषाणाप्रमाणे कोरडाच्या कोरडाच राहिला आहे ?

एखाद्या मोठ्या शहरांत जा अगर एखाद्या छोट्या खेड्यांत जा, तेथे एका बाजूला थोड्या मूठभर लोकांचे भव्य व सुंदर प्रासाद दिमाखाने उभे असलेले व त्यांत नाना प्रकारच्या विलासरंगांत दंग झालेले स्त्री पुरुष स्वर्गानंदात तल्लीन झालेले आढळतील, आणि लगेच दुसऱ्या बाजूला काडीमोडीचीं चंद्रमोळी घरें व त्यांत अन्नावाचून तडफडणारी, जीर्ण वस्त्रें परिधान केलेलीं– ' मनुष्य ' या थोर संज्ञेनें ओळखिलीं जाणारीं पाप्यांचीं पितरें दारिद्रीच्या महाभयानक नरकांत सडत–कुजत मरणोन्मुख होऊन पडलेलीं सापडतील. सृष्टिदेवतेनें वाढत्या मानवजातीला पुरून उरेल इतकी सुखसाधन संपत्ति आपल्या भांडागारांत भरून ठेवलेली असतां व ती यथेच्छ लुटण्यांस मानवास सर्रास मुभा दिलेली असतां, इतकेंच नव्हे तर बुद्धिमान मनुष्य प्राणी विज्ञानाच्या सहायाने या सृष्टसंपत्तीची सारखी बिनहरकत लूट करीत असतां मनुष्य वस्ती असलेल्या जमिनीच्या कोणत्याहि भागावर पाऊल ठेवतांच हें हृदय विदारण करणारें सुखोपभोगांतील विषमतेचें भेसूर दृश्य दृष्टीस कां पडावें? विश्वसुंदर मनुष्य प्राण्यानें वसविलेला भूभाग म्हणजे कल्पवृक्षांनीं गजबजलेलें साक्षात नंदनवन असावयास पाहिजे; परंतु प्रत्यक्ष अनुभव पहातां आजचें जग त्रस्त भुताखेतांच्या कर्कश आक्रोशाने हपापून टाकलेलें एक भयाण स्मशान बनून गेलेलें आहे असेंच दुर्दैवाने दृष्टीस पडतें. कोठेहि सुख-समाधान व शांति यांचें नांवनिशाणहि दृष्टीस पडत नाही. जो तो चिंतामग्न व दुःखातिशयाने निराश झालेला विज्ञानाच्या अभिवृद्धीमुळे मानवी प्रपंचास अवश्य असणाऱ्या साधनसंपत्तींत सारखी भर पडत असता मनुष्याच्या जिवाला क्षणाचीहि विश्रान्ति व शांति लाभूं शकत नाहीं हें खरोखरच दुःखदायक आश्चर्य आहे. धर्माची ग्लानि होऊन अधर्म बेसुमार फोफावला म्हणजे समाजावर कोसळणाऱ्या अति भयंकर कहराचें पुराणांतून केलेलें वर्णन, मानवी प्रपंचाच्या आजच्या दुर्दशेच्या वर्णनापुढे निःसंशय फिकेंच पडेल! या पराकाष्टेच्या शोचनीय अवस्थेतून मुक्त कसें व्हावें हा बिकट प्रश्न मानवापुढे आज कैक वर्षांपासून उभा आहे व त्याचें अचुक उत्तर शोधून काढण्यासाठी तो सारखा धडपड करीत आहे. सुदैवाने तें उत्तर आता त्याला सांपडलें असून ' क्रान्ति ' या नांवाने तें त्याने जगांत प्रगट केलें आहे व " इन्किलाब जिंदाबाद " " क्रान्ति चिरायु होवो "

इत्यादि घोषणांनी जगाच्या मेंदूंत तें ठांसून कोंबण्याचा त्याचा रात्रंदिवस प्रयत्न चालू आहे.

परंतु नुसत्या क्रांति शब्दाच्या उच्चाराने तिच्या पोटांत केवढें ब्रम्हांड साठलेलें आहे याची कल्पना सामान्य माणसास होणें शक्य नाही. फार झालें तर आजच्या दुःखमय दुःस्थितीचें तिच्या अगदी उलट असणाऱ्या सुखमय सुस्थितींत रूपांतर होणें अथवा आपल्याभोंवतीं नांदणाऱ्या नरकाचा अकस्मात स्वर्ग बनणें म्हणजे क्रांति एवढें तो फार झालें तर आज समजूं शकेल. परंतु हा नरक कोणीं उत्पन्न केला–कसा उत्पन्न केला आणि त्याचा स्वर्ग कोण बनवूं शकेल कसा बनवूं शकेल–कधीं बनवूं शकेल याबद्दल त्याला समाधान-कारक खुलासा करतां येईल असें वाटत नाहीं. आपल्या सारखेच दोन पायाचे व दोन हाताचे प्राणी मूल्यवान वस्त्रालंकारांनी नटून सजून डौलाने मिरवीत असलेले पहात असतां त्याला आपल्या अंगावरील फाटक्या तुटक्या लकतरांची जाणीव नसते असें नाही. ती त्यास जरूर असते व तीमुळे त्यांच्या दुबळ्या अंतःकरणास प्राणांतिक वेदनाही होत असतात. परंतु "तुझ्या व त्यांच्या स्थितींत ही जमीन अस्मानची तफावत कां" असा सवाल त्यास केल्यास त्यांचा जबाब शद्बांनी न देतां कपाळास हात लावून अगर आकाशाकडे बोट दाखवून तो देतो. त्याच्या मनाची अशी दृढ समजूत झालेली असते कीं दैव म्हणा देव म्हणा–या विश्वांत अशी एक बलाढ्य अदृश्य शक्ति आहे कीं जिच्यापुढे कोणाचें कांही चालत नाही व तिनेच मनुष्यामनुष्यांत हा दुर्धर स्थिति भेद निर्माण केला आहे. दुर्दैव बिचाऱ्याचें कीं त्याच्या राशीस लागलेलें हें निष्ठुर दैव अगर त्याच्या मानगुटीस बसलेला हा निर्दय देव त्याच्या कधीच दृष्टीस पडत नाही. व त्याला त्या दैवास अगर देवास या त्याच्या अन्याय्य वर्तनाचा जाब विचारतां येत नाही आणि त्यामुळे त्याला जन्मभर त्यांच्या नांवांने खडे फोडीत बसण्याशिवाय कांही मार्ग राहिलेला नाही.

परंतु दैवाच्या अगर देवाच्या नांवाने रात्रंदिवस आक्रोश करीत बसण्याचें सोडून त्याने क्षणभर डोळे उघडे ठेवून आपल्या भोंवतालीं बारकाईने पाहणी केली तर त्याला चटकन् कळून येईल कीं या अदृश्य दैवापेक्षा त्याचा

मानव बंधूच त्याच्या या दुर्दशेस अधिक कारण झालेला आहे. सृष्टिदेवतेनें आपल्या भांडाराचें दार सर्वांना खुलें ठेवलें असतां त्याच्या हाडामांसाच्या त्याच्या ह्या बंधूनेच त्याचा मार्ग आडवून सृष्टिदेवतेने सर्वांच्या करितां खैरात केलेली सुखसंपत्ति बलात्काराने आपल्या कोठाराकडे वाहून नेण्याचा सारखा सपाटा चालविलेला आहे. खुनी मारेकऱ्याला जसा खून चढतो तशी या लुटारूलाहि एक प्रकारचा खून चढला आहे व त्याच्या धुंदींत आपल्या या अमानुष कर्मानें आपण आपल्या असंख्य बांधवांना दारिद्र्यदुःखाच्या गर्तेत ढकलून त्यांचे खून पाडीत आहोत याचें त्याला भान राहिलेलें नाही. त्याला वाटत असतें, मी करतों हें योग्य व आवश्यकच आहे. कारण तो सृष्टिदेवतेनें संचय करून ठेवलेल्या या अलोट संपत्तीचा स्वतःलाच एकमेव मालक समजत असतो आणि त्यामुळे आपणाशिवाय इतरांनाहि तिचा उपभोग घेण्याचा हक्क आहे असें तो मानीतच नाहीं. इतकेंच नव्हे तर इतर कोणी या संपत्तीकडे आशाळभूत नजरेने पाहूं लागला तर त्याचे लोभाविष्ट पापी डोळे फोडून टाकणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे व तें आपण तत्परतेने बजावलेंच पाहिजे असा त्याचा ठाम सिद्धान्त बनून गेलेला असतो. या अखिल विश्वाचा केंद्र मी-या विश्वाचा स्वामी मी, या विश्वाचा भोक्ता मी, असा उन्मत्त अहंकार त्याच्या हाडींमासीं अभेद्यपणें खिळून गेलेला असतो. आपणाशिवाय इतर मानव हे आपल्या सेवेसाठी व आपल्या सुखासाठीच निर्माण करण्यांत आलेले आहेत व त्यांनी आपल्या गुलामगिरींतच सदैव राबलें पाहिजे; त्यांना जगावयाचें असल्यास त्यांनी केवळ आपल्यासाठीच जगलें पाहिजे व मरावयाचें असल्यास आपल्या कारणींच मेलें पाहिजे; स्वतंत्रपणें जगण्याचा अगर मरण्याचा त्यांना बिलकुल हक्क नाही; आपल्या सुखांतच त्याचें सुख-सर्वस्व सांठलेलें आहे. आपल्या सुखानेच त्यांनी सुखी झालें पाहिजे. आपल्या समाधानांत त्यांना समाधान वाटलें पाहिजे; ना स्वतःचें असें निराळें सुख नाही. स्वतःचें असें निराळें दुःखहि नाही. अशा प्रकारच्या विक्षिप्त कल्पनांनी त्यांचा मेंदू बहकून गेलेला असतो. अशा प्रकारच्या विक्षिप्त भावनांनी त्यांचें मन भडकून गेलेलें असतें. त्यांचा जन्मजात 'मी' पणा इतका संकुचित झालेला असतो कीं स्वतःच्या साडेतीन हात देहापलीकडे त्याला कांही दिसतच नाही आणि त्यामुळे इतर मानवांच्या सुखदुःखाशीं समरस होणें त्याला अशक्य होऊन

बसलेलें असतें. आपल्याप्रमाणे इतरांनाहि कांही अस्तित्व आहे, कांही भावना आहेत, कांही सुखदुःख आहे हें मानण्यास तो तयारच होत नाहीं. तो म्हणजे जग व जग म्हणजे तो एवढें एकच विपरीत सत्य त्याच्या विकृत बुद्धीलां पटलेलें असतें व याच मिथ्या सत्याच्या उपासनेंत तो सर्वकाल गर्क झालेला असतो. गीतेंत श्री भगवंतांनीं अशा देहात्मवादी स्वयंनिष्ठ पुरुषाला असुर अशी संज्ञा दिलेली आहे आणि मानवी प्रपंचाच्या आजच्या भयानक दुर्दशेस अशा आसुरी वृत्तीच्या नराधमांचाच स्वयंनिष्ठ दुराचार सर्वस्वीं कारण झालेला आहे. अशा क्रूर पशूंनाहि लाजविणाऱ्या निर्घृण स्वभावाचे अधमाधम मानव—मानवी देह आजच्या उत्क्रान्त अवस्थेस प्राप्त होण्यापूर्वी राक्षसांच्या अक्राळ विक्राळ देहांत वावरत होते व त्यामुळे त्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या या आसुरी संपत्तीची तत्काळ ओळख पटत असे; परंतु मनुष्य प्राणी उत्क्रान्त होतां होतां अशा स्थितीस सांप्रत येऊन पोहोचला कीं त्यांच्या ठिकाणचें राक्षसी देह उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नष्टप्राय झालें व तो निर्माण करीत असलेल्या आजच्या कोमल व सुंदर नरदेहांत संचार करण्याचें दुर्भाग्य या राक्षसी प्रकृतीच्या प्राण्यांना प्राप्त झालें. त्यामुळे पूर्वीचे राक्षस ज्याप्रमाणे एखादा उत्क्रान्त कोमल देहधारी मानव दिसतांच त्याला चटकन सहज लीलेने उचलून आपल्या तोंडांत टाकीत व आपल्या तीक्ष्ण दाढाखालीं रगडून घशाखाली ढकलीत, तसें या उत्क्रान्त मानव शरीरांत वावरत असतां त्यांना आता करितां येईनासें झालें आहे. मनुष्याच्या रक्ताची पिपासा तर कायम आहे; पण त्याच्या नरडीस दांत लावून तें प्राशन करण्याचा सहज सुलभ उपाय तर कायमचा हातचा निसटून गेला. तेव्हा आपली नररक्तलालसा तृप्त करण्यासाठी आज त्याला नवीनच मार्ग शोधून काढावे लागले आहेत—ते मार्ग नवीन व अत्यंत कुशलतेने तयार केलेले असल्यामुळे प्रत्यक्ष रक्ताला आपल्या जिव्हेचा स्पर्शहि न होऊं देतां तो मनुष्याला सहकुटुंब सहपरिवार रक्तशून्य करून टाकतो. आजच्या मानवी आणि प्रपंचांतील आर्थिक विषमतेचें मूळ कारण हा अधमाधम कोटींतील मानव आणि त्याचा परस्वापहारमय स्वार्थलंपट दुष्ट स्वभाव हेंच होय आणि त्याच्या स्वभावांतील हा दोष जोपर्यंत नष्ट होत नाहीं अथवा तो नष्ट होणें प्रयत्नांतीं अशक्य ठरल्यास त्या दोषाचें अभेद्य आश्रयस्थान होऊन बसलेला हा पर-

स्वापहारी पापी चांडाळ या जिवंत मानवी जगाच्या चतुःसीमेबाहेर जोपर्यंत हद्द पार केला जात नाही, तोंपर्यंत आजच्या मानवी जगावर ओढवलेली ही दुर्धर आपत्ति कदापि निवारण व्हावयाची नाही !

मानवी समाजाच्या शरीरांत कायमचें बिऱ्हाड करून त्याला स्वाहा करण्यासाठी सारखा धडपडत असलेला हा व्याधि समूळ नष्ट करून मानवी समाज निरोगी व अजरामर करावयाचा असल्यास त्याच्या विनाशाचाच मार्ग शोधून काढण्यावाचून आता गत्यंतर नाही. भगवंतांनी भगवद्गीतेमध्ये धर्म संस्थापना हें आपलें अवतार कार्य आहे असें सांगून तें कार्य सिद्धीस नेण्यासाठी आपणांस दुष्कृतांचा विनाश करून सुकृतांचें परित्राण करावें लागतें, असें प्रतिपादन केलें आहे. क्रान्ति सिद्ध करावयाची असेल— तिची मानवी समाजांत संस्थापना करावयाची असेल व तिला 'जिंदाबाद' 'चिरायु' करावयाचें असेल तर त्यासाठीहि हा भगवंतांनी सांगितलेला एकच मार्ग अवलंबविणें अवश्य व अपरिहार्य झालें आहे. याहून अन्य तरणोपाय अद्यापि मानवी बुद्धीला उपलब्ध झालेला नाही.

दुष्कृतांच्या स्वभाव-अगर-प्रकृतिपरिवर्तनानें दुष्कृतांचा विनाश न करिताहि दुष्कृतींचा समाजांतून सर्वतोपरी लोप करतां येतो असें प्रतिपादन करणारा एक ज्ञानी पुरुषांचा वर्ग समाजांत पूर्वी होता; आजहि आहे; पुढेहि राहील. तो या दुष्कृतांच्या प्रकृतिपरिवर्तनाचा उत्तम उपाय म्हणजे "अहिंसा" अगर "अहिंसात्मक असहकार" हा आहे असें निश्चितपणें प्रतिपादित असतो आणि त्याच्या या सिद्धान्तांत कांही मर्यादेपर्यंत सत्याचा अंशहि असतो. परंतु समाजाच्या सांघिक मनाच्या सर्वच अवस्थामध्यें तो सारखाच लागू पडतो असा जो त्यांचा आग्रह आहे तो मात्र अनुभवाच्या कसोटीवर घांसून पाहिल्यास खरा ठरेल असें आम्हास मुळीच वाटत नाही. मानवी समाजांतील घटक म्हणजे मानव जन्ममरणाच्या भोवऱ्यांत विश्वांतील इतर वस्तुप्रमाणेच कायमचे सापडले असल्यामुळे त्यांच्या बेरीजवजाबाकीने मानवी समाज व त्याच्या अंतिम मर्यादा त्या नित्य बदलत असतात आणि या नित्य चालू असलेल्या अवस्थांतरांत मानवी समाजास एक अशी विशिष्ट अवस्था प्राप्त होत

असते कीं ज्या अवस्थेंत उपरिनिर्दिष्ट उपाय एका मर्यादेपासून दुसऱ्या मर्यादेपर्यंत सर्वतोपरी गुणकारी ठरतो. परंतु ही विशिष्ट अवस्था वारंवार येणारी व नेहमी टिकणारी नसते आणि त्यामुळे उत्क्रान्तीच्या मार्गावरील या टप्प्यावर मनुष्य समाज येऊन पोहोचेंपर्यंत त्याला तदितर अनेक अवस्थांतून प्रवास करावा लागतो व त्या अवस्थांत हा उपाय कमी अधिक मानाने कमजोर ठरून मानव समाजास गांठून मारण्यास टपलेल्या महाभयंकर रोगजंतूच्या प्रतिकारार्थ मानवाला अन्य कठोर उपायांचाहि अवलंब करावा लागतो. आणि दुर्दैवाने म्हणा वा सुदैवाने म्हणा, निसर्गाने या अवस्थांचा एकंदर काल फारच लांबलचक ठेव-लेला असल्यामुळे क्रान्तीचा विचार करतांना हा विपरीत काल लक्षांत घेऊनच उपाय योजना करणें भाग पडतें. अर्थात या उपाययोजनेंत हा अहिंसेने प्रकृतिपरिवर्तन करण्याचा उपाय नेहेमी वर्ज्यच मानला जातो असें मुळीच नाही. त्याला त्या योजनेंत स्थान असतें. किंबहुना पहिलें व कायमचें स्थान असतें. परंतु त्याचें रोग निवारणाचें सामर्थ्य कमी पडतें असें आढळून येतांच त्याच्या सहाय्यार्थ "**दमन मार्गाचा**" अंगिकार करावा लागतो. दुष्कृतांच्या परस्वापहाराच्या दुर्वासनेंस उतार पडत नसेल तर त्यांचें परस्वापहाराचें सामर्थ्य तरी नाहींसें करावें अशा उद्देशाने हा **दमन मार्ग** उपयोगांत आणला जातो. परस्वापहारास चटावलेले दुरात्मे ज्या साधनसामुग्रीच्या सहाय्याने आपला समाजविध्वंसनाचा उद्योग सफल करितात तीं सर्व साधनें त्यांच्यापासून हरण करून त्यांच्या पीडेपासून समाजांचें रक्षण करण्याचे जे अनेक प्रयोग समाजवाद्यांनी आज सुरू केले आहेत त्या सर्वांचा समावेश या **दमन मार्गांतच** होतो. सर्पाचा विषदंत उपटून टाकून अथवा वाघाचीं दांतनखें उखडून काढून त्याला निरुपद्रवी करण्यासारखाच हा एक प्रकार आहे. परंतु त्यामुळे परस्वापहारी दुष्कृतांच्या दुर्वासनेचा सर्वस्वी लोप होतो असें मात्र मुळीच नाही. इतकेंच नव्हें तर कधी कधी ही दुर्वासना कमजोर होण्या-ऐवजीं अधिक बलवान होते व परस्वापहाराचे नवेनवे मार्ग शोधून काढून मानवी समाजाची अधिकाधिक हानि करूं लागते. अशा प्रसंगीं आसुरी वृत्तीच्या मनुष्यांच्या संग्रहीच्या साधनांचेंच हरण करून भागत नाही तर त्या साधनांच्या बरोबरच त्याच्या प्रत्यक्ष प्राणांचेंहि हरण करणें पुष्कळदां अवश्य होतें. समा-

जाच्या आचार विचारांत अशी परिस्थिति निर्माण होणें म्हणजेच जुन्या लोकांनी वर्णन केलेली धर्मग्लानि व अधर्माचें अभ्युत्थान होय. अशा अधर्माच्या उन्माद कालांत साधेल त्या उपायांनी 'दुष्टांचा संहार' हा एकच उद्योग समाजहितचिंतकांना करावा लागतो; कारण हें दुष्टसंहाराचें कार्य केल्यावाचून सुकृतांचें-सदाचारी वा निरुपद्रवी मनुष्याचें रक्षण होऊंच शकत नाही आणि सदाचारसंपन्न मानवांच्या आश्रयावाचून समाजांत परस्वापहारशून्य सदाचाराची-अर्थात जुन्या भाषेंत धर्माची संस्थापना होणें अशक्य असतें.

सारांश, क्रान्ति सफल करावयाची असल्यास प्रथम 'परिवर्तन'-तें अपुरें पडूं लागल्यास त्याच्या जोडीस 'दमन' आणि शेवटीं हीं दोन्हीहि कमताकत ठरल्यास त्या दोहोंच्या जोडीस 'संहरण.' या तीन टप्प्यांनीच क्रान्तीचा अखेरचा मुक्काम गांठावा लागतो. परंतु त्याला कांही इलाज नाही. सृष्टीची आहे तीच रचना व आहेत तेच कायदे कायम आहेत तोपर्यंत परस्वापहाराच्या दुर्वासनेने विषमय बनलेल्या वृत्तींचें व प्रवृत्तींचें शुद्धिकरण करण्याच्या कामीं इतर सर्व सौम्य व कठोर साधनें हीनबल ठरल्यानंतर त्यांना जन्म देणारें त्यांचें उगमस्थानच नष्ट करणें हा एकच उपाय शिल्लक रहातो व तोच अमलांत आणावा लागतो. नाहीतर मनुष्यहत्त्येचा दोष पदरीं पडूं नये म्हणून त्याचा अव्हेर केल्यास दुष्टास वांचविण्यासाठी निरुपद्रवी व सद्वृत्त-सुकृतांच्या सर्व स्वनाशाचें पाप शिरावर घेण्यास सिद्ध व्हावें लागतें. तेव्हा अशा परिस्थितींत दुष्टांच्या हातून सुष्टांना अगर दुष्टांच्या अत्याचारांपासून सुष्टांचें रक्षण करणाऱ्यांच्या हातून दुष्टांना, कोणाला तरी मरणें अपरिहार्य असल्यामुळे दुष्टांच्या प्राणापेक्षां त्याच्या अमानुष अत्याचारांना प्रत्यहि बळी पडत असलेल्या अनेक सुवृत्तसुकृतांचे म्हणजे चांगल्या वृत्तींच्या सदाचारी मानवांचे प्राण अधिक मोलाचे मानून दुष्टाचें हनन करणें हा धर्म मानावा लागतो व तो निःसंकोचपणें आचरावा लागतो. वरवर पहाणारांना हा मनुष्यसंहारच होय असें दिसत असलें तरी दुर्जनांच्या हस्तें होणारा सज्जनसंहार व सज्जनांकडून वा त्यांच्या रक्षणकर्त्यांकडून होणारा दुर्जन संहार हे दोन्ही एक नसून त्या दोहोंच्या नैतिक मूल्यांतहि जमीनअस्मानाचें अंतर आहे ही गोष्ट कोणाहि ज्ञानी पुरुषाला नाकबूल करतां यावयाची नाही. इतकेंच नव्हे तर दुष्टांनी सज्जनाचा पूर्णतः

संहार केल्यावरहि त्यांचें मनुष्यहत्त्येचें अघोर कर्म थांबत नाही–ते आपापसांतच एकमेकांचे मुडदे पाडूं लागतात. तसें सज्जनांकडून होत नाही. दुष्ट-संहार पूर्ण होतांच हत्त्याकांड समाप्त होतें असो.

आतापर्यंत क्रांति, तिचें प्रयोजन, तिचें पर्यवसान, तिची संस्थापना करण्यासाठी अवलंबावयाच्या मार्गाचें स्वरूप इत्यादि मुद्यांचें आम्ही संक्षेपतः विवेचन केलें. त्यावरून हें स्पष्ट दिसून येईल कीं मानवी प्रपंचाची दुर्दशा होण्यास दैव अथवा देव कारणीभूत झालेला नसून मानवजातींत उत्पन्न झालेला आसुरी प्रकृतीचा परस्वापहारी स्वार्थलंपट मानवच सर्वतोपरी कारण झालेला आहे आणि या दुर्दशेपासून मानवी प्रपंचास कायमचें मुक्त करावयाचें असेल तर ती जबाबदारी दैवाच्या अगर देवाच्या कपाळीं न मारतां तिचा भार मानव जातींत जन्मास आलेल्या मानवानेच आपल्या शिरावर घेतला पाहिजे. आजपर्यंत मानवाने पृथ्वीच्या पाठीवर केलेली घाण मानवालाच काढावी लागली आहे व त्याने ती काढलेलीहि आहे. आणि वर्तमानकाळीं व भविष्यकाळींहि त्यालाच हें पवित्रीकरणाचें महत्कार्य करावें लागेल व तोच तें करील. भूतकाळीं ज्या ठिकाणीं व ज्या वेळीं असें त्यानें केलें नाही अगर त्यास करतां आलें नाही त्या ठिकाणीं व त्या वेळीं मानव जातीचा तेवढा भाग पृथ्वीच्या पाठीवरून कायमचा लुप्त झालेला आहे. एकमेकांच्याजवळ येण्याच्या साधनांची पूर्वयुगांत फारच कमतरता असल्यामुळे मानवी समाज अनंत लहानमोठ्या भागांत विभागला गेलेला होता व त्यामुळे मानवाच्या उत्कर्षापकर्षाचें—उत्क्रान्ति अपक्रान्तीचें–विकास संकोचाचें हें दृश्य विभागशः अत्यंत मर्यादित स्वरूपांत दृष्टीस पडत असे व या कारणानें त्याला एका प्रकारची विविधता आलेली होती. तथापि क्रान्तीच्या या विविध दृश्यांचा समन्वय केल्यास असें आढळून येईल कीं त्या सर्वांत मानवी स्वभावांतील व आचारांतील वैषम्याचे व साम्याचे नियम सर्वत्र एकच होते. मानवाचा 'मी' पणा अत्यंत संकुचित होऊन तो अमर्याद स्वयंनिष्ठ बनला कीं त्याचा स्वार्थ बेसुमार होऊन त्याचें परस्वापहारांत रूपांतर होतें व अशा परस्वापहारलोलुप घटकांचें सामर्थ्य वाढून त्यांची समाजांत बहुसंख्या होऊं लागली म्हणजे त्याच्या आसुरी अत्याचारांनी समाजाचीं शकलें होऊन समाजाचा

सहस्रावधि मुखांनी विनिपात होतो. सुदैवाने त्या मरणोन्मुख अवस्थेंत त्यास तारणारा कोणी समर्थ पुरुष निर्माण झाला तर ठीक, नाही तर त्या दुर्दैवी व्याधि-जर्जर समाजाचें अखेरीस बलहीनतेमुळे प्राणोत्क्रमण होतें किंवा बलिष्ठ परक्यांच्या हस्ताने त्याचा संहार होतो. असाच निरपवाद नियम सर्वत्र आढळतो. जगाचा इतिहास पाहिल्यास अनेक संस्कृति, अनेक समाज, अनेक राष्ट्रें, अनेक वंश जन्मास आले, वाढले व अशाच प्रकारें शेवटीं मृत्युमुखीं पडून नामशेष झाले. यावरून हें स्पष्ट दिसून येईल कीं गीतेंत सांगितल्याप्रमाणे मानव समाज हा "आत्मैव ह्यात्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः" आहे. हें म्हणणेंच शेवटीं खरें ठरतें. असो. मनुष्याच्या ठिकाणीं व्यक्तिगत व विश्वगत अशा दोन्ही प्रकारचा अहंभाव निसर्गतःच वास करीत असतो आणि व्यक्तित्वापासून उत्क्रान्त होत होत तो अखेरीस विश्वत्वास जाऊन पोहोचतो. त्यामुळे मानवजातींत अशा दोन्ही प्रकारचे पुरुष काळानुसार कमी अधिक प्रमाणांत आढळतात. ज्या प्रमाणे अत्यंत संकुचित 'मी' पणा असणारा स्वार्थासक्त परस्वापहारी आसुरी मानव समाजाच्या अपकर्षास कारण होतो, त्याचप्रमाणे 'मी' पणाचा विकास झाल्यामुळे ज्याच्या ठिकाणीं सांघिक भावनेचा उद्भव व उत्कर्ष होत असतो व त्यामुळे जो समाजाच्या सुखदुःखाशीं व हिताहिताशीं समरस होऊं लागतो असा निस्वार्थी परोपकारी दैवी संपदेनें अलंकृत झालेला मानव मानवी समाजास उत्कर्षाच्या शिखरास नेऊन पोहोचवितो. आसुरी प्रकृतीचा पुरुष समाजास आपलें भक्ष्य समजून त्याचें भक्षण करीत असतो व दैवी प्रकृतीचा पुरुष समाजास आपलें रक्ष्य समजून आपल्या स्वतः-च्या सर्वस्वावर तिलांजली देऊन त्याचें रक्षण करण्यांत सदैव मग्न झालेला असतो. पहिला समाजाच्या देहांत वापरत असतांहि त्याच्या जीवनकलेचा सारखा नाश करतो तर दुसरा त्याचें पोषक द्रव्य बनून त्याच्या जीवनबलाची सारखी वृद्धि करतो. पहिला समाजाची अपक्रांति करणारा असतो तर दुसरा समाजांत आमूलाग्र क्रान्ति घडवून आणीत असतो पहिला स्वतःस समाजाचा देव समजत असतो व त्यास आपल्या सेवेंत राबवीत असतो तर दुसरा समाजास आपला देव मानून त्याच्या सेवेंत राबत असतो. असो.

क्रान्तीच्या भक्ताला पहिल्याने कोणती गोष्ट करणें अत्यावश्यक असेल तर ती ही की समाजघटकांच्या वर्गीकरणाच्या सर्व प्रचलित व रूढ कसोट्या

झुगारून देऊन प्रकृतिभेदाच्या म्हणजे सत्त्वाच्या—गुणाच्या—शीलाच्या कसोटीवर घासून मानवी समाजाचे दैवी व आसुरी असे दोन स्पष्ट विभाग त्याने प्रथम केले पाहिजेत. आज समाजवाद्यांनी पूर्वीच्या सर्व कसोट्या झुगारून देऊन श्रमाची कसोटी उपयोगांत आणली आहे व तिच्या अनुरोधाने श्रमजीवी व भांडवलदार—मजुर व कारखानदार—शेतकरी व जमीनदार अशा प्रकारें समाजाचें वर्गीकरण करण्याचा उद्योग सुरू केलेलाच आहे. हें जें वर्गीकरण करण्यांत आलें आहे त्यांत, समाजाच्या शरीरांत घटक रूपाने नांदणाऱ्या द्रव्यांची म्हणजे मनुष्यांची छाननी करून त्यापैकी समाजाच्या शरीरास अर्थात् जीवनकलेस पोषक होणारीं द्रव्यें कोणतीं व नाशक होणारीं द्रव्यें कोणतीं हें निश्चित करणें व त्या निर्णयानुसार पोषक द्रव्यांची अभिवृद्धि व नाशक द्रव्यांचें उच्चाटन करणें हाच एकमेव उद्देश आहे अशी आमची समजूत आहे. आणि समाजाच्या प्रथमदर्शनीं गोचर होणाऱ्या स्वरूपाच्या म्हणजे आर्थिक परिस्थितीचा विचार करतां ही कसोटी प्रत्यक्ष अनुभावाने पुष्कळ अंशीं बरोबर ठरलेली आहे हेंहि प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. परंतु मनुष्याच्या मानसिक व्यापारांत व शारीरिक व्यापारांत बाह्य परिस्थिती-मुळे पुष्कळदा विसंगति उत्पन्न होत असली तरी मूलतः मनुष्याचे शारीरिक व्यापार हे त्याच्या अव्यक्त मानसिक व्यापाराचेच बाह्य परिस्थितीच्या मिश्रणानें तयार झालेलें व्यक्त स्वरूप आहे ही गोष्ट केव्हांहि अमान्य करतां यावयाची नाही. तेव्हा मनुष्यांचा शारीरिक व्यापाराबरोबर त्यांच्या मानसिक व्यापारांचीहि पूर्ण परीक्षा केल्यावाचून मनुष्याचें वर्गीकरण केल्यास तें केव्हांहि अपुरें व अतिव्याप्ति—अव्याप्ति या दोघांनीयुक्त असेंच होणार हें अगदी उघड आहे. आजचे पूर्वीचे सर्वच भांडवलदार—कारखानदार—अगर जमीनदार जन्मजात भांडवलवाले, कारखानेवाले अगर जमीनवाले होते असें मुळीच नाही. कोणी स्वतः—कोणाचे बाप, कोणाचे आजेपणजे, प्रारंभीं श्रमजीवीच म्हणजे भांडवल नसलेले कारखाना नसलेले अगर जमीन नसलेले, मजुर-दारच होते. कदाचित् प्रामाणिक मजुरदारहि असतील. परंतु त्यांचा पुढचा इतिहास संशोधून पाहिल्यास बहुधा सर्वांच्या बाबतींत असेंच आढळून येईल कीं श्रमाच्या द्वारें लक्ष्मीच्या कृपेचे कण त्यांच्या पदरांत पडूं लागतांच त्यांची बुद्धि चळून त्यांची स्वार्थाची भावना वाढत वाढत परस्वापहारा-

(Exploitation) च्या दुर्वासनेंत तिचें शेवटीं पर्यवसान झालें आणि त्यांनी आपल्या संग्रहीं असलेल्या बुद्धि—पराक्रम—इत्यादि सर्व साधनांचा समाजाच्या इतर घटकांची लूट करण्याकडे मनमुराद उपयोग करून आजचें उच्चपद प्राप्त करून घेतलें. जें पूर्वीच्या लोकांनी केलें तें कमीअधिक प्रमाणांत आजचेहि लोक करीत आहेत आणि क्रान्तीच्या विचारांचा प्रभाव समाजाच्या मनावर उत्तरोत्तर अधिकाधिक पडत न गेल्यास हाच प्रकार पुढेहि असाच दीर्घकाल चालू राहील. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे केवळ श्रमांच्या निकषाने समाजांतील घटकांचें वर्गीकरण करण्याने श्रमजीवि वर्गांत ज्या घटकांचा समावेश करावयास नको त्याचा न कळत समावेश केला जातो व त्यांच्या संगतीनें खऱ्या श्रमजीवि घटकांच्या वाढीस अडथळा उत्पन्न होतो. हा अडथळा टाळावयाचा असल्यास श्रमास शीलाची जोड देऊन त्यांच्या संयुक्त निकषाच्या सहाय्यानेंच समाजाचें वर्गीकरण करणें क्रान्तीच्या शीघ्र विकासाच्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरेल असें आम्हांस वाटतें. आर्यांनीं प्राचीन कालीं याच निकषाच्या मदतीनें समाजाचें वर्गीकरण करून समाजरचनेचा एक उत्कृष्ट नमुना तयार केला होता व दीर्घकाल टिकवून दाखविला होता. " शील-श्रम " या नव्या कसोटीलाच पूर्वीचें लोक " गुणकर्म " असें म्हणत आणि या कसोटीला झुगारून तिच्या जागीं ' जन्मा ' च्या कसोटीची स्थापना करण्यांत येई-पर्यंत आर्यांचा संघ अगर समाज सामर्थ्यसंपन्न व नित्य विकासवान असाच राहिला होता. ' जन्मा ' स प्रधानपद प्राप्त होऊन गुणकर्म-अर्थात् शीलश्रम गौण मानले जाऊं लागल्यापासून आर्यांचा सारखा अधःपातच होत गेला. या अधःपताचें चित्र आज हिंदुस्थानांत प्रत्यक्षच पहावयास मिळत आहे. जन्माने ब्राम्हण म्हणून स्वतःस गौरविणारा अगर क्षत्रिय म्हणून आपली प्रतिष्ठा मिर-विणारा अथवा वैश्य म्हणून समाजास आपल्या हातांत खेळवूं पहाणारा खरोखरच एवढ्या श्रेष्ठ पदवीस पात्र आहे काय ? गुणकर्मांच्या कसोटीचें अधिष्ठान जी समाजिक निष्ठा तिचा लवलेश तरी त्यांच्या आचारविचारांत दिसून येत आहे काय ? सारेच आपापल्यापरीने समाजाचें भक्षण करण्या-साठीं टपून बसलेले ! चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे आम्ही सारेच मुक्तकंठाने गोडवे गातों परंतु चातुर्वर्ण्य व्यवस्था अत्यंत श्रेष्ठ अशा समाजनिष्ठेच्या पायावर उभारली गेली होती याची कोणास तरी शुद्ध आहे काय ? ब्राह्मण,

क्षत्रिय व वैश्य यांची तर गोष्टच सोडा, परंतु या तीन वर्णांची सेवा करण्याचें कार्य ज्यांच्या वाट्यास आलें होतें ते शूद्र सुद्धा प्राचीन काळीं चातुर्वर्ण व्यवस्थेंत पूर्ण समाजनिष्ठ होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. उत्तम समाजरचना कोणत्याहि प्रकारची असो, परंतु त्या रचनेचा पाया " अढळ समाजनिष्ठा " हा एकच असू शकतो—व्यक्तिगत स्वयंनिष्ठा हा असूं शकत नाही हें अनेक शतकांच्या अनुभवाने आज निर्विवाद सिद्ध झालें आहे. स्वयंनिष्ठ व स्वार्थासक्त घटकांचे बनलेले समाज आज सर्वत्र दृष्टीस पडत आहेत. परंतु त्यांच्या ठिकाणीं मनुष्याला देव बनविण्याचें सामर्थ्य नाही. त्या समाजरचनेंत स्वार्थलंपटपणा व परस्वापहार यांचीच सारखी वाढ होत असून मनुष्य पशूहूनहि पशु बनत चालला आहे असेंच अनुभवास येत आहे. तेव्हा मानवाच्या ठिकाणीं मानवतेचा पूर्ण विकास घडवून आणावयाचा असेल व त्यासाठी सर्व प्रकारें उपयुक्त होईल अशी समाजाची नवी रचना निर्माण करावयाची असेल तर समाजाच्या हितासाठी तळमळणाऱ्या समाजवाद्यांना समाजघटकांच्या प्रकृतींतील व्यक्तिगत स्वयंनिष्ठा नष्ट करून तिच्या ठिकाणीं समाजनिष्ठेचें आरोपण करणें अत्यवश्य आहे. मनुष्याचें मानसिक कर्म जोंपर्यंत बदलत नाहीं तोंपर्यंत त्यांच्या शारीरिक कर्मांत बदल होऊन मानवी प्रपंचांत क्रान्ति घडून येईल अशी आशा करणें व्यर्थ आहे. तथापि हा बदल घडवून आणण्याचें सामर्थ्य एकट्या श्रमांत नसून त्याला शीलाची जोड देणें जरूर आहे. श्रमाचें माहात्म्य वर्णन करून श्रमाविषयीं भक्ति समाजांत उत्पन्न करीत असतां शीलाचें—सत्वगुणाचें—समाजनिष्ठेचें सर्वश्रेष्ठत्वहि समाजाच्या मनांत बिंबविलें पाहिजे. हें करीत असतां क्रान्ति म्हणजे किसान-मजुरांची राज्यक्रान्ति म्हणजे दरिद्रीनारायणाचा उत्कर्ष इत्यादि अतिव्यापक व्याख्यांना शीलाची मर्यादा घालावी लागेल आणि क्रान्ति म्हणजे समाजनिष्ठ शीलवान् परस्वापहाराच्या दुर्वासनेचा त्याग केलेल्या—किसानमजुरांचें राज्य अशी थोडी लांबलचक व्याख्या करावी लागेल हें खरें. परंतु क्रान्तीच्या मार्गावर समाज वेगाने पुढे सरसावू लागला म्हणजे आज नाही उद्या हें तत्त्व अमलांत आणल्यावाचून क्रान्तिकारकांना क्रान्तीचा पूर्ण विकास करतांच यावयाचा

नाही. कारण क्रान्तीच्या पूर्णावस्थेंत मानव समाज स्वापहाराच्या व्याधीपासून पूर्णपणें मुक्त झालेलाच आढळून येईल. परस्वापहाराचा यत्किंचित् दोष समाजाच्या शरीरांत जोंवर शिल्लक राहील तोंवर क्रान्ति पूर्णावस्थेस पोहोचली असें म्हणतांच यावयाचें नाही. परस्वापहाराच्या दुर्वासनेचा—निदान तिच्या वाढीला पोषक होणाऱ्या परिस्थितीचा पूर्ण लोप हेंच क्रान्तीच्या पूर्णावस्थेचें स्पष्ट लक्षण आहे. किंबहुना हें कार्य घडवून आणण्यासाठीच क्रान्तीचा व क्रान्तिकारकांचा अवतार झालेला आहे. समाजघटकांची बहुसंख्या म्हणजे बहुजनसमाज—जोंपर्यंत परस्वापहाराच्या पापकर्मापासून शरीराने व मनाने पूर्णतः परावृत्त होत नाही तोंपर्यंत क्रान्तिकारकांचें कार्य सफल झालें अगर समाप्त झालें असें कदापि म्हणतां यावयाचें नाही. हें कार्य नजीकच्या भविष्य कालांत पूर्ण होईल असें मानणें चुकीचें ठरेल. परंतु भविष्यकाल नजीकचा असो वा दूरचा असो, क्रान्ति पूर्ण होईपर्यंत आपला उद्योग बंद पडूं द्यावयाचा नाही असा क्रान्तिकारकांचा दृढ निश्चय असला पाहिजे. मानव समाजाचा घटक जो मनुष्य प्राणी तो जन्ममरणाधीन असल्यामुळे समाजांतून कांही घटक रोज मृत्युमुखीं पडून वजा होत असतात व त्यांची रिकामी पडलेली जागा जन्मास येणाऱ्या नव्या घटकांना रोज भरून काढण्यांत येत असते. अर्थात् समाजांतून बाहेर पडणाऱ्या व समाजांत प्रवेश करणाऱ्या घटकांची संख्या नेहमी सारखीच असते असें नाही—बहुधा ती कमी जास्तच होत असते आणि त्याच प्रमाणें त्यांच्या गुणांतहि नेहमी सारखेपणा नसतो—बहुधा फरकच पडत असतो. तथापि हा संख्येंत व गुणांत पडणारा फरक कधी उत्क्रान्तिपर असतो तर कधी अपक्रान्तीपर असतो. व त्यामुळे निसर्गनियमानुसार क्रान्तीची गति कधी शीघ्र तर कधी मंद होते आणि क्रान्तीच्या समाप्तीचा काल नजीक अगर दूर होतो. तथापि क्रान्तीच्या विचाराचा प्रवाह अव्याहतपणें वाहता ठेवल्यास या कालाच्या लांबींत आखुडपणा येऊं शकतो असा आजवरचा अनुभव आहे. आणि म्हणून क्रान्तीच्या उपासकांनी निराशां न होतां आपला ज्ञानप्रसाराचा उद्योग नेटाने सारखा चालू ठेवला पाहिजे असा आमचा आग्रह आहे. क्रान्तीच्या भावनेने समाज जसजसा

उत्क्रान्त होत जाईल तशतशा तत्कालीं समाजांत नांदत असलेल्या अपक्रान्तीच्या शक्ति संतप्त होऊन क्रान्तीस कसून अडथळा करतील हें अगदी उघड आहे. तथापि क्रान्तिकारकांनी अशा अडथळ्यांची पर्वा करण्याचें मुळीच कारण नाही. अपक्रान्तीच्या संतप्त शक्तींनी केवढेंहि अकांडतांडव केलें तरी परिणामीं क्रान्तीचें सामर्थ्यच सरस ठरणार हें निश्चित आहे. असो.

क्रान्तीच्या स्वरूपाचें केवळ दिग्दर्शन करण्याच्या उद्देशाने आम्हीं लिहिण्यास प्रारंभ केला,–परंतु लिहितां लिहितां हें दिग्दर्शन मर्यादेबाहेर गेलें असें आम्हाला वाटतें. तेव्हा आता 'झालें इतकें क्रान्तिवर्णन पुरें' असें म्हणून लेखनीच्या संचारास येथेंच आवरण घालण्याचें आम्ही ठरवितों. आम्हीं वर केलेलें क्रातीच्या उद्भवाचें-वृद्धीचें व पूर्णावस्थेचें वर्णन इतर क्रान्तिकारकांनी केलेल्या वर्णनाहून भिन्न आहे हें आम्ही जाणतों आणि तें अगदी स्वाभाविकहि आहे. क्रान्तीकडे पहाण्याचा आमचा दृष्टिकोणच इतरांच्या दृष्टिकोणाहून निराळा आहे, त्याला करणार काय ? आमच्या विचारसरणीप्रमाणे क्रांतीच्या पूर्णावस्थेपर्यंत जाऊन पोहोचल्यास तेथे किसानमजुरांचें राज्य दृष्टीस न पडतां परस्वापहाराच्या दोषापासून पूर्णपणे मुक्त झालेल्या परोपकाराच्या एकैकभावनेने प्रेरित झालेल्या सदाचारसंपन्न समाजनिष्ठ मानवांचें राज्य दृष्टीस पडेल. अर्थात त्यांत किसानांना अगर मजुरांना मज्जाव असेल असें मुळीच नाही. ते आणि तदितर अनेक पेशांचे लोक तेथे अवश्य असतील. परंतु त्यांच्या ठिकाणीं निस्सीम समाजनिष्ठा व सत्वगुणविकास असेल तरच त्यांना तेथे स्थान मिळेल. नुसत्या किसानाच्या अगर मजुराच्या नांवावर व धंद्यावर त्याचा तेथे शिरकाव होऊं शकणार नाही. इतकेंच नव्हे तर उलटपक्षीं समाजनिष्ठा व लोकहिततत्परता या गुणांनी मंडित झालेले असल्यास भांडवलदार–जमीनदार अगर कारखानदार–या नांवाने आज निंद्य मानले गेलेले लोकहि सदाचारसंपन्न किसानमजुरांच्या पंक्तींत तितक्या मानाने अधिष्ठित झालेले आढळतील. अर्थात् यांची संख्या फारच कमी असेल हें खरें; परंतु त्यांनी आपली समाजनिष्ठा निर्विवादपणें शाबीत करून दिल्यावर केवळ भांडवलदार अगर कारखानदार अगर जमीनदार एवढ्या नांवासाठी पेशासाठी त्यास द्वार बंद केलें जाणार नाही.

कारण आमच्या क्रान्तीच्या कल्पनेंत जन्मापेक्षा व त्याचप्रमाणे धंद्यापेक्षा त्याच्या ठिकाणीं वसत असलेल्या शुद्ध व सात्विक समाजनिष्ठेलाच सर्वात जास्त महत्त्व आम्ही दिलेलें आहे व या एकाच कसोटीने समाजघटक व समाजकटक असे दोन विभाग मानलेले आहेत. तेव्हा मूळ दृष्टिकोणांतच अशी तफावत असल्यामुळे त्या कोणांतून दिसणाऱ्या क्रान्तीच्या स्वरूपांत व त्यांच्या केलेल्या वर्णनांत अंतर दिसून आल्यास त्यांत नवल काय ! आणि म्हणूनच आमच्या प्रतिपादनांत आम्ही आज प्रचलित असलेली परिभाषा जाणूनबुजून टाळली आहे.

त्याचप्रमाणे प्रकृतीच्या व कार्यव्यापृतत्वाच्या अडचणींत आम्हास हें प्रतिपादन करावें लागलें असल्यामुळे त्यांत अनेक दोष राहून गेले आहेत व त्यामुळे ग्रंथाच्या सौंदर्यास पुष्कळच हानि पोहोचण्याचा संभव आहे याचीहि आम्हास पूर्ण जाणीव आहे. इतकेंच नव्हे तर आजच्या क्रान्तिलेखकाप्रमाणे खुद्द ग्रंथकारालाहि आमचें प्रतिपादन अमान्य व अप्रिय वाटण्याचा व त्यामुळे आमच्याकडून प्रस्तावना लिहून घेण्यांत आपण मूर्खपणा केला असा त्यास पस्तावा होण्याचा संभव आहे, असेंहि आमचें मन आम्हांस बजावीत आहे. तथापि क्रान्तीसंबंधाचे आपले विचार—मग ते भले असोत—बुरे असोत—बरोबर असोत, चूक असोत—या संधीचा फायदा घेऊन एकबार जगापुढे मांडावेत असा आमच्या मनाला पडलेला मोह आम्ही आवरूं शकलें नाही आणि या प्रतिपादनाच्या सहाय्याने वाचकांस मूळग्रंथ समजण्यास सहाय्य होईल किंवा नाही याचाहि विसर पडून आम्ही आपल्या लेखणीस बिनहरकत स्वर सचार करूं दिला आहे. वास्तविक पहतां वाचकाला मूळग्रंथाशीं मतलब आहे. प्रस्तावनेशीं नाही आणि त्यामुळे त्याने प्रस्तावनेकडे अजिबात दुर्लक्ष केलें तरी त्याचें त्यांत कांही नुकसान नाही. तथापि चुकून प्रस्तावनेवरून नजर फिरविण्याचा प्रमाद त्याच्या हातून घडलाच तर आपल्या चुकीबद्दल आम्हाला दोष देण्याचा त्याला पूर्ण अधिकार आहे. तेव्हा आम्हीं केलेल्या या अप्रासंगिक व अनाठायीं साहसाबद्दल त्याची क्षमा मागण्याचें ढोंग करण्याचें आम्हाला कांहीच कारण नाही.

तथापि श्री. हरिहरराव देशपांडे व आमचे यावलीकर स्नेही यांना आमच्याकडून अशी वेडीवांकडी प्रस्तावना लिहून घेण्यांत जे कष्ट पडले व त्यामुळे त्यांची व ग्रंथाची जी कुचंबणा झाली तिच्याबद्दल त्यांची क्षमा मागणें आमचें कर्तव्य आहे. इतका त्रास देऊन आम्हीं त्यांच्या पदरांत जर कांही मूल्यवान वस्तु टाकली असती तर त्यांना समाधानाला कांही तरी जागा होती. परंतु दुर्दैव त्यांचें कीं त्यांची दोहोबाजूंनी फसवणूक झाली. पण आता त्याला इलाज काय ? " पदरीं पडलें आणि पवित्र झालें " असें म्हणूनच त्यांना आपलें समाधान करून घेणें भाग आहे !

अमरावती-वऱ्हाड,
रविवार ता. ७ सप्टेंबर,
१९४७

वामन गोपाळ जोशी.

लेखकाचे दोन शब्द

सन १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीच्या वेळीं अमरावती जिल्हा युद्धमंडळाचा मंत्रि या नात्यानें मी अमरावती जिल्ह्यांत सुमारें तीन महिने खेडोपाडीं दौरा केला. गांधीइर्विन करारनाम्यानुसार तुरुंगांतून सुटका झाल्यावर विदर्भ प्रांतिक कांग्रेस कमिटीचे माझे सन्माननीय मित्र श्री. ब्रिजलालजी बियाणी व मी असे दोघे मंत्री निवडले गेले. प्रां. कां. क.च्या वतीने प्रांतांतील कायदेभंगाच्या चळवळीच्या ज्या हकीकती त्या-वेळीं आम्हीं संकलित केल्या त्यांत यावलीने व यावलीचे हुतात्मे कै. लक्ष्मणराव पांचघरे यांच्या बलिदानानें माझें चित्त वेधून घेतलें. तेव्हा-पासून यावलीच्या कर्तृत्वाविषयीं मला विशेष आत्मीयता वाटूं लागली.

पुढे १९४२ च्या आगस्ट क्रांतींत यावलीने गाजविलेल्या परा-क्रमाच्या कथा प्रारंभीं कर्णोपकर्णीं ऐकावयास मिळाल्या. परंतु न्यायालयां-तून यावलीच्या कर्तृत्वावर जो प्रकाश पडूं लागला त्यामुळे यावलीविषयीं माझी उत्कटता अधिक वाढत गेली. १९४५ च्या आगस्ट १८ ला यावलीच्या शहीदांच्या स्मृतिसन्मानार्थ विदर्भ प्रां. कां. क. ने जो समारंभ यावलीस घडवून आणला त्याला नागपुर येथील सुप्रसिद्ध श्री. पु. य. देशपांडे यांच्या 'भवितव्य' साप्ताहिकाचा प्रतिनिधि या नात्यानें मी मुद्दाम उपस्थित राहिलों. त्या दिवशीं अवघा ३–४ तासच मी यावलीला असेन. परंतु तेवढ्या वेळांत आगस्ट क्रांतींतील यावलीच्या कर्तृत्वाने माझ्या अंतःकरणावर अतिशय गंभीर परिणाम केला.

तेथून परत आल्यानंतर यावलीने माझ्या चित्तावर उठविलेले तरंग मीं 'भवितव्या'त सुमारें दहा स्तम्भांचा मजकूर लिहून व्यक्त केले. सांप्रतचे ग्रामोद्योग मंत्रि ना. दादासाहेब बार्लिंगे यांचे तीर्थरूप श्री. शिवदासपंत उर्फ अप्पासाहेब यांनी यावलीची 'भवितव्यां'तली ही वीर-गाथा जेव्हा वाचली, तेव्हा यावलीच्या शहीदांच्या स्मारकासाठी स्वयं-

स्फूर्तीने मजजवळ २५ रु. ची देणगी तात्काळ दिली आणि मीं ती वीर वामनराव जोशी यांच्या मार्फत श्री. पु.का. देशमुख यांच्याकडे पोहचती केली.

त्यानंतर १९४६ च्या एप्रिल महिन्यांत यावलीच्या आगस्ट क्रांतीचे प्रेरक वीर पंजाबराव बापुराव यावलीकर यांची कांग्रेस मंत्रिमंडळ सत्तारूढ झाल्यावर सुटका झाली. आगस्ट क्रांतियुद्धांतला एक तेजस्वी स्फुल्लिंग असें जें यावलीच्या संग्रामाचें स्वरूप तें अधिक विस्ताराने लिहावें अशी उत्कट इच्छा माझ्या मनांत, आधीच उत्पन्न झालेली होती. तशांत वीर पंजाबराव यांनी मला नेमकी तीच विनंती केली व ती मीं मोठ्या आनंदाने मान्य केली. असा प्रस्तुत ग्रंथाचा थोडक्यांत इतिहास आहे.

या ठिकाणीं हें नमूद करणें अवश्य आहे की, या ग्रंथांत आलेली यावलीविषयक माहिती संकलित करण्यास व ती मला वेळीवेळीं उपलब्ध होण्यास वीर पंजाबराव यांचेच परिश्रम कारणीभूत झाले.

पंजाबराव तुरुंगांतून सुटून आल्यावरच त्यांचा माझा प्रथम परिचय झाला. ग्रंथलेखनाचें तोंडी आश्वासन दिल्यापासून प्रत्यक्ष ग्रंथलेखनास प्रारंभ करण्यापर्यंत सुमारें एक वर्षाचा काळ लोटला. अखिल भारतीय शारीरिक शिक्षण परिषदेचें जें पहिलेंच अधिवेशन अमरावतीला १९४६ च्या ऑक्टोबरांत भरलें त्याचा प्रधानमंत्रि या नात्याने तत्संबंधीच्या पूर्वोत्तर कार्यांत माझा १९४७ च्या एप्रिलपर्यंतचा काळ गेला. एप्रिल महिन्यांत मी आजारी झालों आणि त्या संधीचा फायदा घेऊन सुमारें १५ दिवसांत हा ग्रंथ लिहून तयार केला.

ग्रंथ लिहीत असतांना राष्ट्रीय महत्वाच्या मोठमोठ्या घटना घडत होत्या. १९४८ च्या जून महिन्यांत आपण हिंदुस्थान सोडणार अशी घोषणा ब्रि. सरकारने केली होती. ग्रंथ १५ आगस्ट १९४७ ला प्रसिद्ध करावयाचाच या निश्चयाने पूर्ण करण्यांत आला व त्याच्या मुद्रणाचें काम सुरू झालें. परंतु त्यानंतर आणखीहि अनंतपट वेगाने राष्ट्रीय महत्वाच्या केवढ्या तरी मोठ्या घटना घडूं लागल्या. १९४८ च्या जूनच्या ऐवजी

१९४७ च्या १५ आगस्टलाच ब्रिटिशांनी भारतांतील आपल्या सत्तेचें विसर्जन केलें. १५ आगस्टला यावलीचा हा ग्रंथ उदयास येऊं शकला नाही. पण ता. १५ आगस्टलाच यावलीने क्रांतिसंग्रामास प्रारंभ केला होता. भारतीय स्वातंत्र्यहि मोठ्या समारंभपूर्वक ता. १५ आगस्टलाच उदयास आलें, ही यावलीला अभिमानाची गोष्ट वाटते.

अर्थात्, एप्रिल १९४७ च्या नंतरच्या या सर्व राष्ट्रीय व ऐतिहासिक घटनांचा निर्देश या ग्रंथांत येऊं शकला नाही. १५ आगस्ट १९४७रोजीं यावलीने जेव्हा स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज फडकविला तेव्हा खरोखरच तिच्या डोळ्याचें पारणें फिटलें असेल, कारण याच ध्वजाच्या रक्षणासाठी यावलीचा ४२ आगस्टचा उग्र संग्राम घडून आला होता.

सांप्रतचा स्वतंत्र भारत जेव्हा स्वातंत्र प्राप्तीसाठी आपण केलेल्या प्रयत्नांकडे मागे वळून पाहील तेव्हा त्याला त्याचें स्वरुप कशा तहेचें दिसेल याचें केवळ दिङमात्र दर्शन प्रस्तुत ग्रंथाच्या वाचनाने होणार आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या बृहत् संग्रामाचें विदर्भांतील एक अल्पसें पण उज्ज्वल व गौरवास्पद प्रतीक या दृष्टीनेच यावली येथील स्वातंत्र्यसंग्रामाच्या प्रस्तुत इतिहासाकडे पाहिलें पाहिजे.

ग्रंथाची सर्व तयारी झाली तरी 'सर्वारंभास्तंडुलप्रस्थ मूला:' या न्यायानें मुद्रणासाठी आवश्यक रकमेची उभारणी कशी करावयाची हा प्रश्न होताच. परंतु शहीद स्मारक समितीला ग्रंथ प्रकाशनासाठी यावलीचे श्री. रामकिसन अंबादास मुंदडा उर्फ बाबूशेठ व दे. ग. राजाराम झिंगाजी कांडलकार यांनी अनुक्रमे रु. १५०० व ५०० बिनव्याजी कर्जाऊ देऊन हीहि अडचण दूर केली याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. त्यांच्या या साह्याच्या अभावीं समितीला प्रस्तुत ग्रंथ प्रकाशित करण्यास बराच विलंब लागला असता.

ग्रंथ छपाईचें काम नागपुर येथील रामेश्वर मुद्रणालय व प्रभाकर मुद्रणालय यांचे चालक अनुक्रमें श्री. पटले व श्री. तिडके यांनी अतिशय

आस्थापूर्वक व गैरसोय सोसून करून दिलें याबद्दल मी त्यांचा अतिशय आभारी आहे. तसेंच यांत देण्यांत आलेल्या छायाचित्रांचे ठसे (Blocks) नागपुर येथील शिवराज लिथो प्रेसचे मालक श्री घनवटे यांनी अल्प मूल्यांत आत्मीयतेने करून दिले, याबद्दल त्यांचेहि आभार मानणें अवश्य आहे. ग्रंथाचीं मुद्रितें तपासण्याची जबाबदारी नागपुरच्या हिस्लॉप महाविद्यालयांतील मराठीचे प्राध्यापक श्री. अ. ना. देशपांडे यांनी अंगावर घेऊन पार पाडली याबद्दल तेहि धन्यावादास पात्र आहेत.

याशिवाय श्री. जा. बा. दिवटे, यावली, यांनी रात्र–दिवस खपून मुद्रणार्ह हस्तलिखित प्रत तयार करून दिली या बद्दल तेहि धन्यवादास पात्र आहेत.

नागपुर प्रकाशन संस्थेचे चालक श्री. दि. मा. धुमाळ व माझे मित्र श्री. वि. ब. वैद्य यांचेंहि ग्रंथप्रकाशनाच्या बाबतींत जें वारंवार साह्य झालें त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. मुखपृष्ठावरील चित्र श्री. दिनानाथराव दलाल यांनी अल्पावधींत तयार करून दिलें याबद्दल त्यांचा साभार निर्देश करणें अवश्य आहे.

या ग्रंथाच्या प्रथमावृत्तीचें सर्व उत्पन्न यावली येथील शहीद स्मारक समितिला देण्यांत यावयाचें आहे. वीर पंजाबराव यांची अखंड प्रेरणा जर मागे नसती आणि कालावधि होत गेला तरी त्यांनी मजवर जो अढळ विश्वास ठेवला तो जर ठेवला नसता तर ग्रंथलेखनाचें कार्य माझ्या हातून झालें असतें किंवा नाही याची शंकाच आहे पण पंजाबराव यांचे आभार मानण्याचा प्रयत्न करणें हा देखील औचित्यभंग होईल.

अस्तु. यावलीस जे शहीद झाले ते चिरंजीव झाले आणि जे जगले ते भाग्यवान् ठरले. आपल्या त्यागाचें उत्कट फळ त्यांना आज उपभोगण्यास मिळत आहे.

अमरावती
ता. २८।८।१९४७

हरिहर वामन देशपांडे

छायाचित्रें

यावलीचा स्वातंत्र्य संग्राम

अनुक्रमणिका

क्रांतिकांड

हत्याकांड

न्यायकांड



शहीद राजारामजी औरंगपुरे

ता. १८ आगस्ट १९४२ युद्धांतील तीन वीर—



१. बारकाजी तडस २. अबदुल रहीम ३. तुळशीरामजी अंबडकार

क्रांतिकांड

यावलीचा स्वातंत्र्य-संग्राम

क्रांतिकाण्ड

प्रकरण १ लें

प्रास्ताविक माहिती

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासांत विदर्भांतल्या अमरावती जिल्ह्यांतील यावली नामक गांवाने एक प्रकारचा दिव्य लौकिक व अढळ स्थान संपादन केलें आहे. १९२०, ३०, व ४२ या तीनही वर्षी परकीय ब्रिटिश सत्तेचें जोखड आपल्या मानेवरून काढून टाकण्यासाठीं म० गांधींच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसने भारतीय जनतेला जो संग्रामाचा आदेश दिला त्याचें यावलीच्या शूर, ग्रामीण जनतेने कसें पालन केलें आणि स्वातंत्र्ययज्ञाच्या अग्निकुंडांत आपला हविर्भाग कशा रीतीने अर्पण केला याचा इतिहास प्रस्तुत पुस्तकांत देण्याचें योजिलें आहे. यावलीच्या नागरिकांवर परकीय सत्तेच्या दुष्ट आणि निर्दय अधिकाऱ्यांकडून झालेल्या अत्याचारांच्या या कथा अद्‌भुत व रोमांचकारी आहेत. गेल्या २५ वर्षांत स्वदेश-स्वातंत्र्याची तळमळ खेड्यांपाड्यांपर्यंत कशी जाऊन पोहोंचली होती याचें उपलक्षणात्मक ज्ञान भावी पिढीलां करून देण्यास हा इतिहास उपयुक्त होईल, अशा आशेने तो प्रसिद्ध करण्यांत येत आहे. अशाच प्रकारचा इतिहास भारतवर्षाच्या दूरदूरच्या कोपऱ्यांतील खेड्यांपाड्यांतून घडला असला पाहिजे! हजारों लाखों खेड्यांतून भारतीय स्वातंत्र्य-संग्रामाचा सिंहनाद दुमदुमला असला पाहिजे!! हजारों लाखो ग्रामीणांचें बलिदान स्वातंत्र्य-यज्ञाच्या वेदीवर घडलें असलें पाहिजे!!! सहस्रावधि देवाब्राम्हणांनी व ऋषींनी आपल्यावरील

अत्याचारांच्या कथा सहस्रमुखानें वर्णाव्यात व त्यांच्या आर्तनादाने गगनमंडळ दुभंगूं लागावें, तेव्हां कोठे क्षीरसागरांत झोपीं गेलेला भगवान जागा होतो आणि ह्या भूलोकावर अवतार घेऊन दुष्टांचें पारिपत्य करून आपल्या भक्तांचें संरक्षण करतो, अशी पुराणांतरीं कथा आहे. जनताजनार्दनाचें आवाहन देखील अशाच रीतीने सहस्रमुखाने व्हावें लागतें, तेव्हां कोठे तो जागृत होतो.

या जागृतीच्या कालखंडात जुलमी अत्याचारांना टक्कर देणाऱ्या वीरांचें बलिदान जितक्या प्रमाणांत विशुद्ध अशा नैतिक भूमिकेवरून होईल तितक्या प्रमाणांत तें जागृतीचें कार्य लवकर यशस्वी करूं शकतें. यावलीच्या स्वातंत्र्य-संग्रामाचा जो इतिहास प्रस्तुत ग्रंथांत देण्यांत आला आहे त्यावरून तेथील जनतेने या नैतिक भूमिकेचाच अवलंब कसा केला होता आणि त्यामुळेच अघोर दडपशाहींतूनहि तिच्या सामर्थ्याचा विकास कसा होत गेला याची कल्पना येऊं शकेल.

भारतवर्षांतील सात लक्ष खेड्यांपैकीं यावली हें एक लहानसें पण दुमदार खेडें आहे. १९४१ सालीं झालेल्या सरकारी शिरगणतीप्रमाणें यावलीची लोक संख्या २०१० नमूद करण्यांत आली आहे. गांवांत कुणबी व माळी या जातींचें वास्तव्य अधिक प्रमाणांत असलें तरी, तेली, चांभार, मुसलमान इ० जातींच्या लोकांची वस्तीहि यावलीस आहे. एकूण घरें सुमारें ५०० आहेत. एकंदरींत गांवकरी लोक शेती, बागायती व तद्विषयक उद्योग धंदे यावरच आपली उपजीविका करतात. शेतीचें मुख्य उत्पन्न ज्वारी व कापूस हें असलें, तरी त्या बरोबरच गहूं, दाळी, इत्यादि जीवनोपयोगी धान्यांची पैदास शेतीवर करण्यांत येते. स्वावलंबी जीवन निर्माण करण्याच्या दृष्टीने ज्या थोड्या फार खेड्यांनी बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला असेल त्यांतच यावलीची गणना करावी लागेल. शैक्षणिक दृष्टीने मराठी चार इयत्तेपर्यंत प्राथमिक शिक्षणाचीहि व्यवस्था या गांवांत झाली आहे आणि अधिक वरच्या शिक्षणाची व्यवस्था व्हावी अशी ग्रामस्थ लोकांची मागणी आहे.

यावलीचें भौगोलिक महत्व विशेष आहे. अमरावतीपासून उत्तरेकडे चौदाव्या मैलावर हें गांव वसलेलें आहे. अमरावतीहून मोर्शीस जाणारा जो

no map given

राजमार्ग आहे त्यावर बाराव्या मैलावर माहुली नामक गांवीं पोलीस ठाणें आहे. तेथून तीन मैल आंत यावली गांव वसलेलें आहे. गांवांच्या दक्षिणेस पूर्व-पश्चिम एक नदी वाहत आहे, पश्चिमेकडे सपाट असें मोठें मैदान आहे, उत्तरेकडील प्रदेश बागबगीच्यांनी रमणीय बनलेला आहे, गांवाच्या मध्यभागीं शाळा व तिच्या समोर एक छोटेसें पटांगण असून त्याला ग्रामस्थ लोकांनी गांधी चौक हें नांव दिलें आहे. एका बाजूला नदी, दुसऱ्या बाजूला मोकळें मैदान, तिसऱ्या बाजूला बागबगीचे यामुळे गांवाचा आसमंत मोठा रमणीय भासतो. गांवांतील घरें मातीचीं पण प्रशस्त व मोकळीं मोकळीं अशीं आहेत. पावसाळ्या दिवसांत माहुली जहागीरच्या पोलीस ठाण्यापासून यावलीपर्यंतचा अवघ्या तीन मैलांचा रस्ता चालून जाणें हें एक कठीण कर्म आहे. सर्व जंगल काळ्या मातीचें असल्याने चिकट व चिकण असा चिखल तुडवीत जावें लागतें. शिवाय वाटेंत नाले भरून चाललेले असतात. सुमारें एक मैलाचा प्रवास नाल्या नाल्यांतूनच करावा लागतो.

या भौगोलिक परिस्थितीमुळे इंग्रजी अमलापूर्वी यावलीला परकी आक्रमणापासून बरेंच नैसर्गिक संरक्षण मिळत असलें पाहिजे. पावसाळ्यांत गाडी तर चालत नाहींच, घोडें देखील मोठ्या मुष्कलीने जाऊं शकतें. शिवाय यावलीची पावसाळी विशेषता अशी आहे कीं, यावलीच्या वाटेवरील नाल्यांत व खुद्द यावली गांवांत जागोजागीं डेरे निर्माण होतात. ह्या डेऱ्यांच्या जागा अतिशय फसव्या असतात. वरून सपाट व बिनधोक्याची अशी जमीन दिसत असते. परंतु तिच्यावर पाऊल ठेवतांक्षणींच मनुष्य कुठें गुडघ्याइतका, तर कुठे कंबरेइतका आंत फसतो. पावसाळ्यांत अशा फसव्या जागा पुष्कळ निर्माण होतात आणि यांनांच वऱ्हाडी भाषेंत डेरा असें नांव आहे. या डेऱ्यांमुळे यावलीची डेऱ्यांची यावली ' म्हणून प्रसिद्धी आहे. गांवांत एक जुनाट व पडीक अशी गढी आहे ती निदान २५०।३०० वर्षां पूर्वीची असावी असें वाटतें. अमरावती जिल्ह्यांच्या गॅझिटिअर मध्ये यावलीचा ऐतिहासिक संदर्भ आढळून येत नसला, तरी गांवाची भौगोलिक रचना व संरक्षणक्षम अशी नैसर्गिक परिस्थिति, यामुळे ऐतिहासिक कालांत हा गांव बराच बलाढ्य असावा, आणि १९२०, १९३० व १९४२ सालीं झालेल्या स्वातंत्र्य-संग्रामांत येथील

लोकांनी अभिव्यक्त केलेला पराक्रम ही त्यांच्या रक्तांत चालत आलेली परंपरागत देणगी असावी असेंहि अनुमान करण्यास वाव आहे. वरील तीनहि स्वातंत्र्य-संग्रामांत यावलीने ज्या वाढत्या प्रमाणांत भाग घेतला, जे अत्याचार सहन केले, आणि प्रतिकारात्मक शौर्याचा जो अनुपम आदर्श घालून दिला, त्यामुळे यावलीचा आधुनिक इतिहास निर्माण झाला आहे. हा इतिहासाच्या बृहत् ग्रंथांत गौरवाचें स्थान विभूषित करूं शकेल आणि भावी पिढीच्या स्वातंत्र्य प्रीतीला अखंड स्फूर्तीच्या जलधारेने परिसिंचित करीत राहील इतका उज्वल-इतका अद्भुत व रोमहर्षण-खास आहे. यावलीसारख्या लहानशा गांवीं सांप्रत काँग्रेस कमिटी, व्यायाम शाळा, आरति मंडळ, शहीद स्मारक समिति, वाचनालय, औषधालय इत्यादि कार्यक्षम संस्था यशस्वी रीतीने चालू आहेत. यावरून यावलीस निमाण झालेला चैतन्य-प्रवाह केवढा प्रबळ असला पाहिजे याची कल्पना येऊं शकते. प्रतिकारात्मक अनुपम वीरतेबरोबरच ही जी विधायक योग्यता या ग्रामस्थ कार्यकर्त्यांनी दाखविली तिचाच परिणाम असा झाला कीं, राष्ट्रीय सरकारची राजवट येऊन काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्याबरोबर माहुली-यावली सडकेची योजना तयार झाली, प्रसूतिगृहासहित संपूर्ण चिकित्सालय सरकारी खर्चाने यावलीला स्थापन करण्याच्या योजनेस मंजुरी मिळाली, प्रांतांत ज्या ठिकाणीं बेसिक शिक्षणाच्या नवीन शाळा स्थापन होणार आहेत त्यांत यावलीला अग्रमान मिळाला, खादी इत्यादि काँग्रेसप्रणीत विधायक कार्याचें केंद्र यावली बनणार हें स्पष्ट झालें, आणि हें सर्व ज्या शहीदांच्या १९४२ च्या संग्रामांत आहुती पडल्या त्यांचें स्मारक म्हणून होणार हें विशेष होय !!!

प्रकरण २ रें

वन्हि चेतला

प्रतिकारात्मक पराक्रमाच्या बाबतींत अमरावती जिल्हा वऱ्हाडांत नेहमीच आघाडीवर राहिला. दैनंदिन जीवनांत चिकाटीने कराव्यां लागणाऱ्या विधायक कर्तृत्वापेक्षां आणीबाणीचा प्रसंग निर्माण झाला असतां, राष्ट्रीय आंदोलनाची लाट उफाळली असतां व दोन हात करण्याची संधि उपलब्ध झाली असतां या जिल्ह्यांतील जनतेने विशेष शौर्य प्रगट केलेलें आहे. जोपर्यंत कॉंग्रेसची चळवळ अर्जविनंत्यांच्या चाकोरींतून जात होती तोपर्यंत या जिल्ह्यांतील जनतेला तिच्याबद्दल फारसें सौहार्द वाटलें नाही. परंतु कै० लोकमान्य टिळकांनी स्वराज्याचा जो महामंत्र फुंकला त्याचें वारें कानांत शिरल्याबरोबर अमरावती जिल्ह्यांतील लोकांच्या प्रतिकारात्मक शौर्याने उचल खाल्ली. १९०४ ते १९०७ च्या घोर काळांतहि आखाडे व तालीमखाने, गुप्त मंडळें, तरुणांच्या संघटना इ. प्रकारांनीच या जिल्ह्यांतील जागृतीला अभिव्यक्ति मिळाली. वीर वामनराव जोशी यांच्या सभोवार तरुणांचे समूह जमूं लागले. त्या काळांतील दडपशाहीचा तडाखाहि या जिल्ह्यावर बसला आणि लो० टिळक १९०८ सालीं तुरुंगांत गेल्यावर सर्व महाराष्ट्राप्रमाणें अमरावती जिल्ह्यांतहि किंकर्तव्यमूढता उत्पन्न झाली. परंतु या नंतर जालियनवाला बागेंतील असहाय स्त्रीपुरुषांवर जनरल डायर नामक ब्रिटिशाधमाने झाडलेल्या गोळ्यांचे आवाज आणि पंजाबच्या जनतेचा आर्तनाद कानीं पडतांच पुन्हा जागृतीची लाट उसळली. गांवोगांवीं हरताळ पडले. निषेधाच्या सभा झाल्या. जनतेच्या संतापाचा पारा भडकत चालला. तशांत म० गांधींच्या असहकारितेचा कार्यक्रम समोर आला. नागपूर कॉंग्रेसमध्ये त्यावर पसंतीचा शिक्कामोर्तब चढला, आणि नंतर सर्व जिल्हाभर एक प्रकारें तुफानच उठलें.

जनतेच्या संतप्त मनोवृत्तीला असहकारितेची फुंकर घालीत कॉंग्रेस पुढारी खेड्यांपाड्यांतून फिरूं लागले. विशेषतः वीर वामनराव जोशी यांच्या तुफानी दौऱ्यांनी जनतेंत विलक्षण आवेश निर्माण केला. त्या काळांतील वीर वामन-

रावांचीं व्याख्यानेंहि अशीं होत कीं, प्रत्यक्ष प्रेतांतहि प्राणसंचार व्हावा, स्मशानांतील मृतांनीहि जागृत होऊन लढूं लागावें, दगडधोंड्यांच्या ठिकाणींसुद्धां चैतन्य सळसळू लागावें. या तुफानी दौऱ्यांत वीर वामनराव जोशी यांनी यावलीस एक दिवस व्याख्यान देऊन काँग्रेसचा असहकारितेचा कार्यक्रम समजावून सांगितला. विशेषतः विदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशीचा पुरस्कार, आणि बिगारबलुत्याच्या गैरकायदा जुलमाचा विरोध हा वामनरावजींच्या भाषणांचा मुख्य भाग असे. करबंदीच्या संभाव्य चळवळीबद्दलहि ते जनमत तयार करीत. वीर वामनराव यांच्या उपरिनिर्दिष्ट व्याख्यानांनी यावलीसहि चळवळीच्या अग्नीचा स्फुलिंग पडला.

याप्रमाणें ठिणगी पाडून वीर वामनराव निघून गेले. सरकारी नोकऱ्या व पदव्या यांचा त्याग करण्याच्या कल्पनेने, यावली जवळच दोन फर्लांगावर असलेल्या नरसिंगपुर येथील कामकर्ते पाटील रंगराव बालाजी व यावली येथील कामकर्ते पटवारी रामचंद्र केशवराव यांच्या मनांत घर केलें, कामकर्त्या पाटील-पटवाऱ्यांचीही जोडगोळीच पहिल्यांदा ब्रिटिश सरकारच्या छातीवर आदळली. त्यांनी वीर वामनराव गेल्यानंतर स्वयंस्फूर्तीने यावलींत एक सभा भरविली आणि काँग्रेसचा कार्यक्रम अमलांत आणण्याची योजना या सभेंत त्यांनी ग्रामस्थ लोकांसमोर मांडली. त्यांनी प्रथम काँग्रेसचें एक स्वयंसेवक दल स्थापन केलें.

स्वयंसेवक दलाच्या स्थापनेचा निश्चय जाहीर करतांच त्यांत पहिले स्वयंसेवक म्हणून पुढील लोक भरती झाले. (१) रंगराव बालाजी पाटील (स्वतः) (२) रामचंद्र केशवराव पटवारी (स्वतः) (३) अंबादास मारुती त्रिकांडे (४) गंगाधर नारायण जोशी (५) श्रीधर नारायण जोशी (६) शंकर भाडव (७) नारायणराव पांडुजी औरंगपुरे. या औरंगपुरेचाच धाकटा भाऊ १९४२ च्या आंदोलनांत शहीद झाला. या स्वयंसेवक दलातर्फे प्रथमतः गांव स्वावलंबी करण्याची चळवळ हातीं घेण्यांत आली. त्यांनी गांवांत एक तेलघाणा काढला आणि गोरगरीबांना स्वस्त भावाने जीवनोपयोगी वस्तु मिळवून देण्यासाठी एक धान्याचें व किराणा मालाचें दुकान उघडलें. याशिवाय गोरक्षण फंड जमा करून तो अमरावतीच्या गोरक्षण संस्थेकडे पाठविण्याचा उपक्रम सुरू केला.

यावलींतील स्वावलबनाचा उत्साह सहा महिनेपर्यंत पुरला. पुढे तो ओसंडला. ज्या रंगराव बालाजी व रामचंद्र केशवराव या पाटील-पटवाऱ्यांच्या जोडीने हा वन्हि भडकविला व त्यासाठी सभा भरविली, त्यांच्यावर सरकारी अधिकाऱ्यांची वक्रदृष्टि वळली नसती तरच आश्चर्य झालें असतें. सरकारी दडप शाहीची कुऱ्हाड तात्काळ त्यांच्यावर कोसळली. सहा महिन्यांकरितां त्या दोघांनाही कामावरून काढून टाकण्यांत आलें. परंतु चळवळीचें बीज रुजलें तें रुजलेंच. १९३० च्या आंदोलनाच्या वेळीं त्याला अंकूर फुटले आणि १९४२ सालीं त्याचा यावलीस मोठा पराक्रमशाली वृक्ष बनला. सारांश, १९२१ च्या असहकारितेच्या आंदोलनांत यावलीने भाग घेतला आणि सरकारी दडपशाहींत यावलीचे दोन बळी गेले.

प्रकरण ३ रें

१९३० चा जंगल सत्याग्रह

हिंदुस्थानांतील स्वातंत्र्याच्या चळवळीचा असा एक विलक्षण योग आहे कीं, सामान्यतः दर दहा बारा वर्षांनी तिला एक नवी भरती येते. परकीयसत्ता आपल्या प्रबळ सामर्थ्याने ही लाट दडपून टाकण्याचा प्रयत्न करते. कांहीं काल ती दडपलीहि जाते. सर्वत्र सामसूम व शांतता निर्माण होते. परकीय शासकांचा कारभार सुरळीतपणें व बिनबोभाट चालूं लागतो, जनता थिजल्यासारखी-थंड झाल्यासारखी भासते. दडपशाहीच्या आतंकामुळे लोक आतां अगदी निष्प्राण बनले आहेत, त्यांच्या ठिकाणचें सर्व चैतन्य नष्ट झालें आहे, पुन्हा ते आतां वर तोंड काढूं शकत नाहीत आणि गुलामगिरीची बेडी आतां अधिक मजबूत झाली आहे, असाही समज पसरूं लागतो. आणखी शें दोनशें वर्षें देखील आपणांस झोपा काढण्यास हरकत नाही असें ब्रिटिश शासकांनाही वाटूं लागतें. परंतु वस्तुस्थिति अशी असते कीं, दडपशाहीच्या वरवंट्याखाली दबलेली आग भूमिगत होऊन पसरूं लागते. पसरतां पसरतां पुनः दहा वर्षांनी पूर्वीपेक्षांहि दुप्पट

जोमाने तिचा प्रस्फोट होतो. आणि हा प्रस्फोट झाला म्हणजे पुन्हा घोर दमन-चक्र फिरतें, पुन्हा सर्वत्र शांतता भासते, पुन्हा असंतोषाची आग भूमिगत होऊन धुमसत राहते, पुनः दहा बारा वर्षांनी पूर्वीपेक्षां कितीतरी वेगाने तिचा भयंकर स्फोट घडून येतो. ब्रिटिश शासनाच्या प्रारंभापासून हा आवर्त अशाच रीतीने चालत आलेला आहे. १८५७ च्या उघड स्वातंत्र्य-संग्रामानंतर हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत झालेल्या उठावण्या, क्रांतिकारकांचे गुप्त कट, बॉंबगोळ्यांचे परिस्फोट, १९१४ च्या महायुद्धाच्या वेळीं परदेशस्थ हिंदी बांधवांनी केलेले स्वातंत्र्य-साधनाचे प्रयत्न आणि कँग्रेसच्या सनदशीर चळवळीच्या निर्जीव सांगाड्यांत लो० टिळक इ० पुढाऱ्यांनी निर्माण केलेला जिवंतपणा व तिच्या माध्यमांतून उघडपणे वाहूं लागलेलें स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नांचें वारें इ० गोष्टींचा इतिहास वरील विधानाच्या सत्यतेस बळकटी आणण्यास पुरेसा आहे.

१९०४ तें १९०८ च्या दरम्यान उठलेली स्वराज्याच्या चळवळीची लाट दबल्यानंतर पुनः १९२०-२१ सालीं तिची केवढ्या मोठ्या प्रमाणांत असहकारितेच्या आंदोलनाच्या रूपाने आवृत्ति निघाली व तिचे पडसाद यावलीसारख्या दूरस्थ ग्रामांतही कसे उमटले हें मागील प्रकरणीं आपण पाहिलें. परंतु नैसर्गिक क्रमांत असहकारितेचाहि भर ओसरला. सरकारी शाळा-कॉलेजें पुन्हा पूर्ववत् सुरू झालीं, कोर्ट कचेऱ्यांना बहर येऊं लागला. कज्जे दलालांचे खिसे गरम होऊं लागले. ब्रिटिश शासनाचा दरारा सर्वत्र भासूं लागला व मोठमोठे पुढारी पुन्हा आपल्या कर्तृत्वाचा गाडा कायदे मंडळादि सनदशीर मार्गावरून चालवूं लागले. क्षणभर असें भासूं लागलें कीं, क्रांतीचा मार्ग खुंटला आहे, तिचें नांवहि उच्चारण्यास कोणी तयार नाही; आणि हप्त्या हप्त्यांच्या सुधारणांच्या द्वारा ब्रिटिशांच्या मेहेरबानीनेच केव्हां तरी शेंदीडशें वर्षांनंतरच स्वराज्याचें शिखर पाहावयास मिळणार !

परंतु सनदशीरपणाच्या मृगजळामागे धाऊं लागलेली चळवळीची हरिणी लवकरच भ्रमनिरस्त झाली. क्रांतीच्या अथांग जलाशयाकडे तिचें मन पुन्हा ओढ घेऊं लागलें. १९२९ सालीं लाहोरच्या कॉंग्रेसने पूर्ण स्वराज्याचा प्रस्ताव मंजूर करून कायदेभंगाच्या लढाईचें रणशिंग फुंकण्याचा सर्वाधिकार म० गांधींना दिला. मिठाच्या सत्याग्रहाची अभिनव घोषणा गांधीजींनी

करतांच 'रणभेरी बज चुकी· वीरवर पहिनो केसरिया बाना' या गानाचे निनाद भारत वर्षभर घुमूं लागले. गांधीजीचा 'दंडी प्रवास' सुरू झाला. या प्रवासांतील त्यांच्या एकेका व्याख्यानाने देशांत सहस्र सहस्र हत्तीचें बळ निर्माण केलें. चळवळीचा वणवा देशभर भडकूं लागला. मिठागरांवर सत्याग्रहीचे मोर्चे सुरू झाले. पुनः एक वार शाळा-कॉलेजें ओस पडलीं. दारू बंदी, परदेशी कापडाचें निरोधन इ० बाबतच्या काळ्या कायद्यांना लोक खुशाल पायाखाली तुडवूं लागले. चैतन्याचा प्रचंड सागर हेलावून गेला. त्यावर लाटा मागून लाटा उसळूं लागल्या. समुद्रापासून शेकडों मैल लांब असलेल्या यावलीसहि या लाटांचे तुषार झोंबूं लागले. या चळवळीची लाट यावलीला येऊन पोहोंचतांच यावलीच्या जनतेने पहिल्या सप्ताह्यांत विठ्ठलराव दादाजी मंगरूळकर यांच्या हस्तें विदेशी कापडाची होळी पेटवून तींत इतक्या दिवसांचें आपलें शैथिल्य जाळून टाकलें आणि नवचैतन्याने प्रेरित होऊन ती मोठ्या जोमाने नवीन आंदोलनांत भाग घेण्यास सिद्ध झाली.

त्यावेळीं वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्षपद लोकनायक माधव श्रीहरी उर्फ बापूजी अणे यांच्या हातीं होतें. लाहोर कॉंग्रेसच्यानंतर मध्यवर्ती कायदे-मंडळांतील जागांचे राजीनामे देण्याच्या बाबतींत कॉंग्रेस श्रेष्ठींशीं मतभेद होऊन त्यांनीं प्रांतिक कॉंग्रेस कमेटी वीर वामनराव जोशी यांच्या स्वाधीन केली. परंतु लवकरच गांधीजीचें दंडीकूच सुरू झाल्यानंतर लो० अणे यांनी मध्यवर्ती कायदे मंडळांतील सदस्यत्वाचा राजीनामा दिला आणि एक सामान्य सैनिक या नात्याने वीर वामनरावांच्या नेतृत्वाखाली उभारल्या जाणाऱ्या स्वातंत्र्य-सेनेंत ते भरती झाले. वऱ्हाडांत जरी समुद्र-सांनिध्य नसलें, तरी वऱ्हाडच्या एका फार मोठ्या विभागांत, पूर्वी म्हणजे ब्रिटिश सरकारने मिठाचा कायदा पास करून मीठ निर्माण करण्याची येथील लोकांना बंदी करीपर्यंत, मिठाची मोठ्या प्रमाणांत निपज होत असे. वऱ्हाडांतील मिठाचा व्यापार पूर्वेस भंडाऱ्यापर्यंत तर पश्चिमेस खानदेशापर्यंत चालत असे. चाळीस हजार कोळ्यांचीं कुटुंबें या व्यापारावर समृद्ध झालेलीं होतीं. मिठाचा कायदा ब्रिटिश सरकारने अमलांत आणल्यानंतर या लोकोपयोगी जमातीची व कुटुंबांची वऱ्हाडांत वाताहत झाली. कोळी समाजाची गांवेंच्या गांवें कशी नामशेष झालीं

आणि उरल्या सुरल्या कोळयांना उपजीविकेचा धंदा नष्ट झाल्यामुळे सांप्रत कसें दीनवाणी जीवन कंठावें लागत आहे याचा लोकांना फारसा विसर पडलेला नव्हता. त्यामुळे मिठाच्या सत्याग्रहाच्या कल्पनेंन देखील वऱ्हाडच्या जनतेला हालवून सोडले. मिळेल त्या खाऱ्या पाण्याच्या विहिरीचें पाणी घेऊन जागों जागीं लोक बेकायदा मीठ करूं लागले समुद्राचें पाणी आणवून त्यापासून मीठ बनविण्यांत येऊं लागलें, आणि या बेकायदा मिठाचा हर्रास गांवोगांव होऊं लागला. एकेका मिठाच्या पुडीची किंमत पन्नास पन्नास व शंभर शंभर रुपये देखील लागूं लागली. सभा व व्याख्यानें यांचा सर्वत्र बेफाम दर्या उसळला आणि त्यांत मे महिन्याच्या ३१ तारखेस वऱ्हाड प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष वीर वामनराव जोशी आणि जून च्या १४ तारखेस उमरावती जिल्हा युद्ध मंडळाचे मंत्री श्री. हरीहरराव देशपांडे यांना अटक करून ब्रि० सरकारने जनतेवरील आपल्या पहिल्या हल्लयाचा बिगुल वाजविला. वीर वामनराव जोशी यांच्या पश्चात् वऱ्हाड प्रांतिक युद्ध मंडळाची माळ स्वाभाविकपणेंच लो० अणे यांच्या गळ्यांत पडली.

वऱ्हाडांत वनचराईच्या कायद्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांची जी गैर-सोय होते, तिचें गाऱ्हाणें वेशीवर टांगण्याचा प्रयत्न लो० अणे यांनी आपल्या यवतमाळ जिल्हा सभेतर्फे पूर्वी अनेक वेळां केलेला होता. जंगल सत्याग्रहा-च्या रूपाने पुन्हा एक वार वऱ्हाडी जनतेच्या या गाऱ्हाण्याला जबरदस्त वाचा फोडण्याचें लो० अणे यांनी ठरविलें आणि वऱ्हाडांत जंगलचा कायदा तोड-ण्याचें पहिलें रणशिंग पुसद येथे फुंकून लो० अणे गिरफदार झाले. त्यांच्या गिरफदारीच्या पश्चात् वऱ्हाडच्या कोनाकोपऱ्यांतून जंगल सत्याग्रहाचा एवढा प्रचंड कल्लोळ उसळला कीं, त्यामुळे ब्रि० नोकर शाहीचें देखील धाबें दणा-णून गेलें आणि तिला सळो की पळो असें होऊं लागलें. जंगलेंच्या जंगलें, कापून सफा करण्यांत येऊ लागलीं. ताडी, शिंदी, चंदन इत्यादीचीं सरकारी उत्पन्नाला कारणीभूत होणारीं बनेंच्या बनें उध्वस्त करण्यांत आलीं.

ह्या प्रकाराने यावलींतील तरुणांच्या ठिकाणीं नव चैतन्य संचरूं लागलें १९२० पेक्षांहि अधिक जोमाने भारत मातेच्या हांकेला ओ देण्याची वेळ आतां आली आहे असे ते बोलूं लागल. जंगल सत्याग्रहाच्या योजना तयार

होऊं लागल्या आणि सत्याग्रहींच्या सेनेंत तरुणांची भरती सुरू झाली. सुमारें ५-२५ नांवें नोंदविली गेलीं असतील नसतील. तोंच सत्याग्रहाचा मुहूर्त ठरविण्यांत आला. उमरावती जिल्हा कॉंग्रेस कमेटीने १९३१ सालीं जिल्ह्यांतील सत्याग्रहाचा त्रोटक इतिहास छापून प्रसिद्ध केला आहे. त्यांत यावली येथील घटनांचा गौरवपूर्ण निर्देश करण्यांत आला आहे. ता. ८ आगष्ट १९३० हा सत्याग्रहाचा मुहूर्त योजण्यांत आला. कुऱ्हाडी, विळे इत्यादि सत्याग्रहाचीं साधनें गोळा करण्यांत आलीं.

या खेपेस यावलींतील तरुणांचें नेतृत्व कैलासवासी हुतात्मे वीर लक्ष्मणराव पांचघरे यांनी स्वीकारलें होतें. १९४२ च्या संग्रामांत प्रसिद्धीस आलेले वीर पंजाबराव यावलीकर यांनीहि सत्याग्रहींच्या यादींत आपलें नांव नोंदविलें होतें. सत्याग्रहाकरितां कुऱ्हाडी, विळे, पहारी, इत्यादि उपकरणें आणण्यासाठी ते उमरावतीस गेले असतांना त्यांच्या वडिलांनी त्यांना जबरदस्तीने आसेगांव हिवरा येथे नेऊन ठेविलें. तथापि सत्याग्रहाची तयारी चालूच राहिली. ता ७ आगष्टला वीर लक्ष्मणराव पांचघरे यांनी ग्रामस्थ बंधूभगिनींची जाहीर सभा घेतली आणि उद्याच्या सत्याग्रहाच्या वेळीं प्रेक्षक म्हणून सर्व लोकांनी हजर रहावें अशी विनंती केली. सत्याग्रहाची जागा यावलीचे पूर्वेकडे डवरगांव—चिंचखेड रस्त्यावर असलेलें सरकारी जंगल ही ठरविण्यांत आली. तो सर्व रस्ता तोरणें, तिरंगी झेंडे लावून सुशोभित करण्यांत आला होता. ८ आगष्टला सकाळीं बरोबर ९ वाजतां सर्व सर्व सत्याग्रही वीर गांधी चौकांत जमा झाले त्या ठिकाणीं त्यांना सत्याग्रहाचा उद्देश व चळवळीचा दृष्टिकोण समजावून सांगण्यांत आला. यावली येथील संकल्पित सत्याग्रहाची वार्ता समजतांच माहोली पोलीस ठाण्यांतील सब इन्स्पेक्टर मि० शर्मा हे नऊ दहा शिपायांची तुकडी बरोबर घेऊन यावलीस येऊन ठेपलेले होते. योजनेप्रमाणें गांधी चौकांतून निघून सत्याग्रहींची तुकडी सत्याग्रहस्थानावर ग्रामस्थ जनांच्यासह जाऊन पोहोंचली आणि तिनें ब्रि० सरकारच्या जंगल कायद्यावर कुऱ्हाडी चालवून त्यांची खांडोळी करण्यास प्रारंभ केला. दुपारीं ३ वाजेपर्यंत याप्रमाणें एक सारखीं झाडें तोडल्यानंतर सत्याग्रहींनी विश्रांति घेतली. त्या वेळीं पोलीस सब इन्स्पेक्टर मि० शर्मा यांनी सत्याग्रहींना अटक केली व प्रथम माहोलीस व तेथून पुढे उमरा-

वतीच्या तुरुंगांत त्यांची रवानगी केली. सत्याग्रहींनी तोडलेलीं लांकडें गांवकरी लोकांनी गांवांत आणून त्यांचा लिलाव केला. आणि लिलावांत वसूल झालली रक्कम गाव कॉंग्रेस कमेटीला देण्यांत आली. जनतेने अत्यंत निर्लोभ व शांत वृत्तीने सत्याग्रहाविषयी आपली सहानभूति अशा रीतीने व्यक्त केली.

पहिल्या दिवशींची सत्याग्रहींची तुकडी या प्रमाणें गिरफदार झाल्यानंतर जनतेने सत्याग्रह परंपरा चालू ठेवण्याचें ठरविलें आणि प्रथम सत्याग्रहाची सप्ताहाची एक योजना तयार केली. दुसऱ्या दिवशीं म्हणजे ९ आगष्टला बाल सत्याग्रहींच्या तुकडीने जंगलाच्या कायद्यावर हल्ला चढविला. सत्याग्रहींची बालवयें पाहून त्यांना पकडण्याची हिंमत पो० स० इ० मि० शर्मा यांना झालीं नाही. तिसऱ्या दिवशीं सत्याग्रहींची तुकडी बदलण्यांत आलीं व ती पकडलीहि गेली. चवथ्या दिवशीं या प्रमाणेंच सत्याग्रह झाला. सत्याग्रही व ग्रामस्थ लोक अत्यंत शिस्तीने व शांततेने आपलें कार्य करीत होते तरी त्यांच्याविरुद्ध निरनिराळ्या प्रकारच्या फुगविलेल्या भरमसाट बातम्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे पाठविण्यांत येत होत्या वस्तुतः दुसऱ्या दिवसापासून सकाळीं ८ ते ९॥ याप्रमाणें अवघा १॥ तास सत्याग्राहाचा कार्यक्रम चाले परंतु वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांकडे ज्या बातम्या पाठविण्यांत येत त्यांत ‘ आज बाभळीचीं साडेतीनशे झाडें तोडण्यांत आलीं, ‘आज सत्याग्रहींनी पोलिसांना शिवीगाळ केलीं’ ‘आज लोक त्यांना मारण्यास धांवले ’ ‘ हा सत्याग्रह चवदा दिवस चालणार आहे,’ ‘ प्रसंग मोठा भयंकर आहे’ इत्यादि प्रकारच्या विकृत स्वरूपांतील बातम्या पाठविण्यांत येत होत्या; आणि अधिक बलाने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यावलीस येऊन बंदोबस्त न केल्यास चळवळीचा भडका फार मोठ्या प्रमाणावर झाल्याखेरीज राहणार नाही असें हि सुचविण्यांत आलें.

यावलींतील घटनांचीं अतिरंजित वर्णनें दररोजच्या दररोज ऐकून व वाचून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्या दलबलासहित यावलीवर आक्रमण करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें माहोली पोलीस ठाण्यावर कळविण्यांत आलें. सत्याग्रहींना केवळ अटक करून अधिकाऱ्यांचें समाधान होईना. त्यांच्या ठिकाणीं गांवकरी लोकांना खासी दहशत बसविण्याची आसुरी लालसा उत्पन्न झाली. यावलीचें निमित्त करून आसपासच्या गावांवरहि त्यांना आपला दरारा बसवा-

वयाचा होता. त्यावेळीं यशवंत आकाजी हा यावलीचा कामकर्ता पाटील होता. १९२० सालचें रंगराव बालाजी पाटलाचें उदाहरण पाहून, सरकारने यशवंत आकाजीला आपल्या अगदी मुठींत धरून ठेवला होता. जिल्हा पोलीस अधिकारी नेल्सन हा मोठें पोलीस दल घेऊन यावलीवर चालून येणार आहे ही बातमी कळतांच यशवंत आकाजी पाटलाने आपल्या नीच कारवाया सुरू केल्या. सत्याग्रहांत सामील न झालेल्या निरपराध गांवकरी लोकांना तो छळूं लागला आणि पोलीसला मी तुमचें नांव सांगणार नाहीं, 'तुमचा बचाव करीन' असें सांगून पैसे उकळूं लागला. ज्यांनी अशा रीतीने लाच देण्याचें नाकारलें ते सर्व लोक सत्याग्रहांत सामील होते असा कांगावा करण्यास प्रारंभ केला. सत्याग्रहाच्या पांचव्या व सहाव्या दिवशीं डिस्ट्रिक्ट सुपरिन्टेन्डेन्ट ऑफ पोलीस मि० नेल्सन् हा परिस्थिति स्वतः अवलोकन करण्याच्या हेतूने यावलीस आला. आपल्या केवळ उपस्थितीनेहि गांवचे लोक घाबरून जातील अशी त्याची अपेक्षा असावी परंतु तसें कांहीच घडलें नाही. नित्याप्रमाणें सत्याग्रह झालाच. गांवकऱ्यांचा प्रचंड समुदाय उपस्थित होता. ग्रामस्थांचें संख्याबल पाहिल्यावर नेल्सन् महाशय मनांत चरकले त्यांनी गनिमी काव्याचा आश्रय केला. त्यांनी तसेंच गांवाच्या सीमेवरून पाठीस पाय लावला.

दुसरे दिवशीं जिल्हा पोलिस अधिकारी नेल्सन् हा एक सार्जंट व पन्नास लाठीबद शिपायांची एक तुकडी घेऊन पुनः यावलीवर चाल करून आला. तो स्वतः व सार्जंट हे दोघेहि भरलेलीं पिस्तुलें घेऊन घोड्यांवर स्वार झाले होते. हें सर्व आक्रमणकारी दल गांवावर चालून आलें त्यावेळीं पुनः सत्याग्रह चालूच होता. समस्त गांवकरी प्रेक्षक म्हणून हजर होते. त्यांचा जमाव पाहिल्यावर नेल्सन साहेबांची त्यांच्यावर चाल करून जाण्याची हिंमत झाली नाही. ते आपल्या दलबलासहित एका जवळच्या नाल्यांत लपून बसले

ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणें सत्याग्रह आटोपला. सत्याग्रही व गांवकरी लोक आपापल्या घरीं परतले. जेवणेंखावणें आटोपून त्यानंतर गांवांतील बहुतेक लोक आपापल्या शेतावर कामें करण्यास निघून गेले

सत्याग्रहींचीं भोजनें आटोपल्यावर त्यांनीं नित्याप्रमाणें कापून व तोडून आणलेल्या लाकडांचा लिलाव गांधीचौकांत सुरू केला. थोडेसे लोक बोली बोलण्यास जमले होते.

दोन्ही डोळ्यांनी आंधळा वीर नामदेवराव मराठा भाषण करून सत्याग्रहाचीं पवित्र लांकडें खरेदी करण्याविषयीं लोकांना सांगत होता. गांवांतील बहुसंख्य लोक शेतांवर निघून गेले आहेत, अवघीं पांच पंचवीस माणसेंच गांधी चौकांत जमा झालीं आहेत आणि आंधळा नादेवराव भाषण करीत आहे, तेव्हा ही परिस्थिति गांवांवर हल्ला करण्यास अनुकूल आहे असें कामकर्ता पाटील यशवंत आकाजी याने पोलीस अधिकारी मि० नेल्सन् यांस कळविलें. ही माहिती कळतांच आपले सर्व दल बरोबर घेऊन व कवायती पद्धतीने त्यांना चालवून नेल्सन् नाल्यांतून लपलेल्या ठिकाणांतून बाहेर पडला व त्यानें यावलीवर छापा घातला. वाटेंत गुढ्या तोरणें व तिरंगी झेंडे लागलेले होते ते सर्व उध्वस्त करण्यांत आले. पोलीस दल मोठ्या प्रमाणांत चालून आलें आहे हें पाहून लोक जरा चपापले पण तेथेच बसून राहिले. त्यांच्यावर लाठीमार करून त्यांना पळवून लावण्यांत आलें. आंधळा नामदेवराव मराठा भाषण करीतच होता. समोर चाललेला प्रकार त्याला कांहीच दिसत नव्हता, अथवा कळत नव्हता. त्याचें भाषण चालूच आहे असें पाहून नेल्सनच्या रागाचा पारा मस्तकांत शिरला व घोड्यावरून उतरून त्याने त्या काँग्रेसभक्त आंधळ्याच्या छातीवर हातांतील बेताचा प्रहार केला. अनपेक्षित प्रहार झाल्याबरोबर अंध नामदेवराव थोडा डगमगला. परंतु लगेच सावरून गर्जून म्हणाला—" मी भाषण करीत असतांना कोण बेत मारतो आहेरे ? भाषण चालू असतांना ही मजाक काय कामाची ? " त्यांचें तें बोलणें ऐकून नेल्सन् साहेबाचा पराक्रम फुरफुरून आला व त्यांनी आंधळ्या नामदेवरावला बेताने झोडण्यांस प्रारंभ केला. मार लागून आंधळा कोलमडून जमिनीवर कोसळला.

याप्रमाणें गांधी चौकांत आंधळ्यावर आपल्या शौर्याचे प्रदर्शन करून नंतर नेल्सन् व त्याचें पोलीसदल यांनी पळू लागलेल्या लोकांचा पाठलाग करण्यास प्रारंभ केला. लोक दारें लावून आंत बसले. दरवाजे फोडफोडून व घरांत घुसून घुसून लोकांना बेदम चोपण्यांत आलें व जो जो सांपडेल त्याला पकडून शाळेंत बंद करून ठेवण्यांत येऊं लागले. ज्यांच्या ज्यांच्या घरांत बाभळीचें लांकूड दिसेल तो सत्याग्रहास साहाय्यक असलाच पाहिजे असें समजून चोपण्यांत आलें व पकडून शाळेंत बंद करण्यांत आलें. सूर्याजी पिसा-

ळाचा अवतार बनलेल्या यशवंत आकाजी पाटलाने आपल्या नीचपणाची पराकाष्ठा केली. ज्यांनी त्याला लांच देण्याचें नाकारलें त्या प्रत्येकाचें घर त्यांनी दाखवून दिलें. त्यांच्या घरची मालमत्ता लुटण्यांत आली १९२१ सालीं देशभक्तीसाठी सरकारी रोषाची कुऱ्हाड स्वतःवर ओढवून घेऊनहि काँग्रेसचें बीजारोपण करणारा देशभक्त व शूर रंगराव बालाजी पाटील कोणीकडे ! आणि आपल्या स्वार्थासाठी १९३० सालीं आपल्याच ग्रामबंधूंची गर्दन शत्रूच्या हातीं देण्यास तयार झालेला व त्यांच्या जळत्या चितेवर स्वतःची रोटी भाजून घेणारा नराधम यशवंत आकाजी पाटील कोणीकडे !! एकाच ठिकाणच्या ह्या दोन पाटलाचें चित्र व चरित्र उद्बोधक नाही काय ? परंतु यशवंत आकाजीच्या नीचपणाला पायाखाली तुडवून रंगराव बालाजीची संख्याच देशांत वाढत आहे. म्हणूनच देश स्वातंत्र्याच्या मार्गावर अधिकाधिक प्रगति करीत आहे !!!

या हल्ल्याच्या वेळीं नेल्सन साहेब व त्यांचे शिपाई आणि यशवंत आकाजीसारखे त्यांचे हस्तक यांच्या अंगांत इतका सैतान संचरला होता की, त्यांनी लहान मुलें व स्त्रिया यांच्याहि अंगावर हात टाकण्यास कमी केलें नाही. बायामुलांसह सुमारें दोनशें लोकांना जनावराप्रमाणें झोडपण्यांत आले. याप्रमाणें बाया व मुलें यांच्यावर अफाट पराक्रम गाजून पोलीस अधिकारी व शिपाई थकले. त्यांना भूक लागली. गांधी चौकांत पहिल्या दिवसांच्या सत्याग्रहाचे पुढारी वीर लक्ष्मणराव पांचघरे यांचें किराणा मालाचें दुकान होतें. लक्ष्मणराव यांना पहिल्या दिवशींच अटक झाली होती. त्यांनी सत्याग्रहाची आग यावलीस पेटविली होती. त्यांच्या कर्तृत्वाने अधिकाऱ्यांची मनें जळूं लागलीं होतीं म्हणून त्यांचें दुकान लुटून फस्त करण्यांत आलें. सुमारें तीन हजार रुपये किंमतीच्या मालाची लूट करण्यांत आली. खाववेल तेवढा माल सैतानांनी तेथेच खाल्ला. बाकीच्या मालाने त्यांनी आपले खिशे भरले. कापड, किराणा इत्यादि मालाच्या गटड्याच्या गठड्या बांधण्यांत आल्या. ही सर्व लूट त्यांनी आपल्याबरोबर नेली लुटीने आपली सुडाची पोटांतली आग शांत केल्यावर ही टोळधाड शाळेंत बंद करून ठेवण्यांत आलेल्या लोकांच्याकडे वळली. ज्यांच्या डोक्यावर गांधी टोप्या होत्या त्यांना पुनः मारण्यांत आले. गांधी टोप्या फाडून व जाळून टाकण्यांत आल्या.

एवढ्याने शूर पोलीसांचें समाधान झालें नाही. त्यांनी शाळेंत बंदींत असलेल्या त्या असहाय लोकांना 'ब्रिटिश सरकारकी जय' व 'गांधी मुर्दाबाद' अशा घोषणा करण्यास सांगितलें. लोकांनी इनकार केला. त्यांना पुनः बेदम मारण्यांत आलें व झेंडा फाडून टाकण्यांत आला. ब्रिटिश सरकारचा विजय झाला ! ! शाळेंत बंद करून ठेवलेल्या कांहीं लोकांना कैद करून नेण्यांत आलें. यावलीवर या प्रमाणें अत्याचार करून व आंधळे, बायका व मुलें यांच्यासमोर आपला पराक्रम प्रकट करून जिल्हा पोलीस अधिकारी आपल्या पोलीस दलासह कैद्यांना बरोबर घेऊन निघून गेले.

कॉंग्रेसच्या जिल्हा युद्धमंडळाच्या कचेरींत यावलींच्या अत्याचाराची बातमी पोहोचली. तावडतोब कॉंग्रेसचें शुश्रूषापथक यावलीच्या मदतीस धावून आलें. जखमी लोकांना मलमपट्ट्या करण्यांत आल्या. अधिक गंभीर जखमा झालेल्या लोकांना अमरावती इस्पितळांत आणण्यांत आलें.

त्यावेळचे अमरावती जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे मंत्रि आचार्य त्र्यं. गं. जोशी यांनी १९३१ सालीं तुरुंगांतून सुटल्यावर " अमरावती जिल्ह्यांतील सत्याग्रहाचा त्रोटक इतिहास " पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला पुढे सरकारने हें पुस्तक जप्त केलें. त्यांत यावलीच्या सत्याग्रहाविषयीं जो गौरवपर परिच्छेद पृष्ठ २३ वर आला आहे तो खाली देण्यांत येत आहे.—

यावली जंगल सत्याग्रह—" ता ८ आगस्ट रोजीं यावली येथे हुतात्मा लक्ष्मणराव पांचघरे यांचे नेतृत्वाखाली १२ स्वयंसेवकांनी सत्याग्रह केला. त्यापैकी नेत्यासुद्धा ६ स्वयंसेवकांना अटक करण्यांत आली. लक्ष्मणराव पांचघरे यांना ९॥ महिने शिक्षा व बाकीच्या पांचजणांस ६।६ महिने शिक्षा झाली. तारीख ९ रोजीं आनंदराव सोनाजी वानखडे यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनी सत्याग्रह केला. अटक कोणास करण्यांत आली नाही. ता. १० रोजीं याच तुकडीने पुनः सत्याग्रह केला. अटक कोणासच झाली नाही. ता. ११ रोजी सकाळीं काशीराव पुंजाजी पाटील यांचे नेतृत्वाखाली कायदेभंग करण्यांत आला.

" ता० ११ चा सत्याग्रह संपवून स्वयंसेवक व प्रेक्षकमंडळी मराठी शाळेसमोरील मैदानांत जमली व काशीराव पुंजाजी यांचे अध्यक्षतेखाली सभेस

सुरुवात झाली. सभेच्या अगोदर जवळच्या एका आड असलेल्या नाल्यांत पोलीस लपून बसलेले होते. सभा चालू असतां कांही गोरे ऑफिसर, सबइन्स्पेक्टर व सरासरी १०० शिपाई एकदम सभास्थानीं हजर झाले. पोलिसांनी सभेस जमलेल्या लोकांवर एकदम हल्ला केला, त्यावेळीं नामदेव व्यंकटराव मराठा यांचें शांतता राखण्याविषयीं व्याख्यान चालू होतें. इतक्यांत त्यांच्या छातीवर लाठीचे दोन तडाखे बसले. त्यामुळे ते खाली कोलमडून पडले. नामदेवरावांचें वय अंदाजें २० वर्षांचें असून ते दोन्ही डोळ्यांनी आंधळे होते. वरील लाठीचे तडाखे एका गोऱ्या ऑफिसरने मारले व दुसऱ्या ऑफिसरने अध्यक्षास लाठी मारून खाली पाडले बाकीच्या पोलिसांनी प्रेक्षकावर लाठीमार सुरू केला. लाठीमार करण्याचें कारण जमलेल्या लोकांस सांगण्यांत आलें नाही. लोक भराभर पळू लागले. तेव्हां त्यांचा पाठलाग करून त्यांना मार देण्यांत आला. कांही लोकांना त्यांच्या घरांत घुसून मारण्यांत आलें. ता० ११ रोजीं सत्याग्रह केलेल्या स्वयंसेवकांस यावलीवरून माहोली येथील पोलिस ठाण्यांत पोहोचविण्यांत आलें व तेथे पोलिस ठाण्यांत बेताने बेदम मारण्यांत आलें. दीपचंद माणिकचंद, गणपतराव, मारोती, गोविंद, परशराम, रामा पुंजाजी, गणेशगीर, बाजीराव वगैरे लोकांना एक एक लाथ मारून सोडून देण्यांत आलें. वरील मारामारींत सरासरी ४० माणसें जखमी झालीं. त्या सर्वांना मोटारींतून अमरावती कॉंग्रेस हॉस्पिटलमध्यें आणून डॉ. वाटवे व डॉ. जोशी यांनी औषधोपचार सुरू केले. या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याकरितां जिल्हा कॉंग्रेस कमेटीने श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं एक चौकशी कमेटी नेमली होती. तिचा सविस्तर रिपोर्ट (उदयच्या) ता० २ व ९ सप्टेंबर १९३० च्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. या सत्याग्रहांत भाग घेण्यापूर्वी यावलीजवळील कापूसतळणीचे पाटील काशिरावं पुंजाजी यांनी आपल्या पाटीलकीचा राजिनामा दिला होता. परंतु त्यांना अजून गांधी इर्विन तहनाम्याप्रमाणें कामावर घेण्यांत आलें नाहीं."

प्रकरण ४ थें

हुतात्मा लक्ष्मणराव पांचघरे

स्वातंत्र्य-देवतेच्या चरणीं ज्यांनी आपलीं शिरकमलें समर्पण केलीं अशा यावलीच्या देशभक्तांच्या उज्ज्वल परंपरेंत हुतात्मा लक्ष्मणराव पांचघरे यांचें स्थान फार श्रेष्ठ आहे. १९३० च्या चळवळीचा वन्हि याच तरुण देशभक्ताच्या प्रयत्नाने यावली येथे कसा भडकला हें आपण मागील प्रकरणीं पाहिलेंच आहे.

यावेळीं लक्ष्मणराव पांचघरे यांचें वय २० वर्षांचें होतें. त्यांचा स्वभाव मोठा तेजस्वी व स्वाभिमानी होता. कोणाकडून यत्किंचित् झालेला उपमर्दसुद्धा त्यांना सहन होत नसे. त्यांच्या या करारी व तेजस्वी जीवनाची छाप सहजच कोणावरहि पडत असे. अन्याय-मग तो कोणांवरहि झालेला असो—पाहिला की, त्याची त्यांना भयंकर चीड येई व परिणामाची मुळीच पर्वा न करतां ते त्याच्या प्रतिकारास धावून जात. अशा या तेजस्वी व स्वाभिमानी तरुण देशभक्ताला त्याच्या सत्याग्रही साथीदारांसह जेव्हा पकडून नेलें, तेव्हा पदोपदीं ब्रि. सरकारच्या अधिकाऱ्यांकडून होत असलेले अन्याय त्याला दिसूं लागले.


लक्ष्मणराव यांचेवर ताबडतोब खटला भरण्यांत आला व त्यांना ९॥ महिन्यांच्या सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यांत येऊन अमरावतीच्या तुरुंगांत क वर्गांत ठेवण्यांत आलें.

पोलिस काय किंवा तुरुंगाधिकारी काय, बहुतेक सर्व अधिकारी हिंदी असतांना त्यांनी आपल्याच देशबांधवांना कष्ट द्यावेत, त्यांच्यावर अत्याचार करावेत आणि केवळ आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी परकी सत्तेचे गुलाम बनून कोणताहि अन्याय करण्यास प्रवृत्त व्हावें, याची लक्ष्मणरावांना तुरुंगाच्या जीवनांत भयंकर चीड येऊं लागली. गांधीजींच्या उपदेशास अनुसरून आपल्या



शहीद लक्ष्मणराव पांचघरे

या दोघांनाहि गोळया लागल्या



१. तानाबाई न्हावीन   २. उद्धव ढोक

चित्ताची शांति सांभाळण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला, परंतु केवळ पोटासाठी मनुष्य नीतिमत्तेचा खून करण्यास व आपल्या आत्म्याचाहि विक्रय करण्यास कां तयार होतो, हें कोडें त्यांना भंडावून सोडूं लागलें

त्यांच्या या सहनशीलतेचाहि अंत पाहणारा असाच एक प्रसंग ते तुरुंगांत असतांना घडला. लक्ष्मणराव आपल्या बराकीच्या आवारांत चक्करला लागून असलेल्या लोखंडी कुंपणापाशी उभे होते. चक्कर ऑफिसर एका राजकीय कैद्याला शिवीगाळ करीत होता. लक्ष्मणरावांनी तें पाहिलें आणि त्यांचें देहभान हारपलें. त्यांचा काबू सुटला. ते दरवाजांतून चक्करमध्यें मुसंडी मारूं लागले. दरवाजाला लठ्ठ कुलूप लागलेलें होतें आणि पहारेकरी तर कुलूप उघडून त्यांना चक्करमध्ये जाऊं देईना त्यासरशी एका घडाक्यांत पुरुषभर उंचीच्या लोखंडी कुंपणावरून त्यांनी चक्करमध्ये उडी मारली आणि चक्कर ऑफिसरची त्याने केलेल्या अन्यायाबद्दल सडकून हजेरी घेतली. जो राजकीय कैदी चक्कर ऑफिसरची शिवीगाळ मुकाट्याने ऐकून घेत होता, त्यालाहि त्यांनी दोन गोष्टी ऐकविल्या आणि त्याच्या नामर्दपणाची व स्वाभिमानशून्यतेची तेथेच घोर निंदा केली. तेजस्वितेची ही आकस्मिक चमक पाहून, चक्कर ऑफिसर त्यावेळीं तर चूप बसला, परंतु मागाहून त्याने लक्ष्मणरावांना गुन्हाखान्यांत म्हणजे अंधारकोटडींत नेऊन कोंडलें.

हा मनुष्य आपल्या तेजस्वी वागणुकीने सर्व तुरुंगाचें वातावरण बदलून टाकील, आपला दरारा नाहीसा होईल, सरकारी शिस्त कोणी पाळणार नाही आणि परिणामीं आपलीच बदनामी होईल, हें जाणून त्या चक्कर ऑफिसरने आपल्या नेहमीच्या पद्धतीने लक्ष्मणरावांना पिचून टाकण्याचें ठरविलें. तो त्यांचा देह मारूं इच्छित नसला, तरी आत्म्यास मारूं इच्छित होता. कष्टाने गांजून, संत्रस्त होऊन दीनपणें लक्ष्मणरावांनी शरण यावें अशी त्याची इच्छा असली पाहिजे, पण लक्ष्मणरावांची मूर्ति कच्च्या धातूची बनलेली नव्हती. त्यांचा स्वाभिमान सहज छिन्नभिन्न होण्याइतका लेचापेचा नव्हता. त्यांनी एक शब्दहि न बोलतां अथवा कृतकर्माचा यत्किंचितहि विषाद न मानतां अंधारकोठडींतील यातना सहन केल्या. भारी चक्कीवर दळणाचें काम त्या अंधार

कोठडींत त्यांना नेमून देण्यांत आलें. दररोजचें काम त्यांनी दररोज पूर्ण करावें. त्यांनी कधी काम पडूं दिलें नाही; अथवा काम कमी करण्याची याचनाहि केली नाही.

परंतु त्यांना देण्यांत आलेलें कामच इतकें भारी व कष्टाचें होतें की, त्याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाल्याविना राहिला नाही. क वर्गाचें कदान्न भक्षण, अंधारकोठडींतून हवा व प्रकाश यांवाचून चाललेलें जीवन, अनारोग्य-कारक परिस्थिति, आणि तशांत चक्की दळण्यासारखें भारी काम या सर्वांच्या समुच्चयाने त्यांची प्रकृति सपाट्यानें ढासळली. चक्की दळून दळून त्यांची छाती फाटूं लागली. छातींत वेदना होऊं लागल्या. असह्य अशा कळा निघूं लागल्या. अशाहि स्थितींत ते आपलें रोजचें काम पुरें करीत. परंतु त्यांचें दुखणें विकोपास चाललें आहे हें पाहून त्यांना इस्पितळांत नेण्यांत आलें.

ब्रि० तुरुंगांचा—विशेषतः हिंदुस्थानांतील तुरुंगांचा—असा एक कायदा आहे की, कोणतीहि गोष्ट विकोपास गेल्याशिवाय तुरुंगाधिकारी तिची दादच घेत नाहीत. पुष्कळदा योग्य वेळीं दाद न घेतल्यामुळे गोष्टी इतक्या विकोपास जातात की, नंतर त्या सुधारणें अशक्यप्राय होऊन बसतें. गोष्ट विकोपास गेल्याशिवाय तिची दाद न घेण्याच्या सवयीमुळे तुरुंगांतील व्यवस्थेने कितीएक लोकांना जन्माचे जायबंदी करून टाकलें, कितीतरी लोकांच्या प्रकृति कायमच्या ढासळल्या, आणि कित्येकांचें तर तुरुंगाच्या आंतच बलिदान घडलें.

लक्ष्मणराव पांचघरे यांच्या बाबतींतहि असेंच घडलें. त्यांना जेव्हा इस्पितळांत आणण्यांत आलें, तेव्हा त्यांची प्रकृति सुधारण्याच्या मर्यादेच्या पलीकडे ढासळली असल्याचें आढळून आलें. मोजून चार दिवससुद्धा इस्पि-तळांत त्यांना काढावे लागले नाहीत. तिसऱ्या दिवशींच त्यांचें देहावसान झालें. यावलीच्या पहिल्या शहीदाचें रक्त अशा रीतीने तुरुंगांत सांडलें. त्या रक्ताच्या थेंबाथेंबांतून पुढे तुरुंगांत झालेले अनेक तेजस्वी लढे निर्माण झाले. लक्ष्मणरावचा बळी उमरावतीच्या तुरुंगांत गेला नसता, तर येथील तुरुंग जीवनांत पुढे जी सुधारणा झाली ती कितपत झाली असती याची शंकाच आहे.

लक्ष्मणरावाचा मृत्यु हा मृत्यु नव्हता. मूर्ख व हृदयशून्य चक्कर ऑफिसर व तुरुंगाची बनावटी, कठोर शिस्त, यांनी त्यांचा पद्धतशीर खून पाडला होता. चक्कर ऑफिसरसमोर त्यांनी आपली मान वांकविण्याचें नाकारलें, व त्याने केलेल्या अन्यायाचा त्यांनी तोंडावर निषेध केला. या अपराधाचें तें प्रायश्चित होतें. त्यांनी आपल्या आत्म्याचें रक्षण केलें, पण त्यासाठी त्यांना आपल्या देहाचा बळी द्यावा लागला.

लक्ष्मणरावच्या मृत्यूची बातमी हां हां म्हणतां तुरुगभर पसरली. जिकडून तिकडून सत्याग्रहींचे जत्थे त्यांच्या त्या पावन शरीरापाशी जमा झाले. त्यांच्या जिवंतपणीं जीं लोखंडी कुलुपें उघडण्याचें पहारेकरी लोकांनी झिडकारलें होतें, तीं आतां त्यांच्या मृत्यूमुळे आपोआप खुलीं झालीं. तुरुंगाधिकारी वंगून गेले. खाली माना घालून अपराधी मुद्रेने लक्ष्मणरावाच्या शवाचा होत असलेला सत्कार ते पहात राहिले, त्यांचें अपराधी मन तिकडे त्यांना ओरडून सांगत होतें कीं, ‘तुम्ही या देशभक्ताचा खून केलात ! तुम्ही या निरपराध देशभक्ताचा बळी घेतलांत !! तुम्ही भेकड आहात, खुनी आहांत’ !!! आणि इकडे तुरुंगांतील सत्याग्रही लक्ष्मणरावच्या त्या मृतदेहावर पुष्पहार चढवीत होते, त्याची पूजा करीत होते, पुष्प शय्येवर त्याला निजवीत होते !!!

हां हां म्हणता या बलिदानाची हकीगत अमरावती शहरांत समजली. अमरावती जि० काँ० कमेटीने तुरुगाधिकाऱ्यांकडे त्यांच्या शवाची मागणी केली. मुकाट्याने खालीं माना घालून त्यांनी प्रेत बाहेरील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या स्वाधीन केलें. प्रचंड प्रेतयात्रा निघाली. हजारों हिंदुमुसलमानांनी प्रेताला खांदा दिला. लक्ष्मणरावांच्या जयजयकाराने नभोमंडल दुमदुमून गेलें, तर लोकांनी—स्त्रीपुरुष नागरिकांनी-गाळलेल्या अश्रूंच्या पुरामुळे अमरावतीची भूमि भिजून ओली चिंब झाली.

अमरावती जिल्हा काँ. कमेटीने प्रसिद्ध केलेल्या १९३० सालच्या सत्याग्रहाच्या पूर्वोक्त इतिहास पुस्तिकेंत (पृष्ठ १३) हुतात्मे लक्ष्मणराव पांचघरे यांना पुढीलप्रामाणे श्रद्धांजलि अर्पण करण्यांत आली आहे.

" अमरावती तुरुंगांतील अधिकाऱ्यांच्या निर्दय वर्तनामुळे यावली कॉं. कमेटीचे चिटणीस दे० भ० लक्ष्मणराव पांचघरे यांना तुरुंगांतील हालअपेष्टा सहन न होऊन ताप आला. त्यांतच ता० १३ ऑक्टोबर रोजीं तुरुंगांतच त्यांचा अंत झाला. त्यांचें शव मोठ्या शिकस्तीने तुरुंगाच्या अधिकाऱ्याकडून लक्ष्मणराव पांचघरे यांच्या आप्तांनी ताब्यांत घेतलें. त्या शवाची अमरावती शहरांत प्रचंड मिरवणूक काढण्यांत आली. मृतात्म्यास हजारों स्त्री पुरुषांनी प्रणाम करून, सर्वांनी आपली भक्ति व्यक्त केली. जाहीर सभेत त्यांच्या गुणवर्णनपर भाषणें होऊन, त्यांचें शव यावली मुक्कामीं पोहोंचविण्यांत आलें. अमरावती जिल्ह्यांतील सत्याग्रही वीरांपैकीं पंचप्राणांचें बलिदान करणारा हा वीर कोणाचेहि स्मृतींतून दूर होणार नाही."

प्रेतयात्रेचें—मिरवणुकीचें पर्यवसान जाहीर सभेंत झालें. जिवंतपणीं मिळाला नसेल एवढा बहुमान लक्ष्मणराव यांना मृत्यूनंतर मिळाला, त्यांच्या शवावर पुष्पहारांचे ढीग पडले. शवाची छायाचित्रें घेण्यांत आलीं. त्यांच्या गुणवर्णनपर भाषणें होऊन त्यांना श्रद्धांजलि अर्पण करण्यांत आला.

यावली येथील दहनसंस्कार

याप्रमाणें अमरावती येथील समारंभ आटोपल्यावर शव आप्तांबरोबर यावलीस रवाना करण्यांत आलें. लक्ष्मणरावाच्या तुरुंगांतील निर्घृण मृत्यूची बातमी एकतांच त्यांच्या घरीं एकच आकांत माजला. अमरावतीहून शव येण्याची ग्रामस्थ लोक तटस्थ वाट पहात बसले. कोणी भोजन केलें नाहीं, कोणी कामावर गेला नाही. यावलीस प्रेत पोहोंचल्यावर पुनः संस्कार करण्यांत आले. स्मशानयात्रा निघाली. विधिपूर्वक अग्नि देण्यांत आला. त्यावेळीं लक्ष्मणरावाच्या मातेने जो आकांत केला, त्याचें कोण वर्णन करू शकणार ? आपल्या पुत्राबरोबर आपणहि स्वर्गारोहण करावें, या भावनेने ती माऊली वारंवार चितेला कवटाळण्याचा प्रयत्न करू लागली.

१३ अक्टोबर १९३० ही तारीख यावलीच्या इतिहासांत चिरस्मरणीय राहील. लक्ष्मणराव पांचघरे यांच्या दिव्य हौतात्म्याने यावलीच्या राष्ट्रीय

जीवनांत नवीन प्राणसंचार झाला. त्यामुळे यावलीच्या हृदयांत कधीहि न विझणारी अशी क्रांतीची ज्योत भडकली. या ज्योतीचा १९४२ च्या आंदोलनांत जो दिव्य प्रकाश सर्वत्र पसरला त्यामुळेच यावलीचा इतिहास सार्थ झाला. यावलीच्या स्मशानांत, लक्ष्मणरावाच्या चितेंतून उगवणाऱ्या दुर्वांकुरानी पूजित झालेली क्रांतीची महादेवता, जागृत झाली. आणि तिने १९४२ सालीं साक्षात् रणचंडी बनून यावलीचा चैतन्यमय संग्राम ग्रामीणांच्या हातून घडवून आणला.

ग्रामीण जनतेंतून ज्या ज्या प्रमाणांत स्वातंत्र्य—'आंदोलनाचें बीज रोवलें जाईल, त्या त्या प्रमाणांतच स्वराज्याचा महावृक्ष वाढूं लागेल हें उघड आहे. अशा ग्रामीण स्वातंत्र्य-संगरांतच यावलीचा संगर महत्वाचा आहे. खेड्यांतील शेतकरी एक वेळ आपल्या निढळीचा घाम ढाळून आपल्या उपजीविकेचा प्रश्न सोडवीत असे. आतां तो आपले बहुमोल रक्तसिंचन करून, स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्यास तयार झालेला आहे. दैन्य, दारिद्र्य, पारतंत्र्य, जुलुम व जबरदस्ती यांच्यामुळे एकेकाळीं तो केवळ अश्रुमोचन करीत असे, आतां असहाय अश्रूंच्या ऐवजीं मर्दपणाने रक्ताचे पाट वाहवून तो प्रतिकारास सज्ज होऊं लागला आहे. आणि लक्ष्मणराव पांचघरे यांच्यासारख्या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे त्याच्या प्रतिकारक्षमतेला अधिक तेजस्वी अशी धार चढूं लागली आहे; हें यावलीने १९३० सालीं दाखवून दिलें. आणि त्याचें अत्यंत विकसित व भडकदार असें रुद्र रूप १९४२ सालीं प्रकट झालें.

प्रकरण ५ वें

क्रांतिपूर्व काळ

१९३० च्या आंदोलनाची परिसमाप्ति गांधीइर्विन करारनाम्यांत झाली. "या करारनाम्याच्या रूपाने, ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानांतील आपलें साम्राज्य गांधीजवळ गहाण टाकलें आहे व आतां तें परत मिळण्याची आशा नाही." असे उद्गार ब्रिटनमधील हुजूर पक्षाचा गणंग पुढारी चर्चिल याने त्यावेळीं काढले होते. गांधीइर्विन तहनामा हा काँग्रेसने ब्रिटिश सरकारवर मिळविलेला मोठाच विजय होता. नव्हे, या विजयाची ब्रिटिश सरकारच्या मुखाने मिळालेली ती मान्यता होती. या विजयामुळे हिंदी जनतेला अवर्णनीय स्फुरण चढलें. ब्रिटिश सरकारने पहिली गोलमेज परिषद रद्द करून, दुसरी गोलमेज परिषद लंडन येथें बोलाविली. तिला हिंदी राष्ट्राच्या वतीने एकमात्र प्रतिनिधी म्हणून काँग्रेसने म० गांधीची निवड केली. बरोबरीच्या नात्याने गांधी व ब्रि० सम्राट यांची भेट झाली. काँग्रेसचा हा बोलबाला कट्टर साम्राज्यवादी ब्रिटिशांना व हिंदुस्थानांतील दुर्दम्य गोऱ्या नोकरशाहीला सहन होणें शक्य नव्हतें. त्यांनी आपसांत कारस्थान रचलें आणि म० गांधी लंडनहून गोलमेज परिषदेंतून परत येण्याच्या आंत हिंदुस्थानांत पं० जवाहरलाल नेहरूंना अटक करून काँग्रेसला युद्धाचें आव्हान दिलें. परिस्थिति बिकट होती. जनता १९३० च्या संग्रामानंतर थकली होती आणि त्यांत मिळालेल्या विजयामुळे सावधहि नव्हती. अनन्यगतिक होऊन काँग्रेसने आव्हान स्वीकारलें. सरकारचा आघात खाली मान घालून सहन करणें शक्य नव्हतें.

सरकारी दमनशाहीचें चक्र सुरू झालें. काँग्रेसचे पुढारी व अनुयायी तुरुंगांत दडपण्यांत आले. पश्चात् हरिजनांबद्दल ब्रि० सरकारचा अवार्ड प्रसिद्ध झाला तो रद्द करून घेण्यासाठी म० गांधींनी तुरुंगांतच प्राणांतिक उपोषणाचें प्रायोपवेशन केलें. ब्रि० सरकार दबलें. अवार्ड रद्द झाला. पुनः एक महत्त्वपूर्ण विजय मिळाला. हळूहळू सर्वच पुढारी सुटले आणि गांधीजींनी

मोठ्या खुबीने चळवळीची गाडी हरिजन कार्याच्या रुळावर ढकलून दिली. देशव्यापी हरिजन-दौरा करून सर्व देशाचें व कार्यकर्त्यांचें लक्ष त्यांनी हरिजनोद्धाराच्या कार्याकडे वेधून घेतलें.

१९३४ साल उजाडलें. जॉईंट पार्लमेंटरी कमेटीच्या रिपोर्टाकडे सर्वांचें लक्ष लागलें. १९३५ सालीं रिपोर्ट प्रसिद्ध झाला. १९३६, १९३७ मध्यें नवीन घटनेप्रमाणे हिंदुस्थानांत निवडणुकी होणार हें निश्चित झालें. निवडणुकी आल्या. त्यांच्या निमित्तानें प्रचंड धामधूम सुरू झाली. कॉंग्रेसने निवडणुकी लढविण्याचें ठरविलें. कॉंग्रेसचा आबालवृद्ध कार्यकर्ता कॉंग्रेसच्या विजयासाठी झटूं लागला. अकरापैकीं सहा प्रांतांत कॉंग्रेस दणदणीत विजय मिळवून निवडून आली. १९३२ च्या घोर दडपशाहीनंतरही देश व जनता कॉंग्रेसच्याच मागे आहे हें निर्विवाद सिद्ध झालें. दडपशाहीचा बार फुसका ठरला. अवघ्या तीन वर्षांत—१९३० तें ३२—दडपशाहीच्या दोन दोन अग्निकुंडांतून भाजून निघालेलें जनतेचें कॉंग्रेसभक्तीचें सोनें बावन्नकशी ठरलें. प्रथम सहा प्रांतांत व नंतर सरहद्द व आसाम प्रांतांत मिळून अकरापैकीं एकूण आठ प्रांतांत कॉंग्रेसची राजवट सुरू झाली. लोक, जनता, शेतकरी, कामगार, व्यापारी सर्वच मोठ्या आशेने व उत्साहाने कॉंग्रेसचा हा, राज्ययंत्र हातीं घेऊन राबविण्याचा, प्रयोग पाहूं लागले.

अकस्मात् जागतिक परिस्थितींत वादळाचे मेघ जमूं लागले. युरोपांत हिटलरने पोलंडवर आक्रमण केलें. नेहमीप्रमाणे दलित व लहान राष्ट्राच्या मदतीस धावून जाण्याचें थोतांड माजवीत ब्रिटन व फ्रान्स युद्धांत पडलें. जागतिक महायुद्धाचा वणवा भडकला. १९३९ सालीं सुरू झालेल्या या महायुद्धांत हिंदी जनतेच्या मताची कदर न करतां ब्रि० सरकारने हिंदुस्थानला आपल्या बाजूने युद्धांत खेचलें. हा हिंदी जनतेच्या मताचा उपमर्द सहन न होऊन कॉंग्रेस मंत्र्यांनी आपापल्या मंत्रिपदांचे राजिनामे दिले. युरोपांतील वादळी मेघांची छाया भारतावरहि पडूं लागली.

हिंदी लोकमताचा उपमर्द करून ब्रि. सरकारने हिंदुस्थानला महायुद्धाच्या खाईत तर ढकललेंच, पण त्याशिवाय युद्धसाहाय्याच्या नांवाखालीं हिंदुस्थानची

संपत्ति, अन्नधान्य व कपडा आणि जीवनोपयोगी इतर अनेक वस्तूंची अमर्याद लूट सुरू केली. युद्ध प्रयत्नासाठी म्हणून आवश्यक ती सत्ता आपल्या हातीं असावी म्हणून युद्धकाळांत ब्रि. सरकारला सुमारें १०८ काळे कायदे जारी करावे लागले, ही एकच गोष्ट ब्रिटिश शासक हिंदुस्थानांत युद्धाच्या निमित्तानें केवढा नंगा नाच घालीत होते, याची साक्ष देण्यास पुरेशी आहे. हिंदी लोकांची वाटेल ती गैरसोय झाली तरी चालेल, कपडा नसला तर त्यांनी नागवें रहावें, औषधें नसलीं तर त्यांनीं खुशाल मरावें, अन्नधान्य नसलें तर उपासमारीनें तडफडून त्यांनी प्राण सोडावे, उपजीविकेला साधन नसलें तर युद्धकार्यांत भरती व्हावें आणि शत्रूच्या तोफेच्या भक्ष्यस्थानीं पडावें, पण आमचा युद्ध-प्रयत्न असाच अबाधित चालूं राहिला पाहिजे, अशा मनोवृत्तीने ब्रिटिश शासन-यंत्राचें भयंकर चक्र महान् वेगानें फिरूं लागलें. जेथे इंग्लंडच्याच जगण्याची मारामार, तेथे बिचाऱ्या हिंदी जनतेला कोण विचारतो !

ब्रिटिश शासकांच्या या अदूरदर्शी धोरणामुळे, युद्ध जसेंजसें अक्राळविक्राळ स्वरूप धारण करूं लागलें, तसातसा हिंदी जनतेचा छळहि अधिकाधिक वाढूं लागला. तिच्या सहनशीलतेचा जणु काय अंतच पहाण्याचें ब्रि. सरकारनें योजले होतें. कापड नाही, वस्त्र नाही, अन्न नाही, धान्य नाही, स्वाभिमानी उपजीविकेचें साधन नाही, कोणी विचारता नाही, त्राता नाही, अशा विलक्षण अराजक अवस्थेंतून हिंदी जनता जात होती. हताशा व बेफाम मनोवृत्तीचा पगडा तिच्यावर बसूं लागला होता. घोर दुष्काळाचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं आणि स्वाभिमान प्रतिक्षणीं पायाखालीं तुडविला जात होता.

हिंदी लोकांच्या स्वाभिमानाचें प्रतीक म्हणून काँग्रेसने म० गांधींच्या नेतृत्वाखाली वैयक्तिक सत्याग्रहाचा लढा १९४० सालीं सुरू केला. पण तो लढा केवळ प्रतीकात्मक होता. दोस्तांच्या युद्धकार्यांत अडथळा आणण्याची हिंदुस्थानची इच्छा नाही, उलट सहकार्य करण्याचीच इच्छा आहे, पण हें सहकार्य अधिक परिणामकारक करतां यावें म्हणून राष्ट्रीय सत्ता हिंदी लोकांच्याच हातांत असली पाहिजे असें काँग्रेसचें मागणें होतें. एकटेच म० गांधी सोडून बाकीचे बहुतेक सर्व काँग्रेस नेते वैयक्तिक सत्याग्रह करून तुरुंगांत गेले होते. जवळ-

पासचे, दररोजच्या परिचयाचे, आपत्कालीं आपल्या साहाय्यास धावून येणारे स्थानिक पुढारी आपल्याजवळ नाहीत, आणि परिस्थिति तर अधिकाधिक भीषण होत चालली आहे, हें पाहून जनतेचाहि धीर सुटत चालला होता. भावी भीषण संकटाची जाणीव जनता व सरकार या दोघांनाहि म० गांधी करून देत होते. 'हरिजना'च्या ओळी ओळींतून त्यांचें तुटणारें अंतःकरण अभिव्यक्त होत होतें. पण दोस्तांच्या तर्फे उफाळणारी त्यांची सर्व सदिच्छा धुळीस मिळत होती. उन्मत्त व धुंद ब्रिटिश अधिकारी हा कळकळीचा उपदेश झिडकारून ब्रिटिश साम्राज्याच्या विनाशाचा खड्डा स्वतःच खोदूं लागले होते.

अखेरीस त्यांचा ढालगजपणा त्यांच्याच अंगलट येऊं लागला. हिटलरची विजयी समशेर पश्चिम युरोपांतील छोटीं मोठीं राष्ट्रें पादाक्रांत करून ब्रिटनवर अग्निवमन करूं लागली. जर्मनांच्या वैमानिक हल्ल्यामुळे ब्रिटनमधील सर्व मोठमोठ्या नगरांच्या घरांघरांतील विटा खिळखिळ्या झाल्या. दूर परदेशांत असलेलें रणक्षेत्र हिटलरच्या वैमानिकांनी खुद्द इंग्लंडच्या भूमीवर नेऊन पोहोंचविलें. इंग्लंडमधील श्रीमंत लोकांचीं बायकामुलें जहाजांत भरून कानडांत पाठविण्यांत येऊं लागलीं. ब्रि० खजिन्यांतील मौल्यवान् वस्तू व कागदपत्रेंहि कानडांत पाठविण्यांत आलीं. शाही राजवाड्यावर व पार्लमेंटच्या सभागृहावरहि बाँबगोळे पडले. इंग्लंडच्या जनतेची पांचावर धारण बसल्याचें स्पष्ट दिसूं लागलें.

इकडे १९४१ सालीं अमेरिका व ब्रिटन या दोघांच्याहि विरुद्ध जपानने युद्ध पुकारून मोठीच बिकट परिस्थिति निर्माण केली. अवघ्या नऊ महिन्यांच्या अवधीत जपानी सेनेने फिलीपाईन्स, सायमन्स, गाडलकनाल, न्यूगिनी, बोर्निओ, जावा, सुमात्रा, सिंगापूर, मलाया व ब्रम्हदेश, हिंदुचीन इ० प्रदेश पादाक्रांत केले. पत्त्यांच्या बंगल्यासारख्या ब्रिटिश, अमेरिकन, फ्रेंच, डच व पोर्तुगीझ या पांचहि साम्राज्यशाह्या जपानच्या एकेका धडकीसरशीं कोसळल्या आणि जपानी सेना हिंदुस्थानच्या दाराशी धडका मारूं लागल्या.

एका बाजूने ब्रि० नोकरशाहीची हिंदुस्थानांतील उद्दाम जुलमी राजवट अधिकाधिक असह्य होत चालली होती, जनतेच्या सहनशीलतेच्या मर्यादा सुटत चालल्या होत्या, तर दुसऱ्या बाजूने ब्रिटिशांच्या पराभवाच्या व फज्जे

उडाल्याच्या बातम्या तिच्या कानावर आदळत होत्या. जपानी आक्रमणामुळे ब्रि० साम्राज्यशाही किती दुर्बल-कमकुवत झाली आहे याचा अंदाज हिंदी लोकांना लागला होता. एक धडक मारली तर कोसळून पडण्याइतकी ती पोखरून निघाली आहे हें तिला मनोमन कळूं लागलें होतें. आणि म्हणूनच क्रांतीसाठी ती अधिकाधिक उतावीळ झाली होती. गांधीजी जनतेच्या मनोवृत्तीची जाणीव ब्रिटिश सरकारला निःसंदिग्ध शब्दांत करून देण्याचें कर्तव्य बजावीत होते.

तिकडे युरोपांत लेनिनग्रॅड, मास्को, स्टॅलिनग्रॅड आज पडतात की उद्या, अशी स्थिति निर्माण झाली आहे, रशियाचा जर युद्धांत पराजय झाला तर आपली मुळीच धडगति राहणार नाही, इकडे जपान हिंदुस्थानच्या दाराशीं धडका मारूं लागला आहे, जर्मनांचा विख्यात सेनापती रोमेल अलेक्झांड्रिया-च्या दाराशीं येऊन थडकला आहे, अमेरिका व तिची मदत फारच लांब आहेत, अशी अनन्यगतिक परिस्थिति निर्माण होतांच ब्रि० साम्राज्यकर्त्यांची धुंद खाडकन् उतरली. आणि ज्या नंग्याफकीराचें तोंडहि पहाण्यास ब्रिटनचे प्रधान-मंत्रि चर्चिल महाशय तयार नव्हते, त्याच महात्मा गांधींची खुशामत करण्यास सर स्टॅफोर्ड् क्रिप्स यांना हिंदुस्थानांत पाठविण्यांत आलें.

कॉंग्रेस नेत्यांची तुरुंगांतून सुटका करण्यांत आली. वाटाघाटींचा घोळ घालण्यांत आला. जनतेच्या आशा पल्लवित होऊं लागल्या. राष्ट्रीय सरकार प्रस्थापित करण्याच्या गोष्टी क्रिप्स महाशय बोलूं लागले. खातेवाटणीच्या गोष्टी करीपर्यंत मजल पोहोंचली. आपल्या आपत्तींचा अंत आतां जवळ येऊन पोहोंचला आहे, स्वातंत्र्याचा सूर्य आता खरोखरच उदय पावणार आहे असें हिंदी लोकांना वाटूं लागलें. हिंदी लोकांच्या समस्त आशा-आकांक्षा दिल्लीस चाललेल्या वाटाघाटींवर केंद्रित झाल्या. डोळ्यांत व कानांत प्राण आणून ती वाटाघाटींचें दृश्य पाहूं लागलीं व बोलणीं ऐकूं लागली. या पहिल्या क्रिप्स शिष्टाईच्या वेळीं हिंदी जनतेच्या आशा जितक्या पल्लवित झाल्या तितक्या त्या यापूर्वी केव्हांच झाल्या नव्हत्या, त्यामुळे वाटाघाटी फसल्या तर त्याचे घोर परिणाम होणार हें सर्वांनाच दिसत होतें. परंतु, पुनः एक वेळ ब्रिटनमधील

प्रतिगामितेने जोर मारला. सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना तांतडीने परत बोलाविण्यांत आलें. खातेवाटणीचीं बोलणीं प्रत्यक्ष सुरू असतांना वाटाघाटी मोडल्याचें जाहीर करण्यांत आलें. वाटाघाटीच्या अपयशाचें खापर काँग्रेसच्या डोक्यावर फोडण्यासाठीं साम्राज्यशाही प्रचारतंत्राचें ढोल मोठमोठ्यानें बडविण्यांत येऊं लागलें.

वाटाघाटी फसल्या. हिंदी जनतेची घोर निराशा झाली. तिची शांति ढळणार हें स्पष्ट दिसूं लागलें. जनतेचा शांतिनग ढळावा यांत कांहीच नवल नव्हतें. म० गांधी एवढे शांतीचे महामेरू, पण त्यांनाहि आपली शांति कायम ठेवणें जड जाऊं लागलें. वाटाघाटी संपण्यापूर्वीच ते सेवाग्रामला परत आले होते. पुढील भीषण दृश्य त्यांच्या ज्ञानचक्षूंना स्पष्ट दिसूं लागलें होतें. सदिच्छेच्या व कळकळीच्या अंतर्गर्भांतून त्यांनी ब्रिटिशांना हांक दिली की, "ब्रिटिशांनो, ह्या देशांतून निघून जाण्यांतच तुमचें अंतिम कल्याण आहे. सत्तात्याग करण्यांतच तुमची भलाई आहे." हरिजनमधून त्यांची भविष्यदर्शी वाणी बोलू लागला.

क्रिप्स–वाटाघाटी विफल झाल्यामुळे जी जनता निराशा-पंकांत मग्न होऊं लागली होती, तिला हरिजनमधील गांधी-वाणीने नवजीवन दिलें. पुनः ती मोठ्या आशेने काँग्रेसच्या मार्गदर्शनाकडे पाहूं लागली. एप्रिल १९४२ मध्यें क्रिप्स-वाटाघाटी झाल्या. त्यानंतर दोन महिन्याच्या आंतच काँग्रेस वर्किंग कमिटीने गांधीजींनी ब्रिटिशांना अनुलक्षून केलेल्या 'चले जाव' (Quit India) च्या घोषणेला मान्यता दिली. १९४२ च्या ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या सप्ताहांत अंतिम निर्णयासाठी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची सभा बोलाविण्यांत आली. दरम्यान मुंबईच्या एका व्याख्यानांत सरदार वल्लभभाई पटेल यांनी सिंहनाद केला की, काँग्रेसने जर 'चले जाव' चें आंदोलन सुरू केलें तर ब्रि० सरकारला हिंदुस्थानांतील एक आठवड्याच्या आंत गाशा गुंडाळावा लागेल. विद्युद्वेगाने घटना घडूं लागल्या. कारुण्य व अविवशतेने ग्रस्त झालेल्या जनतेच्या ठिकाणीं वीर रस संचार करूं लागला. मधून मधून रौद्रहि डोकावू लागला. 'चले जाव' ची घोषणा देशभर पसरली. क्रांतीची परिस्थिति पूर्ण शिजून तयार झाली होती. लोकांचा प्रचलित राज्यसत्तेवरील

विश्वास पूर्ण ढासळला होता. अराजकाचीं चिन्हें सर्वत्र दृग्गोचर होऊं लागलीं होतीं. ठिणगी पडण्याचाच अवकाश होता. समस्त भारतवर्ष आता मुंबईच्या ऑल इंडिया काँग्रेस कमेटीच्या मार्गदर्शनाकडे मोठ्या उत्सुकतेने व आतुरतेने पहात बसला होता. म० गांधींची वाणी व लेखणी गर्जून बोलत होती—'अराजक ! अराजक !! अराजक !!!'

प्रकरण ६ वें

योजनाबद्ध आक्रमणाची सरकारची तयारी

१९४२ च्या ऑगस्ट आंदोलनाची पार्श्वभूमि मागील प्रकरणांत सांगण्यांत आली आहे. हिंदी जनता अनन्यगतिक होऊन क्रांतीकडे कशी आकर्षिली जात होती आणि म० गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस 'चले जाव' च्या घोषणेवर कशी येऊन ठेपली होती हें मागे सांगितलें. पण ही ऑगष्ट आंदोलनाची केवळ एक बाजू झाली. परंतु त्याला दुसरीहि बाजू आहे आणि ती म्हणजे, आंदोलनाच्या आवर्तात म० गांधी व काँग्रेस यांना बुद्ध्या आणून सोडणें आणि अभूतपूर्व दडपशाहीचा वरवंटा फिरवून त्यांना कायमचे नेस्तनाबूद करून टाकणें याबाबत ब्रि० सरकारचाहि निर्धार होऊन चुकला होता. ही दुसरी बाजूदेखील पूर्णपणें समजून घेतल्याशिवाय ऑगस्ट क्रांतीचें वास्तव रहस्य पूर्णपणें आकलन होऊं शकणार नाही. साम्राज्य सरकारच्या या निर्धाराचाच पडसाद यावली प्रकरणांतहि उमटला असल्यामुळे त्याची पार्श्वभूमि नीट ध्यानांत येण्यासाठीहि ही दुसरी बाजू समजून घेणें आवश्यक आहे.

युद्धजन्य परिस्थितीचा ब्रिटनमधील एक अपघात म्हणजे चर्चिलचें प्रधान मंत्रिपदावर आरोहण हा होय. महायुद्ध जर झालें नसतें, तर या जन्मांत तरी मि० वुइन्स्टन चर्चिल यांना प्रधानमंत्रिपदाचा लाभ घडला असता की नाही,

याची शंकाच आहे. चर्चिल महाशयांची साम्राज्यविषयक कांही मतें व धोरणें अगदी ठाम ठरलेलीं होतीं व प्रधानमंत्र्याचा अधिकार हातीं आल्यानंतर त्यांनी त्या मतांचा व धोरणांचा अमल सुरू करावा हेंहि स्वाभाविक होतें. ब्रिटन पुढाऱ्यांत चर्चिल हे कट्टर साम्राज्यवादी असे गणंग गृहस्थ आहेत व म्हणूनच हुजूर पक्ष त्यांना आपला पुढारी मानीत आला आहे हेंहि प्रसिद्धच आहे. तेव्हां, चार्चिल यांचीं हिंदुस्थानविषयक मतें काय होतीं आणि अधिकारारूढ झाल्यानंतर हीं मतें अंमलांत आणण्याचा प्रयत्न त्यांनी कसा केला हेंहि पाहणें अगत्याचें आहे.

(१) महात्मा गांधींना मि० चर्चिल हे ब्रिटिश साम्राज्याचा कट्टर शत्रू मानतात. 'नंगा फकीर' या निंदाव्यंजक शब्दानेच ते त्यांचा निर्देश करतात.

(२) कॉंग्रेसच्या मुखानें हिंदी राष्ट्रीयता बोलते असें समजणें म्हणजे थोतांड आहे. मूठभर चळवळ्या लोकांची कॉंग्रेस ही संस्था असून तिच्या मागे बहुजन समाजाचा मुळीच पाठिंबा नाही, असें आपलें मत मि० चर्चिल यांनी अनेकवेळां बोलून दाखविलें आहे.

(३) अस्पृश्य, मुसलमान, संस्थानिक व बहुजन समाज यांचा ब्रि० शासनामुळे अतिशय फायदा झाला आहे आणि ते कांही झालें तरी ब्रि० सरकारची साथ सोडण्यास तयार नाहीत असाहि मि० चर्चिल यांचा दावा आहे.

(४) ब्रि० सरकारच्या सांस्कृतिक श्रेष्ठतेचा, हिंदुस्थानचें साम्राज्य हा विजय होय; ब्रि० तरवारींचा नव्हे; असेंहि चर्चिल यांचें म्हणणें आहे.

(५) ब्रि० सरकारच्या नरम धोरणामुळेच कॉंग्रेस शेफारली आहे. निश्चयात्मक व कणखर धोरणाचा अवलंब केल्यास कॉंग्रेस काय किंवा म० गांधी काय, यांचें कंबरडें मोडण्यास व त्यांना नेस्तनाबूद करून टाकण्यास मुळीच विलंब लागणार नाही असें चार्चिल यांनी अनेकदा बोलून दाखविलें आहे.

(६) जालियनवाला बागेतील गोळीबाराचा मि० चर्चिल यांनी जोरादर निषेध केला होता, आणि जनरल डायर याची घोर निंदा त्यांनी केली

होती. हेंहि या ठिकाणीं ध्यानांत ठेवावयास पाहिजे. कारण जी सत्ता गोळीबार करून टिकवावी लागते तिचीं मुळें आधीच उखडलेली असतात, असें मि० चर्चिल यांचें मत आहे. म्हणूनच हिंदुस्थानांतील ब्रि० सत्तेचें अधिष्ठान बंदुक अथवा तरवार हें नसून सांस्कृतिक वर्चस्व हें आहे असें चार्चिल यांना वाटतें

अधिकारारूढ झाल्यानंतर आपल्या मतानुसार साम्राज्य सरकारचें निश्चित धोरण ठरविणें व त्याबरहुकूम हिंदुस्थानचा कारभार चालविण्याचा प्रयत्न करणें हें चर्चिल यांना अपरिहार्य होतें. परंतु ते ज्या मंत्रिमंडळाचें पंतप्रधान बनलें होते तें केवळ एकट्या हुजूरपक्षीय लोकांचेंच मंत्रिमंडळ नव्हतें. तर युद्धकालांतील विशेष आवश्यकता म्हणून मजूर, उदार इ० पक्षांतील पुढाऱ्यांना बरोबर घेऊन त्यांना संमिश्र मंत्रिमंडळ बनवावें लागलें होतें. या मंत्रिमंडळावर प्रारंभीं त्यांची निरंकुश सत्ता न चालणें स्वाभाविक होतें. परंतु युद्धपरिस्थिति जसजशी बिकट होत गेली, दोस्तांचे जसजसे पराजयामागून पराजय होत गेले, आणि इतर सर्व गोष्टीपेक्षा युद्ध जिंकण्याची निकड ब्रि० जनतेला जसजशी भासूं लागली, तसतशी मंत्रिमंडळावरील मि० चर्चिल यांची पकड अधिक मजबूत होत गेली. युद्धप्रयत्नांच्या नांवाखाली अधिकाधिक निरंकुश अधिकार त्यांना स्वतःच्या हातीं घेतां आले हळुहळू व्यवहारतः चर्चिल हे ब्रिटनचे हुकूमशहा बनत गेले. म्हणून युद्धपरिस्थिति जेव्हा सर्वांत बिकट झाली तेव्हाच चर्चिल यांचे हात स्वतःचीं साम्राज्य विषयक धोरणें ठामपणें अंमलांत आणण्यासाठी बळकट झाले. याच कारणासाठीं सुमारें तीन वर्षें त्यांना आपलें धोरण पुरतेपणीं हिंदुस्थानांत अंमलांत आणतां आलें नाही.

प्रधानमंडळांतील आपल्या सहकाऱ्यांच्या व ब्रिटिश जनतेच्या दबावास बळी पडून मि० चर्चिल यांनी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना शिष्टाईसाठी हिंदुस्थानांत पाठविलें खरें ! पण हिंदुस्थानांतील ब्रि० नोकरशाहीला हाताशीं धरून शिष्टाई विफल व्हावी, अशा कारवाया ते करीतच राहिले अखेरीस त्यांनी स्वतःच क्रिप्स यांना तांतडीने परत बोलाविलें हीहि गोष्ट आतां उघड झाली आहे. तेव्हां क्रिप्सना परत बोलावीत असतांना आपल्या मतांची व धोरणांची एकदां

दृढपणें अंमलबजावणी करण्याचा त्यांचा निश्चय पक्का झाला होता हें स्पष्ट आहे. कोणतेंहि निमित्त उकरून काढून काँग्रेस व म० गांधी यांना नेस्तनाबूद करण्याचा त्यांचा निश्चय झाला होता यांत शंका नाही. म० गांधींनाहि मि० चर्चिल यांच्या या निश्चयाचा पत्ता लागला होता आणि म्हणूनच त्यांनीहि एकदा चर्चिल यांच्याशींच खुली लढत घेण्याचा निर्धार केला असला पाहिजे. ऑगस्ट आंदोलनापूर्वी म० गांधींनी चर्चिल यांना पाठविलेली एक दोन बोटाची चिठ्ठी आतां प्रसिद्ध झाली आहे. तींत गांधीजींनी स्वच्छ लिहिल्याचें प्रसिद्ध झालें आहे कीं, "मला चिरडून टाकण्याची (Crush) तुमची इच्छा असल्याचें मला समजलें आहे. माझा हा अस्थिपंजर देह तुमच्या स्वाधीन आहे. तुम्ही याला चिरडूनहि टाकूं शकाल. पण माझ्या आत्म्याला तुम्ही कधीच चिरडूं शकणार नाही." गांधीजींनीं हें एक प्रकारचें प्रति-आव्हानच चर्चिल यांना दिलें होतें.

क्रिप्स शिष्टाई विफल झाल्यापासूनच चर्चिल यांच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानांतील ब्रि० नोकरशाहीने व तिच्या हस्तकांनी हिंदी राष्ट्रीयतेवर एक निर्णायक आघात करण्याचें योजलें होतें. किंबहुना, क्रिप्स यांना, शिष्टाई तशीच टाकून, तांतडीने परत बोलाविणें हा त्या योजनेचाच एक महत्वाचा भाग असला पाहिजे. काँग्रेसला नेस्तनाबूद करावयाची म्हणजे मि० चर्चिल यांच्या मताप्रमाणें काँग्रेसच्या लाख पन्नास हजार चळवळ्या कार्यकर्त्यांना दडपून टाकणें होय. बहुजनसमाजाचा काँग्रेसच्या चळवळीला पाठिंबा नाही अशी चर्चिल यांची पक्की धारणा होती. पण यदाकदाचित् कांही भागांत बहुजनसमाजांच्या उठावण्या झाल्याच, तर तयारी असावी म्हणून बंदुका, तोफा व विमानें यांचीहि सज्जता करण्यांत आली होती. अर्थात् त्यांचा प्रत्यक्ष उपयोग करण्यापेक्षा भयप्रदर्शनार्थच या तयारीचा मतलब होता. त्यांच्या नुसत्या देखाव्यानेहि क्वचित् ठिकाणीं उठूं पहाणारी जनता दबून जाईल व काँग्रेसची साथ सोडून देईल, वरील युद्धविषयक उपकरणांचा प्रत्यक्ष उपयोग करण्याचा प्रसंगच सहसा येणार नाही; किंबहुना, तो येऊं नये, अशीहि चर्चिल यांची अपेक्षा असली पाहिजे. त्यांची मुख्य मदार काँग्रेसच्या चळवळ्या कार्यकर्यांना दडपून टाकण्यावरच होती. आणि ब्रिटिशांचें सांस्कृतिक वर्चस्व हिंदी जनतेला मान्यच

आहे, तेव्हा काँग्रेसच्या चळवळ्या पुढाऱ्यांना अकस्मात् झडप घालून दडपून टाकलें आणि आपल्या कणखर धोरणाचा प्रत्यय जनतेला आणून दिला की, एवढ्यानेच कार्यभाग होईल अशी सुसंगतपणें मि० चर्चिल यांची समजूत असली पाहिजे.

हें धोरण अंमलांत आणण्याची सर्व प्रकारची तयारी कसोशीने सुरू करण्यांत आली. लहान मोठ्या सर्व काँग्रेसकर्त्यांच्या व चळवळ्यांच्या तपशील-वार याद्या बनविण्यांत आल्या. ठराविक दिवशीं त्या सर्वांवर एकाच क्षणीं अक-स्मात व अनपेक्षितपणें झडप घालण्यासाठी लागणाऱ्या अधिकाऱ्यांची संघटना तयार करण्यांत आली व त्यांना आवश्यक ते अधिकारहि देण्यांत आले. पकडलेले पुढारी व कार्यकर्ते लांबलांबच्या तुरुंगांत फेकावयाचे, त्यांच्या तुरुंगजीवनावर अतिशय कडक निर्बंध लादावयाचे, जनतेचाच काय पण त्यांच्या आप्तांचाहि त्यांच्याशीं संबंध येऊं द्यावयाचा नाही, शक्य तोंवर मोठे पुढारी कोठे आहेत याचा थांगपत्ताहि लागूं द्यावयाचा नाही. आणि कारभाराचें अतिशय कठोर व कडक धोरण पदोपदीं राखावयाचें; असें या नवीन धोरणाचें स्वरूप होतें. हिंदु-स्थानसारख्या खंडप्राय देशांत हें धोरण अंमलांत आणावयाचें म्हणजे केवढी प्रचंड तयारी करावयास पाहिजे याची वाचकांनी आपल्या मनाशीं कल्पना करावयास पाहिजे !

अस्तु, अशा रीतीने दोन्ही पक्ष आपापल्यापरीने अखेरची लढत घेण्यास सज्ज झालेले होते. या अखेरच्या निर्णायक लढ्यांत चर्चिल यांचा विजय होणें म्हणजे हिंदी राष्ट्रीयतेचा कायमचा खात्मा होणें होय, म० गांधी व काँग्रेस ही कायमची नेस्तानाबूद होणें होय; आणि मुसलमान, अस्पृश्य व संस्थानिक यांना हाताशीं धरून यापुढें शे दोनशें वर्षें तरी हिंदुस्थानचा कारभार ब्रि० लोक चालवूं शकतील अशी निश्चिति प्राप्त होणें होय. हें सर्व न घडणें म्हणजे चर्चिल यांचा पराजय होणें होय. हिंदी राष्ट्रीयतेचा खात्मा जर न झाला, म० गांधी व काँग्रेस यांच्याविषयीं जनतेच्या मनांतली भक्ति जर तशीच कायम राहिली; मुसलमान, अस्पृश्य व संस्थानिक यांना हाताशीं धरून हिंदुस्थानचा राज्यकारभार यापुढे शे दोनशेच काय पण पांचपंचवीस वर्षेंसुद्धा चालविणें अशक्य आहे, असें जर निश्चितपणें दिसून आलें, तर चर्चिल यांचा पराभव झाला व काँग्रेस व म० गांधी

विजयी झाले. असें हें निःसंदिग्ध समीकरण होतें. चर्चिलसारख्या हिटलर व मुसोलिनीचाहि पराभव करणाऱ्या पुढाऱ्याच्या आघातानेहि जर हिंदी राष्ट्रीयता दबूं शकली नाही, आणि काँग्रेस व महात्मा गांधी नेस्तनाबूद झाले नाहीत, तर जगांतील कोणतीहि शक्ति त्यांना दाबू शकणार नाही हें सिद्ध होणार होतें. म्हणून ब्रि० साम्राज्य सरकारशी काँग्रेसने यापूर्वी जे लढे दिले त्यांत, ४२ ऑगस्टच्या लढ्याला निर्णायक व अखेरचें स्वरूप आहे असें मानण्यांत येत होतें. म्हणूनच या खेपेस काँग्रेस, म० गांधी व हिंदी राष्ट्रीयता यांच्यावर करावयाचा आघात हा वज्राघातच ठरला पाहिजे. याची सर्व प्रकारची तयारी साम्राज्यवाद्याकडून कसोशीने व अत्यंत दक्षतापूर्वक करण्यांत आली होती. हिटलरविरुद्ध लढण्यासाठी जितक्या कसोशीने ब्रि० सरकार प्रयत्न करीत होते, तितक्याच कसोशीने हिंदुस्थानांतील दडपशाहीचाहि प्रयत्न चालू होता. कारण त्यांच्या साम्राज्यशाही युद्धप्रयत्नाचाच हा एक महत्वाचा भाग होता. ब्रि० सम्राटाच्या मुकुटांतील कोहिनूर हिरा जो हिंदुस्थान तो आपणांस कायमचा पचेल की, लवकरच गमवावा लागेल याचा निर्णय हिंदुस्थानच्याच रणभूमीवर लावून घेण्याचा चर्चिल यांचा निर्धार होता.

उलटपक्षी काँग्रेसच्या विजयाचें स्वरूप बाह्य दृष्टीने अकरणात्मक व नैतिक दृष्टीने विधायक राहणार असल्याने तिला तयारीची अशी फारशी गरज नव्हती. हिंदी राष्ट्रीयता मूठभर काँग्रेस पुढाऱ्यांत समाविष्ट झालेली नाही. तो सबंध राष्ट्राचा अंगभूत गुण असावयाला पाहिजे, आणि तसा जर तो असेल, तर लाख पन्नास हजार कार्यकर्ते दडपले व तोफा विमानांचेंहि भय दाखविलें तरी तो नष्ट होणें शक्य नाही; आणि हिंदी राष्ट्रीयता जर एवढी प्रबळ असेल तर नृसिंहाच्या मांडीवर बसलेल्या प्रल्हादाप्रमाणे काँग्रेस व म० गांधी यांचेंहि स्थान अढळ आहे. त्यांना कोणतीहि भौतिक शक्ति नेस्तनावूत करूं शकत नाही. हा विश्वास हेंच काँग्रसचें मुख्य शस्त्र होतें. काँग्रेसची नैतिक भूमिका ही अशी होती. १९४२ च्या ऑगस्टच्या लढ्याचें हें स्वरूप ध्यानांत घेतल्याशिवाय गांधीजींनी 'उघड बंडा'चा पुकारा कां केला व 'करा अथवा मरा'चा अखेरचा आदेश कां दिला याचें रहस्य उलगडणार नाही.

प्रकरण ७ वें

शक्तिसंग्रहाचा कार्यक्रम

इ० स० १९३२ तें ४२ चा कालखंड यावलीच्या जीवनांत अतिशय महत्वाचा समजला पाहिजे. ४२ च्या ऑगस्ट महिन्यांत यावलीस जें जें कांही घडलें त्याची पूर्वतयारी याच कालखंडांत चालू असली पाहिजे हें उघड आहे. १९३० च्या अग्निदिव्यांत जे अनेक यावलीकर तापले त्यांनी ४२ च्या लढ्यासाठी स्फूर्ति दिली असली पाहिजे. विशेषतः या काळांतील उदयोन्मुख कर्तृत्ववीर पंजाबराव यांच्याकडेच दिलें पाहिजे. कै. हुतात्मा लक्ष्मणराव पांचघरे यांच्या जीवनाचा ज्यांच्यावर अतिशय परिणाम झाला असे पंजाबराव हे एक तरुण आहेत. लक्ष्मणरावांच्या दिव्य हौतात्म्यानंतर यावली येथील राष्ट्रकार्याची ध्वजा पंजाबराव यांनीच आपल्या हातीं घेतली. १९३० च्या जंगल सत्याग्रहाच्या वेळीं सत्याग्रही या नात्याने त्यानी आपलें नांव नोंदविलें होतें. पण त्यांच्या वडिलांनी जबरदस्तीनें त्यांना दुसऱ्या गांवीं नेऊन डांबून ठेवलें व अशा तऱ्हेनें नाइलाज झाल्यामुळे त्यावेळीं त्यांना सत्याग्रहांत भाग घेता आला नाही. या गोष्टीची त्यांना अतिशय खंत वाटली आणि तेव्हाच पुढील चळवळींत आपलें सर्वस्व पणास लावण्याचा त्यांनी संकल्प केला.

व्यायामशाळा, वाचनालय व औषधालय यांच्यासारख्या संस्था चालवून ते या काळांत लोकसंग्रह करीत राहिले. व्यायामशाळेंत तरुण मुलांना गोळा करून त्यांना कुस्ती, लाठी, काठी इत्यादि संरक्षक कलांचें शिक्षण त्यांनी दिलें आणि त्यांच्या ठिकाणीं आत्मसंरक्षणांचें सामर्थ्य व प्रतिकारक्षमता त्यांनी निर्माण केली. पंजाबरावचा विशेष हा की, बाहेरच्या राजकाणांत जातिवादाचा सैतान थैमान घालीत असूनहि त्याचा प्रवेश त्यांनी यावलींत होऊं दिला नाही. ब्राम्हणब्राम्हणेतर किंवा स्पृश्यास्पृश्य या भेदाला स्पर्श ज्या प्रमाणें त्यांनी आपल्या स्वतःच्या चित्तास कधी होऊं दिला नाही, त्याचप्रमाणें आपल्या अनुयायांनाहि

त्यांनी या असल्या भेदापासून सर्वथा अलिप्त ठेवलें. इतकेंच नव्हे तर, हिंदुमुसलमान हा भेददेखील त्यांनी यावलीच्या चतुःसीमेंत शिरूं दिला नाही. त्यांच्या व्यायामशाळेंत स्पृश्यास्पृश्य , हिंदुमुसलमान सर्वच वर्गांचें व जातींचें तरुण येत असत व समान भावनेने आत्मसंरक्षणाचें शिक्षण घेऊन आपलें शरीरसामर्थ्य, आरोग्य, धैर्य व प्रतिकारक्षमता यांची जोपासना करीत असत. भेदातीतपणा व व्यापक लोकसंग्रह हाच त्यांच्या कार्याचा फार महत्वाचा विशेष समजला पाहिजे.

व्यायामशाळा व औषधालय चालवून ज्याप्रमाणें पंजाबराव यांनी यावलीचें शारीरिक आरोग्य व सामर्थ्य वाढविलें, त्याचप्रमाणे सार्वजनिक वाचनालय चालवून आपल्या ग्रामबांधवांचीं मनेंहि त्यानी मजबूत केलीं. हळुहळू राष्ट्रीय वृत्तीचा परिपोष करणाऱ्या आणि क्रांतिकारकांची माहिती देणाऱ्या वाङ्मयाचें संकलन त्यांनी सुरू केलें. राष्ट्रीय वर्तमानपत्रें बोलावून आणि तीं आपल्या ग्रामबांधवांना वाचून दाखवून देशांत व जगांत चालू असलेल्या राजकीय, सामाजिक व आर्थिक विचारांचा परिचय ते करून देत आणि स्वातंत्र्यवादी व क्रांतिवादी वाङ्मयाच्या वाचनाने त्यांच्या ठिकाणीं राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करीत. आपल्या गांवांतील आबालवृद्ध स्त्रीपुरुष, स्पृष्टास्पृष्ट, हिंदुमुसलमान या सर्व नागरिकांचें लक्ष त्यांनी स्वदेश-स्वातंत्र्याच्या एकाच चिरंजीव ध्येयावर केंद्रीभूत करून ठेवण्यांत अतिशय यश संपादन केलें आणि म्हणून जेव्हा ४२ ऑगस्टच्या संग्रामाचा निर्वाणीचा क्षण येऊन ठेपला, तेव्हा स्पृश्य व अस्पृश्य, हिंदु व मुसलमान असे सर्वच लोक आपल्या गांवाच्या संरक्षणासाठी आणि कॉंग्रेसच्या तिरंगी ध्वजाची इभ्रत सांभाळण्यासाठी एक दिलाने कंबरा कसून तयार होऊं शकले.

१९३० च्या पोलिस दलाच्या निर्घृण आक्रमणाच्या वेळीं हवा तेवढा प्रतिकार ग्रामस्थ लोकांनी केला नाही याची त्यांना मनस्वी खंत वाटत होती. पुनःकेव्हाहि प्रसंग आला तर लाजिरवाण्यासारखे अत्याचार सहन करावयाचे नाहीत, असा निर्धार आपल्या ग्रामबांधवांच्या ठिकाणीं ते निर्माण करीत होते. १९३० च्या घटनांचें वारंवार स्मरण देऊन, त्यांच्या ठिकाणच्या वीरवृत्तीला ते आवाहन करीत होते. पुन्हा म्हणून, कोणालाहि—मग तो कोणी मोठा सरकारी

अधिकारी कां असेना—आपल्या गावांतील मुलांच्या व महिलांच्या अंगाला स्पर्श करूं देणार नाही. अशा मनोमन प्रतिज्ञा ते ग्रामस्थ लोकांकडून घेववीत होते. पुनः म्हणून, आपल्या गांवांतील कोणतेंहि दुकान अथवा मालमत्ता लुटीस जाणार नाही अशी निश्चयात्मक संरक्षणक्षमता ते गावांत निर्माण करीत होते. पुनः म्हणून, कोणाचेंहि व केवढेंहि आक्रमण झालें तरी तें पाहून नामर्द व भ्याड माणसासारखे आपण पळून जाणार नाही, नव्हे—त्या आक्रमणाचा प्राणपणाने प्रतिकार केल्याशिवाय राहणार नाही, अशा निर्धाराची ठिणगी प्रत्येक तरुणाच्या व वृद्धाच्या मनांत ते पाडीत होते. इतकेंच नव्हे तर पुरुष अशा आणीबाणीच्या वेळीं यदाकदाचित् भ्याड बनले व पळूनहि गेले, तरी स्त्रियांनी मात्र स्वतःच्या संरक्षणासाठी सज्ज राहिलेंच पाहिजे आणि प्रसंग पडलाच तर आपल्या प्राणांचेंहि बलिदान देऊन आपल्या शीलाचें, पावित्र्याचें आणि गांवाच्या इभ्रतीचें रक्षण केलें पाहिजे. अशी स्फूर्ति यावलीकर महिलांच्या ठिकाणीं ते निर्माण करीत होते.

सावकाश पण पद्धतशीर रीतीने पुढील लढ्यासाठी ग्रामस्थ स्त्रीपुरुषांना तयार करणें, त्यांची मनोवृत्ति चेतवीत राहाणें, विशुद्ध राष्ट्रीयत्वाच्या रंगांत त्यांना रंगवून सोडणें, क्रांतीची आतुरता त्यांच्या ठिकाणीं वाढवीत नेणें, त्यांचें शरीरसामर्थ्य व आरोग्य सुधारत राहणें आणि त्यांची शारीरिक व मानसिक उन्नति करीत राहणें; हा कार्यक्रम पंजाबराव व त्यांचे अनुयायी कळत वा नकळत १९३२ ते ४२ च्या कालखंडांत आचरीत राहिले. खादीचा प्रसार करणें, गांव साफ व स्वच्छ ठेवणें, आरोग्यविघातक सार्वजनिक घाण गांवांतून नष्ट करणें, सांसर्गिक साथीच्या उपद्रवापासून वेळींच प्रतिबंधक उपाय योजून गांवाचें संरक्षण करणें, अन्नधान्य व कापडालत्ता इ० जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा गांवांत नियमित रूपाने होत राहील यासाठी खटपटी करणें; आणि आरती मंडळासारख्या संस्था काढून व सार्वजनिक प्रार्थना सुरू करून सामाजिक विषमतेच्या मुळावर कुऱ्हाड चालविणें इ० प्रकारचे उद्योग ते करीत राहिले.

हा सर्व विधायक कार्यक्रम चालू असतांहि भावी आंदोलनावरून त्यांनी आपली दृष्टि ढळूं दिली नाही. विधायक कार्यक्रमाच्या रूपाने केवढा शक्तिसंग्रह

होऊं शकतो, याचें यावली हें मूर्तिमंत उदाहरण होय. लवकरच एक देशव्यापी आंदोलन येणार याबद्दल कोणालाहि शंका नव्हती. किंबहुना, क्रिप्स शिष्टाई विफल झाल्यापासून तशी सर्वांची खात्रीच पटली होती, असें म्हटलें तरी चालेल मागील सर्व आंदोलनापेक्षा हें आंदोलन अधिक भीषण होणार असेंहि सर्वत्र बोललें जात होतें. १९४२ च्या जुलै महिन्यांत वर्धेला वर्किंग कमिटीचा ठराव पास झाल्यानंतर तर संदेहाला कोणतीच जागा उरली नव्हती. वर्धेचा वर्किंग कमिटीचा ठराव यावलीकर ग्रामस्थांनी वाचला व ते पुढील मार्गदर्शनाची प्रतीक्षा करूं लागले.

या ठिकाणीं आणखी हीहि गोष्ट ध्यानांत ठेवावयास पाहिजे की, कॉंग्रेसची नैतिक भूमिका आणि म० गांधींच्या अहिंसेच्या स्थूल मर्यादा ह्याहि यावलीच्या कार्यकर्त्यांनी आत्मसात् केल्या होत्या. सत्याग्रहाचा तात्त्विक, नैतिक, प्रतिकारात्मक व व्यावहारिक अशा चतुर्विध स्वरूपाचा आविष्कार १९३० सालींच त्यांनी अनुभवला होता. आपली नैतिक भूमिका ढळूं न देणें आणि अहिंसेच्या सर्व स्थूल मर्यादा पाळणें, या दोन्ही गोष्टींची आवश्यकता त्यांना कशी पटलेली होती, हें पुढील प्रकरणावरून ध्यानांत येणार आहे. या ठिकाणीं हा मुद्दा उपस्थित करण्याचा हेतु इतकाच की, यावलीच्या लोकांनी ४२ च्या ऑगस्टमध्यें जें कांही केलें, तें केवळ चळवळीच्या वावटळींत सापडून, माथें भडकल्यासारखें केलें नाहीं, तर त्या कृत्यांच्या मागे पद्धतशीर शिकवण होती, विचार-विनिमय होता, नैतिक अधिष्ठान होतें आणि अहिंसेच्या मर्यादा पालन करण्याची प्रामाणिक इच्छा होती; हें ध्यानांत घेतल्याशिवाय यावलीच्या घटनांचें यथार्थ मूल्यमापन करणें शक्य होणार नाही.

अस्तु. अशा रीतीने एका बाजूने यावलीची जनता विधायक कार्यक्रमाच्या शिस्तींतून पद्धतशीरपणें शक्तिसंग्रह करीत होती, तर दुसऱ्या बाजूने कॅंग्रेसच्या अंतिम मार्गदर्शनाकडे तिचें सर्व लक्ष केंद्रित झालेलें होतें आणि आगामी लढयांत मर्दपणें भाग घेण्याचा ठाम निर्धार तिने केलेला होता. सत्याग्रहाचा कोणताहि कार्यक्रम कॉंग्रेसने अंगिकारला आणि जर तो कार्यक्रम खेड्यांतील लोक जिद्दीने, चिकाटीने आणि सहिष्णुतेने पार पाडूं लागले, तर सरकारी

दडपशाहीची केवढी भयंकर कुऱ्हाड त्यांच्यावर कोसळते याचा यावलीने १९३० सालीं पूर्ण अनुभव घेतला होता. शहरांतल्या चळवळींचा बंदोबस्त करतांना ब्रि० शासनाधिकारी एकवेळ नरमपणें वागतील, पण, खेड्यापाड्यांत हें अराजकाचें—नव्हे स्वातंत्र्याचें लोण पोहोचलें असतां आपल्या सत्तेला धोका उत्पन्न होईल, हें त्यांना पक्कें माहित असल्यामुळे, खेड्यांतील चळवळीवर त्यांची अतिशय करडी नजर असे आणि कोणतीहि दयामाया न दाखवितां तें ती भरडून टाकण्याचा प्रयत्न करीत. म्हणून शहरापेक्षां चळवळ्या खेड्यांवर सरकारी अधिकाऱ्यांचे अत्याचार नेहमीच अधिक होत आले, याचा प्रत्यय यावलीच्या लोकांना पूर्वीच येऊन चुकला होता. सरकारी अत्याचारांचें तंत्र व स्वरूप दोन्ही त्यांनी पुरेपूर भोगलीं होतीं; आणि इतकें असून देखील पुढील आंदोलनांत भाग घेण्याची आतुरता यावलीची जनता दाखवीत होती. इतकेंच नव्हे तर. सरकारी अत्याचारांचा कोणत्या प्रकारें प्रतिकार करावयाचा याच्याहि योजना ती ठरवीत होती. या योजना कोणत्या होत्या आणि कॉंग्रेसची नैतिक भूमिका आणि म० गांधींची अहिंसा यांच्या मर्यादेच्या कक्षेंत कशा होत्या याचें विवरण पुढे यथाक्रम येणारच आहे. येथे एवढेंच नमूद करावयाचे आहे की, आंदोलनांत भाग घेणें म्हणजे ब्रि० अधिकाऱ्यांच्या अत्याचारांना निमंत्रण देणेंच होय ; आणि अशी अत्याचार-परंपरा जरी कोसळली तरी तिलाहि पद्धतशीरपणें तोंड देणें शक्य झालें पाहिजे. या सर्व गोष्टींची जाणीव ठेवूनच, कॉंग्रेसच्या मार्गदर्शनाची प्रतीक्षा यावलीकर करीत राहिले.

कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या वर्धा येथील ठरावानंतर ऑगस्ट महिन्यांत मुंबईस भरणार असलेल्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या ठरावाकडे व त्याच्या माध्यमांतून होणाऱ्या मार्गदर्शनाकडे डोळे लावून यावलीचे लोक बसले.

प्रकरण ८ वें

उघड बंडाचा पुकारा

मुंबईस भरणार असलेल्या ऑ. इ. कॉं. क. च्या बैठकीच्या आधीच गांधीजी ' उघड बंडा ' चा पुकारा करूं लागले होते. या संबंधीचे आपले विचार हरिजन-मधून मोठ्या जोरदार रीतीने ते मांडूं लागले होते. परदेशीय वार्ताहरांना दिलेल्या मुलाखतींतूनहि सर्व जगाला व विशेषतः ब्रिटन, अमेरिका व रशिया या दोस्त राष्ट्रांना—खास करून अमेरिकेला—ते ऊर्ध्व बाहू करून आक्रंदून सांगत होते की, आपणांस युद्धकालांतच या ' उघड बंडा ' चा पुकारा हिंदुस्थानांत कां करावा लागत आहे ? फॅसिझम व नाझीवादाचा विरोध, लोकशाहीचें संरक्षण, दलित राष्ट्रांचें स्वातंत्र्यसंस्थापन इ० दोस्तांच्या घोषणा जर प्रामाणिक असतील तर त्यांचा निकष हिंदुस्थान हाच आहे. सर्व कृष्णवर्णीय दलित राष्ट्रांचें प्रतीक हिंदुस्थान बनला आहे. त्याला जर तुम्हीं स्वखुषीने सांप्रतच्या युद्धकालांतच स्वातंत्र्य दिलें तर बाकीच्या दलित राष्ट्रांना, युद्धोत्तर कालांत आपणासहि स्वतंत्र्य मिळणार आहे, असा विश्वास वाटूं लागेल आणि त्या सर्वांचा नैतिक पाठिंबा तुम्हाला मिळेल. दलित राष्ट्रांतून—विशेषतः हिंदु-स्थानांतून आज जें युद्धसाह्य सैनिकांच्या व द्रव्याच्या रूपाने होत आहे, त्या-पेक्षाहि फार मोठी किंमत हिंदुस्थानच्या व इतर दलित राष्ट्रांच्या नैतिक पाठिंब्याला आहे. म्हणून हिंदुस्थानांतून इंग्रजांनी चालते होणेंच दोस्तांच्या हिताचें आहे. आपण जाण्यास तयार आहोंत, एवढें जरी आज त्यांनी मान्य केलें, तरी शिस्तीने व पद्धतशीर रीतीने त्यांना कसें जातां येईल याचा तपशील उभयपक्षीय विचार-विनिमयाने ठरविण्यास कॉंग्रेस तयार होईल. परंतु येथून निघून जाण्याची गोष्टच जर इंग्रज कबूल करणार नाहीत, तर नाइलाजाने कॉंग्रेसला उघड बंडाचा पुकारा करावा लागेल आणि इंग्रजांना या देशांतून बाहेर घालविण्याचा प्रयत्न दोस्तांच्या हितबुद्धीनेच करावा लागेल.

गांधीप्रणीत चळवळींच्या तंत्राचा एक महत्वाचा विशेष असा आहे की, प्रतिपक्षाला अगदी उघड आव्हान द्यावयाचें, कोंडींत धरून मारण्याचा गुप्त कारस्थानी प्रयत्न कधी करावयाचा नाही, आपल्या चळवळीची पूर्व सूचना त्याला बरीच अगोदर द्यावयाची, बेसावध स्थितींत त्याला कधी पकडावयाचें नाही. अशा रीतीने आपली नैतिक भूमिका विशुद्ध ठेवून बहुजनसमाजाच्या पाठिंब्याने व नैतिक बळाने त्याच्यावर मात करावयाची. म्हणूनच मुंबई येथे भरणाऱ्या आ. इं. काँ. क. च्या सभेच्या बरेच आधीपासून 'उघड बंडा' चा पुकारा गांधीजी करू लागले होते. बंड तर करावयाचें, पण ते गुप्त कटाच्या सहाय्याने नव्हे, चोरून फितवाफितवी करून नव्हे ! तर अगदी उघड, राज-रोसपणें सांगून सवरून करावयाचें !! आणि असें उघड बंड करावयाचें म्हणजे तें अहिंसकच असलें पाहिजे, बहुजनसमाजाचें —जनतेचें— असले पाहिजे. मूठभर लोकांनी गुप्त कटाच्या रूपाने केलेल्या क्रांतीसारखे त्याचें स्वरूप असता कामा नये आणि त्यांत हिंसेला, सूडाला, अमानुष कत्तलींना स्थान असतां कामा नये; आणि ही आपली भूमिका गांधीजींनी वारंवार विशद केली होती.

'उघड बंडा' चा व 'चले जाव' घोषणेचा पुकारा करून देखील आपल्या नित्याच्या शिरस्त्याप्रमाणें समेटाचा आणखी एक प्रयत्न ते करून पाहणार होते. देशांतील भयानक स्थितीचें, अंतःकरण थरारून सोडणाऱ्या शद्बांत ते वर्णन करीत होते. कष्ट, जुलुम, जबरदस्ती, उपासमार व उपमर्द यांनी त्रस्त झालेली जनता जर प्रक्षुब्ध झाली, तर काय काय प्रकार देशांत घडतील याचाहि इषारा ते सरकारला देत होते. इकडे जपान दरवाजाशीं येऊन ठेपला होता, तिकडे दुष्काळ आ वासून उभा होता. लोकांच्या उपजीविकेचीं व वाहतुकीचीं साधनें ब्रि० सरकार बुद्धिपुरःसर हिरावून नेत होतें आणि या गोष्टींचें संभाव्य असें भयानक परिणाम जणुं काय, आताच डोळ्यांनी दिसत आहेत अशा निः-संदिग्ध भाषेंत गांधीजी जगासमोर मांडित होते. दुष्काळ पडला तर लोकांनी कसें वागावें, जपान आपल्या देशांत शिरलाच तर त्याचा अहिंसात्मक प्रतिकार कसा करावयाचा, दळणवळणाचीं व वाहतुकीचीं साधनें नाहीशीं झालीं तर काय करावें, आणि सरकारच्या जुलूम

जबरदस्तीचा विरोध कसा करावा याचाहि उपदेश ते आपल्या प्रार्थनेनंतरच्या भाषणांतून, वार्ताहरांना दिलेल्या मुलाखतींतून आणि हरिजनमधील लेखांतून प्रत्यहीं करीत होते. एकंदर वातावरण कसें तापलें, परिस्थिति आटोक्याबाहेर जाण्याइतकी कशी बिघडली, जनतेच्या प्रक्षोभाचा पारा कसा सारखा चढत आहे आणि सरकारी अधिकाऱ्यांचा मूर्खपणा युद्ध प्रयत्नाच्या नांवाखाली कसा परमावधीस पोहचूं लागला आहे, याविषयीं, ब्रि० सरकारला व दोस्त राष्ट्रांना गांधीजींनी फार आगाऊपासून झणझणीत जाणीव करून देण्यास प्रारंभ केला होता त्यांच्या लेखांतील, भाषणांतील व मुलाखतींतील एकएक शद्ब, वाचणाराचें अथवा ऐकणाराचें हृदय कांपीत जात असे. पण ब्रि० साम्राज्यशाही हें एक हृदयशून्य असें यंत्र आहे. ती एक पोलादी चौकट आहे. तिला हृदय कोठून असणार ! गांधीजींची भाषा हृदय भेदणारी खरी !! पण ज्याला हृदयच नाही त्याचें ती तरी हृदय भेदन कसें करणार !!!

अशा रीतीने दिवसामागून दिवस व रात्रीमागून रात्र जात होती. मुंबईच्या ऑ. इं. कॉं. क. च्या सभेकडे देशांतील प्राणिमात्राचें लक्ष लागलेलें होतें. क्षणाक्षणाने व पळापळाने लोक काळ मोजीत होते. भारत वर्षांतील समस्त स्थावर जंगमाची, जडाजडाची व वस्तूमात्राची चिच्छक्ति जागृत होत होती. देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत ग्रामग्रामांतरांतून चैतन्याचा एक अभूतपूर्व असा महावेगशाली व प्रबळ प्रवाह वाहात असल्याचें स्पष्ट भासूं लागलें होतें. जडांत व अचेतनांतहि चैतन्याचा, सामर्थ्याचा, जीवनाचा अनिरुद्ध संचार होऊं लागला होता. निराशा, दैन्य, कारुण्य, अविवशता, असहायता यांचा त्याग करून जनता आशा, आत्मविश्वास, वीर्य, पराक्रम व स्वावलंबन यांनी भारली जाऊं लागली होती. भारतवर्षाच्या प्रत्येक अणुरेणूचें प्रचंड मंथन सुरू झालें होतें. स्वातंत्र्याचा अमृतकुंभ हस्तगत केल्याशिवाय आतां हें मंथन थांबणार नाही असें जाहीरपणें बोलून दाखविण्याइतक्या आत्मप्रत्ययाने सामान्यातला सामान्य मनुष्य देखील उत्स्फूर्त झाला होता.

ऑगस्ट महिना सुरू झाला. आठवी तारीख उजाडली. समस्त देशांतील लक्षावधि लोक कॉंग्रेसचा अंतिम निर्णय श्रवण करण्यासाठी आतुरतेने मुंबईस

जमा झाले. मुंबईस जे जाऊं शकले नाहीत तें आकाशवाणीकडे एकसारखे कान लावून बसले. खेड्यापाड्यांतून नभोवाणीचीं निर्जीव यंत्रें कोठून असणार! पण वाऱ्यावर संदेश येईल, आकाशाच्या गडगडाटांतून तो ऐकूं येईल, विद्युल्लतेच्या लखलखाटांत त्याचें दर्शन होईल. म्हणून खेड्यांतला माणूसन् माणूस आपलें सर्व हृदय एकवटून, अंतःकरणाचें कान करून संदेश ऐकण्यासाठी उत्कंठित झाला होता !!!

ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचा सभामंडप प्रेक्षकांनी चिकार भरून गेला होता. देशी व विदेशी वार्ताहरांची अभूतपूर्व गर्दी जमली होती. मंडपाच्या आंत असलेला जनसंमर्द कांहीच नव्हे. खरी लोकगंगा मंडपाच्या बाहेरच लोटली होती. बाहेरील लोकांना ऐकूं जावें म्हणून सभामंडपाच्या बाहेर देखील दूरध्वनिक्षेपकायंत्रें लावण्यांत आलीं होतीं. आपल्या जिवाचा कान करून प्रत्येकजण सभामंडपात होणारीं भाषणें ऐकत होता. हिंदुस्थानींत किंवा उर्दूत चाललेल्या भाषणांचे शब्दार्थ विदेशी वार्ताहारांच्या कानांना कळत नसले तरी त्यांतला भावार्थ त्यांच्या हृदयांना जाणवत होता, त्यांतील तेजस्वितेची चमक त्यांच्या डोळ्यासमोर लकाकत होती. त्यांतील गांभीर्याचा प्रभाव त्यांच्या अंतःकरणावर पडत होता. वस्तुस्थिति अशी होती की, मित्र राष्ट्रांच्यांपैकीं बहुतेक सर्व राष्ट्रांतील प्रमुख वृत्तपत्रांनी आपापले वार्ताहर काँग्रेसच्या या ऐतिहासिक सभेला पाठविले होते. परदेशस्थ वार्ताहरांचा एवढा प्रचंड मेळावा यापूर्वी हिंदुस्थानांतल्या कोणत्याहि एका सभेला उपस्थित राहिला नसेल ?

ऑगस्टचा ऐतिहासिक व संस्मरणीय ठराव टाळ्यांच्या प्रचंड गडगडाटांत मंजूर झाला. हाताच्या बोटावर मोजण्याइतके कम्युनिस्ट वगळले, तर प्रचंड जनगंगेचा ठरावाला पाठिंबाच मिळाला. उघड बंडाच्या रणभेरींच्या गगनभेदी निनादापुढे विरोधक कॅम्युनिस्टांच्या पुंगीचा आवाज, श्रवण करण्याइतक्या किंमतीचाहि कोणास वाटला नाही. ठराव मंजूर झाल्यानंतर राष्ट्रपति मौलाना आझाद यांचें समारोपादाखल भाषण झालें. त्यांचें भाषण संपल्यावर अखंड आठ तास अविश्रान्त बसलेले लोक जाण्यासाठी उठले. थकल्या

भागलेल्या वार्ताहरांनी आपल्या लेखण्या आवरल्या व कागदपत्रें गुंडाळलीं. इतक्यांत राष्ट्रपति आझाद यांनी घोषणा केली- 'आता गांधीजी बोलणार आहेत ' पुनः सर्व समाज खाली बसला. चित्रासारख्या तटस्थतेने गांधीजीचें भाषण तो ऐकू लागला. गांधीजी प्रथम पस्तीस चाळीस मिनिटें इंग्रजींतून व नंतर सुमारें तासभर हिंदुस्थानींतून बोलले. गांधीजींचें हें वचनामृत आपल्या हृदयाच्या ओंजळी करून सर्व लोकांनी एकाग्र चित्तानें व नितांत भक्तिभावानें प्राशन केलें.

गांधीजी म्हणाले,— " लढ्याचा निर्णय आज काँग्रेसने घेतला आहे. लढा कसा चालवावयाचा, केव्हा सुरू करावयाचा, त्याचें स्वरूप कोणतें राहिल, कार्यक्रम काय असेल इत्यादि बाबतींचा सर्वाधिकार काँग्रेसने मला दिला आहे. लढा अगदीच अपरिहार्य आहे असें मला अद्यापि वाटत नाही. हिंदुस्थानचे व्हॉईसराय लॉर्ड लिनलिथगो हे माझे परममित्र आहेत, त्यांची पुनः एकदा भेट घेऊन समेटाचा अखेरचा प्रयत्न मी करून पहाणार आहे. तोंपर्यंत लढ्याचा आदेश मी तुम्हांला देऊं शकत नाहीं.—कार्यक्रम सांगू शकत नाहीं.

" माझ्याकडे अत्युच्च पदावरील कांही न्यायाधिकारी व सेनाधिकारी येऊन गेले. ' लढा सुरू झाला तर आम्ही कसें वागावें ' म्हणून त्यांनी माझा आदेश मागितला. मी त्यांना सांगितलें— ' तुम्हाला देण्यासाठी आज मजजवळ कोणताच आदेश नाही. आज मी तुम्हाला इतकेंच सांगू शकतों की, आपल्याच देशबांधवांवर गोळ्या झाडूं नका आणि कायद्याचा अन्याय्य अर्थ कोणाच्याहि दडपणाने करूं नका ?

—" लढा अपरिहार्य आहे अशी माझी खात्री पटली म्हणजेच मी कार्यक्रम सांगेन. पण आज मला एवढें सांगून ठेवणें आवश्यक वाटतें कीं, मागील लढ्याप्रमाणें केवळ तुरुंग भरण्याचा काळ आता राहिलेला नाही लढ्यांत सामील होणाऱ्या लोकांनी एक तर केलें तरी पाहिजे अथवा मेलें तरी पाहिजे, हें उघड बंड आहे. म्हणून या क्षणापासूनच आपण स्वतंत्र झालों आहोत अशा भावनेनेच

प्रत्येक हिंदी मनुष्य वागला पाहिजे. कोणत्याहि प्रतिरोधाला न जुमानतां आपण स्वतंत्र असल्याची भावना त्याने प्रत्यक्ष व्यवहारांत आणली पाहिजे. सारांश, झालाच तर, हा लढा अंतिम व निर्णायक स्वरुपाचा असल्यामुळें प्रत्येकाने 'करा अथवा मरा' हा महामंत्र निरंतर समोर ठेवला पाहिजे. या महामंत्राने प्रेरित होऊन तुम्ही वागूं लागल्यानंतर कोणतीहि पाशवी शक्ति तुम्हाला गुलामगिरींत डांबून ठेवण्यास असमर्थच ठरेल."

प्रकरण ९ वे

जनतेवरील वज्राघात

लोक मोठ्या उत्साहाने, आशेने व उत्कंठेने ऑ. इं कॉं. क. च्या सभागृहांतून परतले. समेटाची आशा अद्यापहि संपली नाही, गांधीजी व्हॉईसराय लार्ड लिनलिथगो यांच्या भेटीस जाणार आहेत, लढा टाळण्याचा ते प्रयत्न करणार आहेत. पुनः प्रतीक्षा! पुनः उत्कंठा!! गांधीजी कधी दिल्लीस जाणार? या अखेरच्या क्षणाला तरी ब्रि० सरकारला सद्बुद्धि सुचेल का? —लोक बोलत होते—छे! कसली सद्बुद्धि!! दगडाला कधी पाझर फुटला आहे का? ब्रि० सरकारने डंगा दिल्याशिवाय आजपर्यंत कधी तरी कांही केलें आहे काय? स्वार्थांध साम्राज्यवाद्यांच्या हातून मरणाची घटका येऊन ठेपली तरी, सत्कृत्य घडणें शक्य नाही तो हिटलरच यांना वस्ताद भेटला आहे. त्याच्या बॉम्बगोळ्यांची भाषा यांना लवकर समजते. जपान्यांनी यांची हड्डी चांगली नरम केली आहे. यांच्याशीं अशीच वागणूक पाहिजे. आपल्या गौरवर्णीय वर्चस्वाचा मोठा दिमाख बेट्यांना चढला होता. जपान्यांच्या दररोज लाथा खात आहेत, पण अजून धुंदी उतरत नाही. क्रिप्सला पाठविण्याचें काय पण नाटक केलें. साऱ्या वर्किंग कमिटीला बनविण्याचा प्रयत्न केला. बनला नाही एक म्हाताराच. गांधीजींनी क्रिप्सची भेट झाल्यावर पहिल्याच दिवशीं सांगून टाकलें नव्हतें काय की, क्रिप्स हा अप्रामाणिक इसम आहे? त्याने

आणलेली हुंडी पुढील तारखेची आहे. अहो, बुडीत पेढीवरची हुंडी कोण स्वीकारणार ?

—जें मनास येईल तें लोक बोलत होते. कांहीं म्हणत होते—गांधीजींची आशा वेडी आहे. एक सत्याग्रही या नात्याने प्रतिपक्षाला अखेरची संधि द्यावी, असें त्यांना वाटणें रास्तहि असेल. पण लाथांचा देव कधी बातांनी पावला आहे काय ? आपण तयारीला लागलेंच पाहिजे. आता येथे थांबण्यांत अर्थ नाही. आपापल्या गांवीं परत जाण्यांतच स्वारस्य आहे. गांधीजींचा कार्यक्रम कळेल तेव्हा कळो. व्हॉईसरॉयच्या भेटींत काय होणार असेल तें होवो, पण 'करा अथवा मरा' या गांधीजींच्या आदेशांत सर्व कांही आलें. यापेक्षां अधिक सांगण्याची व समजण्याची जरूरच काय आहे ?'

हजारो लोक त्या दिवशींच परतले. हजारो दुसऱ्या दिवशींच्या जाहीर झेंडावंदनासाठी थांबले. वातावरणांतील अस्थिरता सर्वांनाच जाणवत होती.

घड्याळाचे काटे फिरत होते, तशी ८ ऑगस्टची रात्र ही काळ रात्र ठरत होती. ब्रि० नोकरशाहीचे महावेगवान् यंत्र झपाट्याने फिरूं लागलें होतें. पंतप्रधान चर्चिल यांनी करड्या हाताने व दृढनिश्चयाने त्याला गति दिलेली होती. सर्व योजना आगाऊच शिजून तयार झाल्या होत्या. मारेकऱ्यांची संघटना बारीक-सारीक तपशीलासह सज्ज झाली होती. हत्यारें पाजळून तयार ठेवण्यांत आलीं होतीं. नीतिमत्ता, कायदा, माणुसकी व शिष्टाचार यांना केव्हाच फाटा देण्यांत आला होता. दरोडेखोरांच्या मनोवृत्तीचा पूर्ण अवलंब करण्यांत आला होता. दिवसभर लढून रात्रीं शिबिरांत झोपलेल्या पांडवपक्षीयांवर अश्वत्थाम्यांने झोपेंतच नाही का वार केला व त्यांची कत्तल केली ? नीतिबाह्य कृत्यांनाहि इतिहासांत कांही कमी दाखले नाहीत !!!

वस्तुतः लढ्याचा ठराव पास करणें म्हणजे कांही प्रत्यक्ष लढा पुकारणें नव्हें. साक्षात् कृति घडल्याशिवाय गुन्हा होत नाही प्रामाणिक मतप्रदर्शन म्हणजे गुन्हा नव्हे युद्धकार्याशीं प्रामाणिक मतभेद असणारांना आपलें युद्धविरोधी मत प्रदर्शित करण्याची मुभा इंग्लंडमध्यें देण्यांत आली होती. Conscientious

objectors चा अशा प्रकारचा एक मोठा वर्ग इंग्लंडमध्येहि अस्तित्वांत होता. १९२९-३० सालीं ब्रि० साम्राज्याचे प्रधानमंत्री बनलेले मजूर पुढारी मि० रॅमसे मॅकडोनल्ड हे १९१४ तें १८ च्या महायुद्धाच्या वेळीं युद्ध-विरोधकच होते. आपल्या युद्धविरोधी मतांचा प्रचार करण्यासाठी त्यांनी साम्राज्यभर दौराहि काढलेला होता. सारांश केवळ मतप्रदर्शन हा ब्रि० साम्राज्याच्या कायद्याने देखील गुन्हा मानलेला नाही.

अशी वस्तुस्थिति आहे म्हणूनच १९३० व ३२ च्या आंदोलनांच्या वेळीं कॉंग्रेस नेत्यांच्या हातून साक्षात् कृति घडेपर्यंत त्यांना अटक करण्यांत आली नव्हती. ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष कायदा मोडला अथवा कायदा मोडण्यासाठी लोकांना भडकविण्याचा प्रयत्न केला त्यांनाच कायद्याच्या निरनिराळ्या कलमाखाली अटक करण्यांत आली. खुद्द गांधीजींनी देखील दंडीप्रयाण पूर्ण करून जोपर्यंत प्रत्यक्ष कायदेभंग केला नव्हता तोपर्यंत त्यांना अटक करण्यांत आली नव्हती. पण त्यावेळीं मॅकडोनल्डचें राज्य होतें. कायदा व नीतिमत्ता यांची थोडीफार लाज ब्रि० सरकाला वाटत होती.

आता १९४२ सालीं चर्चिलचें राज्य सुरु होतें. साम्राज्य संरक्षणासाठी कोणतीहि दरवडेखोरी, कोणताहि बेकायदेशीर इलाज, कोणताहि अन्याय्य खून न्याय्यच आहे, अशा धारणेच्या रंगांत चर्चिल महाशय रंगलेले आहेत. हिंदुस्थानच्या रणभूमीवर साम्राज्य-संरक्षणाचें युद्ध त्यांना खेळावयाचें होतें. हिटलरच्या व जपानच्या लोखंडी बुटाच्या ठोकरा खाऊन जर्जर झालेल्या ब्रि० साम्राज्यशाहीला आपला सर्व राग घरच्या म्हातारीवर काढण्याची इच्छा होणें स्वाभाविक होतें. ज्या तत्राचा अवलंब करून हिटलरने झेकोस्लोव्हाकिया गिळला, आस्ट्रिया हजम केला आणि एका काळरात्रीं पोलंडवर हल्ला चढविला त्याच तंत्राचा अवलंब करण्याचें ब्रि० सरकारने कॉंग्रेसच्या बाबतींत ठरविलें होतें. हिटलर व त्याचें अनैतिक युद्धतंत्र यांची निंदा करतां करतां ब्रि० सरकार अखेरीस त्याच तंत्राच्या पूर्णपणें आहारीं गेलें होतें.

वाटाघाटींना संधिच द्यावयाची नाही झाली एवढीच दिरंगाई पुरे झाली. मुंबईस जमलेल्या लोकांना आपापल्या गांवीं पोहचूं देण्यांत सुद्धा अर्थ

नाही, मुंबईस न आलेल्या व आपापल्या गांवीं दबा धरून बसलेल्या कार्यकर्त्यांचीहि गय करण्यांत अर्थ नाही. ब्रि० कारभाराचा पोलादी पंजा किती बळकट आहे हें दाखवून देण्याची हीच संधि आहे; त्या पंजाचा पाश एका झपाट्यांत मारून गांधीसकट सर्व काँग्रेसवाल्यांचा गळा दाबणें अवश्य आहे; आपल्या पोलादी पंजानें एकदा सफाईदार मजबुतीनें काँग्रेसची गर्दन दाबली की, मग देशांत सर्वत्र सामसूम होईल. अशा मजबुतीनें ब्रिटिशांचें हिंदुस्थानांतील यंत्र फिरत होतें. रात्रीच्या हल्लयाची योजना परिपक्व करण्यांत आली होती.

९ ऑगस्टला सकाळीं मुंबई व सर्व देश जागा झाला न झाला तोंच विद्युद्वेगानें प्रत्येकाला कळून चुकलें की, रात्रींच घाला पडला. मारेकऱ्यांनी आपला वार केला. म० गांधी व त्यांचा परिवार, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य आणि ऑ. इं. कां क. चे सांपडतील ते सदस्य यांना अटक झाली. अटक झालेल्यांना अज्ञात स्थळीं हालविण्यांत आलें. युद्धतंत्रांतील स्तैमित्य व तडितूगति या हिटलरी गुणांचें, महायुद्धाच्या युरोपांतील अथवा ब्रह्मदेशांतील रणांगणावर नव्हे, तर निःशस्त्र हिंदुस्थानच्या भूमीवर, वाटाघाटीस तयार असलेल्या गांधीवर व काँग्रेसवर प्रदर्शन करण्यांत ब्रि० सरकार यशस्वी झालें.

पण, ब्रि० नोकरशाहीचें यंत्रहि अखेरीस माणसांचेंच बनलें आहे. भाडोत्री मुलकी गुलामांनी लष्करी डावपेचांची कितीहि ऐट आणली तरी अस्सल तें अस्सल व कम अस्सल तें कम अस्सलच. नकल्याचें काम करूं पाहणारा गांवढेकर अखेरीस उघडा पडलाच कीं नांही? नोकरशाहीच्या सफाईच्या वारांतून कैक सुटले. आठ दिवसांत ब्रि० राज्य खलास करतों, असें सरदार पटेल म्हणाले होते ना? डॉ. पट्टाभिसितारामय्या यांनी चळवळीचा कार्यक्रम तयार केला होता ना? नोकरशाहीचा एवढा जबरदस्त वार ज्यांनी सफाईची डूब मारून चुकविला ते दुसऱ्याच दिवशीं मुंबईत पुनः एकत्र जमले. काँग्रेसने अधिकृत रीत्या कांही निश्चित कार्यक्रम दिला नव्हता हें तर खरेंच! पण काँग्रेस अधिकृत पुढारी बहुजन समाजांतून नाहीसे झाल्यानंतर, प्रत्येक हिंदी मनुष्य काँग्रेस बनला पाहिजे असें गांधीजींनी अनेक वेळां बोलून दाखविलें

नव्हतें काय ? मग काँग्रेसचे इतक्या दिवसांचे कार्यकर्ते जे आम्ही तेच काँग्रेस बनलों तर काय बिघडलें ? आमच्या प्रिय पुढाऱ्यांवर व संस्थेवर झालेला हा स्वैमित्यपूर्ण आघात खाली मान घालून सहन करणें कसें शक्य आहे ? सरदार पटेलांची भविष्यवाणी आम्ही खरी करून दाखवूं. पट्टाभींचा कार्यक्रमच आम्ही देशभर पसरवूं. 'करा वा मरा' या गांधीमंत्रानें आम्ही दशदिशा निनादून सोडूं—ब्रिटिश नोकरशाहीच्या नाकासमोर मुंबई शहरांतच निर्णय घेण्यांत आला.

गांधीजींचें भाषण छापून काढण्यांत आलें. कार्यक्रमपत्रिका तयार करण्यांत आल्या. पुढाऱ्यांवर झालेल्या आघाताचा प्रतिकार करण्याचा वज्र-कठोर निर्णय घोषित करण्यांत आला.

वाहतुकीचीं साधनें ब्रि०सरकारच्या ताब्यांत होतीं. कागद व छापखाने यांच्यावर कडक नियंत्रण होतें-अमका अमक्या ठिकाणीं दिसला की गिरफतार करावयाचाच, याविषयींच्या हुकमांनी पोलीस अधिकारी व मॅजिस्ट्रेट सुसज्ज होते. बिनतारी संदेशयंत्रें त्यांच्या साह्याला होतीं. ब्रि० सरकारच्या परवानगी शिवाय देशांतील चीटपाखरूंहि जागचें हलूं शकणार नाही, इतकी अनिर्बंध सत्ता नोकरशाहीच्या हातांत काळ्या कायद्याच्या रूपाने देण्यांत आली होती.

पण इतकें असूनहि हजारों कार्यकर्त्यांनी सफाईदार डूब मारली. म० गांधींच्या भाषणाच्या व मुंबईच्या दुसऱ्या दिवशींच्या सभेंत तयार झालेल्या कार्यक्रमाच्या लक्षावधि प्रती छापून तयार झाल्या. वाऱ्याबरोबर त्या देशभर संचार करूं लागल्या. खेड्यापाड्यांतून लोण पोहचूं लागलें. पुढाऱ्यांवर अकस्मात् झालेल्या कठोर आघातामुळे क्षणभर दिङ्मूढ झालेल्या जनतेला संजीवन मिळूं लागलें. कर्तव्याचा प्रबोध होऊं लागला. कार्यक्रमाची जाणीव होऊं लागली. 'करा वा मरा' हा एकच घोष सर्व देशभर दुमदुमूं लागला.

बहुजनसमाजाच्या प्रतिकारसामर्थ्याची पहिली, पण झणझणीत चुणुक मुंबईनेच दाखविली. सांस्कृतिक वर्चस्वाच्या गुणावर हिंदुस्थानला आम्ही ताब्यांत ठेवला आहे हा चर्चिलचा दर्प मुंबईनेंच बावडा ठरविला. लाठीमार, अश्रुधूर व गोळीबार यांनीहि जनता दबूं शकत नाही हें अवघे बारा तासांच्या

अवधींत मुंबईने दाखवून दिलें. वाहतुकीच्या साधनांवर ब्रि० सरकारचे कायदेशीर नियंत्रण असेल, पण तीं लोकांचीं साधनें आहेत; लोक स्वेच्छेनुसार तीं चालूं देतील तोंपर्यंतच तीं चालूं शकतील. ज्याक्षणीं लोकांची इच्छा होईल की हीं साधनें बंद पडलीं पाहिजेत त्याक्षणीं ती बंद पडतील, हें मुंबईनें दाखवून दिलें. मुंबई स्वातंत्र्याच्या भावनेने भारून गेली. मुंबईतील स्त्रियाहि आपणांस स्वतंत्र समजून वावरूं लागल्या. पोलिस बंदोबस्त, सभाबंदी, लाठीमार, अश्रुधूर यांना न जुमानतां आझाद मुंबईकर सभा करून 'चले जाव'ची घोषणा करूं लागले. ब्रि० सरकारचें राज्य मूठभर पोलिस व लष्करांत असेल पण मुंबईतील सर्व नुलकी सत्ता धुळीस मिळाली. स्वातंत्र्याचा व चैतन्याचा अभूतपूर्व डोंब मुंबईस उसळला.

अजून हजारों देशवासी मुंबईत होते. त्यांनी मुबईच्या जडाजडाच्या व अणुरेणूच्या ठिकाणीं संचरलेलें हें नवचैतन्य पाहिलें, अनुभवलें. त्यांचेहि बाहू स्फुरण पावूं लागले. मुंबईच्या चैतन्यदीक्षेने दीक्षित झालेले हे हजारो लोक मुंबईच्या प्रतिकाराच्या अद्भुत कथा बरोबर घेऊन परत फिरले. १२।१३ तारखेपर्यंत मुंबईचा प्रतिकार देशभर निनादला. अकर्मण्याला आता वाव नव्हता. शैथिल्याला जागा नव्हती. स्वस्थ बसायला फुरसत नव्हती. काय करायला हवें याचा मुंबईने प्रत्यक्ष पाठ घालून दिला होता. मुंबई म्हणजे भारतवर्ष. एकवेळ 'नवखंड पृथ्वी व दहावा खंड काशी' अशी म्हण होती पण आता तो मान मुंबईने घेतला आहे. भारतवर्षाच्या आधुनिक इतिहासाचें प्रतीक मुंबईच बनली आहे. मग मुंबईने जें केलें त्याच्याच आवृत्त्या देशभर घडल्या तर नवल काय ?

दडपशाहीचा नंगा नाच देशभर सुरू झाला होता. जागोजागीं काँ. कार्यकर्त्यांना अटक करण्यांत येत होती. वऱ्हाडच्या हद्दींत प्रवेश करतांच वऱ्हाडचे कार्यकर्ते पकडले गेले. वर्धा नदी ओलांडताच नागपुरच्या कार्यकर्त्यांना अटक झाली. स्टेशनोंस्टेशनीं ब्रि. नोकरशाहीचे काळे डगलेवाले हस्तक आपापले पिंजरे सज्ज करून बसले होते. आला कार्यकर्ता, गवसला काँग्रेसवाला की, दडपला पिंजऱ्यांत. काँग्रेस वार्कींग कमिटी, ऑ. इं. काँ. क., प्रांतिक-

कमिट्या, जिल्हा कमिट्या, नगर कमिट्या बेकायदा ठरविण्यांत आल्या. देशभर कॉं० कार्यालयांच्या झडत्यांचा व संशयित स्थळांच्या छाप्यांचा धुमाकूळ सुरू झाला. कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी हवाई हल्ल्याच्या प्रतिकारासाठी व उपचारासाठी काढलेलीं स्वयंसेवक दलेंहि बेकायदा ठरविण्यांत आलीं. त्यांचींहि कागदपत्रें जप्त करण्यांत आलीं. कॉंग्रेसचें नामोनिशाण शिल्लक राहूं द्यावयाचें नाही अशा निर्धाराने नोकरशाही धुमाकूळ घालित होती. चर्चिली इंग्याचें व लोहदंडाचें भयानक स्वरूप सर्व प्रकारांनी प्रदर्शित करण्यांत येत होतें.

इकडे अशा रीतीने भयानक दडपशाहीचा अवलंब सरकार करीत होतें, तर तिकडे 'करा वा मरा'चा संदेश गांवोगांव पोहोंचत होता. प्रतिकाराचा चैतन्यप्रवाह साऱ्या देशभर खेळूं लागला होता. आठ दिवसांत ब्रि० राज्ययंत्र उखडून पाडण्याचा प्रयत्न सर्वत्र सुरू झाला होता.

इतक्यांत, हिंदुस्थानांत सुरू झालेल्या दडपशाहीचें समर्थन करण्यासाठी भारतमंत्री मि० लिओपोल्ड अमेरी यांना नभोवाणीवरून भाषण करण्याची दुर्बुद्धि सुचली. त्यांनी आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं, कॉंग्रेसने ब्रि० राज्ययंत्र उलथून पाडण्याचा कार्यक्रम देशाला दिला आहे. आमच्या हातीं लागलेल्या कागदपत्रावरून हें स्पष्ट दिसून येत आहे की, तारा तोडणें, पूल पाडणें, दळणवळणाचीं साधनें बंद पाडणें, सरकारी इमारतींचा ताबा घेणें, लष्करांतल्या व पोलिसांतल्या शिपायांना फितवणें, सरकारी नोकरांना फितूर करणें; सारांश ज्या ज्या उपायांनी ब्रि० सरकारचें राज्य नाहीसें करतां येईल त्या त्या सर्व उपायांचा अवलंब करणें हाच कॉंग्रेसचा कार्यक्रम होता. अशा भयंकर गोष्टी करण्यास कॉंग्रेस प्रवृत्त झाल्यामुळे सरकारला दडपशाहीचा अवलंब केल्याखेरीज गत्यंतर उरलें नव्हतें. मि० अमेरी यांनी आपल्या दडपशाहीच्या समर्थनार्थ कॉंग्रेसचा म्हणून हा जो कार्यक्रम सांगितला तो अनायासेंच लोकांना कळला. इकडे मुंबईस तयार झालेलीं पत्रकें देशभर प्रवास करीत होतीं, तर तिकडे त्या पत्रकांची विश्वसनीयता वाटण्यास मि० अमेरी यांचें भाषण कारणीभूत होत होतें. जनतेला कॉंग्रेसकडून अधिकृत कार्यक्रम कळला नसला तरी, भारतमंत्र्यासारख्या जबाबदार अधिकाऱ्याच्या मुखांतून वरीलप्रमाणें एक कार्य-

क्रम ऐकण्यास मिळाला होता आणि 'चले जाव' ची घोषणा अमलांत आणण्याचें सामर्थ्य या कार्यक्रमाचे ठिकाणीं आहे हें निश्चितपणें जनतेला दिसत होतें. अनायासेंच आकाशवाणीरूपाने कार्यक्रम देशभर पसरला होता. पुढाऱ्यावर झालेल्या आघाताचा प्रतिकार करण्यासाठी उत्कंठित झालेल्या जनतेने भारत-मंत्र्यांनी दिलेल्या याच कार्यक्रमाचें स्वागत केलें असल्यास नवल काय?

मुंबईच्या घटनांचे प्रतिध्वनी जसे देशभर सर्व मोठमोठ्या शहरीं उमटले तसेच ते विदर्भांतही उमटले. उमरावती शहरांत कडकडीत हरताळ पडला, शाळा कॉलेजेस बंद पडलीं. विद्यार्थ्यांनीं प्रचंड मिरवणुकी काढल्या, पोस्टाच्या पेट्या फोडण्यांत आल्या आणि तारा तोडण्यांत आल्या. इंपिरियल बँक आणि तहसिल कचेरी यांचा ताबा घेण्यासाठीहि लोक धडकूं लागले. उमरावतीच्या या घटनामुळे आंदोलनाचें लोण यावलीच्या फारच जवळ येऊन पोहोंचले होतें.

प्रकरण १० वें

यावलीची अहिंसक क्रांति

अमरावतीचें वारें यावलीस वाहूं लागलें. देशांतल्या बातम्या यावलीस जाऊन पोहोचूं लागल्या. ९ ऑगस्टला ब्रि० सरकारने काँग्रेसवर जो वज्राघात केला त्याच्या प्रतिकारार्थ यावेळीं आख्खा अमरावतीबैतूल रोड जळूं लागला. नांदगांव, यावली, माहुली, बेनोडा, इत्तमगांव, मोर्शी, वरूड, मुलताई, बैतुल याप्रमाणें गांवोगावीं सरकारी सत्तेचें जें जें म्हणून प्रतीक असेल त्यावर जनतेने ताबा करण्याचा प्रयत्न केला अथवा त्यांचा विध्वंस तरी करून टाकला. पाटील, पटवारी व रेव्हिन्यू इन्स्पेक्टर्स यांचीं दफ्तरें लोकांनी ताब्यांत घेतलीं. पोलिसठाणीं, शाळा, डाकघरें, तहसिल कचेऱ्या यांचेवर तिरंगी ध्वज फडकूं लागले. कैक ठिकाणीं तहसिलदार, पोलिस सब् इन्स्पेक्टर्स, रेव्हिन्यू इन्स्पेक्टर्स इत्यादि सरकारी अधिकारी डोक्यावर गांधी टोप्या घालून व हातांत तिरंगी झेंडे घेऊन लोक समुदायाच्या मिरवणुकींत सामील झाले. जेथे सरकारी

अधिकाऱ्यांनी सरकारी मालमत्तेवर जनतेचा ताबा होऊं देण्यास प्रतिरोध केला, तेथे लोकांना थोडा फार बलप्रयोगहि करावा लागला. या चकमकींत जनतेलाहि बलिदान द्यावें लागलें. पण कांही झालें तरी, एवढें निश्चितपणें म्हणतां येईल की, अवघ्या दोन तीन दिवसांच्या सपाट्यांत अमरावती ते वरूड पर्यंतच्या सुमारें ५५-६० मैलांच्या टापूंत ब्रि० सत्ता नेस्तनाबूद झाली होती. अमरावतीचे जिल्हाधिकारी हक्काबक्का झाले होते. कायद्याचें तर त्यांना भान उरलेंच नव्हतें. माथें भडकलेल्या पिसाटाप्रमाणें भेटेल त्या मॅजिस्ट्रेटला व पोलिस अधिकाऱ्याला 'गोळीबार करा, 'गोळीबार करा' एवढा एकच हुकूम ते देत होते. त्यांचे छक्केपंजे निश्चितपणें सुटले होते. मेंदूवर त्यांचा यत्किंचित ताबा उरला नव्हता.

एका तालुक्याच्या ठिकाणीं एक बडे अधिकारी जाऊन पोहचले, तेव्हा त्या ठिकाणीं अद्यापि गोळीबार झाला नसल्याचें त्यांना आढळून आलें. अजून येथे गोळीबार कां केला नाही, त्याबद्दल त्यांनी तेथील पोलिसठाणेदाराची व मॅजिस्ट्रेटची हजेरी घेतली. वरील दोन्ही अधिकाऱ्यांनी जेव्हा सांगितलें की, परिस्थिती काबूंत असल्यामुळे गोळीबार करण्याचें कारण उद्‌भवलें नाही; तेव्हा ते बडे अधिकारी एवढेंच म्हणाले की, 'तुम्हीहि फितूर दिसता.'

वाऱ्यावर येणाऱ्या बातम्या, आकाशांत फिरणारे संदेश, सरकारने केलेल्या प्रासंगिक आघाताची चीड यामुळे इतर अनेक ठिकाणचे लोक उठले असले, तरी यावलीची स्थिति तशी नव्हती. निश्चित कार्यक्रम हातीं पडला म्हणजे तदनुसार पद्धतशीर रीतीने कार्य करण्यास यावली पूर्वीपासूनच सज्ज बसली होती. अशा स्थितींत मुंबईहून प्रवास करून येत असलेले पी. के. देशमुख यांचेजवळून कार्यक्रमपत्रिका एके दिवशीं यावलीस अमृतराव पहेलवानाचे मार्फत येऊन पोहोंचली.

ही कार्यक्रमपत्रिका ब्रि. सरकारचे अनेक पहारे चुकवून तिच्या प्रतीवर प्रती होत अवघ्या तीन चार दिवसांत यावलीसारख्या दूरच्या खेड्यांत जाऊन पोहचली. यावरून तिचा प्रवास कसा झपाट्याने होत असला पाहिजे याची

कल्पना येण्यासारखी आहे. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या वेळीं त्या संग्रामाचें प्रतीक जी 'कमल व चपाती' यांचा प्रवास हिंदुस्थानभर ज्या वायुवेगाने घडला, त्याच वायुवेगाने मुंबईस सफाईदार डुब मारलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांची ही पत्रिका यावलीस येऊन पोहचली. कार्यक्रम-पत्रिका पूर्वनिर्दिष्ट पंजाबराव यावलीकर यांच्या समक्ष हातीं नेऊन देण्यांत आली.

याप्रमाणें पत्रिका हातीं आल्यावर पंजाबराव यांनी गांवांतील प्रतिष्ठित मंडळीची एक सभा बोलावली. 'उघड बंड' व काँग्रेसची नैतिक भूमिका याविषयीं म० गांधींचे सर्व विचार यावलीच्या कार्यकर्त्यांनी आत्मसात् केले होते. त्यामुळे जें कांही करावयाचें तें सर्वांच्या विचारविनिमयाने उघडपणें करावयाचें, त्यांत कोणतीहि गोष्ट, कोणतीहि योजना झांकून ठेवायची नाही—लपवून ठेवायची नाही, आंत एक बाहेर एक असें कोणतेंहि आचरण करावयाचें नाही हा पक्का संकल्प होता.

ता० १४ ऑगस्ट हा दिवस यावलीच्या इतिहासांत १९४२ च्या लढ्याचा प्रारंभ दिन म्हणून नोंदला जाईल. अखिल भारतीय काँग्रेसच्या इतिहासांत जें महत्व ८ ऑगस्ट १९४२ या दिवसाला आहे, तेंच महत्व यावलीच्या इतिहासांत १४ ऑगस्ट १९४२ या दिवसाला आहे. जरी सभेसाठी प्रतिष्ठित मंडळीलाच निमंत्रण करण्यांत आलें होतें, तरी काळाची जादू अशी कांही विलक्षण होती की, सगळा गांवच सभेला लोटला होता. स्पृश्यास्पृश्य, हिंदुमुसलमान, सर्व प्रकारचे लोक सभेला मोठ्या उत्सुकतेने हजर होते. सभेंत पंजाबराव यावलीकर यांनी आलेली कार्यक्रम-पत्रिका वाचवून दाखविली आणि भाषण करून वर्तमान परिस्थितीचें समालोचन केलें. गांधीजी व कांग्रेस यांच्यावर ब्रि. सरकारने केलेल्या निर्दय हल्ल्याने लोकांचीं अंतःकरणें गहिंवरून आलीं. आता लढा सुरू झाला आहे आणि यावलीने त्यांत आपला भाग घेतलाच पाहिजे असें लोक बोलूं लागले.

आता यावलीसहि स्वातंत्र्य-यज्ञ सुरू होणार म्हणून जनतेच्या ठिकाणीं अवर्णनीय उत्साह दिसूं लागला. इतके दिवस केलेला शक्तिसंग्रह अखेरीस

आपल्या मातृभूमीच्या कारणीं लागणार म्हणून त्यांना अतिशय आनंद झाला. अण्णासाहेब मढगे व राजाराम झिंगाजी कांडलकर हे सभेंत उठून उभे राहिले व पहिले सत्याग्रही वीर म्हणून त्यांनी आपलीं नावें नोंदविलीं. त्यांच्या या कृत्यामुळे लोकांच्या उत्साहाला अधिकच भरतें आलें. पंजाबराव यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाला प्रारंभ करून, सरकारने आपल्या परमप्रिय पुढाऱ्या-वर केलेल्या आघाताला जबाब देण्याचा निर्णय सभेंत घेण्यांत आला.

१४ ऑगस्टची यावलीची ही सभा अनेक दृष्टींनी संस्मरणीय झाली. सत्य हें परमेश्वराचेंच स्वरूप असल्याने त्या सत्याच्या उपासनेसाठी ज्या-अर्थी गांधीजी आजन्म कष्टत आले, त्याअर्थी उपासनेच्या–भजनाच्या द्वारांच आजचा प्रतिकारनिर्णयाचा–स्वातंत्र्य संग्रामांत उडी घेण्याचा–हा प्रसंग साजरा केला पाहिजे असें ठरवून रात्रीं ९ वाजतां भजनी मंडळीचा फड लागला. पुनः समस्त ग्रामवासी जमा झाले. त्या रात्रीच्या भजनाला खूपच रंग चढला होता. तल्लीन अंतःकरणाने गाणारे गात होते व श्रोते श्रवण करीत होते. जणुं काय आपल्या हृदयाची आर्तता दूर गुहेंत असलेल्या परमेश्वराला ते ऐकवीत होते. आपल्या भजनांतील कडव्या कडव्यांतून व अभंगाअभंगांतून भारतमातेची हांक ते अणुरेणूपर्यंत पोंचवीत होते. या अखेरच्या निर्णायक हरिनामसंकीर्तनाने अभूतपूर्व शक्ति आपल्या ठिकाणीं निर्माण होत असल्याचा आत्मप्रत्यय प्रत्येकाला येत होता. आश्चर्य हें की, या भजनाने यावलीचे समस्त ग्रामबांधव आपली दीर्घकालीन वैरें देखील विसरले. त्यांची एक मूठ बनली. सर्वांच्या ठिकाणीं समान बंधुभाव जागृत झाला. विनिर्मुक्त हृदयाने कित्येकांनी अश्रुमोचन केलें. खरोखर अंतःकरणपूर्वक केलेल्या भजनाचें सामर्थ्य अपार आहे !

या दृश्यामुळे लोकांची भावना दृढ झाली की, परमेश्वराने आपल्या तर्फे कौल दिला आहे. त्यांना विश्वास पटला की, आगामी लढ्यांत कितीहि घोर संकटें आलीं, तरी त्यांना आपण तोंड देऊं शकूं. आत्मप्रत्ययाने ते बोलूं लागले की, कोणताहि त्याग करण्याचा प्रसंग आला तरी आम्ही तो करून दाखवूं; पण ग्रामदेवतेची इभ्रत जाऊं देणार नाही, स्त्रियांच्या शीलाला

धक्का लागूं देणार नाही, काँग्रेसच्या ध्वजाचा उपमर्द सहन करणार नाही, मालमत्तेच्या अन्याय्य लुटीचा प्रतिकार केल्याविना राहणार नाही.

उद्यापासून म्हणजे १५ ऑगस्टपासूनच कार्याला सुरुवात करावयाचें ठरलें. कार्यक्रम मुंबईहून आलेलाच पार पाडावयाचा, पण सत्याग्रहाच्या पद्धतीने-शांतता, सहिष्णुता, अहिंसा व प्रकटपणा यांचा त्याग न करता !! ब्रि० सरकारच्या मालकीची म्हणून जी जी वस्तू असेल व दिसेल-आपल्या गांवांत वा आसमंतांत-त्या प्रत्येक वस्तूवर जनतेचा ताबा प्रस्थापित करावयाचा. हा निर्णय घेऊन लोक दुसऱ्या दिवशींच्या सत्याग्रहाच्या तयारीला लागले. लगेच रात्रींतून उद्याच्या सत्याग्रहाच्या रणभेऱ्या वाजविण्यांत आल्या. दौंड्या देऊन सत्याग्रहाचा कार्यक्रम जाहीर करण्यांत आला. सत्याग्रहींना आशीर्वाद देण्यासाठी सर्व वृद्धांना, मातांना व भगिनींना आवाहन करण्यांत आलें. सर्व तरुणांना या सत्याग्रहाचा प्रथम दिनीं उपस्थित राहण्याचें सुचविण्यांत आलें. त्या रात्रीं लोकांना झोप म्हणून आलीच नाही. उद्याचा दिवस उजाडण्याची जो तो प्रतीक्षा करूं लागला. उषेचा उदय झाल्यापासूनच लोक घराबाहेर पडूं लागले.

भगवान सूर्यनारायणाचें १५ ऑगस्टच्या प्रभातींचें दर्शन यावलीकर लोकांना मोठें स्पृहणीय वाटलें. सुप्रभातीचे आपले कुंकुमवर्णाचे किरण फेकून प्रत्यक्ष आदित्यच आपल्या सत्याग्रहींना आशीर्वाद देण्यास अवतरला आहे असें त्यांना वाटूं लागलें भक्तिभावाने त्यांनी त्याला नमस्कार केला. प्रातःकालचा मंद समीरण सत्याग्रहींचा निःश्वास बनून यावलींतील स्वातंत्र्य-संग्रामाची वार्ता आसपासच्या गांवांतून पसरवीत होता. शेजारपाजारच्या गांवचेहि लोक यावलीचा सत्याग्रह पहाण्यास जमा होऊं लागले. पुनः बिगुल, ढोल इत्यादि वाद्यें वाजवून सत्याग्रहाचें आवाहन करण्यांत आलें. कोन्याकोपऱ्यांत दवंडी देण्यांत आली. या दवंड्यांचा व वाद्यांचा एवढा प्रचंड निनाद झाला की, त्याने यावलीचें व आसमंतांतील सर्व नभोमंडल दुमदुमून निघालें. उद्घोषक सदाशिवराव मडघे दवंडी देताना सांगत होता—" आज सकाळीं बरोबर ८ वाजतां पंजाबराव, राजाराम कांडलकर व अण्णाजी मडघे सत्याग्रह करणार

आहेत. सत्याग्रहाचा प्रारंभ गांधी चौकांतून होणार आहे"—आणि गांवकरी लोक आपापल्या घरांतून-दारांतून-खिडक्यांतून-रस्त्यावरून म० गांधींचा जय-जयकार करून आपली संमति दर्शवीत होते.

घड्याळाचा काटा आठाकडे झुकू लागला. सर्वांच्या आघाडीवर गांवांतील वानरसेना जमा झाली. तिने क्रांतिगीतें गात गांधी चौकांत ठाण मांडलें. मोहल्ल्या-मोहल्ल्यांतील थवेच्या थवे त्यांच्या मागून गांधी चौकाकडे लोटूं लागले. आठ वाजण्याच्या आधीच सारा गांव रिकामा झाला. गांधी चौक स्त्रीपुरुषांनी व बालगोपालांनी फुलून निघाला. रणसंग्रामाला जावयाचें आहे म्हणून जो तो तयारीनेच आला. मातांनी व पत्नींनी आपल्या पुत्रांना व पतींना एवढ्या सकाळींच स्वयंपाक करून जेऊं घातलें होतें. सर्वत्र उत्साहच उत्साह भरलेला दिसत होता.

गांधी चौकाची त्या दिवशींची शोभाहि मोठी विलोभनीय होती. १९३० सालीं तेथे पहिल्यांदा तिरंगी ध्वज फडकविण्यांत आला. आजही तो मोठ्या डौलाने फडफडत होता. गुढ्या, तोरणें, पताका यांनी सर्व चौक सुशोभित करण्यांत आला होता. भारताच्या साऱ्या आशा-आकांक्षा त्या ध्वजाच्या रूपानें उंच उडत होत्या. यावलीकर ग्रामस्थांच्या साऱ्या इभ्रतीचें, कर्तृत्वाचें व पराक्रमाचें तो केवळ केंद्रस्थानच बनला होता. ध्वजाकडे पाहणाऱ्या प्रत्येक इसमाला एक अपूर्व संवेदना होत होती. याच ध्वजाच्या संरक्षणासाठी आणखी तीन दिवसांनी आपणास रक्ताचे पाट वाहवावे लागतील. हें दृश्य त्यांना याच वेळीं दिसत होतें काय! भीमाच्या बळाने व अर्जुनाच्या वीर्याने आपण याच्यासाठी लढत आहोंत असें त्या १५ तारखेच्या प्रभातींच त्यांना वाटत होतें काय! तें कांही असो! पण एवढी गोष्ट खरी की, गांधी चौकाच्या मधोमध, उंच ध्वजस्तंभावर फडकणारें आपल्या राष्ट्राचें तें निशाण, स्वातंत्र्य देवीचें तें प्रतीक, भारतमातेचा तो आशाकिरण पाहून त्यावेळीं तेथे जमलेल्या सर्व आबाल वृद्धांना व हिंदुमुसलमानांना अपूर्व संवेदना होत होत्या यांत शंका नाही. त्यांचें तें केवळ दिवास्वप्न नव्हतें. आता इतिहासानें हें दाखवून दिलें आहे की, तीन दिवसानंतरचें भविष्यच त्यांच्या चक्षूसमोर मूर्तिमंत उभें राहिलें होतें

त्या सकाळच्या समुदायाची भावना अनेक रंगांनी मिश्र होती. वीर रस तर तेथे वाहात होताच पण, प्रतिपक्षी काय करणार, सत्याग्रहींना कोणत्या प्रसंगांला तोंड द्यावें लागणार या चिंतेने करुणाचाहि उत्कट प्रादुर्भाव तेथे झालेला होता. एका परीने आपल्या पराक्रमाने आपण स्वातंत्र्य जवळ आणीत आहोंत म्हणून लोक हर्षोत्फुल्ल झालेले होते. पण तितकीच भावी संकटाच्या आशंकेने विषण्णता त्यांना घेरीत होती.

सत्याग्रह-दर्शनार्थ जमलेल्या लोकांच्या हृदयसागरावर जर इतक्या विविध भावनांच्या लाटा उसळत होत्या तर खुद्द सत्याग्रहींच्या भावना कशा उचंबळत असतील याची कल्पनाच केलेली बरी ! 'करा अथवा मरा' या महामंत्राचा जप करीत आपण घराबाहेर पडणार आहोंत, करून यशस्वी झालों तर स्वातंत्र्यांचा उपभोग घेण्यास मिळेल, करतां करतां मरण आलें तर तें मरणहि उदात्त मरण ठरेल। पण घराबाहेर पडावयाचें तें मनाची सर्व तयारी ठेवूनच पडावयाचें, कोणत्याहि बिकटांतल्या बिकट प्रसंगांतून मागे हटावयाचें नाही हा त्यांचा निर्धार होता. सकाळींच त्यांनीहि आपलीं जेवणें आटोपलीं. अन्नदेवतेचा अखेरचा प्रसाद म्हणून कसेबसे दोन घास खाल्ले. सांप्रतचा लढा स्वातंत्र्यसाठी म्हणजे अन्नासाठीच आहे, स्वातंत्र्य आहे तर अन्न आहे, स्वातंत्र्य नाही तर अन्नहि नाही. म्हणून लढून एकदा स्वातंत्र्य मिळालें म्हणजे स्वस्थपणे पोटभर जेवतां येईल, आज अन्नदेवतेचा अनादर करतां येत नाही म्हणून दोन घास खाणें प्राप्त आहे, अशा विचारलहरींनी त्यांच्या मनांत दाटी चालविली होती. अक्षरशः दोन दोन घास खाऊनच सत्याग्रहींनी आपलीं जेवणें आटोपलीं.

सत्याग्रही कपडे घालून सज्ज झाले. घरच्या स्त्रियांनी मंगलारतीपूर्वक त्यांना ओवाळलें. शेजारपाजारच्या भगिनीहि त्यांच्या स्वागतार्थ धावून आल्या. यावलीच्या माता व भगिनी एकीकडे मोठ्या उत्कट भावाने सत्याग्रहींना कुंकुमतिलक लावून त्यांच्या गळ्यांत निरोपाच्या पुष्पमाला समर्पण करीत होत्या, तर दुसरीकडे त्यांच्या नेत्रांतून निघणारीं अश्रुफुलें टपटप भूमातेच्या चरणावर टपकत होतीं. जणुं काय त्या भूमातेला आळवून हेंच सांगत होत्या

की, ' माते ! धरित्री !! आजपासून हे आमचे बाळ आम्ही तुझ्या स्वाधीन केले आहेत. यापुढील स्वातंत्र्य संग्रामांत त्यांचें संरक्षण करण्यास तूंच समर्थ आहेस. ' त्यावेळचें एकूण दृश्यच मोठें करुणमनोहर होतें. तेथे उपस्थित असलेलें हृदयन् हृदय पाझरूं लागलें होतें. त्यांच्या नेत्रांतून निघणाऱ्या द्रवांत हृदयांतील सारें रक्त समाविष्ट झालें होतें. हृदयद्रावकता तेथे मूर्तिमंत अवतरल्याचें दिसत होतें.

आठ वाजायला आता फारच थोडा अवधि उरला होता. स्वातंत्र्याची घडी चुकूं नये म्हणून सत्याग्रही आतुरतेने सत्याग्रह स्थानाकडे जाण्यास निघाले होते. वेळेचें महत्व त्यांना अतिशय वाटत होतें. गांधी चौकाच्या दिशेने ते जसजसे पाऊल टाकीत होते, तशतशा घरांघरांतून माता व भगिनी मंगल–आरत्या हातीं घेऊन त्यांना ओवाळीत होत्या व प्रेमाचा निरोप अश्रुपूर्ण लोचनांनी देत होत्या. दारादारांत आरत्या व फुलवातींचे दीप घेऊन सुहासिनी उभ्या होत्या. विशुद्ध अंतःकरणाने व सहोदराच्या भावनेने आपल्या मातांची, भगिनींची ओवाळणी घेत सत्याग्रहींचें हें पथक सत्याग्रह स्थानाकडे गमन करित होतें. गांवांतील मातृवर्गाने चालविलेला हा सत्कार पाहून त्यांचें अंतःकरण वारंवार भरून येत होतें. प्राचीन व ऐतिहासिक काळांत रणांगणावर जाणाऱ्या आपल्या पुत्रांना, पतींना व बंधूंना निरोप देण्यापूर्वी ओवाळणी करणाऱ्या आर्य स्त्रियांचें व राजपुत महिलांचें चारित्र्य त्यांच्या दृष्टीसमोर उभें राहात होतें. जणु काय त्या महिला आपल्या पुत्रांना व पतींना बजावून सांगत होत्या की, " समरांगणांतून पाठ फिरवणें हें आपल्या कुलांत मोठें लांछन मानलें गेलें आहे. विजय मिळवून तुम्ही परत या. पराजयाने कलंकित होऊन जर परत याल, तर आम्ही तुमचें मुखावलोकनहि करणार नाही, घराचीं दारें बंद करून घेऊं व तुम्हाला घरांत प्रवेश करूं देणार नाही." इतिहासांतील तेजस्वी अशा रजापूत रमणींचे हे उद्गार जरी यावलीच्या महिलागणांच्या मुखांतून प्रकटपणें बाहेर पडत नसले, तरी इतिहास वाचनाने सुबुद्ध बनलेल्या सत्याग्रहींना त्यांची मनोमन प्रतीति येतच होती आणि या प्रतीतीमुळे स्वतःच्या जबाबदारीची त्यांची जाणीवहि पदोपदीं वृद्धिंगत होत होती.

आठ वाजायला दोन तीन मिनिटांचा अवधि असतांनाच सत्याग्रहींचें पथक गांधी चौकांत येऊन दाखल झालें. त्यासरशीं 'महात्मा गांधी की जय' 'तिरंगी झंडे की जय,' 'राष्ट्रपति आझाद की जय,' 'जवाहरलाल नेहरू की जय' इत्यादि प्रचंड जयजयकारांनी जनतेने त्यांचें स्वागत केलें. राष्ट्रध्वजाखाली एक मेज ठेवण्यांत आला होता. त्यावर सत्याग्रहींचे प्रमुख पंजाबराव यावलीकर यांनी चढून लोकांना सूचना दिली की, आता ध्वजगीत म्हटलें जाईल. सारा समुदाय एकदम शांतपणे व गंभीरपणे उभा राहिला. ध्वजगीताच्या स्वरानीं वातावरणांत आवश्यक ती शांति व गांभीर्य निर्माण झाल्यानंतर पंजाबराव यांनी भाषणास प्रारंभ केला. त्यांनी सत्याग्रहाचा उद्देश व सत्याग्रहाचें तंत्र विशद करून सांगितलें. ते म्हणाले–"सत्याग्रहाचें हें अभिनव शस्त्र आमच्या हातीं देऊन म० गांधींनी या निःशस्त्र देशांतहि प्रबल सामर्थ्य निर्माण केलें आहे. गांधीजी याच शस्त्राच्या साह्यानें आज क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. इतिहासाने हें दाखवून दिलें आहे की, निःशस्त्र जनतेला स्वातंत्र्य संपादनासाठी सत्याग्रह–शस्त्राचा अवलंब केल्याशिवाय तरणोपाय नाही. सत्याग्रहाचें सामर्थ्य अतिशय मोठें आहे आणि बलाढ्य साम्राज्यशाहीचा प्रतिकार करण्याचें तें अतिशय प्रभावी साधन आहे. आज याच अभिनव शस्त्राचा आश्रय करून आम्ही यावलीकर सत्याग्रही क्रांतीच्या लढ्यांत उडी घेत आहोंत."—याप्रमाणें सत्याग्रहाचें महत्व प्रथम निवेदन करून व नंतर आज आपण कोणत्या क्रमाने कोणता सत्याग्रह करणार आहोंत याची माहिती देऊन त्यांनी आपलें भाषण संपविलें. लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

याप्रमाणें प्रास्ताविक विधि उरकवून पंजाबराव आपल्या दोन साथीदारांसह शाळेकडे वळले. शाळा हीच सत्याग्रहाचें पहिलें मंतव्य होती. या शाळेच्या माध्यमांतूनच सुशिक्षित गुलामांची परंपरा ब्रि० सरकारने हिंदुस्थानांत निर्माण केली होती. या शाळेवर आपण आपला ताबा करूं आणि नंतर तिच्याच माध्यमांतून स्वातंत्र्याचे पाईक निर्माण करूं, या उद्देशाने त्यांनी शाळेचा ताबा घेण्याचें ठरविलें. ताबा घेण्याचें प्रतीक म्हणून त्यांनी हातांत एक कुऱ्हाड घेऊन तिचा नाममात्र घाव शाळेच्या बहिर्द्वारावर मारला. कोणीहि

विरोध करण्यास समोर आला नाही. शाळेला लागूनच पोस्टाची पेटी ठेवण्यांत आली होती. हिंदुस्थानांतील पोस्टखातें ब्रि० सरकारने लोकांच्या सुखसोईपेक्षा आपल्या राज्यकारभाराच्या सोईसाठीच उत्पन्न केलें आहे. आमच्या गुलामगिरीचा म्हणजे ब्रि० राजमुकुटाचा छाप असलेलीं पत्रें पोस्टाच्या याच पेटींत पडतात. ही पेटी देखील ब्रि० राजसत्तेचें एक प्रतीकच होय, असें म्हणून ती फोडण्यांत आली आणि ब्रि० राजसत्तेचें यावलींतील दुसरें राजचिन्ह नष्ट करण्यांत आलें. तेथून सत्याग्रही पुढे चालूं लागले व त्यांच्या मागे जयघोष व गर्जना करीत ग्रामस्थ समुदाय चालू लागला. शिस्तीने रांगा करून लोक चालत होते.

त्यांचा मोर्चा आता कामकर्त्या पाटलाच्या घराकडे वळला होता. पाटील हा ब्रि० सरकारचा खेड्यांतला मोठा घटक. प्रांताचा गव्हर्नर, जिल्हाचा डेप्युटी कमिश्नर तसा खेड्याचा पाटील ! तेवढ्या खेड्यापुरती सारी ब्रि०सत्ता त्याच्यांत सामावलेली !! तो नाही तर ब्रि० राज्य नाही. तो आहे म्हणूनच ब्रि० राज्य आहे. हा पाटील काँग्रेसचा बनला पाहिजे. सत्याग्रहीचा माणसाशीं विरोध नाही. द्वेष नाही. सारा विरोध-सारा विद्वेष मनोवृत्तीचा, गुलामी जिण्याचा !!! म्हणून निर्विकार व शांत चित्ताने सत्याग्रहींनी पाटलाच्या घरांत प्रवेश केला. गांवांत चाललेल्या या घडामोडी अगदी उघड होत्या. 'उघड बंडा' चाच जर पुकारा झालेला होता, तर त्याचा पाटलाला पत्ता नसेल असें कसें होईल ! पाटील सर्व कांही जाणीत होता. पण गुलामी रोमरोमीं खिळली होती. पिढ्यान्‌पिढ्या गुलामींत व कुत्तेखासींत गेल्या होत्या. निर्भयता हा स्वातंत्र्याचा गुण आहे. 'अभयंहि वै ब्रम्ह 'असेंच श्रुतिहि बोलली आहे. पण भेकडपणा हा गुलामीचा गुण आहे. त्यामुळे पाटील महाशय बावरले. त्यांच्या अंगास दरदरून घाम सुटूं लागला.

त्यांची ही विकल स्थिति पाहून सत्याग्रहींनी त्यांचें सांत्वन केलें. आपल्या सत्याग्रहाची प्रतीकात्मक व अहिंसात्मक भूमिका त्यांना समजून सांगितली. राजसत्तेच्या प्रतीकांच्या ताबा घेण्याचा आपला निर्धार त्यांना निवेदन केला. एक हिंदी माणूस या नात्याने या पवित्र स्वातंत्र्याच्या कार्यांत सहाय्यक होण्याची विनंती केली. सत्याग्रही वीर पंजाबराव यांचें हें सांत्वनपर भाषण ऐकून पाट-

लास धीर आला. हे लोक कोणतेंहि अत्याचाराचें-हिंसेचें-कृत्य करणार नाहीत, व आपल्या कुटुंबियांच्या जिवाला धोका नाही याची त्याला खात्री वाटली.

त्यानंतर सत्याग्रहींनी पाटलाजवळ सरकारी दप्तराची मागणी केली. पटवारी, कामगार महार व जागलेहि त्यावेळीं पाटलाच्या वाड्यांतच बसले होते. कोणीं हूं का चूं केलें नाही. दप्तर आणून देण्यांत आलें. पुनः दप्तर ताब्यांत घेण्याचें प्रतीक करण्यांत आलें. कांही वह्यांची कोरीं पानें फाडण्यांत आलीं व कांही निरोपयोगी कागदपत्र जाळण्यांत आले. दप्तरावर कॉंग्रेसचा ताबा झाला. आपल्या इच्छेप्रमाणे दप्तराची विल्हेवाट लावण्यांस त्यास कोणी विरोध केला नाही. बाकीचें दप्तर पुनः पाटलाच्या ताब्यात देण्यांत आलें आणि हें कॉंग्रेस सरकारचें दप्तर सांभाळण्याचा त्यास आदेश देण्यांत आला. गांवांतील मुख्य सरकार नेस्तनाबूद झालें. यावलींतील ब्रि. सत्तेचा हा विनाश सत्याग्रहींनी शांतपणें, नासधुसीच्या विध्वंसक मनोवृत्तीचा आश्रय न करतां प्रक्षोभाला कोणतेंही कारण न देतां घडवून आणला. यावलींतील ब्रि. सत्ता संपुष्टांत आल्याची घोषणा करण्यांत आली. ती ऐकून पुनः अफाट जन-समूहाने प्रचंड विजयघोष करून नभोमंडल दुमदुमून सोडलें. मोठ्या शांतपणाने, कांही वाकडातिकडा प्रकार न घडतां यावलींतील ब्रि. सत्तेचा बालेकिल्ला सर झाला. यामुळे लोक आनंदाने उड्या मारूं लागले. सत्याग्रहींनी प्रेमाने पाटील पटवारी व इतर कामगारांचा हंसत हंसत निरोप घेतला.

आता गावांत ब्रि. सत्तेचें एकच चिन्ह उरलें होतें. तें म्हणजे जंगल खात्याचें नाकें व दप्तर. जंगल खात्याचा अन्याय वऱ्हाडांतील खेडुतांच्या हृदयांत अगदी शल्यासारखा बसला आहे. एकवेळ स्वतःस खावयास न मिळालें तरी चालेल, परंतु आपल्या गाई म्हशींना, आपल्या पिवळ्या-ढवळ्यांना शेतकरी पोटभर खाऊं घातल्याविना राहणार नाही; परंतु मुक्या जनावरांना–शेतींत राब-णाऱ्या आपल्या या पंचप्राणांना पोटभर खाऊं घालण्याच्या मार्गांतहि सरकारचें जंगल खातें आडवें येतें. वनचराईचा कायदा करून व निसर्गनिर्मित गवतावरहि कर बसवून सरकारने वऱ्हाडच्या शेतकऱ्याच्या गुराढोरांची जी उपासमार केली आहे तीमुळे स्वतःच्या उपासमारीपेक्षांहि, तो अधिक संतप्त आहे. १९३०


चा जंगल सत्याग्रह याच जुलुमाचा निषेध म्हणून आपण केला होता याची आठवण यावलीकर विसरले नव्हते, विसरू शकत नव्हते. म्हणून जगल खात्याचें नाकें व दप्तर दिसल्याबरोबर लोक किंचित प्रक्षुब्ध झाले. सत्याग्रहांनी प्रथम नाक्याचें बंद असलेलें दार आपल्या कुऱ्हाडींनी फोडून त्यावर ताबा घेतला. कोणीहि विरोध केला नाही. नंतर सर्व कागदपत्रें बाहेर काढण्यांत आलीं व जाळून टाकण्यांत आलीं. दरम्यान जनसमुदायाने सर्वच्या सर्व इमारत उध्वस्त करून टाकली व सर्व लाकूडफाटा एकत्र करून जाळून टाकला जंगलकायद्याच्या विरुद्ध असलेल्या गाऱ्हाण्यांचा आपला क्षोभ याप्रमाणे प्रकट करून लोकसमुदाय शांत झाला. यावलींत आता ब्रि. सत्तेचें एकहि चिन्ह उरलें नाहीं. यावली खरीखुरी स्वतंत्र झाली. काँग्रेसचें अधिराज्य स्थापन झालें. अवघ्या तीन तासांत संपूर्णपणें अहिंसक अशी क्रांति घडून आली.

प्रकरण ११ वें


माहोली पोलीस ठाण्यावरील सत्याग्रह

या प्रमाणे एक लढाई संपली. एक विजय प्राप्त झाला. दुपारचे अकरा वाजले. विजयी सत्याग्रहींनी सर्व लोकांना गांधी चौकाकडे चालण्याची आज्ञा केली. विजयोत्फुल्ल जनता शिस्तीने गांधी चौकाच्या मार्गाने चालूं लागली. ग्रामदेवतेची एक प्रदक्षिणा पूर्ण झाली. गांधी चौकांतूनच सत्याग्रहाच्या द्वारां क्रांतीस प्रारंभ झाला होता. क्रांति पूर्ण झाली. प्रदक्षिणा आटोपून क्रांतिस्तव जनता फिरून गांधीचौकांतच एकत्र झाली. राष्ट्रध्वज डौलाने फडफडत होता. यावलीपुरता तरी आता तो खराखुरा क्रांतीचा—स्वातंत्र्याचा—ध्वज बनला होता. जनतेची त्याच्यावरील श्रद्धा अनंत पटींनी वृद्धिंगत झाली होती.

पुनरपि गांधी चौकाला सभेचें गंभीर स्वरूप प्राप्त झालें. घडलेल्या घटनांचें समालोचन करण्यांत आलें. पुढील कार्यक्रमाची जाणीव देण्यांत



वीर पंजाबराव यावलीकर



ता. १५ आगस्ट १९४२ च्या निःशस्त्र क्रांतीचे सत्याग्रही

आली. शिस्त व शांतता यांच्या सूचना देण्यांत आल्या. एकटी यावली स्वतंत्र होऊन भागणार नाही. अहिंसक क्रांतिसेनेला इतर भाग स्वतंत्र करण्यासाठीहि चाल करून गेलें पाहिजे. या स्वातंत्र्याच्या मोहिमेची तयारी केली पाहिजे. उपकरणें जमा केलीं पाहिजेत. काळ वाया जाऊं देतां उपयोगी नाही. एकेक क्षण मोलाचा आहे, असें सांगून पुढील कार्याच्या तपशीलवार सूचना देऊन जनतेला भोजनादि आटोपण्यासाठी व तयारीसाठी घरोघर जाण्याची अनुज्ञा देण्यांत आली

पुढील हल्ला माहुली, जहागीरच्या पोलिसठाण्यावर जावयाचा होता. सुमारें ५०,६० खेड्यांना गुलामगिरींत डांबून ठेवण्यासाठी उभारलेलें ब्रि० सरकारचें हें पोलिसठाणें सर केल्याशिवाय एकेका खेड्याच्या स्वातंत्र्याला सुरक्षिति नव्हती. यावलीचें स्वातंत्र्य अबाधित राहूं शकत नव्हतें आणि विलंब करण्यांत व विजयोत्सवांत कालहरण करण्यांत मतलब नव्हता. म्हणून फक्त एक तासाचाच अवधि देण्यांत आला होता. बरोबर दुपारीं बारा वाजतां माहुलावर चाल करून जाण्यांचें घोषित करण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें वेळेचें, नियमितपणाचें व शिस्तीचें महत्व जाणून सर्व लोक पुनः बारा वाजण्याच्या सुमारासच गांधी-चौकांत सम्मीलित झाले.

गांवकरी आपापल्या घरीं गेले असले, तरी संपूर्ण कार्यभाग आटोपल्या-शिवाय घरीं परत जावयाचें नाही अशी सत्याग्रहींची प्रतिज्ञा होती. म्हणून ते गांधीचौकांतच बसून राहिले. दरम्यान माहुलीच्या सत्याग्रहासाठी आणखी लोकांनी नांवें नोंदविलीं. बारा वाजण्यापूर्वीच सत्याग्रहींच्या अधिकृत व दीक्षित सेनेंत भर पडूं लागली. आता त्यांची संख्या पूर्ण दहा झाली होती. लोकहि जमा होऊ लागले होते.

माहुली पोलिस ठाण्याचा एक हेडकान्स्टेबल यावलीस आपलें कर्तव्य बजावण्यास आला होता तो आतापर्यंत उपाशीच होता. क्रांतीच्या या उठा-वणींत व्यक्तिद्वेष अथवा हिंसेचा लेशहि नव्हता. गांवकरी लोकांनी, स्वतंत्र याव-लीच्या छायेंत, शत्रूच्या-ब्रि० सरकारच्या या गुलामालाहि मोठ्या प्रेमाने भोजन

घातलें. सर्वांनी त्याला प्रेमाने व शांतीनेच वागविलें. गुलामीच्या रंगांत हाडें रंगलेला तो हेडकान्स्टेबल सत्याग्रहींना आपल्या पुढील विचारापासून परावृत्त करण्यासाठी त्यांची मनधरणी करूं लागला. क्षणभर त्याचेंहि अंतःकरण विरघळलें होतें. यावलीच्या क्रांतीचें स्वरुपच तसें प्रभावी होतें. त्याचें भेकड व गुलाम मन भावी संकटांना भीत होतें. पंजाबरावादि यावलीच्या कार्यकर्त्यांच्याविषयीं त्याच्याहि मनांत आदर व श्रद्धा वास करीत होती. एवढ्या या सत्कार्यकर्त्यांवर अतिप्रसंगाला तोंड देण्याचा प्रसंग येऊ नये, अशा कळकळीनेच तो बोलला. सत्याग्रहींना आपल्या निर्धारापासून मागे फिरवण्याचा त्याचा हा प्रयास वृथा ठरला. तेजस्वी सत्याग्रही आपलें प्रतिज्ञापालन करण्यासाठी वेळच आली, तर स्वप्राणांचेहि बलिदान करील, पण सत्य हेंच त्याचें व्रत असल्याने तो आपल्या प्रतिज्ञेपासून रेसभरहि मागे ढळणार नाही, या सिद्धांताची प्रतीति त्यालाहि आली. परंतु स्वातंत्र्याच्या निराकार भावनेसाठी हे इतके लोक आपल्या सर्वस्वाची आहुति देण्यास कां तयार होतात हें कोडें त्याला उलगडलें नव्हतें.—तयार होतात हें तो प्रत्यक्ष पहात होता. त्यांना परावृत्त करण्याची कळकळीने खटपट करीत होता. त्यांच्यावरील संभाव्य संकटानी त्याचेंहि हृदय व्यथित होत होतें. एका बाजूने आपल्या त्यागी बांधवांची उत्कटता पाहून त्याचें चित्त हेलावत होतें; तर दुसरीकडे, आपण ब्रि० सरकारचें अन्न खातों या भ्रामक समजुतीने नियोजित कर्तव्याकडे त्याचें गुलाम मन ओढ घेत होतें. चालू असलेला प्रकार तो निमूटपणें अवलोकन करीत होता. यावलींत उठलेला स्वातंत्र्याच्या झुळकीबरोबर त्याच्या ठिकाणीं असलेला ब्रि० साम्राज्यसत्तेचा सारा दरारा, सारा रुबाब, सारी शान उडून गेली होती. कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं ब्रि० साम्राज्याचा हा हस्तक-ज्याला एकट्याला एके वेळीं पांचपन्नास गांवावर रुबाब चालवितां येत असे, आणि त्याच्या एका हुकुमानेहि इकडचें गांव तिकडे हालत असे—आज अगदी गोगलगाय बनला होता. यावलींतील मनुष्यच काय, पण गवताची काडी देखील हलविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगांत उरलें नाही हें त्याला जाणवत होतें. हें सामर्थ्य ज्या ब्रि० सत्तेच्या दराऱ्यामुळे आजपर्यंत कार्य करीत होतें, तो दराराच आता नष्ट झाला होता. त्याचें अधिष्ठान लोकांचें दुर्बल मन हें होतें. पण आतां तें मन क्रांतीच्या रसांत डुंबून स्वतंत्र झालें होतें, निर्भय बनलें होतें, आणि त्यासरशी ब्रि० हुकुमतीचा हा ठेकेदार अविवश, केविलवाणा, दुर्बल बनला होता.

दुपारचे बारा वाजले. सर्व सत्याग्रही आपापले शुभ्र खादीचे गणवेश व गांधीटोप्यांचीं शिरस्त्राणें घालून सज्ज झाले. प्रत्येकाने एका हातांत तिरंगी ध्वज व दुसऱ्या हातांत कुऱ्हाड घेतली. १९४२ च्या लढ्यांत यावलीकरांनी कुऱ्हाड हीच आपल्या निर्धाराचें प्रतीक बनविली होती. सत्याग्रहींनी माहुलीच्या रस्त्याने कूच केलें. म० गांधींचा प्रचंड जयजयकार झाला. दीडहजारांचा जनसमुदाय सत्याग्रहींच्या मागे चालू लागला. शेकडो कुऱ्हाडी तळपूं लागल्या, शेकडो कटांतून वीर निनाद निघूं लागले, शेकडो लोक सत्याग्रहाशीं तादात्म्य झाले. क्रांतीचा डोंबच उसळला होता. दुसऱ्या दिवशींच बेनोड्यास क्रांति झाली होती. इत्तमगाव स्वतंत्र झाला होता. वरुडवर जनतेचा ताबा झाला होता. मोर्शीचा तालुकाधिकारी जनतेचा गुलाम बनला होता. क्रांतीचा वणवा बातम्यांच्या झंझावाताबरोबर झपाट्याने भडकत होता. गावोगांवच्या क्रांतिसेना बाहेर पडत होत्या. इकडे ही यावलीची क्रांतीची सेना बाहेर पडली. तिकडे इत्तमगावची अशीच ४०० सैनिकाची टोळी बाहेर पडली होती व बेनोड्याच्या १०० सैनिकांना ती मिळाली होती. बिनागणवेशाच्या, बिनाशस्त्राच्या, खेडुतांच्या ह्या सेना ठिकठिकाणांहून निघून मोठ्या गांवांच्या व शहराच्या रोखाने रवाना होऊं लागल्या होत्या. रस्ते तोडण्यांत येत होते—अडविण्यांत येत होते. ग्रामीण जनतेला अंधुकपणें हें कळत होतें की, क्रांति करण्याचें सामर्थ्य आपणांतच आहे. पाश्चात्य देशांत शहरांनी क्रांति केली असेल. फ्रान्सची क्रांति पॅरिसच्या नागरिकांनी घडवून आणली असेल. रशियाची क्रांति मास्को व पेट्रोग्रॅडच्या कामगारांनी केली असेल पण, भारताची क्रांति भारतीय पद्धतीनेच झाली पाहिजे. ग्रामीणांनीच तिचा पुढाकार घेतला पाहिजे. गांवें स्वतंत्र करून शहरावर मोर्चे नेले पाहिजेत व तींहि स्वतंत्र करण्यासाठी तेथील आपल्या कॉंग्रेस बंधूंना मदत केली पाहिजे. ग्रामीणाचे हे मेळावेच्या मेळावे आपापल्या गांवांतून बाहेर कां पडले आणि शहरांच्या रोखाने कां चालू लागले, यांतील हें रहस्य ध्यानांत ठेवलें पाहिजे. भारतीय क्रांतीचा हा क्रमविकास इतिहासांत महत्वाचा ठरेल. त्यामुळेच येथील क्रांतीला अन्यनिरपेक्ष वैशिष्ट्य प्राप्त होईल.

जवळच्या रस्त्यानें यावलीहून माहुलीजहागीर तीन मैल आहे. पण यावलीच्या क्रांतिसेनेला वऱ्हाडी चेतवावयाचा होता. आपल्या एका क्रांतिदीपावर

अनेक ठिकाणचे क्रांतिदीप पेटवावयाचे होते. त्यांनी वाघोलीच्या मार्गे कूच केलें. वाघोलीस जाऊन क्रांतीचा शंख फुंकावयाचा आणि नंतर जवळची सडक गाठून राजमार्गानें माहुलीस जावयाचें असा क्रम त्यांनी आखला. यावलीची क्रांतिसेना आपल्याच गांवाकडे येत आहे हें पाहून वाघोलीकरांना अत्यानंद झाला. यावलीकरांच्या स्वागत-सत्काराची त्यांनी तातडीने तयारी केली. पंजाबराव प्रभृति यावलीच्या सत्याग्रहींचें पथक व त्याच्या मागोमाग दीड हजार समुदाय वाघोलीस पोहोचला. राष्ट्रीय गर्जनांनी वाघोलीकरांनी त्यांचें स्वागत केलें व मोठ्या प्रेमाने पुष्पहार त्यांच्या गळ्यांत घातले.

वाघोली ओलांडल्यावर ज्या शेतांतून रस्ता सडकेकडे जातो त्यांत ब्रि० सरकारच्या तारखात्याचे तारेचे खांब उभे होते. या तारा कसल्या ! हिंदी जनतेच्या मातेभोंवती आवळलेले ते पाशच होते. हे पाश तोडले पाहिजेत. भारताचा गळा मुक्त केला पाहिजे. एक कुऱ्हाड पंजाबराव यांनी एका खांबवर मारली. दुसरीकडून दुसऱ्या कुऱ्हाडीचा आघात शरीफ बेग मिर्झा यांनी केला. खांब कोसळून पडला. कोणी तरी तारेवर दोर फेकला. दोराचीं दोन्ही टोकें धरून तार खाली ओढण्यांत आली. तारहि तुटली. त्यानंतर सर्वच कुऱ्हाडींत चैतन्य आलें. सुमारें एक दीड मैल टापूंत—वाघोलीपासून माहुली-पर्यंत असलेले ब्रि० सरकारचे हे तारस्तम्भ हां हां म्हणता धराशायी झाले खांबच कोसळल्यावर इमारत कशी टिकणार ? फेक दोर की ओढ तार. मार कुऱ्हाडीचे घाव की पाड खांब खाली. असा प्रकार सुरू झाला. ब्रि० सरकारचे हे खांब किती पोकळ आहेत, दोन घावांतच ते कसे कोसळतात हें पाहून लोकांना मोठें आश्चर्य वाटलें.— या पोकळ खांबांनाच का आपण इतके दिवस भ्यालों ? या पोकळ खांबाइतकेंच ब्रिटिश साम्राज्यहि पोकळ नाही काय ? भारतीय जनतेने निर्धार करून दोनच घाव मारण्याचा अवकाश की, तेंहि ह्या खांबा-सारखेंच कोसळून पडणार नाही काय? जनतेची स्फूर्ति व पराक्रम वाढत चालला. आत्मविश्वास बहरास येऊं लागला.

इतका वेळ क्रांतिसेनेच्या ओघांत वाहणारा आणि यावलीसारख्या क्रांतिग्रामांतील अन्न खाल्लेला मघाचा तो हेडकान्स्टेबल शेकडो कुऱ्हाडींचा व

दोरांचा हंसत हंसत चाललेला खेळ पाहून अधिकच भेदरला. त्याने हळूच जनसमुदायांतून पोबारा केला. जवळच्या मार्गाने तो माहोलीस जाऊन पोहोचला. ठाणेदार सब्-इन्स्पेक्टरला त्याने सकाळपासून यावलींत आता पावेतों झालेल्या प्रकारांची खबर दिली. क्रांतिसेनेचें बलाबल सांगितलें आणि माहुलीच्या पोलिस ठाण्यावर ताबा करण्याच्या उद्देशाने ही सेना थोड्याच वेळांत येथे येऊन थडकणार आहे हेंहि निवेदन केलें.

एकंदर बातमी ऐकून ठाणेदारसाहेब मनांत तर घाबरले. पण वरून धैर्य धरून पुनः सर्व प्रकार पाहून येण्यास त्यांनी आपले दूत पाठविले. किती खांब पडले, किती तारांच्या भेंडोळ्या झाल्या, क्रांतिसेना किती दूर आहे, तींत कोण प्रमुख मंडळी आहेत इ० तपशीलवार बातमी दूतांनी आणल्यावर सब्इन्स्पेक्टर-साहेब आपल्या व्यवस्थेस लागले ठाण्यांत असलेल्या बंदुकी त्यांनी बाहेर काढल्या. एक बंदूक हातीं घेतली. बाकीच्या इतर कांही शिपायांना दिल्या. उरलेल्या सर्व शिपायांच्या हातांत लाठ्या दिल्या. कागदपत्रांचीं सर्व दफ्तरें लोखंडी पेटींत कोंबून तिला लठ्ठ कुलूप ठोकलें. नंतर ठाण्यांचीं सर्व खिडक्या व दारें बंद करण्यांत आलीं. बाहेरचा दरवाजाहि कुलूप लावून बंद करण्यांत आला. किल्ल्यांचें जुडगें त्यांनी आपल्या ताब्यांत घेतलें आणि ठाणेदारसाहेब आपल्या शिपायांसह सशस्त्र होऊन ब्रि० सरकारच्या मिठास वफादार राहण्यासाठी सज्ज बसले.

बलप्रयोग करण्याचा त्यांचा निर्धार पक्का झाला होता. गोळ्यांचे कांही बार उडतांच खेड्यांतले हे भेकड कानाकान होतील अशी त्यांनी आपली मिथ्या कल्पना करून घेतली. बार तरी काढण्याचें प्रयोजन काय? नुसत्या बंदुकी दिसल्या तरी काम भागेल! पण त्या मूर्ख ठाणेदाराला—ब्रि. सरकारच्या त्या इमानदार रखवाल्याला—भारतमातेच्या व स्वातंत्र्यदेवीच्या त्या विद्रोही इसमाला क्रांतिसेनेच्या निर्धाराची कांहीच कल्पना नव्हती. त्यागाच्या कोणत्या कमाल मर्यादेपर्यंत यावलीचें क्रांतिवीर जाऊं शकतात यांची अटकळ त्याला येऊं शकली नाही. पंजाबराव आपल्या नित्य परिचयाचा आहे. दोन धमक्या देऊं. दोन समजुतीच्या गोष्टी सांगून पाहूं. नच ऐकलें तर दोन बार काढूं;

आणि काम फत्तें करूं. या मूर्ख समजुतींत तो क्रांतिसेनेच्या आगमनाची वाट पहात बसला.

गांवांतले कामदार महारहि त्याने एकत्र केले. सर्वांच्या हातांत लाठ्या दिल्या व वेळप्रसंग पडल्यास कसोसीने बलप्रयोग करण्याची त्यांना सूचना दिली. सब इन्सपेक्टर, पोलिस शिपाई आणि कामदार महार याप्रमाणे ब्रि. साम्राज्याच्या संरक्षणासाठी एकत्र झाले. स्टेशन हौसच्या बाहेरील आवाराजवळील सडकेवरील दरवाजांत त्यानी आपला तळ ठोकला.

माहोलीचें पोलिस ठाणें हें दक्षिणेच्या बाजूला अमरावती सडकेवर माहोली गांवापासून सुमारें फर्लांगभर अंतरावर बांधण्यांत आलें आहे. पंजाबरावच्या नेतृत्वाखाली क्रांतिसेना उत्तरेकडून येत होती. माहोलीकर ग्रामस्थांना ठाणेदाराने केलेली तयारी कळली होती. त्यांनी क्रांतिसेनेला सामोरे जाऊन सत्याग्रहींचें स्वागत केलें. परीस्थितीची जाणीवहि दिली.

आता क्रांतिसेनेचा प्रवाह अधिकच मोठा झाला होता. गांवोगांवचे लोक येऊन मिळूं लागले होते. यावलीचे लोक तर होतेच. पण नरसिंगपुर, वाघोली, माहुली येथील लोक त्यांच्यांत येऊन मिसळले. माहुलीकरांनी स्वागत केल्यावर पुनः एकवार जयजयकारांनी आकाश दुमदुमून गेलें. आता हा सर्व जनप्रवाह मोठ्या सडकेने पोलीस ठाण्याच्या दिशेने वाहूं लागला.

ब्रि सरकारच्या माहुली येथील ठाण्याचे रखवालदार रखवालीसाठी लाठ्या व बंदुकी घेऊन उभे आहेत आणि वेळप्रसंगच पडला तर गोळीबार करण्यासहि ते मागेपुढे पाहणार नाहीत ही बातमी कळून देखील पंजाबराव प्रभृति सत्याग्रहींचें पथक अथवा जनसमुदाय यांतील एकहि इसम परत फिरला नाही हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

राजमार्गानें पंजाबराव व त्याचे इतर सत्याग्रही पोलिस ठाण्याच्या मैदानांत जाऊन पोहोचले. गेल्याबरोबर ठाण्याच्या अंगणांतच असलेला जो तारेचा खांब त्यावर कुऱ्हाडीचा आघात करून त्यांनी तो जमिनीवर लोळविला. बंदुकी

व लाठ्या यांनी सज्ज असलेली सरकारी पोलिस शिपायांची व कामगार महारांची तुकडी त्याच आंगणांत उभी असतांना त्यांच्या देखत देखत यावलीच्या सत्याग्रहींनी तो तारेचा खांब हां हां म्हणतां जमिनीवर कोसळविला. हें त्यांचें शौर्य पाहून जनतेला अधिकच स्फुरण चढलें. अधीरपणें पुढील घटनांच्याकडे ती पाहूं लागली. आपले शिपाई व कामगार यांतून सत्याग्रहींना प्रतिरोध करण्यासाठी कोणीच पुढे सरसावत नाही हें पाहून ठाणेदार सब-इन्स्पेक्टर स्वतः पुढे झाला आणि त्याने पंजाबराव यांना-'मीं तुम्हाला अटक केली आहे-' असें ओरडून सांगितलें.

त्याचें तें म्हणणें ऐकून पंजाबराव यांनी जबाब दिला की,-'सत्याग्रह अजून अपुरा राहिला आहे. तो पूर्ण झाला म्हणजे मी व माझे सत्याग्रही सोबती तुमची अटक मान्य करूं.' हा जबाब ऐकून सब-इन्स्पेक्टरने पंजाबराव यांचेवर बंदूक रोखली आणि पुनः ओरडून सांगितलें की 'पोलिस ठाण्याला यत्किंचित धक्का लागला, तरी मला गोळी झाडावी लागेल.' पंजाबराव यानी जबाब दिला 'एक गोळी झडो अथवा गोळ्यांच्या फैरी झडोत, पोलिस ठाण्याचा ताबा घेतल्याशिवाय आमचा सत्याग्रह थांबणार नाहीं' सब-इन्स्पेक्टर पंजाबराव यांच्या छातीशी रोखलेली बंदूक धरून उभा आहे. पंजाबराव यत्किंचित न डगमगतां छाती ताठ ठेवून उभे आहेत. केव्हा घोडा दबेल, केव्हा गोळी सुटेल आणि केव्हा पंजाबराव यांचें बलिदान घडेल याचा नियम नाही असें हें चित्र त्यावेळीं सर्वांच्या दृष्टीसमोर होतें. एका निमिषार्धांत पंजाबरावची आहुति यज्ञकुंडांत पडली असती. त्यांची ती धीर व उदात्त मूर्ति तशीच उभी आहे, सत्याग्रह पूर्ण करण्याचा त्यांचा निर्धार कायम आहे आणि आपल्या अहिंसेच्या व नैतिक बळाने त्यांनी बंदुकधारी पोलिस अधिकाऱ्यांच्या व त्यांच्या शिपायांच्या सैतानी बळावर मात केली आहे याची जाणीव होतांच, आतापर्यंत प्रतिरुद्ध झालेला जनप्रवाह अकस्मात धो धो वेगाने वाहूं लागला. हां हां म्हणता पोलीस ठाण्याच्या चारही बाजूला क्रांतिसेनेचा गराडा पडला. ठाणेदारसाहेब, त्यांचे शिपाई, कामगार महार यांच्या बंदुकी व लाठ्यांच्या समोर, ठाण्याच्या मुख्य दरवाज्यावर कुऱ्हाडीचा प्रहार प्रथम राजाराम गोपाळजी कांडलकार व विश्वासराव बापुराव यावलीकर आणि सिताराम दुमाजी राऊत यांनी केला. निमिषार्धांत दरवाजा

कोसळून पडला आणि क्रांतिसेनेचा एक लोंढा पाहतां पाहतां आत घुसला. मागच्या बाजूने त्याचवेळीं इमारतीच्या खिडक्याहि कोसळल्या आणि त्यांतूनहि लोक आंत घुसले. लोखंडी पेटीचें कुलुप तोडण्यांत आलें. सर्व दप्तरे व कागदपत्रें आणि इमारतींतील लाकडी सामान बाहेर काढण्यांत आलें. लाकडी सामानाचे तुकडे तुकडे करण्यांत आले. कागदपत्रें फाडण्यांत आलीं. सुमारे दीड तासपर्यंत अत्यंत शांतपणे व निर्विकार चित्ताने ब्रि० राजसत्तेच्या प्रत्येक चिन्हाचा विध्वंस करून जनतेने पोलिस ठाण्याचा पूर्ण ताबा घेतला. सत्याग्रह शांतपणे पूर्ण झाला.

बिचारा सब्-इन्स्पेक्टर! त्याच्या अंगास दरदरून घाम सुटूं लागला. हातपाय लटलट कापूं लागले. पंजाबरावच्या छातीवर रोखलेली बंदूक जमिनीस टेकली गेली. दीनवाणी मुद्रा करून, लोकांना आवरण्याविषयीं तो पंजाबरावची विनवणी करूं लागला. ब्रि० सरकारच्या दराऱ्याला लोक दबत नाहीत, पोलिसांच्या धमकीचे व लाठ्यांचें भय त्यांना वाटत नाही. बंदुकीच्या गोळीची धास्ती त्यांना रेसभर देखील मागे हटवूं शकत नाही. हा चमत्कार आयुष्यांत त्याने पहिल्यांदाच अनुभवला. त्यामुळे त्याचा प्रारंभींचा तो उद्दाम दर्प विरघळून गेला. त्याचें सर्व सामर्थ्य नष्ट झालें. सत्याग्रहींच्या आत्मिक बलापुढे व जनतेच्या नैतिक बलापुढे त्याचें पाशवी बल लुळेंपांगळें झालें. सैतान माणुसकीवर आला.

सत्याग्रह पूर्ण झाला हें पाहून पंजाबराव यांनी लोकाना हाक दिली. त्यासरशी ती सर्व क्रांतिसेना एका क्षणार्धांत पुन्हा पंजाबराव यांच्यामागे येऊन शिस्तीने उभी राहिली. जनतेवरील त्यांचा काबू विलक्षण होता. त्यांचा एक एक शब्द जादूचें काम करीत होता. लोक पंजाबराव यांच्या संपूर्ण कह्यांत आहेत आणि पंजाबराव यांची हिंसा करण्याची कोणतीहि प्रवृत्ति नाही, हें पाहून ठाणेदारसाहेबांचा धीर थोडाथोडा चेपूं लागला. त्यांनी फिरून पंजाबराव यांना सांगितलें की,— ‘ मीं सत्याग्रहींना अटक केली आहे. जे सत्याग्रही असतील त्यांनी ठाण्यांत असावें. ’ पंजाबराव यांनी लोकांना सांगितलें की,— ‘ सच्चा सत्याग्रही या नात्याने मी या अटकेचा स्वीकार करणें माझें कर्तव्य आहे आता आजचा सत्याग्रहाचा कार्यक्रम संपूर्ण झाला आहे. तेव्हा तुमच्या-

पैकी जे सत्याग्रही असतील त्यांनी येथे थांबावें आणि बाकीच्यांनी आपापल्या गांवीं परत जावें

—"आम्ही सर्व सत्याग्रही आहोंत, आम्ही सर्व थांबणार.—" एक हजार कंठांतून एकदम आवाज निघाला. सब्-इन्स्पेक्टर पुनः बावचळला. एक हजार लोकांना अटक करावयाची ? त्यांना कोठें ठेवायचें ! त्यांना भोजन कसें घालावयाचें? त्यांना तुरुंगांत कसें व कोणाबरोबर पाठवावयाचें ?—त्यानें पुनः पंजाबराव यांना विनंती केली की, इतक्या लोकांना अटक करणें अशक्य आहे. तुम्हीच यांतील पांच माणसें निवडून द्या व इतरांना जाण्यास सांगा. पंजाबराव यांनी नांवें घेऊन पांच सत्याग्रहींना पुकारलें. तरी दहा इसम येऊन बसले. जनतेला उद्देशून पंजाबराव यांनी भाषण करून शिस्तीचें महत्व समजून सांगितलें. " संकटें अजून पुढेच आहेत. त्यावेळीं शूर पुरुषांची गांवाला गरज पडणार आहे. तेव्हा पुढील काळावर नजर देऊन सर्वांनी परत गांवीं जाणें चांगलें. " पंजाबराव यांच्या वक्तव्यांतलें तथ्य ध्यानांत असल्यामुळे लोक शिस्तीने व शांतपणे परत फिरले. पंजाबराव प्रभृति दहा सत्याग्रही अटक स्वीकारून तेथेच थांबले. ब्रि० सरकारच्या पाशवी बलांत त्यांना अटक करण्याचें सामर्थ्य नव्हतें हें अगदी उघड झालें होतें. सत्याग्रहीचा धर्म म्हणून त्यांनी अटकेचा शांतपणे व अहिंसकपणे स्वीकार केला होता. पंजाबराव यांनी आपल्या सर्व लोकांच्याबरोबर यावलीसच परत जाण्याचें ठरविलें असतें तर त्यांना कोण धरूं शकणार होता ? पोलीस अधिकाऱ्यांत तें सामर्थ्य उरलें होतें का ? त्यांच्या लाठ्या व बंदुकीच्या अंगीं तरी तो प्रभाव उरला होता कां! अर्थात् नाही. अशाहि परिस्थितींत त्यांनी अटक स्वीकारली हाच त्यांच्या विशुद्ध नीतिमत्तेचा, अहिंसकतेचा व आध्यात्मिकतेचा पुरावा होय.

इकडे जें यावलीस, वाघोलीस व माहोलीचे सडकेवर घडले तेंच बेनोडा व इत्तमगांवला घडलें. बेनोड्यास गोळीबार झाला. त्यांत बेनोड्याच्या व इत्तमगांवच्या शूर क्रांतिवीरांचें बलिदान घडलें. हा वृत्तांत पुढील प्रकरणांत द्यावयाचा आहे. प्रस्तुत संदर्भ इतकाच की, सबंध उमरावती मोर्शी-वरुड रस्ता क्रांतीने भडकल्याच्या बातम्या अमरावतीस जिल्हाधिकाऱ्यांकडे जाऊन पोहचल्या होत्या.

परिस्थिति समक्ष पाहण्यासाठी ते जातीने निघाले होते. माहोली पोलिस ठाण्यावरील सत्याग्रह पूर्ण करून यावली, बाभोली, माहोली, नरसिंगपूर इ. ठिकाणची जनता वर सांगितल्याप्रमाणे पंजाबराव यांच्या आदेशानुसार निघून गेल्यावर आणि अटकेचा स्वीकार करून पंजाबराव प्रभृति दहा सत्याग्रही ठाण्यांत बसून राहिल्यानंतर, कांही वेळाने जिल्हाधिकारी मेल्ड्म तेथे येऊन पोहचले. त्यांना पोलिस ठाणें संपूर्ण उध्वस्त झालेलें आढळून आलें. लाकडी सामानाचे तुकडे इतस्ततः पडले होते. कागदपत्रांच्या चिटोऱ्यांचा तर पोलीस ठाण्यापासून माहोली गांवापर्यंत फर्लांगभर सडला सांडला होता. वेळ निघून गेली होती. तरी परत जाणाऱ्या क्रांतिसेनेचा पाठलाग करण्याचा मोह डेप्युटी कमिश्नर मेल्ड्म याला आवरता आला नाही. त्याने पाठलाग केलाच. पण हताश होऊनच त्यास परत यावें लागलें. शेवटीं फगन्या व उकडर्या महार यांच्या हस्तें माहोलींत दवंड्या देऊन जाहीर करण्यांत आलें की, 'तारा तोडणारांना व सरकारी मालाचें नुकसान करणारांना फांसावर दिलें जाईल असा डी. सी. चा हुकूम आहे, दवंडीवरच बिचाऱ्यास समाधान मानावें लागलें.

सत्याग्रही शांतपणे बसले होते. साहेबमजकुरांचा क्रोध अनावर झाला त्यांनी तो सर्व सब-इन्स्पेक्टर वर काढला. त्याला त्यांनी अद्वातद्वा शिव्या दिल्या. तो बिचारा काय बोलणार ! त्यांच्यांतला सैतान क्रांतिसेनेच्या नैतिक बलाने केव्हाच धुऊन निघाला होता. 'गोळीबार कां केला नाही ? लोकांना ठार कां मारलें नाही ?'—मूर्ख जिल्हाधिकारी बडबडत होता. क्रांतीच्या नीतिबलापुढे लाठी व बंदूक देखील ढिली पडते हें त्याला काय माहिती ? म्हणूनच सब-इन्स्पेक्टरला वाटेल तशा अर्वाच्य शिव्या देऊन तो आपल्या संतप्त चित्ताचें समाधान व मूर्खपणाचें प्रदर्शन करीत होता. परंतु ईश्वरी संकेतहि असा कांही मजेदार असतो की, बरोबर तीनच दिवसानंतर क्रांतिकारकांच्या नीतिधैर्यासमोर खुद्द मेल्ड्म महाशयाची बंदूक यावली गांवांतच ढिली पडली. यावलीच्या नागरिकांनी त्याला कैद केलें व तिचा त्यानेहि स्वीकार केला. कैदेंतून भ्याडासारखा तो पळाला. नाल्यांत १५ वर्षांचा एक तरुण भेटला. त्याची त्याने माफी मागितली व यावलीच्या शौर्याने आपण पराजित झालों याची कबुली दिली. यावली प्रकरण पुढे हायकोर्टांत चाललें. त्यांत मेल्डूल हा चोर, दरवडे-

खोर आहे असें मानण्यापर्यंत एका हायकोर्ट जज्जाचें मत बनलें. सब-इन्स्पेक्टरच्या भ्याडपणाला शिव्या देणारा हा शूर जिल्हाधिकारी, यावलीचा खटला हायकोर्टांत प्रविष्ट झाल्याबरोबर हिंदुस्थानांतून पळाला आणि द. आफ्रिकेंत नोकरीवर गेला. दुसऱ्याचा भ्याडपणा काढणारा हा इंग्रज शेवटीं भेकडांतला भेकड ठरला. यावलीची आठवण तो जन्मभर विसरणार नाही.

अस्तु. सब्-इन्स्पेक्टरवर शिव्यांची लाखोली वाहून मेल्ड्रम साहेब माहुलीहून तसेच पुढे मोर्शीस गेले. तेव्हा वाघोलीपर्यंत त्रि. सरकारचें तारखातें जमीनदोस्त झालेलें त्यांना आढळून आलें. ज्या दिवशीं मेल्ड्रम यांची खाजगी रोजनिशी उपलब्ध होईल त्या दिवशीं त्यांच्या यावली प्रकरणांतील एकंदर भावनांचा फारच चांगला उलगडा होऊं शकेल! हा सर्व इतिहास या पुढील प्रकरणांतून द्यावयाचा असल्याने प्रस्तुत प्रकरणाला येथेच पूर्णविराम देऊं.

अटक झालेल्या पंजाबराव प्रभृति यावलीकर सत्याग्रहींना रातोरात अमरावतीच्या तुरुंगांत रवाना करण्यांत आलें.

प्रकरण १२ वें

धवलगिरीचा गोळीबार

मागील प्रकरणांत जिचा निर्देश केला ती बेनोडा येथील गोळीबाराची अद्भुत कथा आता आपणांस पहावयाची आहे. बेनोडा येथील संग्राम म्हणजे धवलगिरी नदीकाठचा संग्रामच होय.

मोर्शी तालुक्यांतील धवलगिरी नदीचें नांव १९४२ च्या आगस्ट क्रांतीच्या इतिहासांत संस्मरणीय राहील. बेनोडा हें गाव मोर्शी–वरुड मुख्य रस्त्यावर याच नदीवर वसलेलें आहे. सबध बेनोडा सर्कल १९३० च्या जंगल सत्याग्रहापासूनच कॉंग्रेसच्या निशाणाखालीं समरस झालेलें आहे.

ता. ८ ऑगस्ट १९४२ चा मुंबईचा ऑ. इं. कॉं. क. चा ठराव, ९ ता. स मुंबईस झालेली राष्ट्रीय नेत्यांची धरपकड व नंतर देशभर पसरलेला आंदोलनाचा कार्यक्रम यांच्या बातम्या व पत्रकें इत्यादि १२ ऑगस्टपर्यंत बेनोडा सर्कलमध्यें जाऊन पोंहोचलीं. लोणी, इत्तमगांव, पळसवाडा, बेलोरा, सावंगा इत्यादि गांवीं क्रांतीचें वारें वाहूं लागलें. जागोजागीं सभा होऊन 'चले जाव' ची कॉंग्रेसची घोषणा अंमलांत आणण्याचें ठरलें. सर्कलमधील कार्यकर्त्यांची १५ ऑगस्टला लोणी येथे एक सभा होऊन दुसरे दिवशीं बेनोडा येथील पोलीस ठाण्यावर ताबा स्थापन करण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यांत आला.

खुद्द बेनोडाहि स्वस्थ बसलेला नव्हता. सरकारी आक्रमणाच्या नियोजित योजनेप्रमाणे तेथील कार्यकर्ते श्री. बळीरामजी फरकाडे व श्री. यादवराव खांडपासोळे यांना अटक करण्याचा प्रयत्न तेथील पोलीस स्टेशन हौसचा अधिकारी सब्-इन्स्पेक्टर निंबाळकर याने १३ ऑगस्टलाच करून पाहिला, पण त्यांचेबरोबर १०० प्रतिष्ठित गांवकरी पोलिस ठाण्यावर गेल्यामुळे हा प्रयत्न विफळ झाला. त्याने सर्वांनाच घरीं जाण्यास सांगितलें.

ता० १४ आगस्टला सकाळीं गांधी चौकांतून १००० लोकांची प्रभात फेरी निघाली. दे. भ. बळीरामजी फरकाडे, यादवराव खांडपासोळे व शेषराव सुघोळकर यांचीं भाषणें झालीं. सभा आटोपल्यावर त्या तिघांना निंबाळकर सब-इन्स्पेक्टरने अटक केली. लोकांनी हरताळ पाडला. पोस्ट ऑफीस, फॉ. रेंजरचें ऑफिस व पाटील पटवारी यांचें कागदपत्र जाळण्यांत आले व टेफिग्राफच्या ताराहि तोडण्यांत आल्या. या प्रकाराबद्दल श्री. केशवराव बारमासे व गणपतराव चिंचामलातपुरे यांना अटक करून ठाण्यावर नेण्यांत आलें.

सायंकाळीं वरील पांच देशभक्तांना अमरावती जेलमध्यें पोंचविण्यासाठीं पोलिसने मोटार सज्ज केली. 'आम्ही स्वतंत्र आहोंत. आमच्या पुढाऱ्यांना अटक करण्याचा ब्रिटिश सरकारच्या या पोलिसांना काय अधिकार!'—सगळें गांव बोलूं लागलें. बोलतां बोलतां लोक पोलिस ठाण्याकडे जमा होऊं लागले. त्यांनी पोलिसची मोटार अडवली. पोलिस अधिकाऱ्यांनी शांतपणें आपल्या ठाण्यांत

परत जावें म्हणून सांगण्यांत आलें व पुढाऱ्यांची सुटका करण्यांत आली. ब्रि० सत्तेचा अधिकार आपणावर व पुढाऱ्यांवर चालू शकत नाहीं हें दोन वेळां आपल्या पुढाऱ्यांची पोलिसच्या हातून सुटका करून जनतेने सिद्ध करून दाखविलें. जनतेचा स्वातंत्र्याचा झेंडा उंच आकाशांत फडकूं लागला व स्वातंत्र्याच्या जयजयकाराने आकाश मंडळ दुमदुमूं लागलें. दोनदा पराभूत झालेला सब्-इन्स्पेक्टर जागच्या जागीं दांत, ओंठ खात बसला.

ता १५ ऑगस्टला पुनः अधिक मोठी प्रभातफेरी निघाली. आठवडे बाजारांत प्रचंड जाहीर सभा झाली. जनतेने मुक्त करून आणलेल्या पाचहि पुढाऱ्यांचीं भाषणें झालीं. क्रांतीच्या रंगांत जनता अधिकाधिक रंगूं लागली. या बातम्या अमरावतीस ब्रि० जिल्हाधिकाऱ्याकडे जाऊन पोहोचल्या. सायंकाळच्या सुमारास जिल्हाधिकारी मेल्ड्रम, डी. एस्. पी. प्रॅट व पोलिस दल बेनोड्यास येऊन ठेपले. आल्याबरोबर त्यांनी दोन वायबार केले. बाजारांतील एका म्हातारीला लाठीने झोडपण्याचा पराक्रम केला. डि. मॅ. च्या हत्यारबंद टोळीने पुनः मागील पांचहि पुढाऱ्यांना अटक केली. डि. मॅ. ने त्यांना क्रोधसंतप्त होऊन विचारलें–' तुम्हास अटक केल्यानंतर तुम्ही मोटारींतून उतरून कां गेलात?" त्यांना उत्तर मिळालें–" आम्ही स्वतंत्र आहोंत. जनतेने आम्हाला मोटारींतून उतरवून घेतलें. आमचा निर्णय आम्हीं घेतला. तुमचें काम तुम्ही करा " डि. मॅजिस्ट्रेट मेल्ड्रम याने गोळीबार न करण्याबद्दल सब्-इन्स्पेक्टर निंबाळकर याची खूप हजेरी घेतली. पुढाऱ्यांना अटक करून व पोलिस ठाण्यांत बंद करून मेल्ड्रम, प्रॅट, व त्यांचें दल परत उमरावतीस निघून गेलें.

सबंध बेनोडा सर्कल पेटलें आहे आणि कांही भयंकर घटना घडणार आहेत अशा वार्ता सर्वत्र पसरूं लागल्या. त्या कानावर आल्यामुळे १५-८-४२ लाच रात्रीं मोर्शीला तहसिलदार, सर्कल इन्स्पेक्टर व वरुडचा सब्-इन्स्पेक्टर ही मंडळी बेनोड्यास तेथील सब्-इन्स्पेक्टर निंबाळकर यांच्या मदतीसाठी आली. त्यांनी रातोरात गांवांत धरपकड सुरू केली. पोलिस ठाण्यांत आणून लोकांना बेदम मार देण्यांत आला, गिरफ्तार लोकांना बेनोड्याहून वरुडच्या

पोलीस ठाण्यांत पाठविण्यांत आलें. धरपकडीचें सत्र चालूच राहिलें. बेनोड्याचें आंदोलन आपण दाबून टाकलें अशी गुर्मी अधिकाऱ्यांना चढूं लागली.

परंतु पायाखाली काय जळत आहे याची त्यांना कल्पना नव्हती. बेनोडा सर्कलमधील कार्यकर्त्यांची १५ ता. च्या लोणीच्या सभेंत जी योजना ठरली तिचें पुढारीपण श्री. वामनराव बळीरामजी पाटील यांना देण्यांत आलें होतें. त्यांनी १६ तारखेला नागपंचमीच्या दिवशीं क्रांतिसेनेचा मोर्चा इत्तमगांवाहून बाहेर काढला. वाटेंत लोणी येथील कार्यकर्ते पाटील महादेवराव हे त्यांना मिळाले, लोणी येथील क्रांतिसेना इत्तमगांवच्या क्रांतिसेनेला मिळाली. तेथेच बेलोरा. पळसवाडा, सावंगा येथील क्रांतिसैनिकहि त्यांना येऊन मिळाले. लोणींत प्रचंड मिरवणूक निघाली. गोलबाजारांत सभा झाली. वीर वामनराव यांनी सर्व क्रांतिसेनेला सवाल टाकला—'छातीवर गोळया झेलण्याची ज्यांची तयारी असेल त्यांनीच आमच्याबरोबर यावे.' सर्व सभा चालू लागली. वाटेंत बेनोड्याच्या अलीकडे एक जंगल आहे. त्यांत वामनराव यांनी आपल्या सैनिकांना उभे केले. त्यांनी भाषण केलें व पुनः सवाल टाकला–'ज्याला मरणाची भीति वाटत असेल त्याने परत जावें.'–वामनराव पुढे चालू लागले. एकहि सैनिक परत फिरला नाही. बेनोड्याच्या मोटार स्टँडवर क्रांतिसेना येऊन पोहचली. क्रांतीच्या जयजयकारांनी बेनोड्याचें आकाश दुमदुमूं लागलें. जलालुद्दीन नांवाचा एक पोलीस कान्स्टेबल मोटार स्टँडवर उभा होता. त्याचा पोषाख काढून घेण्यांत आला. त्याला खादीचा पोषाख चढविण्यांत आला व जनतेचा स्वयंसेवक बनवून त्याला इत्तमगांवाला रवाना करण्यांत आलें.

क्रांतिसेना मोटारस्टँडपर्यंत येऊन पोहोचल्याचें कळतांच स. इ. निंबाळकर हा पंचहत्यारांनी सुसज्ज झाला. डि. मॅ. मेल्ड्रमने त्याची घेतलेली हजेरी त्याला बोचली होती. त्याने येत असलेल्या जमावाचा प्रतिकार करण्यासाठी पोलीसची एक तुकडी पुढे पाठविली व स्वतः पोलीस ठाण्याच्या समोर बंदूक व तरवार घेऊन उभा राहिला. क्रांतिसैनिक मोटारस्टँडवरून पोलीस ठाण्याकडे येऊं लागले. वाटेंत धवलागिरी नदीचा पूल लागला. आता समाज पुलावरून चालू लागला. अग्रभागीं असलेले पुढारी पुलाच्या दुसऱ्या टोकापर्यंत जाऊन पोहचले असतील नसतील तोंच पोलिसाने गोळीबार सुरू केला.

क्रांतिसेना चांगलीच कोंडींत पकडली गेली. पूल नदीपासून सुमारें २५ फूट उंच असल्याने पांगण्यासहि अवकाश नव्हता. गोळीबार सुरू होतांच महादेवराव वाघमारे व महादेवराव फंदाडे यांनी पहिल्या गोळ्या आपल्या छातीवर झेलल्या. दोघेहि वीर धराशायी झाले. पुनः गोळ्या आल्या. त्या उत्तमराव मानकर यांना हातावर व पुंडलिकराव वानखेडे यांस पायांवर लागून दोघेहि जखमी होऊन पडले.

चार वीर पडले तरी क्रांतिसेना पुढेच चाल करून जाऊं लागली. पुनः गोळ्या झाडण्यांत आल्या. महादेवराव बारमासे, विनायकराव यावले, पांडुरंगजी मालपे यांनी गोळ्यांचा मुकाबला केला. तिघेहि धारातीर्थी मरण पावले गोळीबार चालूच होता. लोक पुढेच सरकत होते. लोणीचे उदेभानजी बारी, गोपाळ देवघरे, मारोती लिखितकार, नत्थूजी मालपे, माणिक सखाराम आगरकर, बाजीराव चांभार, किसनजी नेरकर, पुंजाजी कुणबी, गंगाधर ब्राम्हण आणि इत्तमगांवचे श्रीराम पाटील, संतोष बोरकर, शंकर धोबी, बाबूराव कुलार, माणिक न्हावी मिळून आणखी १४ वीर जखमी होऊन पडले. पडतां पडतां त्यांनी लोकाना आदेश दिला.—'कर्तव्याला चुकूं नका.' 'माघार घेऊं नका.'

जखमी होऊन पडलेल्या लोकांना ताबडतोब उचलून नेण्यांत आले. त्यांना पाणी पाजण्यांत आलें व त्यांच्या जखमा बांधण्यांत आल्या. आतापर्यंत एकून २१ वीर पडले, तरी क्रांति सेना डगमगली नाही. ती वीर वामनराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पुढेपुढेच जात राहिली. जरी ती कोंडींत सांपडली होती व तिची अतिशय हानि झाली होती, तरी तिने धैर्य सोडलें नाही. तिची ती निर्भयवृत्ति पाहून पोलिस तुकडीची हिंमत खच्ची झाली. आता तिने माघार घेण्यास प्रारंभ केला. पोलिस माघार घेत होते. क्रांतिसेना पुढे सरकत होती. स. इ. निंबाळकर हें सर्व दृश्य पहात होता. आता त्याने आपल्या जवळच्या राखीव पोलीसांस मागे हटणाऱ्या पोलीस तुकडीच्या मदतीसाठी पाठविलें. पुनः पोलिस दलाने पवित्रा ठाणला.

क्रांतिसेना थबकली. वामनराव पाटील व महादेवराव पावडे अग्रभागीं होते. वामनराव हीच क्रांतिसेनेची स्फूर्तिदेवता होती. त्यांचे पुनः 'आगे बढो'चें

स्फुरण पाहून पोलिस दलाने पुनः गोळीबारास प्रारंभ केला. एक गोळी वामनरावच्या हातावर लागली. परंतु तरीहि त्यांचें पाऊल पुढेच. हें पाहून पुनः बंदुकी डागण्यांत आल्या. निशाण साधलें. वामनराव व महादेवराव पावडे गोळ्या लागून धराशायी झाले. सेनापति पडला हें पाहून लोकांनी कच खाल्ली. त्यांनी माघार घेतांना जखमी लोकांना उचलून नेलें. त्यांना पट्टया वगैरे बांधून खाटेवर घालून त्यांच्या त्यांच्या गांवीं रवाना करण्यांत आलें. वामनरावसाठी मेणा मागविण्यांत आला पण तो येण्यास विलंब लागला. इतक्यांत पोलिस अधिकाऱ्यांची आणखी एक तुकडी तेथे येऊन पोहोचली. त्यांनी वामनराव व पावडे यांना आपल्या ताब्यांत घेऊन बऱ्याच लोकांना अटक केली. दहा दिवसानंतर अमरावतीच्या इर्विन हॉस्पिटलमध्ये वामनराव पाटील यांचा देहान्त झाला. धवलगिरी नदीच्या तीरावर झालेल्या या संग्रामांत ५९ गोळ्या झाडण्यांत आल्या. त्यामुळे ५वीर शहीद झाले व २२ जखमी झाले.

१. **शहीद-वामनराव बळीरामजी पाटील, इत्तमगांव**—वय वर्षें २८, श्रीमंत व कुलीन घराण्यातला जन्म. लहानपणापासून धाडसी. वडील बंधु आनंदराव यांनी १९३० च्या जगल सत्याग्रहांत भाग घेतलेला. १९४० पासून वामनराव यांनी राष्ट्रकार्याची धुरा शिरावर घेतली. बेनोडा सर्कलमध्ये क्रांतीचा वणवा पेटविण्याचें श्रेय वामनराव यांनाच दिलें पाहिजे. इत्तमगाव, लोणी, बेलोरा, सावंगा इ० भागांत क्रांति घडवून आणून व प्रबळ क्रांति सेना बरोबर घेऊन त्यांनी बेनोडा पोलिस ठाण्यावर कशी चाल केली यांचें विवरण पूर्वी आलेंच आहे. त्यांच्याबरोबर त्याचे धाकटे बंधु श्रीराम पाटील हेहि क्रांतिसेनेंत होते, त्यांनाहि गोळी लागली व नंतर पोलिसांनी बंधु आनंदराव यांना अटक करून २ वर्षांची शिक्षा दिली. एकाच कुटुंबांतील या तीन बंधूंनीं क्रांति आंदोलनांत भाग घेतला. वामनराव यांचें शौर्य, त्याग, देशभक्ति व संघटनाकुशलता याची छाप बेनोडा सर्कलवर पडली आहे.

२. **शहीद-महादेवराव आत्मारामजी फंदाडे, इत्तमगांव**—वय वर्षें २०. शहीद वामनराव इत्तमगांवकर यांच्या नेतृत्वाखाली जी क्रांतिसेना बेनोड्याच्या पोलिस ठाण्यावर चाल करून गेली, तींत हा तरुण वीर अगदी

आघाडीवर होता. धवलगिरी नदीच्या पुलावर क्रांतिसेनेला कोंडींत धरून पोलिस दलाने जो गोळीबार केला त्यांतली पहिली गोळी आपल्या छातीवर झेलून राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी आपलें बलिदान करणारा पहिला वीर म्हणून यांचें स्मरण नित्य करावें लागेल

३. शहीद-महादेवराव जागोबा वाघमारे, इस्लमगांव—वय वर्षें २२. लहानपणापासून व्यायामाचा नाद. कुस्तींत चांगलें प्राविण्य मिळविलेलें. महादेवराव फंदाडे यांच्याबरोबरच धवलगिरीच्या संग्रामात हे आघाडीवर होते. पोलीसची दुसरी गोळी यांनी आपल्या वक्षःस्थलावर धारण केली.

४. शहीद-पंडुरंगजी लक्ष्मणजी मालपे, लाणी—वय वर्षें ३९. कुलीन घराण्यांत जन्म. दारिद्र्यांत दिवस काढले. १९२३ पासून राष्ट्रीय चळवळीशीं समरस झाले. धवलगिरीच्या संग्रामांत डोळ्यावर गोळी लागून हे पडले. पडतां पडतांहि 'देशाला स्वतंत्र करा' 'इंग्रजांनो चालते व्हा' हा एकच घोष ते करीत होते

५. शहीद-महादेवराव भगवानजी बारमासे, बेनोडा—वय वर्षें २३. गरीब घराण्यांतला जन्म. १९३०च्या चळवळीपासून राष्ट्रीय कार्याशीं समरस झाले. धवलगिरीच्या संग्रामांत गोळी लागून पडल्यावर 'वंदेमातरम्'चा जयघोष करीत यांनी प्राण सोडला.

६. शहीद-विनायकराव दौलतराव यावले, बेनोडा—वय वर्षें २६ लहानपणापासून कष्टमय पण स्वतंत्र जीवन घालविलें. धवलगिरीच्या संग्रामांत आपल्या बरोबरचे सोबती गोळ्या लागून पडत आहेत हें पाहून हे पुढे सरसावले आणि अखेरीस स्वतःहि गोळी खाऊन शहीद झाले; पण आपलें पाऊल त्यांनी मागे घेतलें नाही.

धवलगिरीच्या संग्रामांत गोळ्या खाऊन मातृभूमीच्या चरणीं ज्यांनी आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या अशा वरील सहा शहीदांशिवाय १९४२च्या

आंदोलनाच्या फलस्वरूप, ज्यांना आपलें जीवन समाप्त करावें लागलें अशा बेनोडा सर्कलमधील पुढील वीरांचें सादर स्मरण करणें आवश्यक आहे.

७. **शहीद-रामराव लक्ष्मण गोहाड, इत्तमगांव**—शिल्पकलेंत व रांगोळ्याचे सांचे बनविण्यांत निष्णात. उत्तम कुस्तीगीर व मल्ल म्हणून प्रसिद्ध. १९३० च्या जंगलसत्याग्रहांत ६ महिन्यांची स. म. शिक्षा भोगलेली. १६ ऑगस्ट १९४२ च्या धवलगिरीच्या संग्रामांत कामगिरी बजावून भूमिगत झाले. त्यानंतर अटक होऊन ३ वर्षें स. म. शिक्षा झाली. तुरुंगांत क्षयाचा विकार जडून तो विकोपास गेल्यावर त्यांची सुटका करण्यांत आली; परंतु थोड्याच दिवसांत त्यांचा अंत झाला.

८. **शहीद-शेषराव नत्थुजी मुधोळकर, इत्तमगांव**-वय वर्षें ४५. शेषराव यांनी १९३० सालीं तळेगांव येथे जंगल सत्याग्रहांत भाग घेतला होता. त्याबद्दल ६ महिने स. म. व १५० रु. दंड इतकी शिक्षा भोगली होती. १९४२ ऑगस्ट आंदोलनांत ता. १४ ला अटक. जनतेकडून सुटका. पुनः १६ तारखेस अटक. एक वर्ष कारावास. तुरुंगांत कॅन्सरचा विकार जडला. तुरुंगांतून सुटल्यावर अतिशय आर्थिक विपन्नता भोगली. रोग वाढतच गेला. ता. १-४-१९४४ला देहान्त झाला. लोकप्रिय देशभक्त म्हणून लौकिक मिळविलेला.

९. **शहीद-केशवराव ताथोडे, बेलोरा**—वय वर्षें २८. सुखवस्तु पाटील घराण्यांतील जन्म. एम्. ए., एल्‌-एल्. बी. पर्यंत शिक्षण. खेळ व व्यायाम यांत प्रवीण. १९३६ पासून 'श्रीराम सेवा संघ' स्थापन करून त्याच्या द्वारां देशकार्यास प्रारंभ. रात्रीची शाळा, राष्ट्रीय सेवादल इ. चळवळी केल्या. १९४२ ऑगस्ट आंदोलनांत, बेनोडा सर्कलमधील जागृतींत व संघटनेंत प्रमुख सर्कलमधील १५ खेडीं स्वतंत्र करण्याची मोहीम. १६ आगस्ट नंतर भूमिगत. तशा स्थितींत प्रकृति बिघडली. उपचारासाठी मुंबईस गेले. तेथे विषमज्वर होऊन ता. १६-४-१९४३ रोजीं मृत्यु झाला. बेनोडा सर्कसला भूषणभूत होणारा तरुण विद्वान अशा रीतीने भूमिगत स्थितींत कालवश झाला. सारी जनता हळहळली.

१०. शहीद-तुकारामजी रोडबा माणिकपुरे, इत्तमगांव—वामनराव पाटील यांचे हे उजवे हात. १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहांत एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा भोगली. १९४२ च्या ऑगस्ट आंदोलनांत अकरा गांवांतून ब्रि. सत्ता नेस्तनाबूद केली. १६ ऑगस्टच्या धवलगिरी नदीच्या संग्रामांत पुढाकार व त्यानंतर अटक व ५ वर्षें सक्त मजुरीची शिक्षा. तुरुंगांत विषमज्वराचा आजार झाला व तो विकोपास गेल्यावर अमरावतीच्या इर्विन हॉस्पिटलमध्ये पाठविण्यांत आलें व तेथेच त्यांचा देहान्त झाला. हे तुरुंगांत असतांना यांचे दोन्ही धाकटे बंधू घरीं स्वर्गस्थ झाले.

बेनोडा सर्कलमधील या सर्व शहीदांच्या बलिदानामुळे इत्तमगांव, लोणी, बेलोरा, बेनोडा हीं गावें राष्ट्रीय तीर्थस्थानें बनलीं आहेत. 'चले जाव' घोषणेची अंमलबजावणी १२-१५ गांवांत करून बेनोड्याचें पोलिसठाणें काबीज करण्यासाठी धवलगिरीच्या पुलावर त्यांनी जो संग्राम केला तो विदर्भाच्या इतिहासांत चिरस्मरणीय राहील.

या सर्व शहीदांना प्रणाम ! !

प्रकरण १३ वें

यावलीवरील पहिलें आक्रमण
व
त्याचा यशस्वी प्रतिकार

माहुलीचें पोलिसठाणें सर करण्याचा विजय प्राप्त करून, पंजाबराव यांच्या आदेशाप्रमाणें परत फिरलेली जनता गांवीं पोहचली; तेव्हा ती आनंदांत गर्क होती. सकाळपासून तिने विजयामागून विजय मिळविले होते. शेवटचा विजय तर फारच महत्वाचा व बहादुरीने कमाविलेला असा होता. स्वतःच्या धैर्याचा व कर्तृत्वाचा एवढा महान आत्मप्रत्यय तिने प्रथमच अनुभवला होता. राष्ट्रीय गर्जना करीत व विजयानंदाने नाचत बागडत सर्व लोक आपापल्या घरीं पोहचले. गांवांत पोहचल्यावर पुन्हा यावलीकरांनी गांधीचौकांत सभा घेतली. पंजाबरावचा आदेश सर्वांना निवेदन केला आणि कसलींहि संकटें ओढवलीं तरी यावलीचें नांव जाऊं द्यावयाचें नाही, असा निश्चय केला. सभेंत पंजाबरावचे बंधु विश्वासराव, मोतीरामजी लंगडे, व गोविंदराव अंबडकार यांचीं भाषणें झालीं.

ता. १६ ऑगस्टला नागपंचमी होती. सर्पासारख्या विषारी प्राण्याशींहि प्रेमाने कसें वागावें, ही या सणाच्या रूपाने भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. त्यांतून वऱ्हाडच्या ग्रामीणांत तर या सणाचें विशेषच महत्त्व आहे. नागपंचमीच्या दिवशीं कोणी शेतांत जाणार नाही. कोणी जमीन नांगरणार नाही. सर्व काम धंदे बंद राहतील. नागोबाच्या पुजेसाठी सुटी मानली जाईल. वारुळावारुळांतून नागोबाची पूजा होईल. दूध फुटाण्यांचा नैवेद्य दाखविला जाईल. बाया नागोबाचीं गाणीं म्हणतील खेड्यांतील जनतेचा हा सणाचा, आनंदाचा दिवस ! जन्मभर वैर बाळगणारा साप !-हवें तेव्हा उलटून विष वमन करणारा

साप !–परंतु आर्यांनी–हिंदूंनी यालाहि आपल्या प्रेमाने जिंकलें. साप व मनुष्य यांचें युद्ध त्या दिवशीं संपलें. सर्पराज मानवाच्या घरीं भोजनास आला. मानवानेहि त्याच्या वृत्तींत झालेल्या या पालटाची पूजा केली. त्याला जेवूं घातलें, आणि हें दाखवून दिलें की, जो आपली विषारी मनोवृत्ति विसरेल, त्याची आम्हीहि पूजा करूं, त्याला आम्हीं देव्हाऱ्यांत बसवूं.

परंतु जो चमत्कार मानवाला प्रत्यक्ष सर्पाच्या बाबतींत करतां आला, तो त्याला मानवयोनींतच जे दोन पायांचे साप आहेत, जे विषारी मनोवृत्तीचे प्राणी आहेत, त्यांच्या बाबतींत त्याला करतां आला नाही. आदल्या दिवशींच्या विजयानंदांत दुसऱ्या दिवशींच्या नागपंचमीच्या सणाची भर पडली. दुधांत साखर पडली. सोन्याला सुगंध सुटला. दरसालपेक्षा कितीतरी आनंदाने यावलोकर ग्रामस्थ नागपंचमीचा उत्सव साजरा करूं लागले. खरोखरीच्या विषारी सर्पांशींहि ते प्रेमाने वागूं लागले.

पण गांवांत कांहीं साप होते. त्यांनी दंश धरला होता. आदल्या दिवशींच्या लढाईत ते पराभूत झाले होते. तो दंश त्यांच्या मनांतून नागपंचमीच्या दिवशींहि निवेना. त्यांनी आपसांत षडयंत्र रचलें. यावलीच्या या क्रांतिकारकांचा सूड उगवला पाहिजे. त्यांच्या विजयामृतांत विष कालवलें पाहिजे. त्यांच्या सणाचा व उत्सवाचा विचका केला पाहिजे.

क्रांतीच्या प्रतिकारार्थ प्रतिक्रांति अशीच उभी राहते. बहुजनसमाजाच्या हितांत प्रतिक्रांतिकारांचें हित नसतें. एकाचा विजय तो दुसऱ्याचा पराजय. एकाचें सुख तें दुसऱ्याचें दुःख. एकाचा लाभ ती दुसऱ्याची हानि. यावलीचा पाटील हा याच जातींतला प्रतिक्रांतिकारक ठरला. १९२१ च्या रंगराव बालाजी पाटलाचा उदात्त आदर्श तो विसरला. १९३० च्या यशवंत आकाजीचेंच मीठ तो खात होता. त्याच स्वजनद्रोही परंपरेस तो जागत होता. गांवचें दूध तो रोज पीत होता. पण त्याच्या पोटांत गेल्यावर त्या दुधाचें पर्यवसान विष निर्माण करण्यांतच होत होतें. आनंद आकाजीला आदल्या दिवसाच्या प्रकारापासून चैन पडली नाही. सूड–बदला–कसा घेतां येईल या चिंतेने त्याला घेरलें होतें. त्याने मन्सुबा

केला. माहोलीस जाऊन तेथील रेव्हेन्यू इन्स्पेक्टर व पोलीस यांना त्याने आपल्या मसलतींत घेतलें. नागपंचमीच्या दिवशींच विषारी सर्पांची टोळी तयार झाली. तिने यावलीवर अकस्मात् हल्ला करण्याचें ठरविलें. यावलीचें धन लुटून आपापल्या घरकुलांत भरून ठेवण्याचा त्यांनी बेत केला.

इकडे गांवकरीहि तितकेसे बेसावध नव्हते. नागपंचमीचा सण साजरा करीत असतांनाहि द्विपाद सर्पांची भयंकरता ते विसरले नव्हते. १९३० चा अनुभव त्यांच्या हृत्पटलावर पक्का कोरलेला होता; म्हणून उत्सव साजरा करीत असतांनाहि पुढील सावधानीच्या गोष्टी ते चर्चीत होते. पंजाबराव यांनी माहोलीहून परत फिरवितांना त्यांना दिलेला इषारा अगदी ताजा होता व त्यालाच अनुलक्षून ते सावधगिरीच्या योजना आखीत होते.

पहिली योजना अशी ठरली की, सदा सर्वकाळ सावधान राहिलें पाहिजे. प्रतिपक्षाच्या हालचालीवर-विशेषतः गांवच्या सर्पांवर नजर ठेवली पाहिजे. दुसरी योजना अशी की, संकट आलेंच तर त्याची सूचना सर्वांना मिळाली पाहिजे. तिसरी योजना अशी कीं, लहान मोठ्या कोणत्याहि प्रसंगीं सर्वांनी एकमेकांच्या साह्यास एका हाकेने धावून गेलें पाहिजे. गांवाचें ऐक्य व परस्परपोषकता हीं कायम राखलीं पाहिजेत. चौथी योजना अशी की अन्यायाचा प्रतिकार हा झालाच पाहिजे. १९३० प्रमाणें या बाबतींत ढील म्हणून दिसतां उपयोगाची नाही. पांचवी योजना अशी की, प्रतिपक्षाच्या प्रक्षोभाला आपण सहसा कारण द्यावयाचें नाहीं व आपला संयम सोडावयाचा नाही. अशा रीतीने त्या अडाणी समजल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांना, आत्मसन्मानाचें रक्षण करण्याच्या वृत्तीमुळे प्रस्तुत परिस्थितींत कसें वागावें याचें ज्ञान प्राप्त होऊं लागलें. हें ज्ञान शिकविण्यास त्यांच्याजवळ कोणी गेला नव्हता. परिस्थितीची जाणीव आणि आत्मसन्मानाच्या संरक्षणाची तळमळ यांतूनच त्यांना हें ज्ञान प्राप्त होत होतें. अड्डयाअड्डयावर याच गोष्टी बोलल्या जात होत्या. भावी संकटाची त्यांनी जागृति ठेवली होती. त्यांला तोंड देण्याचा निर्धार ते करीत होते. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या वर्तणुकीचे नियम ते बसवीत होते. नकळत मानसशास्त्राचा खल ते करीत होते. समुदाय मनाची निर्मिति होत होती. समुदायांतच कल्याण आहे, समुदा-

यांतच पराक्रम आहे, समुदायांतच व्यक्तीचाही अभ्युदय आहे, हा सिद्धांत ते स्वयंप्रेरणेने बसवीत होते.

माहोलीस आदल्या दिवशीं आलेला जिल्हाधिकारी, आपण लौकरच मोठें दल बरोबर घेऊन येऊं, असें बोलून गेला होता. यावलीच्या बंडखोरीच्या अनेकवार्ता आजपर्यंत त्याच्या कानावर गेलेल्या होत्याच. तशांत त्याने माहोली पोलीस ठाण्याचा विध्वंस समक्ष पाहिला होता. हें सगळें सरकारी नुकसान, या लोकांच्याकडून वसूल केलें पाहिजे. यांच्यावर सामुदायिक दंड बसविला पाहिजे, असें तो ओझरतें बोलून गेला होता. परंतु तशा तऱ्हेचा लेखी हुकूम त्याने कधीच दिलेला नव्हता, हें पुढें कोर्टांतहि सिद्ध झालें आहे. हा सामुदायिक दंड बसविण्याचा अधिकार त्यालांहि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कायद्याने मिळवावा लागतो. तसा अधिकार यावलीच्या बाबतींत आपणास असल्याचेंहि त्याला न्यायालयांत सिद्ध करतां आलें नाही.

पण अशा तऱ्हेचें कांहीतरी जें आदल्या दिवशीं बोलला, त्याचा फायदा घेऊन गांवांत लूट माजविण्यांचे कारस्थान पाटलाने शिजविलें. रेव्हेन्यू इन्स्पेक्टर, पटवारी व पोलीस यांना त्यांत सामील करून घेण्यांत आलें. यावेळीं केलेली यावलीची लूट सहज पचून जाईल व साहेबहि त्यामुळे खुष होईल, असा त्यांचा तर्क होता व तो खोटाहि नव्हता. पुढील घटनांनी हे दाखवून दिलें आहे की, १९४२ च्या आंदोलनाचा प्रतिकार करीत असतांना ब्रि० नोकरशाहीने आपल्या हस्तकांना, पोलीसांना व खेड्यापाड्यांतील अधिकाऱ्यांना, उठावणी करणाऱ्या जनतेची मनसुराद लूट करण्याची जणूं कायमुभाच दिली होती.

आनद पाटील व त्यांचे साथीदार यांनी आपल्या मनाशीं सहजच असा कयास बांधला की,—"जिल्हासाहेब मोठें दल घेऊन यावलीच्या बंदोबस्त करण्यास येणार आहेत.—" असें सांगितलें की, यावलीकर लोक आतां भितील. कारण त्यांचा पुढारी पंजाबराव हा पकडला गेला असल्यामुळे त्यांना हिंमत देण्यास अथवा बंडखोरी शिकविण्यास तितका जोमदार असा कोणी माणूस यावलींत उरला नाही. म्हणून पुढारीविहीन झालेले लोक या धमकीस बळी

पडतील आणि आपण मागूं तितके पैसे आपणांस देतील. हे पैसे साहेबाने सामुदायिक दंड बसविला आहे, असें सांगूनच मागावयाचे. रेव्हेन्यू इन्स्पेक्टर व पोलीस बरोबर असले म्हणजे ही गोष्टहि लोकांना सहजच खरी वाटेल. असा हिशेब मनाशीं बांधून ही सर्व मंडळी दुपारीं एक वाजण्याच्या सुमारास यावलीस येऊन पोहचली. गांवकरी लोक टेहेळणीवर होतेच. पण त्यांच्या येण्याचा उद्देश एकाएकीं ध्यानांत येण्यासारखा नव्हता. कित्येकांची तर अशीच समजूत झाली की, कोणाला तरी गिरफदार करण्याकरतां हे लोक आले असावेत. सत्याग्रही या नात्याने गिरफदारीस त्यांचा विरोधहि नव्हता, अथवा तिचा प्रतिकार करण्याचेंहि त्यांनी योजिलें नव्हतें.

त्यांनी योजिलें होतें तें इतकेंच की, १९३० प्रमाणें कोणालाहि स्त्रिया व मुलें यांच्यावर हात घालूं द्यावयाचा नाही. कोणाच्याहि मालमत्तेची गैरकायदा लूट होऊं द्यावयाची नाही. अन्यायाचा असा कोणताहि हुकुम मानावयाचा नाही, आणि सर्वोपरी विशेष म्हणजे आपल्या स्वातंत्र्यध्वजाचा अपमान कोणास करूं द्यावयाचा नाही. त्यामुळे पाटील, पटवारी, रेव्हेन्यू इन्स्पेक्टर व पोलीस हे जेव्हा दुपारी एक वाजतां गांवांत येऊन पोहचले तेव्हां त्यांच्यावर फक्त नजर ठेवली. गांवांत आल्यावर पाटलाने आपल्या साहाय्याकरितां गावांतील कामगार महारहि बोलावून घेतले आणि पहिल्या प्रथम काय करावयाचें हें त्याने ठरविलें. पंजाबराव हाच या सर्व प्रकाराच्या मुळाशीं असल्यामुळे त्याच्याच घरीं पहिल्यांदा वचक बसविला पाहिजे, म्हणजे मग आपोआप सर्व गांवकरी ताळ्यावर येतील. अशा समजुतीने त्याने आपला मोर्चा दलबलासहित पंजाबरावच्या घराकडे वळविला.

पंजाबरावच्या घरच्या बैठकींत आधीच थोडेफार लोक जमा झालेले होते. त्यांचे बंधू विश्वासराव घरींच होते हे विश्वासराव देखील आदल्या दिवशींच्या सत्याग्रहांत सामील होण्यास आतुर होते. माहुलीच्या पोलीस ठाण्यावर ताबा होइपर्यंत तेहि जनसमुदायाबरोबर गेले होते. पंजाबराव यांना अटक झाल्यानंतर दहा सत्याग्रहींच्या मध्यें आपणासहि अटक व्हावी अशा आग्रह धरून ते बसले होते. स्वातंत्र्याच्या लढ्यांत भाग घेण्यासाठी या दोन बंधूंत झालेली ही अहमहमिका मोठी स्फूर्तिदायक होती. अखेरीस वडील बंधूच्या विनंतीस मान देऊन ते घरीं परत आले होते.

" सामुदायिक दंडापैकी तुमच्यावर दोन हजार रुपये बसविण्यांत आले आहेत. ताबडतोब रक्कम देऊन टाका "—रेव्हेन्यू इन्स्पेक्टरच्या मुखाने पाटील आनंद आकाजी बोलत होता. विश्वासराव यांनी दंड देण्याचें साफ नाकारलें. अधिकारी धमक्या देऊं लागले—'जबरीने दंड वसूल करावा लागेल.'—असें म्हणूं लागले. विश्वासराव यांनी पुन्हा तितक्याच निकरानें त्यांना बजावलें.—'एक पैहि मिळणार नाही. मुकाट्याने येथून निघून जा.' हें तेजस्वी उत्तर ऐकून पाटील प्रभृति चमकले. त्यांच्या हेंहि लक्षांत आलें की, विश्वासरावच्या बैठकींत व तिच्या आसपास असलेल्या लोकांच्या मानाने आपण अल्पसंख्य आहोंत आणि जोरजबरदस्तीचा उपयोग केल्यास तो आपणावरच शेकण्याचा संभव आहे. त्यापेक्षा येथून काढतां पाय घेण्यांतच गनीमत आहे. असा विचार करून ब्रि॰ सरकारची ही हस्तक मंडळी, स्वजनद्रोहासाठी व स्वदेश बांधवांची लूट करण्यासाठी दुसरें शहाजोग घर पाहूं लागली.

विश्वासरावच्या घरीं घडलेल्या वरील प्रकाराची बातमी ताबडतोब गांवांत पसरली. पुन्हा निरनिराळ्या अड्ड्यांवर निरनिराळ्या चर्चा सुरू झाल्या. लोक निश्चयाने बोलूं लागले की, गांवाची लूट होऊं द्यावयाची नाही. रुपया, पैसा तर हातीं लागूं द्यावयाचा नाहीच, पण अन्नधान्यास देखील हात लावूं द्यावयाचा नाही. प्रश्न असा उपस्थित झाला की, चांदी, सोनें व नाणें हीं कशींहि दडवून ठेवतां येतील. पण अन्नधान्यांचें अपहरण टाळणें केवळ युक्तिप्रयोगाने कठीण जाणार आहे. पुढे येणारे दिवस अधिकच कठीण आहेत. तेव्हा गांवच्या धान्याचा कणहि बाहेर जाऊं देणें म्हणजे गांवकरी लोकांची उपासमार करणेंच होय. जें कांही धान्य गांवांत असेल, त्याच्या बळावर अर्धी–सगळी सर्वजण मिळून खाऊं शकूं व जगूं शकूं. पण अन्नधान्यच जर लुटलें गेलें, तर सगळ्या गांवावर उपासमारीचा प्रसंग गुजरल्याशिवाय राहणार नाही, असा पोक्त विचार करून, अन्नधान्याच्या बाबतींत प्रसंगच पडला तर सर्व तऱ्हेचा प्रतिकार करण्यास गांवाने सज्ज असलें पाहिजे आणि लहानांतल्या लहान व गरीबांतल्या गरीब माणसाच्या देखील साहाय्यार्थ सर्वांनी धावून गेलें पाहिजे. एका ठिकाणीं सभा भरवून कांही ही चर्चा चाललेली नव्हती. निरनिराळ्या अड्ड्यावर विचारविनिमय होत होता. परंतु समान संकटाच्या भावनेने सर्व ठिकाणीं समान विचारधाराच प्रवाहित

होत होती आणि अंतःकरणाच्या या समसंवेदनेनें सर्व गांव, लहानथोर, गरीब श्रीमंत ऐक्याच्या एका प्रबळ सूत्रांत ओवला जात होता.

पाटील व त्यांचे साथीदार पंजाबरावच्या घरून त्यांचे बंधू विश्वासराव यांच्या-कडून अशा तऱ्हेने थप्पड खाऊन निघाले. यानंतर त्यांनी रामकिसन मारवाडी यास गाठून सांगितलें की, गांवावर २००० रु० सामुदायिक दंड बसला असून, त्यापैकीं ५०० रु० तुम्ही भरा. मारवाड्याने चातुर्याने उत्तर दिलें की, बाकीचा दंड तुम्ही वसूल करा. माझी रक्कम त्यानंतर घेऊन जा. तेथून पुढे त्यांनी राम-राव मराठा यांच्या दुकानाकडे मोर्चा वळविला. रामराव मराठे यावलींतील एक मालदार गृहस्थ आहेत. त्यांचें दुकान प्रसिद्ध आहे. केवळ दुकानदारी करून स्वार्थ साधीतच जन्म कंठण्याऐवजीं थोडीफार देशसेवाहि आपल्या हातून घडावी म्हणून १९३० च्या सत्याग्रहांत त्यांचे मोठे बंधू गुलाबराव यांनी भाग घेतला होता. अशा रीतीने काँग्रेसच्या तेजस्वी शिकवणुकीचे धडे त्यांनी गिरविले होते, आणि तीच शिकवण त्यांच्याकडून त्यांच्या कुटुंबियांना मिळत होती. पाटील आदि मंडळी दुकानासमोर आली. त्यावेळीं दुकानांत गुलाबरावचा धाकटा भाऊ बसलेला होता. त्याच्याजवळ त्यांनी २०० रुपयांची मागणी केली. गांवकरी लोक पाळतीवर होतेच आणि पंजाबराव यांच्या घरीं झालेल्या प्रकारामुळे त्यांच्या हेंहि लक्षांत येऊन चुकलें होतें की, रेव्हेन्यू इन्स्पेक्टर अथवा पाटील-पटवारी यांच्या जवळ कोणत्याहि तऱ्हेचा दंड वसुलीचा हुकूम नाही. ते केवळ लुटीच्या उद्देशानेच पैसे मागीत आहेत. अशा तऱ्हेच्या अन्या-याने मागितला जाणारा पैसा मुळीच द्यावयाचा नाही असाहि निश्चय त्यांनी केला होता. पाटील व त्यांचे साथीदार, गुलाबरावचे घरासमोर उभे राहतांच सावधगिरी ठेवून व आपलें अस्तित्व फारसें भासूं न देतां लोक जवळच दबून बसले.

'दंडाची रक्कम तावडतोब भरा. नाहीतर मोठे साहेब आल्यानंतर ती वाढण्याचा संभव आहे.' रेव्हेन्यू इन्स्पेक्टरच्या मुखाने पुनरपि पाटील आनंद आकाजी हाच बोलत होता. गुलाबरावच्या भावानेसुद्धा रक्कम देण्याचें नाकारलें.—'जबरदस्तीने दुकान फोडावें लागेल. दुकानांतील माल उचलून न्यावा

लागेल. विनाकारण सगळ्या दुकानची खराबी होईल ' पुन्हा बजावण्यांत आलें. इतक्या अवधींत ग्रामस्थ लोक बऱ्याच प्रमाणांत आसपास येऊन ठेपले होते आणि कांही झालें तरी दुकानाची लूट होऊं द्यावयाची नाही, असा निश्चय ते करीत होते. मधून मधून दुकानाकडे डोकावून पाहातहि होते.

बऱ्या बोलाने व सहजासहजीं लूट मिळत नाही, हें पाहून पाटलाने बरोबरीच्या पोलिसांना जबरदस्तीने दुकानांत घुसून माल काढण्याचा इशारा केला आणि तेहि दुकानांत घुसण्याचा प्रयत्न करूं लागले. तोंच दुकानदाराचा कृष्णा पवार नामक भाचा एकदम समोर आला आणि त्याने दोन्ही हातांनी दुकानांत प्रवेश करण्याच्या दाराचा रस्ता अडवून धरला. पोलीस आंत जाण्यासाठी जोर करीत होते आणि तो आपली सर्व शक्ति एकवटून त्यांचा प्रतिरोध करीत होता. अखेरीस अशा तऱ्हेची दांडगाई करून, पोलीस आंत घुसले न घुसले तोंच मधमाशांचे एक पोळें उठलें आणि त्या माशा रेव्हेन्यू इन्स्पेक्टर, पोलीस आदि जबरीने दुकानांत घुसूं पाहणाऱ्या जुलमी लोकांना चावून चावून जर्जर करूं लागल्या. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी एकटा मनुष्य जरी उभा झाला तरी परमेश्वर त्यांच्या मदतीला धावून येतो. जे स्वतःला साह्य करतात, त्यांना परमेश्वरहि साह्य करूं लागतो. पाटील व पोलीस यांच्या बळासमोर आपलें एकट्याचें बळ किती चालेल, ते पुष्कळ, आपण एकटे, ते अधिकारी, आपण खेडूत, असा दुर्बल विचार दुकानावरील त्या कृष्णा तरुणाच्या मनासहि शिवला नाही. गांवांतील लोक मदत करतील वा न करतील, आपण आपलीच मदत केली पाहिजे, ह्या अन्याय्य लुटीचा, या जोर जुलमाचा प्रतिकार हा केलाच पाहिजे, असें ठरवून दृढ निश्चयाने तो प्रतिकारास उभा टाकल्याबरोबर, मधमाशांच्या रूपाने परमेश्वर त्याच्या मदतीस धावून आलाच. मधमाशाच्या त्या भयंकर हल्ल्याने आंत घुसलेले ते पोलीस इ० घाबरून गेले व पळतच दुकानाच्या बाहेर पडले.

दुकानांत जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न पाटलाचे हस्तक करीत आहेत, व दुकानदाराचा एकाकी असलेला भाचा मोठ्या धैर्याने प्रतिकारास उभा झाला आहे, ही बातमी लगेच गांवांत पसरली. क्षणार्धांत लोकांचे थवेच्या थवे त्या ठिकाणीं जमा होऊं लागले. त्यांचा पक्का निर्धार झाला होता की, दुकानांतील

मालाचा सुतळीचा सडा देखील बदमाशांच्या व लुटारूंच्या हातीं लागूं द्यावयाचा नाही. मधमाशांच्या हल्ल्याने भयभीत होऊन पोलीस व रेव्हेन्यू इन्स्पेक्टर दुकानांतून बाहेर पडले, तेव्हा त्यांना काय दिसलें ? तीनशे नरसिंह त्या ठिकाणीं उभे आहेत. नदींत उतरावें तर मगर खातो, काठावर जावें तर वाघ उभा. थोड्याच वेळापूर्वी दुकानदाराच्या एकट्या लहान भावावर आपल्या बलाचा गुमान दाखविणाऱ्या त्या शूर सरकारी अधिकाऱ्यांची गाळणच उडाली. त्यांनी तेथूनहि पोबारा केला. दुसरी थप्पड बसली.

लोक पुन्हा स्वयंप्रेरणेने पाळत ठेवूं लागले. कमींत कमी पांच सात हजार रुपयांची लूट तरी आपणास गांवांतून मिळवितां येईल, जोरदंडेली करून गांवांतल्या बायाबापड्यांना सतावतां येईल, विरोध करूं पाहणारे चार दोन इसम निघाले तर त्यांना पिटून काढतां येईल, अशा रीतीने आदल्या दिवशींच्या प्रकाराचा सूड घेतां येईल, लोकांची मस्ती जिरवितां येईल, वरिष्ठ अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करतां येईल आणि आपलाहि तळिराम गार करतां येईल, अशीं शेख महंमदी मनोराज्यें करीत ते गांवांत घुसले होते. परंतु एक लाथ बसल्याबरोबर मातीच्या भांड्यांचा तो हाराचा हाराच गडगडला, भांडीं फुटलीं आणि मनोराज्यें त्या दिवशीं तरी धुळीस मिळाली. फजित-पराजित होऊन ते परत फिरले होते. फजितीचें शल्य त्यांच्या मनांत डाचूं लागलें होतें. तशांत लोक पुनः आपली पाळत ठेवत आहेत हें पाहून त्यांचा तोल आणखीच सुटूं लागला. लोक पाळतीवर असल्यामुळे आपसांत बोलून नवे मन्सूबे ठरवितां येईनात. घरीं जावें तर तेथेहि लोक आल्याशिवाय राहाणार नाहीत. म्हणून पाटलाने गांवाबाहेर जाण्याचा रस्ता धरला. रे० इन्स्पेक्टर, पटवारी, पोलीसहि त्याच दिशेने वळले.

तरी लोक पाळत सोडीत नाहीत, हें पाहून काल शेळ्यामेंढ्या बनलेल्या या सरकारी बगलबच्च्यांचीं माथीं अधिकच भडकूं लागलीं. पाटील-पटवारी यांनी दुकानासमोर असतांनाच आपल्या जिभेची खाज जिरवून घेतली होती. आता पोलीस शिपायांच्या जिभेला कंड सुटला. त्यांनी लोकांना अर्वाच्य भाषेंत अचकट विचकट शिव्या देण्यास प्रारंभ केला. दुर्बळ व नादान माणूस फजित झाला म्हणजे त्याच्या जवळ आपला मनस्ताप शमविण्यासाठी दुसऱ्यांना

शिव्या देणें एवढें एकच साधन उरलेलें असतें. मनुष्य शिवीगाळ करण्यावर आला म्हणजे निश्चित समजावें की त्याची हिंमत नष्ट झाली आहे, कायरतेने त्याच्या-वर अंमल बसविला आहे. पोलीसांची शिवीगाळ ऐकून, लोकांनी सभ्यपणे त्यांना शिवीगाळ न करण्यास बजावलें. पोलीसांचा पारा आणखीच गरम झाला. ते अधिकच शिवीगाळ करूं लागले. एका शिपायाने उलटून लोकांच्या अंगा-वर धावण्याचा प्रयत्न केला. पण लोकांनी पुनः हिंदुस्थानींत खणकावलें— 'खबरदार कदम उठायगा तो! शरम नही मालूम होती गालीगलोच करनेको? आदमी होकर हैवानियतसे पेश आते हो! जबान बंद करो!' भ्याड पोलीस स्तब्ध झाला. लोकांच्या स्वाभिमानापुढे व आत्मसन्मान-रक्षणाच्या निर्धारा-पुढे त्यांनी नांगी टाकली. मुकाट्याने पाटील व पोलीसदल आपला मार्ग आक्रमूं लागले. आजचें प्रकरण एवढ्यावरच निभावलें. जनतेंतून तेजस्वितेचे स्फुल्लिंगामागून स्फुल्लिंग उडाले. सरकारी अधिकाऱ्यांच्या नीच कारवायांचा हा हल्ला लोकांनी धैर्याने परतवून लावला. काल आक्रमक लढाई ते जिंकले. आज संरक्षणात्मक लढाईंतहि ते विजयी झाले. आपल्या ऐक्यांतील सामर्थ्याचा प्रत्यय व आत्मविश्वास यांच्या अभिमानाने त्यांची मान पुनः ताठ झाली. यावलीचा अभिमान यथार्थ ठरला. आज पुन्हा क्रांतिप्रवण जनतेने शत्रूला लज्जित-फजित, पराजित करून परत फिरविलें; पण या विजयाने देखील जनतेने आपला सावधपणा सोडला नाही. याहून उग्रतर संकटाची जाणीव त्यांनी जागृत ठेवली. याहून तेजस्वी प्रतिकाराच्या तयारीस ते लागले. हा सर्व इतिहास आपणास पुढील कांडांत पहावयाचा आहे.

अत्याचारी दल अशा रीतीने परत गेल्यावर श्री. अजाबराव यांच्या घरीं पुनः सभा घेऊन लोकांनी पुढील संभाव्य आक्रमणाच्या तरतुदीच्या योजना आखल्या.

हत्याकांड

यावलीचा स्वातंत्र संग्राम

हत्याकांड

प्रकरण १ लें

बचावाची पूर्वतयारी

ऐन नागपंचमीच्या सणाच्या दिवशीं ज्या द्विपाद सर्पांनी यावलीला दंश करण्याचा प्रयत्न केला होता, ते महा भयंकर विषारी प्राणी आहेत; ते डूग धरून बसतील आणि पुन्हा संधि साधून यावलीवर चालून येतील याची ग्रामस्थांना पूर्ण जाणीव होती. म्हणून रेव्हिन्यू इन्स्पेक्टर, पाटील, पटवारी, पोलीस इत्यादिकांची —यावलीची बेकायदा लुट करण्यासाठी आलेल्या लुटारूंची—एक टोळी परत गेल्यावर गांवकरी लोकांनी पुनः पुढील आपत्तीस तोंड देण्याची तयारी चालविली. दिवस आंदोलनाचे आहेत, सहजासहजीं गमावण्याकरतां हिंदुस्थानचें साम्राज्य ब्रिटिशांनी कमाविलेलं नाहीं. ज्या मानाने आंदोलन प्रबळ, त्याच मानाने प्रबळ असा दडपशाहीचा वरवंटा फिरविल्याशिवाय ब्रि. सरकार राहणार नाही. किंबहुना, ब्रि. राजमुकुटांतील या कोहिनूर हिऱ्याचें संरक्षण करण्यासाठी ब्रि. राजसत्तेचे हिंदुस्थानांतील अधिकारी आपल्या जिवाचें रान केल्याशिवाय राहणार नाहीत. प्रसंग पडला, तर रक्ताचे पाटहि वाहविण्यास ते कमी करणार नाहीत. दयामाया, नीतिमत्ता, माणुसकी व सभ्याचार इ. ज्या सद्गुणांचा एरवीं ते उदोउदो करीत असतात, त्यांना वेळ आली म्हणजे ब्रि. लोक निमिषमात्रांत कसें धाब्यावर बसवितात आणि क्रूर राक्षसीवृत्तीचें व सैतानी लीलांचें कसें प्रदर्शन करतात ही गोष्ट १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या वेळीं हिंदुस्थानी लोकांच्या ठसठशीतपणें प्रत्ययास आली होती. आधुनिक काळांतहि जालियनवाला बागेच्या निघृण अत्याचारानें हीच गोष्ट पुन्हा दाखवून दिली. त्यानंतर पुन्हा दहाच वर्षांनी गढवाल दिनाच्या दिवशीं साऱ्या हिंदुस्थानभर ज्या हजारों मिरवणुकी निघाल्या त्यांतील स्त्रियांना व मुलांना देखील त्यांनी केवढ्या निर्दयपणें वागविलें ही गोष्ट प्रसिद्धच आहे. आठ आठ, दहा दहा तास

उन्हांतान्हांत अन्नपाण्यावाचून मिरवणुकींत बसलेल्या मुलांना व महिलांना खाण्यासाठी लोकांनी जे पदार्थ आणले ते धुळींत मिळवून देण्यास आणि पिण्यासाठी जें पाणी आणलें त्यांत शेण कालविण्यास ज्यांनी कमी केलें नाही, त्या ब्रि० नोकरशाहीच्या व तिच्या हस्तकांच्या ठिकाणीं माणुसकीचा लवलेश देखील शिल्लक आहे असें जमेला धरण्यांत कांहीच अर्थ नव्हता. सर्वस्व गमावण्याची वेळ आली असतां आपल्याकडून अत्याचारांची ते पराकाष्ठा करतील हें स्वाभाविक होतें.

१५ तारखेच्या सत्याग्रहानंतर आपल्यावर अत्याचारांची परंपरा कोसळणार ही यावलीकरांची आशंका रास्त होती यांत शंका नाही; पण अत्याचारांची परंपरा कोसळणार असें वाटून त्यांनी परिस्थितीस पाठ दाखविण्याचा भेडकपणा मुळींच दाखवला नाही. गेल्या बारा वर्षांत राष्ट्रीयतेची जी संजीवनी बुटी त्यानी भक्षिली होती तिच्यामुळे त्यांच्या ठिकाणीं दृढ प्रतिकारसामर्थ्य निर्माण झालें होतें. लहानमोठे व गरीबश्रीमंत असा भेदभाव विसरून समान संकटाच्या तयारीस ते लागले होते. गांवावर येणारीं संकटें हीं जर गरीबश्रीमंत स्पृश्यास्पृश्य, हिंदुमुसलमान असा भेदभाव मानीत नाहीत, तर त्या संकटांच परिहार अथवा प्रतिकार करण्याच्या कामांत ग्रामस्थांनी तरी असा भेदभाव कां मानावा ? गावांत प्लेग येतो, महामारी येते, तीं कोठे असा भेदभाव करतात ? हा श्रीमंत, हा अस्पृश्य हा मुसलमान हा भेद जसा सांसर्गिक रोगांच्याजवळ असत नाही, तसाच तो अत्याचारास प्रवृत्त झालेल्या ब्रि० शासकांच्याजवळ देखील असत नाही. म्हणून प्लेग व महामारी प्रमाणेच, ब्रि० अत्याचारांच्यावेळीं सर्वांनी भेदभाव विसरून, विषमतेला फाटा देऊन संकटाला तोंड देण्यासाठी सज्ज होणें जरूर असतें. या दृष्टीने यावलींतील ग्रामीणांनी केलेल्या पूर्व तयारीचें, घेतलेल्या सावधगिरीचें व प्रकट केलेल्या पराक्रमाचें कोणीहि स्वातंत्र्यवादी माणूस कौतुकच करील. हाच सर्व इतिहास आपणास आता प्रस्तुत ' हत्याकांडां ' त पहावयाचा आहे.

लुटारू सर्पांची टोळी विफलमनोरथ होऊन परत गेल्यानंतर, १६ तारखेला कोणीहि सूचना न देतां अथवा दवंडी पिटविली गेली नसतांना ग्रामस्थ लोक स्वयंप्रेरणेने गांधी चौकांत संमीलित झाले, बोलतां बोलतां गांधी चौकाला सभेचें स्वरूप प्राप्त झालें. या सभेंत नानातऱ्हेचे विचार प्रदर्शित करण्यांत

आले. विशेष म्हणजे पुढील आक्रमणापासून बचावाची तयारी कशी करावी याचाच खल झाला. दोन चार पोलीस व दोन चार कामदार महार पाठवून यावलीचे लोक दबत नाहीत. रेव्हिन्यू इन्स्पेक्टर अथवा पाटील यांच्यासारख्या हलक्यासलक्या अधिकाऱ्यांना ते दाद देत नाहीत, म्हणून बंदूकधारी पोलिसांची मोठ्या संख्येची टोळी गांवावर पाठविली जाण्याचा संभव आहे. याहि टोळीचा प्रतिकार केला, तर लष्कर येईल. गांवचा गांव उध्वस्त करण्यास–नव्हे जमीनदोस्त करण्यास देखील, तें कमी करावयाचें नाहीं. या गोष्टींची कल्पना १९३० च्या अनुभवावरून त्यांना येऊन चुकली होती. शिवाय वर्तमान पत्रांतून रोज नव्या व अधिक भीषण बातम्या येत होत्या. १५ व १६ तारखांना यावलीस अथवा माहोलीस जरी प्रत्यक्ष गोळीबारासारखी परिस्थिति तर खासच निर्माण झाली होती. तशांत सोळा तारखेस मोर्शी तालुक्यांत बेनोडा मुक्कामीं गोळीबार झाल्याची बातमी आली. त्यांत शूर कॉंग्रेस भक्त वामनराव व त्यांचे सहा साथीदार यांच्या आहुत्या पडल्या, तेव्हा वातावरण अतिशय गरम आहे, परिस्थिति फारच तंग आहे. दडपशाहीचा नंगा नाच चालू आहे, हें जाणून आपणांस आपला मार्ग काढला पाहिजे, हा चर्चेचा सारांश होता.

परिस्थितीच्या वाढत्या भीषणतेने राखीव हितसंबंधाच्या लोकांचा धीर प्रथम खचत असतो. तेच पळवाटीचे मार्ग शोधण्याचा प्रथम प्रयत्न करूं लागतात. शरणागतीची भाषा प्रथम त्यांच्या अभद्र मुखांतून बाहेर पडते. जो नियम सगळीकडे लागू आहे त्याला यावली तरी कशी अपवाद राहील ! यावलीचेहि कांही राखीव हितसंबंधी अशीच कार्याची भाषा बोलूं लागले. गांवांतील सापांची पूजा करा. त्यांना लाचलुचपत द्या. सामुदायिक दंड भरून टाका म्हणजे गांवावरील संकट टळेल. असाहि बदसूर मध्येच निघूं लागला. पण वीर पंजाबरावच्या तालमींत तयार झालेले तरुण इतक्या कच्च्या दिलाचे नव्हते. वेळेवर दगा द्यावा म्हणून त्यांनी इतक्या दिवसांचें सामर्थ्यप्रसाधन केलेलें नव्हतें. आखाड्यांत रग्गे खाऊन खाऊन त्यांनीं आपलीं शरीरें व मनें पोलादाचीं बनविलीं होतीं. सामुदायिक प्रार्थनेंतून ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल त्यांच्या ठिकाणीं निर्माण झालेला विश्वास इतका लेचापेचा नव्हता. त्यांनी हमी दिली कीं, आम्ही गावाचें संरक्षण करूं; आमच्या जिवांत जीव असेपर्यंत गांवांतील

गवताची काडी देखील आम्ही हलवूं देणार नाही. आमच्याजवळ पिस्तुलें नाहीत, बंदुकी नाहीत, ही गोष्ट खरी असली तरी, आमच्याजवळ निर्धार आहे, काँग्रेसचें नैतिक सामर्थ्य आहे. म. गांधीचें आत्मबल आमच्या पाठीशीं उभें आहे. अहिंसा हें शस्त्र आमच्या हातीं आहे. साधेल तोंपर्यंत आम्ही अहिंसा बळानेच लढूं; पण जेव्हा हें साध्य होत नाही असें दिसून येईल तेव्हा, पुन्हा गांधीजींच्याच आदेशाप्रमाणें भ्याडासारखें पळून न जातां, ज्या ज्या साधनाचा अवलंब करणें शक्य होईल त्या त्या साधनांचा अवलंब करून आम्ही लढूं; पण पाठ फिरविणार नाही. मुलांना व स्त्रियांना शत्रूचा उपसर्ग होऊं देणार नाही. गांवाच्या मालमत्तेला दरवडेखोरांचा हात लागूं देणार नाही. आमच्यांपैकी एकेक तरुण बळी पडेल. अखेरचा तरुण लढत राहील; पण पाठ फिरविणार नाही.

तरुणांचा हा जोष, आत्मविश्वास, प्रतिकारार्थ आत्मबलिदानाची तयारी आणि शौर्ययुक्त स्फुरण पाहून सामान्य जनतेलाहि धीर आला. तिला त्यांच्या करारीपणाचें कौतुक वाटलें. त्यांच्या पराक्रमांत, प्रतिकारांत, धाडसांत व आत्मबलिदानांत सामील होण्याची भाषा तीहि बोलूं लागली. राखीव हितसंबंधवाले जागच्या जागींच खजील झाले. गांवगंगेच्या प्रवाहांत एकरूप होणें त्यांनाहि भाग पडलें. पुन्हा एकवार सर्व गांव—गरीबश्रीमत, हिंदु–मुसलमान—एक दिलाने प्रतिकारासाठी कंबर बांधून सज्ज झालें.

संकटसमय प्राप्त झाला असतां ग्रामीण जनांच्या मनावर उठणारे हे तरंग मोठे मजेदार असतात. कालचा निश्चय आज उरत नाही अथवा अधिक दृढ होतो. समुदायमनाचें शास्त्रच अजून विकसित व्हावयाचें आहे. एवढी गोष्ट खरी की, समुदायमनाच्या ठिकाणीं अपार असें सुप्त सामर्थ्य वसत आहे. व्यक्तिशः भेकड भासणारा मनुष्यहि समुदायांत दिगंत पराक्रम करून जातो. एरव्हीं कृपण दिसणारा मनुष्यहि समुदायमनाच्या प्रबळ आवेगांत आपल्या सर्व संपत्तीचें दान करून टाकतो. एरव्ही, काटा बोचला तरी वेदनेने विव्हळ होणारा मनुष्यसुद्धा समुदायमनाच्या आवर्तांत सांपडला म्हणजे रक्ताचे पाट वहात असलेले पहात असूनहि विचलित होत नाही. समुदायमनाचें हें अफाट सामर्थ्य

ओळखून तें राष्ट्राच्या कामीं लवणारा एकच महापुरुष आधुनिक भारतांत निर्माण झाला. तो म्हणजे महात्मागांधी होय. त्यानेच निःशस्त्र, निराश व निद्रिस्त झालेल्या भारतीय जनतेच्या समुदायमनाला जागृत करून तिच्या ठिकाणीं, महाबलाढ्य अशा ब्रिटिश साम्राज्यविरुद्ध झुंज देण्याचें सामर्थ्य निर्माण केलें. याच समुदायमनाच्या सामर्थ्यांचा एक तेजस्वी असा आविष्कार आपणास यावलीच्या, प्रस्तुतच्या स्वातंत्र्य—संग्रामाच्या इतिहासांत उत्कटत्वाने पाहण्यास मिळतो.

प्रतिकार करण्याचा निर्धार झाला. गांवाची एक मूठ बांधली गेली. एकाचें दुःख तें सर्वांचें दुःख अशी समसंवेदना जागृत झाली बोट कापलें तरी सर्व शरीरास वेदना होत नाहीत काय? अशा एकशारीरिक सहानुभूतीने सर्व यावली एक झाली. ऐक्याचा स्फूर्तिदायक देखावा दिसतांच सर्वांना अवर्णनीय आनंद झाला. युद्धाच्या गंभीरतेने पुढील व्यूह रचण्यांत आले, योजना ठरविण्यांत आल्या, कामगिऱ्या वाटून देण्यांत आल्या. सर्वांत प्रथम ही गोष्ट ठरली की, उद्या कोणीहि शेतावर कामास जावयाचें नाही, सर्वांनी गांवांतच राहावयाचें. दररोजची कमाई हातावर करणाऱ्या मजुरांनी जर कामावर जावयाचें नाही, तर पोट कसें भरावयाचें? लगेच आकडे पडले. अशा तऱ्हेने दररोज मजुरीवर जाऊन हातावर कमाई करणाऱ्या कुटुंबाच्या घरीं दाळ, ज्वारी नेऊन देण्याची व्यवस्था ठरविण्यांत आली. दुसरी गोष्ट ठरली ती ही की, शत्रूच्या हालचालींचा पत्ता लावला पाहिजे. बित्तंबातमी समजली पाहिजे. लगेच हेरगिरी करण्यासाठी माणसें पुढे आलीं. त्यांना घोडीं पुरविण्यांत आलीं. या अश्वरोही स्वारांनी माहुली तें यावलीची रपेट दिवसभर मारीत रहावे. यावलीस येणारे सर्व रस्ते टेहळीत रहावें असें ठरलें. शत्रु धोकेबाज आहे. तो कोणीकडून हल्ला करील याचा नेम नाही. म्हणून चौफेर टेहळणी आवश्यक ठरली. कोठे कांही खुट्ट वाजलें, तरी गांवच्या युद्ध-कचेरींत बातमी येऊन पोहचेल अशी व्यवस्था करण्यांत आली. शत्रूचा सुगावा लागतांच ताबडतोब गांवांत सर्वांना इषारा देण्यासाठी विशेष वाद्यांची व्यवस्था करण्यांत आली.

शंख, बिगुल, घंट्या, टिन, डबडें जें जें कांही वाजविण्यासारखें असेल तें तें वाजवीत रहावयाचें, १५ मिनिटेंपर्यंत हा घोष असाच चालू ठेवावयाचा

आणि तो ऐकतांच, जर कोणी कांही विशेष कामासाठी शेतीभातीवर गेलाच असेल, तर त्याने ताबडतोब गांवांत येऊन पोहचावें आणि गांवकऱ्यांनी मिळणाऱ्या सूचनेप्रमाणें वागावें असें ठरलें.

संयम, शांतता व शिस्त यांची आवश्यकता पुन्हा प्रतिपादण्यांत आली. शक्यतोंवर आपणाहून प्रक्षोभास कारण द्यावयाचें नाहीं. अहिंसेचें व्रत शक्यतोंवर सोडावयाचें नाहीं. पण भ्याडपणा दाखवावयाचा नाही, म्हणून, निरुपायास्तव शारीरिक प्रतिकारच करण्यांचा प्रसंग आला, तर बंदुकीस उत्तर देण्यासाठी तोड म्हणून गोफणी व गोटे यांची योजना करण्यात आली. गोट्यांचे ढीग कोठे लावावयाचे, कोणत्या मोर्च्यांवरून लढणें अधिक सोयीचें होईल हें ठरविण्यांत आलें. गोफणगोट्याशिवाय जवळच्या लढाईसाठी लाठ्या, कुऱ्हाडी व भाले यांचीहि योजना करण्यांत आली. वस्तुतः बंदुकीच्या जमान्यांत हीं शस्त्रें म्हणजे शस्त्रेंच नव्हत; परंतु भ्याडपणे पळून जाण्यापेक्षा प्रसंग पडला तर हीं शस्त्रें वापरून कां होईना; प्रतिकार हा केलांच पाहिजे, हें समजून सांगण्यांत आलें.

आणखी एक महत्त्वाची—अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे स्त्रियांच्या पावित्र्याचें—संरक्षण करण्याची होती. स्त्री ही जोंपर्यंत आत्मसंरक्षणक्षम होत नाही, तोपर्यंत पुरुषांकडून होणारें तिचें संरक्षण हें नेहमी अपुरेंच पडणार. पुरुष पकडले गेले, मारले गेले, पळून गेले, तर स्त्रियांनी आपल्या शीलावर, पावित्र्यावर, खुशाल दरवडा पडूं द्यावा काय? शत्रूच्या हातून विटंबना होऊं द्यावी काय? केवळ आत्मसंरक्षणाच्याच नव्हे, तर ग्रामरक्षणाच्या समान कार्यांतसुद्धां स्त्रियांना आपला वाटा कांहीच उचलतां येण्यासारखा नाही काय? आपल्या पुत्रांना, बंधूंना व पतींना जेवूं घालून ताजेतवाने ठेवण्याचें काम तर त्या करतीलच-आपल्या मुलाबाळांचें संगोपन तर त्या करतीलच. पति, पुत्र, भ्राते रणांगणांवर गेल्यावर घर तर त्या सांभाळतीलच; पण प्रबळ शत्रु, त्यांनाहि मारून घरावरच चालून आला व लूट करूं लागला तर? तरीहि स्त्रियांनी अन्नपूर्णेचेंच काम करीत रहावयाचें काय? नाहीं! स्त्री ही अन्नपूर्णा तर आहेच पण ती दुर्गाहि आहे. रणचंडीहि आहे. षोडशावधि भुजांत खड्ग

धरून ती प्रहार करूं शकते. 'त्व हि दुर्गा दशप्रहरणधारिणी' हें 'वन्दे-मातरम्' गीतांतील उद्गार व्यर्थच आहेत काय?

यावलींतील महिलांची १६ आगस्टलाच एक स्वतंत्र सभा भरली होती. गांवावर येणाऱ्या संकटांची चर्चा त्यांनीहि केली होती. गांवाच्या इभ्रतीच्या रक्षणाचा विचार त्याहि करूं लागल्या होत्या. अन्नपूर्णेचें कर्तव्य बजावीत असतांना, रणचंडीचें स्वरूप आपणास कसें धारण करतां येईल याचा विचार त्याहि करूं लागल्या होत्या. समस्त यावलीकर महिलांनी निश्चय केला की, प्रतिकार हा केलाच पाहिजे. मरण हें कांही झालें तरी ओढवणारच. पण प्रतिकारशून्य मरण ओढविण्यापेक्षा, आपलें शील, पावित्र्य व सन्मान यांन कलंक लागूं देण्यापेक्षा प्रतिकार करीत करीतच, सौदामिनीची चमक दाखवीत दाखवीत, दुर्गेचे खड्ग फिरवीत फिरवीत मरण आलेलें पत्करलें. यावलीचें स्त्रीत्व-जागृत झालें. त्यानें उग्र स्वरूप धारण केलें. तें शस्त्र शोधूं लागलें. तें त्याला चुलीजवळच सांपडलें.

आत्मसंरक्षणासाठीं तैलास्त्र वापरण्यांचा त्यांनी निर्णय केला. कढत—उकडतें तेल नित्य तयार ठेवण्याचें ठरलें. उकळतें तेल हें एक भयंकर—अस्त्र आहे. घरांत शिरूं पाहणाऱ्या शत्रूला दाराबाहेरच रोखून धरण्यासाठी त्यासारखें घरोघर उपलब्ध असणारें व प्रभावी असें दुसरें साधन नाही. तिखटमिठाच्या पुड्या बांधून ठेवण्यांत आल्या. तेलाच्या कढया चुलीवर चढविण्यांत आल्या. प्रतिकार-युद्धांत भाग घेण्यासाठी यावलीचा समस्त महिला वर्ग तयार झाला.

हीं सर्व शस्त्रें तयार करण्यांत आलीं, तर लढाई अहिंसक कशी? असा प्रश्न विचारण्यांत येईल. पण लाठी, भाला, तरवार, कुऱ्हाड, गोफणगोटा, तिखट मिठाच्या पुड्या, कढतें तेल हीं शस्त्रेंच नव्हत. ब्रि० सरकारच्या कायद्यानें शस्त्र संज्ञेचा अर्थ केला आहे. आगस्ट युद्धाच्या वेळीं ब्रि० साम्राज्याचे पंतप्रधान असलेले मि. वुइन्स्टन चर्चिल यांनी पूर्वी एके काळीं जालियनवाला बागेंतील गोळीबाराचा निषेध करण्यासाठी पार्लमेंटच्या सभागृहांत केलेल्या

भाषणांत शस्त्र या संज्ञेची मोठी स्पष्ट व्याख्या केली आहे. सशस्त्र समाज कोणास म्हणावें ? गोळीबार केव्हा करावा ? याचे कायदे त्यांनी सांगितले. त्यांत त्यांनी स्पष्टपणें हें सांगितलें की ज्या समाजाच्या हातीं बारुदीच्या साह्याने उडणारें शस्त्र नाही, तो समाज निःशस्त्र समजला पाहिजे. दुसरा कायदा त्यांनी असा सांगितला की, समाज आपण होऊन सरकारी अधिकाऱ्यांच्या जिवासच जोपर्यंत धोका उत्पन्न करीत नाही, तोपर्यंत त्याच्यावर गोळीबार करण्यांत येऊं नये. यावलीच्या जनतेनें प्रतिकाराची तयारी चालविली होती, आक्रमणाची नव्हे. यावलीच्या क्रांतिसेनेने १५ तारखेलाच आक्रमण केलें होतें व तें सफलहि करून दाखविले होतें. पण १६ तारखेपासून ती बचावाची लढाई लढूं लागली होती.—

संयम व शिस्त राखून प्रक्षोभाला कारण द्यावयाचें नाही, असें तिने ठरविलें होतें; त्याचें पालन ती करीत होती. आपल्या बचावाच्या युद्धासाठी तिने जीं उपकरणें गोळा केलीं होतीं त्यांत बारुदीच्या साह्याने उडणारें एकहि उपकरण नव्हतें. त्यामुळे कायदेशीररीत्या तें शस्त्र या संज्ञेस पात्र होत नव्हतें; खुद्द चर्चिल यांच्या व्याख्येप्रमाणेंच पात्र होऊं शकत नव्हतें. नैतिक दृष्ट्याच विचार केला, तर आत्मसंरक्षणासाठी आततायी माणसाचा वध करण्याचाहि अधिकार नीतिशास्त्राने, धर्मशास्त्राने, कायदेशास्त्राने व गांधीजींच्या अहिंसा शास्त्रानेहि दिलेला आहे. म्हणूनच यावलीची ही बचावाची तयारी काँग्रेसची नीति व गांधीजींची अहिंसा यांच्या मर्यादांचें उल्लंघन करीत नव्हती, असेंच मानावें लागेल.

वरीलप्रमाणे योजना ठरल्या. मानसिक तयारी पूर्ण झाली. पण त्या सर्व योजना व्यवहारांत कोणी आणावयाच्या ? प्रत्येक योजनेबरहुकूम कामें बरोबर चाललीं आहेत की नाहीं, हें कोणी पाहावयाचें ? प्रतिकार सेनेचें संचालन कोणी करावयाचें ? सारांश, या प्रतिकारयुद्धाचा सेनापति कोण ?

असल्या युद्धांत सेनापति नेमले जात नसतात. ते निवडूनहि येत नसतात. परिस्थितीच्या घोड्यावर स्वार होण्याची ज्यांच्या अंगांत धमक असेल

तो स्वकर्तृत्वानेंच सेनापति बनत असतो. स्वातंत्र्ययुद्धाचे सेनापति स्वयंभू असतात. असल्या स्वायंभुव सैनापत्याचे गुण ज्याच्या अंगीं असतात तो नेमणुकी अथवा निवडणुकी यांची वाट पाहात बसत नाही. मला सेनापतिपदाचा अभिषेक झाला आहे किंवा नाही याची पर्वा तो करीत नाही. आणीबाणीचा प्रसंग त्याला नेहमीच आघाडीवर पाहात असतो. बाकीची सेना हुकुमाबिनाच त्याच्यामागे चालू लागते. त्याचा हुकूम हाच सेनापतीचा हुकूम आहे असें समजून लोक त्याचीच आज्ञा शिरोधार्य मानीत असतात. 'विक्रमार्जित सत्त्वस्य स्वयमेव मृगेंद्रता !'

या आणीबाणीच्या प्रसंगीं यावलींतहि असाच एक स्वयंभू सेनापति निर्माण झाला आणि तोहि मुसलमान जमातींमधून. कॉंग्रेसच्या चळवळींत मुसलमान सेनापति ? होय. यावलीचा, तारीख १८ च्या प्रतिकार-युद्धाची तयारी करणारा सेनापति मुसलमान होता. आणि एकटा सेनापतीच काय, पण त्या युद्धांत यावलींतील कैक मुसलमान-तरुण व वृद्ध-सामील झाले. हिंदुमुसलमान ऐक्याचा अपूर्व आदर्श यावलीनें घालून दिला. वस्तुतः शहरी राजकारणांत दिसणारा व वर्तमानपत्रीय स्तंभांत झळकणारा हिंदुमुसलमानांचा प्रश्न त्या तऱ्हेने खेड्यांत अस्तित्वांत असूंच शकत नाही हें यावलीने दाखवून दिलें. इस्लामचा सच्चा सेवक हा स्वातंत्र्यविरोधी असूंच शकत नाही; स्वातंत्र्ययुद्धाच्या आघाडीवरच त्याचें स्थान असावयास पाहिजे, हें यावलीने सिद्ध केलें. हिंदुबहुसंख्येच्या गांवचें सेनापतित्व सहज स्फूर्तीने मुसलमानकडेहि जाऊं शकतें, हें दृश्य यावलीला पाहाण्यास मिळालें.

अबदुल रहीम हा एक तडफदार तरुण आहे. पंजाबराव यांच्या विश्वासांतल्या गणापैकी तो एक आहे. त्यांचें आपल्या मातृभूमीवर निरतिशय प्रेम आहे. आता खरा संकटकाल प्राप्त झाला आहे, हें पाहून त्यांचें इतक्या दिवसांचें सुप्त कर्तृत्व जागृत झालें. कोणाच्याहि आदेशाची वाट न पाहतां, १६ तारखेच्या सभेंनंतर तो पुढे सरसावला. जणु काय सर्व जबाबदारी आपली एकट्याचीच आहे अशा अभिनिवेशाने तो प्रत्येक नियोजित योजनेच्या अमंलबजावणीची व्यवस्था करूं लागला. दाळ, ज्वारी वाटली गेली का ? गोफण गोटयांची तयारी

झाली कां, इतर शस्त्रास्त्रें बाहेर काढण्यांत आलीं कां, तरवार, भाले, कुऱ्हाडी यांच्या धारी पाजळल्या गेल्या कां, कोण टेहेळे कोणत्या रस्त्याने गेले, गांवचा सर्प कोठे आहे, त्याच्या काय काय हालचाली चालू आहेत, स्त्रियांचीं मनें कशीं आहेत, कोणाचा धीर तर खचत नाही ना, अशा एक का दोन, हजार गोष्टी अबदुल्लाभाई एकटाच पाहूं लागला. त्या छोट्याशा गांवांत मोठ्या विद्युत्चापल्याने त्याच्या हालचाली होऊं लागल्या. घरांघरांतून तो फिरून आला. ऐन युद्धाचा प्रसंग उद्भवलाच तर कोणी कोठे उभे राहावयाचें व प्रतिकार करावयाचा हेंहि त्यांनेच ठरवून दिलें. माणसामाणसांतील कमी अधिक पराक्रम ओळखून ज्याच्या त्याच्या सामर्थ्याला झेपतील अशीं कामें त्याने नेमून दिलीं. प्रसंगावधान, समयसूचकता, हजरजबाबीपणा, चापल्य, कामाचा उरक, पुढलें धोरण ठरविणें, आगाऊची व्यवस्था घालून देणें इ० गुणांचा असा कांही जोरदार आविष्कार अबदुल रहीमच्या अंगीं दिसून आला कीं कोणीहि तोंडांत बोटच घालावें! कमाल केली अबदुल्लाभाई! असे उद्गार कोणाच्याहि मुखातून बाहेर पडावेत!! अबदुल्ला भाई हा स्वयंभू कर्तृत्वाने त्या मोहिमेचा सेनापति बनला.!!!

अबदुल रहीम हा कोण्या शाळेंत लष्करी डावपेचांचें शिक्षण घेण्यास गेलेला नव्हता अथवा एखाद्या लढाईवरहि जाऊन आलेला नव्हता. स्वातंत्र्याची उत्कट तळमळ, ग्रामसन्मानाच्या रक्षणाची तीव्र इच्छा, काँग्रेसची अलोट भक्ति, या व यासारख्याच गुणांनी १६. तारखेच्या प्रकारानंतर त्याची, 'प्रतिकार युद्धाची तयारी' या एकाच विषयाशीं तन्मयता झाली होती. इतकी नितांत तन्मयता जेव्हा उत्पन्न होते, असा अखंड ध्यास जेव्हा लागतो, इच्छित ध्येयाच्या प्राप्तीसाठी अशी तहान-भूक जेव्हा हारपते, तेव्हाच ज्ञानरवीचा उदय होतो प्रबोधाचा प्रकाश आपोआप दिसूं लागतो. कर्तव्यांचें स्फुरण अनायसेंच होऊं लागतें. अस्तु. अबदुल भाईने अवघ्या कांही तासांच्या अवधींत प्रतिकारयुद्धाची तयारी परिपूर्ण केली. यावलीच्याच काय, पण समस्त भारतवर्षाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासांत ज्यांचीं नांवें सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखीं आहेत त्यांतच यावली प्रतिकारयुद्धाचा सेनापति अबदुल रहीम याचीहि गणना करावी लागेल?

बेकायदा दंडवसूलीच्या म्हणजे दरवडेखोरीच्या कामांत गांवकऱ्यांच्या

तेजस्वितेमुळे अयशस्वी झालेले आयत्या बिळांतले नागोबा हिरमुसले होऊन माहोलीस गेले. पोलीस ठाण्यावर पुनरपि त्यांची मसलत सुरू झाली. यावलीचा सूड घेतलाच पाहिजे. गांवाची लूट केलीच पाहिजे. आपला गेलेला वचक प्रतिष्ठापित केलाच पाहिजे. आपल्या मार्गातले काटे उपटलेच पाहिजेत.

पण स्वतः हें करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं उरलें नव्हतें. म्हणून आपल्याच ग्रामबांधवांना दडपून टाकण्यासाठी व नागविण्यासाठी परकी इसमाची–गोऱ्या–साहेबाची मदत मागण्याचें त्यांनी ठरविलें. त्या दिवशीं पुन्हा जिल्हाधिकारी मेल्ड्रम याची मोटार उमरावतीहून मोर्शीच्या वाटेने जातांना त्यांना दिसली. पाटील, रेव्हिन्यू इन्स्पेक्टर प्रभृतींनी मोटार उभी करविली. " यावलीस भयंकर बंडाची तयारी चालू आहे. यावलीचे लोक काय काय करतील याचा नियम नाही. आमचा अधिकार संपुष्टांत आला आहे. साहेबांनी स्वतः येऊन बंदोबस्त केला तरच कांही होण्यासारखें आहे. साहेबांनी देखील एकटें येण्यांत फार मोठा धोका आहे. पोलीस फोर्स बरोबर पाहिजे. बंदुकीचा फोर्स असल्याशिवाय मामला दबणार नाही. "–इत्यादि अर्थाचे फूत्कार साहेबाच्या कानांत सोडण्यांत आले. कालच्या प्रकारांनी साहेब मजकूर आधीच गरम झाले होते. इंग्रजी राज्यास घरघर लागल्याचा देखावा आधीच त्यांस दिसत होता. यावलीच्या कागाळ्या आधीच त्याच्या कानावर गेल्या होत्या. त्याच्या अंगाची आग भडकविण्यास विषारी सर्पाची फूक कामयाब झाली. साहेबाने आश्वासन दिलें. ' अच्छा हम कल आयेगा. भारी आदमी लेकर आयेगा ! '

यांचें मनोगत सिद्ध झालें. तावडतोब आपल्या हस्तकाकरवीं यावलींत घरोघर बातमी पसरवून देण्यांत आली की, उद्या डी. सी. मोठ्या जमावाने चाल करून येणार आहे. पुन्हा तेच पूर्वीचे डावपेंच सुरू झाले. लोकांनी घाबरून जावें आणि माझें नांव सांगू नका म्हणून पाटलास मुखलेप करावा. पण या खेपेस १९३० सारखे यावलीचे लोक कच्चे थोडेच होते ? उद्या डी. सी. येणार व बरोबर भारीं दस्ता आणणार ही एकच बातमी ज्याच्या त्याच्या तोंडीं पसरला होती. ती ऐकून प्रथम कांही वेळ गांवचें गांव थोडें हादरल्यासारखें झालें. पण अबदुल रहीम व यावलीकर तरुण मंडळींनी पुन्हा गांवांची हिंमत सावरून

धरली. पूर्वनियोजित प्रतिकारयुद्धाच्या योजनेवर ते अढळ राहिले. त्या संबंधीची तयारी ते पूर्ण करीतच राहिले.

१७ तारखेचा सबंध दिवस यावलीकरांनी विलक्षण प्रतीक्षेत घालविला. आनंद आकाजी व त्याचे साथीदार यानीहि माहोली पोलीस ठाण्यांतच मुक्काम ठोकला. एक तर गावांत येण्याची त्यांस लाज व भीतीहि वाटत असली पाहिजे. दुसरें, साहेबास घेऊन गेल्याशिवाय रहावयाचें नाही असा त्यांचा निर्धार होता. त्यामुळे दुसरे दिवशीं म्हणजे १७ ता० स जिल्हाधिकारी मेल्ड्रम व पोलीसदल येणारच आहे व त्यांच्याबरोबरच आपण यावलीस जाऊं असा विचार करून तो माहोलीस थांबला. त्याचीहि १७ तारीख ही अतिशय प्रतीक्षेंत गेली. यावलीकर ग्रामस्थ व आनंद आकाजी दोघेहि निरनिराळ्या कारणास्तव एकाच इसमाच्या आगमनाकडे डोळे लावून बसले.

गांवांत काय चाललें आहे याच्या बातम्या आनंद आकाजी माहोलीच्या पोलीस ठाण्यांत बसून काढत होता. त्याचे मूठभर हस्तक गांवांत फिरून बातम्या मिळवीत होते व त्या त्याला पुरवीत होते. इकडे गांवकऱ्यांचे टेहेळे आनंद आकाजीच्या हालचालीवर नजर ठेवीत होते. एक एक क्षण प्रतीक्षेंत जात होता. प्रत्येक यावलीकर पळापळाने काळ मोजीत होता. काळ भयंकर कंटाळवाणा जात होता. सर्वांचीं मनें अतिशय अस्वस्थ व विचलित झालेलीं दिसत होतीं. अशा या भयंकर प्रतीक्षेंत सबंध दिवस निघून गेला. पण शत्रु आला नाही. हल्ला झाला नाही. यावलीची खोड जिरली नाही. आनंद आकाजी हिरमुसला होऊन त्या रात्रींहि माहोली पोलीस ठाण्यांतच झोपला.

प्रकरण २ रें

यावलीवरील दुसरें आक्रमण

१७ आगस्टची रात्र ही सुद्धा अशीच चिंता, प्रतीक्षा, आशंका यांत गेली. लोकांनी प्रातःकालचे विधि उरकले. पुनः सर्व लोक गांधी चौकांत जमा झाले. गांधी चौक हेंच त्यांचें आश्रयस्थान. तिरंगी झेंडा हीच त्यांची स्फूर्तिदेवता. जैरामजी पाचघरे यांचे बैठकींत विचारविनिमय सुरू झाला. शत्रु आक्रमण करून येणार या आशकेने गांवचे व्यवहार किती दिवस बंद ठेवावयाचे ? शेतीचा उद्योग किती दिवस थांबवावयाचा ? शेतीवरच तर गांवचें पोषण अवलंबून आहे. शत्रूच्या आक्रमणाच्या भयाने शेती पडित कां पाडावयाची आहे ? रिकाम्या मजुरांना आयते किती दिवस पोसावयाचे ? शेती राबविलीच पाहिजे. पिकें निघालींच पाहिजेत. आक्रमणाच्या भयाने कास्तकारी बंद पाडण्यांत कांही अर्थ नाही. जवळ असलेलें धान्य कांही दिवस घरीं बसून खाता येईल. पण शेतीच जर पिकविली नाही तर पुढे खावयासच कांही मिळणार नाही. म्हणून सर्वांनीच निव्वळ गांवांत बसून राहण्यापेक्षा कांही तरी निराळी व्यवस्था अमलांत आणली पाहिजे.—वगैरे तऱ्हेने विचार सुरू झाला.

शेवटीं असें ठरलें कीं, आवश्यक त्या शेतकऱ्यांनी, कामगारांनी व बायांनी शेतीवर व कामावर जावें. कांही निवडक लोकांनी गांवांत रहावें. टेहळणीचें काम मात्र चालूच ठेवावें आणि संकटाची सूचना मिळतांच सर्वांनी ग्रामरक्षणासाठी आपापल्या शेतीवरून धांवत यावें. शेतांवर जाण्याची ज्यांची आवश्यकताच होती त्यांनाहि ही सूचना देण्यांत आली की, त्यांनी आपापल्या दिशेने यावलीकडे येणाऱ्या मार्गावर नजर ठेवावी आणि कोणी येतांना आढळल्याबरोबर शेतावरच्या लोकांना सूचना देऊन गांवांत बातमी देण्यासाठी ताबडतोब निघून यावें.

याप्रमाणें नवीन व्यवस्था ठरवून लोक आपआपल्या शेतीवर व कामावर निघून गेले. कांही गांवांत राहिले. त्यांनी पुन्हा अबदुल रहीमच्या नेतृत्वाखाली संरक्षणात्मक युद्धाची जुळवाजुळव केली. गांवांत जे थोडे लोक राहतील त्यांच्या बळावर देखील गांव कसा लढवितां येईल याची योजना आखली गेली. गोफणी, गोट्यांचे ढीग इत्यादींची पाहणी केली गेली. निरनिराळीं घरें व माड्या यांतून गोट्यांचे ढीग व्यवस्थित लावण्यांत आले. मारुती कलाल व बारक्या मराठा यांना घोड्यावरून माहुलीस पाठविण्यांस आले व तेथे नजर ठेवण्याची व संकट दिसतांच गांवांत बातमी पोचविण्याची कामगिरी त्याचेवर सोपविण्यांत आली.

यावलीच्या पुरुषाप्रमाणेंच महिलांनीहि शंकरराव त्रिकांडे याच्या घरीं आपली सभा घेतली. पुन्हा संरक्षणाच्या कार्यांत भाग घेण्याचा आपला निश्चय त्यांनी प्रकट केला. कढत तेल वापरण्याचीं साधनें तयार ठेवावींत असें पुन्हा ठरविण्यांत आलें. कांहीं झालें तरी, अत्याचार होऊं द्यावयाचे नाहीत. आपलें शील व पावित्र्य यांचें संरक्षण करावयांचेंच. आक्रमणकारी लोकांचा प्रतिकार केल्याशिवाय रहावयाचें नाही असा महिला वर्गाचा निर्धार दिसून आला.

याप्रमाणें ता. १८ ची सकाळही पार पडली. लोकांचीं जेवणींखाणीं उरकलीं, पण संकटाचा कृष्ण सर्प आपला फणा उगारून उभा होता. त्याची काळी सावली गांवावर पडलेली होती. प्रतिकाराच्या निश्चयाने लोक जरी दृढ झाले असले, तरी चिंता सुटली नव्हती. अस्वस्थता नाहीशी झाली नव्हती. मनोवृत्ती स्थिर होत नव्हत्या. अस्थिरतेचें दुसरें एक कारण असें होतें कीं, गांवचा सर्प गांवांत नव्हता. त्याने माहुली पोलीस ठाण्यांतच ठाण मांडलें होतें. त्यामुळे तो कृष्ण सर्पांची टोळी बरोबर घेऊन आल्याविना खात्रीने राहणार नाही असें लोकांना मनोमन वाटत होतें. आनंद आकाजीप्रभुति गांवचे मारेकरी साहेब येण्याची वाट पाहात होते. आदले दिवशीं त्याची मोठी निराशा झाली होती साहेब मुळी आलाच नाही तर ? अथवा आणखी कांही महत्वाचें काम निघालें तर ? आपला मनोरथ पुन्हा विफल होईल ? अशी चिंता त्यालाहि व्याकुळ करीत होती.

साहेब तरी काय रिकामा होता? त्याच्यामागे काळजीचे कमी का काटे पसरले होते? हिंदुस्थानच्या कोन्याकोपऱ्यांतून वणवा भडकत असल्याच्याच बातम्या येत होत्या. ब्रिटिश राज्य आज नष्ट होतें की उद्या, असें वाटण्याइतकी परिस्थिति गंभीर होती. तारा तुटत होत्या, पूल पडत होते, सरकारी इमारतींना आगी लागत होत्या, आगगाड्या उलथून पडत होत्या, गिरण्या, कारखाने व शाळा बंद पडल्या होत्या. मुल्की कचेऱ्यांतले सरकारी नोकर कामावर येईनासे झाले होते. बातम्यांचा पाऊस दररोज पडत होता. सबंध हिंदुस्थान पेटला आहे, हिमालयाच्या माथ्यावर बसून शंकराने जणुं काय आपला तृतीय नेत्रच उघडला आहे, असा भास होत होता. आम्ही गांधीला पकडलें तर हिंदुस्थानांत कुत्राहि भुंकला नाही, अशी घमेंड मारण्यास एक वेळ उद्युक्त झालेल्या साहेबांना या खेपेस हें दिसून आलें की, हा भुंकणारा कुत्राच नव्हे; तो भुंकत बिकत नाही. भुंकण्याचे दिवस गेले; आता हा एकदम पोटरी धरून तिचा कडकडीत चावा घेतो. इतका कडकडीत चावा घेतो की, प्राणच कासावीस व्हावेत. प्रतिकार, गोळीबार या दोनच गोष्टी सगळीकडून ऐकूं येत होत्या

आमचा उमरावती जिल्हाधिकारी ज्या प्रांतिक सरकारचा गुलाम होता त्याची खुद्द राजधानींतच हवेलंडी उडाली होती. नागपूरच्या नागरिकांनी, तरुणांनी, मुलाबाळांनी, पुढारी गिरफ्तार झाल्याचें ऐकल्याबरोबर एका झटक्यांत नागपूरवर आपला ताबा केला होता. क्रांतिकारकापासून नागपूर परत जिंकून घेण्यासाठी ब्रि. फौज बेफाम गोळीबार करीत होती. नागपूर शहर ७२ तासपर्यंत बंडखोरांच्याच ताब्यांत होतें अशी कबुली प्रत्यक्ष गव्हर्नराने पुढे दिलेली आहे. वस्तुस्थिति अशी आहे की, नागपूर शहर ११ आगस्टलाच क्रांतिकारकांनी जिकलें आणि सतत आठ दिवसपर्यंत तें लढविलें. नागपूर शहराचा एक सप्ताहाचा हा प्रतिकार निःशस्त्र प्रतिकाराच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी नोंदण्याइतका उज्ज्वल आहे. नागपूरचें सेक्रेटेरिएटसुद्धां बंद पडलें होतें. उभ्या नागपूर शहरांत विलक्षण चैतन्याचा संचार झाला होता. लष्करी दलांच्या तुकड्या पाठवून गोळीबार करण्यापलीकडे दुसरी कोणतीच मुल्की व्यवस्था ब्रि. अधिकाऱ्यांच्या स्वाधीन नव्हती.

खुद्द नागपूरप्रमाणेंच रामटेक, खापा, उमरेड, आष्टी चिमूर इ० अनेक ठिकाणीं उठावण्या झाल्या होत्या. बैतूल जिल्ह्यांतील गोंड बिथरले होते. प्रांतांत अनेक ठिकाणीं पोलिस ठाणीं, कोर्टकचेऱ्या, पोस्ट ऑफिसें, रेल्वेस्टेशनें, डाकबंगले जाळण्यांत आले होते. रेल्वेचे रूळ उखडण्यांत आले होते. लष्कराच्यासाह्यानेच पुनः सर्व प्रांताचा ताबा घेण्याचा प्रसंग येऊन ठेपलेला होता. राजधानीच्या ठिकाणीं आपल्या वरिष्ठांची चालू असलेली ही दुर्दशा अमरावतीचा जिल्हाअधिकारी मेल्ड्रम यालाहि अवगत होती. त्यामुळे तोहि अधिकच एखाद्या पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे वागूं लागला होता.

ता. आगस्ट १९४२ दुपारच्या १२ वा. ची वेळ असेल, अमरावतीचे जिल्हाधिकारी मि. मेड्रम, जिल्हा पोलिस अधिकारी मि. प्रॅट, सार्जंट कीन, नायब तहसीलदार अनीक अहमद व पोलिस कॉन्स्टेबलसचें पथक इतकी सर्व मंडळी माहोलीस येऊन पोहचली. तेथून माहोलीचा सब-इन्सपेक्टर गोविंदराव कांबळे, रेव्हिन्यु इन्सपेक्टर,तेथील पोलिस कान्स्टेबल्स, कामदार महार, आनंद आकाजी पाटील व पटवारी हे सर्व त्यांस मिळाले. त्यानंतर हा सर्व जमाव वाघोलीच्या मार्गें यावलीस येण्यास निघाला. यावलीस आल्यावर यावलीचे कामदार महार त्यांस मिळाले. अशा तऱ्हेने सुमारें ४० इसमांचा हा जमाव यावली परत जिंकून ब्रि० सरकारला मिळवून देण्यासाठी यावलीवर चाल करून आला. डे. क. मेल्ड्रम, डी. एस. पी. प्रॅट व सार्जंट कीन यांच्याजवळ भरलेलीं रिव्हाल्हर्स होतीं. हेडकान्स्टेबल्स व कान्स्टेबल्स यांच्याजवळ मिळून चार बंदुकी होत्या व बाकीच्या लोकांच्याजवळ लाठ्या होत्या. माहोलीहून यावलीस येण्याचा जो जवळचा रस्ता तो सोडून, आक्रमणकाऱ्यांचें दल वाघोलीच्या मार्गानें मुद्दाम येण्यास निघालें होतें.

आक्रमकदल वाघोलीस येऊन पोहचतांच गांवकऱ्यांचे अश्वरोही टेहळे मारुती कलाल व बारक्या मराठा यांनी त्यांना पाहिलें व ताबडतोब त्यांनी आपलीं घोडीं यावलीस पिटाळलीं. ठरल्याप्रमाणें त्यांनी गांवांत बातमी पोहचविली. पुढे ज्या मार्गानें हें आक्रमकदल यावलीस येण्यास निघालें त्या मार्गावरील शेतकऱ्यांनीहि त्यांना पाहिल्याबरोबर तडक शेतांतून कामें करणाऱ्या सर्व यावलीकरांना सूचना

दिली आणि सर्व शेतकरी व कामावरील स्त्रीपुरुष तावडतोब शेतांतील आपला उद्योग सोडून पूर्वसंकेताप्रमाणे गांवांत धाऊन आले. येतांना वाटेंतील सर्व शेतकऱ्यांना व कामकऱ्यांना त्यांनी गांवांत निघून येण्याच्या सूचना पाठविल्या.

संकटाची सूचना मिळतांच शंख, घंटा, बिगुल, टिन, डबडीं इत्यादि वाद्यांचा प्रचंड घोष करण्यांत आला. सतत १५ मिनिटेपर्यंत एवढा प्रचंड निनाद चालू होता की, त्यामुळे सर्व गांव तर हादरून निघालाच, पण नदीच्या परतीरावर असलेल्या नरसिंगपुरच्या लोकांना देखील तो ऐकूं गेला व यावलीवर संकट कासळल्याची जाणीव झाली. या वाद्यघोषाने यावलींत त्यावेळीं असलेले सर्व लोक एकत्र झाले. त्यांनी पूर्वयोजनेप्रमाणें मोर्च्यांच्या निरनिराळ्या जागा धरल्या. घरांतून व माड्यांवरून गोफणमार बसले. सुमारें १०० लोक राष्ट्रध्वजाच्या संरक्षणासाठी गांधी चौकांत जमा झाले. शेतीवरील लोक भराभर येऊं लागले. संकटाला न डगमगतां सारा गांव प्रतिकारासाठी सज्ज होऊन प्रतिपक्षाची हालचाल काय होते तें पाहत बसला.

गांवांत होत असलेला वाद्यघोष एवढा प्रचंड होता की, त्याने कांही काळ यावलीचें आकाश हादरून गेलें. आक्रमक लोकांनीहि तो ऐकला. कान बधिर करणारा व हृदयें कापविणारा तो आवाज ऐकूनच त्यांचीहि खात्री पटली असली पाहिजे की, जमीन कोपराने सहज खणतां येण्यासारखी नाही. प्रतिकाराचा अतिशय टणक असा खडक फोडावा लागणार आहे. मामला चिकट आहे. येथे धसमुसळेपणाने काम भागणार नाही, तसा नरमपणाहि कामीं येणार नाही. फार सावधगिरीनेच पाऊल टाकलें पाहिजे.

लढाई आलीच तर कोणत्या मोर्च्यावर अंगावर घ्यावी, याचा लोकांनीहि आपल्या परीनें कयास बांधलेला होता. त्यांनी हातांत लाठ्या वगैरे नसलेले कांही लोक निरनिराळ्या रस्त्यांनी फिरते ठेवले. गांधी चौकाच्या चारहि बाजूंचे मोर्चे सुसज्ज केले. माड्यांवरूनहि शत्रूच्या गांवांतील हालचालींची टेहळणी करण्याची योजना केली. शक्य तोंवर गांधी चौकाच्या रोखानेच शत्रु आला पाहिजे. पंजाबराव यांच्या घराकडे त्याने वळूं नये अशा पद्धतीने कोपऱ्याकोपऱ्यांवर माणसें उभीं केलीं.

प्रतिपक्षाला यावलींत एकाएकी प्रवेश करणें शक्य नव्हतें. गांवांतील वाद्यघोष ऐकून तो कांहीसा चमकला तर होताच, पण गांवच्या नाल्यावर लाकडें टाकल्याशिवाय साहेबमंडळीस त्यांतून पार जाणेंहि शक्य नव्हतें. म्हणून आक्रमकदल, यावलीजवळ आल्याबरोबर नाल्याच्या पलीकडील तीरावर रामकिसन मारवाडी याच्या शेतीचा मोठा फड होता, त्यांत थबकलें. कामदार महार लाकडें नेऊन नदीवर टाकण्याच्या कामास लागले. पूल तयार झाल्यावर मेल्डमप्रभृति सर्व सरकारी दल नाला ओलांडून नदीच्या ऐल-तीरावर आलें व तेथे जवळच असलेल्या मैदानांत त्यांनी आपली तुकडी संघटित केली. पोलीस कान्स्टेबल्स कवायती पद्धतीने रांगेनें उभे करण्यांत आले. त्यांच्या पुढे सब इन्स्पेक्टर गोविंदराव व रेव्हिन्यु इन्स्पेक्टर, त्यांच्याहि पुढे सार्जंट क्वीन, डी. एस. पी. मि. प्रॅट व डे. क. मेल्ड्म अशी रचना करण्यांत आली. पोलिसांच्या तुकडीच्या मागे कामदार महारांची तुकडी उभी करण्यांत आली. याप्रमाणें आपलें दल सुसज्ज करून सामर्थ्यशाली ब्रि० सरकारचे खास जिल्हाधिकारी साहेब यावलीसारखें एक लहानसें खेडें सर करण्यासाठी आता मोठ्या कवायती पद्धतीने व रुबाबदार रीतीने गांवांत प्रवेश करूं लागले.

हा वेळ पावेतों गांवहि सुसज्ज झाला होता. आक्रमकांचा पहिला आघात अंगावर घेण्यासाठी कांही लोक मुद्दाम गांवाबाहेर प्रतिपक्षाच्या दृष्टिपथांत राहण्याइतक्या अंतरावर येऊन उभे राहिले होते. त्यांच्या हातांत लाठ्याहि नव्हत्या. अतिशय शांतपणे जिल्हासाहेबांचा रुबाब व शान यांचें अवलोकन करीत ते उभे होते. शस्त्रधारी मनुष्याची अशी अपेक्षा असते की, निःशस्त्र माणसाने आपल्याला पाहूनच पळून गेलें पाहिजे. त्यांतून तो जर आपला शत्रु असेल तर त्याने क्षणभरहि आपल्या समोर उभें राहण्याचें धारिष्ट दाखवितां कामा नये. हिंदुस्थानांत लोक असेंच वागतात, अशी ब्रि० सिव्हिल सर्व्हंटांना शिकवण मिळालेली असते. हिंदुस्थानी लोक भेकड आहेत आणि लाठीधारी पोलीस शिपायी जरी दिसला तरी ते पळत सुटतात, त्यांतून साहेब डोळ्यासमोर दिसला की, त्यांची अगदी गाळणच उडते इत्यादि तऱ्हेच्या गोष्टी हिंदुस्थानांत नोकरीसाठी येणाऱ्या या गोऱ्या छोकऱ्यांना शिकविण्यांत

येतात. अशा तऱ्हेचे संस्कार झालेल्या मेल्डूम साहेबाच्या मनाला, आपण समोर दिसत असूनहि सुमारें २५।३० हिंदुस्थानी खेडूत आपल्या हालचाली पहात शांतपणें व निर्भयपणें उभे राहूं शकतात, हें पाहून आश्चर्याचा मोठाच धक्का बसला असला पाहिजे. साहेब संतप्त झाला. खेड्यांतील लोकांची आणि ही हिंमत ! लोकांनी प्रक्षोभाचें कोणतेंहि कृत्य केलेलें नसतांना त्यांच्यावर लाठी-हल्ला करण्याचा पोलीसांना हुकूम झाला. लगेच डबल मार्च करीत शिपायी लाठ्या फिरवीत त्यांच्यावर चालून गेले. लोक पळून गेले. लोक इतक्या सहजासहजी पळालेले पाहून साहेबांची हिंमत चढूं लागली. पुनः पोलीसदल एकत्र झालें व आक्रमकांची टोळी पुढे चालूं लागली.

पूर्वेकडून त्यांनी गांवांत प्रवेश केला. वाटेंत पहिलीच मोठी इमारत रामकिसन मारवाडी यांची आहे. त्यांच्या माडीवर कांही लोक बसले होते. गच्चीवरून व खिडकींतून ते आक्रमकांच्या हालचाली पहात होते. त्यांना पाहिल्याबरोबर सार्जंट क्वीन याने शामराव देशमुखाचे घरापासून नेम धरून माडीवर बसलेल्या लोकांवर गोळी झाडली. नेम चुकला. गोळी भिंतीस लागून खाली पडली. अशा तऱ्हेनें लोकांनी प्रक्षोभाला कोणतेंहि कारण दिलेलें नसतांना सत्तापिसाट अधिकाऱ्यांनी आपल्या सामर्थ्याचा कंडु जिरविण्यासाठी शांतपणें उभे असलेल्या लोकांवर पहिला लाठी हल्ला केला व पहिली गोळी झाडली. आक्रमकांनीच लोकांना प्रतिकाराच्या भूमिकेवर आणून उभें केलें. रामकिसन उर्फ बाबुशेट मारवाडी यांच्या माडीवर झाडण्यांत आलेली ही पहिली गोळी न्यायालयांतील जबान्यांत प्रगट झालेली नाही. पण तिने बाबूशेटच्या घराला पाडलेलें छिद्र लेखकाने स्वतः पाहिलें आहे व ती मारतांना ज्यांनी सार्जंट क्वीन यांस पाहिलें असे लोक यावलींत हयात आहेत. या पहिल्या गोळीचें वृत्त ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे. कारण नसतांना ती मारल्यामुळे आक्रमणाचा पहिला हल्ला सरकारी कर्मचाऱ्यांनी केला होता. लोकक्षोभाला तीव्र कारण झाली होती, हें सिद्ध होत आहे.

प्रकरण ३ रें

ता० १८ आगस्टची लढाई

याप्रमाणे पहिली गोळी घालून आक्रमकांनी पुढे काय केले, कोणत्या क्रमाने कोणत्या घटना घडल्या यांची संगति उपलब्ध लेखी साहित्यावरून लावणें अतिशय कठीण आहे. यावलीचा मामला यानंतर न्यायप्रविष्ट झाला व हायकोर्टापर्यंत तो गाजला. त्याबाबतची सर्व हकीकत 'न्यायकांडा'त येणारच आहे. प्रस्तुत प्रकरणीं त्याचा उल्लेख करण्याचें कारण असें कीं, न्यायालयांत ज्या जबान्या झाल्या त्यांत सरकारतर्फे झालेल्या जबान्यांत यावलीची जनताच आक्रमक होती हें दाखविण्याचा पद्धतशीर प्रयत्न करण्यांत आल्यामुळे त्यांतून प्रतिबिंबित होणारा इतिहास विकृत झाला आहे. आरोपींच्या-तर्फे जो बचाव देण्यांत आला त्यांत कायद्याच्या दृष्टीने आरोपींचा बचाव करण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला असल्याने आरोपींच्यातर्फे जबान्याच फारशा देण्यांत आलेल्या नाहीत. सारी मदार सरकारी साक्षीदारांच्या जबान्यांतील विसंगति दाखवून आरोपांचें स्वरूप सौम्य करून दाखविण्यावर ठेवण्यांत आली होती. स्वतंत्र होऊं पाहणारी जनता व तिला गुलामींत डांबून ठेवण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करूं पाहणारें सरकार यांच्यांत समस्त देशभर जें युद्ध चालू होतें त्यांतील एक अतिशय जोरदार लढाई यावलींत घडली आणि तींत यावलींच्या जनतेने अपूर्व पराक्रम प्रकट केला या दृष्टीने 'यावली प्रकरणा'कडे पाहण्यांत आलें नाही. पाहणें शक्य नव्हतें असें नाही; परंतु त्यानंतरच्या काळांत सर्वत्र जनतेची पिछेहाट व सरकारची सरशी झाल्याकारणाने व त्याच सरकारच्या न्यायालयांत कायद्याचा लढा लढावा लागल्याकारणाने, आरोपांचें स्वरूप सौम्य करून कोर्टापुढे मांडण्यावरच आरोपींच्या वकिलांनी आपली सारी भिस्त ठेवावी हें स्वाभाविक होतें. अशी वस्तुस्थिति असल्यामुळे न्यायकोर्टांत निर्माण झालेल्या कागदपत्रांच्या आधारें यावलीच्या ता० १८ आगस्टच्या तेजस्वी लढाईचा क्रम व वास्तविक स्वरूप मांडणें कठीण झालें आहे.

आता काळ बदलल्यानंतर यावलीचे लोक या एकंदर लढाईचें जें स्वरूप सांगतात, तेंच न्यायकोर्टातल्या उलट सुलट जबान्या व तपासण्या वाचल्यानंतर अधिक प्रामाणिक आहे असें वाटूं लागतें. म्हणून लोकांनी समक्ष सांगितलेली हकीकत, घटनास्थलांची वरील दृष्टीने लेखकाने केलेली पाहणी आणि न्यायालयांतील कागदपत्रें इतक्या सामग्रींतून ता. १८ आगस्टच्या यावलींतील लढाईचा क्रम व संगति लावण्याचा लेखकाने प्रयत्न केला; आणि तोच प्रस्तुत प्रकरणांत प्रतिबिंबित झाला आहे.

डे० क मेल्ड्म, डि. एस्. पी. प्रॅट, सार्जंट क्रीन, नायब तहसीलदार अनिक अहमंद, पोलीस सब-इन्स्पेक्टर गोविंदराव व पोलीस कान्स्टेबल्स, कामदार महार, पाटील, पटवारी व रेव्हिन्यु इन्स्पेक्टर यांच्या तुकडीने गांवांत प्रवेश केला तोच असा की, दरारा बसविण्याच्या पद्धतीने लष्करी चाल ते चालू लागले. पंजाबराव यावलीकर यांच्या घरावरच त्यांचा पहिला रोख असणें स्वाभाविक होतें; पहिली गोळी झाडून आपण कोणत्या थराला जाऊं शकतो हें त्यांनी दाखविलें होतें. एवढ्याने लोक घाबरून गेले तर त्यांना गांवची लूट करण्यास हवी होती. सामुदायिक दंड वसूल करण्यास अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या हेतूने आपण यावलीस गेलों होतों असें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मेल्ड्म याने पुढे न्यायालयांत दिलेल्या आपल्या जबानींतहि म्हटलें आहे. हा दंड १५ आगस्टला करण्यांत आलेल्या ‘ उत्पाती कृत्यां ’ बद्दल (Sabotage) बसण्यांत आला होता. तो बेकायदा कसा होतो हें पुढे आलेंच आहे. १५ आगस्टच्या सत्याग्रहाचें नतृत्व पंजाबराव यांनीच केलें होतें. पाटील व रेव्हिन्यु इन्स्पेक्टर १६ ता. ला लूट करण्यास गेले तेव्हा त्यांनी पंजाबराव यांचे बंधु विश्वासराव यांनाच २००० रु. दंड भरण्यांस सांगितलें होतें. तेव्हा १८ ता. च्या या सरकारी तुकडीचा रोख त्यांच्याच घराकडे असणें स्वाभाविक होतें, हें सहज ध्यानांत येईल.

म्हणून गांवांत शिरल्यावर ते प्रथम एकदमच गांधी चौकाकडे न जातां आनंद आकाजी पाटील यांच्या घरापर्यंत गांधी चौकाचा रस्ता सोडून पुढे गेले व तेथे ते थबकले, तेथून जंगलू खात्याच्या नाक्याची जी नासधूस १५ ता.

ला करण्यांत आली होती ती समक्ष दाखवून साहेबांचा पारा अधिक चढवावा असा आनंद आकाजीचा बेत असावा; म्हणून त्याने त्यांना तिकडे वळविलें. परंतु राजारामजी पांचघरे यांच्या घराजवळ कांही लोक जमले आहेत हें दिसतांच ते त्या लोकांवर धाऊन गेले. लोक पळून गेले म्हणून ते अजाबराव पाटील यांच्या घराजवळ आले; तेव्हा त्यांना राधाबाई पांचघरीणच्या घराजवळ पुन्हा लोकांचे आवाज ऐकू येऊं लागले. म्हणूनच अजाबराव पाटलाच्या घराजवळून ते पुन्हा लोकांवर चालून गेले व लोकांना त्यानी पळत जाण्यास ओरडून सांगितलें. लोकांतून बारकाजी तडस यांनी खणखणीत जबाब दिला— 'नही भागेंगे.' लढाईच्या आव्हानाचा पहिला जबाब लोकांनी धैर्याने दिला.

सरकारी दल नत्थु बाऱ्याच्या घराजवळ येऊन पोहचलें. आता तें पूर्णपणें गांवांत येऊन पोहचलें होते. बाहेर रसद कुमक कांही नव्हती. गांवांतील लोक अजूनहि शांतच होते. लोकांची व त्यांची मूठभेट अजून कोठेच झाली नव्हती. हे फिरत तसतसे लोक फिरत. हे चालून गेले की, लोक वृकनीतीचें अवलंबन करून पळून जात. पण पुन्हा त्यांच्या मागे मागे जमा होत. 'हम नहीं भागेंगे' हा जबाब बारकाजी तडस यांनी ज्या ठिकाणीं दिला तेथूनच लढाईचा पुढील क्रम बदलला. पंजाबरावच्या घराकडे जाण्याचा मार्ग सोडून लोकांना दहशत बसविण्यासाठी प्रथम त्यांच्यावर चाल करून जाण्याची जरूरी या जबाबाने निर्माण केली. लोकांचे आवाज जिकडून जिकडून येत होते तिकडे तिकडे चाल करून पोलीसदल जाऊं लागलें. राधाबाई पाचघरीनच्या घरावरून तें मोतीसा तेली याच्या दुकानासमोर आलें व तेथून त्यांनी पुन्हा बंदुकीचे दोन आवाज काढले. हेतु हा की लोकांनी भ्यावें, पण लोक भिण्याऐवजीं पुन्हा गोळा होऊं लागले व 'साहेब लोक आले'—'साहेब लोक आले' असे आवाज करूं लागले. या आवाजाच्या मागोमाग जाण्यामुळे सरकारी दलास गांधी चौकाकडेच आपला मोर्चा वळविणें भाग पडलें. पंजाबरावच्या घराचा मार्ग त्यांना सोडावा लागला. केवळ हुलींच्या व हालचालीच्या डावपेचांत लोकांचा पहिला उद्देश तर सफल झाला.

मेल्ड्रमप्रभृति आक्रमक गांधी चौकांत जाऊन पोहचले तेव्हा तेथे किती लोक जमलेले होते याचा सरकारी सुशिक्षित साक्षीदारांनीं दिलेला अंदाज मोठा

मजेदार आहे. कांही पढीक लोकांनी एकमुखाने ५०० लोक जमले होते म्हणून सांगितलें, तर कांही लोकांनी ज्यांना पढविण्यांत आलें नव्हतें त्यांनी ५० ते १०० लोक असावेत असा अंदाज सांगितला. ' लोकांनी केलेला हा जमाव बे-कायदा असून लोक जर जमाव सोडून गेले नाहीत तर जबरीने तो मोडावा लागेल असा हुकूम देण्यांत आला होता काय?'—या प्रश्नाला जबाबदार सर-कारी साक्षीदारांनी 'असा हुकूम देण्याला अवकाशच नव्हता' असा जबाब दिला. त्रि सरकारच्या कायद्याने प्रस्थापित झालेलें राज्य त्याच कायद्यानुसार चाल-विण्याची जबाबदारी ज्या डेप्युटी कमिशनरवर होती त्याने लोकांचा जमाव बे-कायदा घोषित करण्याचीहि दक्षता बाळगली नाही. या न्यायालयांत बाहेर आलेल्या गोष्टी येथे ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. तुमचा जमाव बेकायदा ठरविण्यांत आला आहे असें अगाऊ घोषित न करतांच तो लोकांना ' भाग जाव ' म्हणत होता व लोक ' नही भागेंगे ' असा जबाब देत देत या गल्लींतून त्या गल्लींत जात जात गांधी चौकांत जमा होत होते.

गांधी चौकांत तिरंगी ध्वजाखाली ५०० लोकांचा समुदाय जमा झाला होता, ही सरकारी साक्षीदारांची जबानी पढीक आहे. वस्तुस्थिति अशी आहे की, झेंड्याखाली अवघे पांच पन्नासच लोक होते आणि गांधी चौकाकडे येणाऱ्या बाकीच्या रस्त्यावर गल्ल्यांतून, तेथील घरांतून व दुकानांतून लोक समुदाय विरवरून जमलेला होता. गांधी चौकाच्या रस्त्याला लागल्यापासूनच लोक पळून जात नाहीत हें पाहून आक्रमकांनीच त्यांच्यावर बेत मारण्यास सुरवात केली. लोक पळूं लागले पण आपापल्या घराकडे नव्हे. मार खाऊनहि ते गांधी चौकाकडेच जाऊं लागले. त्यांच्यावर बेत व लाठ्या यांचे मार करीत आक्रमकहि उत्तरेच्या बाजूने गांधी चौकाच्या तोंडाशीं जाऊन पोहचले.

तेथे गेल्यावर डिस्ट्रिक्ट मॅजिस्टेट मेल्ड्रम, डी. एस. पी. प्रॅट व सार्जेंट क्वीन हे तिघेहि त्वेषाने लोकांवर तुटून पडले व हातांतील शिकारी काठ्या व बेत यांचे जबरदस्त तडाखे मारूं लागले. कांही लोक मार खाऊनहि तेथेंच थांबले. कांहींना माराचे तडाखे असह्य झाले. अगदी हातघाई वर प्रसंग आहे असें पाहून त्यांनी पळत घरीं जाऊन लाठ्या घेतल्या व पुन्हा ते गांधी चौकांत जमूं लागले.

यानंतरच लढाईला तोंड लागलें. डी. सी., डी. एस. पी.. व सार्जंट यांनी गांधी चौकाच्या तोंडाशीं असलेल्या लोकांवर लाठ्या व वेत यांचा तडाखेबंद मारा सुरू करून त्यांना मागे रेटण्यास सुरुवात केली. गांधी चौकांत प्रवेश केल्यावर तेथे तिरंगी ध्वज डौलाने फडकत आहे व त्यांच्याखाली लाठ्या घेऊन कांही लोक उभे आहेत, असें पाहून त्यांचें पित्त अधिकच खवळलें. हिंदी स्वातंत्र्य-संग्रामाचें तिरंगी ध्वज हें प्रतीक होतें. हें प्रतीकच लोकांच्या गौरवाचें, आदराचें व सन्मानाचें स्थान बनलें होतें. त्याच्या रक्षणासाठी यावलीचेंच काय, समस्त भारतवर्षाचे लोक लढत होते. या प्रतीकांतले हें सामर्थ्य ओळखून तें नष्ट करण्याचा प्रयत्न ब्रि० सरकारचे हस्तक जागोजागीं करीत होते. घराघरांवरील तिरंगी ध्वज उपटून टाकण्यांत येत होते. नागपुरला या तिरंगी ध्वजाच्या रक्षणासाठी कित्येक चकमकी झडल्या होत्या. सौ. सुभगाबाई काशीकर या एकट्या तरुण महिलेवर गोऱ्या टॉमिजनी, तिने आपल्या घरावरील तिरंगी ध्वज काढून टाकावा म्हणून, हल्ला केला व तिच्या छातीशीं संगीन रोखली तरी तिने ध्वज काढून टाकण्याचा इन्कार केला. टिळक विद्यालयाच्या श्री आप्पाजी तिजारे यांच्या किराणा दुकानावरील तिरंगी ध्वज जबरीने काढून नेण्यांत आला. लढा न्यायालयांत चालून तिजारे विजयी झाले व त्यांच्या दुकानचा ध्वज त्यांना परत मिळाला. ध्वजाचें हें प्रतीक पाहून गोऱ्यांचें पित्त अधिकच खवळत असें. तसें तें यावलीसहि खवळलें यांत अस्वाभाविक कांहीच नव्हतें. ध्वज डौलाने फडकत आहे व त्याच्याखाली त्याच्या रक्षणाच्या निर्धाराने लोक हातांत लाठ्या घेऊन उभे आहेत, आपण लाठ्या व बेत यांचा इतरांवर मार करीत आहोत हें ध्वजाखालील लोक पाहत आहेत, पण आपली जागा सोडीत नाहीत; हें पाहून त्यांच्या रागाचा पारा अधिकच भडकला.

झेंड्याच्या खाली उभ्या असलेल्या लोकांच्या रोखाने डी. एस पी. मि० पॅट यांनी गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. एक गोळा गोविंदराव अंबडकार यांचे पोटास चाटून भिंतीस लागली. आणखी एक गोळी तुळशीरामजी अंबडकार यांच्या हातांतील लाठीस लागून खाली पडली. तुळशीरामजीवर त्याने दुसरी गोळी झाडली ती त्यांच्या डोक्याला चाटून गोळी. डी. एस. पी ने गोळ्या

मारण्यास प्रारंभ केलेला पाहून सरकारी दलांतील इतर लोकांनीहि गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. आता मात्र लोकांच्या शांतीचा भंग होऊं लागला. सहनशीलतेचा अंत झाला. एक तर भ्याडासारखे पळून तरी जावें, किंवा हातांतील साधनांनी प्रतिकारास प्रारंभ करावा अशी त्यांची मनःस्थिति होऊं लागली. लाठीप्रहार व गोळीबार यांचें हें हिडिस स्वरूप पाहून त्यांचा सात्त्विक संताप भडकूं लागला. गांधी चौकांतील गोळीबाराची वार्ता सगळीकडे पसरली. आता संरक्षणात्मक प्रतिकार सुरू केल्याशिवाय गत्यंतर नाही असें जनतेने ठरविलें. त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या साधनांनी त्यांनी मोर्चेबंदी केली. नदीवरील लाकडें काढून फेकून देण्यांत आलीं. गांधीचौकांतून बाहेर जाणारे व गांवच्या बाहेर जाणारे रस्ते रोखून धरण्यांत आले. यावलीच्या लढाईचा निर्णय गांधी चौकांतच लागला पाहिजे असा लोकांनी निर्धार केला. गांधी चौकाला तर रणक्षेत्राचें रुप प्राप्त झालें.

तुळशीरास अंबडकार यास दोन दोन गोळ्या मारूनहि तो झेंड्याखालील आपली जागा सोडीत नाही हें पाहून डी. एस. पी. प्रॅट यांस आणखीच त्वेष आला. तो जातीने झेंड्यावर चालून गेला आणि झेंड्याचें अपहरण करण्याच्या हेतूने त्याने ध्वजास्तंभास हात घातला. स्वातंत्र्याचा नारायण सर्व जडाजड, चराचर, वस्तूंत भरला होता. हिरण्यकश्यपूने खांबास लाथ मारल्याबरोबर प्रल्हादाचा नारायण जसा नृसिंहाच्या रूपाने त्या खांबांतूनच प्रकट झाला तद्वतच ध्वजस्तम्भास प्रॅटने हात लावल्याबरोबर तुळशीरामजी अंबडकार यांच्या अंगांत नृसिंहाचा संचार झाला. त्यांनी एक झडप घालून प्रॅट याची कंबर धरली व त्यास जमिनीवर लोळवून ते त्याच्या छातीवर बसले.

प्रतिकाराची ठिणगी पडली. तुळशीरामजींच्या रुपाने प्रकट झालेला नृसिंह आता प्रत्येक यावलीकरांच्या अंगांत संचार करूं लागला. इकडे सार्जंट क्वीन लोकांना बेताचे तडाखे मारीत होता. त्याने महादेवराव श्रीखंडे यांना बेदम मारलें. गांधी चौकाच्या कोपऱ्यावर असलेल्या मंदिराजवळ मारीत मारीत त्याने त्यांना रेटलें. तोंच मागून रामचंद्र भोजने व बापुराव खासबागे यांच्या उड्या क्वीनच्या अंगावर पडल्या. एका झडपींत त्यानी त्यास जमिनी-

वर लोळविलें. क्वीनचे होषहवास उडाले. त्याची सारी मदांधता क्षणार्धांत ताळ्यावर आली. तो लोकांच्या गयावया करू लागला. विनवून व हात जोडून तो सांगूं लागला "मी इंग्रज नाही. मी हिंदुस्थानीच आहे. हिंदुस्थानी बाईच्या पोटींच माझा जन्म झाला आहे. मला मारूं नका. मला माफ करा. मी यापुढे कांही करणार नाही"—लोकांनी त्याला उचललें व विहिरीजवळ नेऊन ठेवलें. त्याला बजावण्यांत आलें की,–"तुला आम्हीं कैद केलें आहे. तूं येथून हालतां कामा नये." या वेळेपासून पुढे पळून जाईपर्यंत क्वीन एखाद्या कैदी चोरासारखा विहिरीजवळच उभा राहिला. त्याने कैदेचा स्वीकार केला. त्याला जिंकल्याची खूण म्हणून लोकांनी त्याचा टोप हिरावून घेतला व विहिरींत फेकून दिला. टोपावरच बचावली असा आनंद त्यांनेहि मनांतल्या मनांतच उपभोगला.

गोळीबार चालूच होता. एक गोळी लागून मारोतराव कांडलकार घायाळ होऊन चौकांतील दुकानासमोर खाली पडला. घळघळा रक्त वाहूं लागलें. गांधीचौकांतील रणचंडीला रक्ताचा अभिषेक सुरू झाला. मोतीराम बडोने नामक तरुण मुलाला गोळी लागून तोहि पडला. तिसरी गोळी वर वर्णिलेल्या गोविंदराव अंबडकार यांच्या पोटास लागून तोहि पडला. जनतेचा एकेक मोहरा धराशायी होऊं लागला. राष्ट्रध्वजाच्या संरक्षणासाठी यावलीं-तील एकेक हिरा बळी पडूं लागला. गोळ्यांचा वर्षाव होत होता. टपटप लाख मोलाचा वीर जमिनीवर पडत होता. रक्ताचा पाट वाहूं लागला होता. पण राष्ट्रध्वजाच्या संरक्षणासाठी उभे असलेल्या वीरांतील एकहि मागे हट-ण्यास तयार नव्हता. ध्वज तसाच डौलाने फडकत होता.

तुळशीराम अंबडकार यांनी डी. एस. पी. प्रॅट यास जमिनीवर लोळविलें व ते त्याच्या छाताडावर चढून बसले, हें पाहून गोविंदराव सब-इन्स्पेक्टर त्यांच्या मदतीस धावला. त्यासरशी बापुराव खासबागे व रामचंद्र भोजने हे तुळशीरामजीच्या मदतीस धावले. त्यांनी सब-इन्स्पेक्टरला घेरलें. बारक्या मांगाने त्याला जमिनीवर लोळविलें. त्याचेंहि हाडें नरम करण्यांत आलीं. परंतु बाकीच्या पोलीसांनी तुळशीरामजी अंबडकार यांच्यावर वरतून लाथा व

बुक्यांचा जबरदस्त मार केला. तुळशीरामजी बेहोष झाला. दुःशासनाचें वक्षःस्थल विदीर्ण करणाऱ्या भीमाच्या बळाने त्यांनी ग्रॅटच्या छातीवर आपली बैठक ठोकली होती. बुटांच्या ठोकरा, लांथा व गुद्दे यांचा मार खाऊन खाऊन तें बेशुद्ध झाले. पण साहेबाच्या छातीवरील त्यांची मांड ढळली नाही.

डी. एस. पी. इंग्रजींत बडबडूं लागला. बेहोश तुळशीरामजीला तें काय समजणार! ग्रॅटचा जीव कासावीस होऊं लागला. दीनवाण्या व केविलवाण्या मुद्रेने तो करुणा भाकीत होता. तुळशीरामजींची मगरमिठी सोडविण्याचें सामर्थ्य त्याच्या कान्स्टेबलांतहि नव्हतें. मनसोक्त लाथा मारल्या तरी तुळशीरामजीची लोखंडी पकड ढिली पडूं शकत नाही हें पाहून त्यांचीहि हिंमत ढळली होती. त्यांतल्या एका हेड कान्स्टेबलला ग्रॅटच्या बडबडीचा अर्थ समजला. त्याने तुळशीरामजीच्या कानाशीं ओरडून सांगितलें "साहेब म्हणतात मी शरण आलों आहे. माझी सुटका करा." हे शब्द कानांत शिरतांच बेशुद्ध स्थितींतील तुळशीरामजींची पकड एकदम ढिली पडली. कॉन्स्टेबल लोकांनी जिल्हा पोलीस अधिकाऱ्याला तुळशीरामजींच्या ढिल्या पडलेल्या मांडेखालून ओढून उभा केला. प्रतिकारकांनी त्यासहि कैद केलें. त्याचें रिव्हाल्व्हर काढून घेण्यांत आलें. त्यासहि सार्जंट क्वीनजवळ उभें राहण्याची ताकीद देण्यांत आली. ब्रि० सरकारचे दोन जबरदस्त मोहरे लोकांनी आपल्या अचाट शौर्यावर पकडले व त्यांना विहिरीजवळ बंदिस्त उभें केलें. श्री तुळशीरामजी अंबडकार लेखकांस पाठविलेल्या पत्रांत लिहतात "ता. १८।८।४२ ला यावलीस डी. एस. पी. च्या छातीवर मी असतांना डी. एस. पी. कांही इंग्रजीमध्ये पुटपुटत होता. तें मी समजूं शकलों नाही. तरी पण तेथील एक हेडकान्स्टेबलला तें समजून तो मला पुढील वाक्य बोलला. 'तुम्ही साहेबास सोडून द्या. कांही न करीतां आम्ही आता वापस जातों, असें तो हात जोडून सांगत आहे.'"

या सर्व घटना एकाचवेळीं—एकसमयावच्छेदेंकरून-घडत होत्या. कोणती आधी घडली, कोणती मागाहून घडली हें सांगणें कठिण आहे. लोकांच्या ठिकाणीं अचाट वीरश्री संचार करीत होती. प्रतिकारांच्या खुल्या लढाईत त्यांनी अर्धे अधिक यश मिळविलें होतें. पोलीसांच्या लाठीशीं लाठी भिडवून व बंदेश

खेळून त्यांना त्यांनी निःशस्त्र करून टाकलें होतें. सार्जंट व डी. एस. पी. यांना पकडलें होतें. डी. एस. पी. चें रिव्हाल्व्हर काढून घेऊन विहिरींत फेकून दिलें होतें. लढाई रंगांत येत होती. साहेबांस बरोबर घेऊन यावलीची रग जिरविण्यासाठी येणाऱ्या नायब तहसीलदार, रेव्हिन्यु इन्स्पेक्टर, पाटील आनंद आकाजी, पट्वारी इत्यादि दिवाभीतांची गाळण उडाली होती. यांची लढाई साहेब लढत होता. हे नुसती मौज पहात होते

अजून पूर्ण विजय मिळालेला नव्हता. प्रतिपक्षाचा खरा मोहरा अजून मोकळा होता. डेप्युटी कमिश्नर मेल्ड्म याची मारगिरी चालूच होती. तोच आक्रमकांचा खरा पुढारी होता. यावली जिंकून ब्रि० राज्यांत समाविष्ट करण्याची जबाबदारी त्याचीच होती. त्यामुळे त्याचा पाडाव होईपर्यंत लढाई संपणार नव्हती व लोकहि हें जाणून होते.

रणांगण मोठ्या पध्दतशीर रीतीने सजलें होतें. प्रतिपक्षाच्या गोळ्यांना बळी पडलेल्या वीरांना ताबडतोब उचलून नेऊन त्यांच्या घरीं पोचविण्यांत येत होतें व मलमपट्टी करण्यांत येत होती. जणूं काय शुश्रुषापथकच शिकवून तयार करण्यांत आलें आहे!! लाठ्या व गोळ्यांच्या वर्षावांतहि हें कार्य चालूच होतें.

मोतीराम बडोने यास गोळी लागून तो पडल्यावर शुश्रूषापथकांच्या लोकांनी त्यास उचलून त्याच्या घरीं नेलें. त्याच्या वृद्ध पित्याने तरुण पुत्राचें हें अपूर्व बलिदान पाहिलें. पुत्राची ती स्थिति पाहून वृद्ध पित्याचें हृदय विदीर्ण झाल्याशिवाय कसें राहील? पण तो भ्याड, शोक करणारा बाप नव्हता. जयरामजी हा शूर पिता होता व आपल्यासारख्याच शूर पुत्रास त्याने जन्म दिला होता. सत्तर वर्षांचा म्हातारा, पुत्राचा तो आसन्नमरण देह पाहून कांही बोलला नाही. तो फक्त उठला. त्याने लाठी हातांत घेतली आणि असाधारण वेगाने तो रणांगणावर धाऊन आला.

त्यावेळीं डेप्युटी कमिश्नर मेल्ड्म हा लोकांना मारीत मारीत गांधी चौकांतून पुढे पुढेच जात होता. वजीरभाईच्या घराच्या रोखाने चाल करून

पुढे जात असतांना त्याने ज्या गोळ्या मारल्या त्यांतलीच एक गोळी मोतीराम यास लागली होती. याप्रमाणे जवळून नेम मारून तो पुढे चालला. वजीर भाईच्या घराजवळ येऊन तो क्षणमात्र थांबत नाही, तितक्यांत मोतीरामचे वृद्ध वडील जैरामजी हातांत लाठी घेऊन मैदानांत आले. ते मैदानांत आले ते वेगाने लाठी फिरवीतच ! त्या सत्तर वर्षांच्या म्हाताऱ्याचा त्यावेळेचा तो आवेश व त्याच्या लाठीचा तो वेग पाहून जिल्हाधिकारी मेल्ड्रम साहेब याची पांचावर धारण बसूं लागली. तो राजाराम कुंभाराच्या घराकडे मागे मागे हटूं लागला. एवढ्या वेळात वृद्ध जैरामजीच्या महावेगशाली लाठीचे दोन तीन तडाखे तर साहेबास बसलेच पण ते ओझरते बसले. कसाबसा तोल सावरीत तो पुन्हा मागे हटूं लागला. समोर जैरामजी वाघाच्या आवेशाने चाल करून येत होता. मागे कुंभाराचा पजावा (आवा) होता. आता अधिक मागे हटणें अशक्य झालें. त्या खेडुत वृद्धाने तरुण व तडफदार साहेबालाहि कोंडींत पकडलें व आपल्या हातांतील लाठी गरगरा फिरवून असा एक तडाखेबंद झोडपा जिल्हा साहेबांच्या डोक्यावर लगावला की, त्यास आपल्या पितरांचेंच स्मरण व्हावें. हिंदी खेडु-ताच्या एका तडाखेबंद प्रहाराने, ब्रि. साम्राज्य सरकारचा अमरावती जिल्ह्या-चा हा आधारस्तंभ कोसळला व कोलमडत कुंभाराच्या आव्यांत जाऊन आदळला. त्याच्या भाग्याने त्यावेळीं आवा गरम नव्हता. पुत्राच्या रक्ताने व्यथित झालेल्या वृद्ध पित्याच्या हातचा तो तडाखा होता. हजार हत्तींचे बळ गोळा करून धावत आलेल्या वृद्धाने आपल्या अंतःकरणातून वाहणाऱ्या रक्तांत भिजविलेल्या लाठीचा तो तडाखा होता. साहेबाची सारी धुंदी निमिषांत खलास झाली. डोक्यावरील टोप गडगडून पडला. चष्मा गळून पडला. शुद्ध हारपली आणि साहेब महाशय रक्तबंबाळ होत्साते कुंभाराच्या आव्यांत लोळत पडले. आजच्या मोहिमेंतला ब्रि. सरकारचा अव्वल जर्जाचा पुढारी गारद झाला. सत्तर वर्षांच्या एका वृद्धाच्या शौर्याने अखेर मात केली आणि गांधी चौकांतील लढाई पूर्णपणें जिंकून घेतली.

डेप्युटी कमिश्नर मेल्ड्रम यांची ही दुर्दशा कैदी झालेले सार्जंट क्वीन व डी. एस. पी. प्रट हे अविवश होऊन पहात होते. आनंद आकाजी प्रभृति दिवाभीतें अजून मागेंच दडलीं होतीं. स्वातंत्र्यध्वज डौलाने फडफडत होता.

घायाळांना उचलून नेण्यांत येत होतें. लोकांचा प्रतिकार केवळ संरक्षणात्मक असल्याने तीनहि साहेब नामोहरम झाल्यावर लोकहि क्षणमात्र खामोष झाले होते- इतक्यांत मेल्ड्मला शुद्ध आली. धुळीने भरलेले आपले अंग झटकीत तो उभा राहिला. आपले साथीदार विकल नजरेने गांधी चौकाच्या उत्तरेकडील बोळाच्या विहिरीजवळ उभे असलेले त्याने पाहिलें. रक्ताचे ओघळ त्याच्या अंगावरून वहात होते. त्याच्या फौजेंतील डी. एस. पी, सार्जेंट, सबइन्स्पेक्टर व कांही कान्स्टेबल्स जखमी झाले होते. जनतेच्या प्रतिकाराचें हें रुद्र स्वरूप पाहून ते जागच्या जागींच गारठले होते. मेल्ड्म तसाच पळत निघाला तों लोकांनी पकडून त्यासहि विहिरीजवळ इतर दोघांजवळ उभा केला. त्यासहि कैद करण्यांत आल्याचें सांगण्यांत आलें. लोकांनी त्याच्या हातांतील छड्या व शिकारी काठ्या काढून घेतल्या आणि प्रचंड विजय घोष केला. 'म. गांधीकी जय', 'तिरंगी झेंडेकी जय' 'इन्किलाब जिंदाबाद' च्या गर्जनांनी सारें गांव दुमदमून गेलें. जनतेला मोठें बलिदान द्यावें लागलें. पण अखेर जयश्रीने तिलाच माळ घातली.

विजय पदरांत पडल्याबरोबर लोकांनी बेफामपणा पत्करला नाही. नीतीच्या, अहिंसेच्या, सभ्याचाराच्या मर्यादा ओलांडल्या नाहीत. त्यांनी त्या सर्व अधिकाऱ्यांना बजावलें की,—'तुमच्याशीं आमचा कांहीच द्वेष नाही. तुमचा उपमर्द करावा, बेइज्जत करावी, अशी आमची इच्छा नाही. तुम्ही जनतेचे अधिकारी म्हणून वागा आणि क्रांतीच्या जयघोषांत सामील व्हा.' जनतेचें म्हणणें ऐकण्याशिवाय त्यांनाहि दुसरी गति उरली नव्हती. त्यांनी जनतेबरोबर जयघोष करण्यांत भाग घेतला. परिस्थितीचा अति विकटपणा आता त्यांच्या पुरतेपणीं ध्यानांत आलेला होता. यावलीचें पाणी त्यांच्या प्रत्ययास आलें होतें. क्रांतीच्या रंगांत यावलीची जनता किती रंगून गेली आहे हें त्यांनी अनुभवलें होतें. हा अनुभवहि सहज विसरण्यासारखा नव्हता. यावज्जन्म त्याची आठवण विसरण्यासारखी नव्हती. त्यांची दंडनीति, त्यांचें सामर्थ्य, त्यांच्या लाठ्या व बंदुकी साऱ्या व्यर्थ ठरल्या होत्या. इतक्यांत सब इन्स्पेक्टर गोविंदराव याने पुनः लोकांच्या रोखाने हालचाल करण्याचा प्रयत्न सुरू केलेला पाहून डे. क. मेल्ड्म याने त्याला रोखलें. प्रसंग बाका होता.

म्हणून त्यांनी आंता सामनीतीचा अवलंब करण्यास प्रारंभ केला. डेप्युटी कमिश्नर मेल्ड्रम स्वतः भाषण करूं लागला. त्याने झालेल्या एकूण प्रकाराबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली. जनतेच्या शौर्याचें व विजयाचें अभिनंदन केलें. लोकांच्या सभ्याचाराची व चांगुलपणाची प्रशंसा केली आणि शेवटीं मोठ्या कळकळीने अशी विनंति केली की "आता लोकांनी आमची सुटका करावी व आम्हाला परत आमच्या गांवीं जाऊं द्यावें. यावलीकरांनी आमचे प्राण वाचविले आणि एवढी प्रखर लढाई देऊनहि द्वेषभावरहित वृत्तीने व आदरभावनेने ते आमच्याशीं वागले याबद्दल त्यांचे आभार मानावेत तितके थोडेच आहेत. आम्ही आपल्या गांवीं जातों. तुम्हीहि शांतपणे आपल्या कामाला लागा.'

मोकळे सुटल्यानंतर आम्ही मुकाटपणें यावली सोडून अमरावतीला परत जाऊं असें आश्वासन मेल्ड्रन यांनी दिल्यानंतर, तुमची सुटका करण्यांत आली आहे असें लोकांच्यातर्फे त्यांना सांगण्यांत आलें. लोकांची प्रामाणिक समजूत ही झाली कीं, अधिकाऱ्याच्या वृत्तींत आता खरोखरच फरक पडला आहे. प्रतिकाराच्या तेजाने डोळे दिपल्यामुळे ते शुद्धीवर आले आहेत आणि आश्वासन दिल्याप्रमाणे दगाफटका न करता ते परत जातील. त्यांच्या आश्वासनाने लोक शांत झाले होते. त्यांनी आपणहून लढाई अंगावर घेतली नव्हती. त्यांच्या स्वाभिमानास अधिकाऱ्यांनीच डिवचलें होतें. त्यांनीच त्यांच्यावर आक्रमण केलें होतें. त्यांनीच त्यांना प्रतिकार करण्यास भाग पाडलें होतें. अशी परिस्थिति असल्यामुळे लोकांनी आपल्या शौर्याचें पाणी दाखवून दिलें, पण साहेबांनी शरणागति पत्करल्यानंतर आणि मुकाट्याने निघून जाण्याचें आश्वासन दिल्यानंतर मुद्दाम भांडण लांबविण्याचें त्यांना कारण नव्हतें. त्यांना शांतताच हवी होती आणि अहिंसकवृत्तीचा त्यागहि त्यांनी केलेला नव्हता. तसें जर नसतें तर ब्रि० सरकारचे तीन तीन बडे अधिकारी हातांत गवसल्यानंतर विवेक नष्ट झालेल्या, बेफाम बनलेल्या, तोल सुटलेल्या लोकांनी प्रकरणें कोणत्या थरास नेलीं असतीं हें सांगण्याची गरज नाही. यावलीच्या लोकांनी शूरता दाखविली, पण अंतःकरणाची समता ढाळूं दिली नाही आणि मोठ्या संयमाने व शिस्तीने वागून विजय मिळविल्यानंतरहि प्रतिपक्षाची बेअदबी न करतां त्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून त्याला मुक्त केलें व गांव सोडून जाण्यास परवानगी दिली.


प्रकरण ४ थें

तिरंगी ध्वजाची लढाई


विजयानंदात लोक गर्क होते. आपल्या औदार्याचा अभिमान त्यांना अधिक फुलवीत होता. बहुतेक सारा समाज गांधी चौकाच्या उत्तरेकडील मुखाशीं मंदिराच्या आसपास जमा झालेला होता. म. गांधींच्या नांवाने जय जयकारांमागून जयजयकार चालू होते. धोका होण्याची कोणालाच कल्पना नव्हती. पराभूत झाल्यानंतर शरण आलेला शत्रु खरोखरच मुकाट्याने परत जाईल अशी लोकांची अपेक्षा होती. पण ती विफल ठरली. शत्रूने धोकेबाजी केली. शरण आल्याची भाषा ही केवळ एका विशिष्ट अडचणीच्या प्रसंगांतून सुटण्यासाठी योजलेली युक्ति ठरली. साम्राज्यशाहीचे हस्तक इतक्या लवकर पराभव मानायला तयार नव्हते. त्यांच्या रायफलींची ग्वाज अजून जिरली नव्हती. अग्निवमन करण्यासाठी अजून बरींच काडतुसें शिल्लक होतीं. विजयानंदाच्या भरांत लोकांनी त्यांना पुरतें निःशस्त्र केलेलें नव्हतें.

खुषामतीची, शरणागतीची व पश्चातापाची भाषा वापरून लोकाच्या हातून आपली व आपल्या साथीदारांची सुटका करून घेतल्यानंतर व अशा रीतीने लोकांना बेसावध केल्यानंतर डेप्युटी कमिश्नर मेल्ड्म हा आपल्या साथीदारांसह व पोलिस दलासह जाण्यासाठी म्हणून परत फिरला. सुमारें २५–३० कदम मागे गेल्यावर थबकून सर्वांनी विचारविनियम केला. झालेल्या पराभवाचा सूड घेण्याची वृत्ति पुन्हा त्यांच्या ठिकाणीं डोकावूं लागली. पराभवाचा सूड हा घेतलाच पाहिजे !! त्यांनी निर्धार केला.

झालें इतक्या बलिदानाने यावलीच्या रणचंडीचा संतोष झालेला नव्हता. इतक्याशा बलिदानाने प्रसन्न होण्याइतकी स्वातंत्र्यदेवी सुलभ नाही. आणखी एकवार यावलीच्या जनतेकडून प्रतिकाराचें दिव्य घडवून आणण्याचा तिने



ता. १८ आगस्ट १९४२ च्या गोळ्या खाऊन जखमी झालेले वीर



ता. १८ आगस्ट १९४२ च्या गोळीबार खटल्यांतील आरोपी.

निश्चय केला. त्याशिवाय यावलीचें खरें तेज प्रकट होणार नाही, यावलीचें सोनें किती बावन्नकशी आहे, याची त्याशिवाय परीक्षा होणार नाही असेंच जणूं काय तिला वाटलें !

रायफली व रिव्हाल्व्हर्स भरण्यांत आलीं. धाड! धाड!! गोळ्या मागून गोळ्या सुटूं लागल्या. शहीद तुळशीराम तडस गोळी लागून पडला. रामचंद्र भोजनेहि पडला. यानंतर, धडाधड कोणाच्या हाताला तर कोणाच्या छातीला, कोणाच्या पोटाला तर कोणाच्या डोळ्याला गोळ्या लागूं लागल्या. अकस्मात् झालेली धोकेबाजी लोकांच्या ध्यानांत आली. आता या आमना सामना युद्धांत उभें राहणें म्हणजे निव्वळ मरण ओढवून घेणेंच होतें.

लोकांची पांगापांग सुरू झाली. जाणाऱ्या लोकांनी जखमी लोकांना उचलून नेलें. क्षणमात्रांत गांधी चौक निर्जन बनला. प्रतिपक्षाने आपला पवित्रा बदललेला पाहून लोकांनीहि आपला पवित्रा बदलला. आता गनिमी काव्याचें युद्ध सुरू झालें. आता गोफणीचें शस्त्र अमलांत येऊं लागलें. चाऱ्ही बाजूंनी दगडांची बरसात सुरू झाली. इतका वेळ माड्यांवर व घरांत बसलेले राखीव वीर आता लढूं लागले. साहेब चमकला, चरकला. यावलीस जातीने येण्यांत आपण आपल्या आयुष्यांत फार मोठी चूक केली असेंच त्याला जन्मभर वाटत राहील.

प्रतिपक्षाने केलेली ही उघड उघड धोकेबाजी पाहून साऱ्या गांवभर एकच हाका सुरू झाला. 'मारा' 'मारा' 'मारा' 'मारा' चा मारा सारखा साहेबांच्या कानावर आदळूं लागला. आता पुनश्च मागे सरकण्याचा प्रसंग त्याच्यावर आला होता. परंतु गांधीचौकांत डौलाने फडकत असलेलें तिरंगी निशाण त्याच्याने पहावत नव्हतें. त्याचें अपहरण करण्यासाठी थोड्यावेळा पूर्वीच डी. एस. पी. प्रॅट याने दोन बळी घेतले नव्हते काय? त्याचें अपहरण करण्याचें कर्म करीत असतांना तुळशीराम अंबडकाराने त्याला नारसिंह दाखवून जमीनदोस्त केलें नव्हतें काय? तिरंगी ध्वजाचें हें शल्य त्याच्या काळजाला घरें पाडीत होतें. गांधी चौक आता निर्जन झाला आहे हें पाहून त्याला दुर्बुद्धि सुचली. ज्या तिरंगी ध्वजाचे मघाशी तो आपल्या पराक्रमाने अपहरण करूं शकला नाही तो आतां चोरून आणण्याचें त्याने ठरविलें. त्याने गांधी चौकांत पळत

जाऊन ध्वज चोरून आणला आणि पुन्हा तो आपल्या दलांत सामील झाला. ध्वज रोंव्हन्यू इन्स्पेक्टरजवळ देऊन पुन्हा तो हत्याकांड गाजवूं लागला.

जनतेपैकी कोणाचें तरी ध्वजाकडे लक्ष गेलें. स्तम्भावर ध्वज नाही. गांवांत एकच आरोळ माजला. 'झेंडा दुष्मानाने नेला' 'झेंडा आणला पाहिजे. ध्वज हा आपल्या गांवाची इज्जत आहे. ती परत मिळविलीच पाहिजे. शत्रूच्या हातांतून ध्वज सोडविलाच पाहिजे. आम्ही मघाशी गांधी चौकांत लढलों तें व्यर्थच होतें काय? आम्ही इतकें बलिदान केलें तें फुकट घालविण्यासाठी काय? अशा तऱ्हेने शत्रूला झेंडा नेऊं देण्यासाठीच आतांपर्यंत आम्ही आपल्या शौर्याचा सडा सांडला काय? नाही! आम्ही आपला ध्वज नेऊं देणार नाही. पुन्हा बलिदान करूं. पुन्हा रक्त सांडूं. पुन्हा लढाई देऊं. हातघाईची लढाई करूं. पण ध्वजाच्या रूपाने गांवाची इभ्रत जाऊं देणार नाही. यावलीला कलंक लागूं देणार नाही.'—

या दुसऱ्या लढाईत घरांच्या आडून व माड्यावरून गोफणींच्या साह्याने लढणारा एकेक वीर हातांत लाठ्या गोफणीं व भाले घेऊन पुन्हा मैदानावर येऊं लागला. गोफणमार जबरदस्त होऊं लागला. शत्रु कासावीस होऊन मागे मागे सरकूं लागला. आता तो पळूंहि लागला. मोतीरामजी तेली यांच्या दुकानासोरच्या चव्हाट्यावर तो आला, तेव्हा त्याच्यावर चारही बाजूंनी गोटमार बरसूं लागली. तीन रस्त्यांनी तरुण मंडळी येतांना दिसूं लागली. पुन्हा त्याने रायफलींत काडतुसें भरलीं. पुन्हा गोळ्या मारण्यास प्रारंभ केला. मोतीरामजी पांचघरे यास पोटांत गोळी लागून तो शहीद झाला. त्यासरशी नथ्थुजी लंगडे यांनी त्याला उचलून पांचघरेच्या बैठकींत ठेवलें. जैश्रीरामजी वासनकार पडला. तुळशीराम टेकाडे गुढग्यावर घायाळ झाला. अभिमानजी यावलेच्या तोंडावरच गोळी लागली. राष्ट्रध्वजाच्या मुक्ततेसाठी बाहेर पडलेला एकेक वीर पुन्हा कामास येऊं लागला.

आपला एकेक वीर पडतो आहे, यावलीच्या गळ्यांतील एकेक मोती गळतो आहे हें पाहून लोकांचा त्वेष आणखीच भडकला. त्यांच्या गोफणी अधिक वेगाने काम करूं लागल्या. शत्रूच्या डोक्यावर, पाठीवर, पायावर, हातावर, मस्तकावर दगडामागून दगड लागूं लागले. शत्रू घायाळ होऊं

लागला. अधिक सुरक्षित जागा तो शोधूं लागला. अल्पावधींतच स्वतःचा बचाव करण्याची आवश्यकता त्याला भासूं लागली. मोतीरामजी तेली यांच्या दुकानापासून पळत जाऊन त्याने राधाबाई पांचघरीनच्या घराचा कोपरा गांठला आणि तेथून पुनः त्याने गोळ्या झाडण्यास प्रारंभ केला. लोक आता गांधी चौकाच्या बोळांतून पुढे येऊं लागले. विहिरीपाशी डोकावून गोटमार करावी व गोळ्या येऊं लागल्या की भिंतीआड लपून त्या चुकवाव्या असा क्रम सुरू झाला. पण झेंडा कसा हस्तगत होणार ? त्यासाठी धैर्याने पुढेच गेलें पाहिजे. साक्षात् झोंबाझोंबी केल्याशिवाय झेंडा परत मिळवितां येणार नाही. लक्ष्मण कलाल पुढे सरसावला, पण गोळी खाऊन पडला. गणपत यावलेने हिंमत केली त्यासहि गोळी लागली. बळीराम बोराळेने धाडस बांधलें. त्याची ही तीच गत झाली. गोटमारींत बापूराव खाटीक याने विलक्षण कौशल्य दाखविलें. त्यांचे अखंड परिश्रम पाहून त्यांच्या घरच्या लोकांनी त्यास घरांत नेऊन कोंडून ठेवलें. पण तो दार फोडून बाहेर धाऊन आला व पुन्हा आपल्या गोफणीचा प्रसाद प्रतिपक्षाला देऊं लागला.

दक्षिण दिशा खरोखरच यमाची दिशा ठरली. तिकडून पुढे येणारा प्रत्येक वीर धराशायी झाला.

हें पाहून पश्चिमेकडील तरुण पुढे सरसावूं लागले. पश्चिमेकडून येणारा आघात पाहून शत्रु आणखी मागे सरकला. राधाबाई पांचघरीनच्या घराजवळून मागे सरकून तो तिच्या कोठ्याच्या कोपऱ्यावर आला; आणि तेथून पुनः पवित्रा बांधून व निशाण साधून मारगिरी करूं लागला. राजारामजी पांचघरे यांच्या घराकडून लोक सरसावूं लागले. उदेभानजीच्या कोठ्यापर्यंत नारायण खवले येऊन पोहचला. हें पाहून त्याच्यावर नेम धरून गोळी मारण्यांत आली. पण ती त्याच्या लाठीस लागून निसटली व मागील भिंतींत शिरली. नारायण खवलेची गोळी चुकलेली पाहून त्याच्यावर दुसरी गोळी मारण्यांत आली. नारायण एकटाच पुढे चाललेला पाहून त्याच्या मदतीस कृष्णराव पवार व रघुपत देशमुख धावून येऊं लागले होते. दुसरीहि गोळी नारायण खवले याने चुकविली, परंतु ती कृष्णराव पवार याच्या डोळ्यावर लागून रघुपत देशमुखच्याहि खांद्यास चाटून गेली. पुढे जैराम बासनकर येत होता. त्याच्याहि हातास एक

गोळी लागून तो जखमी झाला. कृष्णराव पवार पडला हें ऐकून त्याचे मामा रामराव टाकोने यांनी एक भाला हातांत घेतला व ते घराच्या बाहेर पडले व पाटलाच्या घरावर चालून गेले. 'कुठें आहेत ते साहेब लोक?'–रामराव विचारूं लागले. इतक्यांत पटवारी त्यांना दिसला. पण तो त्याचा भल्लभधारी अवतार पाहतांच पळून गेला.

पुन्हा एकवार रणांगणावरून जखमी वीरांना उचलून नेण्यासाठी शुश्रूषापथक धावलें. भराभर जखमी लोक उचलण्यांत येऊं लागले. या खेपेस शुश्रूषा करण्याची व त्यांना मलमपट्टी बांधण्याची कामगिरी यावलीच्या भगिनींनी अंगावर घेतली. जखमी वीरांना त्या सांत्वन देऊं लागल्या. इकडे गांवाच्या पश्चिमेच्या बाजूने लांबच्या शेतावर गेलेल्या लोकांना आतापावेतो गांवावर कोण अनर्थ गुजरला आहे याची सूचना मिळाली. ते तसेच शेतांतील आपआपलीं कामें टाकून गांवांत धाऊन आले. ताज्या दमाची नवी कुमक गांवास मिळाली. पुन्हा सर्वांचा जोष चढूं लागला. लोक संघटित होऊं लागले. पुन्हा एकवार आक्रमण शत्रूवर गोफणगोट्यांचा चौफेर मारा सुरू झाला.

कृष्णराव पवार हा यावलीकरांचा आवडता तरुण होता. १६ तारखेला आलेल्या दरवडेखोरांच्या टोळीचा त्यानेच हिंमतीने प्रतिकार केला होता. त्यामुळे घरांघरांतून त्याच्या बहाद्दरीचीं स्तोत्रें गायलीं जात होतीं. आज पुन्हा त्याने परकीय चोरांपासून आपल्या राष्ट्रध्वजाची मुक्तता करण्यासाठी हिरीरीने रणांगणावर पाऊल टाकलें होतें. शत्रूच्या गोळीस तो बळी पडला होता. 'हुतात्मा वीरोंकी जय' हा त्याचा गोळी लागून पडल्यानंतरचा जयघोष लोकांच्या कानांत दुमदुमत होता. त्याचें बलिदान पाहून लोक अधिकच खवळले. याप्रमाणे लागोपाठ तीन वीर पडले. तरी बारकाजी तडस हा पुढेच जात राहिला. बंदुकीच्या गोळ्या चुकविण्यांत त्याने जी शिताफी दाखविली तिचें स्मरण झालें म्हणजे यावलीकर अजून मुग्ध होतात. असें म्हणतात की, एकट्या बारकाजीला अनुलक्षून आठ दहा तरी गोळ्या मारण्यांत आल्या. पण त्या सर्व त्याने चुकविल्या व आपल्या गोफणीचा मार करीत अखेरपर्यंत तो आघाडीवरच राहिला.

पुन्हा गोफणगोट्यांची जोरदार मारगिरी चौफेर सुरू झाली. राधाबाई पांढरीणच्या गोठ्याजवळील जागा देखील शत्रूला सुरक्षित वाटेनासी झाली.

तो आणखी मागे पळूं लागला. पळत पळत त्याने आनंद आकाजी पाटलाच्या घराच्या मागील दारास असलेल्या पायऱ्या गाठल्या. दार बंद होतें. दगडांची चौफेर बरसात सुरूच होती. आपल्याजवळ शिलकी असलेल्या गोळ्या आता किती थोड्या आहेत याची कल्पना येऊं लागल्यामुळे शत्रूची अधिकच गाळण उडूं लागली. पांच गेले आणि सात राहिले अशी त्याची स्थिति होऊं लागली. तो निकडीनें पाटलाच्या घरांत संरक्षण घेण्याचा प्रयत्न करूं लागला.

पाटीलणबाई घरांतच होत्या. गांवात चाललेला प्रकार त्यांना कळला नसेल काय ? आपल्या पतीने घडवून आणलेलें हें आक्रमण व केलेला ग्रामद्रोह त्यांस पसंत असेल काय ? आक्रमण व प्रत्याक्रमण, लाठीमार, गोफणमार, व गोळीबार यांचा दणदणाट व थडथडाट त्यांना ऐकूं येत नसेल काय ? आपल्या गांवांतील उडालेल्या रक्ताच्या चिळकांड्या आणि तरुण मुलांचे होत असलेले खुनामागून खून त्यांस दिसत नसतील काय ? या सर्व गोष्टी पाहून व ऐकून त्यांच्याहि हृदयांत कांही कालवाकालव होत नसेल काय ? आपल्या गांवांत येऊन रक्ताचा सडा सांडणाऱ्या या लोकांना घरांत प्रवेश करूं द्यावा की नाही, याबद्दल त्यांच्या चित्तावर कांहीच तरंग उठत नसेल काय ? पाटलीण बाईच्या या विशिष्ट प्रसंगींच्या मनोव्यापाराचें पृथक्करण करण्याचा प्रयत्न करणें मनोरंजक होणार आहे. परंतु तो पृथक् विषय आहे. प्रस्तुत ठिकाणीं संदर्भ इताकाच की, एका बाजूने पळपुटे ब्रि. अधिकारी दार उघडण्यासाठी अत्यंत काकुळत्या करीत होते, तर दुसऱ्या बाजूने दार उघडण्यास विलंब होत होता. प्रसंग अतिशय कठिण होता. दार उघडण्यास लागणारा पळापळाचा विलंब पळपुट्यांचा जीव कासावीस करीत होता. अखेरीस असें म्हणतात की, पाटलाने फारच विनवण्या केल्या आणि पतीच्या आज्ञेनुसार त्या आर्यस्त्रीने दार उघडून देशद्रोह्यांना घरांत घेतलें.

ते घरांत घुसत होते. इतक्यांत लोक जवळ येऊन ठेपलेच. गोट्यांचा वर्षाव सुरू झाला. घासलेट तेलाचे डबे शोधण्याची भाषा याच वेळीं बोलली जाऊं लागली. कित्येकांचा त्वेष इतका कळसास जाऊन पोचला की, पाटलाचें घरचें घर फुकून देण्याची गोष्ट ते बोलूं लागलें. परंतु लोकांनी संयम राखला. आततायीपणा केला नाही. पाटलाच्या घरांत गेल्यावर आक्रमकांनी घराच्या

माडीवरून पटवाऱ्याच्या मुखाने लोकांना शांत राहाण्याचा उपदेश केला. पटवारी कांहीतरी बोलतो आहे हें पाहून त्याचें बोलणें ऐकण्यासाठी राजारामजी पांचघरे पाटलाच्या घराच्या मागील बाजूजवळ गेले. पटवारी शांततेचा उपदेश करूं लागला. राजारामजींनी त्यांस स्पष्टपणें सांगितलें की,—'तुम्ही लोकांचा झेंडा चोरून आणला आहे. त्यामुळे लोक भडकले आहेत. झेंडा परत केल्याशिवाय ते मुळीच शांत होणार नाहींत. झेंडा ताबडतोब परत करा.' परंतु ही गोष्ट त्या हट्टी अधिकाऱ्यांना रुचली नाही. झेंड्यासहित पाटलाच्या घरांतून पलायन करण्याचा ते विचार करूं लागले.

पाटलाच्या घरीं पाणी वगैरे पिऊन त्यांनी पलायन करण्याचा विचार पक्का ठरविला. लोकांची गोफणमार चालूच होती. झेंड्याची गोष्ट गांवभर पसरली होती. लोकसमाज उत्तरोत्तर अधिक क्षुब्ध होत चालला होता. एक तर सरकारी दलाने उघड धोकेबाजी केली होती. आम्ही परत जातों असें आश्वासन देऊन त्यांनी लोकांच्या अटकेंतून आपली सुटका करून घेतली व पुन्हा लोकांवरच उलटून गोळीबार सुरू केला होता. दुसरें लोकांना प्राणाहून प्रिय असा त्यांचा तिरंगी ध्वज त्यांनी चोरून आणला होता. ध्वज खरोखरच लोकांना प्राणापेक्षाहि कसा प्रिय होता हें, त्याच्या मुक्ततेसाठी त्यानी आतां पर्यंत जें बलिदान केलें, त्यावरून सिद्ध झालें होतें. तेव्हा लोकसमाजाला प्रक्षुब्ध होण्यासाठी प्रबळ कारणें होतीं. लोकक्षोभाचें हें वाढत्या प्रमाणातील रौद्र स्वरूप पाहून आणि आपल्याजवळील काडतुसें किती मर्यादित उरलीं आहेत हें ध्यानांत येऊनच मेल्ड्रमप्रभृति आक्रमणकाऱ्यांनी आता चोरून पळून जाण्याचा नामुष्कीचा विचार ठरविला होता. मघा लोकांनी त्यांना सन्मानाने सोडून दिलें होतें व तेव्हाच निघून जाण्यांत त्यांची भलाई व माणुसकी होती. पण माणुसकीला त्यांनी केव्हाच फाटा दिलेला असल्याने आता चोरासारखें पळून जाण्याशिवाय त्यांना अन्य गति उरलेली नव्हती—अस्तु.

झेंड्याचा आरोळ सर्व गांवभर झाला. पाटलाच्या घरांतून पळून जाण्याचा प्रयत्नहि गांवकरी लोकांच्या ध्यानांत आला. पाटलाच्या घराच्या मागच्या बाजूला जो समाज जमूं लागला होता तो अधिकाधिक उतावीळ होत होता. पाटलाच्या घराचीं दारें तो ठोठावूं लागला. दरवाजे फोडा, पोलीसांना

पकडा, धराला आग लावा—असेंहि कित्येक ओरडूं लागले क्षणाक्षणानें आपलें जीवित धोक्यांत आहे, हें आंतील पळपुट्यांच्या ध्यानांत आलें, त्यांनी ताबडतोब पाटलांच्या घराच्या खिडकींतून ज्या बाजूने लोक दिसत नव्हते त्या बाजूने केशवरावच्या घरांत उड्या मारल्या व रस्ता गाठून ते पळूं लागले. तरी लोकांना त्यांची चाहूल लागलीच. राजारामजी पांचघरेप्रभृति लोक तडक त्या बाजूला जाऊन त्यांचा पिच्छा करूं लागले. रेव्हिन्यु इन्स्पेक्टरच्याजवळ झेंडा आहे असें पाहून राजारामजी पांचघरेनीं त्यास पकडलें व अखेरीस झोंबाझोंबी करून त्यांचे जवळून झेंडा हिसकावून घेतला व ते आपल्या घरीं निघून आले.

इकडे मेल्ड्रम प्रभृति मंडळी पाटलाच्या घरांतून उड्या मारून गांवाच्या बाहेर पळून जात आहेत ही बातमी पुन्हा गांवभर पसरली. राजारामजी पांचघरे यांनी झेंडा काबीज केला आहे हें कळण्याच्या आंतच झेंडा सोडवून आणावयाचाच, या निश्चयानं गांवातील दोन तीन जमाव पळपुट्या सरकारी अधिकाऱ्यांचा पाठलाग करूं लागले.

गोळ्या वेताच्याच उरल्या होत्या. त्यामुळे थोडा वेळ पळावें, पुनः मागे वळावें, एखादी गोळी जमावावर झाडावी व समाज थबकला म्हणजे पुनः पळावें असा क्रम आक्रमकांनी सुरू ठेवला. या पाठलागांत नत्थुजी खवले हा खांद्यावर गोळी लागून दडला. साहेब मंडळी व त्यांचे अनुचर कसेबसे नदीपर्यंत येऊन पोहचले होते. अशा रीतीने राष्ट्रध्वजासाठी झालेल्या या दुसऱ्या लढाईतहि यावलीची जनता जिंकली व ब्रि० सरकारचे अधिकारी पूर्णपणे पराभूत झाले. पलायनाचा मार्ग स्वीकारून त्यांनी पराभव कबूल केला. यावलींचें शौर्य अप्रतिम ठरलें. राष्ट्रध्वजाची इभ्रत कायम राहिली व ब्रि० सरकारची सारी इभ्रत व दरारा आमनासामना लढाईत धुळीस मिळाला.

प्रकरण ५ वें

मुसलमान पितापुत्रांचा पराक्रम

'झेंडा घेऊन शत्रू पळाला'—असा एकच आरोळ गांवभर उठला होता. झेंडा जाऊं देणें ही नामुष्कीची गोष्ट आहे असें प्रत्येकास वाटूं लागलें.

थकला भागलेला राजारामजी पांचघरे झेंड्याची मुक्तता करून व झेंडा घेऊन आपल्या घरीं गेला आहे याची कोणालाच जाणीव नव्हती. प्रत्येकजण झेंड्याची सुटका करण्याच्याच फिकीरींत होता. गांवातील सामर्थ्यशाली तरुणांचा बराच मोठा भाग आतापर्यंत लढून थकला होता. त्यांच्यापैकीं कितीतरी वेचक वीर कामास आले होते. कोण पडला, कोणास जखम झाली, कोणास मलमपट्टी करावयाची आहे इत्यादि बातम्या गांवांत पसरत होत्या.

गांवांतील तरुणांनी अशा तऱ्हेने आपलें तारुण्य राष्ट्रध्वजाच्या रक्षणासाठी व मुक्तेसाठी सार्थकीं लावलें आहे हें पाहून सत्तर वर्षांचा म्हातारा मुसलमान फकीर अकबरशाहा हा पुढे सरसावला. त्याने तरुण कार्यकर्त्यांना व वीरांना विश्रांति देण्याचें ठरविलें, आणि गांवांतील बाकीचा समुदाय जमा करून आपल्या ध्वजाच्या सुटकेसाठी, पळून जाणाऱ्या मेल्ड्रम प्रभृति अधिकाऱ्यांचा पाठलाग करण्याचें त्यानें ठरविलें. मोठ्या त्वेशाने तो लोकांना घेऊन नदीच्या रोखाने धाऊन आला आणि पळपुटे लोक गोफणीच्या टप्प्यांत आलेले पाहतांच त्याने जबरदस्त मारा सुरू केला.

यावलींत चाललेल्या गोळीबारांचे आवाज नदीच्या पैलतीरावर असलेल्या नरसिंगपुरच्या लोकांना ऐकूं जात होते. त्यावरून यावलींत चालू असलेल्या प्रकाराची कल्पना त्यांना येऊं लागली होती. पंधरा तारखेच्या सत्याग्रहांत त्यांनी यावलीकरांबरोबर भाग घेतला होता. १८ तारखेला यावलीवर ओढवलेल्या संकटाची जाणीव होऊन गोळीबार प्रकरणांतहि यावलीची मदत करण्याचा त्यांनी निर्धार केला. नरसिंगपुरचेहि लोक जमा झाले. त्यांनी कुऱ्हाडी, लाठ्या इत्यादि उपकरणें हातीं घेतलीं आणि मोठा जमाव करून यावलीकरांच्या साह्यार्थ ते धावून येवूं लागले. आनंदाआकाजी पाटलाच्या घरांतून पळ काढून मेल्ड्रमचें दल नदीच्या कांठावर जें येऊन पोहोंचते तोंच त्यास नरसिंगपुरच्या नरसिंहाचा जमाव आपल्याच रोखाने चाल करून येत आहे, असें आढळून आलें. इकडे ७० वर्षांचा वृद्ध अकबरशहा फकीर एक जमाव संघटित करून येत होता. तिकडे नरसिंगपुरचा दुसरा जमाव येऊं पाहात होता. या दोन जमावाच्या कोंडीत आपण सांपडूं की काय अशी भीति अधिकाऱ्यांना वाटूं लागली. म्हणून त्यांनी उरलेल्या गोळ्या वापरून प्रथम एक

जमाव हटविण्याचें ठरविलें. अकबरशहा फकीराचा जमाव अधिक जवळ होता. शिवाय गोफण गोट्यांची मारगिरीहि त्याने चालविली होती. म्हातारा फकीर आघाडीवर राहून सर्वांना स्फुरण देत होता. त्याचा त्यावेळचा आवेश व राष्ट्रध्वजाच्या सुटकेसाठी त्याला लागलेली तळमळ अवर्णनीय होती. 'पकडो. झेंडा छुडाके लाव.' वृद्ध फकीर गर्जत होता. त्याचें तें असामान्य धैर्य पाहून प्रतिपक्षीही चकित झाला होता.

प्रथम अकबरशहाचा बीमोड करणें अवश्य आहे असें ठरवून प्रतिपक्षानें त्याच्यावर गोळ्यांचें संधान करण्यास सुरुवात केली. एक गोळी मोठ्या शिताफीने चुकवून म्हातारा पुनः पुढे सरसावला. 'पकडो. पकडो, झेंडा छुडाके लाव' चा घोष तो करीत होता आणि दगडांचा वर्षाव करण्यासाठी तो आपल्या अनुयायांना प्रोत्साहित करीत होता. म्हाताऱ्याचा आघाडीवरचा तो आवेश कोणाचेंही लक्ष वेधून घेण्यास पुरेसा होता. सार्जंट क्वीन याने रायफल हातांत घेतली आणि नेम बांधून गोळी मारली. ती अकबरशहाच्या हातास लागली. म्हातारा जमिनीवर पडला.

अकबरशहास पडलेला पाहून त्याचा तरुण पुत्र मेहताबशहा पुढे झाला. त्याने बाप पडल्यामुळे घसरूं लागलेली बाजू भरून काढली. बापाची आघाडीवरील जागा घेऊन तो लोकांना स्फुरण देऊं लागला. अधिकाऱ्यांचा पाठलाग करूं लागला. साहेब आणि मंडळी पळत होती व मधून मधून गोळ्याहि मारीत होती. यावेळीं त्यांनी नदी ओलांडली होती आणि गांवकरी मंडळी नदीपर्यंत येऊन पोहोंचली तेव्हा, साहेब आणि मंडळी बाबू शेटच्या (रामकिसनजीच्या) फडापर्यंत जावून पोहोंचली असतील. अकबरशहा पडला तरी पडल्या पडल्याच तो 'दुस्मनको पकडो. झेंडा छुडाके लाना बेटा' असे स्फूर्तीचे आवाज देतच होता. आघाडीवरील मेहताबशहा समुदायबरोबर घेऊन गोटमार करूं लागला होता. तोच त्यासहि एक गोळी लागली व तो नदींत पडला. नदी रक्ताच्या पाण्याने लाल होऊन वाहूं लागली. लोकांनी दोघांहि पितापुत्रांना उचललें; त्यांच्या जखमा धुतल्या व त्यांना उचलून ते गांवांत निघून आले. अकबरशहा व महेताबशहा ही पितापुत्रांची जोडी आपल्या राष्ट्रप्रेमाने व पराक्रमाने यावलीच्या इतिहासांत अमर झाली. स्वातंत्र्यांच्या इतिहासांतच त्यांचें नांव चिरंजीव राहील !

साहेब पळणार हें पाहातांच, पूर्वी कामदार महारांनी नदी उतरून जाण्यासाठी जीं लांकडें टाकलीं होतीं तीं गावकऱ्यांनी काढून टाकलीं. त्यामुळे नदी उतरतांना मेल्ड्म प्रभृतींचे फार वाखे झाले. नदीच्या दलदलींत तो फसला. बाकीचे लोक पाठलाग करणारांच्या भयाने झपाट्याने निघून पुढे गेले. हा एकटाच दलदलींत फसला. इतक्यांत बारक्या वल्लद शिवराम नांवाचा तरुण मुलगा त्याला दिसला. त्यानंतर घडलेला प्रकार सदर्हु बारक्या मराठ्यानें एक पत्र पाठवून लेखकाला कळविला आहे. तो लिहितो " ता. १८–८–४२ ला यावलीवरून डी. सी. आपल्या पार्टीसह पळून जात असतांना नदीवर मी तेथे उभा असतांना मला तेथें बोलाविलें व म्हणाले,—"तुम लोक बहोत बहादूर हो। हम हार गये। और तुमने जीत लिया। अब तुम वापस घर लौट जाव. और हम इधर जाते हैं।" यावर मी त्यांना म्हटलें, " आपने तो बहोत आदमी मार डाला। और हमको कहते की, वापस चले जाव! कैसा हो सकता।" यावर डी. सी. म्हणाले,—"ओ कुछ नही! तुम चले जाव !!" याप्रमाणें म्हणून ते पळून गेले. व नंतर गोळ्या झाडल्या. याप्रमाणें त्याचें माझ्याशीं केविलवाण्या स्वरांत बोलणें झालें."

प्रकरण ६ वें

अमर शहीद राजारामजी औरंगपुरे

डेप्युटी कमिश्नर मेल्ड्म, डी. एस. पी. प्रॅट, सार्जंट क्वीन वगैरे सरकारी मंडळी ज्यावेळीं नदींतून पलीकडे जात होती त्यावेळीं शेतावरून परत आलेले आणखी कांही लोक गांधी चौकांत जमा झाले होते. त्यांनी लांबूनच मेल्ड्म वगैरेंना पळतांना पाहिलें होतें. गांधी चौकांत आल्याबरोबर त्यांना दिसून आलें की, झेंडा स्तंभावर नाही. त्यांची अशी पक्की समजू झताली की, पळून जाणाऱ्या अधिकारी लोकांनीच झेंडा आपल्याबरोबर नेला आहे. या गोष्टीची राजारामजी औरंगपुरे यास अतिशयच चीड आली "आपला राष्ट्रीय ध्वज अशा तऱ्हेने हिरावला जावा ही मोठी खेदाची गोष्ट आहे. हा आपल्या गांवाच्या इज्जतीचा

प्रश्न आहे. काय वाटेल तें झालें तरी झेंडा परत मिळविलाच पाहिजे. साहेब मंडळी अजून फारशी दूर गेली नाहीत तोंच आपण त्यांना गाठूं-शकूं." इ० प्रकारें स्फूर्तिदायक भाषण करून त्यांनी गांधी चौकांत जमलेल्या त्या लोकांपैकी सुमारें १०,१२ लोक आपल्याबरोबर येण्यास तयार केले. कोणी कुऱ्हाडी बरोबर घेतल्या, कोणी लाठ्या घेतल्या. स्वतः राजारामजी औरंगपुरे यांनी घरांत जाऊन तलवार काढली आणि ती नंगी समशेर हातीं घेऊन तो सर्वांच्यापुढे वेगानें धाऊं लागला. राजारामजी औरंगपुरे व त्याचें हें शूर पथक गांवांतून बाहेर पडण्याच्या तयारींत होतें, त्यावेळीं मेल्ड्रम प्रभृति बाबूशेट (रामकिसनजी) मारवाडी यांच्या गोठ्यांतून बाहेर पडून वाघोलीच्या रस्त्याने पळूं लागले होते. औरंगपुरे आणि त्यांचें पथक यांच्यांत किमान फर्लांग दीड फर्लांगाचें तरी अंतर असेल. परंतु साहेब आणि मंडळी बरीच थकली होती. डे. क. मेल्ड्रम यास तर चालवतहि नव्हतें. पोलीस कान्स्टेबलस् त्याला आपल्या बगलेंत धरून कसेंतरी पळवीत होते. सर्वांचीच गति मंद मंद होत चालली होती. तर इकडे औरंगपुरे व त्याचें ताज्या दमाचें पथक त्यांचा भरधांव पाठलाग करीत होतें. औरंगपुरे यांचा त्यावेळचा आवेश व वेग तर फारच अद्भुत होता. बाबू शेटच्या गोठ्यापर्यंत पोंहचतां पोंहचतां त्याने आपल्या साथीदारांना तसेंच मागे टाकलें. राष्ट्रध्वज सोडवून आणावयाचाच या एकाच निर्धाराने हातांतील तलवार पाजळीत व फलांगीवर फलांगी मारीत तो सारखा पुढे पुढे धावत होता. त्याच्या जवळपास दशरथ मराठा हा एकटाच राहूं शकत होता. पूर्वीचे पाठलाग करणारे निघून गेले असले तरी हें नवीनच मांवकऱ्याचें पथक महान् वेगाने आपला पाठलाग करीत येत आहे हें पाहून साहेब आणि मंडळीचें धैर्य अगदीच विगलित होऊं लागलें. त्यांनी मुठींत प्राण धरून पळण्यास सुरुवात केली. पळतां पळतां मधूनच मागे वळून ते एखादी गोळी पाठलाग करणारांवर झाडीत होते.

बाबूशेट (रामकिसनजी) मारवाडी यांच्या फडांतून बाहेर पडतांना साहेब आणि मंडळी यांनी बाहेरील तारेच्या कुंपणाचें लोखंडी दार पाठलाग करणारास अडथळा व्हावा म्हणून पक्के बंद करून घेतलें होतें. औरंगपुरे व त्याचे तरुण सहाय्यक यांनी फाटकावरून भराभर उड्या मारल्या आणि ते

पुनः मेल्ड्रमप्रभृतींचा अतिशय जोराने पाटलाग करूं लागले. साहेब आणि मंडळी बाबूशेट यांचे गोठ्याजवळील वावरांतून पळतां पळतां सौंदडच्या झाडाजवळ आली असतील; त्यावेळीं राजारामजी औरंगपुरे हा देखील आपल्या बरोबरीच्या मंडळीला सुमारें २५ कदम मागे टाकून त्याठिकाणीं जवळपास येऊन पोंहोंचला. त्याचा सर्व रोख मेल्ड्रम याचेवर आहे हें ओळखून डी. एस. पी. व सार्जंट यांनी मेल्ड्रमला पुढे घातलें व ते स्वतः त्याच्यामागे राहून बचावाची तरतूद करूं लागले. सौंदडच्या झाडापासून ते कांहीसें दूर जातात न जातात, तोंच औरंगपुरे हा त्यांच्यापासून चारपांच हाताच्या अंतरावर जाऊन पोंहचला आणि आपल्या हातांतील तलवार सरसावून डी. एस. पी. व सार्जंट यांना डावलीत त्यानें मेल्ड्रमवर वार काढण्याचा प्रयत्न केला. पण तितक्यांत कान्स्टेबल लोकांनी मेल्ड्रमला आणखी थोडें पुढे पळविल्यामुळें तो वार निष्फळ ठरला. हें पाहून औरंगपुरे यांनी आणखी एक सफाईचा हात मेल्ड्रमवर मारला. परंतु त्याचा हात उद्दिष्टावर पडण्याच्या आधीच सार्जंट क्वीन याने जवळच्या कान्स्टेबलच्या हातांतील बंदूक आपल्या हातीं घेऊन व नेम धरून औरंगपुरेवर गोळी मारली. इकडे गोळी त्याच्या पोटांत घुसली आणि तिकडे त्याच्या तलवारीचा हात मेल्ड्रमच्या डोक्यास चाटून गेला, औरंगपुरे जमिनीवर पडला. साहेबहि जखमी झाला. इतर मंडळी अद्यापहि वीस पंचवीस कदम मागेच होती. परंतु दशरथ मराठा हा त्याच्या जवळपास येऊन पोहोंचला होता. आपला पुढारी अशा रीतीने गोळी खाऊन पडला आहे हें पाहून त्याने त्वेषाने आपल्या हातांतील कुऱ्हाड उचलून ती मेल्ड्रमच्या रोखाने फेंकून मारण्याचा प्रयत्न केला. परंतु ती सौंदडच्या झाडास अडली. पुन्हा कुऱ्हाड सरसावून दुसऱ्यांदा वार करण्याचा त्याने प्रयत्न केला तोंच पुन्हां सार्जंट क्वीन याने नेम साधला. दशरथनें नेम साधून कुऱ्हाड फेंकून मारली पण ती एका कान्स्टेबलास लागली आणि सार्जंटची गोळी लागून दशरथ मराठा खाली पडला. कान्स्टेबल लोक पुन्हा मेल्ड्रम यास बगलेंत धरून वेगाने पळूं लागले. पळतां पळतां मेल्ड्रम यास भयंकर ग्लानि आली. भिजवलेल्या कापडांतील पाणी वगैरे पाजून त्याची ग्लानि दूर करण्यांत आली व पुनः त्यास पळविण्यांत आलें.

इकडे औरंगपुरेच्या टोळींतील बाकीची मंडळी त्याचेजवळ येऊन पोहोंचली, तेव्हा तो व दशरथ मराठा दोघेही रक्तबंबाळ होऊन पडलेले होते.

आपला पुढारी गोळी लागून पडला आहे व प्रतिपक्षी बराच दूर निघून गेला आहे असें पाहून व जखमी लोकांना ताबडतोब उपचार करण्याची आवश्यकता जाणून त्यांनी औरंगपुरे व दशरथ मराठा यांना घेऊन परत फिरण्याचें ठरविलें. औरंगपुरे यास बाबूशेटचे गोठ्यांत ठेवण्यांत आलें व दशरथला त्याच्या घरीं पोहचविण्यांत आलें. वस्तुतः औरंगपुरे यास झालेली जखम एवढी मोठी होती व त्याचा रक्तस्त्रावहि इतका विपुल झालेला होता की, त्यास कोणतीच शुद्ध असणें शक्य नव्हतें. जखम धुवून पट्टी बांधण्यांत आली. पाणी पाजण्यांत आलें. किंचित्शी शुद्ध आल्यासारखी झाली. तेव्हा तो बडबडू लागला. बडबडूं लागला म्हणण्यापेक्षां अत्यंत क्षीण स्वरांत तो पुटपुटत होता. असें म्हणणेंच जास्त योग्य होईल. तो म्हणत होता. "मरणाचें दुःख मला मुळींच वाटत नाही. आपल्या राष्ट्रध्वजाकरतां शूरपणें लढतां लढतां मला हें वीराचें मरण प्राप्त होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु दुःख एकाच गोष्टीचें वाटतें की, आपला यावलीचा राष्ट्रध्वज मी परत आणूं शकलों नाही. ज्या ध्वजाकरितां एवढी लढाई दिली, गोळ्या खाल्ल्या, व बलिदान केलें तो ध्वज अखेरीस शत्रूंनी पळवून न्यावा याचेंच वाईट वाटतें. आम्ही भारतभूमीचे पुत्र हजर असतांना शत्रू आमचा झेंडा घेऊन जातो यापरता दुसरें कशाचेंहि दुःख मला वाटत नाही. केवढेंहि बलिदान झालें असतें आणि जर झेंडा परत मिळाला असता तर तें सर्व सार्थकीं लागलें असतें. आज आमचें बलिदान झेंडा परत न मिळाल्यामुळे व्यर्थ गेलें असें वाटतें. अशा स्थितींत मी कांहीच करूं शकत नाही. याचाच मला राहून राहून खेद होत आहे." इतकें व असें कांहींतरी पुटपुटल्यावर त्याला पुन्हा ग्लानि आली व तो बेशुद्ध झाला.

राजाराम औरंगपुरे याला गोळी लागून तो बाबूशेटचे गोठ्यांत आसन्न-मरण स्थितींत पडला आहे असें कळतांच गांवांतील बरेच लोक त्यास पाहाण्या-साठी तेथे आले. एकंदर वातावरण गंभीर होतें. विजयाचा आनंद व आपल्या तरुण मुलांच्या आत्यंतिक वियोगाचें दुःख अशा संमिश्र भावनेने सर्व उपस्थित समाज व्यथित होता. इकडे राजारामजी पांचघरे यांस गांवांत बातमी कळली की, औरंगपुरेप्रभृति तरुणांची टोळी, अधिकाऱ्यांनी आपला झेंडा नेला अशा समजुतीने त्यांचा पाठलाग करून झेंडा आणण्यासाठी गेली व या पाठलागांत

गोळी लागून औरंगपुरे पडला. मृत्युशय्येवर आपण झेंडा आणूं शकलों नाहीं या एकाच गोष्टीचें त्यास दुःख होत आहे

हें कळतांच झेंडा हातांत घेऊन राजारामजी पांचघरे पळतच निघाले व लगबगीनें बाबूशेटच्या गोठ्यांत औरंगपुरे यांना नेऊन ठेवलें होतें त्याठिकाणीं येऊन दाखल झाले. त्यांस तेथील लोकांनी औरंगपुरे यानें काढलेले उद्गार निवेदन केले. ते ऐकून राजारामजी पांचघरे यांचेहि डोळे भरून आले. कंठ गद्गदित झाला. झेंडा गांवांतच आहे, डी. सी. व डी. एस. पी. इत्यादि मंडळी पळून जात असतांना आपण झेंडा कसा परत आणला याची हकीगत औरंगपुरे यांच्या कानावर घालण्याचें त्यांनी ठरविलें. ही हकीगत ऐकून त्यांच्या चित्तास अतिशय समाधान वाटेल अशी त्यांची अपेक्षा होती व ती अर्थात् खरी होती.

म्हणून सभोंवारच्या लोकांनी औरंगपुरे याचे तोंडावर थोडें पाणी शिंपडलें आणि त्यास थोडें पाणी पाजून शुद्धीवर आणण्याचा ते प्रयत्न करूं लागले. राजारामजी पांचघरे यानी त्याच्या कानांत वारंवार ओरडून सांगितलें की, झेंडा गांवांतच आहे. मीं तो आणला आहे. शत्रूनें तो नेला नाहीं'. वारंवार उच्चारलेले पांचघरे यांचे हे शब्द ऐकल्यावर औरंगपुरे यांनी पुन्हा एकवार डोळे उघडले व ते म्हणूं लागले, 'काय ! झेंडा आहे ? खरं बोलतां तुम्ही ? खरंच शत्रूंनी झेंडा नेला नाही ?'—

त्यावर राजारामजी पांचघरे यांनी पुन्हा सांगितलें,–' होय. झेंडा आहे. डी. एस्. पी. ने तो मुनसरीम (रेव्हिन्यू इन्स्पेक्टर) जवळ दिल्यानंतर मीं त्याचेजवळून तो हिसकून आणला आहे. तुम्ही झेंड्याकरतां गेलात व तुम्हांस गोळी लागली हें कळल्यावर मी तुम्हांस दाखविण्याकरितां झेंडा बरोबर घेऊन आलों आहे. ' असें म्हणून बरोबर आणलेला झेंडा त्यांनी त्यांस दाखविला.

झेंडा, आपला राष्ट्रध्वज, डोळ्याने दिसतांच मृत्यूच्या द्वारांत उभा असलेल्या त्या वीर तरुणाच्या मुखावर आनंदाची छटा दिसूं लागली. त्यास समाधान झालेलें दिसलें. तो म्हणाला,–" झेंडा हें आपल्या राष्ट्राचें सौभाग्य आहे. हें सौभाग्य यावलीकरांनी फडकत ठेवलें. मीं त्यासाठीच आपलें प्राण खर्ची घातले. माझ्या मरणाच्यावेळीं तेंच आमच्या राष्ट्राचें सौभाग्य माझ्या

दृष्टीसमोर फडकत आहे हें पाहून मला अतिशय संतोष वाटला. शत्रूने झेंडा नेला नाही. तुम्हीं तो परत आणलात. फार आनंदाची गोष्ट झाली. आता मीहि आनंदानें मरतों. झेंडा पाहिल्यानंतर मला आतां कोणतेंच दुःख उरलें नाही". असें बोलून त्या क्रांतिवीराने आपला प्राण सोडला. उपस्थितांचा सर्व समाज त्याचें हें मरण पाहून ढळढळा अश्रू गाळूं लागला ! खरोखर औरंगपुरे यास वीरमरण आलें !! मरूनहि हा शहीद अमर झाला !!! त्याचें राष्ट्रप्रेम, राष्ट्रध्वजावरील त्याची प्रगाढ भक्ति, त्याचें अलोट धैर्य, त्याचा दिव्य पराक्रम आणि महान् त्याग व आत्मबलिदान यांच्या कथा पिढ्यानुपिढ्या यावलींत गायिल्या जातील. मरतेवेळीं त्याने उच्चारलेले शब्द यावलीकरांनी आपल्या हृदयावर कोरून ठेवले आहेत. त्यांचा शिलालेख वाचून भारतवर्षातील भावी पिढींना अखंड स्फूर्ति मिळत जाईल व ते औरंगपूरे यांच्या वीरमरणाचें नित्य स्मरण करीत आपल्या राष्ट्रध्वजाच्या संरक्षणासाठी असेंच आत्मबलिदान करण्यास तयार होतील. !!!

राजाराम औरंगपुरे यांच्या मृत्यूची बातमी त्यांच्या आईस समजली व ती त्याला पाहाण्यास आली. त्याला पाहिल्यावर तिनें एकच आकांत मांडला. ' माझीं तीनहि मुलें अशींच मृत्युमुखी पडलीं. आता मी कोणाकरिता जिवंत राहूं ? मीहि विहीरींत उडी टाकून आत्महत्या करीन.' अशा तऱ्हेने शोक करीत, ती विहीरीकडे जाऊं लागली. तिची ही विकल स्थिति पाहून तिच्यावर नजर ठेवण्यासाठी दोन बाया ठेवण्यांत आल्या. तिचीं दोन मुलें आधीच मेलीं होतीं व तिसरा तिचा एकुलता एक आधार राजाराम आज यावली येथील तिरंगी झेंड्याच्या युद्धांत शहीद झाला होता. म्हातारीच्या हृदयास होणाऱ्या व्यथा खरोखर अवर्णनीय आहेत !!!

प्रकरण ७ वें

उत्तर क्रिया

ता. १८ आगस्टची यावलीची ही लढाई दुपारीं एक वाजल्यापासून सायंकाळी पांच वाजेपर्यंत म्हणजे सुमारें चार तास चालली. एक प्रहराच्या या

युद्धांत चार रणस्थानें गाजलीं. एक गांधी चौक, दुसरें राधाबाई पांचघरीनच्या घराच्या व कोष्ट्याचा टापू ते आनंद आकाजी पाटलाचें घर, तिसरें नदीचें ऐलतीर व पैलतीर ते बाबूशेटचा कोठा, आणि चौथें बाबूशेटच्या वावरांतील सौंदडच्या वृक्षाजवळील भूमि. या चार ठिकाणीं घडलेल्या चारहि चकमकींत लोकपक्षच विजयी झाला ब्रि. सरकारच्या अधिकाऱ्यांचा पूर्ण पराभव झाला. पराभवाचें लांछन पत्करून त्यांस चोरांसारखे पळून जावें लागलें. शत्रूच्या हातीं रिव्हाल्व्हर्स, रायफल्स व लाठ्या होत्या आणि तमाम ब्रि. साम्राज्य सरकारचा दरारा त्याच्या पाठीशीं उभा होता. जनतेजवळ राष्ट्रप्रेम, बलिदानाची तयारी, राष्ट्रध्वजावरील उत्कट भक्ति व प्रतिकारासाठी लागणारें अलोट धैर्य एवढींच मुख्य शस्त्रें होतीं. म. गांधीच्या नांवाची स्फूर्ति हेंहि तिचें एक शस्त्र होतेंच. काँग्रेसच्या पाठिंब्याचा विश्वास तिला बळ देत होता. या प्रमुख शस्त्रांखेरीज गोफणी, दगड, लाठ्या, कुऱ्हाडी, भाले व तलवार हींहि उपकरणें तिनें आपल्या साह्यार्थ जमा केलीं होतीं.

हिंदुस्थानच्या आधुनिक इतिहासांत, वऱ्हाडच्या, उमरावती जिल्ह्याच्या, एका खेड्यानें ब्रि. सत्तेबरोबर चार तास केलेलें हें युद्ध, एकाच युद्धांत अवघ्या चार तासांत बदललेलीं चार चार रणस्थळें व घडलेल्या चार चार चकमकी व त्या सर्वांत ब्रि. सत्तेचा झालेला पराभव व जनतेनें मिळवलेला विजय ही घटनाच अपूर्व ठरणार आहे. या अत्यंत विषम अशा संग्रामांत यावली विजयी झाली होती. भावी इतिहासकाराला यावलीच्या या युद्धाची—निःशस्त्र युगांतल्या या खरोखरीच्या युद्धाची–फार ठळक रीतीनें नोंद घ्यावी लागेल. तिकडे परकीय रणांगणावर, ब्रि. सत्तेच्या भपकेदार जाहिराती, भरपूर पगार, कपडालत्ता यांना भाळून व घरीं असलेली खाण्यापिण्याची विवंचना दूर करतां येईल असें वाटून लक्षावधि भाडोत्री हिंदी तरुण आपले प्राण समर्पण करित होते व ब्रि. सत्तेची हिंदुस्थानच्या मानेवरील पकड मजबूत करण्याच्या प्रक्रियेस अज्ञानानें मदत करीत होते; तर इकडे यावलीच्या रणांगणावर कोणत्याही तऱ्हेचें प्रलोभन नसतांना, आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी, आपल्या राष्ट्रध्वजाच्या संरक्षणासाठी व सुटकेसाठी यावलीसारख्या खेड्यांतील शेकडो तरुण जाणून बुजून सतत चार चार तास बंदुकी तोफांवाचून लढत होते; बलिदान करीत होते व अखेरीस विजयी होत होते.

यावलीच्या १८ आगस्टच्या या संग्रामांत एकंदर तीस इसमांनी गोळ्या खाल्ल्या. त्यांत तीन मुसलमान होते; दोन हरिजन होते; एक महिला होती व बाकीचे न्हावी, कलाल, सोनार, माळी, कुणबी, मराठे इ. सर्व जमातींतील लोक होते. या संग्रामांत पांच वीर ठार झाले व आणखी एक पुढे तुरुंगांत मेला. या खटल्यांत पुढे एकंदर बासष्ट इसमावर खटला भरण्यांत आला. अवघ्या दोन हजार वस्तीच्या यावलीच्या मानाने हा त्याग फारच मोठा होता, हें कोणासहि मान्य करावें लागेल.

या विषम युद्धांत यावलीने मिळविलेला हा विजय फार मोठा आहे व भावी इतिहासांत त्याला स्थानहि फार मानाचें मिळेल यांत शंका नाहीं. परंतु गांवाच्या मानाने हा विजय फार महाग पडला. यावलीने व्यक्त केलेलें धाडस फार मोलाचें ठरलें. कोणत्याहि राष्ट्रांत सक्तीची लष्कर भरती सुरू झाल्यावरहि युद्धक्षम लोकसंख्येचें प्रमाण शे. ८ या पेक्षां अधिक धरण्यांत येत नाहीं. नुकत्याच संपलेल्या महायुद्धांत जर्मनीने अगदी कमाल करून हें प्रमाण शे. १० वर नेऊन दाखविलें. परंतु यावलीच्या दोन हजार लोकसंख्येंतील निदान २०० तरी तरुण रणांगणावर येऊन खास लढले व त्यापैकीं ७ शहीद झाले व ३० जखमी झाले. यावलीनेंहि जर्मनीच्या बरोबरीने युद्धक्षम लोकसंख्येचें आपलें प्रमाण आणून दाखविलें; आणि तेंहि पारतंत्र्याच्या नित्य उत्साहनाश करणाऱ्या युगांत, दारिद्र्य व दुष्काळ हीं चारीं बाजूंनी फोफावलीं असतांना! स्वातंत्र्याच्या व सुबत्तेच्या काळांत हें प्रमाण यावली कितीतरी वाढवूं शकेल हें उघड आहे. अस्तु.

शत्रु पराजित झाला व पळून गेला हें पाहिल्यावर लोक युद्धोत्तर कर्माला लागले पंजाबराव यांचे चुलते अजाबराव, बंधु विश्वासराव, अबदुल रहीम, राजारामजी पांचघरे प्रभृति लोक जखमी लोकांच्या व्यवस्थेला लागले.

जखमी लोकांपैकी कृष्णराव पवार, राजाराम औरंगपुरे व बळीराम बोराळे हे तत्काल शहीद झाले होते. त्यांचे अन्त्य संस्कार करावयाचे होते. कृष्णराव पवार हा तर यावलीच्या गळ्यांतला ताईतच बनला होता. त्याच्या व बळीराम बोराळेच्या शवांची गांवकऱ्यांनी प्रचंड मूक मिरवणूक काढली. सर्व वातावरण अतिशय गंभीर झालें होतें. आपल्या तरुणांच्या या वीर बलिदानावर यावलींतील

समस्त आबालवृद्ध, स्त्रीपुरुष, हिंदुमुसलमान, स्पृश्यास्पृश्य जनता अश्रुफुलें ढाळीत होती. शुभ्र वस्त्रांनीं झांकलेल्या वीर शहीदांच्या त्या शरीराकडे पाहून प्रत्येकजण आपली मान नम्र करीत होता. नितांत शांततेच्या व गंभीर स्तब्धतेच्या वातावरणांत ती शहीदांची मूक प्रेतयात्रा नदीच्या कांठावर येऊन पोंहचली. तिकडून बाबूशेटच्या कोठ्यांतून शहीद राजारामजी औरंगपुरे यांचेंहि शव आणण्यांत आलें. तिन्ही शहीदांचीं शरीरें रामकिसनजीचे शेतींतील काष्ठराशींत एकाच ठिकाणीं रचण्यांत आलीं. अग्नि देण्यापूर्वी सर्वांनीं व नथूजी लंगडे यांनी उत्थापनपूर्वक शहीदांना अभिवादन केलें आणि नंतर विधिपूर्वक अग्नि देण्यांत आला. जनता खिन्न व जड अंतःकरणांनी घरीं परतली.

रात्रींतून जखमी वीरापैकीं मोतीराम पांचघरे व तुळशीराम तडस यांचें प्राणोत्क्रम झालें होतें. १९ तारखेला सकाळीं या दोन शहीदांचीहि तशीच गंभीर व मूक प्रेतयात्रा काढण्यांत आली आणि कालच्या तीन हुतात्म्यांना ज्या ठिकाणीं अग्नि देण्यांत आला होता त्याच ठिकाणीं व त्याच चितेवर या दोन शहीदांचाहि अग्निसंस्कार करण्यांत आला. सारा गांव हळहळला ! सांडलेल्या पराक्रमाच्या अभिमानयुक्त कथा गात गात प्रत्येकाने अश्रु ढाळले. ! ! दुसरा विषय नाही ! दुसरी कथा नाही ! ! यावलीचे शहीद मरून अमर झाले ! गांधीजींच्या ८ आगस्ट अखेरच्या संदेशाप्रमाणें त्यांनी " करा वा मरा " या महामंत्राचें आचरण पूर्ण करून दाखविलें. ! त्यांनी केलेंहि व मरूनहि दाखविलें ! ! ! इतक्या यथार्थ रीतीनें सगळ्या देशभर या महामंत्राचें आचरण घडलें असतें, तर पारतंत्र्याच्या शृंखला केव्हांच गळून पडल्या असत्या ! ! ! भारतमाता तेव्हांच स्वतंत्र झाली असती ! !

प्रकरण ८ वें

ग्रामीण जनतेचें सामुदायिक निर्वासन

ता० १८ आगस्टच्या खुल्या युद्धाच्या रूपाने यावलीने ब्रि० भूजंगाला डिवचलें होतें. त्याच्या मस्तकावर वारंवार प्रहाघात करून त्याला तिने

चिडविलें होतें. १८ आगस्टच्या पराभवाचा बदला घेतल्यावाचून ब्रि० सरकार कसें राहील ? त्रिखंड साम्राज्य गाजविणाऱ्या सामर्थ्यशाली ब्रि० साम्राज्यशाहीचा हिंदुस्थानांतील यावलीसारख्या एका लहानशा खेड्याने केलेला पराभव ब्रि० सरकार कसा सहन करील ? एकवेळ हिटलर व जपानने केलेले पराभव तें गिळून बसेल ! पण एका वऱ्हाडी खेड्यांतील निःशस्त्र जनतेने केलेला ब्रि० जिल्हाधिकाऱ्याचा हा घोर पराजय तें गिळूं शकेल हें शक्यच नव्हतें. चिडून गेलेला, अपमानित झालेला, मार खाल्लेला भुजंग डूग धरून पुन्हा आणखी बळ एकत्र घेऊन येणारच हें उघड दिसत होतें जिल्हाधिकारी व पोलीस यावलीचें राज्य हारले होते. क्रांति-शक्तीच्या बळावर जनतेने विजय मिळविला होता व यावली स्वतंत्र झाली होती. पण एकाकी खेड्याचें हें स्वातंत्र्य, अफाट ब्रि० सत्तेच्या झंझावातापुढे फार काळ टिकणारें नव्हतें. जें मुलकी अधिकाऱ्यांना व पोलीसांना साधलें नाहीं तें लष्कराच्या जोरावर ब्रि० सरकार घडवून आणणार हें उघड होतें. यावलीवर लष्कर रवाना करण्यांत येणार हें न सांगताहि कळण्यासारखें होतें.

रात्रीं गांवांत भीषण स्तब्धता पसरली होती आजच्या युद्धांत यावली विजयी झाली असली तरी तिची अतिशय हानि झाली होती. तिचें निम्मे शिम्में तारुण्य कामास आलें होतें. ज्यांच्या निर्धाराच्या बळावर यावली प्रतिकारास सज्ज झाली होती त्यांतील निम्मे शिम्में सामर्थ्य अशा रीतीने घटल्यानंतर उर्वरित लोकांच्या बळावर पुन्हा लष्करी आक्रमणाचा प्रतिकार करण्याची भाषा बोलणें म्हणजे केवळ सर्वस्वनाश करून घेण्यास, आत्मघात करण्यासच प्रवृत्त होण्यासारखें होतें. म्हणून पुढील संकटाला समोरून तोंड देण्यापेक्षा बगल देणेंच श्रेयस्कर होय असें यावलीकरांनी ठरविलें आणि ही बगल द्यावयाची म्हणजे गांवचा गांव रिकामा करणें, सर्वांनी गांव सोडून निघून जाणें असा त्याचा अर्थ होता.

पण सामुदायिक निर्वासन ही सकृद्दर्शनीं वाटतें इतकी सोपी गोष्ट नाही. स्वतःच्या हक्काची निवाऱ्याची जागा मनुष्याने एकदा सोडली म्हणजे त्याला दुसरीकडे निवाऱ्याला कोठे जागा मिळेल याची कांहीच शाश्वति नसते. अशा अशाश्वत अवस्थेंत, अमर्याद कालच काय पण वर्ष सहा महिने देखील, काढणें

कठीण असते. त्यांतून हा केवळ सड्या पुरुष मंडळींचाच प्रश्न नव्हता. गांवांतील बायका मुलांसह हें निर्वासन करावयाचें होतें. पुरुष मंडळींनी स्वतः गांव सोडून निघून जावें आणि बायका मुलांना काय लष्करी लांडग्यांच्या भक्ष्यस्थानीं पडू द्यावें ! जायचेंच तर सर्वांना बरोबर घेऊनच गेलें पाहिजे. नाहीतर गांवांतच राहून जी काय आपत्ति येईल ती मुकाट्याने सहन केली पाहिजे, केलेला पराक्रम व घडलेलें बलिदान सर्व व्यर्थ दवडलीं पाहिजेत; आणि ब्रि० सत्तेसमोर मान वांकवून मानहानि पत्करली पाहिजे.

आपत्तींचा पहाड समोर दिसत असूनहि यावलीकरांनी मानहानि पत्करण्याचें नाकारलें. ब्रि० सत्तेसमोर मान वांकवावयाची नाही हा त्यांचा निर्धार पक्का होता. १८ आगस्टच्या युद्धांत बुद्धिपुरस्सर केलेल्या बलिदानाचें मूल्य व महत्त्व ते ओळखून होते. पण त्याबरोबरच सर्वस्वनाश—आत्मघात—करून घेण्याचीहि त्यांची तयारी नव्हती. मानहानि पत्करली तरी आत्मनाश चुकत नाही, प्रतिकाराचा प्रखर मार्ग पत्करला तरी आत्मनाश निश्चित आहे, दोन्हीचे फलित परिणाम एकच. म्हणून त्यांनी निर्वासनाचा मध्यम मार्ग पत्करला. वस्तुतः सामुदायिक निर्वासन हें सुद्धा एक महान् दिव्य होतें. त्यांतून जावयाचें म्हणजे अतिशय कठोर परिस्थितीच्या आगीने अंग भाजणार होतें, प्रत्यक्ष काट्यागोट्याचा मार्ग तुडवावा लागणार होता, उपासमारीने जीव कासावीस होणार होता. निराश्रित, निरालंब, निराधार अवस्थेंत दिवस काढावें लागणार होतें. हें दिव्य युद्धाच्या प्रतिकार-दिव्यापेक्षांहि अतिशय भयंकर होतें, असें एकापरीनें म्हणतां येईल व तसाच अनुभवहि आला. परंतु सर्वस्व—नाश, आत्म-नाश टाळावयाचा असेल, तर हें दिव्य करणें भाग होतें. यावलीची शूर व कणखर जनता याहि दिव्यांतून जाण्यास तयार झाली.

या वेळच्या यावलीच्या जनतेच्या मनःस्थितीचें प्रतिबिंब यावलीचा शूर सेनापति अबदूल रहीम याच्याच शब्दांत देणें उचित होईल. अबदूल रहीमने आपल्या निर्वासनाबाबत जें एक वक्तव्य लेखकाजवळ दिलें आहे त्यांत तो म्हणतो—

" १८-८-४२ का गोलीबार हो चुकने के बाद लोगोन के दिल हवाल दिल हो गये ! लोग घबराने लगे की, अब क्या होगा ? क्यूं कीं गांवमेके

उसवक्त गोलीबार में पांच लोक शहीद हो चुके थे और करीबन् ३५-४० आदमीको गोल्या लग चुक्या थ्या ! उन लोगोंके बदनसे लहू एक सरीखा बह रहा था ! इसी कारणसे लोकोंको बहोत घबराहटसी मालूम होती थी ! हालाँकी वही लोग ब्रि० अधिकारीयोंके साथमें बडेही बहादूरीसे लढे, और गोलियोंका सामना उन्होंने अपने सीनेसे किया ! लेकीन वो अधिकारी लोग भाग जानेके बादमें, वहांकेही जो खुदको ब्रि० गव्हर्मेंटके खैरख्वाह समजते थे वो लोगोंने गांवमें ऐसी हूल मचा दियी की अब और भी चालीस मिलिट्रीवाले लोग आ रहे हैं ! और मैंने उन लोगोंको देखा है ! ये हूलको, इस गलत फैमीको उन लोगोंने इतने जल्दी गांवमें फैलाया की गांवमेंका कोनाकोना और बच्चा बच्चा इस गलत फैमीको जानने लगा !

"इस ही गलत फैमीने मेरे भी दिलपर असर किया ! और अपने देश के इज्जतका ख्याल आंखोके सामने खडा हुआ ! क्यूं की इस अधिकारी लोकोनके मनमानी ढंगको मैं जानता था ! उनके काबूमें जानेके बादमें वो किसकी भी इज्जत बिघाडनेमें कभी भी हिचकिचाहट नही मानते ! ना उनको उस बातकी कभी नफरत भी है ! उलट वो उसमें खुदको एक बडा ऑफिसर समजते और वो एक बडेपनका लक्षण है ऐसा मानते हैं !

"ऐसा सोचकर मैंने मेरे मित्र विश्वासराव (पंजाबराव यांचे बंधु) इनको शिवमंगलसिंग पहेलवानके जरियेसे बुलाना भेजा । लेकिन उन्होंने आनेसे इन्कार किया । क्यूं की वो उस वक्त अपने काममें—लोकोनकी सेवामें, गोल्या लगे हुए लोकोंको ड्रेसिंग करनेमें और उनकी देखभाल करनेमें व्यस्त थे । फिरसे दो मिनिटके लिये मुलाखत लेनेके बहानेसे उन्हे बुलाया और मैंने अपने विचार उनको बताये ।"

अस्तु, सामुदायिक ग्रामनिर्वासनाचा विचार पक्का ठरवून यावलीकरांनी निर्वासन केलें. या निर्वासनांतील कष्ट अंगावर शहारे आणणारे आहेत. ज्यांनी मुन्सरीम (रेव्हिन्यू इन्स्पेक्टर) जवळून आपल्या गांवचा तिरंगी झेंडा जबरीने हिसकावून आणला होता व गांवची इज्जत वाचविली होती ते शूर देशभक्त राजारामजी पांचघरे लिहितात—"त्यावेळीं गांवांतील बायामंडळी बहुतेक

जंगलानेच दिसत होती. कारण प्रत्येकाला आपापल्या इज्जतीची भीति वाटत होती. शिवाय अरेरावीपुढे रक्षण करणें कठीण जातें. म्हणूनहि गांवकरी लोकांनी गांव खाली केलें होतें. मी बायामंडळीस घेऊन अडगांव रस्त्याने निघालों. दिवस बुडाला होता. लवकरच अंधार कीट्ट पडला. रातकिड्यांचा आवाज प्रत्येक माणसास भेडसावीत होता. अशाच स्थितींत बायाबरोबर लहान मुलें व मुलीहि बऱ्याच होत्या. त्यांनी सारखें रडणें सुरूं केलें. स्त्रियांनाहि अंधाऱ्या रात्रीं भीति वाटत होती. त्यांना कधींच पायदळ जाण्याचें काम पडलें नव्हतें. त्यांत पावसाचा, कांट्याकुट्यांचा रस्ता, अंधारी रात्र. पायांत कांटे बोचत व ठेंचा लागत. आणखी त्यांना एक भीति जास्त त्रास देत होती. ती ही की,—त्यांच्या घरांतील माणसें व मुलें हीं सुरक्षित आहेत कीं नाहींत, किंवा त्यांना गोळ्या लागल्या याची त्यांना कांहींच माहिती नव्हती. घर सोडतेवेळीं त्यांच्या भेटीहि झाल्या नव्हत्या."

शेषराव पांचघरे व विक्रम सिनकर लिहितात—' रात्रीं नऊ वाजेपर्यंत व पाऊस येत असतांनाहि कांट्या-कुट्यांतून अंधारांत व जंगलांत भटकत होतों. फिरतां फिरतां आम्ही चिंचेच्या झाडावर चढलों होतों. त्या झाडावर सर्प दिसला. त्याच्या भीतीनें झाडावरून खाली उड्या टाकल्या."

अशा रीतीनें सर्व गांव खालीं झाला. फक्त जखमी व आजारी माणसें आणि त्यांची सेवा शुश्रूषा करण्यासाठी लागणारीं आवश्यक तेवढींच माणसें गांवांत राहिलीं. गांवांतील लोक व बायामुलें जंगलांत निघून गेलीं. त्यांचे जंगलांतून रातोरात हिंडत असतांना अतिशय हाल झाले. आजपर्यंत ज्यांना कोणत्याच तऱ्हेने अडीअडचणींची संवय नव्हती अशाहि बायांना व मुलांना रानावनांतून वणवण करीत भटकावें लागलें. हे हाल—ग्रामनिर्वासनाचें हें दिव्य—किती भयंकर होतें याची लडूशा फकीर याच्या पुढील हकीगतीवरून चांगलीच कल्पना येण्यासारखी आहे. लडूशा लिहितो—" ता. १८-८-४२ ला संध्याकाळीं मी व माझे घरांतील मुलें व माझी स्त्री घेऊन यावलीवरून तीन मैल अंतरावर सिरसगांव आहे तेथे जाण्यास निघालों. स्त्रीला दिवस होते. तिचे दिवस पूर्ण होत आले होते. शिरसगांवला जातांजातांच रस्त्यावर माझी लक्ष्मी बाळंतीण झाली. इकडे बाळंतपण इकडे धांवपळ. पळा, पकडणारे येतात

ही अफवा. मी तिला सिरसगांवला ठेवून देऊन पांच दिवसपर्यंत झाडावर बसून राहिलों. ”

निर्वासितांचे गांव सोडल्यानंतर कोण हाल हाल झाले या विषयीं आणखी एकच हकीकत देऊन हें प्रकरण पूर्ण करूं. प्रसिद्ध गोफणगीर बारकाजी खाटीक याची ही हकीगत आहे. बारकाजी खाटीक याने यावली युद्धाच्या चारहि चकमकींत आघाडीवर पराक्रम गाजविला होता आणि शत्रूच्या गोळ्या चुकवीत चुकवीत आपल्या गोफणीचा बिनचूक मारा करण्याची जी विलक्षण चपलता त्यांने दाखविली होती ती पाहून सर्व लोक चकित झाले होते. खाटीक जातींतला असा हा पराक्रमी देशभक्त आपल्या व आपल्या मुलांबाळांच्या निर्वासनाची अतिशय करुण कहाणी पुढीलप्रमाणे निवेदन करीत आहे.—

“ जयहिंद. गोळीबार झाल्यानंतर त्याच दिवशीं पांच वाजतां मी गांव सोडलें. आतापर्यंत आम्ही सर्व ब्रि० सत्तेशीं लढलों. पण आता त्यांच्या शस्त्रास्त्राबरोबर कोठपर्यंत लढावें ? पहिल्या गोळीबारांतच ३५।४० लोक जखमी झाले व पुनः जर त्यांनी गोळ्या झाडल्या तर गांवांतील अर्ध्या लोकांना जिवंत रहावें लागणार नाही. त्यापेक्षां आपण गांवच सोडलेलें काय वाईट ? अशा प्रकारें विचार करून आम्हीं गांव सोडलें. मी आपल्या घरांतील स्त्रीपुरुष व मुलें बाळें सर्वांनाच बरोबर घेतले. रात्रीचा समय होता. रस्ता बरोबर दिसत नव्हता. त्यांत हवापाण्यामुळे रस्त्यांत कांटे उडालेले होते. अशा अडचणींशीं तोंड देत देत सावंग्यास येऊन पोहचलों. जवळ पैशाची सोय नव्हती. बरोबर मुलेंबाळें. खायला अन्न नाहीं. मुलें गांवांत गेल्याबरोबर अन्न अन्न म्हणून मागे लागलीं. अशा कठीण प्रसंगीं काय करावें हेंच मला सुचेना. शेवटीं मुलांकरितां गांवांत जाऊन भाकरी मागून आणल्या व मुलांना खाऊं घातल्या. उरलेलें थोडें अन्न मुलांकरितां बांधूनहि घेतलें. दुसरें दिवशीं सकाळीं मुलाबाळांना घेऊन शिराळ्यास गेलों. तेथे कांहींच आश्रय न लागतां तळवेलला गेलों. तेथील पाटलाने नांव गांव विचारलें. नांव गांव लिहिल्याशिवाय तुम्हांला येथे रहातां येणार नाही असें म्हणाला. नंतर मी तेथून वापस पुन्हा शिराळ्यास आलों व रात्र तेथे मोठ्या त्रासाने काढली. त्यानंतर नायगांववरून वाठोड्यास गेलों व नातेवाईकाकडे

दोन तीन दिवस राहिलों. तेथेहि आश्रय लागेना व मुलाबाळांच्या खाण्या-पिण्याची कांहीं सोय लागेना. शेवटीं तेथून दर्यापुर गाठलें. तें माझ्या सासुरवाडीचें गांव होय. सासऱ्याचें घरीं जाऊन तेथे आम्ही सर्वजण राहिलों. हाल अपेष्टा, कठीण प्रसंग, रातोरात्रीं जंगलशेतांतून आल्यावर एकदाचा थोडा कां होईना पण आराम मिळाला. तरीपण मानसिक त्रास सारखा सुरूच होता. अफवांचा बाजार गरम होता. त्यांची मजल येथपर्यंत जाऊन पोहचली होती की, यावलीचे जे लोक गांव सोडून पळाले त्यांना सरकार गोळ्या घालून ठार करणार आहेत. अशा नाना तऱ्हेच्या बातम्या दिवसांतून कित्येकदां ऐकायला मिळत.

सासऱ्याच्या घरची परिस्थिति चांगली नसल्यामुळे जंगलचें काम करून आम्हा दोघांहि स्त्रीपुरुषांना मुलाबाळांच्या जबाबदारींतून मोकळें व्हावें लागत होतें. परक्या ठिकाणीं असल्यामुळे प्रथम कामहि रोज मिळत नसे. शिवाय मनःस्थितिहि नेहमी चलविचल असे. एकादा मनुष्य मागाहून येत असला तर तो पोलीसच आहे असें वाटत असे व एकदम हातपाय थरथर कापायला लागत. अशा कठिण स्थितींत महागाईशीं सामना करीत एक महिना काढला. ते दिवस जन्माचे आठवणीचे व त्रासाचे गेले. एवढे त्रास व हाल-अपेष्टा आणि मुलाबाळांची दैना जन्मांत केव्हांच झाली नसेल. एक महिन्यानतर एके दिवशीं माहुलीचा कान्स्टेबल दर्यापूरला माझे सासऱ्याकडे आला व त्याने त्याला धाकदडप करून माझा पत्ता बिचारला. सायंकाळी मी कामावरून घरीं आलों तों काळ्या डगलेवाल्याची स्वारी दारांत उभी होती. त्याने मला पोलीस स्टेशनमध्ये चाल असें म्हटलें. मी सांगितलें—मी काम करून आलों आहे. थोडें जेऊन घेतों व तुमच्याबरोबर येतो. त्याने तें ऐकलें नाही. उलट माझ्या थोबाडींत दोन चापटा मारून मला स्वतःच्या मुलाबाळांची भेट घेऊं न देतां पोलीस ठाण्यांत नेलें. मी समजून होतों की—आतां मला घरीं परत यावें लागणार नाही. तर मोठ्याघरीं (जेलमध्यें) जावें लागेल. पोलीस स्टेशनमध्यें गेल्यानंतर तेथेहि मला मारठोक केली व गांवांतील हकीगत विचारीत होते. दुसरे दिवशीं सकाळीं तेथून चलावन केलें व उमरावतीस पाठविलें व नंतर जेलमध्यें पाठवून दिलें.

"मी जेलमध्यें गेल्यानंतर माझ्या घरच्या लोकांची भयंकर दैना झाली. जेलमधून सुटून आल्यावर स्त्रीच्या तोंडून माहिती ऐकली ती अशी की,— माझ्या स्त्रीने तर मी जेलमधून सुटून येईपर्यंत दोन्ही टाईम अन्न केव्हांच खाल्लें नाही. खाल्लें नाही म्हटलेपेक्षा मिळालें नाही असें म्हणणें जास्त संयुक्तिक होईल आणि उपवास मुलांसमवेत तर पुष्कळच काढावे लागत व स्त्रीला उपवास इतके पडले असतील की, त्यांची गणति होऊं शकत नाही. व शिक्षण नसल्यामुळें त्या गोष्टी लिहूनहि ठेवल्या नाहीत. तरी पण झालेले हाल व कष्ट सर्व यावलीकरांना माहीत आहेतच. तेथला लहान मुलगासुद्धां या सत्य गोष्टीला कोणीही विचारलें असतां एकदम कांही विलंब न लागतां सांगूं शकेल. अशा कठीण प्रसंगीं जर पंजाबराव यांचे घरून व गांवांतील जेलवासी बंधू यांचे घरून व कॉंग्रेस कमेटी उमरावती यांचे कडून मदत मिळाली नसती तर खात्रीने सांगूं शकतों की, माझी व माझ्या मुलांची व स्त्रीची भेट येथे झाली नसती. ती मला स्वर्गात घ्यावी लागली असती. अशी ही गरीबीची करुण कहाणी आहे."

बारकाजी खाटीक यांची ही कहाणी उपलक्षणात्मक म्हणून दिली आहे. अनेक कुटुंबांचे निर्वासनांत असेच हाल झाले. पण ते सर्व त्यांनीं शूरपणें सहन केले. कुटुंबेंच्या कुटुंबें रानोमाळ भटकलीं. गांवोगांव फिरलीं. कित्येकांना आश्रय मिळाला. कित्येकांना मिळाला नाही. ज्यांनीं आश्रय दिला त्यांच्यामागे पोलीसचा भुंगा लागला. त्यामुळे त्यांच्या येथून निघून पुनः दुसरीकडे जावें लागे. मिळकत नाही, आश्रय नाही, उद्योगधंदा नाही, इष्टमित्रांची खबर नाही. सगळीकडे आंदोलन दबलें होतें. दडपशाहीचा नंगा नाच चालूं होता. क्रांतीच्या झंझावातापुढे घाबरून गेलेले पोलीस आतां सावरले होते. त्याच्या रूपाने सैतान सर्वत्र धुमाकूळ घालीत होता. यावली सोडून गेलेल्या कुटुंबांच्या मागेहि यमदूत लागले.

निर्वासनानंतर कित्येक तरुण कार्यकर्ते भूमिगत झाले. त्यांच्यावर वारंटें सुटलीं. त्यांना पकडण्यासाठी पोलीसचे लोक गांवोगांव फिरूं लागले. खेड्या-खेड्यांची त्यांनी चाळणी केली. घर न् घर धुंडाळण्याचा प्रयत्न केला. पण यावलीचे कित्येक भूमिगत कार्यकर्ते त्यांना अखेरपर्यंत गवसले नाहीत. अशा

रीतीने बराच काळ लोटला. महात्मा गांधींची आजारपणामुळे सुटका झाली. सुटका झाल्यानंतर भूमिगतांनी उजेडांत यावें व पोलीसच्या स्वाधीन व्हावें म्हणून त्यांनी फतवा काढला. हा फतवा वर्तमानपत्रांतून वाचायला मिळाल्यानंतर यावलीचे कित्येक भूमिगत सरकारच्या, स्वाधीन झाले. पण पोलीसांना ते शोधून काढतां आले नाहींत. भूमिगतांचा हा निर्देश केवळ ओघाने आला म्हणून येथे केला आहे. त्यांचा वृत्तांत '**न्यायकांडांत**' येणार आहे. अस्तु.

यावलीने ज्याप्रमाणे खुल्या युद्धाचा व दिव्य प्रतिकाराचा यशस्वी प्रयोग करून दाखविला, त्याचप्रमाणे तिच्या शूर जनतेने ग्राम निर्वासनाचें भयंकर दिव्यहि करून दाखविलें. त्यांतूनहि ती मर्दपणे पार पडली. पण तिने ब्रि. सरकारसमोर मान वांकविली नाही, हार कबूल केली नाही. आपलें स्वातंत्र्यप्रेम व राष्ट्रभक्ति तिळमात्र ढळूं दिली नाही. निर्वासनाच्या दिव्यांतून पार पडणाऱ्या जनतेची धन्य होय!

प्रकरण ९ वें

लष्करी आक्रमण

ता. १८ आगस्टच्या पराजयाचें उष्टें काढण्यासाठी ब्रि० सरकारचें लष्करी-दल यावलीवर चालून येणार हा यावलीकरांचा अंदाज अगदी तंतोतंत खरा ठरला. यावलीचें प्रतिकार-सामर्थ्य ब्रि० सरकारच्या प्रत्ययास आलें होतें. त्यामुळे या खेपेस त्यांनी यावली परत जिंकून घेण्याचा ठाम निश्चय केला आणि हुकमाचा एक्काच फेकून मारला.

ता १९ आगस्टला सकाळपासून लष्करी गाड्या येत असल्याची अफवा गांवभर पसरली. असल्या अफवा पसरून देण्यासाठी आनंद आकाजी प्रभृति सरकारी हस्तक गांवांत बसलेले होतेच. त्यांनी मागील प्रकरणीं वर्णिल्याप्रमाणे आदल्या रात्रीपासूनच असल्या अफवांचा बाजार गरम करून ठेवला होता. १९ ता. ला सकाळीं १० वा. च्या सुमारास लष्करी गाड्या माहुली मार्गें

वाघोलीच्या रस्त्यापर्यंत आल्या. त्याठिकाणीं त्यांनी आपला एक तळ ठोकला. बातम्या पोहोचत राहाव्या म्हणून बिनतारी संदेशयंत्राची व्यवस्था केली. ५० सैनिक सडकेवरील या तळाच्या रक्षणासाठीं ठेवण्यांत आले आणि बाकीची फौज चालत यावलीस गेली. गेल्याबरोबर तिने सर्व बाजूंनी गांवाला वेढा दिला आणि नंतर त्यांतील कांही सैनिकांनी गांवांत शिरून प्रत्येक घराची तलाशी घेण्यास प्रारंभ केला.

मोठ्या जोमाने यावलीचा प्रतिकार मोडून काढून आपल्या बाहूंचा कंड शमविण्यासाठी आलेल्या ब्रि० लष्कराची प्रत्यक्ष यावलीस पोहोचल्यावर मोठीच निराशा झाली असली पाहिजे. ! यावलीस गेल्यावर त्यांना काय दृश्य दिसलें ? कांही जखमी माणसें विव्हळत पडलीं आहेत. कांही म्हातारीं माणसें त्याची शुश्रूषा करीत आहेत. बाकी सर्व गांव रिकामा पडला आहे. कोठे प्रतिकार नाही. कोठे गडबड नाहीं. सर्वत्र शांतता—स्मशान शांतता नांदत आहे.

त्या शूर पुरुषांची यावलीने मोठीच निराशा केली. अखेरीस सर्व जखमी माणसें त्यांनी आपल्या ताब्यांत घेतलीं. दोन दुकानांची लूट केली आणि जखमी लोकांना बरोबर घेऊन उमरावतीस प्रयाण केलें.

याप्रमाणे लष्कराची मर्दुमकी गाजल्यानंतर मग आनंद आकाजी, पोलीस प्रभृतीच्या कारवायांना ऊत आला. गांवाची लूट करण्याची फार दिवसाची आपली अतृप्त आकांक्षा त्यांनी तृप्त करून घेतली.

१५ व १८ आगस्टच्या सत्याग्रहांत व लढ्यांत भाग घेणारांवर नंतर ब्रि० सरकारच्या मुलकी अधिकाऱ्यांनी खटले भरले व ते न्यायासनासमोर चालले. हे खटले भरण्यासाठी जी धरपकड सुरू करण्यांत आली तींतहि सांपडतील त्यांना बेदम मारठोक करण्यांत आली. निर्वासितांच्या नातलगांच्या मागे पोलिसांचा ससेमिरा लागला. त्यांचा अनन्वित छळ करण्यांत आला. यावलीकडून १०००० रुपये सामुदायिक दंड सक्तीने वसूल करण्यांत आला. त्यासाठी कित्येकांचीं घरेंदारें बरबाद करण्यांत आलीं. पाटील आनंद आकाजी व त्याचे हस्तक यांनी जी गांवची बेकायदा लूट केली तिचीहि सरकारी चौकशी झाली.

वीर पंजाबराव यांचीं गुरेंढोरें, शेतीभाती सर्व लुटण्यांत आली व बरबाद करण्यांत आली. हा सर्व वृत्तान्त आपणांस पुढील न्यायकांडांत पाहावयाचा आहे.

अस्तु. निर्वासनाचा मार्ग शोधून यावलीकर जनतेने मोठ्या समंजसपणाने लष्कराच्या आक्रमणाचा उद्देश विफल करून दाखविला. तिने गांव सोडलें पण आपल्या सन्मानाचें व उर्वरित तारुण्याचें रक्षण केलें. पुढे कोर्टापुढील खटले, शिक्षा व कैद या सर्वांच्या दिव्यांतून यावलीच्या जनतेला जावेंच लागलें. पण ज्या शौर्यानें तिनें क्रांति करून दाखविली, ज्या बहादुरीने ती प्रतिकाराचा लढा लढली, ज्या संयमाने तिने निर्वासनाचें अग्निकाष्ठ भक्षण केलें, त्याच पराक्रमाने व चिकाटीने ब्रि० न्यायासनासमोरहि तिने आपली बाजू मांडली व अखेरीस आंधळ्या न्यायदेवतेलाहि आपल्या पराक्रमाचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यास भाग पाडलें.

प्रकरण १० वें

शहीदांना स्मृतिसुमनांजलि

यावली-स्वातंत्र्य-संग्रामेतिहासाचें हें 'हत्याकांड' पूर्ण करीत असतांना, या हत्याकांडांत ज्यांचें बलिदान घडलें त्या वीरांना, त्या अमर शहीदांना, स्मृतिसुमनांजलि समर्पण करणें हें लेखकाचें पवित्र कर्तव्य आहे. त्यांच्या स्मृतिसमोर आपला माथा विनम्र करून हें कांड पूर्ण करण्यांत येणार आहे.

स्वदेहावरील आसक्ति ही मनुष्य स्वभावास धरून आहे. परंतु स्वदेशावरील, स्वराष्ट्राच्या ध्वजावरील दिव्य आसक्तीसाठी स्वदेहासक्तीचा परित्याग करण्यास तयार होणें हा फार मोठा अनासक्तीचा योग आहे. म० गांधींनी भगवद्गीतेचें सार 'अनासक्ति योग' या एकाच शब्दांत काढून दाखविलें आहे. हा दिव्य अनासक्ति योग ज्यांनी प्रत्यक्ष आचरून दाखविला, आपल्या आत्म्याची भरारी साडेतीन हाताच्या देहाच्याबाहेर भारतवर्षाच्या अनंत आकाशांत ज्यांनी मारून दाखविली, कोणत्याहि लौकिक स्वार्थासाठी नव्हे, तर केवळ

आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी देहात्मभाव सोडून आपल्या रक्ताच्या चिळकांड्या उडविल्या व पंचप्राणांचेंहि बलिदान केलें त्या यावलीकर हुतात्म्यांच्या स्मृतीला शतवार, सहस्रवार वंदन असो!!! ते खरे योगी! तेच खरे अध्यात्म-वादी!! तेच खरे पुण्यश्लोक!!! तेच भगवद्गीतेच्या 'सात्विक कर्ता' या संज्ञेने विभूषित होण्यास पात्र होते. गीता म्हणते—

मुक्त संगोऽनहंवादी धृत्युत्साह समन्वितः ।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्विक उच्यते ।।

यावलीच्या शहीदांनीहि संग म्हणजे आसक्ति सोडली होती. धृति म्हणजे धैर्य व उत्साह यांनी समन्वित तर ते होतेच. सिद्धि व असिद्धि यांच्याबद्दल निर्विकार राहून म्हणजे फलाची पर्वा न करतां केवळ कर्तव्य म्हणून त्यांनी युद्ध केलें आणि अशा तऱ्हेने लढतां लढतांच ते मेले. सात्विक कर्ता ही संज्ञा त्यांनी यथार्थ करून दाखविली.

त्यांच्या रक्ताने परिषिंचित झालेल्या भूमीवरच स्वातंत्र्याची मनोरम बाग फुलूं लागेल. त्यांच्या चितेने पावन झालेल्या भूमीवर क्षेत्रस्थानें निर्माण होतील आणि प्रतिवर्षी या क्षेत्रस्थानांचें दर्शन घेण्यासाठी हजारो भारतवर्षीय सम्मीलित होतील व स्वतःस पावन करून घेतील. अशा या हुतात्म्यांना प्रणाम, त्रिवार प्रणाम !!!

१. **शहीद बळिरामजी बोराडे**—यांचें वय २८ वर्षांचें होतें. यावली संग्रामांतील आघाडीवरील धाडशी वीरांपैकी हा एक होता. युद्धारंभापासून तों धारातीर्थी पतन पावेपर्यंत त्याने आघाडी सोडली नाही. पोलीस कर्मचाऱ्यांना पकडून निःशस्त्र करण्याचा याने दोनदां धाडसी प्रयत्न केला. डी. एस्. पी. प्रॅटने राष्ट्रध्वजाचें अपहरण करण्यासाठी जेव्हा राष्ट्रस्तंभास हात घातला तेव्हा तुळशीरामजी अंबडकार यांच्याप्रमाणेच यानेहि प्रॅटवर झडप मारली होती. मेल्ड्रमप्रभृति अधिकाऱ्यांनी, माफी मागून व परत जाण्याचें अभिवचन देऊन, जनतेच्या कैदेंतून आपली सुटका करून घेतल्यानंतर धोकेबाजीने जेव्हा गोळी-बार सुरू केला, तेव्हा बळिराम बोराडेच पुनः त्यांच्यावर तुटून पडला. पोलीसांची

व याची जोराची चकमक झाली व त्यांची फळी फोडून तो पुढे सरसावला व डे० क० मेल्ड्म याच्या अंगावर चालून गेला. हें पाहून त्याच्यावर एक गोळी झाडण्यांत आली. ती त्याने चुकविली व पुढे मुसंडी मारली. म्हणून पुनः दुसरी गोळी त्याच्यावरच मारण्यांत आली, ती मात्र त्याच्या मर्मस्थानीं लागली व तो खाली पडला.

त्याला त्याच्या घरीं पोंचविण्यांत आल्यावर त्याची बहीण शोक करूं लागली. तेव्हा तिला उद्देशून तो जें बोलला त्यावरून त्याच्या अध्यात्मिकतेची व क्रांतिप्रवण राष्ट्रवादी विचारसरणीची कल्पना येऊं शकते. आपल्या बहिणीस तो म्हणाला–" बाई, कर्तव्य बजावल्याचें पूर्ण समाधान होऊन मी मरत आहे, म्हणून मला अतिशय आनंद होत आहे. माझ्या मरणाचा तूं शोक करूं नकोस. तुझ्या म्हातारपणीं मी तुझ्या तोंडांत सुखानें घांस घालीन व तुला पाणी पाजीन अशी तुला आशा होती. पण माझ्या मरणाने तुला निराश होण्याचें कारण नाही. मी संसारसागरांतून मुक्त होत आहे. याबद्दल आनंद मान. परमेश्वर हा गरीबांचा वाली आहे. तोच तुझें रक्षण करील. तोच तुला वस्त्र देईल. अन्न देईल व पाणी पाजील. बाई, तूं सुखी हो. माझ्या भारतमातेसाठी मी सुखाने व आनंदाने आपले प्राण दिले आहेत. बाई, अशा आनंदाच्या मरणाच्या वेळीं तूं शोक सोडून दे; मला आशीर्वाद दे. " याप्रमाणें बोलून ता. १८ आगस्ट १९४२ रोजीं दुपारीं ४ वा० त्याने प्राण सोडला.

२. शहीद मोतीरामजी पांचवरे—यांचें वय ३५ वर्षांचे होतें. घरीं म्हतारी बहीण, पत्नी व दोन मुलें एवढा परिवार होता. बळिरामजी बोराळे बरोबरच पहिल्या धाडशी हल्ल्यांत यांनीही भाग घेतला होता. शत्रूच्या गोळीने बळिरामजी पडला हें पाहून हा त्याच्या जागीं पुढे सरसावला. आपल्या हातांतील लाठी फिरवीत तो डे० क० मेल्ड्म याच्यावर चालून गेला. पोलिसांनी लाठ्या घेऊन त्याच्यावर हल्ला केला. खाशी चकमक उडाली. त्याने एकट्याने पोलीसांना पिटून काढलें व त्यांची फळी फोडून पुन्हा मेल्ड्मच्या रोखाने तो पुढे सरसावला. पोलीस शिपायांची फळी फोडत असतांना त्याच्या रोखानेच गोळ्या मारण्यांत येऊं लागल्या. अखेरीस तो फळी फोडून पुढे सरसावतो तोंच एक गोळी त्याच्या पोटाला लागली व तो कोसळला. घळघळां रक्त वाहूं

लागलें. रक्तबंबाळ स्थितींतच त्यास घरीं नेण्यांत आलें. घरचा आकांत काय विचारावा ? म्हातारी बहीण, तरुण पत्नी, दोन कच्चीं बच्चीं, सर्वच मोंवती गोळा झाले. पण त्या सर्वांना धीर देऊन व त्यांचें सांत्वन करून त्याने प्राण सोडला.

३. शहीद तुळशीरामजी तडसः—या तरुण वीराचें वय अवघें १७ वर्षांचें होतें. त्याच्या ओंठावरील आईचें दूधहि अद्यापि वाळलें नव्हतें. याला एक वडील व एक धाकटा असे आणखी दोन भाऊ होते. धोकेबाजीने सुरू झालेल्या दुसऱ्या गोळीबारांत पहिला बळी याच तरुण वीराचा पडला. त्याला घरीं पोंचविण्यांत आलें व तेथेंच तो मरण पावला. त्याच्या मरणाने त्याचे भाऊ शोक करीत बसले नाहीत. बारकाजी व हिरामण यांनी जेव्हा पाहिलें की, आपला भाऊ गोळी खाऊन शहीद झाला, तेव्हा तेहि त्याच्याच मार्गाने जाण्यास सिद्ध झाले. ते उठून त्वेषाने मेल्ड्मवर चाल करून गेले. हिरामणच्या पायास गोळी लागून तोहि घायाळ होऊन पडला. सूर्यभानजी तडसाच्या या तीनहि पुत्रांनी यावलीच्या संग्रामांत भाग घेऊन आपल्या मातेची कूस धन्य केली !

४. शहीद कृष्णराव पवार—या तरुण हुतात्माचें वयहि अवघें १८ वर्षांचें होतें. याची हकीकत पूर्वीं आली आहे. १६ आगस्टला लुटारू सरकारी कर्मचाऱ्यांच्या टोळीचा प्रतिकार करतांना त्याने जी चमक दाखविली तिनेच तो मित्र व शत्रु दोघांच्याहि डोळ्यांत भरला होता. धोकेबाजी करून सुटका करून घेतल्यावर शत्रूने जो गोळीबार सुरूं केला त्यांत दक्षिणेकडून गांधीचौकांतून येणारे आपले वीर कामास येत आहेत हें पाहून त्याने पश्चिमेकडून आपले साथीदार गोळा करून शत्रूवर त्वेषाने चाल केली होती. गांधी चौकांतील लढ्याच्या वेळींहि त्याने आपल्या पराक्रमाचें पाणी चांगलेंच प्रकट केलें होतें. या दुसऱ्या गोळीबाराच्या वेळीं पुन्हा स्वतः आघाडीवर राहून त्याने शत्रूवर जोराचा हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांतच एक गोळी त्याच्या डोळ्याला लागली व रक्तबंबाळ होऊन तो धाडकन जमिनीवर पडला. रक्तस्राव अतिशय झाला. त्याला जवळच बाजूच्या एका बैठकींत उचलून ठेवण्यांत आलें. तिथेंच पाण्याचा एक घोट घेऊन त्याने प्राण सोडला. याच्या धाकट्या भावालादेखील गोळी लागली होती. त्याने युद्धांत चांगलाच पराक्रम व्यक्त केला.

५. **शहीद राजारामजी औरंगपुरे**—याचें वय यावली युद्धाचे वेळीं ३० वर्षांचें होतें. सविस्तर हकीकत पूर्वी दिलेलीच आहे. तीवरून त्यांचें शौर्य केवढें प्रखर होतें व राष्ट्रध्वजावरील प्रेम किती उत्कट होतें याची कल्पना येण्यासारखी आहे. आपला राष्ट्रध्वज शत्रूच्या तडाख्यांतून सोडवून आणण्यांत आला आहे हें पाहून त्यांनी केवळ्या समाधानाने प्राण सोडला इ० वर्णन पूर्वी आलेलेंच आहे.

६. **शहीद जयरामजी बडोणे**—याचें वय ७० वर्षांचें होतें. गांधी-चौकांतील गोळीबारांत यांचा मुलगा मोतीराम यास गोळी लागल्यामुळे म्हातारा कसा चवताळून गेला व वाघासारखा डे. क. मेल्ड्रम याच्यावर तुटून पडला इ० हकीकत गांधी चौकांतील लढाईच्या वर्णनांत आलीच आहे. पुढे झालेल्या धरपकडींत यांना पकडण्यांत आलें व त्यांच्यावर खटला भरण्यांत येऊन ४ वर्षांच्या सक्त मजुरीची शिक्षा त्याना ठोठावण्यांत आली. ही शिक्षा भोगीत असतांनाच १९४४ सालीं बैतुलच्या तुरुंगांत त्यांचा अंत झाला. बाप आणि लेक दोघेहि राष्ट्रासाठी लढले. आपला देह राष्ट्राच्या कामीं लावून जयरामजीने आपल्या म्हातारपणाचें चीज केलें.

७. **शहीद गणपतराव यावले**—याचें वय अवघें २० वर्षांचें होतें. यांना गांधी चौकांतच लढतां लढतां पोटांत गोळी लागली होती. अतिशय रक्तस्राव झाल्यामुळें त्यांचीहि स्थिति अतिशय खराब झाली होती. १९ तारखेस लष्करी सैनिक यावलीवर चालून आले त्यावेळीं हे जवळ जवळ अखेरचा श्वास घेत आहेत असें वाटत होतें. अशा प्रेतप्राय जखमी माणसाला बरोबर घेऊन जाण्यापेक्षा येथेच ठार मारून टाकावें असें एक फौजी शिपाई बोलला. परंतु दुसऱ्या एका मद्रासी शिपायाने त्याला परावृत्त केलें. पुढे इस्पितळांत ते दुरुस्त झाले. त्यांच्यावर खटला भरण्यांत येऊन त्यांना ४ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा देण्यांत आली होती. परंतु पुढे हायकोर्टांतील अपीलांत तेहि सुटले. वस्तुतः त्यांच्या पोटावरील गोळीची जखम कायमची दुरुस्त झाली नव्हती. मधून मधून तिच्यांतून पू वाहात असे. तुरुंगांतून सुटून आल्यावर जखम अतिशय चिघळली आणि अखेरीस तिच्यामुळेच त्यांचाहि मृत्यु झाला.

न्याय-कांड

यावलीचा स्वातंत्र्य संग्राम

—: न्याय-कांड :—

प्रकरण १ लें

न्यायालयांतून चाललेला संग्राम.

दहा दिवसांत रशियन क्रांति झाली . त्या दहा दिवसांचें वर्णन 'जगाला हादरून सोडणारे दहा दिवस' असें रशियन लेखकांनी केलें आहे. हिंदुस्थानांतील १९४२ च्या आगस्ट महिन्याबाबतहि असेंच म्हणतां येईल. सर्व जगाला हादरा देणारा महिना असें त्याचें यथार्थ वर्णन करतां येईल; आणि त्याच एका महिन्यांत ब्रि० साम्राज्यसत्तेला उलथून पाडण्यासाठी जे जे प्रकार झाले, ज्या मोडतोडी झाल्या, जे उत्पात घडले त्या सर्वांची बेरीज, जर्मनीने जिंकल्यानंतर फ्रान्सनें आपल्या स्वातंत्र्यासाठी पुढील चार पांच वर्षांत जी धडपड केली व त्यांत जे उत्पातांचे, मोडतोडीचे व घातपाताचे प्रकार केले, त्यांच्या संकलित बेरजेपेक्षाहि अधिक भरेल. दीडशें वर्षें गुलामगिरींत असलेल्या हिंदुस्थानने अवघ्या एका महिन्यांत जें करून दाखविलें तें अगदी कालपरवापर्यंत स्वातंत्र्याचा उपभोग घेत असलेल्या फ्रान्सला सबंध चार वर्षांत करतां आलें नाही !

१९४२ च्या आंदोलनाचा उत्पाती प्रकार होणें हा केवळ एक पैलू होता. वस्तुतः म० गांधी व काँग्रेसचे पुढारी यांना ब्रि० सरकारने पकडल्यानंतर जनतेने सर्व देशभर जी उघड बंडाची उठावणी केली तीच गोष्ट

या आंदोलनांतील अधिक महत्त्वाची बाब समजली पाहिजे. ह्या उघड बंडाचा जोर ओसरल्यानंतर आणि आपली पडलेली बाजू आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत सावरून घेतल्यानंतर ब्रि० सरकारने भारतीय क्रांतीचा निःशेष बीमोड करण्याचें ठरविलें आणि तदनुसार त्यांचें जबरदस्त दमनचक्र हिंदुस्थानभर फिरूं लागलें. उघड बंडांत भाग घेणारे आणि घातपाती चळवळी करणारे या दोघांनाहि पकडून तुरुंगांत डांबण्यांत आलें व त्यांच्यावर खटले भरून त्यांना निरनिराळ्या तऱ्हेच्या शिक्षा सुनावण्यांत आल्या. हे खटले भरतां यावे, कोणालाहि केव्हांहि नोकरशाहीच्या लहरीप्रमाणे पकडून ठेवतां यावें व दिवसचेदिवस विनाचौकशी डांबून धरतां यावें म्हणून निरनिराळ्या प्रकारचे काळे कायदे व्हॉईसरॉयच्यामार्फत अंमलांत आणले जाऊन अनिर्बंध व निरंकुश अधिकार नोकरशाहीच्या हातांत देण्यांत आले होते. या अधिकारांचें कोलीत हातांत मिळाल्यापासून 'आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला' अशी नोकरशाहीची स्थिति झाली असल्यास नवल काय ? पिशाच्या हातीं कोलीत सांपडल्याप्रमाणें आपल्या हातांतील अधिकारांचा उपयोग करून नोकरशाही नागरिक स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कावरीह गदा घालूं लागली आणि परिस्थितीने भेदरलेले, धांदरलेले, हादरून गेलेले लहान लहान न्यायाधिकारी नोकरशाहीच्या बोटाच्या इशाऱ्यावर नाचूं लागले.

नोकरशाहीच्या उद्दामपणाची मजल या काळांत इतकी वाढली होती की, हायकोर्टासारख्या वरिष्ठ न्यायालयांचे मूलभूत अधिकारदेखील ती धाब्यावर बसवूं लागली होती. हायकोर्टाच्या मूलभूत अधिकारांचें, बेताल नोकरशाहीच्या अतिक्रमणापासून व मर्यादाभंगापासून संरक्षण करणें हें नवीनच काम शिरावर घेण्याची आवश्यकता वरिष्ठ हिंदी न्यायालयांना म्हणजे हायकोर्टांना वाटूं लागली. ४२ चें आंदोलन ओसरल्यानंतरच्या काळांत ब्रि० नोकरशाहीची कार्यकर्ती सत्ता आणि हिंदी वरिष्ठ न्यायालयें यांच्यांत एक अपूर्व संघर्ष सुरू झाला व त्यांत न्यायदेवतेने शासनसत्तेवरील आपला अधिकार फारच खणखणीतपणें बजावला, ही गोष्ट अवश्य ध्यानांत ठेवली पाहिजे. न्यायदेवता व शासनसत्ता यांत श्रेष्ठ कोण हा झगडा १९४२

पासून १९४५ पर्यंत सतत तीन वर्षे चालू होता. ह्या १९४२ च्या आंदोलनाचा पैलू विसरून चालणार नाही.

" माझ्याकडे कांही बडे न्यायाधिकारी आले होते व आंदोलनाच्या वेळीं आम्हीं काय करावें असें त्यांनी मला विचारलें. मीं त्यांना इतकेंच सांगितलें की, तुम्हांस सांगण्यास मजजवळ कार्यक्रम नाही. पण एक गोष्ट मात्र ध्यानांत ठेवा. आणि ती ही की, अन्यायाने कोणालाहि शिक्षा देऊं नका व कायद्याने अन्याय्य अर्थ लावूं नका. "--

ता. ८ आगस्टच्या ऑल इंडिया काँग्रेस कमेटीच्या सभेंत वरील उद्गार काढून म० गांधी यांनी शासनसत्ता व न्यायसत्ता यांच्यांमधील संभाव्य संघर्षाची जाणीव वरिष्ठ न्यायाधिकाऱ्यांना आधीच करून दिलेली होती. हिंदुस्थानांतील नोकरशाही युद्धप्रयत्नांच्या नांवाखाली हळू हळू अमर्याद अधिकार आपल्या हातीं घेत आहे आणि त्या अधिकारांच्या बेगुमानपणांत वरिष्ठ न्यायालयांच्या मूलभूत अधिकारांची देखील पायमल्ली करीत आहे हें दिसून येतांच, हिंदुस्थानांतील हायकोर्टें आपल्या मूलभूत अधिकारांचें व न्यायदेवतेच्या सन्मानाचें संरक्षण करण्यासाठीं मोठ्या हिरीरीने पुढे सरसावलीं आणि सतत तीन वर्षेपर्यंत हिंदी स्वातंत्र्याचा लढा आपल्या न्यायालयांच्या मार्फत त्यांनी पुढे चालविला. हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याचा या काळांतील हा पैलू नीट ध्यानांत येण्याच्या दृष्टीने यावलीचा खटला फार चांगला उपयोगी पडण्यासासारखा आहे. वस्तुतः वर सांगितल्याप्रमाणे मुंबई, लाहोर, कलकत्ता, पाटणा व नागपूर हायकोर्टांची नोकरशाहीच्या अनिर्बंध सत्तेविरुद्ध आणि हायकोर्टाच्या मूलभूत अधिकारांचें संरक्षण करण्यासाठी लढत झाली. पैकी मुंबई हायकोर्टाची लढत फेडरल कोर्टापर्यंत पोंहचली, तर नागपूर व कलकत्ता हायकोर्टाच्याविरुद्ध नोकरशाहीने प्रिव्ही कौंसिलकडे अपील केलें व तेथेहि थपडा खाल्ल्या.

हिंदी हायकोर्टांनी आपल्या मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी पंचहत्यारांनी सुसज्ज अशा नोकरशाहीबरोबर जी गंभीर लढत दिली त्यांत नागपूर हायकोर्टाचें नांव अगदी अग्रभागीं राहील. चिमूर-आष्टी-रामटेकचे

खटले, यावलीचा खटला, खानदेश दरवडा प्रकरणांत श्री० पु० य० देशपांडे, ह० वा० देशपांडे, वा० गो० शेवडे व लेले प्रभृतींना पकडण्यांत आल्यानंतर हायकोर्टासमोर चाललेले खटले, श्री० बा० ना० सावजी यांनी वरिष्ठ तुरुंगाधिकाऱ्यावर केलेला हायकोर्टाच्या बेइज्जतीचा खटला, इ० असे नानाविध मामले नागपूरच्या हायकोर्टासमोर आले व त्यांच्या निकालांनी आगस्ट क्रांतीचा पुरस्कार कायदेशीर ठरला; मोठमोठ्या तुरुंगाधिकाऱ्यांना शिक्षा झाल्या; चीफ सेक्रेटरीसारखा अधिकारी खोटें प्रतिज्ञापत्रक भरतो असें दिसून आलें, वृत्तपत्रांचे जामीन परत करावे लागले.

पण या सर्व खटल्यांत खरी बहारीची केस ठरली यावलीचीच. या सर्व खटल्यांपैकी यावलीचीच हकीकत प्रस्तुत न्यायकांडांत द्यावयाची आहे. पण यावलीच्या या खटल्याचें अनन्यसाधारण महत्त्व काय होतें याचें थोडक्यांत निदर्शन करणें आवश्यक आहे. ज्यांनी यावलीचा खटला हायकोर्टाच्या बेंचाकडे पाठविला त्या न्यायमूर्ति बोस यांच्याच शब्दांत पुढे प्रकरण ५ मध्ये त्याचें विशेष विवरण केलें आहे.

बाहेर मोकळा असलेला मनुष्य न्यायकोर्टाचा आश्रय घेऊन जेव्हा लढूं पाहतो तेव्हा त्यास देखील शेवटपर्यंत टिकाव धरून राहणें अतिशय कठीण वाटतें. तेच ते कोर्टाचे खेटे; लहानसहान गोष्टींसाठी पुढची तारीख, आज वकीलच हजर नाही, तर आज साक्षीदाराची तब्येत बरोबर नाही; आज साहेब दौऱ्यावर जाणार आहेत, तर आज दुसऱ्याच कांही कारणासाठी खटला चालू होणार नाही इ० अनेक कारणांस्तव जेव्हा पेशी मागून पेशी होत असतात आणि प्रत्येक पेशीवर कोर्टाचे खेटे घ्यावे लागतात; आपल्या तर्फेचीं माणसें हजर ठेवावीं लागतात व साक्ष पुरावा इ० सगळ्या गोष्टी संगीन असाव्या लागतात. आणि आज इतक्या गोष्टी आटोपणारच असा कयास मोठ्या हुरुपाने मनाशीं बांधावा तों साहेबाचा कोणीतरी कारकून येऊन पुढील तारीख झाली आहे म्हणून सांगूं लागतो. अशावेळीं मोठीच निराशा पदरांत पडते. परंतु हे सगळे धक्के चपेटे खात खातच कोर्टांतला लढा लढावा लागतो व मोठ्या चिकाटीने व सततोद्योगाने दीर्घकालपर्यंत जो लढत राहील त्यालाच परिणामीं यश मिळण्याचा थोडाफार संभव असतो.

बाहेर मोकळ्या असलेल्या माणसाला जर ही लढत इतकी बिकट जाते, तर तुरुंगांत असलेल्या माणसाला ती किती हजार पटीने कठीण जाते ह्याची कल्पनाच केलेली बरी. यावलीला आपल्या स्वातंत्र्यसंग्रामाचा लढा, निर्वासनाच्या दिव्यांतून पार पाडल्यानंतर, ब्रि० न्यायालयांतूनच लढावा लागला. हा लढा लढला जात असतांना यावलीचीं पांच कर्तबगार माणसें दगावलीं होतीं आणि त्याशिवाय २५ माणसें जखमी झालीं होतीं. जखमी झालेल्या लोकांना १९ तारखेला जरी लष्करांतील लोकांनी आपल्याबरोबर नेण्याचा प्रयत्न केला होता तरी सगळेच जखमी त्यांना गवसले अशांतला भाग नव्हता. कित्येक जखमी निर्वासितांच्या बरोबर रानावनांतून निघून गेले होते आणि त्यांचीं नांवें अखेरपर्यंत सरकारला कळूं शकलीं नाहीत. अस्तु.

या जखमी लोकांच्याशिवाय सुमारें आणखी ३०-३५ लोकांना गिरफदार करण्यांत आलें होतें. एकाच गांवांतले सुमारें ६०-७० कर्तबगार लोक अशा रीतीने तुरुंगांत दडपल्यानंतर त्यांचे खटले चालविण्याकरितां चिकाटीचा जोरदार व गरज पडेल तेव्हा हवा तितका पैसा खर्च करूं शकणारा असा मनुष्य सहसा बाहेर उरला नसेल! परंतु अशाहि परिस्थितींत, आपलें सर्व तारुण्य तुरुंगांत अटकलें असतांना, घरादारांचा जाहीर लिलाव चालूं असतांना; गुरेंढोरें व शेतीभाती यांचीं शत्रूच्या हस्तकांकडून लूट चालू असतांना, उभीं पीकें कापलीं जात असतांना आणि शेजारपाजारचा सर्व आश्रय तुटला असतांना, धन्य यावलीची की, तिने सतत दोन अडीच वर्षेपर्यंत मोठ्या चिकाटीने, धैर्याने व आपल्या अंतिम उद्दिष्टाच्या निष्ठेने कोर्टांतला लढा दिला व अखेरीस त्यांतहि विजय मिळून दाखविला. यावलींतील कितीतरी आरोपी श्रीमंत होते. तरीपण त्यांनी आपल्या बचावाच्या सोहास बळी पडून निराळे वकील ठेवले नाहीत.

प्रकरण २ रें

भूमिगतांच्या करुण कहाण्या

मागे सांगितलेंच आहे की, यावलीस १५ आगस्टपासून १८ आगस्टपर्यंत जे प्रकार झाले त्याबद्दल एकंदर ६२ इसमांना शिक्षा झाल्या. या शिवाय आणखी ९ इसम खटल्यांत गोवण्यांत आले होते. पण ते खटला चालू असण्याच्या निरनिराळ्या अवस्थेंतच सुटले.

याशिवाय ७ इसम असे आहेत की, त्यांना १८ ता. च्या गोळीबारांत गोळ्या लागल्या, पण पोलीसला मात्र त्यांचा पत्ता लागूं शकला नाही; त्यामुळे कोर्टाच्या दगदगींतून ते बचावले. नाहीतर या सात घायाळ इसमांवर खटला भरला जाणें व त्यांना शिक्षा होणें या दोन्ही गोष्टी स्वाभाविक होत्या.

यावलीच्या हताहतांची थोडक्यांत मोजणीच करुन दाखवावयाची तर ५ जागच्या जागीं ठार; ३० जखमी; त्यांतून २ तुरुंगांत अथवा तुरुंगांतून सुटल्यावर मेले; एकूण ७१ इसमांवर खटले भरुन ६२ इसमांना शिक्षा दिल्या; खटला भरण्यासारखे सात इसम गवसलेच नाहीत. एकूण १०००० रुपये सामुदायिक दंड १३४ लोकांकडून वसूल करण्यांत आला.

याशिवाय पाटील व पोलीस यांनी एकुण १४ कुटुंबांकडून लांचलुचपत खाल्ली. नऊ इसमांनी लांच दिली नाही म्हणून त्यांना मारपीट करण्यांत आली. ३० इसमांच्या बैलजोड्या पाटील व कर्मचारी यांनी अनधिकृतपणें आठ दिवसांपासून २ महिनेपर्यंत वापरल्या. ५ इसमांचीं उभीं शेतें कापून नेलीं.

पाटलांचे हस्तक बनून ज्यांनी जनतेवर जुलूम जबरदस्ती केली अशा २६ इसमांवर पुढे ११० कलमांखाली खटले भरण्यांत आले. त्या सर्वांची पाटील साहेबांनी स्वतः चांगल्या वर्तणुकीबाबत जमानत भरली व त्यांची सुटका करून घेतली.

वरील सर्व गोष्टींच्या तपशीलवार याद्या परिशिष्टांत देण्यांत आल्या आहेत. त्या वाचल्या असतां वाचकांच्या हें ध्यानांत येईल की, यावलीची हिंमत खची व्हावी व यावलीने पिचून निघावें म्हणून कसे पद्धतशीर प्रयत्न करण्यांत आले. परंतु इतक्याहि आपत्तींतून जात असतांना यावलीने क्षणभरदेखील आपली मान वांकविली नाही.

१८ आगस्टचा गोळिबार झाल्यानंतर पुढे जी धरपकड झाली तिच्या द्वारांच, ब्रि. सरकारच्या हस्तकांनी आपला खरा धाक जमविण्याचा प्रयत्न केला. मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे की, काळ्या कायद्यांच्या रूपाने अमर्याद अधिकार नोकरशाहीच्या हातीं देण्यांत आले होते. नोकरशाहीला न्यायालयांची भीति वाटेनाशी झाली होती. डिफेन्स ऑफ इंडिया कायद्याच्या १३९; २६ इ० कलमांखाली पकडलेल्या लोकांना नोकरशाहीने कांही जरी केलें तरी त्याची कोठे दाद फिर्याद सुद्धा लागावयाची नाही अशी स्थिति होती. बेमुदत अटकेंत ठेवणें, पोलीस ठाण्यांतच डांबून धरणें व वाटेल तसे हाल हाल करणें, मारठोक करणें इ० अनेक अनन्वित प्रकार या काळांतील बेताल व मदोन्मत्त नोकरशाही करीत होती. कोण्याहि पोलीस शिपायाने उठून कोणाहि भल्या माणसाच्या घरांत शिरावें व त्याची अब्रु घ्यावी, त्याच्या घरांतील वाटेल तें सामान उचलून न्यावें, असा अंदाधुंद कारभार चालू होता.

अशा या कारभारांत यावलीचे जे लोक पकडले गेले त्यांचे कोण हाल झाले असतील याची कल्पनाच केलेली बरी; पण कल्पना करण्याचेंहि कारण नाही. त्यांपैकी कित्येकांचीं वक्तव्येंच उद्धृत केलीं म्हणजे त्यावरून अनायासेंच अटक झालेल्यांच्या स्थितीची कल्पना येणार आहे. ज्यांचीं वक्तव्यें येथे देण्यांत येत आहेत ते यावलीचे जबाबदार कार्यकर्ते आहेत. १५ आगस्टच्या सत्याग्रहांत व १८ आगस्टच्या युद्धांत त्यांनी जबाबदारीने व महत्त्वपूर्ण भाग घेतलेला आहे. व कांहीना कांही स्मरणीय कामगिरी बजावली आहे. अशा लोकांच्या वक्तव्यांतून पोलीस कर्मचाऱ्यांच्या अत्याचारविषयक येणाऱ्या कथा ह्या टाकाऊ व बेजबाबदार होत, कारण त्या न्यायालयासमोर गेल्या नाहीत; असें समजण्याचें कारण नाही. सर्वच जुलूम न्यायालयासमोर जातो असें नाही आणि न्यायालयासमोर

गेलेल्या प्रत्येक जुलमी इसमाला शिक्षा होतेच असें नाही. तशांत सरकारी अधिकाऱ्यांना शिक्षा करण्याचे न्यायालयाचे अधिकारहि कमी करण्याचा प्रयत्न काळ्या कायद्यांनी केलेला होता. बा. ना. सावजी यांच्या केसचा नागपूर हायकोर्टांत निकाल लागेपर्यंत, प्रत्येक सरकारी अधिकारी हेंच समजत होता की, चळवळ दडपून टाकण्याच्या शहाजोग नांवावर आपण कांहीहि जुलूम केला तरी आपलें कोणीहि वांकडें करूं शकत नाही. अशा या बेगुमान समजुतीच्या अधिकाऱ्यांनी यावलीकरांवर काय काय जुलूम केले हें पाहण्यासारखें आहे.

डी. एस. पी. ने चोरून नेलेला राष्ट्रध्वज ज्यांनी १८ ता० स मुनसरीम जवळून जबरीने सोडवून आणला ते राजारामजी पांचघरे त्याच रात्रीं पंजाबरावच्या घरच्या बाया मंडळींना घेऊन जंगलांत निघून गेले. त्यांच्या निवेदनाचा कांही भाग हत्याकांडांतील निर्वासन प्रकरणांत दिला आहे. त्यापुढील कांही भाग येथे उद्धृत करण्यांत येत आहे. त्यावरून पोलीसच्या पशुतुल्य व्यवहाराची कल्पना येऊं शकेल.—

(बरेच दिवस भूमिगत स्थितींत काढल्यानंतर)

“ नंतर मी विचार करून व सर्वांच्या भेटी घेऊन चांदूर बाजार पोलीसस्टेशनमध्ये गेलों. तेथेच यावलीचे पाटील व माहुलीच्या पो० ठाण्याचे स० इ० हे होते. सोनोरी येथे इन्कायरी करतांना माझ्या सासऱ्याला वाटेल ते बोलले होते व असेंहि म्हणाले होते की, तुम्ही राजारामजीला आमच्यासमोर आणणार नाही तर आम्ही त्यांच्या स्त्रीला जेलमध्ये पाठवूं. म्हणून मी त्या सब इन्स्पेक्टरला विचारलें की, स्त्रीला तुम्ही कां बोललांत ? तुम्हाला कोणी आया बहिणी नाहीत की काय ? तें सर्व त्यांनी ऐकून घेतलें व विश्वासराव व अजाबराव कोठे आहेत म्हणून विचारलें. मी न सांगितल्यास मारण्याची धमकी दिली व ती खरीहि करून दाखविली. मला दोघांनी पकडून ठेवलें व तिसऱ्याने चाळीस दंडे माझ्या पाठीवर व अंगावर मारले. त्यांचे घाव झाले होते. ते तीन महिनेपर्यंत बुजले नाहीत. मींहि निश्चय केला होता की, त्यांनी माझा जीव घेतला तरी मी कांहीहि माहिती सांगणार नाहीं. त्याप्रमाणें अजाबराव व विश्वासराव कोठे

आहेत हें मला माहित असूनहि मीं त्यांना सांगितलें नाही. नंतर त्यांनी मला चांदूरवरून जेलमध्ये पाठवून दिलें. ”

अशा तऱ्हेने पोलीसने ज्यांना पकडल्यानंतर बेदम मारलें अशीं उदाहरणें कांही थोडीं थोडकीं नाहीत.

शेषराव पांचघरे लिहितो (हा व विक्रम सिनकर हे दोघेहि बरोबरच भूमिगत झाले.)—“ गोकुळअष्टमीचा सण होता. मी वलगांवला होतों. बाया मंडळी स्वयंपाक करीत होती. तोंच पोलीस व यावलीचे पाटील व पोलीस सर्कल हे सर्व जोडयांसहित घरांत चुलीपर्यंत शिरले व दटावून विचारूं लागले कीं, शेषराव पांचघरे व विक्रम सिनकर येथे आले होते ते कोठे आहेत ते दाखवा. नाहीतर आम्ही पाहातों. आमच्या येथे ते नाहीत असें सांगितल्यावर ते घरांत घुसले व कणगींत, गोठयांत, संडासांत, विहिरींत कंदील घालून पाहूं लागले. पण ते दिसेनात तेव्हा घरमालक गणपतराव वासनकार व त्यांचा भाचा गंगारामजी कांडलकार या दोघांना पोलीस स्टेशनमध्ये नेवून गंगारामजीस खूप मारलें.

आनंद आकाजी पाटील व सब इन्स्पेक्टर कांबळे यांच्या छळास बळी पडलेले यावलीचे शेट रामकिसनजी अंबादासजी मारवाडी यांनी लिहून दिलेल्या माहितींतील नमुन्यादाखल कांही भाग खाली देतों.—

ता० १८-८-४२ चें कधी न पाहिलेलें रणकांड पाहून सर्वांचीं मनें भेदरलीं होतीं. पुढे काय होणार ? आतां काय करावें ? हेच प्रश्न आमचेसमोर होते. अधिकारी लोक गेल्यावर जखमी लोकांची सुरक्षित जागीं व्यवस्था करण्यांत आली व शक्य ते उपाय करण्यांत आले. अमरावतीवरून डॉक्टर आणण्याचें ठरल्यावर माझी आई काशीबाई इने रुपये देऊन अजाबराव यांना डॉक्टर आणण्यास रवाना केलें. गोळीबारांतील लोकांची खाण्यापिण्याची व्यवस्था लावण्याकरितां व त्यांचे घरीं आवश्यक सामान पाठविण्याकरिता माझी आई घरीं राहून मी त्याच रात्रीं दोन वाजतां गांवामधून शिरखेडला निघून गेलों. माझी स्थिति भेदरल्यासारखी होती. तरी पण मला अंतःकरणांतून कोणीतरी

अदृश्य शक्ति धीर देत होती असें वाटे. त्या शक्तीच्या जोरावर आम्ही मार्ग क्रमित होतों. ता० १९ ला सर्वांची व्यवस्था केल्यावर माझी आई १० वाजतां मुलांबाळांना घेऊन यावलीवरुन निघून संध्याकाळीं ७ वाजतां शिरखेडास पोहचली. वाटेंत येतांना त्यांना उन्हाचा व चिखलाचा भयंकर त्रास सहन करावा लागला. तेथून ७ दिवसांनी यावलीचे पाटलाचा लहान भाऊ शिरखेडास आला व सांगूं लागला—" तुमचेवर वारंट आहे. तुम्ही आम्हांस दहा हजार रुपये द्या. म्हणजे सर्कल साहेबांकडून तुमचा वारंट कमी करण्यास लावतों. नाहीतर तुम्हांस जेलमध्ये जावें लागेल ! मी आतांच सब इन्स्पेक्टरला भेटून आलों. ! " मी त्याला सांगितलें की, " आमचेजवळ रुपये नाहीत. आमचे आम्ही पाहून घेऊं. आमच्याकरितां तुम्ही एवढी काळजी वाहूं नका. " इतक्यांत माझी आई आली व त्याला म्हणाली, ' माझा मुलगा जेहलांत गेला तरी चालेल. पण तूं येथून निघून जा. आम्हांस माहीत आहे की, तुम्ही कसे लोकांचे भले करणारे आहांत ? " असें बोलणें झाल्यावर तो तेथून निघून वापस गेला. त्याने आनंद आकाजीस व सब इन्स्पेक्टरला एकाचे दोन सांगितले, ' रामकिसन व त्याचे आईने तुम्हांस धिःकारलें. तुमची निर्भत्सना केली. तुम्हांस अपशद्ब बोलला. ' ही घटना घडल्यानंतर आनंद आकाजी पाटील व सबइन्स्पेक्टर हे शिरखेडला आले व त्यांनी आम्हांस शक्य होता तेवढा शाद्बिक धाक दाखवून रुपये काढण्याचा प्रयत्न केला. पण अखेर मीं त्यांना तेंच सांगितलें की, ' माझें काय होण्याचें तें होऊं द्या. पण माझेजवळ रुपये नाहीत. ' त्यावर पाचसहा दिवसांनी आम्ही सर्व यावलीस येऊन राहूं लागलों. आणखी ८ दिवसांनी पाटील व त्याचा भाऊ हे येऊन म्हणाले.— ' आम्ही म्हणतों यावर आपण विश्वास ठेवीत नाही व पुढे मग पश्चात्ताप पावाल. अजूनहि कांही व्यवस्था करा. वारंट कमी करतां येईल. अधिकारी लोकांनी तर तुम्हांस केव्हाच कैद करून टाकलें असतें. पण मी त्यांना तुमच्या माझ्या प्रेमाचे योगाने थांबून ठेवून राहिलों. तुमचेजवळ रुपये नाहीत तर माझी पस्तीस तिफण जमीन तुमचेपाशी कर्जात आलेली आहे तीच वापस करून टाका. म्हणजे मी सर्व तुमच्याकरिता करतों. ' मी त्यांना म्हटलें, ' आनंदराव, आजपर्यंत तुम्ही स्वार्थाकरतां खूप आटापिटा केला. आपले गांवचे लोकांनी एवढें दिव्य करून दाखविल्यावर तुम्हांस त्याबद्दलचा अभिमान वाटावयास पाहिजे ? कधी घडली नाही एवढी

देशाची सेवा यावेळीं आपल्या गांवानें करून दाखविली. अशा वेळीं तुम्ही सर्वांना जेवढी साधेल तेवढी मदत करावयास पाहिजे. पण तुम्ही लोकांना पिळून काढण्याची वृत्ति धारण केली हें योग्य नाही. हा आपणा सर्वांना काळिमा आणण्यासारखा प्रश्न आहे. मी आपणांस कांहीच देऊं शकत नाहीं. आपण माझ्याकरितां कांहीच करूं नका.' असें शेवटचें बोलणें झाल्यावर अखेर त्यांना पूर्ण समजून आलें की, यांचेजवळून या पद्धतीने कांही निघत नाही.

"असे सर्व उपाय केल्यानंतर पाटलाने यावळींतील सोमोशी महारांना त्यांच्या शेतांतून ज्वारीच्या कणसांच्या चोऱ्या करण्यास लावलें व त्याप्रमाणे गांवांतील उभ्या पिकांच्या चोऱ्या एकसारख्या होणें सुरु झाल्या. पुढे या सर्व लोकांवर ११० ची कारवाई होवून अखेर पाटलालाच त्यांची जमानत घ्यावी लागली.

"पुढे माझ्यावर ३५०० रुपये सामुदायिक दंड बसविण्यांत आला. यावेळीं गांवांतील भूमिगतांना मला मदत करावी लागली. पण पाटलाची पाळत एकसारखी माझ्यावर असावयाचीच.

"मारुती कलाल नांवाचे तरुणास पाटील याने भीति दाखवून त्याचे-जवळून ४० रुपये घेतले व त्याची दोन एकरची जमीन हवालदाराचे नांवाने खरेदी करून घेतली. मला समजल्यावर मीं ती जमीन मारोतीस वापस देवविली अशा एकच काय पण कितीतरी गोष्टी आहेत. त्या विस्ताराचे भयाने लिहीत नाही."

रामभाऊ सितारामजी पांचघरे लिहितात— "राजारामजी पांचघरे रागाच्या भरांत पोलीस स्टेशनमध्य हजर होऊन आनंद आकाजी पाटील व माहुलीचे सबइन्स्पेक्टर यांना म्हणाले की, सोनोरींत चौकशी करतेवेळीं मी जर तेथे नसतों तर तुमची जीभच छाटून टाकली असती. आम्ही सरकारच्या दृष्टीने दोषी असलों तरी, आमच्या निर्दोष बायकोला तुम्हीं कां धमकावलें? हा मी हजर आहे. माझे काय तुकडे करावयाचे असतील ते तुम्ही करून घ्या! असें राजारामजींनीं म्हटल्यानंतर त्यांना पोलिसांनी बेदम मार दिला. त्यावेळीं मला फार क्रोध आला आणि चवताळून पोलिसांना म्हटलें— मूर्ख हो!

हा काय तुम्ही धूमाकूळ घालीत आहांत. बदमाषी करतांना कांहीतरी विचार करावा लागतो. मीं असें म्हणतांच आनंद पाटलाने व पोलिसांनी मजवर शिव्यांचा वर्षाव केला. आणि धमकाविलें की, 'जरा ठहरो, तुम्हारीभी यही हालत होगी !' मला पाटलाने सोडून देण्याकरितां २०० रु. ची मागणी केली. मी रुपये देत नाही असें दिसून आल्यावर तुरुंगांत रवाना केलें."

अजाबराव उर्फ अण्णा बालाजी पाटील हे भूमिगत झाल्यावर भोपाल स्टेटमध्ये गेले. तेथे त्यांना कळलें की, त्यांचें घर, शेती व गुरें जप्त झालीं आहेत. गुरांचा लिलाव होऊन चुकला आहे आणि ता. १८-१० ४२ ला उमरावतीच्या कोर्टांत जर तुम्ही हजर झाले नाही तर तुमचें घर व शेती यांचाहि लिलाव करण्यांत येईल, "म्हणून"— ते लिहितात— 'ता. १८-१०-४२ ला दुपारीं १ वाजतां उमरावतीस आलों व श्री. पांडे वकील यांचे सल्ल्याने सब डिव्हिजनच्या कोर्टांत हजर झालों. त्यावर सब डिव्हिजन साहेब मला म्हणाले, 'कांहो, नरसिंगपूरचे पाटील, तुम्ही आता कां हजर झालांत ?" त्यावर मीं त्यांस सांगितलें, 'तुम्ही जर शेती व घर हर्रास केलें नसतें तर मी तुम्हास केव्हाच सांपडलों नसतों.'

यावलींतील एकंदर आंदोलनाचें नेतृत्व सुरुवातीपासून श्री. पंजाबराव यांनीच केलें असल्यामुळे त्यांच्यावर सर्वच अधिकाऱ्यांचा अतिशय दांत होता. १५ तारखेच्या सत्याग्रहाबद्दल पंजाबरावांवर तीन निरनिराळे आरोप ठेवून खटला भरण्यांत आला होता व त्यांत प्रत्येक आरोपाबद्दल त्यांस पांच वर्षे सक्त मजुरीची शिक्षा देण्यांत आली होती. पण एवढ्यानेच दुष्ट नोकरशाहीचें समाधान होण्यासारखें नव्हतें. त्यांनी त्यांना केसमध्ये १००० रूपये दंड केला. श्री. पंजाबराव यांचे घरावर फारच सक्त लकडा लावला. श्री. पंजाबराव यांचे कनिष्ठ बंधु श्री. विश्वासराव व चुलते अजाबराव. हे दोघेहि भूमिगत झाले. पाठीमागे त्यांच्या गैरहजेरींत त्यांच्या घरांदारांवर छापे मारून त्यांचें सर्वस्व लुटण्यांत आलें. श्री. पंजाबराव यांची इस्टेट त्यांना कोणी नातेवाईक व हितचिंतक नाहींत यासबबीवर पाटील आनंद आकाजी यांना रिसीव्हर नेमून त्यांच्या स्वाधीन करण्यांत आली. या आनंद आकाजीने श्री. पंजाबराव यांचीं गुरें सुमारें १५००रु. किंमतीचीं अवघ्या ३५० रू. स हर्रासांत विकून

टाकलीं आणि ५००० रु. किंमतीचें पीक हर्रासांत स्वतःच ६५० रु. स विकत घेऊन टाकलें. अखेरीस श्री. पंजाबराव ह्यांचे आतेभाऊ भीमराव यांनी इस्टेटीचा ताबा मागितला व तसा हुकूम मिळविला. परंतु आनंद आकाजी पाटील व त्यांचे हस्तक यांनी ताबा देण्याचें नाकारलें. उलट उभें पीक मात्र कापून आणलें. अखेरीस पुन्हा श्री. पंजाबराव यांचे आतेभावाला आनंद आकाजी पाटील यांचेजवळून ताबा घेण्यासाठी पोलीसची मदत घ्यावी लागली. " असो.

फकीर लडुशा लिहितो--" शांतता झाली असेल म्हणून गांवांत आलों. तसेंच पाटलाने मला माहुलीस पोलीस स्टेशनमध्ये नेलें. स्टेशनमध्ये नेल्यावर त्याठिकाणीं आम्हांला कांहीच न विचारतां मारणेंच सुरू केलें. मारणारा गोविंदराव कांवळी सबइन्स्पेक्टर हा होता. दोन दिवस मला पोलीस स्टेशनमध्येच रहावें लागलें. त्याच अवधींत नरसिंगपूरचे काशिराव महार व सूर्यभान महार व यावलीचे नशीबखां यांना भयंकर मारण्यांत आलें. त्यांच्या मुंडक्या धरून दिवालीवर आपटण्यांत आल्या. नशीबखां व सूर्यभान यांना घोडी देऊन मार देण्यांत आला. "

शहीद राजारामजी औरंगपुरे यांची आई सयाबाई लिहिते "(राजारामच्या मृत्यूमुळे) मला फार डोंगर कोसळूं लागल्यासारखा झाला. त्यांत सरकारी अधिकारी, पोलीस, गुलाब हवालदार, कामदार महार यांनी सारखे येऊन विचारपूस करावी की, विश्वासराव कुठे आहेत ? अजाबराव कुठे आहेत ? एक महिनाभर त्यांनी फार त्रास दिला. गोळीबाराच्या तिसऱ्या दिवशीं माझें घर सरकारनी खोदलें, कुलूप फोडलें आणि विचारलें की, तुझ्या मुलाने तलवार कोठून आणली होती ? आणखी कांही शस्त्रें घरांत आहेत काय ? त्यावर मीं त्यांना कोणतीहि माहिती सांगण्याचें नाकारलें. "

केवळ नमुन्यादाखल म्हणून पोलीसांच्या अत्याचारांची हीं कांही उदाहरणें वर दिलीं आहेत. शितावरून भाताची परीक्षा या न्यायाने, यावलींच्या खटल्यांत ज्यांना पकडण्यांत आलें त्यांच्या कष्टाची वरील उदाहरणांवरूनहि कल्पना येण्यासारखी आहे.

या खटल्यांत जे लोक भूमिगत झाले त्यांच्या शोधासाठी पोलीसांनी कसें आकाशपाताळ एक केलें याची कथादेखील इतकीच अद्भुत व पोलीसांच्या काळ्या अंतरंगावर प्रकाश टाकणारी आहे.

मागील वर्णनावरून वाचकांच्या हें ध्यानांत आलेंच असेल की १९४२च्या यावलीच्या आंदोलनाचा मूळ उत्पादक व प्रेरक या नात्यानें वीर पंजाबराव यांच्यावर पोलीसचा खरा दांत होता. श्री. पंजाबराव यांच्या इस्टेटीचें वर्तमान पूर्वी सांगितलेंच आहे. वीर पंजाबरावच्या खालोखाल पोलीसचा दांत त्यांचे बंधु विश्वासराव व चुलते अजाबराव उर्फ अण्णा पाटील यांच्यावर होता. हे दोघेहि ता० १८ ला भूमिगत झाले. पैकी अजाबराव केव्हा, कधीं व कसे पोलीसच्या स्वाधीन झाले याची माहिती त्यांच्याच वक्तव्यांत पूर्वी दिली आहे. आता थोडी विश्वासराव यांचीहि हकीकत याठिकाणीं उध्दृत करूं.

भूमिगत स्थितीतील आपल्या अवस्थेचें एक सविस्तर निवेदन विश्वासराव यांनी लिहून काढलें आहे. त्यांतील त्यांचा शोध करण्यासाठी इतरांचा छळ कसा करण्यांत आला या विषयींचा उतारा पुढे देण्यांत येत आहे.

"मी व अजाबराव हे दोघेहि फरार झाल्यानंतर पाटील व सब-इन्स्पेक्टर यांनी गांवामधून लोकांना कांही दिवसांनी पकडणें सुरू केलें. लोकांना पकडतांना व इन्कायरी करतांना त्यांनी लोकांना मारपीट केली व कित्येकांजवळून पैसे खाऊन त्यांना सोडून दिलें. कित्येकांना धमकावण्या दिल्या व जेलची भीति दाखवून पैशाची भरमसाट लूट केली. कित्येक लोकांच्या तपासाकरिता गांवोगांव त्या त्या लोकांच्या आप्तेष्टांकडे जाऊन तपास केला. व जो जेथे मिळेल तेथेच जशा स्थितींत असेल तशाच स्थितींत त्यास अरेस्ट केलें. कित्येक आप्तेष्टांना व तेथे असणाऱ्या स्त्री पुरुषांना धमकावण्या देऊन त्यांचेकडून फरार लोकांचे पत्ते काढून घेतले. माझी व अजाबराव यांची चौकशी करतांना असेच प्रकार घडले.

"आमच्या तपासाकरतां ते लोक (पाटील व पोलीस) ब्राम्हणवाडा पाठक येथे गेले. तेथे अजाबराव यांचे जांवई होते. त्यांचे येथे जाऊन त्यांनी

त्यांच्या घराची झडती घेतली. त्या घरांतील कोनाकोपरा त्यांनी धुंडाळून काढला. पुरुष मंडळीजवळ चौकशी केली व पुढे स्त्रियांनाहि विचारावयाचें आहे असें म्हणूं लागले. परंतु या थराला गोष्टी गेल्यावर माधवराव यांनी त्यांना घराच्या बाहेर काढून दिलें.

" कृष्णापूर येथे श्रीराम ठाकरे यांचेंकडे त्यांनी आमची चौकशी केली. तेथे तुम्ही विश्वासराव यांचा पत्ता सांगा, नाहीतर तुम्हांलाहि जेलमध्ये टाकण्यांत येईल, अशा धमक्या दिल्या.

" मंगरूळ येथे नानासाहेब वानखेडे व कुंडचे मारोतराव पाटील आणि अमरावतीचे डॉ० पडोळे यांच्याहि घरांच्या आमच्या चौकशीसाठी झडत्या घेतल्या. अजाबराव यांना पाहण्यासाठी ते आरेगांवला गेले व तेथे मारोतराव पाटील यांच्या घराची झडती घेतली. माझ्या तपासाकरिता ते दोन दिवस वर्धेस येऊन राहिले. पण आम्ही दोघे व अबदुल रहीम व बारकाजी तडस हे त्यांना शेवटपर्यंत सांपडलों नाही. आमच्या इस्टेटी जप्त झाल्यामुळे व हर्रासाची तारीख निश्चित ठरवल्यामुळे त्या तारखेवर आम्ही दोघेहि हजर झालों व पोलीसच्या स्वाधीन झालों. जेव्हा म० गांधीजींनी फरार लोकांना पोलीसच्या स्वाधीन होण्याची सूचना केली, तेव्हाच अबदूल रहीम व बारकाजी तडस हे त्यांच्या स्वाधीन झाले. "

भूमिगतांचा भूमिगत अवस्थेंतील अनुभव फार चित्रविचित्र व मनोरंजक आहेत. कित्येक ठिकाणीं जवळचीं आप्त माणसेंहि आश्रय देण्यास नाराज, तर कित्येकदा खुद्द पोलीस कान्स्टेबल्स यांचेंच अज्ञात राहण्यास अनपेक्षित साह्य मिळे. कित्येक ठिकाणीं नातलगांना निश्चित पत्ता असून वाटेल तो छळ त्यांनी सहन केला; पण पत्ता दिला नाही. तर कित्येक ठिकाणच्या नातलगांना ही आपणांवर नसती तोहमत आहे असें वाटलें; व त्यांनी पत्ते सांगितले. कित्येक ठिकाणीं हिंदु भूमिगतांना मुसलमानांचें साह्य झालें, तर कित्येक ठिकाणीं मुसलमानांना हिंदूंनी साह्य केलें. मनुष्य जितका दरिद्री अधिक, तितका तो अधिक प्रामाणिक व देशाविषयीं कळकळ बाळगणारा असा सामान्यतः अनुभव आला. तथापि स्थूलमानाने असें म्हणतां येईल की, भूमिगत ज्या ज्या

ठिकाणीं गेले तेथे प्रामाणिक साह्यकर्तेच त्यांना अधिक भेटले आणि बेइमान व देशद्रोही असे लोक कमी भेटले. कित्येक भूमिगत खुद्द अमरावतींत दोन दोन महिने राहिले. खटले चालविण्यासाठी वकीलांना मदत करणें, इतर भूमिगतांच्या व तुरुंगांत गेलेल्यांच्या कुटुंबियांना मदत करणें इ० कामें अमरावतींत राहून करणेंच त्यांना सोयीचें गेलें. कित्येक नांवें बदलून व रोगी बनून महिना महिना अमरावतीच्या इर्विन हॉस्पिटलमध्ये राहिले. एवढी गोष्ट खरी की, पोलीस व पाटील त्यांच्या मागावर आहेत ही गोष्ट त्यांना बहुधा आगाऊच कळे व त्यामुळे त्यांना स्थलांतर करतां येई.

पण गोळ्या लागून जे भूमिगत झाले त्यांचे या सर्वापेक्षा फार हाल झाले. गोळीची जखम ही लपत नाही. तिचे उपचार तर चालू ठेवावयाचे, शिवाय पोलीस मागावर आहेत म्हणून गांवोगांव भटकत राहावयाचें हें अतिशय कठीण कर्म होतें. गोळीची जखम आहे हें कळतांच पोलीस पकडणार ही ठरलेली गोष्ट होती. यावलीचा गोळीबार, त्यानंतर यावलीस झालेले अत्याचार, यावलीचे फरार लोक, पोलीस त्यांचा करीत असलेला तपास, कोर्टांत झालेले खटले या एकाच गोष्टीची चर्चा सामान्यतः मोटारींत, मोटार स्टँडवर, हॉटेलांतून व इतर कोणत्याहि अड्ड्यावर चालत असे. जरा अनोळखी चेहरा दिसला कीं, हा यावलीचा तर नाहीना, अशा भावनेने त्याचेकडे सर्वजण पाहात. मोटारींतून पोलीस बसलेले असतच. सगळीकडून इतकी कडक नाकेबंदी होती की, ती सर्व चुकवून फिरतें राहावयाचें म्हणजे एक अतिशय दुस्तर कर्म होतें आणि जखमी लोकांना तर तें फारच बिकट होतें. पण अशाहि स्थितींत पुष्कळसें स्वतःच्या बळावर व पुष्कळसें सार्वजनिक सहानुभूतीवर यावलीचे भूमिगत फिरत राहिले व अनेक प्रसंगीं त्यांनी झुंझार पोलिसांनाहि चांगलेच खडे चारले. गोविंदराव आंबडकार व आणखी दोन गोळ्या लागलेल्या लोकांचा उपचार अशा बिकट स्थितींत अमरावतीचे डॉ० पडोळे यांनी केला. त्याकरतां पोलीसांनी त्यांना अतोनात त्रास दिला. तरी ते आपल्या कर्तव्यापासून ढळले नाहीत.

प्रकरण ३ रें.

यावलीच्या हत्याकांडाचा खटला.

ता० १८ ऑगस्ट १९४२ रोजीं झालेल्या गोळीबार प्रकरणीं तब्बल दोन महिने धरपकड, मारझोड, कच्च्या जबान्या वगैरे पूर्वतयारी करून सर्कल इन्स्पेक्टर ऑफ पोलीस मि० केकरे यांनी ता०२३-१०-४२ रोजीं इंडियन पीनल कोडाच्या १४८ कलमाखाली व त्याला १४९, ३३२, ३३३ व ३०७ हीं कलमें जोडून, आरोपपत्रक तयार केलें व खटला दाखल केला.

या तऱ्हेचे खटले चालविण्यासाठी त्या काळांत खास न्यायाधीश नेमण्यांत आले होते व विशिष्ट खटले चालविण्यासाठी प्रांतिक सरकारच्या लीगल रिमेंब्रंसरकडून त्यांना अधिकार देण्यांत येत होते. या नव्या पद्धतीस अनुसरून वऱ्हाड-मध्यप्रांत सरकारचे त्या वेळचे लीगल रिमेंब्रंसर मि० ए. एन. शहा यांनी १०-१०-४२ व २३-१०-४२ रोजीं दोन वेगवेगळे हुकूम जारी करून, पहिल्या हुकुमाअन्वयें ३६ व दुसऱ्या हुकुमाअन्वयें आधिक १२ अशा एकूण ४८ आरोपींचे खटले चालविण्याचा अधिकार स्पेशल जज मि० डी. वी. दंडे यांना दिला. या हुकुमांत "इं० पी० को० १४८, ३०७ व ३३३ हीं कलमें १४९ कलमा बरोबर वाचून, व आणखी जीं जीं कलमें साक्षीपुराव्यानंतर लागूं होण्यासारखीं असतील, तीं लावून" खटला चालविण्यांत यावा असें म्हटलें होतें.

या खटल्यांत सरकारतर्फे एकूण २६ साक्षीदार देण्यांत आले होते. त्यांत डेप्युटी कमिश्नर मि० मेल्ड्रम, सार्जंट क्वीन, सिव्हिल सर्जन मेजर डब्ल्यू. स्कॉट, हौस सर्जन डॉ० ई० एफ्० रोझारिया, डॉ० पावडे,

बडनेऱ्याचे सर्कल इन्स्पेक्टर एस. जी. केकरे, माहोलीचा सब इन्स्पेक्टर गोविंदारव कांबळे, यावलीचा पाटील आनंद आकाजी, नायब तहसीलदार अनीक महंमद, नायब तहसीलदार एन्. डब्ल्यू. चौधरी, इ० महत्त्वाचे साक्षीदार होते.

सरकारी व बिनसरकारी लोकांना ज्या जखमा झाल्या होत्या, त्यांची तपासणी व उपचार अमरावतीच्या इर्विन हॉस्पिटलमधील सिव्हिल सर्जन व डॉक्टरांनी केलेले असल्याने त्यांच्या साक्षीलाहि महत्व प्राप्त झालें होतें.

पुराव्यांत दोन फरशे म्ह० कुऱ्हाडी, दोन भाले, एक लोखंडी गर्डर, एक बल्लम (टोकदार लोखंडी कांब), एक लोखंडी कांब आणि बारा लाठ्या दाखल करण्यांत आल्या होत्या.

ता० २६-१०-४२ पासून साक्षीपुराव्यास प्रारंभ झाला. पहिली साक्ष इर्विन हॉस्पिटलमधील डॉ० पावडे यांची झाली. ता० ३०-११-४२ पर्यंत सरकारी साक्षीदारांच्या जबान्या, तपासणी व उलट तपासणी चालली. डेप्युटी कमिश्नर मेल्ड्रम हा शेवटचा साक्षीदार होता. सरकारी साक्षीदारांच्या जबान्यांनी या खटल्याच्या कागदपत्रांत एकूण १६० टाईप केलेले फुलस्केप कागद व्यापलेले आहेत.

ता० १०-११-४२ पासून आरोपींची जबानी व तपासणी सुरू झाली व ती ता० २-१२-४२ पर्यंत चालली. या जबान्यांनी १४३ टाईप केलेले फुलस्केप कागद व्यापले आहेत. यानंतर सर्व आरोप कायम करून, निरनिराळीं आरोपपत्रकें (Charge Sheets) तयार केलीं. आरोप कायम करण्यांत आल्यावर, त्यावर आरोपींचें काय म्हणणें आहे तें विचारण्यांत आलें. सर्व आरोपींनी वकीलामार्फत पुढीलप्रमाणे आपलें म्हणणें लिहून दिलें—"हा खटला असत्यावर उभारण्यांत आला आहे. सामुदायिक दंड वसूल करण्याचा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने जो बेकायदा प्रयत्न केला व जो अंदाधुंद (indiscriminate) गोळीबार केला, तो लपविण्यासाठी हा खटला सुरू करण्यांत आला आहे. आरोपी निरपराध आहे."

साक्षी पुराव्यांत जी एक गोष्ट विशेष महत्त्वाची ठरली, ती म्हणजे १८ ऑगस्टचें हत्याकांड झाल्यानंतर डे० क० मि० मेल्ड्रम यानें वर्तमान पत्रांच्या बातमीदारांना दिलेली एक मुलाखत ६ सप्टेंबर १९४२ च्या 'हितवाद'मध्ये प्रसिद्ध झालेली असून, तिचें मथळ्यासह भाषांतर खाली देण्यांत येत आहे:—

उमरावती जिल्ह्यांतील दंगे
भडकलेल्या जमावावर गोळीबार
'केवळ आत्मसंरक्षणार्थ गोळ्या झाडल्या'

(आमच्या बातमीदाराकडून) अमरावती, सप्टेंबर ५

अमरावती येथील डि० मॅजिस्ट्रेट यांनी पुढील पत्रक काढून उमरावती तालुक्यांतील यावली येथे घडलेल्या हकीकतींचा तपशील दिला आहे.—

"ता० १५ ऑगस्ट रोजीं उमरावती तालुक्यांतील यावली नांवाच्या खेडयांतील सुमारें २५०० रहिवाश्यांच्या जमावाने माहुली येथील ठाण्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला परंतु स. इन्स्पेक्टरने गोळीबाराचें भय दाखवितांच जमावाची पांगापांग झाली. स. इन्स्पेक्टरला ५ इसमांना कैदहि करतां आलें. डि० मॅजिस्ट्रेट व डि. एस. पी. मोर्शीस जाण्याच्या वाटेवर माहुलीस पोहचण्याच्या पूर्वी थोडा वेळ आधी जमावाची पांगापांग झाली होती. त्यावेळीं जी चौकशी करण्यांत आली, तीवरून असें दिसून आलें की, माहुली पोलीस स्टेशन आणि यावलीकडे जाणारा रस्ता यांच्या दरम्यान सुमारें २ मैल विभागांतील तारेचे खांब जमिनीपासून ५ फूट अंतरावर तोडून टाकण्यांत आले होते. ता. १६ ऑगस्ट रोजीं माहुली येथील रेव्हेन्यू इन्स्पेक्टर आपल्याबरोबर सशस्त्र पोलीस कॉन्स्टेबलचें एक छोटेसें पथक घेऊन गेला असतांना यावली येथील खेडुतांनी जमाव करून त्याला गांवांत प्रवेश करण्यास प्रतिबंध केला. रे. इ. ला आदल्या दिवशीं यावली येथे झालेल्या नासधुशीची चौकशी करण्यास पाठविण्यांत आलें होतें.

ता० १८ ऑगस्टला दुपारच्या सुमारास पोलीस व मॅजिस्ट्रेट लोकांची एक छोटीशी तुकडी डि० मॅजिस्ट्रेट व डी. एस्. पी. यांच्यासह यावलीस जाण्यास निघाली. त्यांचा हेतु खेडयांतले लोक व मुलकी अधिकारी यांच्या दरम्यान चांगले संबंध पुन्हा प्रस्थापित करावे हा होता. कोणत्याहि तऱ्हेची बळजबरी करणें, हा उद्देशच नसल्यामुळे या तुकडीने आपल्याबरोबर फक्त दोन रायफली घेतल्या होत्या. या शिवाय पोलीस सार्जंटच्याजवळ पांच गोळ्या असलेलें एक रिव्हाल्वरहि होतें. गांवांत गेल्यावर या तुकडीला असें दिसून आलें की, गांवांतील रस्ते ओसाड आहेत आणि घरांचे दरवाजे व खिडक्या बंद आहेत. तथापि पाटलाच्या घराजवळ लाठीबंद लोकांचा एक लहानसा जमाव दिसूं लागला पण पोलीस पार्टी दृष्टिपथांत आल्याबरोबर तो पळून जाऊं लागला. म्हणून एक हलकासा लाठीहल्ला करून या आक्रमणशाली जमावाची पांगापांग करण्यांत यावी असें ठरविण्यांत आलें. एका अरुंद बोळांत व एका उघडया चौकांत हा लाठीहल्ला करण्यांत आला. या चौकांत लाठ्या, कुऱ्हाडी व इतर भयानक शस्त्रें हातीं घेऊन एका मोठ्या जमावाने पोलीस पार्टीला वेढा दिला आणि त्यांतील एकेका माणसावर जबरदस्त हल्ला केला. शिवाय दगडफेकहि करण्यांत आली. कांही दगड बऱ्याच मोठ्या आकाराचे होते. या हल्ल्यांत लहानशा पोलीस पार्टींतील एकेका माणसाला अतिशय मोठ्या संख्येच्या जमावाशीं तोंड द्यावें लागलें. त्यांत डि० मॅजिस्ट्रेट, डि० एस्. पी. व इतरहि कित्येक लोकांना मार लागला. पोलीसपार्टी जेव्हा पुन्हा त्या अरुंद गल्लींत जमा झाली, तेव्हा लोकांना असा इशारा देण्यांत आला कीं, ते जर निघून जाणार नाहीत तर पोलिसांना गोळ्या झाडाव्या लागतील. जमावाने निघून जाण्याचें नाकारलें आणि पोलिस पार्टीवर दगडफेक चालूच ठेवली. गोळीबार करण्यांत आला आणि पोलीस पार्टीने मागे फिरून पाटलाच्या घरासमोरील उंचवटयाचा आश्रय घेतला. जमावांतील ज्या एकटदुकट व्यक्ती पुढे आल्या होत्या त्यांना जमावाला शांत करण्याविषयीं सांगण्यात आलें. परंतु चढाईच्या मनोवृत्तींत असलेल्या जमावासमोर त्यांचें कांहीच चाललें नाही. अधिक रक्तपात टाळावा म्हणून पोलीसपार्टी पाटलाच्या घरांत शिरली आणि तिथे तिने गांव सोडून जाण्याचा निर्णय घेतला. गांवाच्या बाहेर असलेली दलदलीची जमीन

ओलांडून पोलीसपार्टी जात असतांना गांवांतील जमावाने त्यांच्यावर पुन्हा एक हल्ला करण्याची तयारी केली व दगडांचा मारा केला. जमावांतील एक दोन व्यक्तींना वेगळें काढून त्यांनी इतरांच्या ठिकाणीं योग्य मनोवृत्ति निर्माण करावी, असा पुन्हा प्रयत्न करण्यांत आला. पण हे लोक दलदलीची जागा ओलांडून जात नाहीत, तोंच शेंकडों लोकांचा जमाव त्यांच्या पाठीवर आला. त्यांच्यापुढे त्यांचा एक पिसाट (Fanatical) पुढारीहि होता. त्याच्या हातांत दोन तरवारीहि दिसत होत्या. पुन्हा गोळीबार करण्यांत आला व शक्यतों रक्तपात टाळावा हा आपला हेतु स्पष्ट करण्यासाठी पोलीस आणखी दूर गेले.

जमाव अंगावर चालून येत होता, पण जेव्हा गोळीबाराने आणखी कांही लोक पडले, तेव्हा मात्र तो पुढे येण्यास अनमान करूं लागला. पांगापांग करण्याची संधि जमावाला देण्यांत यावी म्हणून पोलीस आणखी दूर गेले. यावेळीं पहिल्यांदाच त्यांचा पुढारी पुढे आला. पोलीस सार्जंटने एक रायफल घेऊन त्याला जागच्या जागींच पाडलें. आणखी पुढे येण्याचा त्यांनी किंचित् प्रयत्न केला पण आणखी एक इसम गोळी खाऊन पडतांच हा थांबला. जमावाचें चाल करून येण्याचें आणखी चिन्ह दिसेना. म्हणून येथेच ही चकमक संपली. केवळ आत्मरक्षणाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि कारणासाठी एक देखील गोळी झाडण्यांत आली नाही. पोलीस पार्टीच्याजवळ जो कांही मर्यादित दारूगोळा होता तो बहुतेक सर्व या चकमकीच्या शेवटीं खलास झालेला होता. शेवटीं तपास करतां असें आढळून आलें की, या चकमकींत चार इसम मेले व अकरा जखमी झाले. जखमी लोकांपैकी आणखी एक जण इर्विन हॉस्पिटलमध्ये नंतर मेला. पोलीस व मॅजिस्टेरीअल पार्टीच्या प्रायः सर्वच लोकांना जखमा झाल्या व त्यांतील कांही गंभीर स्वरूपाच्या आहेत. "

उलट तपासणीमध्ये सदर्हु पत्रकाविषयीं मि॰ मेल्ड्रम यांनी पुढील उद्गार काढले— " उमरावती येथील पत्रकारांच्या विनंतीवरून स्थानिक लोकांच्या माहितीसाठी मीं जें एक पत्रक काढलें होतें तें अधिकारी या नात्याने

नव्हे, असें मीं त्यावेळीं स्पष्ट केलें होतें. कारण यावली प्रकरणांत ज्या अधिकाऱ्यांचा संबंध आला त्यांच्याकडील वृत्तांताच्या आधारावर हें वृत्तपत्रीय पत्रक काढण्यांत आलें नव्हतें. सप्टेंबरच्या प्रारंभाच्या सुमारास हें पत्रक काढण्यांत आलें होतें. अधिकृत सरकारी पत्रकाचें स्वरूप त्याला येऊं नये या खास शर्तीवरच हें पत्रक प्रसिद्ध करण्याची परवानगी पत्रकारांना देण्यांत आली होती. " हें पत्रक व मेल्ड्रम याची ज्बानी यांच्या विसंगतीवर उलट तपासणी-मध्ये वकिलांनी खासा प्रकाश पाडला. आपल्या हातून घडलेल्या गोळीबाराच्या अपकृत्यावर पांघरूण घालण्यासाठी व लवकरच न्यायाधीन होणाऱ्या या खटल्यांत आरोपींच्याविरुद्ध लोकमत कलुषित करण्यासाठी बुद्धिपुरस्सर वरील वर्तमान प्रकाशित करण्याची काळजी मेल्ड्रम महाशय यांनी घेतली होती हें उघड आहे. या पत्रकांत त्यांनी सांगितलेल्या माहितीशीं त्यांनी आपल्या जबानींत प्रगट झालेली माहिती पूर्णपणें विसंगत होती आणि या विसंगतीवर पांघरूण घालण्याचा हास्यास्पद प्रयत्न करतांना त्यांची कोर्टांत चांगलीच फे फे उडाली. आपलें हें वार्ताहरांना दिलेलें पत्रक अधिकृत सरकारी पत्रक नव्हतें, असें मागाहून कोर्टांत म्हणणाऱ्या या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने तें प्रसिद्ध करतांना, हितवादने प्रारंभींच "The District Magistrate Amraoti has issued the following communique giving details of the Yawali incident in Amraoti Taluq" हा जो मजकूर छापला होता त्याचा वेळींच प्रतिवाद करण्याची कोणतीहि काळजी घेतली नव्हती हेंहि ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

आरोपींच्यातर्फे अमरावती येथील तरुण कॉंग्रेसवादी वकील श्री० अॅडव्होकेट ना० त्र्यं० पांडे व श्री० राजाभाऊ गोखले यांनी मोठ्या धडाडीने बचावाचें काम केलें व त्यांना अॅड० वि० दा० ब्रम्ह यांनी साह्य केलें. ज्या दिशेने त्यांनी बचावाची रूपरेषा आखली, ती किती योग्य होती; हें पुढे हायकोर्टाने दिलेल्या निकालावरून स्पष्ट झालें. वकील देण्याच्या बाबतींत आणखी एक महत्त्वाची घटना घडली. तिचाहि निर्देश येथे करणें अवश्य आहे. फकीर अकबरशा वगैरे जे पांचसहा मुसलमान खटल्यांत आरोपी होते त्यांच्या बचावासाठी अमरावती येथील मुस्लीम

लीनगे मुसलमान वकील देण्याचा घाट घातला; पण अकबरशा प्रभृति मुस्लीम आरोपींनी—'आम्हांला वेगळा मुसलमान वकील नको. जे सर्वांचे वकील तेच आमचे वकील. त्यांच्यावर आमचा विश्वास आहे.'—असें म्हणून हा घाट हाणून पाडला.

बचावाची रूपरेषा पुढील प्रमाणे होती. डि० मॅजिस्ट्रेट मेल्ड्रम याने ता० १६-२-४२ ला यावलीवर बसविलेला २००० रु० सामुदायिक दंड बेकायदा होता. असा दंड बसविण्याचा हुकूम त्यास प्रांतिक सरकारकडून त्यावेळीं मिळालेला नव्हता. अशा बेकायदा दंडाच्या वसुलीसाठी ता० १६ ऑगस्ट रोजीं गेलेल्या रेव्हेन्यू इन्स्पेक्टर इ० लोकांच्या पार्टीला दंड वसुलीच्या कामांत प्रतिबंध करणें हें न्याय्य होतें व यावलीच्या लोकांनी आपलें हें न्याय्य कर्तव्य बजावलें; याबद्दल त्यांस दोष देतां येणार नाही. हाच बेकायदा दंड वसूल करण्यासाठी १८ ऑगस्टला मेल्ड्रमप्रभृति सरकारी पार्टी गेलेली होती. सार्जंट क्वीन वगैरे सरकारी साक्षीदारांच्या जबानींतूनच ही गोष्ट सिद्ध झालेली आहे. तेव्हा, बेकायदा दंड वसुलीसाठी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच काय, पण केवढाहि मोठा सरकारी अधिकारी गेला तरी त्याचें तें कृत्य कायद्याच्या भाषेंत निव्वळ दरवडा ठरतें; आणि असल्या दरवड्यांचा प्रतिकार करणें, हें जनतेचें कर्तव्यच आहे; व तेंच आरोपींनी बजावलें असल्यामुळे ते दोषी ठरूं शकत नाहीत. शिवाय गांधी चौकांत जमलेला जमाव बेकायदा आहे असेंहि डि० मॅजिस्ट्रेटने घोषित केलें नव्हतें. उलट तसें घोषित न करतांच त्याने जमलेल्या लोकांवर लाठी हल्ला व गोळीबार केला. म्हणून केवळ आत्मसंरक्षणासाठी लोकांनी उलट हल्ला केला व त्यासाठी मिळतील तीं साधनें त्यांनी वापरलीं. याशिवाय पोलीस पार्टीने गांवकऱ्यांची एक मोठी चोरी केली. डी० एस० पी० ने गांवांतील राष्ट्रीय झेंडा चोरला. राष्ट्रीय झेंडा हा केव्हाहि बेकायदा ठरविण्यांत आलेला नव्हता. झेंडा ही गांवकऱ्यांची मालमत्ता होती, आणि ती चोरून नेण्याचा सरकारी अधिकाऱ्यांना कोणताहि हक्क नव्हता. म्हणून झेंड्यासारख्या सार्वजनिक संपत्तीवर जेव्हा अधिकाऱ्यांनी धाड घातली तेव्हा तिच्या बचावासाठी लोकांनाहि लढावें लागलें. या सर्व प्रकरणांत डि० मॅजिस्ट्रेट

व डी० एस० पी० च्या दर्जाचे मोठे अधिकारी इतक्या मनमान्या पद्धतीने,-दंडेलीने व बेकायदा रीतीने वागले की, लोकांनी त्यांचा प्रतिकार करावा हें तर स्वाभाविकच होतें! पण न्याय व कायदा यांची चाड असणाऱ्या सरकारने या अधिकाऱ्यांवरच चोरी, दरवडे खोरी, बेकायदा वागणूक, बेकायदा गोळीबार व खून असले आरोप ठेवून खटले भरायला पाहिजेत! वगैरे प्रकारें आरोपींची बाजू अतिशय धडाडीने, अधिकाऱ्यांची भीडमुर्वत न ठेवतां व कोणत्याहि स्वार्थाची अपेक्षा न बाळगतां अमरावतीच्या तरुण वकिलांनी मांडली हें त्यांस खरोखर भूषणावह आहे. १९४२ च्या क्रांतीचाच लढा आपण न्यायालयांतून लढत आहोंत, हा भाव त्यांनी बऱ्याच प्रमाणांत जागृत ठेवला.

पण स्पेशल जज्जाचें कोर्ट म्हणजे कांही हायकोर्ट नव्हे. १९४२ सालीं जारी करण्यांत आलेल्या काळ्या कायद्यांचे अनिर्बंध अधिकार हातीं घेऊन जेथे नोकरशाही खुद्द हायकोर्टाच्या मूलभूत अधिकारांवर देखील आक्रमण करण्यास कमी करीत नव्हती, तेथे लहान सहान जज्जांनी नोकरशाहीच्या बोटावर नाचावें आणि सर्व सद्सद्विवेक बुद्धि गुंडाळून ठेवून आपले न्यायनिवाडे करावेत हें क्रमप्राप्तच नव्हतें काय?

यावली खटल्यांतले स्पेशल जज्ज मि० दंडे यांनी ता. २२-१२-१९४२ रोजीं आपला निर्णय दिला. हें निकालपत्रक एकूण ६२ पृष्ठांचें असून ९८ परिच्छेदांत तें विभक्त आहे. त्यांनी सर्वच आरोपींना दोषी ठरवून दोन वर्षांपासून सात वर्षांपर्यंत सक्त मजुरीच्या शिक्षा ठोठावल्या. साहेबादि मंडळी आपल्या जबान्यांत करूं शकले नाहीत इतकें त्यांच्या बेकायदा कृत्यांचें समर्थन करण्याचा प्रयत्न आपल्या ६२ पृष्ठात्मक निकालपत्रकांत स्पेशल जज्जाने केला व आपण ब्रि० सरकारचें मीठ खातों आहोंत हें सिद्ध करून दाखविलें.

'आरोपीने दिलेलें स्पष्टीकरण खोटें आहे,' 'आरोपीचा खुलासा खरा नाही, 'आरोपी हा बेकायदा जमावांत सामील होता.' असे उद्गार त्यांनी प्रत्येक आरोपीच्याबाबत आपल्या निकालपत्रांत काढले आहेत. सरकारी साक्षीदारांच्या जबान्यांतून पोलीसांनीच पहिला लाठीहल्ला व गोळीबार केला,

ही गोष्ट सिद्ध झालेली असतांना आणि गांधी चौकांतील जमाव बेकायदा आहे असें कोण्याहि मॅजिस्ट्रेटने घोषित केलें नसल्याचीहि कबूली सरकारी साक्षीदारांनीच दिलेली असतांना, विद्वान स्पेशल जज्जसाहेब आपल्या न्यायपत्रकांत लिहितात— "डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व त्याची तुकडी यांच्यावर जमावाने हल्ला केला. या घटनेबद्दल वाद असूं शकत नाही आणि आरोपींच्या विद्वान वकिलांनीहि मोठ्या समंजसपणें (rightly) या घटनेबद्दल वाद घातला नाही. तेव्हा ज्या समान हेतूसाठी लोक गांधी चौकांत जमा झाले होते तो कांहीहि असला, तरी ज्याक्षणीं त्यांनी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व त्याची तुकडी यांच्यावर हल्ला केला, त्याक्षणींच तो जमाव बेकायदा ठरला. कागदोपत्रीं उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून हें निःसंदेह दिसून येतें की, अरुंद गल्लींत माघार घेतल्यावर डि० मॅजिस्ट्रेट व त्याचें पथक यांची वागणूक ही शेवटपर्यंत संरक्षणात्मक स्वरूपाचीच होती."

स्पेशल जज्जांची ही तर्कप्रणाली मोठीच वाखाणण्यासारखी आहे, यांत शंका नाही ! डि०मॅजिस्ट्रेट व त्यांची तुकडी यांच्यावर जमावाने हल्ला केला, या घटनेबद्दल वाद असूं शकत नाही,— हे उद्गार काढतांना, त्याच्याहि आधी डि० मॅजिस्ट्रेट व त्याची तुकडी यांनी जमावावर बेकायदा हल्ला केला होता, ही गोष्ट स्पेशल जज्जसाहेब सोयीस्कर रीतीने विसरले. 'ज्या क्षणीं त्यांनी (जमावाने) डि० मॅजि० व त्याची तुकडी यांच्यावर हल्ला केला त्याक्षणींच तो जमाव बेकायदा ठरला'— हें तर्कट लढवितांना, जमावाने हल्ला कां व कोणत्या परिस्थितींत केला ? हेंहि ध्यानांत घेण्याची गरज जज्ज साहेबास भासली नाही. 'डि० मॅजि० व त्यांचें पथक यांची वागणूक ही शेवटपर्यंत संरक्षणात्मक होती.'— हें लिहितांना हाच संरक्षणाचा अधिकार कायद्याने लोकांनाहि दिलेला होता व तोच ते बजावीत होते, या महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष देण्याचीहि जरूरी त्यांना वाटली नाही.

एवढ्यानेच या प्रदीर्घ न्यायपत्रकांतील विद्वत्ता संपली नाही ! साहेब आणि मंडळीचा बचाव करण्यासाठी आपण मनकवडे आहोंत तें दाखविण्याची आवश्यकताहि त्यांना वाटूं लागली. म्हणून साहेब आणि मंडळी यांनी

गांधीचौकांत लोकांवर हल्ला चढविण्यापूर्वी, लोक जे तेथे जमले होते तेच मुळी साहेब आणि मंडळीस मारण्याच्या उद्देशाने होय! असेंहि तर्कट काढून लोकांच्या मनांत काय होतें हें आपणास बरोबर समजलें असें दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कसा तो पहा! निकालपत्रकांत स्पेशल जज्ज साहेब म्हणतात—"गोळीबारामुळे झालेली प्रतिक्रिया योग्य रीतीने जमेला धरली, तरी एकंदरीत जमावाची जी वागणूक होती तिच्यावरून असें अनुमान निघूं शकतें की, लोक जशा रीतीने वागले तशा रीतीने वागण्यांतला त्यांचा हेतु समयस्फूर्त नसून, गांधी चौकांत जमा होण्याच्या आधीच तो निश्चित झालेला होता."

हिंदी लोकांना फासावर चढविण्यासाठी व ब्रि० सरकारचें संरक्षण करण्यासाठी हिंदी लोकच तयार झाल्यानंतर १९४२ च्या प्रचंड आंदोलनांतूनहि ब्रि० साम्राज्य येथे सुरक्षित राहिलें, यांत कांहीच आश्चर्य नाही—"**विनाशमभिकांक्षन्ति जातीनां जातयस्तथा**" हें स्मृतिकारांचें वचन किती यथार्थ आहे याची वरील निकालपत्रक पाहिलें व पाटील आनंद आकाजीसारख्यांच्या काळ्या व खुनशी कारवाया ध्यानांत घेतल्या म्हणजे खात्री पटूं लागते.

डि० मॅजि० व त्याची तुकडी पळून जात असतांना आपला राष्ट्रध्वज चोरून नेत आहेत व ही चोरी त्यांना पचूं देतां कामा नये, राष्ट्रध्वजाची सुटका करण्यासाठी त्यांचा पाठलाग केलाच पाहिजे, हा लोकांचा उदात्त हेतु ध्यानांत येण्यासाठी राष्ट्रीय आकांक्षांशीं समरस व्हावें लागतें; आणि तो ध्यानांत आलाहि तरी बोलून दाखविण्यासाठी न्यायाचा काटा निर्भीडपणे हातीं लागतो, व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या रागालोभाविषयीं निरपेक्ष रहावें लागतें!! म्हणूनच गांधीजींनी आपल्या ता० ८ ऑगस्टच्या संस्मरणीय भाषणांत 'कायद्याचा अन्याय्य अर्थ करूं नका!' असा इषारा हिंदुस्थानांतील न्यायाधीशांना दिलेला होता; पण वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भ्रूभंगाकडे पाहून न्यायनिवाडे करण्याची आजवर संवय झालेल्या छोट्या छोट्या न्यायाधीशांच्या गळीं गांधीजींचा हा कडू

घोट कसा उतरावा ? तो पचवून त्याप्रमाणे वागण्यासाठी हायकोर्टाच्या न्यायाधीशांनाच पुढे यावें लागलें आणि अखेरीस त्यांनीच वरील सारख्या तोंडपुज्या निकालपत्रकावर जोराचे कोरडे उडविले.

गांधी चौकांतलि जमाव कोणत्या उद्देशाने जमा झाला होता याविषयीं केवळ सूचक उद्गार काढूनच विद्वान स्पेशल जज साहेब थांबले नाहीत, तर त्याच्याहि पुढे जाऊन आपल्या प्रदीर्घ निकालपत्रकाच्या २१ व्या परिच्छेदांत ते लिहितात— "म्हणून माझा निर्णय असा आहे की, बेकायदा जमाव जमलेला होता, डि० मॅजि० व त्याचें पथक यांच्यावर हल्ला करण्याचा सर्वांचा समान उद्देश होता, आणि अशा या बेकायदा जमावांतील लोकांनी आपला उद्देश तडीस नेण्यासाठी डि० मॅजि० व त्याची तुकडी यांच्यावर हल्ला चढविला." असें ठासून म्हटल्याशिवाय पुढील जबरदस्त शिक्षा देण्याची भूमिका कशी तयार झाली असती ! पण पुढे हायकोर्टाच्या निकालांत स्पेशल जज्ज साहेबांचें हें सारें तर्कट त्यांच्यावरच उलटलें व ज्या घटनांवरून त्यांनी जनतेच्याविरुद्ध कायद्याचा अर्थ लावला, त्याच घटनांमुळे कायदा सरकारी अधिकाऱ्यांच्याविरुद्ध कसा जातो हें हायकोर्टाने दाखवून दिलें.

यावलीच्या खटल्यांतल्या आणखी दोन तीन महत्त्वाच्या गोष्टी विशेष ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे आरोपींच्या तर्फे साक्षीदार देण्यांत आले नाहीत ही होय. दुसरी गोष्ट म्हणजे हा खटला चालू असतांनाच Enhancement of Punishment Ordinance नांवाचा जो काळा कायदा जारी करण्यांत आला त्याचाहि फायदा घेण्याचा सरकारतर्फे प्रयत्न करण्यांत आला, पण तो फसला; आणि तिसरी गोष्ट म्हणजे खटला चालू असतांना कोर्टाची बेअदबी होईल असें वर्तन प्रांताच्या गव्हर्नराने व डेप्युटी कमिश्नर मेल्ड्रम यांनी केलें. पण त्याची दाद घेण्याची हिंमत स्पेशल जज्ज मि० दंदे यांस झाली नाही, ही होय. या प्रत्येक गोष्टी बाबत थोडाथोडा खुलासा अवश्य आहे.

आरोपींच्यातर्फे आपण साक्षीपुरावे कां देऊं शकत नाही, याविषयीं आरोपींच्या वकिलांनी एक अर्ज कोर्टांत दाखल केला. त्यांत असें म्हटलें की,

पुढील तीन कारणांमुळे आरोपींना बचावाचे साक्षीदार मिळणें असंभवनीय झालें आहे. (१) ता० १९-८-४२ रोजीं लष्कराने यावलींत जाऊन जो धुमाकूळ घातला, त्यामुळे तेथील लोकांत इतकी दहशत निर्माण झाली आहे की, त्यांच्यांतून आरोपींच्यातर्फे साक्ष देण्यासाठी पुढे येण्याचीहि लोकांना भीति वाटूं लागली आहे. (२) या खटल्याची कच्ची चौकशी चालू असतांनाच डि० मॅजि० मेल्ड्रम यांनी ता० ५-९-४२ ला वार्ताहरांना जें वक्तव्य दिलें (हें वक्तव्य मागे उधृत केलेंच आहे.) त्यामुळे गांवकऱ्यांनीच सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ला केला असा भ्रम निर्माण झाला आहे. त्याचा परिणाम आधीच लोकमत कलुषित होण्यावर झाला आहे. कच्च्या चौकशीवरहि त्याचा परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. या खटल्यांत सरकार तर्फे जी चालान भरण्यांत आली ती वस्तुतः डि० मॅजि० मेल्ड्रमच्या वरील वक्तव्याची (Press Communique) च नक्कल आहे. तसेंच (३) हा खटला चालू असतांनाच प्रांताच्या गव्हर्नराने मुद्दाम माहोलीस जाऊन यावलीचा पाटील आनंद आकाजी यास एक तरवार बक्षीस दिली. ही तरवार सार्वजनिक समारंभ करून देण्यांत आली, आणि ती घेणारा इसम आनंद आकाजी पाटील हा खटल्यांतला एक प्रमुख साक्षीदार आहे. तरवार बक्षीस देत असतांना गव्हर्नरने असे उद्गार काढले कीं, **'गांवकरी गुंडांपासून सरकारी अधिकाऱ्यांचे प्राण वाचविण्याबद्दल ही तरवार आनंद आकाजी पाटील यास बक्षीस देण्यांत आली आहे.'**

वस्तुतः गव्हर्नरसारख्या प्रांताच्या अत्युच्च अधिकाऱ्याने खटला चालू असतांना एका महत्वाच्या साक्षीदाराला समारंभपूर्वक तरवार बक्षीस देऊन व वरीलप्रमाणे उद्गार काढून न्यायाधिशांवर अप्रत्यक्ष कां होईना पण अन्याय्य दडपण आणलें यांत शंका नाही. प्रांताच्या गव्हर्नराचे न्यायाधीन असलेल्या आरोपींबाबत वरील सारखे उदगार जाहीरपणें ऐकल्यानंतर त्याच्या विरुद्ध जाणारे न्यायाधीश त्या काळांत तरी आढळणें विरळाच! गव्हर्नराचे वरील उद्गार हें न्यायाधीशांवर अन्याय्य दडपण तर होतेंच, सरकारी अधिकाऱ्यांवर प्राणघातक हल्ला करणाऱ्या गांवकरी गुंडांना कडक शासन झालें पाहिजे, असा इषाराहि त्या उद्गारांत गर्भित होताच. शिवाय

कोर्टासमोर असलेल्या खटल्यांत ती ढवळाढवळहि होती; आणि अशी ढवळा-ढवळ करणें ही कोर्टाची बेइज्जत झाली होती.

डि० मॅजि० मेल्ड्रम याने वार्ताहरांना दिलेलें पत्रक हें सुद्धा एकाप्रकारें कोर्टाला बेअदबीकारकच होतें. पण अधिकाराची गुर्मी चढलेला तो मदांध जिल्हाधिकारी एवढ्यावरच थांबला नाही. भर कोर्टांत, कोर्टाच्यासमोर तो आरोपींच्या वकीलांना वाटेल तसें बोलला. 'मला इतर कामें आहेत. तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास मी बांधला नाही. मला वेळ नाहीं. तुम्ही मला काय समजलांत'— इ० अनेक प्रकारचीं दुरुत्तरें त्याने वकिलांना केलीं व तीं सर्व स्पेशल जज साहेबांनी मुकाट्याने ऐकून घेतलीं. इतकेंच नव्हे तर त्याची जबानी आटोपली तेव्हा मोठ्या समाधानाचा सुस्कारा टाकून 'सुटलों बुवा एकदाचे' असे उद्गार काढल्याचेंहि ऐकिवांत आहे. न्यायाचा तराजू समतोल-पणें हातीं ठेवणाऱ्या न्यायाधीशाचें, गव्हर्नर व मेल्ड्रम या दोघांवरहि कोर्टाच्या बेअदबीचा दावा करणें हें कर्तव्य होतें. न्यायालयाच्या इज्जतीचा पडलेला हा खून न्यायाधीशांनी उघड्या डोळ्यांनी पाहिला. पण न्यायदेवतेच्या अधिकारांचें संरक्षण करण्याची हिंमत त्यांस झाली नाही. वरील सारखे उद्गार काढणारा बिचारा न्यायाधीश ही हिंमत कोठून आणणार !

वीर पंजाबराव हे या आंदोलनांतील यावलीचे मुख्य पुढारी असल्याने त्यांच्यावर व त्यांचे बंधू विश्वासराव यांच्यावर नोकरशाहीचा विशेष दंश होता हें पूर्वी अनेक वेळां सांगितलेंच आहे. पंजाबराव १५ आगस्टलाच पकडल्या गेल्यामुळे त्यांस तुरुंगाची शिक्षा देण्यापलीकडे कांही करतां येण्या-सारखें नव्हतें. पण विश्वासरावावर प्रत्यक्ष खून करण्याच्या प्रयत्नांत असल्याचा आरोप ठेवून, त्याला फाशी किंवा काळेंपाणी या सारख्या शिक्षेस पात्र करणें शक्य आहे, असें नोकरशाहीला वाटलें. म्हणून बाबूशेठ मारवाड्याच्या कोठ्यापलीकडील शेतांत पाठलाग करीत येणाऱ्या लोकांत विश्वासराव होता व राजाराम औरंगपुरेप्रमाणेच त्याच्याहि हातीं तरवार होती, असें आनंद आकाजी पाटील व गोविंदराव कांबळे सब

इन्स्पेक्टर यांच्या मुखांतून साक्षीच्या वेळीं वदविण्यांत आलें. हेतु हा की, शिक्षा वाढविण्याचा जो काळा कायदा "Enhancement of Punishment ordinance" नुकताच जारी करण्यांत आला होता त्याचा आधार घेऊन विश्वासरावला जबरदस्त शिक्षा ठोठावण्यास मिळावें. पण सार्जंट क्वीनच्या व नायब तहसीलदार अनीक महमंद यांच्या साक्षीनेच ही गोष्ट खोटी ठरली. सार्जंट क्वीनने सांगितलें की, जे दोघेजण शस्त्र घेऊन मेल्ड्रमवर चालून आले त्या दोघांनाहि मीं गोळ्या मारल्या व ते दोघेहि गोळ्या घालून पडले. विश्वासराव यास गोळी लागलेली नसल्याने तो त्या दोघांत नव्हता, हें उघडच सिद्ध झालें. ना० त० अनीक अहंमदने आपण विश्वासरावला तेथे पाहिलें नाही असें स्पष्टच सांगितलें. त्यामुळे हा सर्व व्यूह बारगळला व विश्वासरावावरील आपत्ति टाळली. पण त्यामुळे नोकरशाहीच्या कृष्णकृत्यांचें आणि आनंद आकाजी पाटील व गोविंदराव स० इ० यांच्या बेईमानीचें स्वरूप कमी होऊं शकत नाही.

विश्वासरावावरील या आरोपांचा खोटेपणा स्पेशल जज्जालासुद्धा जाणविल्याशिवाय राहिला नाही. पण पुरावेदाराचा खोटेपणा प्रत्ययाला आल्यानंतरहि त्यांच्याकडे संशयित दृष्टीने पाहण्याऐवजी तो त्यांच्या कृत्यांवर पांघरूण घालण्यास प्रवृत्त झाला, हें विशेष होय. या पुराव्यांच्या खोटेपणावर आपल्या न्यायपत्रकांतील ७९ व्या परिच्छेदांत यांनी पुढीलप्रमाणे उद्गार काढले.—

"विश्वासरावने दंगलींत भाग घेतला होता. या मुद्याबाबत माझें असें स्पष्ट मत आहे की, गांधीचौकांतल्या व नंतरच्या अशा दोन्ही दंगलींत त्याने भाग घेतला होता. त्याने हातांत तरवार घेतली होती याविषयी जो पुरावा पुढे आला आहे तो मात्र तितकासा खात्री पटण्यालायक नाही. गोविंदराव स० इ० व सार्जंट क्वीन यांना, जमावाच्या आघाडीवर हातांत तरवार घेतलेलीं किती माणसें होतीं, हें निश्चित सांगतां आलें नाहीं. आनंदराव जें म्हणतो की, राजाराम औरंगपुरे व विश्वासराव या दोघांच्याहि हातांत तरवारी

होत्या आणि सैंदडच्या झाडाजवळ ते दोघेहि आघाडीवर होते, तें त्याचें म्हणणें अनिक अहंमदच्या पुराव्याशीं विसंगत आहे. म्हणून विश्वासराव याच्या हातांत तरवार होती याविषयींचा पुरावा माझ्या मतें खात्री पटविणारा नाही. " विश्वासराव याला जाळ्यांत पकडण्याचें कारस्थान अशा रीतीनें बारगळलें.

अस्तु. कोर्टांतील लढाईची एक अवस्था संपली. खालच्या कोर्टाचा निकाल वाचून यावलीचे शूर लढवय्ये व त्यांचे बहादूर वकील यांनी हिंमत सोडली नाही. या खटल्यांतील निर्णयाची फेरतपासणी (Review) करण्यांत यावी असा अर्ज हायकोर्टाकडे करण्याचें त्यांनी ठरविलें व त्याप्रमाणे त्यांनी अर्ज दाखलहि केला. दरम्यान राष्ट्रीय स्वरुपाच्या अशा कायदेविषयक ज्या घटना घडल्या त्यांचा व न्यायकोर्टांतील यावलीकरांच्या पुढील भांडणाचा परामर्श आगामी प्रकरणांत घेण्यांत येईल.

प्रकरण ४ थें

गव्हर्नर जनरलच्या अधिकाराला आव्हान.

स्पेशल जज मि० दंदे यांनीं चालविलेल्या व निकाल दिलेल्या या खटल्याच्या निर्णयाची फेरतपासणी व्हावी म्हणून आरोपींच्या वकीलांनी रिव्ह्यू कोर्टाकडे व पुढे हायकोर्टाकडे जे अर्ज केले त्यांत ग्रथित झालेले मुद्दे अतिशय महत्त्वाचे असल्याने ते प्रथम देण्यांत येत आहेत—

(१) हा सर्वच खटला बेकायदेशीरपणें चालविण्यांत आला. कारण गव्हर्नर जनरल यांनी जो स्पेशल क्रिमिनल कोर्टस् ऑर्डिन्स् नांवाचा कायदा जारी केला व ज्याच्या अन्वयें हा खटला चालविण्याचा अधिकार स्पेशल जज्जास देण्यांत आला, तो ऑर्डिनंस् काढण्याचा अधिकारच गव्हर्नर जनरल यांस नव्हता.

(२) [अ] बेकायदा रीतीने चालविलेले खटले कायदेशीर ठरविण्यासाठी १९४३ चा १९ नंबरचा जो ऑर्डिनंस् जारी करण्यांत आला तो देखील नियमबाह्य आहे आणि त्यामुळे खालच्या कोर्टांत चाललेला हा खटला नियमानुकूल चालू शकत नाही.

[ब] या १९ नंबरच्या ऑर्डिनंसमुळे बेकायदा रीतीने चाललेल्या खटल्याला कायदेशीर स्वरूप प्राप्त होऊं शकत नाही.

(३) यावलींतील जमाव बेकायदा होता असें प्रस्थापित झालेलें नाहीं.

(४) [अ] फिर्यादीचें मत ग्राह्य मानलें तरी, डि० मॅजिस्ट्रेट यांनीं ता० १८-८-४२ रोजीं यावलीस जी भेट दिली ती सामुदायिक दंड वसूल करण्याचा मार्ग सुकर करावा म्हणूनच दिली, परंतु कायद्याप्रमाणे डि० मॅजिस्ट्रेटला अशा प्रकारच्या दंड बसविण्याचा अथवा वसूल

करण्याचा कोणताच अधिकार नव्हता. कारण तशा अर्थाचें प्रांतिक सरकारचें नोटिफिकेशन निघालेलें नव्हतें. म्हणून डि० मॅजिस्ट्रेट व त्याच्या बरोबरची मंडळी यांच्यावर हल्ला करण्याचा गांवकरी लोकांचा समान उद्देश होता असें मानतां येणार नाही.

[ब] खटला चालविणाऱ्या कोर्टानें, या गोष्टींचा डि० मॅजिस्ट्रेटने यावलीस दिलेल्या भेटीशीं कांही संबंध नव्हता असें म्हणण्यांत चूक केली आहे.

(५) आत्मसंरक्षणाच्या कायदेशीर हक्काचा आधार आरोपींना मिळूं शकत नाही असें मानण्यांतहि खटला चालविणाऱ्या विद्वान न्यायाधीशांनी चूक केली आहे.

(६) शिवाय त्यांनी फिर्यादीचा पुरावा अविश्वसनीय व बचावाचा पुरावा विश्वसनीय मानावयास पाहिजे होता.

(७) तसेंच, त्यांनी या खटल्यांतील वस्तुस्थितीची व संभाव्य गोष्टींची जाणीव ठेवलेली नाही. फिर्यादीच्या पुराव्यांतील अंतर्गत असंभाव्यतेकडे सुद्धा त्यांनी लक्ष दिलें नाही.

(८) त्यांनी चुकीच्या दृष्टिकोनांतून या खटल्याकडे पाहिलें व त्यामुळे त्यांच्या हातून योग्य न्याय झाला नाही.

(९) आरोपींनी कोणताहि गुन्हा केला नाही असें समजून त्यांनी त्यांना दोषमुक्त करावयास हवें होतें.

(१०) खटल्याची एकंदर परिस्थिति ध्यानांत घेतां आरोपींना फार कडक शिक्षा देण्यांत आल्या आहेत, असें तरी खास मानावें लागेल.

स्पेशल जज्ज मि० दंडे यांनी दिलेल्या निर्णयाच्या फेरतपासणीसाठी दाखल करण्यांत आलेल्या व हायकोर्टापुढे केलेल्या आरोपींच्या अर्जांतील

जे मुद्दे वर दिले आहेत, त्यांतील पहिल्या व दुसऱ्या मुद्याचा देशांत घडलेल्या कांही कायदे विषयक घडामोडींशीं संबंध असल्यामुळे त्या संबंधींची थोडी माहिती आधी देणें अवश्य आहे.

मागे सांगण्यांत आलेंच आहे की, या काळांत खुद्द हायकोर्टा-च्याहि मूलभूत अधिकारांवर आक्रमण करणारे काळे कायदे जारी करण्यांत येऊन नौकरशाहीच्या हातीं अमर्याद सत्ता देण्यांत आली होती. अशा कायद्यांपैकीच स्पेशल क्रिमिनल कोर्टस आर्डिनन्स हा काळा कायदा होता. १९४२ चें प्रचंड आंदोलन दडपण्यासाठी सामान्य कोर्टें अपुरीं पडतील असें वाटूनच की काय, स्पेशल कोर्टांची योजना या काळ्या कायद्यान्वयें करण्यांत आली होती; आणि आरोपी हजर असोत अथवा नसोत, त्यांचे खटले चालवून त्यांना जबरदस्त शिक्षा देण्याचा अधिकार या नव्या स्पेशल कोर्टांना देण्यांत आला होता. विशेष मौज ही की, सामान्य कायद्याने स्थापन झालेल्या कोर्टांवरच हायकोर्टांचा अधिकार आहे असें म्हणून या स्पेशल कोर्टांवरील हायकोर्टांचा अधिकारहि उडविण्यांत आला होता आणि अनिर्बंध व अमर्याद सत्ता स्पेशल कोर्टांच्या हातीं देण्यांत आली होती. नागरिक स्वातंत्र्यावर या काळ्या कायद्याने भयंकर घाला घातला होता. स्पेशल जज्जांच्या अन्याय्य निर्णयाविरुद्ध जनतेला कोणत्याहि तऱ्हेचें संरक्षण मिळविण्याची सोय या कायद्याने ठेवली नव्हती. वस्तुतः खटले चालविणारे कोणतेंहि कोर्ट झालें तरी त्यावर हायकोर्टाची सत्ता चालते व खटला चालविणाऱ्या कोर्टाने अन्याय केला आहे असें आरोपीस वाटलें तर त्या विरुद्ध हायकोर्टाकडे दाद मागतां येते; पण प्रस्तुत काळ्या कायद्याने अशी परिस्थिति निर्माण केली की, स्पेशल जज्जांच्या अन्याय्य निर्णयाविरुद्ध कोठे दादच मागतां येऊं नये. अशा रीतीने हा काळा कायदा म्हणजे नागरिक स्वातंत्र्याला लावण्यांत आलेला गळफांस तर होताच, पण हिंदुस्थानांतील हायकोर्टांनाहि त्याने निर्माल्यवत ठरविलें होतें.

हायकोर्टांना अशा रीतीनें निर्माल्यवत् करून टाकणारा काळा कायदा जारी करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलास आहे काय? असा राष्ट्रीय

स्वरुपाचा कायद्याचा प्रश्न या परिस्थितीमुळे निर्माण झाला होता. गव्हर्नर जनरलास जर असा अधिकार असेल, तर सर्व वादच खुंटला. पण जर त्याला तसा अधिकार नसेल, तर त्याने जारी केलेला हा काळा कायदा नियमबाह्य आहे, अनधिकृत आहे असें ठरणार होतें आणि मूळ काळा कायदाच जर अनधिकृत ठरला, तर त्या कायद्यान्वयें स्थापन झालेलीं स्पेशल कोर्टें, त्यांनी चालविलेले खटले, घेतलेले निर्णय व दिलेल्या शिक्षा हीं सर्वच बेकायदा ठरणार होतीं; आणि यावलीप्रमाणेच जे शेकडों खटले देशभर चालविण्यांत आले होते व हजारों लोकांना जबरदस्त शिक्षा ठोठावण्यांत आल्या होत्या त्या सर्वच बेकायदा ठरून आरोपींना बंधमुक्त करणें अपरिहार्य होणार होतें. इतकेंच नव्हे, तर अशा बेकायदा रीतीने नागरिकांना शिक्षा सुनावणारे न्यायाधिकारी व खटले चालू असतांना त्यांचा अनन्वित छळ करणारे मुल्की अधिकारी हेच गुन्हेगार ठरून शिक्षेस पात्र झाले असते.

स्पेशल क्रिमिनल कोर्ट्स् ऑर्डिनन्स अनधिकृत ठरतांच या इतक्या सर्व गोष्टी घडणें संभाव्य होणार असल्यामुळे देशांतील कायदेपंडितांनी, गव्हर्नर जनरलास हा कायदा जारी करण्याचा अधिकारच आहे की नाही, हाच मुद्दा प्रथम घसास लावण्याचें ठरविलें.

योगायोग असा की, ही परिस्थिति निर्माण होण्याच्या थोडेच अगोदर ब्रि० सरकारने हायकोर्टापेक्षाहि वरिष्ठ असें फेडरल कोर्ट हिंदुस्थानांत स्थापन केलें होतें आणि हायकोर्टाच्या निर्णयाविरुद्ध दाद मागण्याचें एक नवें साधन हिंदी जनतेला उपलब्ध झालें होतें. परंतु जनतेऐवजी सरकारनेच या फेडरल कोर्टाचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. गोष्ट अशी घडली की, कलकत्ता हायकोर्टाने सर्वांत प्रथम पुढाकार घेऊन स्पेशल क्रिमिनल कोर्ट्स् ऑर्डिनन्स जारी करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलास नाही, असा एका खटल्यांत निकाल दिला. या निकालाविरुद्ध प्रांतिक सरकारने फेडरल कोर्टाकडे अपील केलें, आणि तेथे गव्हर्नर जनरलास असलेल्या कायदेशीर अधिकारांचा खासा कीस निघून असा निर्णय लागला की,

वरील कायदा जारी करण्याचा अधिकारच मुळीं गव्हर्नर जनरलास नव्हता व हा कायदा जारी करण्यांत त्याने आपल्या अधिकारांचा मर्यादाभंग केला आहे. सर्व देशाचें लक्ष या निर्णयाकडे लागलें होतें. फेडरल कोर्टाने हा राष्ट्रीय महत्त्वाचा निर्णय दिल्याबरोबर नौकरशाहीच्या गोटांत भयंकर खळबळ उडाली.

फेडरल कोर्टाचा हा अत्यंत महत्त्वाचा व मूलभूत निर्णय मिळाल्यामुळे यापुढे स्पेशल कोर्टांची झोटींगशाही तर बंद झालीच; पण हा निर्णय मिळण्यापूर्वी जीं स्पेशल कोर्टें स्थापन झालीं होतीं आणि त्यांनी जे खटले चालविले होते व ज्या शिक्षा दिल्या होत्या त्या सर्व बेकायदा ठरत असल्यामुळे या हजारो बंदिस्तांना बंधमुक्त करावयाचें की काय ? उलट शिक्षा देणाऱ्या लोकांनी बेकायदा खटले चालविले म्हणून त्यांच्यावरच खटले भरावयाचे कीं काय ? असा पेंच सरकारसमोर निर्माण झाला. फेडरल कोर्टाने घातलेल्या या कोलदांड्यापासून नौकरशाहीचें संरक्षण करण्यासाठी पुनः गव्हर्नर जनरल धावून आला. त्याने फेडरल कोर्टाचा निर्णय झाला, त्याच्या दुसऱ्याच दिवशीं आणखी एक काळा कायदा जारी केला. स्पेशल कोर्टांत चाललेले खटले आणि झालेल्या शिक्षा कायदेशीर कोर्टाने दिलेल्या शिक्षेइतक्याच प्रमाणभूत मानण्यांत येतील असें या नव्या काळ्या कायद्याने घोषित केलें.

परंतु हायकोर्टांचे स्पेशल कोर्टाविरुद्ध दाद घेण्याचे अधिकार कायम ठेवणें या नव्या काळ्या कायद्यालाहि भाग पडलें. हा दुसरा कायदा जारी करून पूर्वी चाललेल्या खटल्यांना व झालेल्या शिक्षांना जरी कायदेशीर स्वरुप देण्याचा प्रयत्न करण्यांत आला, तरी न्यायसत्तेचा नौकरशाहीवरील एक दणदणीत विजय त्यांतहि मान्य करावाच लागला आणि हायकोर्टांचे दरवाजे स्पेशल कोर्टांविरुद्ध लोकांना खुले ठेवावे लागले. यावली खटल्यांतील आरोपींनी स्पेशल कोर्टाच्या निर्णयाविरुद्ध जो अर्ज केला होता, त्यांतील पहिल्या दोन मुद्यांत वरील राष्ट्रीय परिस्थिति प्रतिबिंबित झाली होती हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

परंतु १९४३ चा १९ नंबरचा ऑर्डिनन्स या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या या काळ्या कायद्यामुळेहि नोकरशाहीचा कोलदांडा पूर्णपणे सुटला नव्हता. स्पेशल कोर्टांनी चालविलेले खटले व दिलेल्या शिक्षा या जरी कायदेशीर ठरल्या, तरी स्पेशल कोर्टांच्याविरुद्ध हायकोर्टाकडे दाद मागितल्यानंतर, सरकारी अधिकाऱ्यांनी दंडेली केली, अन्याय्य अथवा बेकायदा वर्तन केलें, असें जर हायकोर्टांत दिसून आलें, तर सदरहू अधिकाऱ्यांवर उलट खटले भरण्यांत आले असते आणि त्यांना शिक्षा झाल्या असत्या. या आपत्तीपासून आपल्या नोकरवर्गाचें संरक्षण करण्यासाठी गव्हर्नर जनरलास आपल्या खास अधिकारांचा उपयोग करून आणखी एक काळा कायदा जारी करावा लागला. या कायद्याचें नांव Act of Indemnity असें ठेवण्यांत आलें आणि त्याच्या अन्वयें सरकारी अधिकाऱ्यांना सर्व प्रकारचें संरक्षण देण्यांत आलें. पूर्वीच्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांच्या हातून कसलींहि अनन्वित कृत्यें घडलीं असलीं व त्यांनी कसलेहि भयंकर प्रमाद केले असले, तरी त्यांना दोषी समजण्यांत येऊं नये; व त्यांच्याविरुद्ध कसलीहि कारवाई न्यायालयांतून चालू नये अशी व्यवस्था या सरकारी नोकरांच्या संरक्षणासाठी अवतरलेल्या काळ्या कायद्यानें करून ठेवली.

पण काळा कायदा तो काळाच कायदा ! गव्हर्नर जनरलाने आपल्या खास अधिकाराची कितीहि सफेती त्यास पुसली व राज्यकारभाराच्या सुरक्षितीच्या बहाण्याने त्याला कितीहि धुतलें, तरी त्याचें काळेपण थोडेंच नष्ट होणार !! काळ्या कायद्यांच्या रूपाने हिंदुस्थानांतील ब्रि० शासनाला जो कायमचा कलंक लागला तो लागलाच. या कलंकाचें प्रतिबिंब यावलीच्या आरोपींनी केलेल्या अर्जांत उमटलेलें असल्यामुळे त्याला अनुलक्षून वरील ऊहापोह करावा लागला. शिवाय हायकोर्टाच्या पुढील निर्णयांतहि त्याची छाया उमटली असल्याने त्याचा येथे निर्देश करणें अवश्य झालें. अपीलाचा निर्णय देतांना न्या० मू० पुराणिक यांनी काढलेल्या पुढील उदगारांत ही छाया वाचकांना आढळून आल्याशिवाय राहणार नाही. न्या० मू० पुराणिक म्हणतात,—" (सरकारी अधिकाऱ्यांनी) दोन वेळां

केलेला गोळीबार कायदेशीर होता की नाही, तसेंच डि० मॅजिस्ट्रेट व त्याची पार्टी यांचें संपूर्ण वर्तन कायदेशीर होतें की नाही, या प्रश्नावर माझें मत देण्याची ही वेळ नाही."

सरकारी अधिकाऱ्यांचें वर्तन इतकें गर्हणीय होतें आणि त्यांनी केलेला गोळीबार हा इतका बेकायदेशीर होता की, वर निर्दिष्ट केलेला सरकारी कर्मचाऱ्यांच्या संरक्षणाचा काळा कायदा जर जारी झाला नसता, तर त्यांच्या वर्तनाची चौकशी करणें आणि गोळीबाराच्या कायदेशीरपणाची शहानिशा करणें प्रांतिक सरकारला भाग पडलें असतें. अस्तु.

रिव्हयूचा अर्ज नागपूर येथे रिव्हयू जज्ज मि० पोलक यांच्यापुढे स्पेशल क्रिमिनल कोर्टस ऑर्डिनन्सच्याच ८ व्या कलमाप्रमाणे सुनावणीस निघाला. न्यायखात्यांतील या गौर काय अधिकाऱ्याचें माथें १९४२ च्या आंदोलनाच्या आगीचा शेक लागल्यामुळे इतकें गरम झालें होतें की, आरोपींच्या वकीलांचें म्हणणें सुद्धा धडपणें ऐकून घेण्याचें सौजन्य तो दाखवीत नव्हता. त्या वेळच्या परिस्थितीचा रंग इतका जोरदार होता की, जज्ज पोलक यांचा सर्व गरमपणा वकीलांनी, आपल्या पक्षकारांच्या हिताकडे नजर ठेवून सहन केला. स्पेशल कोर्टाने दिलेल्या शिक्षा कायम ठेवावयाच्या असाच जणूं काय जज्ज पोलक यांचा प्रारंभापासून निर्धार होता. किंबहुना, आपल्या वृत्तीने ते असें दाखवीत होते की, ब्रि० सरकारच्याविरुद्ध उघड बंड पुकारणाऱ्या या लोकांना खाऊं की गिळूं असेंच जणूं काय त्यांना झालें आहे!! त्यामुळे रिव्हयूच्या निकालांत त्यांच्याकडून कितपत् न्याय मिळेल याची लोकांना आधीच कल्पना येऊन चुकली होती; आणि हें सर्व जाणीत असूनहि न्यायाच्या दरबारांतलें हें भांडण चालू ठेवणें भाग होतें. आरोपींच्या तर्फे बचावाचें काम ॲडव्होकेट पी० वाय० देशपांडे, ना० त्र्यं० पांडे व राजाभाऊ गोखले यांनी चालविलें. ता० १ ते ४ फेब्रुवारी १९४३ पर्यंत चार दिवस फिर्यादी व आरोपी यांच्या वकीलांचीं भाषणें झालीं; आणि ९-२-४३ रोजीं रिव्हयू जज्जाने आपला निर्णय जाहीर केला.

देशभर झालेल्या उघड बंडाच्या पुकाऱ्यामुळे आणि सर्व हिंदुस्थानभर ब्रि० सत्तेला बसलेल्या प्रचंड हादऱ्यामुळे रिव्हयू जज्ज पोलक यांचें मस्तक किती भणाणलें होतें आणि कागदोपत्रीं नमूद असलेल्या पुराव्यांतील महत्त्वाचा पुरावा कोणता व गैर महत्त्वाचा कोणता इ० गोष्टी ध्यानांत ठेवण्याचीहि शुद्ध त्यांस कशी उरली नव्हती याचीं मनोरंजक प्रमाणें त्यांच्या यावली प्रकरणाच्या निर्णयांत उपलब्ध होऊं शकतात. आपल्या निर्णयाचा पहिला परिच्छेद लिहीत असतांनासुद्धा त्यांचा मेंदू कसा विकृत झाला होता पहा. ता० १६ आगस्टच्या घटनेबद्दल ते लिहितात—" डि० मॅजिस्ट्रेटच्या हुकमावरून माहोली सर्कलचा रेव्हिन्यू इन्स्पेक्टर गजानन ता० १६ आगस्टला एक हेडकान्स्टेबल व पांच कान्स्टेबल्स बरोबर घेऊन, आदल्या दिवशीं जे मोडतोडीचे प्रकार झाले होते त्याबद्दल बसविण्यांत आलेला २००० रु० सामुदायिक दंड वसूल करण्यासाठी यावलीस गेला. ही मंडळी जशी यावलीच्या जवळ गेली तसे त्यांना घंटानाद ऐकूं आले व तेथील रहिवाशांची उपद्रवकारी मनोवृत्ति (Menacing Attitude) पाहून या मंडळीला दंडाचा अंश देखील वसूल न करतांच परत यावें लागलें." आता ही गोष्ट कागदोपत्रीं व सरकारी पुराव्यांतहि स्पष्ट आहे की, घंटा, शंख, वाद्यें इ० जीं वाजविण्यांत आलीं तीं १८ तारखेला, १६ तारखेला नव्हे: १६ तारखेला घंटा वाजविण्यांत आल्या असें खुद्द रे० ड० गजानन सुद्धा म्हणत नाही; आणि १६ तारखेला यावलीच्या रहिवाशांनी उपद्रवकारी मनोवृत्तीचेंहि प्रदर्शन केलें नाही; पण घंटानादाची ता० १८ ची घटना १६ ता० स पोलक साहेबांनी सहज चिकटून दिली. कारण तारखांचा विवेक करण्याइतकीहि त्यांची बुद्धि ठिकाणावर नव्हती.

१८ आगस्टच्या लढाईत गांधी चौकांतील पहिली मारकाट होऊन डि० मॅ० व त्याची टोळी तेथून परत फिरल्यानंतर पुन्हा ही मंडळी दुसऱ्यांदा गांधीचौकांत गेली असें म्हणून पोलक साहेब आपल्या निर्णयाच्या तिसऱ्या परिच्छेदांत म्हणतात—" डि० मॅ० व त्यांची पार्टी कोणाला जखमा झाल्या आहेत की काय हें पाहण्यासाठी पुन्हा गांधी चौकांत गेली, पण कोणालाच जखमा झाल्या नाहीत असें त्यांना आढळून

जे मुद्दे वर दिले आहेत, त्यांतील पहिल्या व दुसऱ्या मुद्याचा देशांत घडलेल्या कांही कायदे विषयक घडामोडींशीं संबंध असल्यामुळे त्या संबंधींची थोडी माहिती आधी देणें अवश्य आहे.

मागे सांगण्यांत आलेंच आहे की, या काळांत खुद्द हायकोर्टा-च्याहि मूलभूत अधिकारांवर आक्रमण करणारे काळे कायदे जारी करण्यांत येऊन नौकरशाहीच्या हातीं अमर्याद सत्ता देण्यांत आली होती. अशा कायद्यांपैकीच स्पेशल क्रिमिनल कोर्टस आर्डिनन्स हा काळा कायदा होता. १९४२ चें प्रचंड आंदोलन दडपण्यासाठी सामान्य कोर्टें अपुरीं पडतील असें वाटूनच की काय, स्पेशल कोर्टांची योजना या काळ्या कायद्यान्वयें करण्यांत आली होती; आणि आरोपी हजर असोत अथवा नसोत, त्यांचे खटले चालवून त्यांना जबरदस्त शिक्षा देण्याचा अधिकार या नव्या स्पेशल कोर्टांना देण्यांत आला होता. विशेष मौज ही की, सामान्य कायद्याने स्थापन झालेल्या कोर्टांवरच हायकोर्टांचा अधिकार आहे असें म्हणून या स्पेशल कोर्टांवरील हायकोर्टाचा अधिकारहि उडविण्यांत आला होता आणि अनिर्बंध व अमर्याद सत्ता स्पेशल कोर्टांच्या हातीं देण्यांत आली होती. नागरिक स्वातंत्र्यावर या काळ्या कायद्याने भयंकर घाला घातला होता. स्पेशल जज्जांच्या अन्याय्य निर्णयाविरुद्ध जनतेला कोणत्याहि तऱ्हेचें संरक्षण मिळविण्याची सोय या कायद्याने ठेवली नव्हती. वस्तुतः खटले चालविणारे कोणतेंहि कोर्ट झालें तरी त्यावर हायकोर्टाची सत्ता चालते व खटला चालविणाऱ्या कोर्टाने अन्याय केला आहे असें आरोपीस वाटलें तर त्या विरुद्ध हायकोर्टाकडे दाद मागतां येते; पण प्रस्तुत काळ्या कायद्याने अशी परिस्थिति निर्माण केली की, स्पेशल जज्जांच्या अन्याय्य निर्णयाविरुद्ध कोठे दादच मागतां येऊं नये. अशा रीतीने हा काळा कायदा म्हणजे नागरिक स्वातंत्र्याला लावण्यांत आलेला गळफांस तर होताच, पण हिंदुस्थानांतील हायकोर्टांनाहि त्याने निर्माल्यवत ठरविलें होतें.

हायकोर्टांना अशा रीतीनें निर्माल्यवत् करून टाकणारा काळा कायदा जारी करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलास आहे काय? असा राष्ट्रीय

स्वरुपाचा कायद्याचा प्रश्न या परिस्थितीमुळे निर्माण झाला होता. गव्हर्नर जनरलास जर असा अधिकार असेल, तर सर्व वादच खुंटला. पण जर त्याला तसा अधिकार नसेल, तर त्याने जारी केलेला हा काळा कायदा नियमबाह्य आहे, अनधिकृत आहे असें ठरणार होतें आणि मूळ काळा कायदाच जर अनधिकृत ठरला, तर त्या कायद्यान्वयें स्थापन झालेलीं स्पेशल कोर्टें, त्यांनी चालविलेले खटले, घेतलेले निर्णय व दिलेल्या शिक्षा हीं सर्वच बेकायदा ठरणार होतीं; आणि यावलीप्रमाणेच जे शेकडों खटले देशभर चालविण्यांत आले होते व हजारों लोकांना जबरदस्त शिक्षा ठोठावण्यांत आल्या होत्या त्या सर्वच बेकायदा ठरून आरोपींना बंधमुक्त करणें अपरिहार्य होणार होतें. इतकेंच नव्हे, तर अशा बेकायदा रीतीने नागरिकांना शिक्षा सुनावणारे न्यायाधिकारी व खटले चालू असतांना त्यांचा अनन्वित छळ करणारे मुल्की अधिकारी हेच गुन्हेगार ठरून शिक्षेस पात्र झाले असते.

स्पेशल क्रिमिनल कोर्ट्स् ऑर्डिनन्स अनधिकृत ठरतांच या इतक्या सर्व गोष्टी घडणें संभाव्य होणार असल्यामुळे देशांतील कायदेपंडितांनी, गव्हर्नर जनरलास हा कायदा जारी करण्याचा अधिकारच आहे की नाही, हाच मुद्दा प्रथम घसास लावण्याचें ठरविलें.

योगायोग असा की, ही परिस्थिति निर्माण होण्याच्या थोडेच अगोदर ब्रि० सरकारने हायकोर्टापेक्षाहि वरिष्ठ असें फेडरल कोर्ट हिंदुस्थानांत स्थापन केलें होतें आणि हायकोर्टाच्या निर्णयाविरुद्ध दाद मागण्याचें एक नवें साधन हिंदी जनतेला उपलब्ध झालें होतें. परंतु जनतेऐवजी सरकारनेच या फेडरल कोर्टाचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. गोष्ट अशी घडली की, कलकत्ता हायकोर्टाने सर्वांत प्रथम पुढाकार घेऊन स्पेशल क्रिमिनल कोर्ट्स् ऑर्डिनन्स जारी करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलास नाही, असा एका खटल्यांत निकाल दिला. या निकालाविरुद्ध प्रांतिक सरकारने फेडरल कोर्टाकडे अपील केलें, आणि तेथे गव्हर्नर जनरलास असलेल्या कायदेशीर अधिकारांचा खासा कीस निघून असा निर्णय लागला की,

वरील कायदा जारी करण्याचा अधिकारच मुळीं गव्हर्नर जनरलास नव्हता व हा कायदा जारी करण्यांत त्याने आपल्या अधिकारांचा मर्यादाभंग केला आहे. सर्व देशाचें लक्ष या निर्णयाकडे लागलें होतें. फेडरल कोर्टाने हा राष्ट्रीय महत्त्वाचा निर्णय दिल्याबरोबर नोकरशाहीच्या गोटांत भयंकर खळबळ उडाली.

फेडरल कोर्टाचा हा अत्यंत महत्त्वाचा व मूलभूत निर्णय मिळाल्यामुळे यापुढे स्पेशल कोर्टांची झोटींगशाही तर बंद झालीच; पण हा निर्णय मिळण्यापूर्वी जीं स्पेशल कोर्टें स्थापन झालीं होतीं आणि त्यांनी जे खटले चालविले होते व ज्या शिक्षा दिल्या होत्या त्या सर्व बेकायदा ठरत असल्यामुळे या हजारो बंदिस्तांना बंधमुक्त करावयाचें की काय? उलट शिक्षा देणाऱ्या लोकांनी बेकायदा खटले चालविले म्हणून त्यांच्यावरच खटले भरावयाचे कीं काय? असा पेंच सरकारसमोर निर्माण झाला. फेडरल कोर्टाने घातलेल्या या कोलदांड्यापासून नौकरशाहीचें संरक्षण करण्यासाठी पुन: गव्हर्नर जनरल धावून आला. त्याने फेडरल कोर्टाचा निर्णय झाला, त्याच्या दुसऱ्याच दिवशीं आणखी एक काळा कायदा जारी केला. स्पेशल कोर्टांत चाललेले खटले आणि झालेल्या शिक्षा कायदेशीर कोर्टाने दिलेल्या शिक्षेइतक्याच प्रमाणभूत मानण्यांत येतील असें या नव्या काळ्या कायद्याने घोषित केलें.

परंतु हायकोर्टाचे स्पेशल कोर्टाविरुद्ध दाद घेण्याचे अधिकार कायम ठेवणें या नव्या काळ्या कायद्यालाहि भाग पडलें. हा दुसरा कायदा जारी करून पूर्वी चाललेल्या खटल्यांना व झालेल्या शिक्षांना जरी कायदेशीर स्वरुप देण्याचा प्रयत्न करण्यांत आला, तरी न्यायसत्तेचा नौकरशाहीवरील एक दणदणीत विजय त्यांतहि मान्य करावाच लागला आणि हायकोर्टाचे दरवाजे स्पेशल कोर्टांविरुद्ध लोकांना खुले ठेवावे लागले. यावली खटल्यांतील आरोपींनी स्पेशल कोर्टाच्या निर्णयाविरुद्ध जो अर्ज केला होता, त्यांतील पहिल्या दोन मुद्यांत वरील राष्ट्रीय परिस्थिति प्रतिबिंबित झाली होती हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

परंतु १९४३ चा १९ नंबरचा ऑर्डिनन्स या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या या काळ्या कायद्यामुळेहि नोकरशाहीचा कोलदांडा पूर्णपणे सुटला नव्हता. स्पेशल कोर्टांनी चालविलेले खटले व दिलेल्या शिक्षा या जरी कायदेशीर ठरल्या, तरी स्पेशल कोर्टांच्याविरुद्ध हायकोर्टाकडे दाद मागितल्यानंतर, सरकारी अधिकाऱ्यांनी दंडेली केली, अन्याय्य अथवा बेकायदा वर्तन केलें, असें जर हायकोर्टांत दिसून आलें, तर सदरहू अधिकाऱ्यांवर उलट खटले भरण्यांत आले असते आणि त्यांना शिक्षा झाल्या असत्या. या आपत्तीपासून आपल्या नोकरवर्गाचें संरक्षण करण्यासाठी गव्हर्नर जनरलास आपल्या खास अधिकारांचा उपयोग करून आणखी एक काळा कायदा जारी करावा लागला. या कायद्याचें नांव Act of Indemnity असें ठेवण्यांत आलें आणि त्याच्या अन्वयें सरकारी अधिकाऱ्यांना सर्व प्रकारचें संरक्षण देण्यांत आलें. पूर्वीच्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांच्या हातून कसलींहि अनन्वित कृत्यें घडलीं असलीं व त्यांनी कसलेहि भयंकर प्रमाद केले असले, तरी त्यांना दोषी समजण्यांत येऊं नये; व त्यांच्याविरुद्ध कसलीहि कारवाई न्यायालयांतून चालू नये अशी व्यवस्था या सरकारी नोकरांच्या संरक्षणासाठी अवतरलेल्या काळ्या कायद्यानें करून ठेवली.

पण काळा कायदा तो काळाच कायदा! गव्हर्नर जनरलानें आपल्या खास अधिकाराची कितीहि सफेती त्यास पुसली व राज्यकारभाराच्या सुरक्षितीच्या बहाण्यानें त्याला कितीहि धुतलें, तरी त्याचें काळेपण थोडेंच नष्ट होणार!! काळ्या कायद्यांच्या रूपानें हिंदुस्थानांतील ब्रि० शासनाला जो कायमचा कलंक लागला तो लागलाच. या कलंकाचें प्रतिबिंब यावलीच्या आरोपींनी केलेल्या अर्जांत उमटलेलें असल्यामुळे त्याला अनुलक्षून वरील ऊहापोह करावा लागला. शिवाय हायकोर्टाच्या पुढील निर्णयांतहि त्याची छाया उमटली असल्यानें त्याचा येथे निर्देश करणें अवश्य झालें. अपीलाचा निर्णय देतांना न्या० मू० पुराणिक यांनी काढलेल्या पुढील उद्गारांत ही छाया वाचकांना आढळून आल्याशिवाय राहणार नाही. न्या० मू० पुराणिक म्हणतात,—" (सरकारी अधिकाऱ्यांनी) दोन वेळां

केलेला गोळीबार कायदेशीर होता की नाही, तसेंच डि० मॅजिस्ट्रेट व त्याची पार्टी यांचें संपूर्ण वर्तन कायदेशीर होतें की नाही, या प्रश्नावर माझें मत देण्याची ही वेळ नाही. "

सरकारी अधिकाऱ्यांचें वर्तन इतकें गर्हणीय होतें आणि त्यांनी केलेला गोळीबार हा इतका बेकायदेशीर होता की, वर निर्दिष्ट केलेला सरकारी कर्मचाऱ्यांच्या संरक्षणाचा काळा कायदा जर जारी झाला नसता, तर त्यांच्या वर्तनाची चौकशी करणें आणि गोळीबाराच्या कायदेशीरपणाची शहानिशा करणें प्रांतिक सरकारला भाग पडलें असतें. अस्तु.

रिव्हयूचा अर्ज नागपूर येथे रिव्हयू जज्ज मि० पोलक यांच्यापुढे स्पेशल क्रिमिनल कोर्टस ऑर्डिनन्सच्याच ८ व्या कलमाप्रमाणे सुनावणीस निघाला. न्यायखात्यांतील या गौर काय अधिकाऱ्याचें माथें १९४२ च्या आंदोलनाच्या आगीचा शेक लागल्यामुळे इतकें गरम झालें होतें की, आरोपींच्या वकीलांचें म्हणणें सुद्धा धडपणें ऐकून घेण्याचें सौजन्य तो दाखवीत नव्हता. त्या वेळच्या परिस्थितीचा रंग इतका जोरदार होता की, जज्ज पोलक यांचा सर्व गरमपणा वकीलांनी, आपल्या पक्षकारांच्या हिताकडे नजर ठेवून सहन केला. स्पेशल कोर्टाने दिलेल्या शिक्षा कायम ठेवावयाच्या असाच जणूं काय जज्ज पोलक यांचा प्रारंभापासून निर्धार होता. किंबहुना, आपल्या वृत्तीने ते असें दाखवीत होते की, ब्रि० सरकारच्याविरुद्ध उघड बंड पुकारणाऱ्या या लोकांना खाऊं की गिळूं असेंच जणूं काय त्यांना झालें आहे !! त्यामुळे रिव्हयूच्या निकालांत त्यांच्याकडून कितपत् न्याय मिळेल याची लोकांना आधींच कल्पना येऊन चुकली होती; आणि हें सर्व जाणीत असूनहि न्यायाच्या दरबारांतलें हें भांडण चालूं ठेवणें भाग होतें. आरोपींच्या तर्फे बचावाचें काम ॲडव्होकेट पी० वाय० देशपांडे, ना० त्र्यं० पांडे व राजाभाऊ गोखले यांनी चालविलें. ता० १ ते ४ फेब्रुवारी १९४३ पर्यंत चार दिवस फिर्यादी व आरोपी यांच्या वकीलांचीं भाषणें झालीं; आणि ९-२-४३ रोजीं रिव्हयू जज्जाने आपला निर्णय जाहीर केला.

देशभर झालेल्या उघड बंडाच्या पुकाऱ्यामुळे आणि सर्व हिंदुस्थानभर ब्रि० सत्तेला बसलेल्या प्रचंड हादऱ्यामुळे रिव्हयू जज्ज पोलक यांचें मस्तक किती भणाणलें होतें आणि कागदोपत्रीं नमूद असलेल्या पुराव्यांतील महत्त्वाचा पुरावा कोणता व गैर महत्त्वाचा कोणता इ० गोष्टी ध्यानांत ठेवण्याचीहि शुद्ध त्यांस कशी उरली नव्हती याचीं मनोरंजक प्रमाणें त्यांच्या यावली प्रकरणाच्या निर्णयांत उपलब्ध होऊं शकतात. आपल्या निर्णयाचा पहिला परिच्छेद लिहीत असतांनासुद्धा त्यांचा मेंदू कसा विकृत झाला होता पहा. ता० १६ आगस्टच्या घटनेबद्दल ते लिहितात—" डि० मॅजिस्ट्रेटच्या हुकमावरून माहोली सर्कलचा रेव्हिन्यू इन्स्पेक्टर गजानन ता० १६ आगस्टला एक हेडकान्स्टेबल व पांच कान्स्टेबल्स बरोबर घेऊन, आदल्या दिवशीं जे मोडतोडीचे प्रकार झाले होते त्याबद्दल बसविण्यांत आलेला २००० रु० सामुदायिक दंड वसूल करण्यासाठी यावलीस गेला. ही मंडळी जशी यावलीच्या जवळ गेली तसे त्यांना घंटानाद ऐकूं आले व तेथील रहिवाशांची उपद्रवकारी मनोवृत्ति (Menacing Attitude) पाहून या मंडळीला दंडाचा अंश देखील वसूल न करतांच परत यावें लागलें." आता ही गोष्ट कागदोपत्रीं व सरकारी पुराव्यांतहि स्पष्ट आहे की, घंटा, शंख, वाद्यें इ० जीं वाजविण्यांत आलीं तीं १८ तारखेला, १६ तारखेला नव्हे: १६ तारखेला घंटा वाजविण्यांत आल्या असें खुद्द रे० इ० गजानन सुद्धा म्हणत नाही; आणि १६ तारखेला यावलीच्या रहिवाशांनी उपद्रवकारी मनोवृत्तीचेंहि प्रदर्शन केलें नाही; पण घंटानादाची ता० १८ ची घटना १६ ता० स पोलक साहेबांनी सहज चिकटून दिली. कारण तारखांचा विवेक करण्याइतकीहि त्यांची बुद्धि ठिकाणावर नव्हती.

१८ आगस्टच्या लढाईंत गांधी चौकांतील पहिली मारकाट होऊन डि० मॅ० व त्याची टोळी तेथून परत फिरल्यानंतर पुन्हा ही मंडळी दुसऱ्यांदा गांधीचौकांत गेली असें म्हणून पोलक साहेब आपल्या निर्णयाच्या तिसऱ्या परिच्छेदांत म्हणतात—" डि० मॅ० व त्यांची पार्टी कोणाला जखमा झाल्या आहेत की काय हें पाहण्यासाठी पुन्हा गांधी चौकांत गेली, पण कोणालाच जखमा झाल्या नाहीत असें त्यांना आढळून

आलें." डि० मॅ० व त्याची सबंध टोळी दुसऱ्यांदा जी गांधी चौकांत गेली, ती मोठ्या दयार्द्रबुद्धीनेच !! कोणाला जखमा लागल्या काय हें पाहाण्याचा त्यांचा हेतु होता !!! हा डि० मॅ० च्या जबानीवर जज्ज पोलक यांनी दाखविलेला विश्वास त्यांच्या उपरिनिर्दिष्ट मस्तिष्क-विकृतीचा दुसरा नमुना होय.

आता तिसरा नमुना पहा. याच परिच्छेद ३ मध्ये हे विद्वान व इतिहास-संशोधक न्यायाधीश म्हणतात—"नरसिंगपूरचा दुसरा जमाव चालून येऊं लागला. या जमावाचें उग्र (threatening) स्वरूप पाहून डि० मॅ०व त्याची मंडळी रामकिसनच्या कोठ्यांत शिरली व तेथून त्यांनी गोळीबार केला; परंतु आपण वेढलें जाऊं या भयाने ते दक्षिणे-कडील शेतांत घुसले व ३।४ शे लोकांचा हा जमाव त्यांचा पाठलाग करूं लागला. पुन्हा गोळीबार करण्यांत आला. जमाव क्षणभर थांबला, पण पुन्हा पाठलाग करूं लागला. यावेळीं डि० मॅ० व त्याची मंडळी यांची मोठी बिकट अवस्था होती. त्यांच्याजवळचा दारूगोळा संपत आला होता. अशा वेळीं सार्जंट क्वीन याने एक मस्केट घेऊन गोळी मारली व आघाडीवर असलेल्या जमावाच्या तरवारधारी पुढाऱ्याला जमिनीवर लोळविलें. आणखी एक गोळी मारली व दुसरा पुढारी लोळविला गेला." हा सर्व पाठलाग नरगिंपुरहून आलेल्या जमावाने केला होता; व त्याचेच तरवारधारी पुढारी क्विनने गोळ्या घालून मारले. या अभिनव शोधामुळे पोलक साहेब यांची अभिनव इतिहास--संशोधकांत गणना करावी लागेल !

प्रत्यक्ष कागदोपत्रीं नमुद असलेल्या घटनांची आपल्या निर्णयांत इतकी विकृति करणाऱ्या या न्यायाधिशाचें डोकें ठिकाणावर होतें असें म्हणतां येईल काय ? अस्तु.

जज्ज पोलक यांनी आपल्या निर्णयांत स्पेशल जज्ज मि० दंडे यांचा निर्णय बहुतेक मान्य केला. त्यांनी फरक केला तो इतकाच की, सदाशिव बानाईत व विक्रम माळी यांना त्यांनी दोषमुक्त करून सोडून दिलें

आणि गोविंद सोनार व इसना मराठा हीं अल्पवयी म्हणजे चौदा वर्षांचीं मुलें आहेत व त्यांनी दंगलींत घेतलेला भाग गैर महत्वाचा आहे असें म्हणून व खटला सुरू झाल्यापासूनचा त्यांचा काळ तुरुंगांत गेला हें ध्यानांत ठेवून त्यांची शिक्षा कमी करून त्यांना तीन महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा फर्माविली. आपल्या निर्णयाच्या शेवटीं पोलक साहेब म्हणतात—" इतर आरोपींना फार मोठ्या शिक्षा देण्यांत आल्या आहेत असें मला वाटत नाही. किंबहुना, त्यांपैकी कांहीं लोकांनी तरी स्वतःला भाग्यवानच समजायला पाहिजे. (कारण ४ वर्षें व ७ वर्षें सक्त मजुरी इतक्या हलक्या शिक्षा त्यांना स्पेशल जजाने दिल्या.) म्हणून वर निर्देशिलेल्या सोडून बाकीच्या शिक्षा मी कायम ठेवतों."

रिव्हयू जज मि० पोलक यांच्यासमोर जेव्हा या खटल्याच्या निर्णयाची फेरतपासणी चालू होती, तेव्हा आरोपींचे वकील ॲड० ना० त्र्यं० पांडे व जज पोलक यांची आत्मसंरक्षणाच्या मुद्यावर जी चकमक उडाली ती विशेष संस्मरणीय असल्याने तिच्यांतील प्रश्नोत्तरें देऊन हें प्रकरण संपवूं.

रिव्हूयू जज पोलक व आरोपींचे ॲड० पांडे यांचा उपरिनिर्दिष्ट संवाद पुढील प्रमाणे आहे.

जज पोलक—गांधी चौकांत जमा होण्यांत लोकांचा उद्देश काय होता ?

ॲड० पांडे–सामुदायिक दंड वसुलीस प्रतिकार करणें हा उघड उद्देश होता.

प्रश्न—खेड्यांतील लोकांना सामुदायिक दंडाच्या ऑर्डिनन्समधील सर्व परिणामांचें ज्ञान होतें, यावर मी विश्वास ठेवावा असें तुम्हांला म्हणावयाचें आहे काय ?

उत्तर--न्यायाधीश महाराज, कायद्याचें अज्ञान ही कांही सबब नव्हे. या सिद्धांतानुसार आपण जर लक्षावधि लोकांना शिक्षा देऊं शकतों तर त्याच सिद्धांतानुसार आपण हें गृहीत धरायाला पाहिजे की, प्रत्येक मनुष्याला ऑर्डिनन्सचें ज्ञान होतें.

प्रश्न—खासगी संरक्षणाचा हक्क किती मर्यादेपर्यंत पोहचूं शकतो ?

उत्तर—दुष्ट गोळीबाराला जबाबदार असणाऱ्या डेप्युटी कमिश्नर व डि० सुप० ऑफ पोलीस यांना ठार मारण्यापर्यंत खासगी संरक्षणाचा हक्क पोहचूं शकतो.

शेवटीं ॲड० पांडे म्हणाले—" न्यायाधीश महाराज, फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे, यावलीला जाण्यांतला उद्देश गांवकऱ्याशीं स्नेहसंबंध प्रस्थापित करणें हा होता; परंतु गांवांत प्रवेश करण्याच्या वेळेपासून आपण त्यांच्या कृतीकडे पाहिलें तर, त्यांनी स्थापन केलेला एकच संबंध आपल्या दृष्टोत्पत्तीस येतो व तो म्हणजे त्यांच्या लाठ्या व गांवकऱ्यांचीं फुटलेलीं मस्तकें हाच संबंध होय ."

प्रकरण ९ वें

न्या. बोस यांचा संदर्भ

रिव्ह्यू जज्ज पोलक काय निकाल देणार याचा अंदाज लोकांना आधीच असल्यामुळे त्याच्या निकालाचें कोणालाच आश्चर्य वाटलें नाही. १९४३ च्या १९ नंबरच्या आर्डिनन्सप्रमाणें आतां हायकोर्टाचें द्वार, स्पेशल जज्ज व रिव्ह्यू जज्ज यांच्या निकालाविरुद्ध दाद मागण्यासाठी खुलें झालें होतें. म्हणून कोर्टाच्या लढाईची आणखी एक पायरी चढण्याचें आरोपींनी ठरविलें व हायकोर्टाकडे ता. २७-७-४४ रोजीं यावलीचें अपील दाखल केलें. चीफ जस्टिस् ग्रिल यांनी हें अपील ऐकण्यासाठी न्या. मू. व्हिव्हियन बोस यांची नेमणूक केली.

ता. २२ व २३ आगस्ट १९४३ रोजीं अपीलाची सुनावणी झाली. ॲडव्होकेट मुधोळकर व घाटे यांनी आरोपींची बाजू न्या. मू. बोस यांच्या-समोर जोरदार भाषेंत बिलकूल गोलमाल न करतां मांडली. त्यांत डि. मॅ. मल्ड्रम हा असत्यवादी आहे, कायदेशीर अधिकार नसतांना त्याने सामुदायिक दंड वसूल करण्याचा बेकायदा प्रयत्न केला. त्याच्या या प्रयत्नाचा अर्थ असा होतो की, त्यानेच पोलीसची टोळी बरोबर नेऊन बेकायदा जमाव उभारला व यावलीवर दरवडा घालण्याचा प्रयत्न केला, त्यांत ५ इसमांचे खून पाडण्यांत आले. त्याने गांवकऱ्यांवर केलेल्या हल्ल्यापासून स्वतःचें संरक्षण करण्यासाठी गांवकऱ्यांना लढावें लागलें. इ. गोष्टी न्यायमूर्तींच्या नजरेस आणण्यांत आल्या.

आरोपींची बाजू न्या. मू. बोस यांनी शांतपणें ऐकून घेतली. तिचा त्यांच्या मनावर गंभीर परिणाम झालेला दिसला. डि. मॅ. च्या दर्जाच्या सरकारी अधिकाऱ्यावर बेकायदा वर्तनाचा, दरवडेखोरी, अपहार व खून करणें इत्यादि प्रयत्न केल्याचा, आरोपींच्या वकीलाने केलेला हा चौफेर हल्ला पाहून ते एक क्षणभर स्तिमितच झाले. खटल्याचा गंभीरपणा व गुंतागुंत आणि या बाबतींत पडत असलेला कायद्याचा कीस व त्यांचा निर्णय देण्याच्या बाबतींत दिसून येत

असलेला अति बिकटपणा यांची त्यांना अतिशय तीव्र जाणीव झाली. २३ ता.चें ॲड० घाटे यांचें भाषण ऐकल्यावर न्या. बोस घरीं गेले व रात्रीं त्यांनी कायद्याचीं पुस्तकें पाहिलीं. तीं पाहूं लागल्यानंतर खटल्याचें गांभीर्य, निर्णयाचा कठीणपणा व कायद्याची गुंतागुंत त्यांना अधिकच जाणवूं लागली. यावलीच्या खटल्याचा त्यांच्या मनश्चक्षूसमोर एक निराळाच प्रकाश पडूं लागला. खटल्याचें स्वरूप किती घोर आहे व त्याच्या निर्णयांत भविष्यकाळाचा ओघ बदलून देण्याचें केवढें सामर्थ्य साठलें आहे याच्या जाणिवेने त्यांचें चित्त अधिकच व्यथित होऊं लागलें. निर्णयाची जबाबदारी अतिशयच मोठी होती यांत शंका नाही. स्पेशल जज्ज मि. दंडे व रि. जज्ज मि. पोलक यांच्याशीं सहमत होण्यास व त्यांनी आरोपींना दिलेल्या बेफाम शिक्षा मंजूर करण्यास न्या. बोस यांची सदसद्विवेकबुद्धि तयार नसावी हें स्पष्ट आहे. मि. दंडे व मि. पोलक यांचा निर्णय-प्रमाद त्यांना स्पष्ट दिसूं लागला असावा. संयम, शिस्त, प्रसंगावधान, धैर्य, स्वार्थत्याग, स्वदेशभक्ति आणि राष्ट्रध्वजावरील प्रीति इ. आरोपींच्या गुणांचा ठसा त्यांच्या मनावर खास उमटल्यावाचून राहिला नसेल. तसेंच; डि. मॅजिस्ट्रेट व डी. एस. पी. यांच्यासारख्या अधिकाऱ्यांनी केलेली दंडेलीची वागणूक, गांवकऱ्यांवर करण्यांत आलेले अत्याचार, अधिकार नसतांना सामुदायिक दंड बसविण्याचें त्यांचें धाष्टर्य आणि बेकायदा रीतीने वसूल करण्यासाठी त्यांनी केलेला सरकारी सामर्थ्याचा दुरुपयोग, परिणामतः पांच गांवकऱ्यांचा पडलेला बळी, गांधीचौकांत वाहिलेलें रक्त, चौदा चौदा वर्षांच्या मुलांना आणि सत्तर सत्तर वर्षांच्या म्हाताऱ्यांना झालेल्या जखमा, बेफामपणें करण्यांत आलेला गोळीबार, आणि अखेरीस अधिकाऱ्यांनी भ्याड व नामर्दासारखें केलेलें पलायन इ. सर्व गोष्टींचा परिणाम कोणाहि सहृदय व न्यायप्रिय मनुष्याच्या अंतःकरणावर झाल्यावाचून कसा राहील? त्यांतून न्या. बोस यांनी, 'न्यायदेवतेचा करारी पुजारी'. असा लौकिक आजवर संपादन केलेला होता. या आपल्या रास्त लौकिकास आपल्या हातून बट्टा तर लागणार नाही ना, अशा विचाराने त्यांचें मन अगदी भंडावून गेलें असलें पाहिजे. म्हणून या परिस्थितींत न्यायाची जबाबदारी एकट्यावर घेण्यापेक्षा फुलबेंचाचा निर्णय घेणेंच श्रेयस्कर असें त्यांनी ठरविलें. न्या. बोस यांच्या मनःस्थितीचें जें वर्णन वर करण्यांत आलें आहे तें

केवळ कल्पनाविलास नव्हे. चीफ जस्टिस् ग्रिल यांचेकडे संदर्भ करतांना त्यांनी लिहिलेलें निर्णयपत्रक जसेंच्या तसें अनुवादित करून खाली देण्यांत येत आहे. त्याच्या ओळीओळींतून त्यांच्या चित्ताची विकलता व निर्णयाच्या जबाबदारीची त्यांना वाटत असलेली गंभीरता व्यक्त होण्यासारखी आहे.

न्यायमूर्ति बोस यांचें संदर्भ-पत्र

"या खटल्यामुळे सार्वजनिक महत्त्वाचे गंभीर प्रश्न उत्पन्न होत आहेत. डि. मॅजिस्ट्रेटने, तो जातीने ज्यांत हजर होता अशा (यावली येथील) घटनां-बद्दल जें एक सार्वजनिक वक्तव्य दिलें त्यांत एकतर बुध्दया अंशतः खोटीं विधानें केलीं आहेत, अथवा कोर्टासमोर त्याने दिलेली जबानी तरी खोटी आहे; असा आरोप करण्यांत आलेला आहे. पोलीसांनी गोळीबार केला होता व त्यांत पांच इसम मरण पावले, तसेंच, कायदेशीर अधिकार मिळण्याच्या सुमारें एक महिना अगोदर, प्रस्तुत खटल्यांतील खेड्यांतून सामुदायिक दंड वसूल करण्याचा त्याने जो प्रयत्न केला तें त्याचें कृत्य देखील गैरकायदा होतें असाहि आरोप करण्यांत आलेला आहे.

या प्रकरणांत ज्यांचा संबंध आला त्या सरकारी अधिकाऱ्यांचा दर्जा लक्षांत घेतां व त्यांचें (त्यांनी केलेल्या कृत्यांचें) संभाव्य परिणाम ध्यानांत घेतां यांतील सत्य हकीकत शोधून काढणें हीच एक अतिशय गंभीर अशी सार्वजनिक महत्त्वाची बाब बनलेली आहे. यांतून निर्माण होणारे कायद्याचे प्रश्नहि तितकेच गंभीर व दूरगामी परिणाम करणारे आहेत आणि ते अतिशय गुंतागुंतीचेहि आहेत. बेकायदा लूट व अपहरण करण्याचा जो प्रयत्न डि. मॅ. च्या नेतृत्वाखाली सरकारी अधिकाऱ्यांनी केला असें म्हणण्यांत येत आहे, त्याविरुद्ध खाजगी संरक्षणाचा अधिकार किती आहे याच्याशीं हे कायद्याचे प्रश्न निगडित आहेत. त्यांचीं हीं कृत्यें बेकायदा होतीं काय आणि त्यांचा अर्थ लूट व अपहरण असा होतो काय हे प्रश्नहि तितकेच गंभीर महत्त्वाचे आहेत.

"या प्रकरणाचें गंभीर स्वरूप पाहतां व त्यांतून निर्माण होणाऱ्या मुद्यांचा बिकटपणा लक्षांत घेतां, तसेंच. या अथवा त्या कोणत्याहि एका बाजूने

निर्णय झाला तरी त्याचे जे परिणाम होणार आहेत त्यांचें महत्त्व ध्यानांत घेतां, मला असें वाटतें की, या अपीलाचा संदर्भ आमचे लार्ड चीफ जस्टिस यांच्याकडे, या कोर्टाच्या कलम ९ (१) या नियमान्वयें करणें आणि हें अपील दोन जज्जांच्या बेंचाने ऐकावें अथवा शक्य असल्यास, त्या दोघांचा मतभेद झाल्यास पुन्हा तिसऱ्या जज्जाकडे त्याचा संदर्भ करण्याची आवश्यकता नाहींशी करण्याच्या दृष्टीने फुलबेंचानेच तें ऐकावें अशी शिफारस करणें रास्त होईल.

"या खटल्याचें महत्त्व व त्यांत गुंतलेल्या कायद्याच्या प्रश्नाचा बिकटपणा दोन दिवसांच्या अर्ग्युमेंटनंतर माझ्या ध्यानांत आला, ही खेदाची गोष्ट आहे; पण कालच्या अर्ग्युमेंटपर्यंत या प्रश्नांचा आविष्कार (emergant) च झाला नव्हता आणि जेव्हा घरीं जाऊन काल रात्रीं या बाबतींतलें प्रमाणभूत वाङ्मय मीं वाचलें, तेव्हाच त्यांतील आत्यंतिक बिकटपणा व त्याचें अतिशय गुंतागुंतीचें स्वरूप माझ्या ध्यानांत आलें.

म्हणून हे कागद पुढील आज्ञेसाठीं माझे लॉर्ड चीफ जस्टिस यांच्यासमोर ठेवण्यांत यावेत." ता. २४-८-१९४४

सही

व्हिव्हियन बोस जज्ज.

प्रकरण ६ वें

नागपूर हायकोर्टाचा ऐतिहासिक निर्णय


मागील प्रकरणांत निवेदिल्याप्रमाणे यावलीच्या खटल्याच्या निर्णयाची गंभीर जबाबदारी ध्यानांत घेऊन न्या. मू. बोस यांनी खटला फुलबेंचाकडे पाठविण्यांत यावा, अशा आपल्या शिफारशीसह त्याचें सर्व कागदपत्र व आपलें संदर्भपत्र प्रधान न्यायाधीश मि० ग्रिल यांच्याकडे पाठविलें. चीफ जस्टिस ग्रिल यांनी, ते स्वतः, न्या० मू० भवानीशंकर नियोगी व न्या० मू० काकासाहेब पुराणिक या तिघांचें मिळून फुलबेंच बनविलें. ज्या अर्थी न्या० मू० बोस यांनी संदर्भ केला आहे त्याअर्थी त्यांना बेंचावर घेण्यांत येईल अशी लोकांची अपेक्षा होती, पण त्यांना वगळूनच पूर्ण बेंच बनविण्यांत आलें.

स्पेशल जज्जाकडून रिव्ह्यू जज्जाकडे, रिव्ह्यू जज्जाकडून न्या० मू० बोस यांच्याकडे व त्यांच्याकडून पूर्णबेंचाकडे जातां जातां यावलीचा खटला बराच गाजूं लागला. मि० पोलक यांच्यासमोर तो आला त्यावेळींच जनतेचें कुतूहल त्या विषयीं वाढलेलें होतें. तशांत न्या० मू० बोस यांचें संदर्भपत्र वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्यानंतर यावलीने सर्वांचें लक्ष एकदम वेधून घेतलें व खटल्याचें महत्त्व सर्वांच्या ठळक रीतीने लक्षांत आलें. वस्तुतः यावलीच्या जनतेने १८-८-४२ ला दिलेली लढाई अपूर्व होती. राष्ट्रीय आंदोलनाच्या इतिहास निर्मितींत १९२१ पासून यावली सुसंगतपणें व वाढत्या तेजाने भाग घेत होती. हुतात्म्यांची परंपरा यावलीस निर्माण होत होती. १९३० पासून १९४२ पर्यंत पुढील लढ्यासाठी तयार राहण्याच्या अविचल उद्देशाने तिने पद्धतशीर शक्ति-संग्रह केला होता. १५ ऑगस्ट १९४२ ला अहिंसात्मक पद्धतीने तिने संपूर्ण क्रांति करून दाखविली होती. डि० मॅ० मेल्ड्म व त्याचे सहकारी यांनी स्वतंत्र यावलीवर ब्रि० साम्राज्य सत्तेच्या वतीने जें भयंकर आक्रमण केलें त्यापासून पद्धतशीर लढाई देऊन व तींत विजय मिळवून तिने आपला बचाव केला होता.

यावलीने शिस्त, संयम, संघटना व पराक्रम हे चारहि युद्धोपयोगी गुण प्रकट केले होते; परंतु आष्टी-चिमूर सारखे लाल भडक प्रकार यावलीला घडले नाहीत. यावलीच्या स्वातंत्र्यवीरांनी शिस्त व लढाईच्या मर्यादा सोडल्या नाहीत. ब्रि० अधिकाऱ्यांना त्यांनी प्रत्यक्ष कैद केलें व ते शरण आल्यावर त्यांना सोडूनहि दिलें, पण त्यांची हत्या करण्याची कल्पनाहि त्यांच्या मनांत उद्भवली नाही. त्यांनी त्यांचा पाठलाग केला तो केवळ आपला झेंडा परत मिळविण्याच्या हेतूने, त्यांना मारण्याच्या हेतूने नव्हे. यावलीच्या खटल्याचें हें स्वरूप प्रारंभीं प्रारंभीं जनतेच्या ध्यानांत आलें नाही, परंतु तीन तीन कोर्टांतून गाजत हा खटला जसा वरवर गेला तसतासा तो लोकांचें ध्यान अधिकाधिक आकर्षित करूं लागला आणि न्या० मू०बोस यांच्या संदर्भपत्रामुळे यावलीचें महत्व अगदी कळसास चढलें. राष्ट्रीय पुढाऱ्यांचें चित्त त्याने एकदम वेधून घेतलें.


म्हणून हायकोर्टाच्या फुलबेंचासमोर जेव्हा हा खटला गेला तेव्हा तो चालविण्यासाठी राष्ट्रीय विख्यातीचा वकील आणण्याचें ठरलें. म० गांधी यांच्या कानावर सर्व हकीकत घालण्यांत आली. खटल्याचें स्वरूप त्यांच्या निदर्शनास आणून देण्यांत आलें. त्यांनी त्याचे कागदपत्र वाचले. त्यांनाहि त्याचें महत्त्व पटलें. त्यांनी स्वतः मुंबईचे माजी मंत्री व सुविख्यात ॲडव्होकेट श्री० कन्हय्यालाल मुन्शी यांना पत्र दिलें व खटला चालविण्याची शिफारस केली. हायकोर्टाच्या फुलबेंचासमोर यावलीचा खटला ॲड० मुन्शी यांनी आपल्या नित्याच्या कौशल्याने चालविला आणि आरोपींची बाजू दणदणीतपणें मांडली.

ता० २९-१२-४४ रोजीं फुलबेंचाचा निर्णय जाहीर झाला. न्या० मू० चीफ जस्टिस ग्रिल यांनी सर्वच आरोपींना दोषी ठरविलें व त्यांच्या बहुतेक शिक्षा कायम ठेवल्या; परंतु न्या० मू० नियोगी व न्या० मू० पुराणिक यांनी इं० पी० को० ३३२ व ३३३ कलमांखाली आरोपींना पूर्ण दोषमुक्त केलें व आत्मसंरक्षणाच्या हक्काच्या मर्यादा त्यांनी ओलांडल्या असें म्हणून इं० पी० को० १४७, ३२४, ३२५, (१४९ कलमा बरोबर वाचून) या कलमांखाली त्यांच्यावर दोष ठेऊन व त्यांनी भोगल्या इतक्या शिक्षा पुरे झाल्या असें म्हणून त्यांना बंधमुक्त करण्यांत यावें, असा निर्णय दिला. फुलबेंचांतील बहुमताचा निर्णय अशा प्रकारचा झाल्यामुळे आरोपींची मुक्तता करण्यांत आली.



अॅडव्होकेट कन्हैयालाल मुन्शी, मुंबई

फकीर अकबरशहा व त्याचे तीन बहाद्दूर बेटे



१. जिग्गू शहा, २. मैताब शहा, ३. लड्डू शहा (उभा)

न्या० मू० नियोगी व न्या० मू० पुराणिक यांनी आपला निर्णय देतांना जीं निकालपत्रें लिहिलीं त्यांचा यथार्थानुवाद प्रस्तुत कांडांत पुढे दिला आहे. न्या० मू० ग्रिल यांच्याहि निकालपत्राचा सारांश महत्त्वाच्या अवतरणांसह त्यांच्यासोबत देण्यांत आला आहे. हीं तीनहि निकालपत्रें इतिहासांत अतिशय महत्त्वाचीं ठरतील. न्या० मू० बोस यांनी जी आशंका बाळगली ती निःसंशय खरी ठरली. भविष्यकाळाचा प्रवाह बदलून देण्याचें प्रचंड सामर्थ्य या निर्णयांत वसत आहे, यांत शंका नाही. हे निर्णय म्हणजे दयायाचनेच्या अर्जाचीं निकालपत्रें नव्हत. आरोपींनी दिलेला लढा ब्रि० सरकारच्या कायद्यांनी सुद्धा समर्थनीय कसा होता, याचें मार्मिक विवेचन या निकालपत्रांत आहे. त्यांचे कायदेशीर हक्क त्यांत मान्य करण्यांत आले आहेत. ब्रि० अधिकाऱ्यांच्या उद्दाम वर्तनावर, अत्याचारी मनोवृत्तीवर, बेकायदा वागणुकीवर, सत्यापलाप करण्याच्या अनीतिमान मार्गावर त्यांत कोरडे ओढण्यांत आले आहेत. या निर्णयामुळे यावलीचा संग्राम हा एका निराळ्याच तेजस्वी स्वरुपांत प्रकट झाला आहे. तो मूळचाच तेजस्वी व उज्ज्वल होता यांत शंका नाही. पण न्यायमूर्तींच्या अधिकारी लेखणींतून त्याचें स्वरूप जेव्हा मांडलें गेलें, तेव्हा वार्तानियंत्रणाच्या मुस्कटदाबीची जी राखड त्यावर पडत चालली होती ती सर्व उडून गेली आणि त्याची उज्वल तेजस्विता लोकांच्या दृष्टीसमोर अभिनव स्वरूपांत चमकूं लागली.

वरील न्यायमूर्तींच्या निर्णयामुळे त्यांच्या निकालपत्रांच्या आधारें यावलीच्या ता० १८ ऑगस्ट १९४२ च्या प्रतिकाराची जी संगतवार व तेजस्वी अशी वीरगाथा तयार झाली ती या ठिकाणीं सांगणें आवश्यक आहे. घडलेल्या प्रकाराचा यावलीच्या ग्रामस्थांकडून कळलेला इतिहास पूर्वी हत्याकांडांत दिलाच आहे. त्याच इतिहासाचें सुवर्ण तीन तीन ब्रि० कोर्टाच्या अग्नींतून शुद्ध होऊन बाहेर पडल्यानंतर त्याला किती अभिनव चमकदारपणा प्राप्त झाला आहे हें पाहणें व न्यायमूर्तींच्या गोमुखांतून बाहेर पडलेल्या यावली वीरांच्या गाथागंगेचें उदक प्राशन करणें वाचकांनाहि अधिक पावनकारी वाटेल अशी आशा आहे.

हायकोर्टाच्या निर्णयपत्रांच्या आधारें तयार होणारी यावली प्रकरणाची कथा पुढीलप्रमाणे आहे:—

अमरावतीच्या डि० मॅजि० मेल्ड्रम याने यावलीच्या नागरिकांवर २००० रु० चा बेकायदा सामुदायिक दंड बसविला आणि रेव्हे० इन्स्पेक्टरच्या मार्फत तो वसूल करण्याचा ता० १६-८-४२ रोजीं प्रयत्न केला, त्याचा लोकांनी जो प्रतिकार केला तो न्याय्य होता. लोक आपल्या कायदेशीर हक्कांच्या मर्यादेंतच वागले. (न्या० मू० ग्रिल यांचा निर्णय पृष्ठ पहा.) रेव्हेन्यू इन्स्पेक्टरला अपयश आलेलें पाहून ता० १८-८-४२ रोजीं, डि० मॅजि० मेल्ड्म स्वतःच बेकायदा उद्देशाच्या सिद्धीसाठी म्हणजे सदहू सामुदायिक दंड वसूल करण्यासाठी यावलीस गेला. या अन्याय्य वसुलीच्या प्रतिकारासाठी लोक गांधीचौकांत जमा झाले अशा तऱ्हेने जमा होतांना अथवा जमाव करतांनाहि ते पूर्णपणे आपल्या कायदेशीर हक्कांच्या मर्यादेंतच वागले. (न्या० मू० नियोगी यांचा निर्णय प० ५ पहा.) या जमावाने निघून जावें असा कोणताहि हुकूम त्यास देण्यांत आला नव्हता. जमावहि शांतच होता. तथापि डि० मॅ० व डी० एस्० पी० हे लोकांच्या अंगावर धावून गेले व तुटून पडले; आणि गांधीचौकांत फडकत असलेला कॉंग्रेसचा राष्ट्रध्वज उपटण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अशा रीतीने त्यांच्या हातून झेंड्याचा उपमर्द होईपर्यंत लोकांनी त्यांच्यावर कोणतीहि दगडफेक केली नाही अथवा लाठ्यांचाहि उपयोग केला नाही. (न्या० मू० नियोगी प. ६, ९, व ११)

झेंडा ही गांवकऱ्यांची दौलत होती व त्याबावतींत गांवकऱ्यांना कांही कायदेशीर हक्क होते. म्हणून डि० मॅजि० च्या टोळीने झेंडा उपटण्याचा, फाडण्याचा वा काढून नेण्याचा जेव्हा प्रयत्न केला, तेव्हा त्याचा गांवकऱ्यांनी प्रतिकार केला. (न्या० नियोगी प० १५). प्रतिकार करण्याच्या हेतूनेच त्यांनी दगडफेक केली व लाठ्याहि उपयोगांत आणल्या. झेंड्याचें संरक्षण करीत असतां व तो काढून नेण्याचा प्रतिकार करीत असतांनाहि लोक आपल्या कायदेशीर हक्कांच्या पूर्णपणें मर्यादेंतच वागले. (न्या० नियोगी प०:१५). त्यांत इतकेंच झालें की, असें करतांना त्यांनी जरूरीपेक्षा अधिक बलप्रयोग केला व खासगी संरक्षणाच्या हक्काच्या मर्यादांचें उल्लंघन केलें. (न्या० नियोगी प० १५) डि० मॅ०च्या टोळीने गोळीबार केल्यामुळे लोक पांगले. याच वेळीं अधिकाऱ्यांच्या टोळीने गांव सोडून जावयास पाहिजे होतें. कारण त्यावेळीं कोणीहि त्यांचा पाठलाग करीत नव्हते. लोक आधीच पांगले होते. पण अधिकाऱ्यांपैकी

डी० एस्० पी० पुन्हा गांधी चौकांत गेला व त्याने तेथे कोणी नसतांना झेंडा काढून आणला. हें त्याचें कृत्य अनावश्यक व अन्यायाचें होतें. मध्ययुगीन काळाला शोभण्यासारखें त्याचें हें कृत्य होतें. त्यामुळे लोकक्षोभाचा पारा अधिक भडकला. (न्या० ग्रिल प० १८ पहा.) लोकांनी झेंडा परत मागितला, पण तो परत देण्याऐवजीं अधिकाऱ्यांनी उलट दुसऱ्यांदा गोळीबार केला. पण लोकांचा निर्धार पाहून ते पाटलाच्या घरांत लपले. तेथें त्यांनी झेंडा परत देण्याच्या शर्तीची लोकांच्याबरोबर नामुष्कीची वाटाघाट केली व ती फसली. (न्या० ग्रिलं प. १८) तेथूनहि मागल्या दाराने ते पळून गेले. लोक पुन्हा जमा झाले व दगडफेक करून त्यांचा पाठलाग करूं लागले. अधिकाऱ्यांनी पळतां पळतांहि गोळीबार चालूंच ठेवला.

हा जो गोळीबार करण्यांत आला तो कोणत्याहि अवस्थेंत न्याय्य होता की नाही आणि अधिकाऱ्यांनी जीं कृत्यें केलीं तीं कृत्यें तितक्या थरास नेऊन करणें कायद्याच्या दृष्टीने समर्थनीय होतें किंवा नाही हें ठरविण्याची मागणी हायकोर्टाकडे करण्यांत आलेली नव्हती (न्या० पुराणिक प० ५), म्हणून त्यांनी ह्या प्रश्नावर निर्णय दिला नाही. तथापि हे सरकारी अधिकारी त्या ठिकाणीं आपलें कायदेशीर व सार्वजनिक कर्तव्य बजावण्यासाठी गेलेले नव्हते आणि म्हणून त्यांना आपल्या बचावासाठी इं० पी० को० च्या ३३२ व ३३३ ह्या कलमांचा आश्रय घेण्याचा अधिकार नव्हता. (न्या० नियोगी प० १६) ज्या घटना घडल्या म्हणून प्रस्थापित झालें आहे, त्यांच्या आधारें कायद्याचीं पुढील अनुमानें निघूं शकतात.—

(१) डि. मॅजि. मेल्ड्रम याने ता. १६-८-४२ रोजीं यावलीवर २००० रु. बेकायदा सामुदायिक दंड बसविला व बलप्रयोगाने तो वसूल करण्याचा प्रयत्न केला, तो वसूल करण्यासाठी पाठविलेल्या रे. इ. बरोबर सशस्त्र कान्स्टेबल्स देण्यांत आले होते. अशा तऱ्हेने दंड बसविणें व बलप्रयोगाने तो वसूल करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे डाका घालणें व लूटमार करणेंच होय.

(२) बेकायदा उद्देशाच्या सिद्धीसाठी म्हणजे वरील सामुदायिक दंड वसूल करण्यासाठी ता. १८-८-४२ रोजीं डि. मॅ. मेल्ड्रम स्वतः सशस्त्र पोलीस बरोबर

घेऊन यावलीस गेला. त्याने बसविलेला सामुदायिक दंडच बेकायदा असल्याने तो वसूल करण्यासाठीं त्याने स्वतः जो हा प्रयत्न केला त्याचा अर्थ त्यानेंहि डाका घालण्याचा व लूटमार करण्याचाच प्रयत्न केला असा होतो.

(३) लाठीहल्ला करून जमावाची पांगापांग करण्यापूर्वी एरव्ही शांतपणें उभा असलेला जमाव बेकायदा होता असेंहि त्याने जाहीर केलें नाही. त्याच्या सांगण्यावरूनच डी. एस. पी. ने झेंडा उपटण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या संमतीवाचून आणि त्यांच्या इच्छेविरुद्ध, डि. मॅ. मेल्ड्रम व डी. एस् पी. प्रॅट यांनी आपल्याबरोबर पांचांपेक्षा अधिक सशस्त्र पोलीस बरोबर घेऊन हा जो झेंडा उपटण्याचा प्रयत्न केला तो चोरीच्या गुन्ह्यापेक्षाहि अधिक भयंकर स्वरुपाचा गुन्हा होता. (न्या० नियोगी प० १५)

(४) झेंडा काढून नेण्याचा हा प्रयत्न बेकायदा होता. आपलें कर्तव्य बजावीत असतांना त्यांच्या हातून ही गोष्ट घडली असेंहि म्हणतां येणार नाही. (न्या. पुराणिक प. २)

(३) प्रक्षोभाचें कोणतेंहि कारण नसतांना त्यांनी जो गोळीबार केला तो समर्थनीय नव्हता. निदान असें खास म्हणतां येईल की, खासगी संरक्षणाच्या हक्काची मर्यादा त्यांनीच गोळीबार करून उल्लंघलेली होती. म्हणून त्यांच्या हातून झालेला मनुष्यवध हा निंदास्पद आहे.

(७) निदान लोक पांगून गेल्यानंतर त्यांनी ताबडतोब गांव सोडून निघून जावयास पाहिजे होते. त्याऐवजीं चौकांत कोणी नाही असें पाहून त्यांनी झेंडा काढून नेला. कायद्याच्या भाषेंत याचा अर्थ चोरी असा होतो.

(८) त्यांनी दुसऱ्यांदा केलेला गोळीबार मुळीच समर्थनीय नव्हता. म्हणून अधिकारी व त्यांची टोळी हे मनुष्यवधाच्या गुन्ह्यास पात्र ठरतात.

सारांश डि. मॅ. मेल्ड्रम व त्याची टोळी यावलीस गेली ती सरकारी अधिकारांत नव्हे. त्यांनी तेथे जाऊन डाका घालण्याचा प्रयत्न केला. लोकांनी

त्यांचा प्रतिकार केला. मेल्ड्रम व त्याची टोळी यांनी लाठ्या व बंदुकी यांचा उपयोग केला. म्हणून प्रश्न असा आहे की, आक्रमण करणाऱ्या इसमाला खासगी संरक्षणाचा कांहीं हक्क आहे काय आणि वरील परिस्थितींत लोकांना ठार मारण्याच्या मर्यादेपर्यंत त्या हक्काची व्याप्ति वाढूं शकते काय? वस्तुस्थिति अशी होती की, मेल्ड्रम व त्याची टोळी हेच आक्रमक होते. त्यांना खासगी संरक्षणाचा हक्क नव्हता आणि जरी यदाकदाचित् तो असला तरी त्यांनी त्याच्या मर्यादेचें उल्लंघन केलें आणि त्यांचे हातून लूट करणें, डाका मारण्याचा प्रयत्न करणें इ० गुन्हे घडले.

यावलीच्या खटल्याचें वरील स्वरूप ध्यानांत घेऊनच न्यायमूर्तीचीं निकालपत्रकें वाचलीं पाहिजेत; अथवा उलट असें म्हणणेंच योग्य होईल की, त्यांचीं निकालपत्रकें वाचलीं म्हणजे यावली येथील घटनांचें वरील स्वरूप ध्यानांत आल्या वाचून राहात नाही. पाण्यापेक्षा रक्त अधिक घट्ट असतें या म्हणीचें प्रत्यंतर हायकोर्टाच्या निर्णयांतहि आलें. न्या० मू० बोस यांच्या मनःस्थितीचें विवरण मागील प्रकरणांत केलेलेंच आहे. नियोगी व पुराणिक या न्यायमूर्तिद्वयांनी लोकांच्या नाडीवर अचूक बोट ठेवलें. ते हिन्दी असल्यामुळे हिंदी लोकांच्या आशा–आकांक्षांशीं ते अधिक समरस होऊं शकले व त्यांच्या मनोवृत्तींत शिरून खऱ्या प्रकारचें मर्म त्यांना बरोबर शोधून काढतां आलें उलट चीफ जस्टिस ग्रिल यांना इंग्लिश लोकांचा व ब्रि. सत्तेचा अभिमान असणें स्वाभाविक असल्यामुळे त्या सत्तेचें उन्मूलन करणाऱ्या लोकांच्याकडे बंडखोर या नात्यानेच ते पाहूं शकले; आणि साहजिकपणेच ती सत्ता कायम ठेवण्यासाठी जिवाचें रान करणाऱ्या मेल्ड्रमविषयी त्यांना आंतरिक सहानुभूति वाटली आणि म्हणून त्याच्या अनेक अवास्तव कृत्यांचेंहि समर्थन करण्याची प्रवृत्ति त्यांच्या ठिकाणीं दिसून आली.

परंतु एकंदर प्रकरणांत ब्रि. अधिकाऱ्यांच्या दुर्वर्तनाचें पारडेंच एवढें भारी होतें की, त्यापुढे न्या. ग्रिल यांच्या वरील सहज प्रवृत्तीचें वजनसुद्धा हलकें भरलें. आणि त्यांनाहि मधून मधून त्यांच्या दुर्वर्तनावर कोरडे उडविणें अपरिहार्य झालें. कांहीं उदाहरणें देऊन हा मुद्दा विशद करणें अधिक मनोरंजक होणार आहे.

गांवांत शिरल्याबरोबर पोलीसांनी जो पहिला लाठीहल्ला केला त्याविषयीं न्या. ग्रिल म्हणतातः-" या बाबतींतल्या प्रत्यक्ष घटनांचें स्वरूप फिर्यादीच्या साक्षीदारांनी सौम्य करून दाखविलें. जमावाने निघून जावें असा औपचारिक हुकूम देण्यांत आला नव्हता हेंहि मला मान्य आहे."

"या लहानशा जमावाचा चौकापर्यंत पोलीसांनी पाठलाग केला नसता तर तें अधिक शहाणपणाचें झालें असतें, असें पुढील घटनांवरून म्हणतां येईल."

डि. मॅ. मेल्ड्रम याच्या जबानींतली विसंगतिहि चीफ जस्टिस यांना मान्य करावी लागली. ते म्हणतात.-"इतर साक्षीदारांशीं तुलना करतां त्याचें तपशीलाबाबतचें वक्तव्य गोलमाल (Vague) आहे."

प्रांतिक सरकारच्याहि वर्तनावर कोरडे उडविणें न्या. मू. ग्रिल यांस अवश्य वाटलें. सामुदायिक दंड बसविण्याचा हुकूम प्रांतिक सरकारनेच डि. मॅ. मेल्ड्रम यास दिला असला पाहिजे. त्याच्यासारखा तरुण जिल्हाधिकारी स्वतःच्या जबाबदारीवर बेकायदा कृत्य करण्यास प्रवृत्त होईल असें न्या. ग्रिल यांस वाटत नाहीं. या बाबतींत त्यांनी मेल्ड्रमचें समर्थन करण्याचा कसा प्रयत्न केला आहे हें पाहणें मनोरंजक आहे. न्या. मू. ग्रिल म्हणतात.-"मि. मेल्ड्रम यांनी आपल्या जबानींत सांगितलें आहे की, प्रांतिक सरकारने दिलेल्या अधिकारान्वयेंच आपण सामुदायिक दंड बसविला. ता. १२ ते १५ ऑगस्टच्या काळांत त्या बाबतींतल्या सूचना प्रां. सरकारकडून टेलिफोनवर मिळाल्या होत्या. कोणत्या खेड्यावर किती दंड बसवावयाचा हें तारतम्य पाहून ठरविण्याचा अधिकारहि प्रां. सरकारने आपणासच दिला होता. या मुद्याला उत्तर देतांना विद्वान ॲडव्होकेट जनरल यांनी सांगितलें की सरकार व मि. मेल्ड्रम यांच्या दरम्यान टेलीफोनवर बातचीत झाल्याचा सुगावा (trace) सरकारला लागत नाहीं. पुढे तर त्यांनी निश्चितपणें असें सांगितलें की, या प्रश्नाबाबत **चीफ सेक्रेटरीने** मि. मेल्ड्रम यास कोणताहि फोन केला नव्हता."

परंतु मेल्ड्रम हा दोषी आहे ही गोष्टच न्या० ग्रिल यांना पटत नव्हती, याची कल्पना त्यांच्या पुढील उद्गावरून येण्यासारखी आहे.--

" आमच्या मनावर असा ठसा उमटला आहे की, **'चीफ सेक्रेटरी'** या शब्दावर जोर देण्यांत आला होता. पण सरकारजवळ कांही चीफ सेक्रेटरी हा एकच ऑफिसर नाही.............मि० मेल्ड्रमसारखा नवीन (Junior) डि० मॅ० १९४२ च्या नं. २० च्या ऑर्डिनन्सची, सामुदायिक दंड बसविण्याच्या पद्धतीच्या बाबतींत अवज्ञा करील आणि प्रां० सरकारचे सर्व अधिकार आपणासच आहेत असें समजून वागेल, हें आम्हांला संभवनीय वाटत नाहीं.............प्रांतिक सरकारनेच हुकूम दिलेले असले पाहिजेत. मि० मेड्रम यांच्या मेंदूतून सामुदायिक दंडाची कल्पना निघाली नाही, याविषयीं आम्हांला संदेह नाही. " चीफ सेक्रेटरीने जर हुकूम दिला नव्हता, तर तो खुद्द गव्हर्नराने दिला असला पाहिजे अशी न्या० ग्रिल यांची गर्भित सूचना आहे काय ?

डि० मॅ० मेल्ड्रमच्या तोडीचा दुसरा जो अधिकारी ता० १८-८-४२ च्या आक्रमक टोळीबरोबर यावलीस गेला होता तो म्हणजे डि० सुपरिंटेंडंट ऑफ पोलीस मि० प्रॅट हा होय. परंतु सरकातर्फे या प्रॅटला साक्षीदार म्हणून शेवटपर्यंत बोलावण्यांत आलें नाही. साक्षीदारांच्या यादींतून प्रॅटला वगळण्यांत सरकारचा हेतु दुष्ट होता ही गोष्ट न्या० ग्रिल यांनाहि मान्य करणें अपरिहार्य झालें. किंबहुना, त्यामुळे सरकारच्या वर्तनावर जबरदस्त लांछन आलें अशी त्यांची निश्चित धारणा झाली असली पाहिजे. या विषयाबाबतचे त्यांचे पुढील उद्‌गार मोठेच उद्‌बोधक आहेत यांत शंका नाही. ते म्हणतात.—" मि० प्रॅट यांना साक्षीदार म्हणून बोलावण्यांत आलें नव्हतें. याबाबत सरकारच्या तर्फे असें स्पष्टीकरण देण्यांत आलें आहे की, दंगेखोरांपैकी कोणालाच तो ओळखूं शकला नसता, म्हणून त्याला बोलावण्याची आवश्यकता नव्हती." हें स्पष्टीकरण पर्याप्त आहे असें आम्हांला वाटत नाहीं...........(मि० प्रॅट) यांनी स्वतःच दुसऱ्यांदा चौकांत जाऊन झेंडा काढून आणलेला होता आणि दंगलीच्या वेळींहि त्यांनीच प्रथम झेंडा काढण्याचा प्रयत्न केला होता. म्हणूनच त्यांना साक्षींत बोलावण्यांत आलें नव्हतें असा आमचा ठाम समज झाला आहे. त्यांची (मि० प्रॅट यांची) ही कृति (झेंडा काढण्याची) जरी बेकायदा

नसली, तरी तिच्यामुळेच जमावाच्या क्षोभाचा पारा, एरव्ही भडकला नसता इतका भडकला. झेंडा काढून नेण्याचा पहिला प्रयत्न विफल झाल्यानंतर मागाहून पुन्हा पोलीसदल बरोबर घेऊन चौकांत जाणें व झेंडा काढून आणणें अनावश्यक व अन्यायाचें (Unnecessary and injudicious) होतें. मध्ययुगीन लढाईच्या ज्या विचित्र तऱ्हा होत्या व विजयपताका आणण्याची त्या काळची जी पद्धति होती त्या सारखाच हा प्रकार होय. या त्यांच्या कृतीचाच आणखी एक दुर्दैवी व अपरिहार्य परिणाम असा झाला की, पोलीस पार्टी जेव्हा पाटलाच्या घरांत दडली व जेव्हा त्याला लोकांनी वेढा दिला तेव्हा कोणत्या शर्थीवर आपण झेंडा परत करण्यास तयार आहोंत या विषयीं नामुष्कीचीं बोलणीं करण्याचा प्रसंग त्यांच्यावर (पोलीस दलावर) आला व तीं बोलणींहि फसलीं; आणि परिणामतः लोकांचा क्षोभ पुन्हा भडकला. त्याच्या समोर अधिक माघार घेणें त्यांना भाग पडलें! मि० प्रॅट यांच्या या सारासार विवेकहीन (Injudicious conduct) वर्तनावर कसून होणारी उलटतपासणी टाळावी, म्हणूनच फिर्यादीनें त्यांना साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत बोलाविलें नाही असें आम्हांला वाटतें.

स्पेशल जज श्री० दंडे व रिव्हयू जज मि० पोलक यांच्यावरहि जातां जातां एक फटकारा न्या० ग्रिल यांनी मारला आहे. ३३२ व ३३३ कलमाखाली आरोपींना शिक्षा दिल्यानंतर पुन्हा त्याच लोकांना ३२४ व ३२५ कलमांखाली शिक्षा सुनावण्यांत आल्या होत्या. त्याविषयीं न्या० मू० ग्रिल म्हणतात " ३३३ व ३३२ कलम १४९ कलमाबरोबर वाचून शिक्षा दिल्यानंतर त्याच लोकांना ३२४ व ३२५ कलमांन्वयें शिक्षा देणें बाबफल (Superfluous) होतें. "

हायकोर्टाच्या जड कागदपत्रांतून यावली खटल्याचें जें नारसिंहरूप प्रकट झालें त्याची कल्पना येण्यास वरील विवरण पुरेसें होईल असें वाटतें.

ता० १८-८-४२ च्या लढाईबावत एकंदर ४८ इसमांवर खटले भरण्यांत आले. त्यांपैकी दोन शेवटपर्यंत फरार राहिले. हायकोर्टाचा निर्णय

झाल्यावर ते पोलीसच्या स्वाधीन झाले व त्यांना नंतर सोडून देण्यांत आले. ते सर्व लोक कामकरी शेतकरी वर्गांतीलच होते. ट्रायल कोर्टाने त्यांपैकी चार इसमांना दोषमुक्त करून सोडून दिलें व बेचाळीस इसमांना दोषी ठरवून चार वर्षांपासून सात वर्षांपर्यंत सक्त मजुरीच्या शिक्षा ठोठावल्या. रिव्ह्यू जजाने आणखी चार इसमांना सोडून दिलें व अडतीस जणांच्या शिक्षा कायम केल्या. हायकोर्टाने ३०७, ३३२ व ३३३ कलमांखाली झालेल्या सर्व शिक्षा रद्द ठरविल्या. ३२५ कलमाखालील शिक्षा कायम ठेवल्या. पण भोगली इतकी शिक्षा पुरे झाली असें म्हणून सर्वांनाच बंधमुक्त केलें. असा न्यायालयांतील लढाईचा थोडक्यांत मतितार्थ आहे.

या खटल्यांत हायकोर्टानेहि कांही शिक्षा कायम ठेवल्या असल्या तरी व्यवहारतः सर्वच आरोपी बंधमुक्त झाल्याने सर्वांना विजयाइतकाच आनंद वाटला. शिवाय हायकोर्टाच्या निर्णयांत यावलीकरांचा नैतिक विजय फार मोठा झाला. जनतेच्या बाजूने कायद्याचे कैक सिद्धांत प्रस्थापित झाले. तिरंगी ध्वज हा बेकायदा नव्हता व ती साऱ्या गांवची संपत्ति होती व तिच्या संरक्षणासाठी साऱ्या गांवाने समुचित होऊन लढणें हा त्याचा हक्क होता, ही गोष्ट कायद्याने प्रस्थापित झाली. अधिकाऱ्यांनी बसविलेला बेकायदा सामुदायिक दंड वसूल करण्यास प्रतिकार करणें हाहि जनतेचा हक्क प्रस्थापित झाला असल्याने अन्याय्य दंडाचा प्रतिकार करण्याचा आपला निश्चय सभा भरवून व्यक्त करण्याचा लोकांना हक्क आहे हीहि गोष्ट कायद्याने प्रस्थापित झाली. हे सर्व प्रश्न राष्ट्रीय स्वरूपाचे होते. जनतेच्या या हक्कांवर नोकरशाहीने गदा आणली होती. पण यावलीने प्रथम नोकरशाही बरोबर ता० १६ व १८ ऑगस्टला प्रत्यक्ष लढाई करून आणि नंतर कोर्टातील लढाया देऊन आपले हे हक्क प्रस्थापित केले. एकट्या यावलीने राष्ट्राला दिलेली ही देणगी होय. या देणगीबद्दल राष्ट्र तिचें ऋणी राहील.

यावलीने आणखी एक धडा राष्ट्राला शिकविला. तो म्हणजे, असले मूलभूत महत्त्वाचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी त्यागहि तितकाच मोठा करावा लागतो. त्यासाठी यावलीचे सात वीर हुतात्मे झाले व त्याशिवाय

तेवीस वीर गोळ्या लागून कायमचे जायबंदी झाले. नोकरशाहीकडून अनन्वित छळ व जुलूम बरदास्त करावा लागला. सामुदायिक निर्वासनाचें तप आचरावें लागलें आणि तीन तीन कोर्टीं चिकाटीने आपला लढा लढत रहावें लागले व सतत दोन वर्षें कारागृहवासांतील यातना भोगाव्या लागल्या. गांवचागांव जेव्हां इतक्या महान त्यागास–यज्ञास तयार झाला, तेव्हाच वरील हक्कांचें पसायदान त्याच्या-नव्हे सबंध राष्ट्राच्या पदरांत पडलें.

पण एवढ्यानेच यावलीच्या विजयमालिकेंतील मणी संपले नाहीत. नागपूर हायकोर्टाने यावली खटल्यांत दिलेल्या निर्णयाने नोकरशाहीचे छक्केपंजे उडाले. यावली खटल्याला प्राप्त होऊं लागलेलें नारसिंहरूप पाहून तिची पांचावरच धारण बसली. या प्रकरणातला मुख्य गुन्हेगार अमरावतीचा डेप्युटी कमिश्नर मेल्ड्रम हायकोर्टाच्या निर्णयाच्या आधीच हिंदुस्थान सोडून पळून गेला. त्याने दक्षिण आफ्रिकेंतली नोकरी पत्करली. सरकारी अधिकाऱ्यांच्या धुंदोचा पारा यावलीच्या निर्णयाने शून्यांशावर उतरविला. आपल्या वर्तनाची चौकशी होणार काय, १९४२ सालांतील आपल्या दुष्कृत्यांचा पाढा यापुढे भरकोर्टांतून वाचला जाणार काय या भीतीने त्यांची गाळण उडूं लागली. कालपर्यंत ताठ माना करुन चालणारे अधिकारी खाली मान घालून चालूं लागले. कित्येकांनी राष्ट्रीय पुढाऱ्यांची खुशामत करण्यास प्रारंभ केला. सारांश, नोकरशाहीला धैर्य विगलित करणें (loss of morale) हा या खटल्याच्या रूपाने यावलीने मिळविलेला मोठाच विजय होता. यावलीच्या निर्णयाने भविष्यकालाचा प्रवाह बदलवून टाकला यांत शंका नाही. सरकारी अधिकाऱ्यांच्या संरक्षणाचा काळा कायदा प्रा० सरकारने यावलीच्या निर्णयानंतरच जारी केला. पण त्यामुळे नोकरशाहीची घसरूं लागलेली हिंमत सावरली गेली नाही. यावलीने तिचा एवढा मोठा बुरूज जमीन दोस्त केला होता की तें भगदाड बुजविणें ब्रि० सरकारला त्यानंतर केव्हाच शक्य झालें नाही.

प्रकरण ७ वें

निःस्वार्थ साह्यकर्ते.

ता० १८-८-४२ रोजीं झालेल्या युद्धाच्या घटनेंत व त्यांतून निर्माण झालेल्या कोर्टाच्या भांडणांत आपण आतापर्यंत इतके रंगलों की, ता० १५ आगस्टला ज्यांनी संपूर्ण अहिंसक क्रांति केली व यावलीपासून माहोली-पर्यंतच्या टापूवर काँग्रेसचें राज्य प्रस्थापित केलें आणि माहोली पोलीसस्टेशनवर सत्याग्रह करून त्यावर क्रांतीचा पूर्ण ताबा केल्यानंतर जे सत्याग्रही या नात्याने पोलीस सबइन्स्पेक्टरने 'तुम्हांला कैद केलें आहे' असे म्हणतांच, आपणहून त्याच्या स्वाधीन झाले त्या वीर पंजाबराव प्रभृति क्रांतिवीरांचें पुढे काय झालें हें पाहण्यास आपणांस आतापर्यंत सवडच मिळाली नांही.

मागे क्रांतिकांडांत सांगण्यांत आलेंच आहे की, त्यांना त्या रात्रींच म्हणजे १५ तारखेलाच अमरावतीच्या तुरुंगांत नेऊन पोहचविण्यांत आलें. नंतर १८ ता. च्या घडामोडींबाबत धरपकड झाल्यानंतर व त्या प्रकरणांतील आरोपींचा सतत दोन महिने पाठलाग करून दोघांखेरीज बाकींच्या सर्वांना पकडण्यांत आल्यानंतर १५ आगस्टच्या सत्याग्रहाबद्दल एकूण २५ इसमांवर सरकारी मालमत्तेचा विध्वंस केल्याच्या आरोपावरून खटले भरण्यांत आले. त्यांत लड्डूशा फकीर, विश्वासराव, रामराव टाकोणे, सूर्यभान हरिजन, अमृतराव हरिजन, काशिराव हरिजन, जयदेव मानेकर व सिताराम तेली हे आठ आरोपी असे होते की, त्यांना १८ तारखेच्या खटल्यांतहि गोवण्यांत आलें होतें आणि १७ इसमांवर केवळ १५ ता० च्या घटनांबद्दल खटले भरण्यांत आले होते.

या सतरा जणांचीं नांवें पुढीलप्रमाणे आहेतः—(१) वीर पंजाबराव यावलीकर (२) अण्णासाहेब मडघे (३) सितारामजी राऊत (४)

राजाराम झिंगाजी कांडलकार (५) राजाराम गोपाळजी (६) नथूजी बारी (७) बाजीराव ढोक (८) नथूजी घोंगडे (९) मिर्झा बेग (१०) अमृतराव पहिलवान (११) राजारामजी पांचघरे (१२) पूर्णाजी हरिजन (१३) साहेबराव नागपुरे (१४) सदाशिवराव मडघे (१५) अण्णासाहेब पंढरपुरकर (१६) नथूजी कांडलकार (१७) विठोबा हरिजन.

हे खटले ॲडिशनल डि० मॅजिस्ट्रेट मि० अमानुल्ला यांच्यापुढे चालले. जे दहा सत्याग्रही १५ आगस्ट १९४२ ला आपणहून पोलीसच्या स्वाधीन झाले होते त्यांनी सर्व आरोप कबूल केले. सत्याग्रही या नात्याने काँग्रेसचा कार्यक्रम आपण अंमलांत आणला व त्याबद्दल होईल ती शिक्षा भोगण्यास आपण तयार आहोंत, असें सत्याग्रहीस शोभण्यासारखेंच तेजस्वी उत्तर त्यांनी कोर्टास दिलें. पण वाळल्याबरोबर ओलेंहि जाळण्यांत आलें. सर्वच आरोपींना पांच वर्षांपासून एक वर्षापर्यंतच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या.

वकिलांनी त्यांचेंहि अपील दोन कोर्टं वर चालविलें, पण आरोपींना आरोप मंजूर असल्याने अपिलांना कांही अर्थ उरत नव्हता. अर्थात् खालच्या कोर्टाच्या सर्व शिक्षा कायमच राहिल्या. १५ ता० च्या सत्याग्रहींचे खटले हा वस्तुतः भांडणाचा विषयच नव्हता. त्यांना जबरदस्त शिक्षा देण्याची सरकारला जिद्द होती एवढेच. सत्याग्रही वाटेल त्या शिक्षा बिनतक्रार भोगण्यास तयारच होते.

अजाबराव व विश्वासराव फरारी होते. त्यांच्या जमिनी हर्रासास निघाल्यानंतर ते आपणहून पोलीसच्या स्वाधीन झाले होते. त्या दोघांचाच खटला निराळा चालला. ॲ० डि० मॅ० मि० बंगाले यांनी अजाबराव यांना १८ आगस्टच्या दंगलींत भाग घेतल्याबद्दल चार वर्षे सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. परंतु विश्वासराव यांना १५ ता० चा सत्याग्रह व १८ ता०ची दंगल या दोन्हींत गोवण्यांत आलें व त्यांना सत्याग्रहाबद्दल चार वर्षे सहा महिने व दंगलींत भाग घेतल्याबद्दल चार वर्षे अशी दुहेरी शिक्षा फर्मावण्यांत आली. पुढे त्या दोघांचेंहि अपील इतरांच्या बरोबरच चाललें.

यावली खटल्याचे अविश्रांत साह्यकर्ते



ॲडव्होकेट राजाभाऊ गोखले



ॲडव्होकेट, आबासाहेब सुधोळकर

निःस्वार्थी साह्यकर्ते



श्री. भीमराव ब्राम्हणवाडेकर



श्री. मारोतराव कुंडकर



श्री. अण्णासाहेब हिवरेकर

वीर पंजाबराव यांस कोणी जवळचा नातलग नाही असें म्हणून त्यांची सर्व शेती व मालमत्ता सरकारने जप्त केली होती व आनंद आकाजी पाटील यास रिसीव्हर नेमून ती त्याच्या स्वाधीन केली होती. ही इस्टेट त्याच्या ताब्यांत असेपर्यंत त्याने पुष्कळच मलई खाल्ली. परंतु कुंडचे श्री० मारोतराव पाटील यांनी ती इस्टेट आपल्या ताब्यांत मिळावी म्हणून मि० अमानुल्ला ॲ० डि० मॅ० यांचेकडे अर्ज केला. श्री० मारोतराव पाटील व वीर पंजाबराव यांचे अतिभाऊ भीमराव माधवराव ब्राम्हणवाडेकर यांचे संबंध ध्यानांत घेऊन मि० अमानुल्ला यांनी वरील इस्टेट त्यांच्या ताब्यांत मिळावी असा हुकूम दिला. पाटील आनंद आकाजी एवढ्यावर तावा देईना. तेव्हा मारोतराव यांनी पोलीसची मदत घेतली व इस्टेटीचा ताबा मिळविला.

या ठिकाणीं श्री० मारोतराव पाटील, भीमराव व आणखी कांही कार्यकर्ते यांच्याबद्दल दोन शब्द लिहिणें जरूर आहे. ज्यावेळीं सर्व गांव हवालदील झाला होता आणि ता० १९-८-४२ ला फौजी आक्रमण गांवावर येणार म्हणून सामुदायिक निर्वासन करण्यांत येत होतें, त्यावेळीं अब्बासभाई, अवदुल्ला व शिवमंगलसिंह यांच्या आग्रहावरून विश्वासराव यांनीहि भूमिगत होण्याचें ठरविलें; परंतु त्यांचें मन गांव अनाथ टाकून निघून जाण्यासाठी धजेना. तीच स्थिति अजाबराव यांचीहि होती. त्यावेळीं अब्बासभाई यांनी त्यांना पुन्हा सांगितलें की, " तुम्ही गांवांत राहणें धोक्यांचें आहे. तुमचा जो घरच्या इस्टेटीचा कारभार आहे तो आम्ही सांभाळूं, पण तुम्ही गांव सोडलेंच पाहिजे. मी तुम्हांला यापुढे तुमच्या घरीं वापस जाऊं देणार नाही. तुम्हांला जर कांही सांगावयाचें असेल तर तें मला सांगा. मी तें पूर्ण करीन. तुमच्याबरोबर शिवमंगलसिंह ठाकूर व अबदूल रहिम यांनाहि न्या, म्हणजे तुम्हाला कोणत्याच गोष्टीचा त्रास होणार नाही " याप्रमाणे निवेदन करून विश्वासराव आपल्या वक्तव्यांत पुढे म्हणतात—" निघण्यापूर्वी मी अब्बासभाई यांच्यावर, माझ्यावर असलेली सर्व जबाबदारी सोपवून दिली. त्यांना मीं सांगितलें की, प्रथम तुम्ही आमच्या घरीं जा. घरासमोर असलेल्या गोळया लागलेल्या लोकांना

अमरावतीला नेण्याची व्यवस्था लावा. त्याकरिता बैलगाड्या तयार ठेवल्या आहेत. निदान त्यांच्यासाठी डॉक्टर घेऊन या. आमच्या जमिनीची, बैल, गाई, म्हशी या गुरांची जोपासना करा व जखमी व पीडित लोकांच्या खाण्याची व्यवस्था करा व त्यांची काळजी वहा."[१०]

निर्वासनप्रकरणांत देण्यासारखा विश्वासराव यांच्या वक्तव्यांतील हा उतारा येथे देण्याचें कारण इतकेंच की, लढाई लढत असतांना अथवा निर्वासन करीत असतांना कांही प्रामाणिक व विश्वासु कार्यकर्ते मुद्दाम मागे राहिले होते. लढवय्यांच्या अथवा तुरुंगांत जाणारांच्या यादींत त्यांचीं नांवें अर्थात् येण्यासारखीं नाहीत. पण त्यामुळे त्यांनी केलेल्या सेवेचें मूल्य कमी होऊं शकत नाही. किंबहुना, मारोतराव पाटील, अब्बासभाई व रामकिसनजी उर्फ बाबूशेठ यांच्यासारखे जे कार्यकर्ते बुद्धया पाठीमागे राहिले, पण ज्यांनी यावलीच्या विपन्न स्थितींत तिची सेवा केली, तिला धीर दिला व तिचें स्वातंत्र्यप्रेम कायम राखलें. त्यांच्या मूक सेवेचें मूल्य लढवय्यांच्या पराक्रमापेक्षा कमी गणतां येणार नाही. विदूर पांडवांबरोबर कौरवांच्याविरुद्ध लढला नाही, पण पांडव वनवासांत व अज्ञातवासांत असतांना त्याने पांडवांची माता कुंती हिचा जो प्रतिपाळ केला व भारतीय आख्यानांत तो जितका प्रशंसेस पात्र झाला, तितक्याच दर्जाचें काम मारोतराव पाटील, अब्बासभाई, भीमराव, रामकिसनजी उर्फ बाबूशेठ, नानासाहेब मंगरुळकर इ० कार्यकर्त्यांनी यावलीच्या वीरांच्या अज्ञातवासांत करून दाखविलें व तितक्याच प्रशंसेस तेहि पात्र झाले.

जखमी लोकांचे उपचार करणें, निराश्रितांना साह्य करणें, भूमिगतांची माहिती ठेवून त्यांच्या गरजांचें निवारण करणें, कोर्टातील भांडणें लढत राहणें, वकिलांना सर्व तऱ्हेची माहिती व मदत उपलब्ध करून देणें आणि वीर पंजाबरावच्या इस्टेटीचें भांडण लढणें इ० प्रकारचीं सर्व कामें या मंडळींनी केलीं. मारोतराव पाटील कुंडकर यांनी पंजाबराव यांची अनन्य मैत्री निभविली. कोर्ट कचेऱ्यांतील भांडणासाठी स्वतःची सर्व इस्टेट फुकून देण्यास ते तयार झालें. 'माझें सर्वस्व बरबाद झालें तरी चालेल, पण यावलीचा लढा तीनहि कोर्टांतून लढला गेलाच पाहिजे.' असा त्यांचा आग्रह होता व तो त्यांनी

शेवटास नेऊनच दाखविला. यावलीस गोळीबार झाला हें समजल्यावर मारोतराव पाटील व मारोतराव ढोबळे एका लॉरींत डॉक्टरला घेऊन माहोलीस आले पण ब्रि० लष्कर गांवांत आहे हें समजल्यावर ते वापस गेले. पंजाबराव यांच्या इस्टेटीवर कर्ज होतें. रिसीव्हर आनंद आकाजी याच्या ताब्यांतून सोडवून मारोतराव व भीमराव यांनी ती आपल्या ताब्यांत घेतली, तेव्हां तर तिची अधिकच धुळधाण उडालेली होती. गुरेंढोरें लिलाव झालीं होतीं. उभें पीकहि कापून नेण्यास दुष्ट आनंद आकाजी यानें कमी केलें नव्हतें. परंतु मारोतराव व भीमराव यांनी ती ताब्यांत घेतली व त्यांनी तिची मशागत केली. इतक्या आत्मीयतेने व चोख रीतीने त्यांनी ती सांभाळली की, पंजाबराव सुटून येण्यापूर्वीच त्यांचें सर्व कर्ज फिटलेलें होतें. कर्जाच्या निकालाचें सर्व श्रेय मंगरूळकर नानासाहेब यांनाच आहे. गुरेंढोरें नांदूं लागलीं होतीं व शेतें पिकांनी डुलूं लागलीं होतीं. मैत्रीचा हा नमुना खरोखर अनन्यसाधारण नव्हे काय? किती ठिकाणीं तो सांपडूं शकेल? तसेंच श्री. रामकिसनजी अंबादासजी उर्फ बाबूशेट यांच्या व त्यांच्या मातोश्रींच्या साह्याचाहि कृतज्ञतापूर्वक निर्देश करणें अवश्य आहे. ता. १९-८-४२ ला यावलींत शिल्लक राहिलेल्या सर्व लोकांना त्यांनी शिधासामुग्री दिली. जखमी लोकांना वैद्यकीय साह्य मिळविण्यासाठी रोख रकमेची मदत केली आणि पंजाबराव सुटून येईपर्यंत आणखी ज्या ज्या तऱ्हेने शक्य होईल त्या त्या सर्व तऱ्हांनी निराश्रितांना साह्य केलें. एवढे निःस्वार्थ व जिव्हाळ्याचे कार्यकर्ते यावलीस होते. म्हणूनच तिचें नांव प्रारंभापासून अखेरपर्यंत उज्ज्वल राहिलें. तिला खाली मान घालण्याचा प्रसंग आला नाही व प्रचंड ब्रि० साम्राज्यशाहीशीं झुंज देण्यांत ती यशस्वी झाली.

आता अमरावतीच्या व नागपूरच्या वकील मंडळीबद्दलहि दोन शब्द या ठिकाणीं लिहिणें अत्यावश्यक आहे. यावलीचा खटला तीन तीन कोर्टांत लढला गेला, पण एकाहि अवस्थेंत वकीलांनी पैसा घेतला नाही. पांडे; गोखले; ब्रम्ह, पी. वाय. देशपांडे, मुधोळकर, घाटे व कन्हयालालजी मुनशी इतक्या कायदेपंडितांनी या खटल्यांत विनामूल्य काम केलें. स्वातंत्र्याच्या लढ्याचा एक भाग या बुद्धीनेच ते लढले. कायद्यांचा कीस तर त्यांनी काढलाच पण बड्या सरकारी अधिकाऱ्यांची कोणतीहि भीडमूर्वत व

भय न बाळगतां त्यांनी त्यांच्या अपकृत्यांचें स्वरूप व यावलीच्या प्रतिकाराची तेजस्विता इतक्या ओजस्वी रीतीनें प्रकट केली की, न्यायाधीशांनाहि माना डोलाव्या लागल्या.

विशेषतः ॲड० ना० त्र्यं० पांडे व राजाभाऊ गोखले यांनी सहा महिनेपर्यंत सर्व उद्योगधंदा व कामकाज सोडून दिलें व अनन्यभावानें ते खटल्याची तयारी करीत राहिले. या त्यांच्या देशसेवेच्या कालांत ॲड० पांडे यांचे मित्र ॲड० वि० दा० ब्रम्ह यांनी त्यांना कोणतीहि घरगुती काळजी भासूं दिली नाही. तसेंच ॲड० राजाभाऊ गोखले यांचे चुलते ॲड० काकासाहेब गोखले यांनी पुतण्याचा सर्व भार सांभाळला. हे दोघेहि तरुण दिवसचे दिवसच काय, पण महिनेच्या महिने तुरुंगांत राहिले. आरोपींची बाजू त्यांनी पूर्णपणें समजून घेतली. आरोपींच्या दमदारपणाची व हिंमतबाजीची कणखरता पाहून त्यांचीहि हिंमत द्विगुणित होत गेली. त्यांनी नागपूर अमरावतीच्या तर कित्येक वाऱ्या केल्या असतील. पण सेवाग्राम व मुंबईच्याहि वाऱ्या केल्या. अतिशय मन लावून व अंगमेहनत करून त्यांनी कष्ट केले. या दोन तरुण वकिलांनीच खरें म्हटल्यास यावलीचा लढा अखेरपर्यंत लढविला. कागदपत्रें तयार करून देण्याच्या कामीं त्यांना श्री० वसंतराव केतकर व श्री० बाबुराव पांगारकर या दोन तरुण वकिलांनी मदत केली. बाररूमने आपल्या सदस्यांतून वर्गणी करून त्यांचा सर्व तांगाखर्च व प्रवासखर्च दिला. सर्वांचा जिव्हाळा या खटल्यांत गुंतला होता.

या ठिकाणीं सरकारी वकिलांचाहि निर्देश करणें अवश्य आहे. रावबहादूर संरजामे हे पब्लिक प्रासिक्युटर होते व रावबहादूर शिदोरे हे त्यांचे सहाय्यक होते. वरिष्ठ कोर्टांत ॲडव्होकेट जनरल खान बहादूर हिदायत उल्ला यांनी सरकार पक्षाचें काम चालविलें. डि० मॅ० मेल्ड्रम यांनी बसविलेला सामुदायिक दंड बेकायदा होता हें सरकारच्या तर्फे हायकोर्टांत त्यांनीच कबूल केलें. सरकारी वकिलांनीहि आरोपींच्या वकिलांशी सहानुभूतीचें वर्तन ठेवलें होतें हें नमूद करणें अवश्य आहे.

याशिवाय आणखी एका निःस्वार्थ कार्यकर्त्याचा निर्देश करणें अवश्य आहे. हा कार्यकर्ता म्ह० कॉंग्रेसच्या अज्ञातवासांत ज्यांनी अमरावतीला कॉंग्रेस कार्याची धुरा सांभाळली ते श्री० देवकिसनजी झंवर अमरावतीकर हे होत. कॉंग्रेसचीं सर्वसाधारण कामें तर त्यांनीं सांभाळलींच, चळवळीची ज्योत जळती ठेवण्याचाहि त्यांनी सर्वतोपरीने प्रयत्न केला, पण यावलीच्या खटल्यांत त्यांनी अतिशय जिव्हाळ्याने मदत केली. अडीअडचणीला लागणारी द्रव्याची मदत त्यांच्याकडूनच मिळत गेली. प्रारंभापासून अखेरपर्यंत यावलीच्या खटल्याशीं तेहि तादात्म्य झाले आणि आपल्या सामर्थ्यानुसार त्यांनी त्यांत हातभार लावला. तसेंच अमरावतीचे श्री० रघुनाथमलजी कोचर एम्. एल्. ए. यांनीहि स्वतः तुरुंगांतून सुटून आल्यावर यावलीच्या निराश्रितांना अतिशय मदत केली व कित्येकांचीं घरेंहि बांधून दिलीं.

भूमिगत कार्यकर्त्यांना इतक्या अनेक ठिकाणच्या व अनेकविध लोकांची मदत झाली की, विस्तारभयास्तव त्या सर्वांचा नामनिर्देश करणें अशक्य असलें, तरी त्यांच्या आत्मीय साह्याची नोंद करणें अवश्य आहे.

प्रकरण ८ वें

न्यायमूर्तींचीं निकाल-पत्रें

वस्तुतः हीं निकाल-पत्रें परिशिष्टांत द्यावयास पाहिजेत परंतु प्रस्तुत प्रकर्णीं त्यांचें महत्व लक्षांत घेतां आणि त्यांत ग्रथित झालेल्या विचारसंपदेचें मूल्य ध्यानांत आणतां, त्यांना प्रकरण रूपाने मूळ ग्रंथाचाच अंगभूत भाग बनविणें अधिक इष्ट होईल. न्या० मू० बोस यांचें संदर्भपत्र पांचव्या प्रकरणांत दिलेलें आहे. प्रस्तुत प्रकरणांत न्या० मू० नियोगी, न्या० मू० पुराणिक व न्या० मू० ग्रिल यांचीं निकालपत्रें देण्यांत येत आहेत. हिंदी स्वातंत्र्याच्या इतिहासवाङ्मयांत या निकाल पत्रांना अतिशय महत्त्वाचें व मानाचें स्थान मिळण्यासारखें आहे.

न्यायमूर्ति नियोगी यांचें निकाल-पत्रकः—

"मुख्य घटनांच्याविषयी वाद नाही. त्या घटना अशा—डि० मॅ० व डि० सुप० ऑफ पोलीस यांच्यावर काठ्यांनी हल्ला करण्यांत आला व पोलीस पार्टीवर दगडफेक करण्यांत आली आणि गोळीबार करण्यांत आला. वादाचे जे मुख्य मुद्दे आहेत, ते असे की, डि० मॅ० व त्याची टोळी यांचा यावलीला जाण्यांत हेतु कोणता होता ? तसेंच गांधी–चौकांत जमलेल्या लोकांचाहि हेतु कोणता होता ? आणि कोणत्या मूळ घटनेमुळे डि० मॅ० व डि० सुप० ऑफ पोलीस यांच्यावरहि हल्ला झाला ?

"डि० मॅ० व त्याच्या बरोबरीची सशस्त्र पोलीस टोळी यांचा यावलीला जाण्याचा उद्देश काय ? आरोप–पत्रकांत म्हटल्याप्रमाणे हा उद्देश 'रेव्हेन्यू अधिकारी व खेड्यांतील लोक यांच्यांत चांगले संबंध प्रस्थापित करणें' हा होता. उलट, आरोपींनी आपल्या वकिलामार्फत एक मुखाने असें सांगितलें की, त्यांचा उद्देश सामुदायिक दंड वसूल करणे हा होता.

"शांतता प्रस्थापित करण्यासाठीं जिल्ह्यांतील खेडे-विभागांत पोलीसच्या टोळ्या घेऊन डि० मॅ० फिरत होता, ही गोष्ट खरी आहे. पण प्रस्तुत खटल्यांतील मुख्य प्रश्न असा आहे की, डि० मॅ० त्या विशिष्ट दिवशीं जो यावलीस गेला तो फक्त राज्यव्यवस्था कायम ठेवण्यासाठींच गेला होता काय? अथवा त्याच दिवशीं सामुदायिक दंडाची वसुली सुलभ व्हावी म्हणून खेड्यांतील लोकांना भीतिग्रस्त करणें व धाकदपटशा दाखविणें यासाठी गेला होता? **सामुदायिक दंड बसविणें हें बेकायदा होतें, ही गोष्ट सरकारतर्फें मान्यच करण्यांत आली आहे आणि म्हणूनच या प्रकरणाशीं निगडित असलेले सरकारी अधिकारी या मुद्यावर सरळ कबुली देतील अशी अपेक्षा बाळगणें अशक्य आहे.** अर्थात् सरकारी साक्षीदारांनी जीं निरनिराळीं वक्तव्यें केलीं आहेत त्यांतील सुसंगतपणा शोधून त्यांतून सत्यान्वेषण करणें भाग आहे.

"सरकारी साक्षीदार नं० ७ रे० इन्स्पेक्टर म्हणतो की, ता० १६-८-१९४२ रोजीं पांच कॉन्स्टेबल्स व एक हेड कॉन्स्टेबल यांची तुकडी बरोबर घेऊन २००० रु० सामुदायिक दंड वसूल करण्यासाठी आपण यावलीस गेलों होतों, आणि आपण रामकिसन अंबादास याजजवळून ५०० रु० व रामराव टाकोने याजजवळून २०० रु० मागितले त्यावेळीं रे० इन्स्पेक्टरच्याबरोबर जागल्या (साक्षीदार नं० २), पाटील (साक्षीदार नं० ५), पटवारी (साक्षीदार नं० १६), व इतर कांही महारहि होते. जागल्याने (साक्षीदार नं० २) म्हटल्याप्रमाणे एका कॉन्स्टेबलजवळ बंदूक होती हेंहि ध्यानांत ठेवावयास पाहिजे. आता, **सामुदायिक दंडाची ही मागणी सर्वस्वी बेकायदा होती आणि ज्यांना तो मागण्यांत आला होता त्यांना, कायद्याप्रमाणे दंड देण्याचा इन्कार करणें, इतकेंच नव्हे तर त्याच्या वसुलीचा प्रतिकार करणें याचा पूर्ण हक्क होता.**

"डि० मॅजिस्ट्रेट (साक्षीदार नं. १७) म्हणतो—'सरकारकडून मला मिळालेल्या सूचनांच्या अनुसार ता. १६-८-४२ रोजीं मी सामुदायिक दंड बसवूं शकत होतों. म्हणून मीं त्या अधिकारान्वयें रेव्हेन्यू इ० याला २००० रु०

सामुदायिक दंड बसवून वसूल करण्याची आज्ञा दिली होती.' तेव्हा, डि० मॅ० च्या आदेशानुसार रे० इ० वागत होता हें स्पष्ट आहे. ज्या लोकांकडे रे० इ० गेला होता त्यांच्याजवळूनच दंडाची रक्कम मागावी अशी प्रत्यक्ष सूचना त्याला मिळाली होती काय? हा प्रश्न येथे गैरलागूं आहे. तसा हुकूम त्याला तहसिलदाकडूनहि कदाचित् मिळाला असेल. अर्थात्, **विशिष्ट माणसाकडून ठराविक रकमांची मागणी करणें हें रे० इ० चें कृत्य कायद्याच्या विरुद्ध होतें यांत शंकाच नाही.**

"परंतु रे० इ० चा हा प्रयत्न विफल झाल्यानंतर त्याने ती गोष्ट डि० मॅ० ला सांगितली. या मुद्यावर डि० मॅ० म्हणतो—'यावली येथे घडलेल्या घटना जेव्हा ता० १६–८–४२ रोजीं रे० इ० ने मला सांगितल्या तेव्हा मीं त्याला म्हणालों की, परिस्थितीप्रमाणे शक्य तितक्या लौकर आमच्या अधिकारांत असेल ती सर्व मदत आम्ही तुला करूं' असें म्हणून डि० मॅजिस्ट्रेट पुढे म्हणतो—'१८–८–४२ रोजीं यावलीला जाण्यांत आमचा उद्देश दंड वसूल करण्याचा नव्हता, तर मुख्यत्वेंकरून दंड–वसुलीचा मार्ग सुलभ करून ठेवावा हा होता.' यानंतर प्रश्न असा उत्पन्न होतो की, त्याच दिवशीं दंड वसूल करण्याचा त्यांचा हेतु होता काय? या मुद्यावर इतर साक्षीदारांनी दिलेली कबुली विशेष महत्वाची आहे.

"सार्जंट क्वीन (साक्षीदार नं० १०) म्हणतो.—'यावली गांवावर बसविण्यांत आलेला सामुदायिक दंड वसूल करणें हाच तेथे जाण्यांत आमचा उद्देश होता. १८ तारखेलाच मला या कामासाठी बोलाविण्यांत आलें. त्या दिवशीं सकाळीं डी० एस्० पी० आला व त्याने मला सिटी कोतवालीमधून आपल्या बरोबर घेतलें.' परंतु पुढे आपला उद्देश लपविण्याचा प्रयत्न करण्यासाठी तो म्हणतो.—"सरकारी अधिकाऱ्यांविषयीं वचक उत्पन्न करण्याच्या उद्देशामागे सामुदायिक दंड वसूल करणें सुलभ जावें ही कल्पना होती किंवा नाही; हें मला माहित नाहीं.' पण लगेच पुन्हा तो कबूल करतोः—डि० मॅजिस्ट्रेट व डी० एस० पी० यांचें जें संभाषण मीं उमरावती व माहोली या दोन्ही ठिकाणीं ऐकलें त्यावरून माझा असा समज झाला की, दंड वसूल करण्यासाठीच आपण यावलीस

जात आहोंत.' तो आणखी असेंहि म्हणाला यांत शंका नाहीं की, आपण यावलीस कशाकरिता जात आहोंत हें त्या दोघांपैकी कोणींहि मला सांगितलें नव्हतें;' पण या त्याच्या म्हणण्याला कांही महत्व नाही.

"माहोली पोलीस स्टेशनचा अधिकारी सब् इन्स्पेक्टर (साक्षीदार नं० ११) हा त्या (१८-८-४२ रोजींच्या) बिकट प्रसंगीं डि० मॅजिस्ट्रेटच्या बरोबर होता. तो म्हणतो.--'अशा तऱ्हेचीं (प्रतिकाराचीं) कृत्यें करण्यांत भाग घेणें चांगलें नाही हें लोकांना समजून सांगण्याकरिता आणि शक्य झाल्यास सामुदायिक दंड वसूल करण्याकरिता आम्ही यावलीस जाण्यास निघालों होतों.' एका जखमी माणसाची परीक्षा करण्यासाठी पाठविलेल्या मागणीपत्रांत त्याने असें म्हटलें आहे की, '१८-८-४२ रोजीं यावलीस जाण्यांत डि० मॅजिस्ट्रेटचा हेतु दडं वसूल करणें हा होता.' हें असें कां म्हटलें याविषयीं खुलासा विचारला असता तो म्हणाला की, '१६-८-४२ रोजीं रे० इ० व पोलीस यांना दंड वसुलीसाठी यावलीस पाठविण्यांत आलें होतें आणि पुन्हा १८-८-४२ रोजीं तोच रे० इ० व नायब तहसीलदार हे डि० मॅ० यांच्याबरोबर होते. यामुळे डि० मॅ० व त्याची टोळी दंड वसुलीसाठींच यावलीस गेली असें अनुमान मीं काढलें आणि म्हणून माझा तसा समज मीं सदर्हु पत्रांत लिहिला.' डि० मॅ० व डि० सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी जें मागणी-पत्र पाठविण्यांत आलें होतें त्यांत सुद्धा यावलीस जाण्यांतला उद्देश दंडाची वसुली करणें हा होता, असेंच म्हटलें आहे.

"वरील वक्तव्यावरून एकच अप्रतिरुद्ध अनुमान निघूं शकतें व तें असें की, त्याच दिवशीं सामुदायिक दंड वसूल करण्यासाठी डि० मॅ० ने यावलीस भेट दिली. हाच त्याचा उघड उघड व मुख्य हेतु होता."

"(आता दुसरा प्रश्न) गांधी-चौकांत जमा होण्यामध्ये खेड्यांतील लोकांचा हेतु काय होता? या बाबतींत ज्या महत्त्वाच्या गोष्टी विचारांत घेणें जरूर आहे, त्या अशा की, ता. १५-८-४२ रोजीं ज्या लोकांनी मोडतोडीचीं

कृत्यें केलीं होतीं त्यांना पोलीसने (१८-८-४२) पूर्वीच अटक केली होती असें पाटील (सा. नं. ५) याने सांगितलें आहे. जागल्या (सा. नं. २) व पाटील (सा. नं. ५) यांच्या जबान्यांवरून आणखी हेंहि स्पष्ट झालें आहे की, १६ व १७ ऑगस्टला कोणतींहि वाईट कृत्यें घडलेलीं नव्हतीं. तथापि या दोन्ही दिवशीं गांवकऱ्यांनी सभा केल्या होत्या आणि सामुदायिक दंड द्यावयाचा नाही असा निश्चय केला होता. त्यांनी जर असा निश्चय केला असेल तर सामुदायिक दंड बसवणें हेंच बेकायदा असल्यामुळे तो न देण्याचा निश्चय करण्याचें त्यांचें कृत्य पूर्णपणें न्याय्यच होतें. गांधी चौकांत जमा होण्यांत, आपण दंड देणार नाही हा आपला निश्चय जाहीर करण्याचाच जर त्यांचा हेतु असेल तर त्यांचा तो जमाव गैरकायदा होता असें म्हणतां येणार नाही. याचें कारण उघडच आहे की, दंड देण्याचा इन्कार करणें हें कायद्याला धरूनच होतें."

"बेकायदा रीतीने लादलेला दंड देण्याचें नाकारण्याचा अधिकार जसा प्रत्येक व्यक्तीला होता, तसाच सर्वांनी मिळून एकत्र जमून संयुक्त रीतीने आपण दंड देणार नाही हें जाहीर करण्याचाहि अधिकार त्यांना होताच. लॉ ऑफ कान्स्टीट्यूशन नामक पुस्तकांत पृष्ठ २७१ वर डायसीने म्हटल्याप्रमाणे व्यक्तीला जें व्यक्तिस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य आहे त्याविषयीं कोर्टांनीं जो दृष्टिकोन धारण केला आहे त्याहून जमाव करण्याचा अधिकार ही वेगळी बाब नाही; म्हणून एकत्र जमा होण्यांतलें गांवकऱ्यांचें कृत्य हें सर्वस्वी कायदेशीर व विधियुक्त (Constitutional) असेंच होतें. मॉंटेग्यू चेम्सफर्ड रिपोर्टांत (परिच्छेद १२५ पृष्ठ ८१)— 'लहान लहान लाचलुचपती व जोरजुलूम' यांचा निर्देश करतांना असें म्हटलें आहे की—'लोक सहसा तक्रारी करीत नाहीत आणि प्रतिकाराची तकलिफ करण्यापेक्षा मुकाट्याने जुलूम सहन करणेंच ते पसंत करतात.·········पण या बाबतींत सार्वत्रिक लोकमताच्या जागृतीशिवाय सर्व साधारण सुधारणा होणार नाहीत.' बेकायदा बसविण्यांत आलेल्या सामुदायिक दंडाचा त्या त्या व्यक्तींनी

प्रतिकार करणें आणि त्याच्या विरुद्ध लोकमत खडें करणें,—जसें गांधी चौकांतल्या जमावाने करून दाखविलें,—हें वरील उद्‌गारांतील शब्द व तात्पर्यार्थ ह्या दोन्हींशीं पूर्णपणे सुसंगतच होतें."

"या नंतरचा प्रश्न असा आहे की, दंगलीला सुरुवात कोठून झाली? भडक्याचें मूळ कारण काय? या दंगलींत एका बाजूला डि॰ मॅ॰ व त्याची टोळी यांना झालेल्या जखमा आहेत, तर दुसऱ्या बाजूला गांवकऱ्यांपैकी ५ मेले, १७ इसमांना गोळ्या लागून जखमा झाल्या व इतर रीतीने जखमा झाल्या. साक्षी-पुराव्यावरून हें स्पष्ट दिसतें की, १६ तारखेला गैर कायदा बसविलेला दंड वसूल करण्याचा रे॰ इ॰ चा प्रयत्न विफल झाल्यानंतर लवकरच डि॰ मॅ॰ यावलीस भेट देईल अशी अपेक्षा होतीच. १८ तारखेलाच तो येणार आहे या विषयीं गांवकऱ्यांना निश्चित माहिती होती किंवा नाही हा महत्वाचा मुद्दा नाही. कारण १६ तारखेनंतर कोणत्याहि दिवशीं तो येईल अशी त्यांची अपेक्षा होती. जेव्हा केव्हा डि॰ मॅ॰ व त्याची टोळी येईल, तेव्हा गांवकऱ्यांना एकत्र जमवितां यावें या हेतूनेच घंट्या वाजविण्याची योजना करण्यांत आली होती. अशा पद्धतीने गांवकऱ्यांना एकत्र बोलाविलें, एवढ्यानेच केवळ सरकारी दलावर हल्ला करण्याचा त्यांचा मनोदय होता हें सिद्ध होऊं शकत नाही. चौकांत जमा झालेल्या लोकांची संख्या किती होती याविषयीं निरनिराळ्या साक्षीदारांनी निरनिराळे अंदाज दिले आहेत. कित्येकांच्या मतें ही संख्या शंभर दीडशे होती. तर कित्येकांच्या मतें ५०० ते ७०० होती. सार्जंट क्वीन (सा॰ नं॰ १०) याच्या मतें सुमारें शंभर लोक जमले असावेत. (वस्तुतः) **ज्या वेळीं हे लोक चवताळले तो क्षण जितका महत्त्वाचा आहे तितकें महत्व त्यांच्या संख्येला नाही.** डि॰ मॅ॰ व त्याची टोळी यांनी गांवांतून गांधी चौकापर्यंत जी चाल केली तिचा मागोवा घेतला असतां, लोकांच्या चवताळण्याचा क्षण स्पष्ट होणार आहे. (या बाबतींत) डि॰ मॅ॰ (सा॰ नं॰ १७) म्हणतो की, मैदान ओलांडल्यावर पोलीस दल कवायती पद्धतीने सज्ज झालें. ही मंडळी जेव्हा पाटलाच्या घराजवळ आली, तेव्हा त्यांना लोकांचा एक छोटासा जमाव दिसून आला. या जमावाची पांगापांग करण्यासाठी पोलीस दलाने जी जोराची चाल (Rapid advance) केली तिचें, डि॰ मॅ॰ चे वरील उद्गार म्हणजे

कांहींसें काव्यमय वर्णन (somewhat picturesque description) होय. अशा रीतीने दबाव पडतांच लोक गांधी–चौकाकडे जाणाऱ्या गल्लीकडे गेले. त्यांतला एकहि गांवकरी परत फिरला नाही व त्याने डि० मॅ० व त्याची टोळी यांच्यावर हल्ला करण्याचा दम भरला नाही, हें विशेषेंकरून ध्यानांत ठेवावयास पाहिजे. तसेंच गांधी–चौकांत गांवकरी जमा झाले होते एवढ्यावरूनच केवळ ते हल्ला करण्याच्या मनोवृत्तींत होते असें सूचित करण्यासारखेंहि कांहीं घडलें नाही. कोणताहि अपघात (incident) न होतां डि० मॅ० व त्याची टोळी गांधी–चौकांत पोहचूं शकली. पण ते जेव्हा एका विशिष्ट ठिकाणीं आले, तेव्हाच भांडण सुरू झालें व आगीची ठिणगी पडली.

"नक्की ज्या ठिकाणीं मारामारी सुरू झाली तें ठिकाण आणि जेव्हा गोळीबार सुरू करण्यांत आला ती वेळ व स्थान हीच या खटल्यांतील निर्णायक निदर्शकें (Crucial Points) होत. गांधी चौक हा गांवाच्या उत्तरेस आहे. चौकाच्या दक्षिणेकडे असलेल्या गल्लींतून चौकांत जातां येते. या गल्लीकडे तोंड असलेलें एक देऊळ आहे. या देवळाच्या वायव्येस शाळा आहे. या शाळेला बाहेरचें कुंपण असून त्याला गांधी चौकाकडे तोंड असलेला दरवाजा आहे. या दरवाजाच्या जवळच बारा फूट उंचीचा एक स्तंभ आहे व त्यावर एक ध्वज उभारलेला आहे. ही जागा नकाशांत P या खुणेने दाखविली आहे व ती गल्लीपासून दूर आहे. गल्लीच्या तोंडापासून ती सुमारें ६५ फूट दूर असावी. ज्या जागेवरून गोळीबार सुरू झाला त्या ठिकाणीं नकाशांत तारकाचिन्ह केलेलें असून तें गल्लीच्या मुखापासून सुमारें ३० फूट आंत आहे.

दोन्ही पक्षांत झगड्याची पहिली ठिणगी कशी पडली याविषयी दोन मतें आहेत. फिर्यादीचें म्हणणें असें की, डि० मॅ० व त्याचें दल यांनी चौकांत प्रवेश केला न केला तोंच दगडफेकीला प्रारंभ झाला व डि० मॅ० व डी० एस्० पी० यांच्यावर हल्ला करण्यांत आला. याच्या उलट, आपण गांधी चौकांत हजर होतों अशी कबूली देणाऱ्या कांही आरोपींचें म्हणणें असें आहे की, सरकारी दलाने प्रथम लाठी हल्ला सुरू केला व झेंडा काढून नेण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीच्या साक्षीदारांचें, सरकारी दल गांधी चौकांत येतांच जमावाने दगडफेक

करण्यास प्रारंभ केला, असें म्हणणें आहे यांत शंका नाही. पण उलट तपासणींत बाहेर आलेल्या हकीकतीवरून असें दिसतें की, डि० मॅ० व डी० एस्० पी० यांच्यावर हल्ला झाल्यानंतर दगडफेक सुरू झाली.

"जागल्या (सा. नं. २) म्हणतो.—'गांधी चौकांतील विहिरीजवळ जेव्हा आम्ही पोचलों तेव्हा जमावाने दगडफेकीस प्रारंभ केला, त्यापूर्वी नव्हे.' आणि आमची टोळी जेव्हा झेंड्याकडे चाल करूं लागली तेव्हा साहेबांवर हल्ला झाला.' पाटील (साक्षीदार नं. ५) म्हणतो.—'देवळाच्या वायव्येकडील कोपऱ्याच्या थोडेसें पुढे जेव्हा आमचें दल गेलें, तेव्हा जमावाने दगडफेकीस प्रारंभ केला.' रेव्हेन्यू इन्स्पेक्टर (सा. नं. ७) म्हणतो.—'दलाच्या अग्रभागीं डि० मॅ० होता. दल शाळेच्या इमारतीच्या दरवाजाजवळ गेलें. तत्काळ गांधी-चौकांत जमा झालेल्या लोकांनी आम्हाला दगड मारण्यास प्रारंभ केला.······· दगडफेक व डि० मॅ० व डी० एस्० पी० यांचेवरील (लोकांचा) लाठी हल्ला हीं एकदमच सुरू झालीं.' सार्जंट कीन (सा. नं. १०) म्हणतो—'आम्ही ज्या क्षणीं तेथे पोहचलों त्याक्षणींच आम्हांला घेरण्यांत आलें आणि दगड व लाठ्या यांचा मारा आमच्यावर सुरू झाला.······शाळेच्या आवाराच्या आग्नेयेकडील कोपऱ्यावर जमाव उभा होता.·········त्याच्या जवळपासच डि० मॅ० व डी० एस्० पी० यांना घेरण्यांत आलें.' सब इन्स्पेक्टर (सा. नं. ११) म्हणतो.—'बाकीच्या दलाच्या अग्रभागीं असलेलें डि० मॅ० व डी० एस्० पी० शाळेच्या आवाराच्या दरवाजापर्यंत गेले.······शाळेच्या दरवाज्याजवळ झेंडा होता.······ डि० मॅ० व डि० एस्० पी० हे झेंड्याच्या दोन कदम अंतरावर पूर्वेस होते.······ आम्ही गांधी चौकांत पोहचून शाळेच्या इमारतीच्या दरवाज्याजवळ जात नाही, तोंच जमावाने आमच्यावर एकदम हल्ला करण्यास प्रारंभ केला. शाळामास्तर (सा० नं० १५) याने एका साहेबाला झेंड्याजवळ पाहिलें. डि० मॅ० (सा० नं० १७) म्हणतो—'चौकाच्या दुसऱ्या टोकाजवळ जेव्हा मी होतों, तेव्हा एका बळकट जमावाने (Dense crowd) आपणांस घेरलें आहे असें मला आढळून आलें. माझ्यावर हल्ला करण्यांत येत होता.'

वरील वक्तव्यांवरून हें स्पष्ट होत आहे की, जेव्हा डि० मॅ० व त्याचें दल शाळेच्या दरवाज्याजवळ झेंडा होता त्या ठिकाणीं गेलें, तेव्हाच जमावाने प्रत्यक्ष

हालचाल केली (became Active) आपणांवर हल्ला होण्यापूर्वी लोकांनी दगड फेक केली असें डि० मॅ० सुद्धा म्हणत नाही, हें विशेषेकरून ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. सब इन्स्पेक्टरचा पुरावाहि हाच आशय व्यक्त करतो. डि० मॅ० व त्याचें दल गांधी–चौकाकडे जात असतांना पाठीमागून कोणींहि दगड मारले नाहीत, असेंच जागल्याचेंहि म्हणणें आहे. डि० मॅ० वर हल्ला होण्यापूर्वीच दगडफेक सुरू झाली होती ही गोष्ट दोन महत्त्वाच्या गोष्टींमुळे असिद्ध होत आहे. त्या म्हणजे, पोलीस अधिकाऱ्यांच्या शरिरावर ज्या ठिकाणीं जखमा झाल्या. तो भाग ही एक, आणि जेथून गोळीबार सुरू करण्यांत आला तें स्थळ ही दुसरी. पोलीसदलापैकी मार लागलेल्या अनेक इसमांतून तिघांची फिर्यादीतर्फे तपासणी करण्यांत आली. सार्जंट क्वीन, सब इन्स्पेक्टर व नायब तहसिलदार हे ते तीन इसम होत. (गांधी चौकांतून) माघार घेऊन गल्लींत जात असतांना विहिरीजवळ सार्जंट क्विन यास मार लागला. डि. मॅ. व डी. एस्. पी. यांची सुटका करीत असतांना सबइन्स्पेक्टरला मार बसला. नायब तहसिलदाराला, आपणांस कोणत्या ठिकाणीं (घटना स्थलाच्या) मार लागला हें सांगतां आलें नाही. त्याला फारच बारीक जखम झाली होती आणि म्हणूनच बहुधा मार लागण्याचें स्थळ ध्यानांत ठेवण्याची काळजी त्याने घेतली नसावी. पोलीस दलाने गल्लींत माघार घेतल्यावर तारकाचिन्हांकित (नकाशांतलि) स्थळापासून गोळीबार करण्यांत आला. वरील सर्व प्रमाणांवरून हेंच दिसून येतें की, शाळेच्या आवाराच्या दरवाजाजवळ डि० मॅ० व डी० एस० पी० जाऊन पोहचेपर्यंत जमावाकडून कोणत्याहि गंभीर स्वरूपाचा उपद्रव सुरू करण्यांत आला नव्हता. म्हणून या ठिकाणीं ज्या घटना घडल्या त्यांतच या खटल्यांतील खरी ग्यानवाची मेख साठलेली आहे.

"जागल्या म्हणतो की, जेथे झेंडा उभा आहे त्या ठिकाणीं डि० मॅ० ची टोळी पोहचल्याबरोबर दगडफेक सुरू झाली व ती चालू असतांनाच साहेबांपैकी एकाने ध्वजासुद्धा झेंडा धरला व तो स्वतःकडे ओढला. यानंतर काय घडलें इकडे आपलें लक्ष नव्हतें असें हा साक्षीदार म्हणतो, पण त्याच श्वासांत मोठा जोर देऊन त्याने असेंहि सांगण्याचा प्रयत्न केला की, साहेब लोकांवर हल्ला झाल्यानंतरच त्यांच्यापैकी एकाने झेंडा पकडला—'जेव्हा साहेबांपैकी एकाने

झेंडा पकडला तेव्हा एकाएकी लोक जमा झाले आणि त्यांनी लाठ्या व दगड यांच्या साह्याने साहेब लोकांवर हल्ला केला.'—ही पोलीससमोर दिलेली त्याचीच जबानी त्यास दाखविण्यांत आली, तेव्हा आपण आठवण विसरलों असें तो म्हणूं लागला. सार्जंट क्वीन म्हणतो की, गोळीबार करून जमावाची पांगापांग केल्यानंतर, डि० मॅ०, डी० एस्० पी० व आपण स्वतः कांही कान्स्टेबल्स बरोबर घेऊन गांधीचौकांत परत गेलों व काँग्रेसचा झेंडा काढून आणला. सब इन्स्पेक्टर, रे० इ०, जागल्या व पाटील यांनीहि हुबेहूब अशीच हकीकत सांगितली. पण डि० मॅ० च्या जबानींत त्यांच्या या हकीकतीला पाठिंबा मिळाला नाही. पाटील म्हणतो की, सरकारी दलाने चौकांत प्रवेश केल्याबरोबर लगेच लाठ्या व दगड यांचा हल्ला सुरू झाला आणि कांही लोकांनी डी० एस्० पी० व डि० मॅ० यांना पकडल्याचेंहि आपण पाहिलें.

—'त्यांच्यापैकी कोणींतरी, गांधी-चौकांत फडकत असलेला खादीचा तिरंगी झेंडा खाली ओढण्याचा प्रयत्न केला. पण दंगेखोर लोक मोठ्या त्वेषाने धावून आले व त्यांनी झेंडा हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला.'—ह्या त्याने पोलीससमोर केलेल्या विधानाकडे जेव्हा पाटलाचें लक्ष वेधण्यांत आलें, तेव्हा आपण हें विधान केलें होतें व तेंच बरोबर आहे असें त्यास कबूल करावें लागलें. त्याच्या तोंडांतून आणखी अशीहि कबूली मिळाली की, डी० एस्० पी० हा झेंड्याजवळ उभा होता आणि जेव्हा तो झेंड्याकडे गेला तेव्हाच त्याला लाठीचे कांही तडाखे बसले. नायब तहसीलदारानेंहि असेंच सांगितलें की, जमावाने डि० मॅ० व डी० एस्० पी० यांना घेरण्यापूर्वी झेंडा काढून घेण्याचा कोणताहि प्रयत्न करण्यांत आला नव्हता. पण पोलीससमोर त्याने जें विधान केलें व जें पोलीसच्या केस डायरींत नमूद आहे—आणि हें विधान पाटलाच्या विधानासारखेंच आहे—त्याच्याकडे जेव्हा त्याचें लक्ष वेधण्यांत आलें, तेव्हा आपण तसें विधान केलेंच नव्हतें असें तो म्हणूं लागला. पाटलासारखेंच विधान रेव्हिन्यू इन्स्पेक्टरनेंहि केलें होतें. पण त्यानेंहि पुढे तें नाकारलें. पण सर्कल इन्स्पेक्टर [सा० दा० नं० १३] याने या बाबतींतलें त्यांचें म्हणणें खोडून काढलें. त्यानेच त्यांच्या जबान्या लिहून घेतल्या होत्या. एका साक्षीदाराने दुसऱ्यासारखेंच सांगितलें असें जें त्याने लिहून घेतलें त्याचा अर्थ विचारला

असतां, सर्कल इन्स्पेक्टरने खुलासा केला की, पहिल्या साक्षीदाराने जें सांगितलें तेंच व तसेंच संपूर्णपणें दुसऱ्यानेहि सांगितलें. यावरून हें स्पष्ट दिसतें की, जागल्याने सांगितलेल्या हकीकतीसारखीच हकीकत नायब-तहसिलदार, रेव्हिन्यू इन्स्पेक्टर व पाटील यांनीहि [पोलीससमोर जबानी देतांना] सांगितली; पण कोर्टासमोर त्यांनी पलटी मारली-

"(सा० दा० नं० ७ च्या जबानीप्रमाणे) जमावाची पांगापांग झाल्यानंतर, झेंडा रेव्हिन्यूइन्स्पेक्टर याच्या हातीं असलेला प्रत्यक्ष दिसला. आरोपी नं० ३० राजाराम याने, सार्जंट क्वीन व इतरांना झेंडा घेऊन पाटलाच्या घराकडे जातांना पाहिलें. तेथेच डि० मॅ० बसलेला होता. ही घटना, झेंड्या जवळ झालेल्या पहिल्या मारामारीला असिद्ध करीत नसून उलट सिद्ध करीत आहे. पोलीस डायरीमध्ये नोंदण्यांत आलेल्या जबान्या हेंच दर्शवीत आहेत की, झेंडा खाली ओढण्याचा प्रयत्न करण्यांत आला आणि पाटलाने रहस्य स्फोट केलाच आहे (disclosed) की, डी० एस्० पी० झेंड्याजवळ उभा होता. यावरून असें अनुमान काढण्यास प्रबळ जागा आहे की, त्यानेच झेंडा खाली ओढण्याचा प्रयत्न केला. डी० एस्० पी० ला साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत फिर्यादीने बोलावलें नाही, ही घटना, झेंड्याबाबत फिर्यादीने जी कथा रचली तिच्या दुष्ट कारवाईवर प्रकाश टाकीत आहे, आणि अशा अनुमानास प्रोत्साहन देत आहे की, शपथ देऊन विचारलें असतें, तर डी० एस्० पी० नेंहि जागल्याच्या हकीकतीसच पाठिंबा दिला असता. फिर्यादीच्या साक्षीदारांनी, या घटनेला बगल देण्याचा अथवा त्याचे खुलासे देण्याचा जो प्रयत्न केला तो इतका उथळ आहे की, ध्यानांत आल्याविना राहात नाही. हा प्रयत्नच कल्पकताशून्य (disingenious) आहे आणि त्यामुळे, झेंड्याजवळ आल्याबरोबर अधिकाऱ्यांनी तो काढून घेण्याचा प्रयत्न केला हें आरोपींचें म्हणणें सत्य असल्याबद्दल भक्कम पाठिंबा मिळत आहे. आरोपी नं० ८ गोविंदा, नं० १० लक्ष्मण, नं० २१ सिताराम, नं० ४० मारोती, नं० ४१ गणपत व नं० ४४ तुळशीराम यांनी, कोर्टानी केलेल्या तपासणींत या घटनेचा निर्देश केला आहे.

"तेव्हा, पुराव्यावरून जें स्वाभाविक व संभाव्य अनुमान निघूं शकतें तें हेंच की, डिस्ट्रिक्ट सुप० ऑफ पोलीस याने झेंडा काढण्याचा प्रयत्न केला; पण त्याच्यावर व डि० मॅ० वर जो अकस्मात हल्ला झाला त्यामुळे हा प्रयत्न विफल झाला व त्याचा परिणाम असा झाला की, जमावाच्या दबावामुळे त्यांना पिछेहाट पत्करावी लागली. नैतिक विजय मिळविल्याची जी खुशी (sense) गांवकऱ्यांना झाली होती ती नष्ट करण्यासाठी झेंडा ध्वज-स्तंभावरून उपडून आणणेंहि आता त्यांच्या (सरकारी अधिकाऱ्यांच्या) इभ्रतीची गोष्ट (Point of honour) होऊन बसली. म्हणून थोड्या वेळाने शांतता प्रस्थापित झाल्यावर पोलीस अधिकारी पुन्हा चौकांत गेले व झेंडा काढून घेऊन परत आले.

"आता या खटल्यांत जे कायद्याचे मुद्दे निघत आहेत त्यांचा विचार करूं. हे मुद्दे दोन आहेतः—

(१) डी० मॅ० व डी० एस्० पी० हे बेकायदा सामुदायिक दंड बसविण्यास गेले असल्यामुळे त्यांच्यावर हल्ला करण्याचें जमावाचें अथवा त्यांतील विशिष्ट व्यक्तींचें तें कृत्य कायद्याने समर्थनीय ठरूं शकतें काय?

(२) डि० मॅ० व डी० एस्० पी० यांनी जेव्हा झेंडा काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा लाठ्या व दगड यांच्या साह्याने त्यांच्यावर बेछूट (indiscriminate) हल्ला करण्याचें त्यांचें कृत्य समर्थनीय आहे काय?

पहिल्या मुद्याबाबत बोलतांना क्वीन एम्प्रेसविरुद्ध तुळशीराम (I. L. R. B. Bom 168) आणि क्वीन एम्प्रेस विरुद्ध जोगेंद्रनाथ मुकर्जी (I. L. R. 24 Cal 321) यांच्या खटल्यांचीं प्रमाणें देण्यांत आलीं आहेत आणि असें सांगण्यांत आलें आहे की, ज्या अर्थी, डि० मॅ० व त्याची टोळी एका बेकायदा उद्दिष्टाच्या सिद्धीसाठी यावलीस गेलेली होती, त्या अर्थी चौकांत जमलेल्या गांवकऱ्यांना शारीरिक बळ वापरूनहि त्यांचा प्रतिकार करण्याचा हक्क होता. प्रस्तुत खटल्यांतील घटना ध्यानांत घेतां, उध्दृत केलेलीं प्रमाणें मोठींशी लागू होण्यासारखीं नाहीत. खेड्यांतील कोणाहिजवळून अथवा प्रत्येकाजवळून दंड वसूल करण्यासाठी डि० मॅ०

व त्याचें दल तेथे गेलेलें नव्हतें. डि० मॅ० व त्याची टोळी यांचा जमावच बेकायदा असें जरी गृहीत धरलें तरी, हिंसात्मक उपायांनी त्यांची पांगापांग करणें शक्य होतें काय ? आपण स्वतः अथवा आपली मालमत्ता यांच्या हक्कावर आक्रमण होण्याचें भय जोंपर्यंत प्रत्यक्ष निर्माण होत नाही, तोंपर्यंत कोण्याहि खाजगी व्यक्तीला हिंसेचा अवलंब करण्याचा अधिकार असूं शकत नाही. उध्दृत केलेल्या खटल्यावरून फक्त एवढाच सिद्धांत प्रस्थापित करतां येईल. त्यापेक्षा जास्त त्यापासून निष्पन्न होत नाही. रेव्हिन्यू इन्स्पेक्टरच्या आक्रमणाविरुद्ध आपला बचाव करतांना रामकिसन किंवा रामराव यांनी जर हीं प्रमाणें उध्दृत केलीं असतीं, तर तीं बरोबर लागू पडलीं असतीं. पण गांधी चौकांतील लोकांच्या बचावासाठी त्यांचा कांहीहि उपयोग नाही. कारण स्पष्ट आहे. त्यांच्यापासून (गांधी चौकांतील लोकांपासून) कोणतीहि (दंडाच्या) रकमेची जबरीने वसूली करण्यांत आलेली नव्हती.

" दुसऱ्या मुद्याबाबत **सिद्ध झालेल्या घटनांवरून हें मान्य करणें भाग आहे की, झेंडा खाली ओढण्याच्या प्रयत्नांचा प्रतिकार करण्याचा गांधी चौकांत जमलेल्या लोकांना हक होता**. झेंडा हा जप्त करण्यांत आलेला नव्हता अथवा तो चौकांत फडकविणें बेकायदाहि नव्हतें. जोंपर्यंत, डि० मॅ० व त्याची तुकडी येणार आहे हें लक्षांत घेऊन मुद्दाम तेथे झेंडा लावण्यांत आला होता हें सिद्ध करणारा पुरावा दाखल करण्यांत येत नाही, तोंपर्यंत, सरकारच्या अधिकाराला तुच्छ लेखण्यासाठी झेंड्याचें अस्तित्व कारणीभूत होत होतें असें अनुमान सयुक्तिकरीत्या काढतां येणार नाही. डि० मॅ० ने झेंड्याकडे कोणत्याहि नजरेने पाहिलेलें असो. झेंडा उपटण्याचा प्रयत्न कां करण्यांत आला याचें कायदेशीर समर्थन फिर्यादीने करावयास पाहिजे होतें. पण असें कायदेशीर समर्थन करण्यांत आलेलें नाही.

झेंडा ही खेड्याची दौलत होती आणि तो उपटण्याच्या प्रयत्नांचा गांवकऱ्यांनी जो प्रतिकार केला तो पूर्णपणें

समर्थनीय होता. चोरी, अपहरण किंवा इं० पी० कोडाच्या ' प्रिव्हीफ सेक्शन. ' ९७ यांच्या ज्या व्याख्या देण्यांत आल्या आहेत त्यांच्या अनुसार ज्याला गुन्हा म्हणतां येईल अशा कोणत्याहि कृतीपासून स्वतःच्या अथवा दुसऱ्या कोण्याहि व्यक्तीच्या मालमत्तेचें संरक्षण करण्याचा प्रत्येक व्यक्तीला अधिकार आहे. ज्याच्याबरोबर सशस्त्र अशा पांच इसमांपेक्षा अधिक इसमांचें बल आहे अशा माणसानें, गांवकऱ्यांच्या संमतीवाचून त्यांच्या इच्छेविरुद्ध झेंडा काढून नेणें हा अपहारापेक्षाहि अधिक गंभीर स्वरुपाचा गुन्हा होता. झेंड्याचें संरक्षण करतांना व त्याच्या अपहरणाचा प्रतिकार करतांना लोक पूर्णपणे आपल्या अधिकाराच्या कक्षेंतच वागत होते.

" पण असें करतांना, डि० मॅ० व डी० एस० पी० यांना गंभीर स्वरुपाच्या जखमा करून आपल्या अधिकाराच्या उचित मर्यादांचें त्यांनी उल्लंघन केलें. प्रत्यक्ष हल्ला करणारे वेगळे व जमाव वेगळा असें पार्थक्य घडलेल्या घटनांवरून प्रस्थापित करणें अशक्य आहे. कारण, डि० मॅ० व डी० एस० पी० यांचें पोलीसदलानें संरक्षण करण्याचा प्रयत्न केल्यानंतर ते गल्लींत माघार घेऊं लागले तरी देखील पोलीस दलावरील दगडफेक जमावानें चालूच ठेवली. म्हणून प्रत्यक्ष गुन्हे (गंभीर जखमा करण्याचे) करणारे हे जितके अपराधी ठरतात, तितकाच अपराधी जमावांतील प्रत्येक इसम ठरावयास पाहिजे.

" आता शेवटीं एकच प्रश्न उरला. तो म्हणजे (या खटल्यांत) इं० पी० कोडाचीं ३३२ व ३३३ हीं कलमें लागू होतात की नाही, हा होय. कॉंग्रेस झेंडा हा (ब्रि० सरकारच्या) अधिकाराच्या विरोधाचें प्रतीक होता, असें डि० मॅ० च्या दृष्टिकोनांतून पाहिलें असतां म्हणतां येईल. तसेंच व्यवस्था प्रस्थापित करण्याचें काम, दंगेधोपे थांबविणें व गुन्हेगारांना

शासन करणें एवढ्यानेच केवळ भागणारें नव्हतें; तर झेंड्याच्या प्रतीकामुळें गुन्हे करण्याची जी मानसिक प्रेरणा मिळत होती ती नष्ट करण्यासाठी झेंडा काढून नेणेंहि आवश्यक होतें असेंहि डि० मॅ० च्या दृष्टिकोनांतून पाहणारा म्हणूं शकेल. पण उलट बाजूने असेंहि म्हणतां येईल की, झेंडा उभारणें हें कायद्याने मना करण्यांत आलें नव्हतें. म्हणून तसें केल्याने कायद्याचा भंग झाला असें म्हणतां येणार नाही.

ध्वज ही गांवकऱ्यांची संपत्ति होती व तिच्याबाबत गांवकऱ्यांना जे कायदेशीर अधिकार होते त्यांचा आदर करण्याचें बंधन अधिकाऱ्यांनी पाळणें अवश्य होतें.

मुहंमद बकरअली विरुद्ध हनुमंतसिंग (वुइकली नोट ५ पृ० ५९) या खटल्यांत वायव्य सरहद्द प्रांताच्या हायकोर्टाचे चीफ जस्टिस एज्ज व जस्टिस ब्लेअर यांनी असें म्हटलें आहे की, " कलेक्टर किंवा मॅ० या अधिकारावर काम करणाऱ्या गृहस्थांनी कायद्यास धरूनच आपलें वर्तन ठेवलें पाहिजे आणि आपण कलेक्टर किंवा मॅजिस्ट्रेट आहोंत एवढ्यावरूनच, कायद्याने जे अधिकार त्यांना दिलेले नाहीत तेहि आपणांस आहेत असें त्यांनी गृहीत धरतां कामा नये."

झेंडा काढून नेण्याचा प्रयत्न हा जर गैरकायदा होता, तर तसें करणें कितीहि आवश्यक वाटलें असलें तरी, आपलें कर्तव्य बजावण्यासाठी तसें करणें आवश्यकच होतें, असें सरकारी अधिकाऱ्यांना म्हणतां येणार नाही; आणि **जे सरकारी अधिकारी, ज्यांचा प्रतिकार समर्थनीय ठरेल अशीं बेकायदा कृत्यें करतील, त्यांना इं० पी० को० च्या ३३० व ३३३ कलमांच्या आड लपून स्वतःचें संरक्षण करतां येणार नाहीं.** (प्रमाण–नेहरू वि० बादशहा (१९३२) ३४ क्रि० एल्० जे० ४६०) म्हणून ३३२ व ३३३ कलमांखाली ज्यांच्यावर आरोप ठेवण्यांत आले आहेत ते दोषमुक्तच ठरले पाहिजेत आणि त्यांच्या शिक्षा रद्द केल्या पाहिजेत.

परंतु इं० पी० को० चीं १४७, ३२४, व ३२५ हीं कलमें १४९ कलमाबरोबर वाचून त्यांच्याअन्वयें अपराध शाबीत करून ज्या शिक्षा देण्यांत आल्या असतील त्या मात्र कायम राहतील.

झेंडा काढून नेण्याचा (सरकारी अधिकाऱ्यांनी) जो अप्रस्तुत प्रयत्न केला, त्यामुळे लोकांचा झालेला प्रक्षोभ हेंच या दुर्दैवी घटनेचें कारण होतें हें लक्षांत घेऊनच शिक्षा देण्यांत आल्या पाहिजेत. शिक्षा कमी करण्यासाठी, माझ्या मतें, हें सबळ कारण आहे. अपील करणारे आरोपी, अगोदरच दोन वर्षें झालीं, तुरुंगांत आहेत. म्हणून भोगली एवढी शिक्षा पुरे झाली असें म्हणूनहि, माझ्या मतें, न्यायाचा उद्देश सिद्ध होणार आहे.

सही—

एम्. बी. नियोगी, जज्ज.

२९-१२-१९४४

न्यायमूर्ति पुराणिक यांचें निकालपत्र

"माननीय चीफ् जस्टिस व न्या० मू० नियोगी या दोघांचींहि निकालपत्रें मला वाचण्यास मिळालीं. खटल्यांतील एकूण घटनांचा व त्यांबाबत करण्यांत आलेल्या भाषणांचा काळजीपूर्वक विचार करतां, माझें मत न्या० मू० नियोगी यांच्याप्रमाणेच बनलें आहे.

"वरील दोघांनीहि आपापल्या निकालपत्रकांत खटल्यांतील घटनांची मीमांसा केली तिचीच पुनरावृत्ति करण्याची माझी इच्छा नाही. **ज्या दिवशीं ही घटना घडली त्या दिवशीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व डिस्ट्रिक्ट सुप० ऑफ पोलीस यांच्या नेतृत्वाखाली जी टोळी यावलीस गेली होती तिने गांवांत प्रवेश केल्यापासूनच उद्दामपणाची वं**

चढाईची मनोवृत्ति धारण केली होती, असें माझें मत बनलें आहे.

"कायदा व सुव्यवस्था यांविषयीचा आदर प्रस्थापित करण्यासाठी ही टोळी यावलीस गेली होती असें फिर्यादीपक्षाचें म्हणणें आहे. असें जर होतें, तर **गांवांत प्रवेश केल्यानंतर गांवकऱ्यांकडून कोणताहि विरोध झालेला नसतांना आणि त्यांच्या गांवांत प्रवेश करण्यालाच गांवकऱ्यांनी विरोध केला किंवा प्रतिबंध केला हें प्रदर्शित करणारें कोणतेंहि प्रमाण उपलब्ध नसतांना, प्रारंभापासूनच त्यांनी जो हलका लाठीहल्ला केला त्याचें कोणत्याहि प्रकारें समर्थन करतां येणार नाही.** गांवाच्या सीमेवर जे कांही गांवकरी जमा झाले होते ते कोणताहि प्रतिकार न करतां गांधीचौकांत पळून गेले होते; आणि गांधी चौकांतदेखील, जोंपर्यंत या टोळीपैकीच एकाने, झेंडा ज्यावर उभारलेला होता तो ध्वजस्तंभ, धरून उपटण्याचा प्रयत्न केला नाही, तोंपर्यंत कांहीहि वेडेंवांकडें घडलें नाही.

"**कागदोपत्रीं दाखल असलेल्या पुराव्याने माझ्या मनावर असा ठसा उमटविला आहे की, झेंडा काढून नेण्यासाठी किंवा फाडून टाकण्यासाठी ध्वजस्तंभ धरून वाकविण्यांत आला. त्यानंतरच तावडतोब गांवकऱ्यांनी हल्ला केला, नंतरच दगडफेक करण्यांत आली व अधिकाऱ्यांनाहि गचांड्या मारण्यांत आल्या,** (roughly handled), **लाठ्यांचाहि उपयोग करण्यांत आला. परंतु या टोळीच्या लोकांना झालेल्या जखमांचें स्वरूप आणि ज्या सुलभतेने त्यांची सुटका करण्यांत आली ती** (या दोन्ही गोष्टी) **लक्षांत घेतां, मला वाटतें, माझ्या समोरील आरोपी ज्यांत समाविष्ट होते तो गांवकऱ्यांचा जमाव, झेंडा व त्याचा स्तंभ यांचें अपहरण करण्याच्या कामीं डि० मॅ० च्या टोळीला प्रतिबंध करण्याच्या हेतूनेच प्रेरित झालेला होता.** असें करतांना त्यांनी केली इतकी हिंसा करण्याची आवश्यकता नव्हती. शिवाय टोळीने माघार

घेतल्यानंतर तिचा आरोपींनी केलेला पाठलागहि अनावश्यक होता. तसेंच टोळी माघार घेत असतांना जी दगडफेक करण्यांत आली तिचेंहि समर्थन करतां येणार नाही. (डि० मॅ० च्या) **टोळीने माघार घेत असतांना गोळीबार केला व त्यांत कांही मारले गेले व कित्येक जखमी झाले. परिणामतः गांवकऱ्यांची पांगापांग झाली. आता आपला कोणीहि पाठलाग करीत नाही, असें पाहून डि० मॅ० च्या टोळीने त्याचवेळीं गांव सोडून जावयास पाहिजे होतें. पण फिर्यादीने दिलेल्या पुराव्यावरूनच असें दिसतें की, टोळींतले कांही लोक** (गांधीचौकांत) **परत गेले व त्यांनी झेंडा काढून आणला. यामुळेच पुढील दंगल घडून आली.**

"आपला झेंडा परत मिळावा अशी गांवकऱ्यांची इच्छा होती. म्हणून निरनिराळ्या दिशांनी ते एकत्र जमूं लागले व दगडफेक करूं लागले. डि० मॅ० व त्याचे साथीदार मागच्या दाराने पळून गेले, आणि याच्याहि नंतर कांही गांवकरी जेव्हा त्यांचा पाठलाग करण्याचें धाडस करूं लागले, तेव्हा गोळीबार करण्यांत आला व त्यांत एक गांवकरी मेला. यानंतर डि० मॅ० च्या टोळीने गांव सोडलें. अशा रीतीने या दिवशींची ही दुर्दैवी घटना समाप्त झाली.

आपल्या ध्वजस्तंभाची व ध्वजाची फाडतोड करणाऱ्यांना प्रतिबंध करण्याचें गांवकऱ्यांचें कृत्य समर्थनीय असलें, तरी आत्म-संरक्षणाच्या अधिकाराच्या मर्यादांचा त्यांनी भंग केला होता, हें मीं वर दाखविलेंच आहे. म्हणून ते अपराधी आहेत.

दोनदा करण्यांत आलेला गोळीबार समर्थनीय होता काय, अथवा डि० मॅ० च्या टोळीने ज्या मर्यादेपर्यंत जीं कृत्यें केलीं तीं त्या मर्यादेचीं त्यांचीं कृत्यें समर्थनीय होतीं काय, यांचा निर्णय माझ्याकडून मागण्यांत आलेला नाही. म्हणून, न्या. मू. नियोगी यांच्याशीं सहमत होऊन मीहि आरोपींना १४७, ३२४ व ३२५ हीं इं. पी. को. चीं कलमें १४९ कलमाबरोबर वाचून त्यांच्याअन्वयें

झालेल्या गुन्ह्यांबद्दल अपराधी ठरवितों; आणि इं. पी. को, च्या ३३२ व ३३३ कलमांप्रमाणे त्यांनी गुन्हा केला आहे असें मला वाटत नाही.

"या दुर्दैवी घटनेंत यावलीचे ५ इसम मेले व कित्येकांना जखमा झाल्या आणि शिवाय त्यांच्यापैकी ३८ इसम आज सुमारें दोन वर्षें झालीं तुरुंगांत खितपत आहेत. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां न्या० मू० नियोगी यांच्या प्रमाणेंच माझेंहि असें मत आहे की, त्यांना झाली इतकी शिक्षा पुरे झाली असें समजून सोडून देण्यांत यावें. ता० २९-१२-१९४४

सही
डब्ल्यू. आर्. पुराणिक, जज.

चीफ् जस्टिस् ग्रिल यांचें निकाल-पत्र

"हें अपील एरव्हीं एका जज्जापुढे चाललें असतें व तसें तें न्या० मू० बोस यांच्या पुढे गेलेंहि होतें. परंतु त्यांना असें वाटलें की, त्यांत उत्पन्न झालेले प्रश्न गंभीर स्वरूपाचे व दूरगामी महत्वाचे आहेत, म्हणून हाय कोर्टाचा नियम ९ (१) च्या अन्वयें, हा खटला फुलबेंचानेच ऐकणें चांगलें, असें म्हणून त्यांनी तो आमच्याकडे पाठविला आहे.

"ता० १८-२-१९४२ रोजीं मौजा यावली जि० अमरावती येथे डि० मॅ० व डि० सुप० ऑफ पोलीस यांच्या नेतृत्वाखाली एक सार्जंट, २ हेड कान्स्टेबल्स व ८ कान्स्टेबल्स यांचें जें एक पथक गेलें होतें त्यावर झालेल्या हल्ल्याबाबत इं० पी० कोडाच्या निरनिराळ्या कलमान्वयें, अपील करणारांना शिक्षा झालेल्या आहेत. या पथकाबरोबर एक सबइन्स्पेक्टर ऑफ पोलीस, एक नायब तहसिलदार, एक रे० इ०, आणि त्या खेड्याचा पटवारी, पाटील व जागल्या इतकी मंडळीहि होती. त्यांच्यावर झालेल्या हल्ल्यांत त्यांना लाठ्या व दगड यांचा मार लागला, आणि डि० मॅ० च्या बोटाचें हाड तुटलें. म्हणजे

त्याला गंभीर स्वरूपाची इजा झाली होती. या परिस्थितींत गोळीबार करणें आवश्यक झालें. गेलेल्या पथकांत दोघा कान्स्टेबल्सजवळ बंदूकी होत्या व सार्जंटजवळ रिव्हाल्व्हर होतें. अनेक वेळा गोळ्या झाडण्यांत आल्या आणि अखेरीस खेड्यांतील पाटलाच्या घरांत माघार घेतल्यानंतर, पथकाने खेडेंच सोडून जाण्याचें ठरविलें, आणि ते गांवाच्या बाहेर उघड्या शेतांतून माघार घेत असतांना, हा वेळपावेतों अधिकच फुगलेल्या जमावाने आपली दहशत-वादी मनोवृत्ति चालूंच ठेवली. पुन्हा गोळीबार करावा लागला, प्रायः अखेरचें काडतुसहि खलास झालें. सार्जंट क्वीन याने थंड डोक्याने व धैर्याने एका कान्स्टेबलजवळून बंदूक घेऊन-स्वतःच्याजवळचीं काडतुसें संपलीं असल्यामुळे-जमावाचे दोन पुढारी जर जमिनीवर लोळविले नसते, तर संभव असा होता की, सर्वच्या सर्व पथक घेरलें गेलें असतें व ठार मारलें गेलें असतें."

यानंतर २ ऱ्या परिच्छेदांत यावलीची भौगोलिक माहिती व १५ ऑगस्टला झालेल्या सत्याग्रहाची व मोडतोडीची माहिती देऊन डि० मॅ० ने २००० रु० सामुदायिक दंड यावलीवर बसविण्याचा हुकूम रे० इन्स्पेक्टरला कसा दिला, गांवकरी लोकांनी दंड देण्याचें नाकारल्याची बातमी डि० मॅ० ला कशी कळली व त्याने रे० इ० ला सर्व प्रकारची मदत करण्याचें आश्वासन कसें दिलें, आणि अखेरीस १८-८-४२ ला डि० मॅ० व त्याचें पथक यावलीस कसें गेलें इ० हकीकत निवेदन करून पुढे चीफ् जस्टिस ग्रिल आपल्या निकाल-पत्रांत लिहितात—"गांवांत प्रवेश केल्यावर पोलीस कवायती-पद्धतीने सज्ज झाले व गांधी चौकाकडे जाऊं लागले. गांधी चौकाचा मार्ग जेथे पूर्वेकडून पश्चिमेकडे जातांना एकदम उत्तरेकडे वळतो तेथे १२ किंवा १५ लोक जमा झालेले होते. फिर्यादीचें म्हणणें असें की, तुम्ही येथून निघून जा अशी त्यांना विनंती करण्यांत आली होती, तरी ते लोक तेथून हालले नाहीत. जेव्हा पोलीसदल पुढे चाल करूं लागलें तेव्हा त्यांतील बहुतेक लोक गांधीचौकांत जाणाऱ्या गल्लींत शिरले व त्यांच्या पाठोपाठ पोलीसहि गेले. गांधी चौकाच्या उत्तरेकडील टोकाला लोकांचा जमाव जमलेला होता. कांही म्हणतात त्यांची संख्या १५० होती. कित्येकांच्या मतें ती ५००-६०० होती. फिर्यादीचें म्हणणें असें की, या लोकांच्या पाठोपाठ हें सरकारी-दल जेव्हा गांधीचौकांत शिरलें,

तेव्हा त्यांच्यावर दगडांचा वर्षाव सुरू झाला आणि जमावाने त्याला घेरून त्यांच्यावर हल्ला केला."

"अपील करणारांचें जें म्हणणें आमच्यासमोर सांगण्यांत आलें तें असें की, पोलीसदल लोकांचा पाठलाग करीत जें आलें त्याने गांधीचौकांतील जमावाला एकदम तडाखेबंद मारपीट सुरू केली व म्हणून संरक्षणासाठी लोकांना आपला बचाव करणें भाग पडलें. डि० मॅ० व डी० एस्० पी० हे आपल्या दलाच्या कांहीसे पुढे होते. त्यांना घेरून लोकांनी वेढा दिला, पण शेवटीं मागे असणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांची सुटका केली. ही जी दंगल उडाली तींत दलांतील लोकांना मार लागला. ते कसेबसे गल्लींत परत फिरले. लोकांनीं आपल्या अत्याचारी मनोवृत्तीची पकड ढिली पडूं दिली नाही, म्हणून गल्लींत कांही अंतर मागे गेल्यानंतर गोळीबार सुरू करण्यांत आला. गल्लींतून माघार घेत असतांना मधून मधून गोळ्या झाडण्यांत येत होत्या········अखेरीस दल पाटलाच्या घरांत शिरलें, आणि जमावाची अखंड विरोधाची वृत्ति पाहून त्याने माघार घेण्याचें ठरविलें. दुसऱ्या एका इसमाच्या घरांतून त्याने आपला मार्ग काढला. जमावाने हें पाहिलें व तो पाठलाग करूं लागला. दल पळूं लागलें. नाल्याच्या परतीरावर रामकिसन मारवाड्याच्या कोठ्यांत तें थांबलें. वाटाघाटींचा कांहीच उपयोग नाही हें पाहून त्याने माघार चालूंच ठेवली. अखेरीस सार्जंट क्वीनच्या निशाणबाजीनेच हा हल्ला थांबविला."

आपल्या निकालपत्राच्या तिसऱ्या परिच्छेदांत फिर्यादी व आरोपी यांनी आपापली बाजू मांडतांना उपस्थित केलेल्या मुद्यांचें निवेदन करून ४ थ्या परिच्छेदांत चीफ् जस्टिस ग्रिल म्हणतात–"याप्रमाणे दोन्ही पक्षांनी आपापली बाजू आमच्या समोर मांडली. बचावाची रूपरेषा सर्वसाधारण (general) आहे. ३८ आरोपींपैकी, प्रत्येकाची अशी स्वतंत्र बाजू मांडण्यांत आली नाही. सामान्यत्वेंकरून असें म्हणण्यांत आलें आहे कीं, बचावाची कैफियत जर आम्हांला मान्य होत नसेल, तर शिक्षा तरी कमी करण्यांत याव्या."

५ व्या परिच्छेदांत चीफ् जस्टिस म्हणतात—"आपलीं कर्तव्यें पालन करण्याच्या बुद्धीनेच डि० मॅ० व डि० सुप० ऑफ पोलीस वागले कीं, कायद्याची

ज्याला मुळीच मान्यता नव्हती असें कांहीतरी कृत्य करण्यासाठी ते यावलीस गेले होते, हा प्रश्न प्रथम निकालांत काढला पाहिजे." असा प्रश्न उपस्थित करून ६ व्या परिच्छेदांत ते म्हणतात, "दंड वसूल करण्यास गेले असतांना १६ ता० स रे० इ० चा लोकांनी विरोध केला होता ही, गोष्ट डि० मॅ० व त्याच्या दलांतील इतर सर्व लोकांना माहित होती यांत शंका नाही. रे० इ० चें, दंड वसुलीचा प्रयत्न करणें हें, कृत्य गैरकायदा होतें, हें विधान अॅड० जनरल यांनीहि मान्य केलेंच आहे. १६ ता. ला लोकांनी जो प्रतिकार केला त्याबद्दल शिक्षा होऊं शकत नाही हेंहि त्यांनी मान्य केलें."

यानंतर यावलीस जाण्यांत सरकारी अधिकाऱ्यांचा उद्देश काय होता या॰ विषयीं डि० मॅ०; नायब तहसिलदार व सार्जंट कीन यांच्या जबान्या उध्दृत करून चीफ् जस्टिस म्हणतात—"**जेव्हा उठावण्या होतात व सामुदायिकरीत्या लोक कायदा मानीनासे होतात, तेव्हा डि० मॅ० चें मुख्य कर्तव्य व्यवस्था प्रस्थापित करणें** (restore order) **हें असतें. याच उद्देशानें पोलीसपथकें बरोबर घेऊन या काळांत तो जिल्हाभर फिरत होता. याच उद्देशानें व हें कर्तव्य बजावण्यासाठींच १५ तारखेला मोर्शीस व १६ तारखेला नांदगांवपेठ व बेनोडा येथे तो गेला होता. यावली हेंच असें ठिकाण आहे की, तेथे तो सशस्त्र दल बरोबर घेऊन गेला. ह्या आरोपींच्या विद्वान वकिलांच्या म्हणण्यांत तथ्य दिसत नाही.** कांही वेळां फक्त पोलिसांचीं तर कांही वेळां फौजी सैनिकांचीं सशस्त्र दलें, ज्या ठिकाणीं दंगे धोपे व मोडतोडीचे प्रकार झाले, तेथे गेलेलीं होतीं. व्यवस्था प्रस्थापित करणें व अजून सरकारी सत्ता देशांत कायम आहे हें दाखवून देणें आणि सरकारी सत्ता कार्यक्षम नाही हा दंगेखोरांचा जो समज झाला होता तो नाहीसा करणें या उद्देशानेच हीं दलें ठिकठिकाणीं जात असत. यावलीची भेटहि या नियमास अपवाद नव्हती. यावलीच्या लोकांनी माहोली पो० स्टेशनवर हल्ला केला होता. त्या बाबतींत कांही लोकांना गिरफ्तारहि करण्यांत आलें होतें. मुख्य रस्त्यांवरील तारेचे खांब त्यांनी तोडले होते. शिवाय त्यांनी आपल्या गांवांतील सरकारी मालमत्तेवर हल्ला चढवून तिचीहि नासधूस केली

होती. दोन दिवसांपूर्वी त्या खेड्यावर सामुदायिक दंड बसविलेला असो अथवा नसो, त्याला भेट देणें व सरकारी अधिकार प्रस्थापित करून सरकारी सत्तेच्या बाबतींतला विश्वासहि प्रस्थापित करणें हें डि० मॅ० चें कर्तव्य होतें. तो जर यावलीस गेला नसता, तर या बाबतींत कर्तव्यचुकारपणा त्याच्या पदरीं आला असता. तो व डि० सुप० ऑफ पोलीस हे यावलीस गेले होते, हें अगदी ठाम आहे. म्हणून सामुदायिक दंड—कायदेशीर अथवा बेकायदेशीर—बसविण्याचा हुकूम त्याने दिला होता हा मुद्दा या विशिष्ट बाबतींत फारच अप्रस्तुत आहे."

७ व्या परिच्छेदांत सामुदायिक दंड बसविण्याचा अधिकार डि० मॅ० मेल्ड्रम यास होता कीं नाही, याची चर्चा सुरु करून चीफ् जस्टिस म्हणतात—"मि० मेल्ड्रम यांनी आपल्या जबानींत सांगितलें आहे की, 'प्रांतिक सरकारने दिलेल्या अधिकारान्वयेंच आपण सामुदायिक दंड बसविला. ता. १२ ते १५ ऑगस्टच्या दरम्यान त्या बाबतींतल्या सूचना प्रांतिक सरकारकडून टेलिफोनवर मिळाल्या होत्या; कोणत्या खेड्यावर किती सामुदायिक दंड बसवावयाचा हें तारतम्य पाहून ठरविण्याचा अधिकारहि सरकारने आपणांसच दिला होता.'—मि० मेल्ड्रमची ही जबानी खोटी आहे असा त्याजवर आरोप करण्यांत आला आहे. असें सांगण्यांत आलें आहे की, त्याला सरकारकडून कोणताच अधिकार देण्यांत आला नव्हता, केवळ स्वतःच्या प्रेरणेनेच वागून त्याने दंड बसविला आणि प्रारंभापासून अखेरपर्यंत तो स्वतःच्याच जबाबदारीवर वागत होता. सरकारचे सर्व अधिकार आपणांसच आहेत असें तो समजूं लागला. आपण बेकायदा दंड बसवीत आहोंत हें कळत असून तो बेकायदा दंड बसवीत होता, आणि लोकांनी तो दिला नाही, तेव्हा अत्याचारी व बेकायदा उपायांचा अवलंब करून आपला अधिकार तो प्रस्थापित करूं पाहत होता."

"या मुद्याला उत्तर देतांना विद्वान ॲड० जनरल यांनी सांगितलें की, सरकार व मेल्ड्रम यांच्या दरम्यान टेलिफोनने

बातचीत झाल्याचा सुगावा (trace) सरकारला लागत नाही. पुढे तर त्यांनी निश्चितपणे असें सांगितलें की, या प्रश्नाबाबत चीफ सेक्रेटरीने मि० मेल्ड्रम यांना कोणताहि फोन केला नव्हता. आमच्या मनावर असा ठसा उमटला आहे की, 'चीफ सेक्रेटरी' या शब्दावर जोर देण्यांत आला होता. पण सरकारजवळ कांही चीफ सेक्रेटरी हा एकच ऑफिसर नाही."

८ व्या परिच्छेदांत, मि० मेल्ड्रम यांनी बसविलेला सामुदायिक दंड बेकायदा होता ही गोष्ट सरकारतर्फे मान्य करण्यांत आली याचा निर्देश करून चीफ् जस्टिस म्हणतो—"मि० मेल्ड्रम यांनी शपथेवर केलेलें विधान खोटें आहे असें ज्याअर्थी म्हणण्यांत आलें आहे, त्याअर्थी आम्हांलाहि हें नमूद करणें कर्तव्य वाटतें की, मि० मेल्ड्रम-सारखा ज्युनिअर डि० मॅ०, १९४२ च्या नं० २० च्या ऑर्डिनन्सची, सामुदायिक दंड बसविण्याच्या पद्धतीच्या बाबतींत, अवज्ञा करील आणि प्रांतिक सरकारचे सर्व अधिकार आपणांसच आहेत असें समजून वागेल, हें आम्हांलाहि संभवनीय वाटत नाही. १२ सप्तेंबर १९४२ ला (No X. L. XI. of 1942) हा ऑर्डिनन्स काढून वरील २० नंबरच्या ऑर्डिनन्सॅमध्ये सुधारणा करण्यांत आली. त्यांत प्रांतिक सरकारने आपले अधिकार कोणाला द्यावेत हें सांगण्यांत आलें व ऑफीशिअल गॅझेटमध्ये आगाऊ प्रसिद्धीच्या आवश्यकतेविषयींच्या कलमांतहि बदल करण्यांत आला. या सुधारणा होणारच हें ध्यानांत घेऊन, प्रांतिक सरकारनेच हुकूम दिले असले पाहिजेत; मि० मेल्ड्रम यांच्या मेंदूतून सामुदायिक दंडाची कल्पना निघाली नाही, याविषयी आम्हांला संदेह नाही. म्हणून त्यांची जबानी सत्य आहे असें आम्ही समजतों."

यानंतर ९ व्या परिच्छेदांत, आपण असक्याच दिवशीं यावलीस येऊं असें मि० मेल्ड्रम यांनी सांगितलें नव्हतें. म्हणून १६ तारखेच्या लोकांच्या प्रतिकाराचा बदला घेऊन दहशत निर्माण करणें हा त्याचा यावलीस जाण्याचा

हेतु नव्हता, असें प्रस्थापित करून चीफ् जस्टिस घंटा वाजविण्याच्या घटनेकडे वळले. नंतर ता० १७ व १८ ला गांवांत झालेल्या सभांचा त्यांनी निर्देश केला. पुढे रे० इ० ता० १६ ला गांवांतून निघून गेल्यावर लगेच गांवकऱ्यांनी गांधीचौकांत जी एक सभा घेतली होती तिचा विशेष निर्देश करून, शाळा मास्तरांच्या जबानीच्या आधारें चीफ् जस्टिस लिहितात.-"या सभेंत सांगण्यांत आलें की, आज जरी दंड वसूल करण्यांत सरकारला यश आलें नाही, तरी सरकारी अधिकारी लौकरच दंडवसूलीसाठी आल्याशिवाय राहणार नाहीत. ज्यांच्याजवळ ज्वारी आहे त्यांची ज्वारी ते जप्त करतील. म्हणून ज्वारी मजुरांना वाटून देणेंच इष्ट होईल.........**या सभा ही केवळ एक लोककल्याणाची बाब होती व श्रीमंतांच्या कोठ्यांतली ज्वारी गरिबांना वाटणें एवढाच त्यांचा उद्देश होता असें मानण्यास मी तयार नाहीं.**" घंटी वाजल्याबरोबर लोकांनी आपापलीं कामें सोडून एकत्र जमावें व प्रतिकारास सज्ज व्हावें, म्हणून ज्वारी वाटण्यांत आली होती असें म्हणून गांधीचौकांत १८ ता० ला जमलेला जमाव हा मुळांतच 'भयानक व साशंकित मनोवृत्तीचा' (in a dangerous and apprehensive mood) होता, ही गोष्ट १० व्या परिच्छेदाच्या प्रारंभींच चीफ् जस्टिस यांनी नमूद केली.

१५ ता० पासून घडलेल्या मोडतोडींच्या प्रतिकाराच्या घटनांचा पुन्हा एकदा निर्देश करून चीफ् जस्टिस म्हणतात—"**जमाव जीं कृत्यें करतो त्यावरूनच त्याचे हेतु ठरवावयाचे असतात; आणि जमाव प्रथम जमला तेव्हा तो बेकायदा नव्हता असें म्हणणें जरी शक्य असलें, तरी जेव्हा त्याने पोलीसदलावर दगडफेक केली तेव्हा तो बेकायदा बनला होता** आणि पोलीसदलाने चौकांत प्रवेश करतांक्षणींच त्याच्यावर दगडफेक सुरू झाली असा पुरावा आहे. **बेकायदेपणाचीं बीजें ज्यांत मुळांतच भरून होतीं तो जमाव प्रत्यक्ष बेकायदा बनण्यास फारच अल्प कारण पुरतें.**"

११ व्या परिच्छेदांत, डि० मॅ० मि० मेल्ड्रम यांनी ५ सप्टेंबरला जें प्रेस कॅम्युनिक वार्ताहरांना दिलें त्याचा व त्यांतील विधानें कशीं बुद्धिपुरःसर

असत्य करण्यांत आलीं होतीं असें म्हणून त्याचे वाभाडे आरोपींच्या वकिलांनी काढले, या गोष्टीचा निर्देश करून, गांवांत शिरल्याबरोबर पोलीसांनी जो पहिला लाठीहल्ला केला त्याविषयीं चीफ् जस्टिस म्हणतात "या बाबतींतल्या प्रत्यक्ष घटनांचें स्वरूप फिर्यादीच्या साक्षीदारांनी सौम्य करून दाखविलें, हें मला मान्य आहे. जमावानें निघून जावें असा औपचारिक हुकूम देण्यांत आला नव्हता, हेंहि मला मान्य आहे. पण कोणत्या रीतीनें कां होईना त्यांनी निघून जावें याची सूचना जमावाला देण्यांत आली होती हेंहि स्पष्ट आहे, आणि हेंहि स्पष्ट आहे की, लोक जेव्हा जाण्यास निघाले, तेव्हा त्यांतील एकानें त्यांना जाऊं नका म्हणून सांगितलें. म्हणून जमावाची पांगापांग करण्यासाठी करण्यांत आलेला प्रयत्न समर्थनीय ठरतो."

लष्करी पद्धतीनें 'त्वरेनें चाल करून जाणें' यांत व 'हलका लाठी हल्ला' यांतील फरक ओळखणें कठीण आहे—"हें लक्षांत घेतां प्रेस कम्युनिकामध्यें मि० मेल्ड्रम यांनी (याबाबत) केलेलें विधान खरें आहे"—असें पुढे चीफ् जस्टिस यांनी म्हटलें. ते पुढे म्हणतात—"मी अशा निर्णयाप्रत पोहचलों आहें की, जमावानें निघून जावें असें सांगितल्यावर जेव्हा तो गेला नाही, तेव्हा पोलीसपार्टी त्याच्यावर चालून गेली. त्यावेळीं त्यांतील बरेचसे लोक गल्लींतून चौकाकडे पळाले आणि पोलीसहि त्यांचा पाठलाग करीत चौकांत व चौकांतून पलीकडे गेले. अशा तऱ्हेनें या लहानशा जमावाचा चौकापर्यंत पोलिसांनी पाठलाग केला नसता तर तें अधिक शहाणपणाचें झालें असतें, असें पुढील घटना लक्षांत घेतां म्हणतां येईल. त्यांनी केलेला हा पाठलाग शहाणपणाचा नसेल पण बेकायदा खास नव्हता."

अशा रीतीनें घटनाक्रम गांधीचौकापर्यंत आणून सोडल्यावर चीफ् जस्टिस आपल्या निकालपत्राच्या १२ व्या परिच्छेदांत,—"आपल्या ग्रामबांधवांचा पाठलाग करीत पोलीस चौकांत येत आहेत असें पाहून (तेथील)

जमावाने त्यांच्यावर दगड फेकून मारण्यास प्रारंभ केला, आणि ते त्यांच्याजवळ जाऊन भिडले व लाठ्यांनी मारण्यासहि त्यांनी सुरवात केली. अशा स्थितींत **काँग्रेस-ध्वजाच्यामागे जमाव शांतपणें उभा होता व पोलीस दलानेंच त्याच्यावर तडाखेबंद लाठीहल्ला सुरू केला व जमावाने केवळ आत्मरक्षणार्थ प्रतिकार केला, हें चित्र मी मान्य करूं शकत नाहीं."**

पुढे १३ व्या परिच्छेदांत, नक्की कोणत्या स्थळीं पोलीस पोहचले असतांना दगडफेक सुरु झाली याविषयींच्या जबान्यांत एकमत आढळेल अशी अपेक्षा करणें योग्य नाही असें म्हणून चीफ् जस्टिस म्हणतात—"मनुष्यस्वभाव ध्यानांत घेतां असेंच म्हणावें लागेल की, पोलीसदलाने चौकांत प्रवेश करतांच दगडफेक सुरु झाली." गांधीचौक, त्याच्या चतुःसीमा, शाळा, झेंडा, देऊळ, विहीर इ० स्थळें व त्यांचीं अंतरें याविषयीं वर्णन करुन चीफ् जस्टिस म्हणतात—"हा चौक म्हणजे कांही मोठी जागा नव्हती. उत्तरेकडून दक्षिणेपर्यंत त्याची लांबी ८० फुटांहून अधिक भरणार नाही" दगडफेक केव्हा व कशी सुरु झाली याविषयींच्या साक्षीदारांच्या उलट सुलट जबान्या उध्दृत करुन चीफ् जस्टिस म्हणतात—"या पुराव्यावरून निर्णय जो निघतो तो हा की, पोलीस जेव्हा चौकांतून धावून जात होते, तेव्हा त्यांच्यावर थोडीशी दगडफेक झाली, आणि तरी देखील जेव्हा ते पुढेच जाऊं लागले, तेव्हा लोक त्यांच्यावर तुटून पडले व या दंगलींत डी० एस्० पी० व डि० मॅ० यांच्यावर जबर मार पडला. त्यांचे कपडे फाटले, त्यांचे टोप हरवले आणि डि० मॅ० चें घड्याळ व शिकारी काठीहि हरविली. त्याच्या हाताच्या बोटाचें हाड तुटलें व डोक्याच्या मागच्या बाजूस दगड लागून जखम झाली."

यानंतर १४ व्या परिच्छेदांत डि० मॅ० व त्याची टोळी यांनी झेंडा केव्हा काढून नेला याची पुराव्यावरुन मीमांसा करण्यांत आली. खुद्द डि० मॅ० **मि० मेल्ड्रम यांच्याहि जबानींतली या बाबतींतली विसंगति चीफ् जस्टिस यांच्या लक्षांत आली. ते म्हणतात "इतर साक्षीदारांची तुलना करतां त्याचें (डि० मॅ० चें) तपशीलाबाबतचें वक्तव्य**

गोलमाल (vague) आहे; पण हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे की, मि० मेल्डूस यास डोक्याच्या मागच्यावाजूने दगड लागून गंभीर जखम झाली होती आणि अतिशय गुंतागुंतीच्या अशा या मामल्यांतील (in a very confused proceeding) प्रत्यक्ष तपशिलांच्या बावतींत त्याची स्मृति अगदी स्वच्छ असणें संभवनीय नाही."

१५ व्या व १६ व्या परिच्छेदांत, गांधीचौकांतील दंगलीच्या वेळीं डि० मॅ० व त्याचें दल यांनी झेंडा काढला नव्हता, तो त्यांनी मागाहून आणला ही गोष्ट चीफ जस्टिस यांनी प्रस्थापित केली. १७ व्या परिच्छेदांत, गांधीचौकांतील दंगलीच्यावेळीं, साहेबमंडळींनी प्रथम झेंडा काढण्याचा प्रयत्न केला व त्यामुळे खवळून नंतर लोकांनी त्यांच्यावर हल्ला केला कीं, लोकांनी आधीच हल्ला केला होता याविषयींच्या जबान्यांची छाननी करण्यांत आली आहे. पाटलाचें जें वक्तव्यपोलीस डायरींत नोंदलेलें आहे व जें बरोबर असल्याचें त्याने कोर्टांतहि कबूल केलें, तें वक्तव्य असें—"त्यांच्या (पोलीस दल) पैकी कोणीं तरी, गांधीचौकांत उभारण्यांत आलेलें, तिरंगी खादीचें निशाण काढून नेण्याचा प्रयत्न केला. पण दंगेखोर धावून आले व त्यांनी तें निशाण त्यांच्यापासून हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. दंगेखोर हल्ला करीत आहेत हें पाहून तुम्ही जर निघून जाणार नाही तर गोळीबार करण्यांत येईल अशी त्यांना ताकीद देण्यांत आली. पण दंगेखोरांनी तिच्याकडे लक्ष दिलें नाही. उलट ते दगड मारूं लागले व त्वेषाने हल्ला करूं लागले.' याप्रमाणे पाटलाचें वक्तव्य उध्दृत केल्यावर चीफ् जस्टिस म्हणतात—"यावरून असें म्हणतां येणार नाही की, झेंडा प्रत्यक्ष काढला होता व त्याच वेळीं ते तो घेऊन गेले. ज्या तऱ्हेने या विषयाचा उपन्यास करण्यांत आला. त्यावरून झेंडा पहिल्या दंगलींत काढून नेण्यांत आला हें कथन असिद्ध होतें, आणि पोलीसडायरींतल्या भाषेवरून एवढेंच सूचित होतें की झेंडा काढण्याचा प्रयत्न करण्यांत आला, पण त्याचा प्रतिकार करण्यांत आला. यापेक्षा त्या भाषेवरून अधिक कांहीहि सूचित होत नाही. हा साक्षीदार (म्हं० पाटील) उलट तपासणींत असें ठासून सांगत आहे की, झेंडा काढण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीच पोलीसदलापैकी कांही लोकांना मार

लागलेला होता आणि विशेषतः, डि० मॅ० व डी० एस्० पी० यांच्या डोक्यावर तर झेंडा काढण्यापूर्वीच मार लागलेला होता. **अर्थात्, जमलेला समूह बेकायदा होता याविषयीं मुळीच संशय राहूं शकत नाही. झेंडा उपटण्याचा कोणताहि प्रयत्न दूर करण्यापूर्वीच हा समुदाय बेकायदा जमाव बनलेला होता.**"

यानंतर १८ व्या परिच्छेदांत, मग झेंडा प्रत्यक्ष कोणीं काढला याची चर्चा करण्यांत आली आहे. झेंडा प्रत्यक्ष कोणीं काढला याविषयीं इतर साक्षीदार मुग्ध असले तरी सार्जंट क्वीन या बाबतींत फार निश्चयात्मक रीतीने बोलला हें दाखवून चीफ् जस्टिस लिहितात—"या बाबतींत निश्चयात्मक असें एकच साक्षीदार बोलला. तो म्हणजे क्वीन. तो म्हणाला की, **डी० एस्० पी० मि० प्रॅट, यांनी झेंडा काढून आणला. मि० प्रॅट यांना साक्षीदार म्हणून बोलावण्यांत आलें नव्हतें. याबाबत सरकारच्या तर्फे असें स्पष्टीकरण देण्यांत आलें आहे की, दंगेखोरांपैकी कोणालाच तो ओळखूं शकला नसता म्हणून त्याला साक्षीदार या नात्याने बोलावण्याची आवश्यकता नव्हती. हें स्पष्टीकरण पर्याप्त आहे, असें आम्हांला वाटत नाही.** हजर असलेल्या दोन प्रमुख अधिकाऱ्यांपैकी एक या नात्याने मि० प्रॅट जर साक्षीदार म्हणून बोलावले गेले असते, तर कमी शिकलेल्या अशा इतर साक्षीदारांपेक्षा कितीतरी अधिक खुलासेवार असें स्पष्टीकरण अनेक मुद्यांवर ते देऊं शकले असते. **त्यांनी स्वतःच दुसऱ्यांदा चौकांत जाऊन झेंडा काढून आणलेला होता आणि दंगलीच्या म्हणजे पहिल्या खेपेसहि त्यांनी झेंडा काढण्याचा प्रयत्न केला होता. म्हणूनच त्यांना साक्षींत बोलावण्यांत आलें नव्हतें असा आमचा ठाम समज झाला आहे. त्यांची ही कृत्ति जरी बेकायदा नसली, तरी तिच्यामुळेच जमावाच्या रागाचा पारा, एरव्ही भडकला नसता इतका, भडकला.**"

इतकें सर्व मान्य करूनहि ची० ज० पुढे म्हणतात--"झेंडा हा जरी जप्त करण्यांत आला नव्हता व झेंडा उभारणें हें प्रतिबंधित कृत्य नव्हतें, तरी

याप्रसंगीं तो सरकारी सत्तेचा विरोध दर्शविण्यासाठीच उभारण्यांत आला होता यांत शंका नाही. आणि **एका बिघडलेल्या व बेकायदा जमावाचा बंदोबस्त करीत असतांना (असला विरोधाचे प्रतीक बनलेला) झेंडा काढून घेण्याचा प्रयत्न करणें अगदी स्वाभाविक होतें."**

याप्रमाणे डि० सुपं० ऑफ पोलीस प्रॅट यांच्या कृतीचें समर्थन केल्यानंतर पुढील उद्गार काढणें चीफ् ज० यास आवश्यक वाटलें. ते म्हणतातः—" **झेंडा काढून नेण्याचा पहिला प्रयत्न विफल झाल्यानंतर, मागाहून पुन्हा पोलीसदल बरोबर घेऊन चौकांत जाणें व झेंडा काढून आणणें अनावश्यक व अन्यायाचें** (injudicious) **होतें. मध्ययुगीन लढाईच्या ज्या विचित्र तऱ्हा होत्या व विजयपताका आणण्याची त्या काळची जी पद्धति होती त्यासारखाच हा प्रकार होय"** प्रॅट याच्या बाकीच्या कृत्यांचें समर्थन करीत असतांनासुद्धा वरील शालजोडींतला अहेर त्यास चीफ् ज० यास करावासा वाटला हें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. पण हा अहेर हलका झाला असें वाटूनच की काय, ची० ज० पुढे म्हणतात—" या त्यांच्या कृतीचाच आणखी एक दुर्दैवी व अपरिहार्य परिणाम असा झाला की, पोलीसपार्टी पाटलाच्या घरांत दडली, तेव्हा त्याला लोकानी वेढा दिला; आणि कोणत्या शर्तीवर आपण झेंडा परत करण्यास तयार आहोंत यांविषयी नामुष्कीचीं बोलणीं करण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला व तीं बोलणींहि फसलीं; आणि परिणामतः लोकांचा क्षोभ पुन्हा भडकला व त्यांच्यासमोर अधिक अधिक माघार घेणें त्यांना भाग पडलें. **मि० प्रॅट यांच्या या सारासार, विवेकहीन वर्तनावर कसून होणारी उलट तपासणी टाळावी म्हणूनच फिर्यादीने त्यांना साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत बोलाविलें नाही, असें आम्हांस वाटतें. "**

मि० प्रॅट यांना साक्षींत न बोलावण्यांतला सरकार पक्षाचा दुष्ट हेतु याप्रमाणे उघड करून दाखविणें ची० जस्टिस यांनाहि अपरिहार्य झालें.

तथापि १८ व्या परिच्छेदाच्या शेवटच्या वाक्यांत ते म्हणतात—" तथापि मला या ठिकाणीं हें पुन्हा सांगितलेंच पाहिजे की, ध्वजस्तंभ मोडण्याचा व झेंडा काढून नेण्याचा प्रयत्न झाल्यामुळे, पोलीसदल परत फिरल्यावरहि त्याच्यावरील हल्ला कां चालू ठेवण्यांत आला याचें थोडेसें स्पष्टीकरण होऊं शकतें, पण त्यामुळे लोकांनी जी हिंसा केली व ज्या हिंसेमुळे पोलीसदलाच्या प्राणांना धोका उत्पन्न झाला होता आणि जिच्यामुळे केवळ आत्मरक्षणार्थ गोळीबार करण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला तिचें समर्थन मात्र होऊं शकत नाही. "

पुढे १९ व्या परिच्छेदांत रामकिसन मारवाड्यांच्या कोठ्याजवळ झालेल्या घटनांचें वर्णन करून चीफ् ज० यांनी असें प्रस्थापित केलें आहे की, गांधी चौकांत पोलीसदलावर हल्ला करणारा जमाव आणि नदीवर पाठलाग करणारा जमाव हे दोन भिन्न जमाव होते असें मानतां येणार नाही.

२० व्या व २१ व्या परिच्छेदांत, पाटलाच्या घरांत पोलीसदल दडलें असतांना झालेल्या घटनांबद्दल मेल्ड्रम व सार्जंट क्वीन यांच्या जबान्यांत जो फरक पडला व जी विसंगति दिसून आली त्यांचा परिहार चीफ् ज० यांनी केला आहे; आणि नंतर पुन्हा नदीपार रामकिसनच्या कोठ्याजवळ घडलेल्या घटनांचा निर्देश करून २१ व्या परिच्छेदाच्या शेवटीं ते म्हणतात—" **सार्जंट क्वीन यानें ज़र करारी वर्तन** (resolute conduct) **केलें नसतें व निशाणबाजींतलें आपलें कौशल्य दाखवून, पाठलागाच्या या अंतिम अवस्थेंत जमावाच्या पुढाऱ्यांना लोळविलें नसतें, तर पोलीसदलास जमावानें गुरफटलें असतें व ठार मारलें असतें यांत शंका नाही.**"

२२ व्या परिच्छेदांत आरोपींना झालेल्या शिक्षा व त्यांचीं कलमें यांची चर्चा करण्यांत आली आहे. त्यांत त्यांनी असें म्हटलें आहे की, **३३३ व ३३२ कलमें १४९ कलमाबरोबर वाचून शिक्षा दिल्यानंतर पुनः त्याच लोकांना ३२४ व ३२५ कलमान्वयें शिक्षा देणें वायफळ** (Superfluous) **होतें.** "

चीफ् ज० यांचें हें वरील वाक्यांतील पागोटें स्पेशल जज्ज मि० दंडे व रिव्ह्यू जज्ज मि० पोलक यांच्या डोक्यावर बसण्यासारखें आहे.

शेवटच्या म्हणजे २३ व्या परिच्छेदांत चीफ् ज० म्हणतात— "आरोपींपैकी बहुसंख्य लोकांना ४ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा देण्यांत आली आहे, व त्यांपैकी २ वर्षें त्यांनी आतापर्यंत भोगिलीहि आहे. शिक्षा कमी करण्यांत यावी ही प्रार्थना सामान्यत्वें करण्यांत आली. विशिष्ट व्यक्तींचीं नांवें घेऊन करण्यांत आली नाही. **एकंदर जमावाचा समुचित विचार करतां यांची शिक्षा कमी करणें इष्ट आहे असें मला वाटत नाही;** कारण पुराव्यावरून हें स्पष्ट झालें आहे की, झालेल्या हल्ल्यांत पोलीस दलाचे प्राण गेले नाहीत, ही भाग्याचीच गोष्ट समजली पाहिजे. ज्यांना फक्त दोनच वर्षांची शिक्षा झाली आहे त्यांची मुदत आता संपत आली आहे. लड्डूशा व नशीबखां याने डि० मॅ० वर हल्ला केला होता व त्याला झालेल्या गंभीर दुखापतीला तेच जबाबदार आहेत; म्हणून त्यांना प्रत्येकीं सात वर्षांच्या सक्त मजुरीची शिक्षा झालेली आहे. पण त्यांची शिक्षा कां कमी करण्यांत यावी याचीं कोणतींहि खास कारणें सांगण्यांत आलेलीं नाहीत, "खून करण्याचा प्रयत्न" हा जो आरोप त्यांच्यावर ठेवण्यांत आलेला होता त्या बाबतींत (खालच्या कोर्टांतून) त्यांना दोषमुक्त करण्यांत आल्यानंतर त्यांना देण्यांत आलेली शिक्षा कांहीशी अयुक्तिक (illogical) वाटते. जमावाने जें केलें व जें करण्याचा प्रयत्न केला त्याहून अधिक त्यांनी कांहीच केलें नाही. म्हणून त्यांच्या बाबतींत शिक्षा कमी करणें व ती चार वर्षांवर आणणें समर्थनीय ठरेल. एवढी सुधारणा करून बाकीच्या शिक्षा माझ्यामतें कायमच ठेवल्या पाहिजेत."

सही:—**एफ्० एल्० ग्रिल,**
चीफ् जस्टिस.

ता० २९-१२-१९४४

प्रकरण ९ वें.

शहीद स्मारकसमितीची स्थापना

राष्ट्रीय-परिस्थिति क्रमाक्रमाने निवळत गेली. केवळ दडपशाहीच्या जोरावर लोकांच्या शारीरिक उठावण्या कांही काळ दाबणें शक्य असलें तरी त्यांच्या मनांत भडकलेली असंतोषाची आग विझवणें अशक्य असतें, याची जाणीव ब्रि० सरकारला होत गेली. महायुद्ध संपलें. युरोपांत दोस्त विजयी झाले. प्रशांत महासागरांत अमेरिकेच्या परमाणु-स्फोटकाने (Atom Bomb) जपानवर मात केली. जपाननेंहि दोस्तासमोर गुडघे टेकले. युद्धसमाप्तीच्या सुमारास म्हणजे युरोपांतील युद्धांत विजय मिळाल्यावर व जपानी युद्धाचा अंत होण्यापूर्वी ब्रि० साम्राज्याचे कुटिल महामंत्री चर्चिल हे आणखी एक डाव खेळले. महायुद्धाच्या निमित्ताने हातांत आलेली ब्रि० साम्राज्याची सत्ता आणखी निदान पांच किंवा तीन वर्षे तरी आपल्याच हातीं रहावी अशी हाव त्यास सुटली. म्हणून पूर्वेकडील युद्ध संपण्यापूर्वीच ब्रिटनमध्ये त्यांनी निवडणुकीचा फड मांडला. युद्धनेते व युद्धविजेते या नात्याने त्यांना ब्रि० जनतेंत जी लोकप्रियता मिळाली होती तिचा फायदा घेऊन युद्धाचा पूर्वेकडील भाग संपण्यापूर्वीच स्वदेशांत निवडणुकीचा फड जिंकण्याचा त्यांनी इरादा केला. पण त्यांत ते अयशस्वी झाले. त्यांच्या पक्षाचा प्रचंड पराभव झाला आणि ब्रिटनच्या इतिहासांत पहिल्यांदाच ब्रि० मजूरपक्ष प्रचंड बहुमताने पार्लमेंटांत निवडून आला व अधिकारारूढ झाला.

मजूर मंत्रीमंडळ ब्रिटनमध्ये अधिकारारूढ झाल्यानंतर ब्रिटनच्या साम्राज्यविषयक व आंतरराष्ट्रीय धोरणांत क्रमाने पण निश्चितपणें परिवर्तन होऊं लागलें. ब्रि० लोक हे परिवर्तनतंत्रांत मोठे कुशल आहेत. प्रत्यक्ष परिवर्तन असतांनाहि त्याला ते परिवर्तन म्हणणार नाहीत. बादशहांच्या सरकारचें जुनें व निश्चित धोरणच आम्ही पुढे चालवीत आहोंत असें ते म्हणत राहतील. प्रत्यक्ष आपल्या बादशहाचें डोकें ते कापून आणतील. पण आपण ही क्रांति केली असें

ते तोंडाने कधी म्हणणार नाहीत. आपल्या पिढीजात स्वभावास अनुसरून बादशहासरकारचें हिंदुस्थानविषयक निश्चित धोरण अंमलांत आणण्याच्या उद्योगास मजूर-सरकार लागलें. चर्चिल-मंत्रिमंडळाच्या धोरणांत आमूलाग्र परिवर्तन केल्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हतें.

या ठिकाणीं आणखी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे की, जरी महात्मा-गांधींना काँग्रेसचें आंदोलन सुरू करण्याची संधि चर्चिल यांच्या मंत्रिमंडळाने दिली नव्हती व कित्येक दिवसपर्यंत पुण्याजवळ आगाखान-प्रासादांत त्यांना त्यांनी डांबून ठेवलें होतें तरी तेथूनहि गांधीजी एकटे हिंदी स्वातंत्र्याची लढाई लढतच होते. आगाखान-प्रासादाच्या बंदीखान्यांतून गांधीजींनी त्या वेळचे व्हाइसरॉय लार्ड लिनलिथगो व ब्रि० मंत्रिमंडळ यांच्याशीं केलेला पत्र व्यवहार हें एक अपूर्व वाङ्मय आहे. तो एक अद्‌भुत वाङ्मय-खंड आहे. जगाच्या स्वातंत्र्य-वादी वाङ्मयांत, आगाखान-प्रासाद व व्हाइसरॉय-प्रासाद यांच्या दरम्यान झालेल्या या पत्रव्यवहाररूपी वाङ्मयखंडाचें स्थान फारच उच्च लागेल यांत शंका नाही. गांधीजींना हिंदुस्थानांत कांहीं करतां येऊं नये म्हणून चर्चिल महाशयांनी त्यांना तुरुंगांत डांबलें, पण तेथे बसून त्यांनी जें केलें तें हिंदु-स्थानच्या तर कामीं पडेलच, पण जगाच्या बाजारांत त्यामुळे काँग्रेसची इभ्रत आणखी वाढली व ब्रि० सत्तेची इभ्रत घटली. हिंदी स्वातंत्र्याचाच केवळ नव्हे, तर जगांतील सर्वच पददलित जनतेचा लढा हा एकटा म्हातारा तुरुंगांतून लढला. गांधीजींच्या या माऱ्याने लॉर्ड लिनलिथगो इतका हैराण झाला की, त्याची ती व्यथा त्याच्या पत्रव्यवहारांत उमटूं लागली.

गांधीजी तुरुंगांत असतांना त्यांच्या परिवारांतील दोन सर्व श्रेष्ठ परिजन ब्रि० सरकारच्या बंदीजीवनाच्या आगींत जळून भस्मसात् झाले. महादेव भाई देसाई व पूज्य माता कस्तुरबा यांचे तुरुंगांतील मृत्यु हा ब्रीटनच्या राज्य-व्यवस्थेवर लागलेला कायमचा कलंक होय. पुढे गांधीजींनी तुरुंगांत २१ दिवसांचा उपवास केला. या उपवासाचें नीतिशास्त्रहि त्यांनी ब्रि० सरकारला लिहिलेल्या पत्रांतून प्रकट झालें आहे. ब्रि० सरकार त्यावेळीं गांधीजींचें रक्त पिण्यासच बसलेलें होतें. चर्चिली राजवटीचा तो दंडक होता. गांधीजींच्या उपवासाने सर्व

देश हादरून गेला. त्यांना युरेमिया झाला. त्यांची शुद्धहि गेल्यासारखी झाली. कांही दैवी चमत्कार झाला तर गांधीजी बचावतील, एरव्ही त्यांची आशा. सोडलेली चांगली असें नामांकित डॉक्टर बोलूं लागले. पण ब्रि० सरकार त्यावेळीं दगडासारखें मख्ख होऊन बसलें. त्यानें अशाहि स्थितींत गांधीजींची मुक्तता करण्याचें नाकारलें. असें म्हणतात कीं, उपवासांत गांधीजी जर मेलेच तर त्यांचें दहन करण्यासाठी चंदनी चितेची सर्व तयारी ब्रि० सरकारने करून ठेवली होती पण गांधीजींची इच्छाशक्ति जबर! उपवासाच्या अग्निदिव्यांतूनहि ते पार पडले. डॉक्टर लोकांनी म्हटल्याप्रमाणे चमत्कार घडला खरा!!

यानंतर आंत्रविकाराने आजारी पडल्याचें निमित्त करून ब्रि० सरकारने त्यांची मुक्तता केली. पुन्हा देशांत नवचैतन्य खेळूं लागलें. हजारोंचे समुदाय त्यांच्या प्रार्थनेस जमूं लागले. राजकारणाचें तुंबलेलें पाणी प्रवाही होऊं लागलें. मुदतबंदीचे अनेक पुढारी सुटूं लागले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वार्ताहरांचीं घोळकीं गांधीजींच्यामागे फिरूं लागलीं. नवीन आलेले व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी गांधी–लिनलिथगो–पत्रव्यवहार प्रसिद्ध करण्यांस परवानगी दिली. ब्रि० सरकारच्या नीतिवर्तनाचें पहिलें ममक उपलब्ध झालें.

हळूहळू हें परिवर्तन अधिक विशद होऊं लागलें. अद्यापि इंग्लंडमधल्या निवडणुकी संपल्या नव्हत्या. लोकमताची खुशामत करण्याची जरूरी मि० चर्चिल यांना भासूं लागली होती. हिंदुस्थानांतील त्यांची दडपशाही विफल ठरली होती. निवडणुकींतला एक पवित्रा म्हणून त्यांनी हिंदुस्थानांतील दडपशाहीचें धोरण परत घेण्याचें ठरविलें आणि हिंदुस्थानांत हिंदी पुढाऱ्यांची सर्वपक्षीय परिषद भरवून तिच्यापुढें हिंदी सुधारणांच्या कांही योजना मांडण्याचें ठरविलें. त्यासाठीं काँग्रेस–वर्किंग–कमेटीची अहमदनगरच्या किल्ल्यांतून मुक्तता करण्यांत आली. पहिली सिमला–परिषद भरली व अयशस्वी झाली. पण राजकारणाचा प्रवाह वेगाने वाहूं लागला. आपले राष्ट्रीय पुढारी सुटलेले पाहून जनतेला महान् आनंद झाला.

ब्रिटनमधल्या निवडणुकींत चर्चिलपक्ष पराभूत झाला व मजूरपक्ष विजयी झाला. व्हॉइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी इंग्लंडची वारी केली. हिंदुस्थानांत केंद्रीय


च प्रांतीय विधीमंडळांच्या निवडणुकींची नव्या मजूरसरकारची घोषणा बरोबर घेऊन ते परत आले. निवडणुकींची प्रचंड धामधूम झाली. १९३६ च्या निवडणुकींत हिंदुस्थानांतील ११ पैकी ६ प्रांतांत कॉंग्रेस विजयी झाली होती. पण १९४६ च्या या निवडणुकींत ती ११ पैकी ८ प्रांतांत विजयी झाली. केंद्राचा प्रश्न सुटेल तेव्हा सुटो. पण १९४६ च्या एप्रीलांत हिंदुस्थानच्या आठ प्रांतांत कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें सुरू झालीं. अत्यंत बिकट अशा आर्थिक व सामाजिक परिस्थितींत कॉंग्रेसने अधिकाराचीं सुत्रें हातीं घेतलेलीं पाहून जनतेला निरतिशय आनंद झाला.

या निवडणुकींच्यावेळीं मध्यप्रांत कायदेमंडळासाठी कॉंग्रेसचे अमरावती तालुक्यांतील उमेदवार म्हणून यावलीचे वीर पंजाबराव यांना उभें करावें असा कांही मंडळींनी प्रयत्न केला. पण वेळेच्याआंत त्यांच्या निवडणुकीचा अर्ज प्रांतीक कॉंग्रेस कमेटीकडे दाखल करणें शक्य झालें नाही, व यामुळे हा विचार सफल होऊं शकला नाही. वऱ्हाड-मध्यप्रांतांत कॉंग्रेसचें मंत्रीमंडळ स्थापन झाल्यावर त्याने चोवीस तासांत आष्टी, चिमूर, रामटेक, यावली येथील राजबंदींची व मगनलाल बागडी प्रभुति हिंदुस्थानी लालसेनेच्या लोकांची तुरुंगांतून मुक्तता केली. वीर पंजाबराव सुटून आले. यावलीकरांना परमानंद झाला.

यावलीच्या वीर गाथांचा प्रसार आधीच प्रांतभर झालेला होता. १९४५ सालीं, म्हणजे १९४४ च्या दिसेंबरांत हायकोर्टाच्या निर्णयाने यावलीचे ता. १८ ऑगस्टचे वीर सुटून आल्यानंतर प्रथमतःच, १८ ऑगस्टचा दिवस यावलीला मोठ्या थाटामाटाने व उत्साहाने साजरा झाला होता. आपले वीरपुत्र सुटून आलेले पाहून यावली आपलें गेल्या दोन तीन वर्षांतलें सर्व दुःख विसरली. तिची मान सुरवातीपासून अखेरपर्यंत ताठच राहिली. आता फक्त एकच शल्य तिच्या काळजांत सलत होतें. तें म्हणजे १५ ऑगस्टच्या क्रांतीचे वीर पंजाबराव व त्यांचे सहकारी अजून तुरुंगांत होते, हें होय. पण कॉंग्रेस मंत्रिमंडळाने अधिकार ग्रहण केल्यावर कांही तासांतच त्यांची मुक्तता केल्यानंतर तर यावलीच्या आनंदास पारावार राहिला नाही. स्वातंत्र्याच्या वेदीवर बलिदान गेलेल्या वीर पुत्रांच्या मरणाचा तिला गौरव वाटत होता. पंजाबराव यांच्या सुटकेनंतर त्यांनी

शहीद स्मारक समिती स्थापन केली आणि यावलीच्या आपल्या विपद्ग्रस्त बांधवांना मदत करणें आणि यावलीच्या शहीदांचें स्मारक उभारणें हीं दोन कामें त्यांनी तावडतोब हातीं घेतलीं. यावली येथील दानशूर शेठ श्री. रामकिसन अंबादास उर्फ बाबूशेठ मुंदडा यांनी तावडतोब गांवाशेजारील सुमारें २५०० रु. किंमतीची आपली २ एकर २० गुंठेची वाडी स्मारकासाठी शहीद स्मारक समितीला दान दिली. त्यांच्या या औदार्यामुळे स्मारकाच्या योजनेला एकदम जोराची चालना मिळूं शकली. याशिवाय विदर्भ प्रांतिक काँ. लाहि वऱ्हाडांतील शहीदांच्या स्मारकासाठी त्यांनी ५०० रु. ची देणगी दिली आहे. यावलीच्या सार्वजनिक कार्यात १९४२ पासून आजपर्यंत वेळोवेळीं त्यानी उदार साह्य केलें आहे.

स्मारकाकरितां २००० रु. किंमतीचें शेत बक्षीस दिलें



श्रीमान शेठरामाकिसन अंबादास (ऊर्फ) बालू शेठ



दे. भ. रघुनाथमल कोचर
एम्. एल्. ए.



श्री. देवकिसन झेवर

प्रकरण १० वें

अत्याचारांच्या चौकशीची मागणी

काँग्रेसचें मंत्रिमंडळ वऱ्हाड-मध्यप्रांतांत सत्तारूढ झाल्यानंतर थोड्याच दिवसांनी प्रधानमंत्री पं० रविशंकरशुक्ल यांनी स्वतःच्या सहीने एक परिपत्रक प्रांतांतील सर्व काँग्रेस कमिट्यांचेकडे पाठविलें व १९४२ च्या आंदोलनांतील सरकारी अधिकाऱ्यांच्या अत्याचारांची हकीकत संकलित करण्यास सुरुवात केली. या परिपत्रकास अनुसरून वीर पंजाबराव यांनी यावली हत्याकांडाची समग्र माहिती संकलित करून प्रधानमंत्र्यांकडे पाठविली. या बाबतींत वीर पंजाबराव यांनी प्रधान मंत्री पं० शुक्लाजी यांना जो एक सविस्तर खलिता लिहिला तो महत्त्वाचा असल्याने त्यांतील कांही भाग येथे उद्धृत करण्यांत येत आहे. सुटून आल्याबरोबर यावलीच्या आपल्या विपद्ग्रस्त बांधवांना मदत करण्याचें कार्य त्यांनी कसें शिरवर घेतलें याचीहि खलित्यांतील पुढील उताऱ्यावरून कल्पना येण्यासारखी आहे.—

"सरकारी अधिकाऱ्यांनी जे अत्याचार केले, जो उद्दामपणा दाखविला व जीं बेकायदा कृत्यें केलीं त्यांचा परिणाम म्हणून अनेक लोक मेले, कित्येक जन्माचे जायबंदी झाले व त्यांच्यावर अवलंबून असणारे कुटुंबीय निराश्रित झाले, १०,००० रु० चा प्रचंड सामुदायिक दंड यावलीला भरावा लागला. कित्येक गरीब लोकांचीं घरेंदारें उध्वस्त झालीं व जंगम मालमत्ता जप्त करण्यांत आली व तिची एकतर विकटाक करण्यांत आली अथवा ती हरविली गेली. पुष्कळसे लोक दीर्घ मुदतीकरिता तुरुंगांत डांबले गेले. त्या मुदतींत त्यांच्याहि कुटुंबियांचे अतिशय हालझाले. ज्यांना गोळ्या लागून जखमा झाल्या होत्या त्यांना योग्य उपचार करण्यत आले नाहीत. गणपत यावले यास पोटांत गोळी लागून जखम झाली. त्याचीजखम केव्हाच नीट दुरुस्त झाली नाही. तुरुंगांतून सुटून आल्यावर त्या जखमेमुळेच त्याचा प्राण गेला. मारोती कांडलकार यास

जी गोळी लागली ती अजून त्याच्या मांडींत आहे. ती केव्हाच काढण्यांत आली नाही. तिच्या वेदनांनी तो अजून विव्हळत आहे.

अशा रीतीने किती तरी लोकांना, त्यांचा कांहीएक अपराध नसतांना यातना सोसाव्या लागल्या अशा परिस्थितींत, त्यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे ही आमची प्राथमिक न्यायाची मागणी आहे. त्यांना जें नुकसान व ज्या यातना भोगाव्या लागल्या त्या बद्दल सरकारच जबाबदार आहे. कारण सरकारी नोकरांनी बेकायदा कृत्यें केलीं म्हणूनच ही आपत्ति या लोकांना भोगावी लागली.

(१) निरनिराळ्या मुदतीसाठी जे लोक तुरुंगांत डांबले गेले होते त्यांची यादी सोबत जोडली आहे. तींत त्यांचा आर्थिक दर्जाहि नमूद करण्यंत आला आहे. ते जितके दिवस तुरुंगांत होते तितक्या दिवसांची नुकसानभरपाई त्यांना मिळावी अशी आमची मागणी आहे.

(२) गोळीबारांत जे मेले त्यांची व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व सांप्रत अगदीच निराश्रित झालेल्यांचीहि यादी सोबत जोडली आहे. या हुतात्म्यांच्या निराश्रित कुटुंबियांना पूर्ण नुकसानभरपाई मिळावी अशी आमची मागणी आहे.

(३) गोळ्या लागून जे जन्माचे जायबंदी झाले आहेत अशा लोकांचीहि एक यादी सोबत जोडली आहे. त्यांना हयातभर पेन्शन मिळावी अशी आमची मागणी आहे.

(४) ज्यांच्या जवळून सामुदायिक दंड वसूल करयांत आला त्यांचीहि एक यादी सोबत जोडली आहे. त्यांचा दंड त्यांना व्याजसहित परत मिळाला पाहिजे अशी आमची मागणी आहे.

(५) ज्यांच्या घरांची मोडतोड करण्यांत आली व जंगम मालमत्ता लांबविण्यांत आली अशांचीहि एक यादी सोबत जोडल आहे. त्यांनाहि नुकसान भरपाई मिळावी अशी आमची मागणी आहे.

(६) ज्यांची जंगम मालमत्ता जप्त करून विकण्यांत आली त्यांची एक यादी सोबत जोडली आहे. आमची अशी मागणी आहे की, विक्रीची किंमत त्यांना परत करण्यांत यावी.

(७) ज्यांच्या जवळून लाचलुचपत घेण्यांत आली अशांची यादी सोबत जोडण्यांत आली आहे. या आरोपांची चौकशी व्हावी व गुन्हेगारांना शासन करण्यांत यावें अशी आमची मागणी आहे.

(८) डि० मॅ० मेल्ड्म, डी० एस्० पी० प्रॅट व त्यांची जी टोळी १८-८-४२ ला यावलीस गेली होती त्या सर्वांची चौकशी होऊन त्यांच्यावर खटला भरण्यांत आला पाहिजे अशी आमची मागणी आहे. एकदा अधिकाराचा खोगीर काढून टाकला म्हणजे तशाच रीतीने त्यांच्या वर्तनाची चौकशी झाली पाहिजे. कोणत्याहि खासगी व्यक्तीच्या असल्या वर्तनाला जे नीतिनियम लागूं पडतील त्यांच्याच आधारें त्यांचीहि चौकशी झाली पाहिजे व तेच कायदे त्यांनाहि लागूं करण्यांत आले पाहिजेत; आणि त्याच कायद्यानुसार त्यांना शासनहि झालें पाहिजे.

कायद्याच्या दृष्टीनेहि परिस्थिति अशीच आहे. डि० मॅ० हा आपलें सरकारी कर्तव्य बजावण्यास यावलीस गेला नव्हता हें एकदा मान्य केलें, म्हणजे तो दंगेखोर ठरतो आणि त्याने उभारलेल्या बेकायदा दंगेखोरांची सशस्त्र टोळी आणि शांतताप्रिय ग्रामीण लोक यांच्यांत ता० ऑगस्ट १९४२ ची चकमक उडाली असें ठरतें. डि० मॅ० ची टोळी ही बेकायदा जमाव तर होताच पण ता आक्रमकहि होता. त्यांच्याजवळ शस्त्रें होतीं. डाका घालणें व लूटमार करणें, हा त्यांचा उद्देश होता. गांवांत प्रवेश केल्यापासूनच त्यांनी उद्दामपणाची व आक्रमक वृत्ति धारण केली होती. त्यांनी लोकांवर गोळ्या झाडल्या व खून पाडले. ९३ कलमी सरकारलाहि या खटल्याच्या या स्वरुपाची जाणीव झाली होती; आणि, या खटल्यांतलि अपीलाचा निर्णय जाहीर झाल्याबरोबर C. P. & Berar maintanance of order and resto:ation of order and collection of fine (indewnity) नांवाचा कायदा त्यांनी जारी केला. १९४५ चा

कायदा नं. २ या नांवाने तो प्रसिद्ध आहे. या कायद्याने असला (बेकायदा) दंड बसविण्यांत आला असेल तो कायदेशीर ठरविण्यांत आला आणि ८ ऑगस्ट १९४२ नंतर सरकारी नोकरांनी कोणतेहि बेकायदा हुकूम जारी करून दुसऱ्यांना बेकायदा कृत्यें करण्यास लावलें असेल अथवा स्वतःच तीं केलीं असतील, तर त्यांबद्दल त्यांना पूर्ण संरक्षण देण्यांत आलें. यावलीखटल्यांतील अपीलांच्या निर्णयाचा हा साक्षात् परिणाम होय. हा कायदा रद्द करण्यांत आला पाहिजे अशी आमची मागणी आहे. तो जरी रद्द करण्यांत आला नाही, तरी त्यामुळे डिपार्टमेंटल चौकशी करण्यास व अत्याचारी लोकांना नोकरींतून बरखास्त करण्यास कोणताच प्रत्यवाय नाही. त्यांनी केलेले गुन्हे अतिशय गंभीर स्वरुपाचे आहेत. मानवतेला त्यांनी फाटा दिला आहे. सरकारी नोकरांनी ताळतंत्र सोडून केलेल्या वागणुकीमुळे अज्ञान गांवकऱ्यांना जबरदस्त भुर्दंड भरावा लागला आहे.

या टोळींत कांही खालच्या दर्जाचे हिंदी अधिकारी व सरकारी नोकरहि होते. त्यांची स्थिति खरोखरच बिकट होती. वरिष्ठांचे हुकूम पाळण्यासाठीच ते तेथे गेलेले होते. येथपर्यंत त्यांच्या हातून घडलेलीं कृत्यें स्वेच्छापूर्वक घडलीं असें म्हणतां येणार नाही. परंतु एका विशिष्ट अवस्थेंत, या कृति केवळ परेच्छे-नेच घडल्या असें म्हणतां येणार नाही. ज्या वेळीं एखादा खेड्याचा पाटील किंवा सब् इन्स्पेक्टर खोटी जबानी देतो अथवा आतिशयोक्त हकिकती सांगतो, किंवा लाचलुचपत घेतो, तेव्हा त्याची ती कृति स्वेच्छापूर्वकच घडलेली असते; हा फरक ध्यानांत ठेवणें अवश्य आहे.

वरिष्ठांच्या आज्ञेप्रमाणे एखाद्या कान्स्टेबलने गोळ्या झाडल्या तर त्याची ती कृति परेच्छाजनित ठरेल. परंतु ताळतंत्र सोडून बेतालपणे जर त्याने बोळीबार केला असेल, तर ती त्याची कृति स्वेच्छाजनितच म्हणावी लागेल. वरिष्ठांना खूष करण्यासाठी बुध्द्या त्याने ती केली आहे असें मानावें लागेल.

सूड घेण्याची आमची इच्छा नाही. ज्यांनी सत्य तेंच निवेदन केलें व वस्तुस्थिति काय होती हें दाखवून दिलें त्यांचीहि कृति आपण लक्षांत घ्या. ते जर सत्य बोलले नसते, तर वस्तुस्थिति सिद्ध होणें अशक्य होतें. आमचें अस

म्हणणें आहे की, न्याय करण्यांत यावा आणि जे खरे गुन्हेगार असतील त्यांना कायद्यास धरून शासन करण्यांत यावें.

म्हणून, आमची अशी मागणी आहे की, "मेल्ड्रम, प्रॅट, व त्यांच्या टोळांबरोबर जे जे लोक ता० १८-८-१९४२ रोजीं यावलीस गेले असतील त्यांची खून करणें, डाका घालणें, चोरी करणें, व परस्त्रापहार यांचे आरोप ठेवून चौकशी करण्यांत आली पाहिजे. व त्यांच्यावर खटले भरण्यांत आले पाहिजेत"

वीर पंजाबराव यांच्या या पत्राच्या फलस्वरूप यावलीपासून वसूल केलेला १०,००० रु० ची सामुदायिक-दंडाची रकम परत करण्याचें आश्वासन कॉं. सरकारने पंजाबराव यांना दिलें.

अत्याचार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर खटले भरण्याबाबतचें धोरण अद्यापि कॉंग्रेस मंत्रिमंडळाने ठरविलेलें नाही. मध्यंतरी असल्या अत्याचारांची चौकशी करण्यासाठी कांही प्रमुख न्याय पंडितांची एक समिती नेमण्याचा घाट घातला गेला होता. पण तो अद्यापि प्रत्यक्षांत आला नाही. अकस्मात् प्रांतांत उद्भवलेल्या हिंदु-मुसलमानांच्या दंग्याच्या वावटळीमुळे वातावरण काबूंत ठेवण्यासाठी कांही कडक उपाय मंत्रिमंडळाला योजावे लागले. व तसें करतांना अधिकाऱ्यांना विश्वासांत घेऊन त्यांना परिस्थितीचा बंदोबस्त करण्यासाठी कांही जादा अधिकारहि द्यावे लागले. त्यामुळेच बहुधा १९४२ च्या अत्याचारांच्या चौकशीचा प्रश्न तूर्त मंत्रिमंडळाने बाजूला ठेवला असावा. स्वातंत्र्ययुद्धासाठी यावलीने केलेला त्याग हा कोणत्याहि अपेक्षा बुद्धीने केलेला नसला, तरी त्याचा गौरव करणें, व यावलीची झालेली हानि भरून काढणें हें कॉंग्रेस मंत्रिमंडळाचें कर्तव्य आहे.

प्रकरण ११ वें

समारोप

—*—

हायकोर्टाच्या निर्णयानुसार यावलीच बहुतेक बंदिस्थ वीर सुटून आल्यानंतर १९४५ च्या ऑगस्टमहिन्याच्या १८ व्या तारखेस यावलीला शहीद स्मारक दिनाचा उत्सव मोठ्या समारंभपूर्वक साजरा करण्यांत आला. वीर वामनराव जोशी यांची प्रकृति बरी नव्हती. तरी यावलीकरांनी वऱ्हाडच्या या भीष्मपितामहाला मेण्यांत घालून यावलीस नेलें. त्यांनीच १९२१ सालीं यावलीला वन्हि चेतविला होता व यावलीकरांचे ते परम श्रद्धेय बनले होते. विदर्भ प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नामदार ब्रिजलालजी बियाणी, आणि अमरावती, आकोला व नागपूर जिल्ह्यांतील स्त्री पुरुष कॉंग्रेस भक्तांचा बराच मोठा मेळावा यावलीस जमला होता. गोळ्या खाल्लेल्या वीरांना शहीदांच्या नातलगांना प्रांताध्यक्षांच्या हस्तें सन्मान-पुरस्सर चांदीच्या ढाली समर्पण करण्यांत आल्या. या ढालींवर भारतमातेचा नकाशा कोरण्यांत आला असून त्यांवर तत्कालीन राष्ट्रपति मौलाना अबुल कलाम आझाद यांचे 'उनकी यादमें जिन्होंने अपने खूनसे हिंदुस्थानके बागको सींचा' हे उद्गार अंकित करण्यांत आले आहेत; असलेच समारंभ बेनोडा व इत्तमगांव येथेहि करण्यांत आले.

हे समारंभ पाहून प्रत्येकाला, आनंद आकाजी पाटील यास गव्हर्नराने दिलेल्या तरवारीच्या समारंभाची, आठवण झाल्याविना राहिली नाही. आनंद आकाजीस मिळालेली तरवार देशद्रोहाचें व स्वजनद्रोहाचें बक्षीस होती तर यावलीच्या वीरांना मिळालेल्या या ढाली त्यांच्या स्वातंत्र्यप्रीतीच्या व त्यागाच्या गौरवार्थ देण्यांत आल्या होत्या. ती तरवार आक्रमक व पाशवी मनोवृत्तीची प्रतीक होती तर ह्या ढाली संरक्षणात्मक व उदात्त मनोवृत्तीच्या द्योतक होत्या. ती तरवार पोलीस संरक्षणाच्या पहाऱ्यांत व पोलीस ठाण्यांत समारंभ करून देण्यांत आली होती तर या ढाली उघड रीतीने, जनतेच्या मेळाव्यांत, जनतेच्या प्रेमाचा पूर वहात असतांना मिळालेल्या होत्या. ती तरवार

मिळालेला पाटील आनंद आकाजी दिवाभीतासारखा तोंड लपवून बसला, बदली पाटील देऊन सुमारें तीन साडेतीन वर्षें त्याने यावलीस तोंड दाखविलें नाही तर या ढाली मिळालेले वीर ब्रि. सरकारवर विजय मिळवून व तुरुंगाचीं दारें फोडून बाहेर आलेले होते व उजळ माथ्याने आपल्या भूमातेचा गौरव वाढवीत स्वैर संचार करीत होते. ती तरवार मिळालेला आनंद आकाजी यावलीकरांच्याच नव्हे, तर समस्त जनतेच्या धिःकारास पात्र झाला, तर या ढाली मिळालेले वीर यावलीकरांच्या गळ्यांतले कंठमणी बनले व जनतेने त्यांना आपल्या हातां खांद्यांवर घेऊन नाचविलें. ब्रि. सरकारनें दिलेली तरवार व कॉंग्रेसने दिलेली ढाल यांत इतकी तफावत आहे.

१९४२ च्या युद्धांत यावलीची महान हानि झाली. ती भरून निघण्यास बराच वेळ लागेल. पण वीर पंजाबराव यांनी तुरुंगांतून बाहेर आल्यापासून या एकाच दिशेने प्रयत्न सुरू केले आहेत. विधायक कार्यक्रमाच्या माध्यमांतून केवढा शक्तिसंग्रह करतां येतो याचा उत्तम अनुभव त्यांनी घेतलेला आहे. त्यांनी यावलीच्या हुतात्म्यांचें स्मारक उभारण्यासाठी जी 'शहीद स्मारक समिति' स्थापन केली आहे तिच्यामार्फत केवळ दगडविटांचें स्मारक बांधावें असा त्यांचा हेतु नाही. यावलीच्या शहीदांच्या नांवाने अनेक विधायक कार्यक्रम चालविण्याचा त्यांचा मनोदय आहे.

यावलीच्या आपद्ग्रस्तांना सरकार मदत करील तेव्हा करो, पण पंजाबराव व त्यांची शहीद स्मारक समिति यांनी हें कार्य आधीच सुरू केलें आहे. तसेंच त्यांनी इतके दिवस यावलीस जो एक धर्मार्थ दवाखाना चालविला त्याला आता प्रांतिक सरकारने व्यापक स्वरुप देण्याचें ठरविलें आहे. आरोग्यमंत्री डॉ० हसन साहेब यांनी एक आयुर्वेदिक चिकित्सालय यावलीस देण्याचें निश्चित केलें आहे. शैक्षणिक पुनर्घटनेच्या योजनेंत 'सिनिअर बेसिक् स्कूल' यावलीला मिळणार आहे. यावलीचा रस्ता दुरुस्त होऊन, माहोली ते यावली पक्की सडक होईल व पावसाळ्यांत यावलीच्या ग्रामस्थांचे होणारे हाल कमी करण्यांत येतील अशीहि आशा बाळगण्यांत येत आहे. सूत-कताई व कपडा विणणें यांचें केंद्र यावलीस सुरू करण्याचा पंजाबराव यांचा विचार आहे.

यावलीस आढळून येत असलेलें जातीय–ऐक्य हा यावलीच्या गर्वाचा विषय आहे. केवळ एकट्या १९४२ च्या ऑगस्ट युद्धापुरताच विचार केला, तर त्यांत मुसलमान व हरिजन यांचीं नांवें आदराने व गौरवाने घ्यावीं लागतील. १८ ऑगस्टच्या युद्धाचा सेनापती अब्दूल रहीम याचा निर्देश हत्याकांडांत आलाच आहे. तसेंच सत्तर वर्षांचा वृद्ध फकीर अकबरशा व त्यांचे मेहेताबशा, जिग्गूशा, व लड्डुशा हे बहादुर पुत्र यांचाहि निर्देश पूर्वी आलाच आहे. अमरावतीस अखिल भारतीय शारीरिक शिक्षण परिषदेचें १ लें अधिवेशन भरलें. त्यावेळीं परिषदेचे अध्यक्ष श्री० शरश्चंद्र बोस यांना यावलीच्या गोळ्या खाल्लेल्या वीरांनी नांदगांव मुक्कामीं १३ आक्टोबर १९४६ ला पहिली सलामी दिली. वृद्ध अकबरशाच्या जखमांचे वण पाहून शरद बाबूंच्या नेत्रांत अश्रु उभे राहिले व त्यांनी त्याला कडकडीत आलिंगन दिलें. त्याप्रसंगाचें छायाचित्र प्रस्तुत ग्रंथांत देण्यांत आलें आहे.

वरील मुसलमान पितापुत्रांशिवाय, नशीबखां यानेहि लढाईंत भाग घेतला होता. लड्डुशा व नशीबखां यांना प्रत्येकी सात वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. यावरून त्यांनी केलेल्या पराक्रमाची जाणीव होण्यासारखी आहे. सत्तर वर्षांच्या वृद्ध अकबरशालाहि चार वर्षांची शिक्षा देण्यांत आली होती. पण आजारीपणामुळे पुढे त्याची सुटका करण्यांत आली. मेहेताबशाला चार वर्षांची शिक्षा झाली, मिर्झाबेग नामक मुसलमानाने पंजाबरावबरोबर १५ ऑगस्टच्या सत्याग्रहांत भाग घेतल्याबद्दल त्याला २ वर्षे सक्त म० ची शिक्षा झाली. १८ ऑगस्टचा सेनापती अब्दुल्ला हा भूमिगत झाला होता, गांधीजींचें वक्तव्य प्रसिद्ध झाल्यानंतर तो पोलीसच्या स्वाधीन झाला. सुमारें १०–११ महिने कच्च्या कैदेंत ठेवून पुढे त्यास सोडून देण्यांत आलें. त्याच्या बिबीजवळून सामुदायिक दंड वसूल करण्यांत आला. विश्वासराव यास भूमिगत होण्याची गळ घालून अब्बास भाईने केलेल्या मदतीचा निर्देश पूर्वी आलाच आहे. ज्यांना गोळ्या लागल्या पण जे पोलीसला सापडले नाहीत व तशाहि अवस्थेंत सय्यद मुनसब मुसलमान हा एक होता त्याचाहि निर्देश करणें अवश्य आहे. यावलीच्या स्वातंत्र्य युद्धांत मुसलमानांप्रमाणे हरिजन बंधूंनीहि प्रमुख भाग घेतलेला होता व राष्ट्रध्वजावरील आपली उत्कट प्रीति व्यक्त केली होती हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. भीमराव खाटीक व बारकाजी मांग यांस गोळी लागली होती व त्यांस

प्रत्येकीं चार वर्षें सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. याशिवाय गणाजी खाटीक, भदूजी खाटीक, बापूराव खाटीक, बारकाजी खाटीक, अमृतराव व काशीराव हरिजन यांना ४ वर्षें सक्त म० ची शिक्षा झाली. तसेंच १५ तारखेच्या सत्याग्रहांत पूर्णाजी हरिजन यांना १ वर्ष स० म० व विठोबा हरिजन सोमवंशी यांना ४ वर्षें स० म० शिक्षा झाली. तसेंच याशिवाय यावलीच्या ९ हरिजन बंधू व भगिनींना मिळून सुमारें २०० रु० सामुदायिक दंड भरावा लागला.

यावलीच्या संग्रामांत भाग घेतलेल्यांच्या याद्या परिशिष्टांत दिल्या आहेत, त्यांवरून हें दिसून येईल की, मुसलमान व हरिजन बांधवांप्रमाणेच स्पृश्य हिंदुसमाजांतील सर्व जातींच्या लोकांनी या संग्रामांत भाग घेतला होता. राष्ट्र कार्यार्थ यावलीने निर्माण करून दाखविलेलें हें जातीय ऐक्य खरोखर अवर्णनीय होय. जाति-धर्म-पंथ इ० कांचे भेद विसरून यावलीचे ग्रामस्थ आपल्या राष्ट्रध्वजासाठी लढले हें नितांत स्पष्ट आहे. त्यांनी घालून दिलेला जातीय ऐक्याचा आदर्श हा निःसंशय अनुकरणीय आहे. यावलीने या संग्रामाच्या निमित्ताने समाजांतील सर्व रोगट विषमता नष्ट करून टाकली. जर समान संधि मिळाली तर समाजांतील एरव्हीं दलित समजला जाणारा वर्गहि धैर्य, पराक्रम, तेज, कौशल्य व राष्ट्रभक्ति इत्यादि गुणांचा कसा उत्कृष्ट आविष्कार करूं शकतो याचें प्रात्यक्षिक यावलीने घालून दिलें.

पुरुषमंडळींप्रमाणेच यावलीच्या स्त्रियांचाहि गौरवानेच निर्देश केला पाहिजे. चिमूर इत्यादि ठिकाणीं झालेले महिलावर्गावरील अत्याचार व त्यांच्या रोमांचकारी कथा ऐकल्या म्हणजे या भयंकर आपत्तीपासून सुरक्षित राहणाऱ्या यावलीच्या महिला भाग्यवान् समजल्या पाहिजेत आणि याचें सर्व श्रेय त्यांच्या १८ ऑगस्टच्या रात्रीच्या सामुदायिक निर्वासनालाच दिलें पाहिजे. आपल्या पुत्रांनी, पतींनी व बंधूंनी केलेला दिव्य पराक्रम त्यांनी डोळ्यांनी पाहिला. गोळीबाराच्या दंगलींत यावलीच्या महिला स्वस्थ बसून राहिल्या नाहीत. जखमी लोकांची त्यांनी शुश्रूषा केली. त्यांनी उपचार केले व धीर दिला. हीं व यासारखींच कामें यावलीच्या महिलांनी १८ ऑगस्टला मोठ्या धीरोदात्तपणें करून दाखविलीं. तानाबाई न्हावीण हिला तर प्रत्यक्ष गोळी लागली. तथाहि

स्थितींत ती भूमिगत झाली व अखेरपर्यंत पोलीसांना सांपडली नाही. यावलीचे सात पुरुष मेले, २३ जन्माचे जायबंदी झाले, ६०–६५ लोकांना २–२ वर्षे तुरुंगांत रखडावें लागलें. पण तें सर्व त्यांच्या मातांनी व पत्नींनी धैर्याने सहन केलें. यावलीच्या २६ महिलांवर सुमारें ६०० रु० सामुदायिक दंड बसविण्यांत आला होता.

यावलीच्या पराक्रमी तरुणांच्याबद्दल बोलण्याची अथवा लिहिण्याची जरूरच नाही. यावलीस सांपडलेल्या रक्तांत बहुतांश भाग त्यांचाच आहे. आणि यावलीच्या वृद्धांच्याबद्दल काय सांगावें? त्यांनी आपल्या पराक्रमानें तरुणांनाहि लाजविलें. वृद्ध जैरामजींच्या हातचा लाठीचा तडाका मेल्ड्रम याच्या स्मरणांतून या जन्मांत तरी जाणें शक्य नाही आणि वृद्ध अकबरशाचें धैर्य व आवेश हीं यावलीच्या युवकांना निरंतर स्फूर्ति देत राहतील.

तेव्हा, हरिजनोद्धार, हिंदुमुस्लीम ऐक्य व सामाजिक विषमतेचा विध्वंस या तीनहि बाबतींत यावलीने अतिशय आघाडी मारली आहे. यावलीच्या सर्व वर्गांत, सर्व समाजांत व सर्व पंथांत एकच भाव वसत आहे व तो म्हणजे राष्ट्रीयता हा होय. महात्मा गांधी हा पुढारी, कॉंग्रेस ही संस्था व स्वातंत्र्य हें ध्येय या त्रयीच्याठिकाणीं यावलीने आपली अविचल निष्ठा प्रकट केली आहे. अज्ञानी, मागासलेल्या व दरिद्री शेतकऱ्यांतून व कामकऱ्यांतून तसेंच मांग, महार, खाटीक, चांभार, कलार, धनगर, धोबी, मुसलमान, माळी, कुणबी, मराठे, मारवाडी इत्यादि सर्व जातींतून स्वातंत्र्य–सेना निर्माण झाली आहे. राष्ट्रीयतेचा हा महान विजय होय व जातीयतेचा पराजय होय. जातीयता–विरहितपणाचें व ज्वलंत राष्ट्रीयतेचें इतकें तेजस्वी उदाहरण इतरत्र क्वचितच आढळून येईल!

राजारामजी औरंगपुरे, कृष्णा पवारप्रभृति यावलीच्या सप्त शहीदांची नामावली भारतीय इतिहासांत नोंदली जाईल यांत शंकाच नाही. पण तुळशीराम अंबडकार, बकारामजी तडस, बारकाजी मराठा, बापूराव खाटीक, रामचंद्र भोजने, हिरामण तडस, दशरथ मराठा, राजारामजी पांचघरे, लड्डुशा, नशीबशा,

अकबरशा, जैरामजी इत्यादि अविस्मरणीय राहतील. या सर्व वृद्ध व तरुण मंडळींचा पराक्रम, महिलांचें साह्य, अब्दुला याची संघटनाकुशलता, मारोतराव पाटील कुंडकर यांची जिद्द व चिकाटी इत्यादि गुणांची खाण म्हणून तर यावलीचें स्मरण सर्व स्वातंत्र्यवाद्यांना करावेंच लागेल. पण या सर्व गुणांना प्रेरकशक्ति ज्यांनी निर्माण केली, ज्यांनी अपूर्व लोकसंग्रह व शक्तिसंचय केला, ज्यांनी अज्ञानी शेतकऱ्या-कामकऱ्यांत व हिन्दु-मुसलमानांत राष्ट्रभक्तीची ज्योत पेटविली व तिच्या जोरावर क्रांतीचा वणवा भडकवून दाखविला त्या वीर पंजाबराव बापुराव यावलीकराचें नांव कोणीतरी विसरूं शकेल काय? आणि पंजाबरावचे बंधू विश्वासराव व चुलते अजाबराव यांचींहि नांवें कोणी विसरूं शकणार नाही! एकाच कुटुंबांतून व एकाच पिढींत हे तीन कर्ते पुरुष जर निर्माण झाले नसते, तर १९४२ सालीं बनला तसा यावलीचा इतिहास बनला असता किंवा नाही याची शंकाच आहे.

आणि पंजाबराव-विश्वासराव यांचीं नांवें जितकीं लोकांच्या स्मरणांत राहतील, तितकेंच, त्याच जातींत जन्मास आलेल्या आनंद आकाजीचेंहि नांव लोकांच्या स्मरणांत राहील!! मराठी इतिहासांत सूर्याजी मालुसरे व सूर्याजी पिसाळ या दोघांचींहि नांवें प्रसिद्ध नाहीत काय? पण एकाने, आपला भाऊ तानाजी मालुसरे पडला, तरी सिंहगड स्वतंत्र केला म्हणून त्याचें नांव स्मरलें जातें, तर दुसऱ्याने स्वराज्याशीं व स्वजनबांधवांशीं द्रोह केला व शत्रूचें दास्य पत्करलें म्हणून त्याचेंहि नांव उच्चारिलें जातें! एकाचा नामोच्चार करतांच अद्यापहि लोकांचें मस्तक नम्र होतें, तर दुसऱ्याचा नामोच्चार होतांच लोक थुंकूं लागतात.

ब्रि० राज्य आल्यापासून अमरावती जिल्ह्याला डि० मॅ० व डि० सुप० ऑफ पोलीस कांही थोडे थोडके येऊन गेले नसतील. पण १९४२ चा डि० मॅ० मेल्ड्रम व डी० एस्० पी० प्रॅट यांचीं नांवेंहि यावलीच्या इतिहासांत काळ्या शाईने अधोरेखांकित करून कायमचीं लिहिलीं जातील! त्यांच्या आततायी, मूर्ख, अहंमन्य व सत्तापिसाट अत्याचारी कृत्यांमुळेच यावलीला आपल्या पराक्रमाचा व त्यागाचा इतका दिव्य आविष्कार करण्यास अवकाश मिळाला. म्हणून यावलीच्या भावी पिढ्या त्यांच्याहि ऋणीच राहतील.

भारतवर्षाच्या समग्र इतिहासांत १९४२ च्या ऑगस्ट क्रांतीचा इतिहास हा एक स्वतंत्र खंड होण्यासारखा आहे. या क्रांतींत यावलीसारख्या विदर्भांतील अवघ्या २००० वस्तीच्या खेड्याने जो भाग घेतला त्याचें निवेदन या ग्रंथांत यथामति करण्यांत आलें आहे. पण यावलीचा हा वृत्तांत केवळ उपलक्षणात्मक आहे. अशा शेकडों "यावली" भारतवर्षांत गाजल्या. त्या सर्वांच्या पुढे यावलीचें मस्तक नेहमी नम्र राहील. ऑगस्ट क्रांतीचा इतिहास संकलित करण्याची एक दिशा या दृष्टीनेच प्रस्तुत ग्रंथाकडे पाहिलें जाईल अशी आशा आहे. मिठाच्या सत्याग्रहासाठी १९३० सालीं गांधीजी दंडीकडे कूच करून जात असतांना वाटेंत रास नामक खेड्यांत त्यांचा मुकाम झाला. नित्यांच्या प्रार्थनेनंतर केलेल्या भाषणांत गांधीजी म्हणाले की, 'मनांत आणील तर एकटें रास खेडेंहि स्वातंत्र्य मिळवून दाखवील' गांधीजींची ही उक्ति भविष्यवाणी ठरली. त्यानंतर बाराच वर्षांनी यावलीने मनांत आणलें व स्वातंत्र्य मिळवून दाखविलें. ता. ८ ऑगस्ट १९४२ ला गांधीजींनी दिलेला "करा अथवा मरा" चा आदेश यावलीने पूर्ण रुपांत आचरून दाखविला.

यावलीचा संग्राम झाल्यापासून अवघ्या ५-६ वर्षांच्या अवधींतच भारतावर स्वातंत्र्योदय झाला आहे. आपण १९४८ च्या जून महिन्यांत हिंदुस्थान सोडून जाणार असें मेल्ड्रम व ॲट यांच्या जात भाईंनी बादशहाच्या परवानगीने घोषित केलें आहे. १९४८ च्या नंतर हिंदुस्थानवर राज्य करण्याचें सामर्थ्य आता ब्रिटिश जातीच्या अंगांत राहिलेलें नाही, असें खुद्द भारतमंत्री लॉर्ड पॅथिक लॉरेन्स यांनी लार्डांच्या सभेंत बोलून दाखविलें आहे. तेव्हा भारतीय स्वातंत्र्याला आता कोणीहि तृष्णामृग म्हणूं शकणार नाही. ती एक प्रत्यक्ष अशी वस्तुस्थिति बनली आहे आणि ही वस्तुस्थिति निर्माण करण्याच्या प्रक्रियेस यावलीने आपलें सर्वस्व समर्पून हातभार लावला आहे.

यावलीने स्वातंत्र्यदेवीला आपल्या रक्ताचा जो अभिषेक केला त्यामुळे यावली हें आता एक पवित्र तीर्थस्थानक्षेत्र बनलें आहे. आपल्या छोट्याशा खेड्याला राष्ट्रीय क्षेत्राचें महत्व आपल्या त्यागाने व पराक्रमाने प्राप्त करून देणाऱ्या समस्त यावलीकरांना जयहिंद !!!

॥ जय हिन्द ॥

परिशिष्ट १ लें

१९३० चे सत्याग्रह्यांची यादी

अ. नं.	पूर्ण नांव	गांव	कलम	शिक्षा
१	शहीद लक्ष्मणराव सितारामजी पाचघरे	यावली	३७९	९ म. २५० रु. दंड; मृत्यु. जेल.
२	विठ्ठलराव दादाजी मंगरूळकर	,,	२६ जी	६ म.
३	गुलाबराव खंडूजी मराठा	,,	३७९	९ म.
४	गुलाबराव गणपतराव मराठा	,,	,,	,,
५	उकंडराव रामजी अंबडकार	,,	,,	,,
६	जैश्रीराम पुंजाजी अंबडकार	,,	,,	,,
७	बापूराव सोनाजी पवार	,,	२६ जी	६ म.
८	मोतीराम चंद्रभान	,,	,,	,,
९	काशीराम पुंजाजी पाटील	कापुसतळणी	३	,,
१०	अमृतराव नारायणराव	,,	,,	,,
११	रामा झावूजी	,,	,,	,,

परिशिष्ट २ रें

यावलीच्या गोळीबारांत गोळ्या लागलेल्यांची यादी

अ. नं.	पूर्ण नांव	वय-वर्षें	धंदा	
१	मारोतराव नारायणराव कांडलकार माळी	२५	शेती	बेकाम झाला
२	रामचंद्रराव सायदाजी भोजने माळी	३०	,,	,,
३	अकबरशा इमामशा फकीर मुसलमान	७०	,,	,,
४	मोतीराम जैरामजी बडोने कोष्टी	१५	,,	
५	गोविंदराव नागोराव अंबडकार माळी	२७	,,	
६	तुळशीरामजी देवरावजी टेकाळे मराठा	२७	,,	

७	नथ्थुजी गोविंदराव खवले माळी	३५	,,
८	जैरामजी बहिराजी वासनकार माळी	२०	,,
९	हिरामणजी सूर्यभानजी तडस माळी	१६	,,
१०	तुळशीरामजी पुंजाजी अंबडकार माळी	२२	,,
११	गोविंदराव बाळकृष्ण सोनार	१९	सोनारकी
१२	विश्वनाथ सूर्यभानजी पवार मराठा	१५	शेती
१३	लक्ष्मणराव शिवरामजी कलाल	२०	,,
१४	मेहेताबशा अकबरशा फकीर मुसलमान	३५	,,
१५	दशरथ शिवरामजी मराठा	२०	,,
१६	भिमराव बालाजी खाटीक	१९	,,
१७	रघुपतराव शामराव देशमुख मराठा	२६	,,
१८	सय्यद मुनसब स० निझाम मुसलमान	१४	,,
१९	जैश्रीरामजी देवरावजी आखरे माळी	३५	,,
२०	आनंदराव देवरावजी लोणे मराठा	२७	,,
२१	अभिमान रावजी यावले माळी	२२	,,
२२	उद्धवराव बाजीराव ढोक मराठा	९	,,
२३	सदाशिव मोतीराम खाटीक	१२	,,
२४	श्रीराम बळीरामजी कयटकार माळी	११	,,
२५	तानाबाई ज० सूर्यभानजी न्हावी	५५	,,

परिशिष्ट ३ रें

ता. १५-८-४२ च्या खटल्यांत शिक्षा व कैद झालेल्यांची यादी

अ. नं.	पूर्ण नांव	वय	धंदा	शिक्षा वर्षे
१	पंजाबराव बापूराव यावलीकर मराठा	३०	शेती	५
२	अण्णाजी परशरामजी मडघे माळी	२२	,,	३
३	विश्वासराव बापूराव यावलीकर मराठा	२७	,,	४॥

४	लड्डूशा अकबरशा फकीर मुसलमान	३५	,,	७
५	रामराव गणपतराव टाकोणे मराठा	३५	,,	४
६	सूर्यभान उर्कड्या सोमोशी नरसिंगपूर	३०	,,	२
७	अमृतराव माहोऱ्या सोमोशी नरसिंगपूर	३०	,,	२
८	काशीराव उर्कड्या सोमोशी नरसिंगपूर	३५	,,	२
९	जयदेवराव जनार्दनराव मानेकर मानभाव	२०	,,	२
१०	सितारामजी सखारामजी झाडपी तेली	२१	,,	२
११	सितारामजी डुमाजी राऊत मराठा	४०	,,	२
१२	राजारामजी गोपाळजी कांडलकार माळी	२८	,,	२
१३	राजारामजी झिंगाजी कांडलकार माळी	३२	,,	२
१४	नथ्थुजी गणाजी बारी	२२	,,	२
१५	बाजीराव सखारामजी ढोक मराठा	४५	,,	२
१६	नथ्थुजी पुंजाजी घोंगडे माळी	३५	,,	२
१७	नथ्थुजी लहानुजी कांडलकार माळी	२८	,,	२
१८	शरीफबेग वासलबेग मुसलमान	४५	,,	२
१९	अमृतराव शंकरराव कोष्टी पहेलवान माहुली	२५	,,	१
२०	राजारामजी नऱ्हाजी पाचघरे माळी	३५	,,	१
२१	पूर्णाजी महेताजी सोमोशी नरसिंगपूर	३०	,,	१
२२	साहेबराव पुंजाजी नागपुरे मराठा खडकी	१७	,,	४
२३	सदाशिव परशरामजी मडघे माळी	२०	,,	४
२४	अण्णासाहेब पंढरपूरकर माहोली	८०	,,	४
२५	विठोबा सटवाजी सोमोशी नरसिंगपूर	६०	,,	४
२६	मोतीराम किसनाजी टाकरखेडे	३५	,,	सुटलेले
२७	मोतीराम पुंजाजी घोंगडे माळी	२३	,,	सुटलेले
२८	जिगुशा अकबरशा फकीर मुसलमान	३०	,,	सुटलेले

परिशिष्ट ४ थें

ता. १८-८-४२ च्या खटल्यांतील कैद व शिक्षा झालेल्यांची यादी

अ. नं.	पूर्ण नांव	वय	धंदा	शिक्षा वर्षें
१	जैरामजी नऱ्हाजी बडोणे कोष्टी	७०	शेती	४
२	गणपतराव सूर्यभानजी यावले माळी	२०	,,	४
३	गोविंदराव नागोजी अंबडकार माळी	२७	,,	,,
४	मोतीराम जैरामजी बडोने कोष्टी	१५	,,	,,
५	तुळशीराम देवरावजी टेकाळे मराठा	२७	,,	,,
६	नथ्थुजी गोविंदराव खवले माळी	३५	,,	,,
७	जैश्रीराम बहिराजी वासनकार माळी	२०	,,	,,
८	तुळशीराम पुंजाजी अंबडकार माळी	२७	,,	,,
९	हिरामण सूर्यभानजी तडस माळी	१६	,,	२॥
१०	गोविंदराव बाळकृष्ण सोनार	१९	सोनारकी	४
११	विश्वनाथ सूर्यभानजी मराठा पवार	१५	शेती	,,
१२	लक्ष्मण शिवराम कलाल	२०	,,	,,
१३	मेहेताबशा अकबरशा फकीर	३५	,,	,,
१४	दशरथ शिवरामजी मराठा	२०	,,	,,
१५	भिमराव बालाजी खाटीक	१९	,,	,,
१६	लड्डुशा अकबरशा फकीर	३५	,,	७
१७	नशीबखा घोळेखा मुसलमान	२६	,,	७
१८	विश्वासराव बापूराव यावलीकर	२७	,,	४॥
१९	अजाबराव बालाजी पाटील मराठा	२८	,,	४
२०	रामभाऊ सितारामजी पाचघरे माळी	३५	,,	,,
२१	बारकाजी शिवरामजी मराठा	२६	,,	,,
२२	बारकाजी झुनाजी मांग	२०	,,	,,
२३	गणाजी राघोजी खाटीक	२५	,,	,,

२४	भदूजा मोतीराम खाटीक	२२	,,	,,
२५	बापूराव राजाराम खाटीक	२८	,,	,,
२६	बारकाजी भिवसनजी खाटीक	३०	,,	,,
२७	रामराव गणपतराव मराठा	३५	,,	,,
२८	गुलाबराव गणपतराव मराठा	४०	,,	,,
२९	सूर्यभान उरकळ सोमोशी नरसिंगपूर	३०	,,	,,
३०	अमृतराव माहोऱ्या सोमोशी नरसिंगपूर	३०	,,	,,
३१	काशीराव उरकळ सोमोशी नरसिंगपूर	३५	,,	,,
३२	जैदेव जनार्दन मानेकर मानभाव	२०	,,	,,
३३	सिताराम सखाराम तेली	२१	,,	,,
३४	शिवराम नारायणसा कलाल	६५	,,	,,
३५	मनसराम ठुमऱ्या पारधी	२२	,,	,,
३६	बापूराव सखाराम खासबागे माळी	२०	,,	,,
३७	सदाशिव चंद्रभानजी बानाईत माळी	२०	,,	२
३८	नथ्थुजी मोतीरामजी लंगडे माळी	२०	,,	सुटलेले
३९	पांडुरंग कृष्णराव पाटील यावलीकर	३५	,,	सुटलेले
४०	हरिहर रायभानजी भोजने माळी	२१	,,	सुटलेले
४१	विक्रम सखारामजी शिणकर माळी	२०	,,	२ व. सुटलेले

परिशिष्ट ५ वें.

ज्यांच्यावर सामुदायिक दंड बसविण्यांत आला त्यांची यादी.

अ. नं.	पूर्ण नांव	रुपये दंड
१	रामकिसनजी अंबादासजी मुंदडा	३५००
२	अजाबराव बालाजी पाटील	१२५०
३	पंजाबराव बापुराव यावलीकर	७००
४	गणेशराव तुकारामजी खवले	४००

५	वामनराव रायसिंगजी पाटील	४००
६	चंद्रभान नारायणजी बारी	३००
७	रामराव गणपतराव टाकोणे	२००
८	गणपतराव चंद्रभानजी यावलीकर	१३०
९	तुळसाबाई ज. राघोजी माळी	६५
१०	शेषराव गणपतराव पाचघरे	९०
११	महादेव जयरामजी यावलीकर	९०
१२	रोडबा सूर्यभानजी मनगटे	८५
१३	जनाबाई ज. परशरामजी मडघे	७५
१४	जैनारायण किसनलाल बंग	६०
१५	जैरामजी गोपाळजी पाचघरे	४८
१६	मोतीराम पुंजाजी अंबडकार	४५
१७	लक्ष्मणराव गोपाळजी पिसे	३५
१८	रघूजी शिवरामजी गणोरकर	१०
१९	सखाराम हिरामणजी खवले	३०
२०	राजाराम हरबाजी खवले	२०
२१	पुंजाजी धनाजी वासनकार	१८
२२	राजाराम बळीरामजी बोबडे	३०
२३	गणपत नागोजी यावले	२२
२४	केळाजी सूर्यभानजी वानखडे	१२
२५	सूर्यभानजी राघोजी कुरळकार	३
२६	मोतीराम बळीरामजी खवले	१२
२७	महादेव देवाजी श्रीखंडे	२४
२८	अलोकाबाई ज० देवाजी श्रीखंडे	६
२९	चंद्रभान गणाजी फसाटे	३५
३०	जनार्दन सारंगधर मानेकर	५
३१	सिताराम गजमलजी यावले	४
३२	गणेश तुकारामजी खवले	१६

३३	तुकाराम सूर्यभानजी चांदुरे	१०
३४	सुखुना मर्द बहेराजी खवले	३
३५	अमृतराव लक्ष्मणराव पिसे	८
३६	दत्तू नारायणजी घाटोळ	७
३७	बिराजी श्यामलाजी धनगर	१०
३८	देवकी मर्द चंपतराव चांदुरे	६
३९	सूर्यभान मोतीराम भोजने	३५
४०	झिंगुजी सितारामजी अळसपुरे	१२
४१	देवराव सूर्यभानजी चांदुरे	५
४२	त्र्यंबक काशीराम वाणी	५
४३	रुस्तुम हरिबुवा मानेकर	५
४४	किसन गणपतराव बोडखे	४
४५	बापूराव नागोजी अंबडकार	२८
४६	भदाजी भिवाजी खवले	२२
४७	इरभान मोतीरामजी भोजने	१८
४८	पुंजाजी कृष्णाजी खवले	१०
४९	आनंदराव रायाजी लेंडे	३०
५०	कृष्णा विश्राम महार	२०
५१	गंगू मर्द रावजी नागोणे	२०
५२	किसन रावजी नागोणे	२०
५३	बनी मर्द सूर्यभान यावले	२०
५४	किसन रामजी अडोकार	२०
५५	बापुन्या बाग्या महार	१०
५६	देवराव तुकारामजी आखरे	२०
५७	केशवराव गोविंदराव यावलीकर	२०
५८	शामराव गोविंदराव यावलीकर	२०
५९	मारोती शिवराम यावलीकर	२०
६०	भगवान झिबल्या महार	२०

६१	नत्थुजी चिंतामणजी लंगडे	२५
६२	सुग्राबी मर्द अब्दुल्ला रहिम	३
६३	खुशाल अभिमानजी इंगळे	४
६४	बालाजी रायाजी खाटीक	१०
६५	सदू मोतीराम खाटीक	१२
६६	परशराम डेबूजी खाटीक	२
६७	पांडुसा मनसा तेली	१०
६८	कोंगशी मर्द रुंज्या चांभार	४५
६९	उत्तम गुलाबराव मराठा	२
७०	जनाबाई ज० जैराम बडोने	१०
७१	उदेभान राघोजी पाचघरे	१०
७२	रघुपत शामराव देशमुख	२८
७३	अन्नपूर्णा ज० शामराव देशमुख	८
७४	वाळलाजी रामजी घाटोळ	२०
७५	तुळशीराम श्रावणजी पाचघरे	२५
७६	जनी मर्द सूर्यभानजी यावले	४
७७	माली मर्द नत्थुजी पाचघरे	५
७८	नत्थु गणाजी बारी	१०
७९	कृष्णराव सितारामजी देखमुख	४०
८०	जनाबाई ज० संगीतराव टाकोणे	२०
८१	कोल्हाबाई मर्द किसनराव पाटील	१०
८२	बकाराम हिरामणजी डेहनकार	६
८३	गणू बल्लू परीट	२५
८४	पांडुरंग कृष्णराव यावलीकर	१२०
८५	भाऊराव अमुतराव उल्हे	२८
८६	तुळशीराम किसनाजी मडघे	४३
८७	गोविंदराव नागोजी अंबडकार	१५०
८८	मारोती सूर्यभानजी वानखडे	५६
८९	नत्थुजी आण्याजी भोजने	८०

९०	गंगाराम रामजी खवले	४५
९१	झिंगू देवाजी माळी	१६
९२	बाजीराव शिवरामजी माळी	८५
९३	नागोराव बसंतराव देशमुख	७
९४	गंगाराम नागोजी पवार	६
९५	राजाराम झिंगाजी कांडलकर	४५
९६	सूर्यभानजी खवले	२२
९७	रायजी मर्द चंद्रभान बोबडे	२
९८	तुकाराम रामजी भोजने	४
९९	गणपत गोविंदराव खवले	८
१००	सरवुबाई ज० किसनराव बोबडे	५०
१०१	तुळसाबाई ज० किसनराव बोबडे	२५
१०२	मोतीराम पुंजाजी घोंगडे	७५
१०३	गोविंद झिंगाजी बागवान	१०
१०४	लक्ष्मण रामजी खेरडे	१०
१०५	गुलाबराव देवराव लोंणे	५०
१०६	अनुसया ज० विश्राम भोगे	१००
१०७	परशराम किसनजी यावले	८
१०८	रामचंद्र बळिरामजी ढोक	१५
१०९	इस्तारी लटारी झाडपी	३५
११०	बालाजी जैरामजी यावले	२०
१११	अलोका ज० राघोजी हागोणे	१२
११२	कमळजाबाई ज० मोतीराम हागोणे	१२
११३	जैरामजी हिरामणजी खवले	३०
११४	नारायण जागोजी वाघ	१६
११५	मोतीरामजी गणाजी तेली	२०
११६	गोविंद सखाराम कलार	२
११७	किसनाजी पांडुजी अळसपुरे	१०

११८	चंद्रभान धनाजी बानाईत	३०
११९	महादेव दिनाजी बानाईत	३०
१२०	राधाबाई जवजे मोतीराम ढोक	१०
१२१	भिमाबाई जवजे लक्ष्मण कलार	१०
१२२	नामदेव धनसा अग्रवाल	१५
१२३	अंजनाबाई जवजे दौलतराव	१०
१२४	शिवराम वाळकृष्ण जोशी	१५
१२५	लक्ष्मण लहानु माळी	१५
१२६	लक्ष्मण बाळाजी खवले	१०
१२७	गोपाळजी माधोजी कांडलकार	१०
१२८	भगवानजी जैरामजी घोगरे	२५
१२९	मोतीरामजी नारायणजी	१०
१३०	द्रौपदी ज० बळीराम महार	३०
१३१	शामराव श्रावण महार	३०
१३२	विठाबाई ज० निळकंठ देशमुख	८
१३३	गणेशराव गणपतराव देशमुख	१२
१३४	अभिमानजी झोलाजी	२२

परिशिष्ट ६ वें

लाचलुचपतीचे व लूटमारीचे पुरावे

(१—पांडुरंग जैरामजी बडोने यांचे वडील जैरामजी कोष्टी व भाऊ जेलमध्ये असतांना त्यांचेजवळून आनंद आकाजी पाटील यांनी धाकदपटशाही करून ७० रु. घेतले. तसेंच गुलाब हवालदार यांनी माहोलीचे दुकानदार श्री. रामसा तेली यांच्या हस्तें ३० रु. घेतले. याला ते स्वतः साक्षीदार आहेत. पांडुरंग बडोने यांचेंच गांवगुंडांनी सत्याग्रहानंतर दुसरे दिवशींच घर फोडलें, त्यांतील नुकसान येणेप्रमाणे:—

पांडुरंग बडोने यांच्या घरून ५ खंडी ज्वारी, १ खंडी दाळ, खाण्यापिण्याचें घरचें सामान, कपडेलत्ते, सर्व अंदाजें रु. १००० चें नुकसान झालें.

(२) मोतीराम बळीराम खवले यांच्याजवळून श्री. आनंदराव आकाजी पाटील यांचा बंधू रंगराव उर्फ विनायकराव देशमुख यांनी रु. ४५ घेतले.

साक्षीदारः—१ राजाराम हरबाजी खवले
२ बापूराव नागोजी अंबडकार

स्थळः—पाटलांच्या वाड्यांत.

(३) राजाराम इसनाजी यावले यांच्यजवळून २० रु. विनायकराव देशमुखाने व १० रु. गुलाब हवालदाराने घेतले.

साक्षीदारः—(१) तुकारामजी चांदुरे
(२) राजाराम हरबाजी खवले.

(४) चंद्रभानची फराटे यांच्याजवळून पैसे उपटण्यासाठी यांना पोलीस स्टेशनवर नेऊन मुन्शीने मारलें व नंतर आनंदराव पाटील यांनी ५० रु०, विनायकराव देवराव देशमुख यांनी ५० रु०, गुलाबराव हवालदार यांनी २५ रु० त्यांच्याजवळून घेतले आणि गोविंदराव सब इन्स्पेक्टर ३ कुडव ज्वारी गल्या महाराच्या डोक्यावर देऊन घेऊन गेला.

साक्षीदारः—तुकारामजी चांदुरे यांनी फसाटेतर्फे स्वतः हातांनी आनंदराव पाटलाला ५० रु० दिले. पैसे जवळ नसल्यामुळे नारायण पाटील सालोरा यांना ७० रु० स म्हैस विकून व बाकीचे पैसे घरून आणून वरील तिघांना दिले.

(५) चंद्रभान धनाजी बानाईत यांचा मुलगा सदाशिव जेलमध्ये असतांना–तुमचा मुलगा सदाशिव याला सोडून आणतों असें सांगून विनायकराव देशमुख यांनी १०० रु० घेतले.

(६) देवराव तुकारामजी आखरे यांच्याजवळून विनायकराव देशमुख यांनीं शेषराव इंगळे व त्याची अलोकाबाई यांच्यासमोर १५ रु० घेतले.

(७) वामनराव रायसिंगजी पाटील यांनी विनायकराव देशमुख यांना ४० रु० दिले.

(८) रामकिसनजी अंबादासजी मारवाडी यांना आनंदराव आकाजी पाटील व विनायकराव देशमुख यांनी धमकी देऊन ३५ तिफणची जमीन दिल्यास ठीक, नाहीतर तुरुंगात पाठवूं अशी धमकी दिली. रामकिसनचे टिनाचे ३५ तक्ते व मरामायच्या देवळाचे ४० तक्ते आनंदराव पाटील व विनायकराव यांच्या घरीं आहेत.

(९)—जेठमल हिरालाल राठी यांचें घर फोडून नेलेल्या सामानाची यादी.—ज्वारी ३ खंडी किं. रु. १२५; तूर दाळ १ खंडी कि. रु. ८०; गहूं १० कुडव कि. रु. ५०; गूळ २ मण किं. रु. १९; सुपारी १ धडा किं. रु. १; बारदाना पोतें १८ किं. रु. ९; गंज ३ किं. रु. ७; ताट १ किं. रु. २; २ पेले कि. २ रु.; २ चमचे किं. १॥ रु.; पानदान १ किं. रु. २; हें सर्व सामान नेलें. अंदाजें नुकसान ७०० रु.

(१०) दौलत जैरामजी बंबळ यांनी १०० रु. आनंदराव पाटलांना गणपतराव धवस यांचे हस्तें अभिमानजी लेंडे यांचेसमोर दिले. तसेंच ५ कुडव गहू, ३ कुडव दाळ, ५ कुडव ज्वारी व १३ रु. इतका माल नेला.

(११) शेषराव गणपतराव पाचघरे यांनी रु. ५० विनायकराव देशमुख यांना दिले.

(१२) शंकरराव मारोतराव त्रिकांडे यांचें घर फोडून गुंडांनी तांब्या पितळेचीं भांडीं व ज्वारी नेली.

(१३) पांडुसा मनसा खाळे यांच्या दुकानांतील किराणा रु. ७००, कापड रु. १०००, घरांतील वापरण्याचा कपडा रु. २०० व तिजोरींतील ५ तोळे सोन्याचें मंगळसूत्र रु० ४००, कुलूप फोडून नेलें. त्याच सालीं त्यांनी आपलें शेत विकलें होतें.

परिशिष्ट ७ वें.

ज्यांचीं उभीं पिकें कापण्यांत आलीं त्यांचीं नांवें:-

(१) रामकिसनजी अंबादासजी मारवाडी. (२) पंजाबराव बापूराव यावलीकर. (३) वामनराव रायसिंगजी पाटील नरसिंगपूर. (४) मोतीसा गणसा तेली. (५) मोतीलाल मारवाडी सावंगा. (६) सखाराम धनगर शिरजगांव.

परिशिष्ट ८ वें.

लांच न दिल्याबद्दल ज्यांना मारपीट करण्यांत आलीं त्यांचीं नांवें

(१) लक्ष्मणराव गोपाळजी पिसे माळी. (२) भगवानजी जयरामजी घोगरे नरसिंगपूर. (३) केळाजी गोविंदराव अळसपुरे नरसिंगपूर. (४) सदाशिव परशरामजी मडघे माळी. (५) देवबा परशरामजी महानुभाव. (६) बापूराव सखारामजी खासबागे. (७) राजारामजी नऱ्हाजी पाचघरे. (८) मोतीराम अभिमानजी लंगडे. (९) रामभाऊ सितारामजी पाचघरे.

परिशिष्ट ९ वें

ज्यांच्या बैलजोड्या जबरदस्तीने नेण्यांत आल्या व वाहण्यांत आल्या त्यांची यादी:—

(१) रामकिसन अंबादासजी मारवाडी यांच्या २४ जोड्या मनास वाटेल त्यावेळीं २ महिनेपर्यंत नेल्या. (२) लक्ष्मणजी गोपाळजी पिसे १ जोडी. (३) उकंडराव रामजी अंबडकार १ जोडी. (४) राजारामजी झिंगाजी कांडलकार १

जोडी (५) बळीराम लक्ष्मणजी तेली १ जोडी (६) सूर्यभान बाळाजी यावले १ जोडी. (७) तुळसाबाई जवजे राघोजी १ जोडी. (८) गोविंद शिवरामजी घाटोळ १ जोडी. (९) सूर्यभानजी रामजी खवले १ जोडी. (१०) भदूजी भिवाजी खवले १ जोडी (११) सूर्यभानजी मनगटे १ जोडी. (१२) उदेभान राघोजी पाचघरे १ जोडी (१३) पुंजाजी मराठी १ जोडी (१४) गोविंदराव झाडपी १ जोडी (१५) इस्तारी तेली १ जोडी (१६) नारायण पुनाजी बोबडे १ जोडी. (१७) मोतीराम बळीराम खवले १ जोडी (१८) मोतीराम हागोणे १ जोडी. (१९) बालाजी जयरामजी यावली १ जोडी (२०) सखुबाई बोबडीन १ जोडी (२१) जेठमल हिरालालजी १ जोडी (२२) चंद्रभानजी बारी १ जोडी (२३) तुकारामजी विक्रमजी खवले १ जोडी (२४) शेषराव गणपतराव पाचघरे १ जोडी (२५) मोतीसा गणसा तेली १ जोडी (२६) चंद्रभानजी बानाईत १ जोडी (२७) मोतीराम पुंजाजी अंबडकार १ जोडी (२८) लक्ष्मण खेरडे १ जोडी (२९) भिमराव धनगर १ जोडी (३०) चंद्रभान गणाजी फसाटे १ जोडी.

परिशिष्ट १० वें

सरकारी मालाच्या मोडतोडीची व नुकसानीची यादी

(१) पोस्टाची पेटी तोडण्यांत आली.

(२) पोलीस पाटलाचे कागदपत्र फाडण्यांत आले.

(३) फॉरेस्ट नाका जाळण्यांत आला.

(४) माहोली ते अमरावती सडकेवरील वाघोली गांवापासून ते माहोली-पर्यंत दोन मैलांचे तारेचे खंबे व तारा तोडण्यांत आल्या.

(५) माहोलीचे पोलीसस्टेशनमधील कागदपत्र फाडण्यांत आले आणि स्टेशनच्या खिडक्या, कवाडें, खुर्च्या, टेबलें व इतर सामानहि तोडण्यांत फोडण्यांत आलें.

शुद्धिपत्र

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
६	१५	पटवाऱ्यांचीहि जोडगोळी	पटवाऱ्यांची ही जोडगोळी
७	२	स्वालबनाचा	स्वावलंबनाचा
१५	१३	वशवंत	यशवंत
२३	६	महादेवता,	महादेवता
२८	५	पोरवरुन	पोखरून
२९	१४	लागला	लागली
२९	२४	ब्रि. सरकारला हिंदुस्थानांतील	हिंदुस्थानांतील ब्रि. सरकारला
३१	४	ब्रिटन	ब्रिटिश
३६	२२	भेदाला	भेदाचा
४२	१५	नये; आणि ही	नये; ही
४६	१६	डंगा दिल्याशिवाय	झेंगा दिसल्याशिवाय
४८	२२	तत्राचा	तंत्राचा
४९	२७	कांग्रेस अधिकृत	कांग्रेसचे अधिकृत
५७	१३	सत्याग्रहाचा	सत्याग्रहाच्यां
६०	२५	रजापुत	राजपुत
६२	२६	प्रतीकांच्यां	प्रतीकांचा
६६	१९	उठलेला	उठलेल्या
६७	७	कटां	कंठां
६८	२	मागे	मार्गे
६८	१२	मातेभोवती	मानेभोवती
७४	१४	हुकुम आहे	हुकुम आहे’
७७	२३	बाम्या	बातम्या
७७	२४	मोर्शीला	मोर्शीचा
८१	१०	लाणी	लोणी
८७	२५	भितील	भितील

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
८८	१७	त्यांच्यावर फक्त	त्यांच्यावर त्यांनी फक्त
९९	११	माहोलीस जरी प्रत्यक्ष	माहोलीस प्रत्यक्ष
९९	२१	अशीच कार्यांची	अशीच कार्पण्याची
१०१	२	लवणारा	लावणारा
१०७	१८	कागळ्या	कागाळ्या
११०	२३	-आकाजी प्रभुती	-आकाजी प्रभृति
११२	१०	ता. आगस्ट	ता. १८ आगस्ट
११३	२३	कर्यास	कयास
११८	१३	मूठमेट	मुठभेड
११९	१९	विरवरुन	विखरून
१२५	२४	जर्जाचा	दर्जाचा
१३०	१७	दुकानासोरच्या	दुकानासमोरच्या
१३२	१५	आक्रमण	आक्रमक
१३५	१८	लागून दडला	लागून पडली
१३८	२३	समजू झताली	समजूत झाली
१३९	१८	तसेंच	बरेंच
१४०	२०	गिळाल्यामुळे	मिळाल्यामुळे
१४३	१२	वीरमणाचे	वीर मरणाचें
१४४	२५	मानवरील	मानेवरील
१४५	१३	युद्धक्षप	युद्धक्षम
१५४	१६	उर्ष्ट्टें	उद्दे
१६३	८	कायद्याने	कायद्याचे
१६५	५	पाडल्यानंतर	पडल्यानंतर
१६५	२३	कीतीतरी	कांही
१७१	२४	तेथे नसतो	तेथे असतो
१७३	८	लागली." असो.	लागली. असो.
१८२	१३	झालेली	केलेली

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
१८६	२३	हातीं लागतो	हातीं धरावा लागतो
१९८	१५	रंग	तंगच
१९९	२०	रे. ड.	रे. इ.
२२१	२०	पुन्हा सांगितलें	पुनः पुन्हा सांगितलें
२२२	१७	व भारतीय	व त्यामुळे भारतीय
२२२	१८	भीमराव, रामकिसनजी उर्फ बाबूशेठ,	अन्नासाहेब हिवरेकर
२२६	३	प्रकर्णी	प्रकरणीं
२३८	३	बेकायदा	बेकायदा होता
२३९	५	काणत्याहि	कोणत्याहि
२६०	१६	नीतिवर्तनाचें	नीतिपरिवर्तनाचें
२६२	५	सुमारें २५०० रु.	सुमारें २००० रु.
२६२	८	विदर्भ प्रांतिक काँ. लाहि	विदर्भ प्रांतिक शहीद स्मारक समितीलाहि
२६५	१९	ता. आगस्ट	ता. १८ आगस्ट
२६५	२७	: indewnity :	indemnity
२६६	२२	बोळाबार	गोळीबार
२६७	५	टोळाबरोबर	टोळीबरोबर
२६८	१०	वीरांना शहीदांच्या	वीरांना व शहीदांच्या
२७०	२५	व तशाहि अवस्थेंत	अशा लोकांत
२७२	८	सांपडलेल्या	सांडलेल्या
२७२	२६	बकारामजी	बारकाजी
२७३	२	इत्यादि अविस्मरणीय	इत्यादि नांवें अविस्मरणीय
२७४	२६	तीर्थस्थानक्षेत्र	तीर्थस्थान

ना ग पू र प्र का श न,
सी ता ब र्डी, ना ग पू र

★

प्रकाशित वाङ्मय

मुद्रक : श्री लक्ष्मी-नारायण प्रेस, मुंबई २